# सूरह
# अल अनआम

# ६. अल अनआम

**नाव :** आयत क्र. १३६ ते १४५ मध्ये त्या अनेकेश्वरवादी बिदअतचे खंडन केले गेले आहे जी अनेकेश्वर वाद्यांनी अनआम अर्थात गुरांसबंधी बाळगली होती. तद्‌नुषंगाने या सूरतीचे नाव ''अनआम'' आहे.

**अवतरण काळ :** मक्केत अवतरली, आणि मजकूरावरून असे दिसून येते की मध्य काळात अवतरली असेल.

**मध्यवर्ती कल्पना:** अनेकेश्वर वादाचे खंडन आणि एकेश्वरवाद, आखिरत व रिसालत (प्रेषितत्व) संदर्भात इन्कार करणाऱ्यांच्या शंकांचे निराकरण करतांना त्यांना ईमानचे आमंत्रण. मागील तीन सूरतीमध्ये ग्रंथ धारकांवर प्रमाण प्रस्थापित केले गेले होते. या सूरतीमध्ये अनेकेश्वर वाद्यांवर प्रमाण प्रस्थापित केले गेले आहे.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ३ विषायारभाच्या आयती आहेत ज्यात सृष्टी निर्मात्याचा खरा परिचय दिला गेला आहे.

आयत क्र.४ ते २१ मध्ये अनेकेश्वरवादींच्या गोष्टींची पकड घेत त्यांच्या शंकांचे निराकरण केले गेले आहे.

आयत क्र. २२ ते ३२ मध्ये अल्लाहचा सहभागी ठरविणाऱ्यांची त्याच्या आयतींचा इन्कार करणाऱ्यांची व मरणोत्तर जीवनास नकार दर्शविणाऱ्यांची ती दशा वर्णिली गेली आहे जेव्हा कियामत घडून येईल आणि ते अल्लाह समक्ष उभे राहतील.

आयत ३३ ते ५५ मध्ये प्रेषिततत्व संबंधाने आक्षेप घेणाऱ्यांना उत्तर दिले गेले आहे. व त्यांना नकार दर्शविण्याच्या परिणामापासूनहि सावध केले गेले आहे. तसेच ईमान बाळगणाऱ्यांना माफी व दयेची शुभवार्ता दिली गेली आहे.

आयत ५३ ते ६७ मध्ये अल्लाहखेरीजच्या उपस्यांची उपासना करण्याबाबत उद्विग्नतेची घोषणा करण्याचा आदेश दिला गेला आहे व एकेश्वरवाद प्रस्तुत केला गेला आहे. आयत ६८ ते ७० मध्ये वक्रचर्चा करणाऱ्यांना त्यांच्या दशेवर सोडून देण्याचा आदेश दिला गेला आहे.

आयत ७१ ते ७३ मध्ये शिर्कचे खंडन व तौहीद (एकेश्वरवादा) चे सत्य प्रतिपादन आहे.

आयत ७४ ते ८३ मध्ये शिर्क व मूर्तिपूजेविरुद्ध आणि एकेश्वरवादाच्या समर्थनात हजरत इब्राहीम यांचे ते प्रमाण प्रस्तुत केले गेले आहे जे त्यांनी आपल्या जाती समूहासमोर सादर केले होते.

आयत ८४ ते ९० मध्ये अत्यंत प्रतिष्ठीत प्रेषितांचा सादर केले गेले आहे. की ते एकेश्वरवादावर कार्यरत होते आणि शिर्क शी त्यांचे अगदी दूरचेहि नाते नव्हते. त्यांचा मार्ग सन्मार्ग आहे.

आयत ९१ ते ९४ मध्ये 'वही' अवतरणा संबंधीच्या आक्षेपांना उत्तर देत ती परिस्थिती सादर केली गेली आहे जिच्याशी इन्कार करणाऱ्यांना मृत्यु समयी व कियामतीच्या दिवशी तोंड द्यावे लागेल.

आयत ९५ ते १०८ मध्ये त्या चिन्हांकडे लक्ष वेधले गेले आहे जी आकाशात व पृथ्वीवर पसरलेली आहेत तसेच माणसाच्या अंत:करणात अंतर्भूत आहेत. आणि ज्यावरून कसल्याहि सहभागाविना अल्लाहच एकटा ईश्वर असण्याचा पुरावा मिळतो आणि प्रत्येक प्रकारच्या शिर्कचे खंडन होते.

आयत १०९ ते ११५ मध्ये इन्कार करणाऱ्यांना त्यांच्या अयोग्य मागण्याबाबत तंबी केली गेली आहे.

आयत ११६ ते १२१ मध्ये या गोष्टीची ताकीद केली गेली आहे की, धर्म, व्यवहारात माणसाने लोकांच्या अनुमान गोष्टींनी प्रभावित होऊ नये आणि अनेकेश्वरवादी भ्रमापासून अलिप्त रहावे.

आयत १२२ ते १३५ मध्ये प्रेषिताचा विरोध करणाऱ्यांना त्यांच्या परिणामाबाबत सचेत केले गेले आहे.

आयत १३६ ते १५० मध्ये अनेकेश्वरवाद्यांच्या या मार्गभ्रष्टतेबाबत कानउघाडणी केली गेली आहे की त्यांनी संशय मनोवृत्ती बाळगून काही गुरांना हराम (अवैध) ठरविले आहे, आणि ते आपल्या देवांदिकांना प्रसन्न करण्याकरिता आपल्या संततीस भेट चढवितात तसेच शेती व गुराढोरां मध्येहि त्यांच्या नजराण्याकरिता हिस्सा निर्धारीत करतात.

आयत १५१ ते १५८ मध्ये ईश्वराने कोणत्या गोष्टी हराम ठरविल्या आहेत त्याचे संक्षिप्त निवेदन देत कुरआनावर ईमान आणण्याचे व त्याचे अनुसरण करण्याचे आवाहन केले गेले आहे.

आयत १५९ ते १६५ संभाषणाचा शेवट आहे. ज्यात ही घोषणा केली गेली आहे की ज्या लोकांनी वेगवेगळे धर्म बनविले आहेत त्यांचा ईश-धर्माशी कसलाहि संबंध नाही आणि प्रत्येक मनुष्य आपल्या आचरणास जबाबदार आहे.

# ६. सूरतुल अनआम

سُوْرَةُ الْأَنْعَامِ

**आयती - १६५**

**परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नांवाने**

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. प्रशांसा [१] अल्लाह करिताच आहे ज्याने आकाशांना व पृथ्वीला निर्माण केले [२] आणि अंध:कार व प्रकाश घडविला [३] तरीहि कुफ्र करणारे आपल्या पालनकर्त्याच्या समकक्ष ठरवितात.[४]

اَلْحَمْدُ لِلّٰهِ الَّذِيْ خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ وَجَعَلَ الظُّلُمٰتِ
وَالنُّوْرَ ۬ ثُمَّ الَّذِيْنَ كَفَرُوْا بِرَبِّهِمْ يَعْدِلُوْنَ ﴿١﴾

२. तोच होय की ज्याने तुम्हाला मातीपासून निर्माण केले [५] मग (जीवनाचा) एक अवधि निर्धारीत केला [६]आणि त्याच्याजवळ एक अन्य अवधिदेखील निर्धारीत आहे [७] तरीदेखील तुम्ही असे लोक आहात की शंका बाळगता. [८]

هُوَ الَّذِيْ خَلَقَكُمْ مِّنْ طِيْنٍ ثُمَّ قَضٰۤى اَجَلًا ؕ وَاَجَلٌ مُّسَمًّى
عِنْدَهٗ ثُمَّ اَنْتُمْ تَمْتَرُوْنَ ﴿٢﴾

३. आणि तोच अल्लाह आकाशांतहि आहे व पृथ्वीतहि [९] तुमच्या गुपित व प्रकट अशा सर्व गोष्टींना जाणतो आणि जे (चांगले वाईट) तुम्ही कमविता ते देखील त्याला माहित आहे.[१०]

وَهُوَ اللّٰهُ فِى السَّمٰوٰتِ وَفِى الْاَرْضِ ؕ يَعْلَمُ سِرَّكُمْ وَجَهْرَكُمْ
وَيَعْلَمُ مَا تَكْسِبُوْنَ ﴿٣﴾

४. त्यांच्या पालनकर्त्याच्या निशाण्यांपैकी एकही निशाणी अशी नाही जी त्यांच्याजवळ आली असेल व त्यांनी तिच्या बाबत उपेक्षा केली नसेल.[११]

وَمَا تَاْتِيْهِمْ مِّنْ اٰيَةٍ مِّنْ اٰيٰتِ رَبِّهِمْ
اِلَّا كَانُوْا عَنْهَا مُعْرِضِيْنَ ﴿٤﴾

५. यास्तव जेव्हा सत्य त्यांच्याजवळ आले तेव्हा त्यांनी त्यास खोटे ठरविले.[१२] तर ज्या गोष्टींची ते थट्टा उडवित राहिले तत्संबंधीच्या वार्ता लवकरच त्यांच्याजवळ पोहचतील.[१३]

فَقَدْ كَذَّبُوْا بِالْحَقِّ لَمَّا جَآءَهُمْ ؕ فَسَوْفَ يَاْتِيْهِمْ اَنْۢبٰٓؤُا مَا كَانُوْا
بِهٖ يَسْتَهْزِءُوْنَ ﴿٥﴾

६. काय यांनी हे पाहिले नाही की यांच्यापूर्वी आम्ही कित्येक जाती समूहांचा नाश केला आहे. ज्यांना आम्ही जमीनीवर ते सामर्थ्य प्रदान केले होते जे तुम्हाला प्रदान केले नाही.[१४]आम्ही त्यांच्यावर खूप वर्षाव करणारा पाऊस पाठविला होता. आणि त्यांच्या खाली जलप्रवाह प्रवाहित केले होते [१५] मग आम्ही त्यांच्या अपराधांमुळे त्यांना नष्ट केले आणि त्यांच्या नंतर अन्य जाती समूहांना उभे केले.

اَلَمْ يَرَوْا كَمْ اَهْلَكْنَا مِنْ قَبْلِهِمْ مِّنْ قَرْنٍ مَّكَّنّٰهُمْ فِى الْاَرْضِ
مَا لَمْ نُمَكِّنْ لَّكُمْ وَاَرْسَلْنَا السَّمَآءَ عَلَيْهِمْ مِّدْرَارًا ۪ وَّجَعَلْنَا
الْاَنْهٰرَ تَجْرِيْ مِنْ تَحْتِهِمْ فَاَهْلَكْنٰهُمْ بِذُنُوْبِهِمْ وَاَنْشَاْنَا
مِنْۢ بَعْدِهِمْ قَرْنًا اٰخَرِيْنَ ﴿٦﴾

१. हम्द (प्रशंसा) चे स्पष्टीकरण सूरह फ़ातिहा टीप क्र. २ मध्ये आले आहे.

२. अल्लाह आकाश व पृथ्वीचा निर्माण कर्ता आहे ही एक उघड वस्तुस्थिती आहे. जिला कसल्याही पुराव्याची गरज नाही. यहुदी व ख्रिश्चन तर यावर श्रद्धा बाळगूनच होते आणि अरबच्या अनेकेश्वर वाद्यांचाहि याबाबत इन्कार नव्हता आणि जो पर्यंत आकाशस्थ ग्रंथांचा संबंध आहे अस्तित्वात असलेल्या ग्रंथांमध्ये तौरात सर्वात प्राचीन ग्रंथ होय, ज्याचा आरंभ या वस्तुस्थितीच्या घोषणे द्वारे होतो.

''प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी हीं उत्पन्न केली''

(उत्पत्ति - १ : १)

या उघड वस्तुस्थितीचा इन्कार करण्याचे दु:साहस केवळ नास्तिकच करु शकलेत अथवा असे लोक जे विवेक बुद्धिला सोडून तत्वज्ञानीय विवादात व्यस्त राहिले, आणि हिंदू धर्मात सृष्टीच्या निर्माण कर्त्या विषयीची कल्पना बरीच गुंतागुंतीची आहे. ऋग्वेदात हे कोठेहि सांगितले गेले नाही की एखाद्या सर्वोच्च सत्ताधिकार बाळगणाऱ्या शक्तिने विश्‍व-निर्मिती केली आहे. त्यांच्या विविध देवादिकांचे जे कार्य वर्णिले गेले आहे ते केवळ एवढेच की त्यांनी विश्‍वाला एक विशिष्ट स्वरूप आणि एक विविष्ट स्थान दिले विश्‍वाला शून्यातून निर्माण केल्याचे नव्हे.

''It has not been said any where in the Rigveda that there was a creation of the world, the bringing into being of what was not existing by some superior power. The various gods related to the formation of the world. But not one of them 'created' The world. They gave the world a form and a position. (The Quintessence of the Rigveda P. 103) तथापि उपनिषिदात हे स्पष्टीकरण मिळते की सर्वात प्रथम आत्मा होता आणि त्याने या विश्‍वांना निर्माण केले. 'In the beginning all this was, verily, the Atman alone. There was nothing else living. He created these worlds' (The Essence of Principal Upanishads by swami Sivananda P. 136)

एका बाजूला ह्या गुरफटलेल्या गोष्टी आहेत तर दुसऱ्या बाजूला कुरआनाचे सृष्टीच्या निर्मात्या विषयी निवेदन जे किती स्पष्ट उचित व हृदयात खोलवर जाऊन पोहचणारे आहे !

३. याद्वारे अग्नि पूजकांच्या (Zorestrians) या कल्पनेचे खंडन होते की प्रकाश आणि अंध:काराचे ईश्‍वर वेगवेगळे आहेत त्यांनी आपल्या अनुमानानुसार एकाचे नाव ''यजदा'' तर दुसऱ्याचे नाव ''अहरमन'' ठेवले आहे. ''यजदां'' प्रकाश व मांगल्याचा ईश्‍वर आहे तर अहरमन अंध:कार व अपायाचा ईश्‍वर आहे या कल्पनेने त्यांना अग्नि-पूजक बनविले. दोन ईश्‍वरांच्या (Dualism) या श्रद्धेचा अर्थ या गोष्टीस मान्य करणे होय की या सृष्टीवर दोन विभिन्न शक्तिंचा अधिकार आहे, परंतु असे असते तर सृष्टीची ही व्यवस्था परिपूर्ण संतुलनासह कशी चालू शकली असती मग तर ही सृष्टी दोन परस्परविरूद्ध शक्तिंचे रणांगण बनले असते. हे एकच प्रमाण या श्रद्धेला खोटे ठरविण्यास पुरेसे आहे.

४. अर्थात ज्याअर्थी ही एक इन्कार न करण्याजोगी वस्तुस्थिती आहे की या समस्त सृष्टीला अल्लाहनेच निर्मिले आहे तेव्हा अन्य कोणी ईश्‍वर असण्याचा किंवा देवी देवता असण्याचा प्रश्‍न निर्माण होत नाही.

५. अर्थात हजरत आदम यांची निर्मिती मातीपासून झाली होती. व त्यांच्यापासून मानव-वंश चालत आला आहे.

६. अर्थात आचरणाची मोहलत जी मृत्युमुळे नाहीशी होते.

७. अर्थात तो अवधि जो समस्त माणसांना दुसऱ्यांदा जीवित करण्याकरिता निर्धारीत केलेल्या आहे. अर्थात कियामतीची वेळ.

८. अर्थात दुसऱ्यांदा जिवंत केले जाण्याबाबत मनुष्य अकारण संशयात पडला आहे. ज्याने मातीतून माणसाला निर्मिले तो त्याला दुसऱ्यांदा मातीतून उठवून उभा कसा करु शकत नाही? आणि ज्याने मृत्यु-समय निश्‍चित केला की कोणताहि मनुष्य त्यास टाळू शकत नाही, मग तो कियामतीची वेळ निर्धारीत का करु शकत नाही? आणि ज्याअर्थी मनुष्य आपल्या मृत्युची वेळ टाळू शकत नाही तर तो कियामतीची वेळ कशी बरे टाळू शकेल? ज्याप्रमाणे तो निर्धारीत समयी मरण भोगण्यास विवश असतो तद्वतच तो निर्धारीत समयी दुसऱ्यांदा जीवित होण्याकरिताहि विवश होईल.

९. याचा साधा सरळ अर्थ तोच जो सर्वसामान्य वाचकाच्या लक्षात येऊ शकतो व ज्याचे समर्थन नंतरच्या वाक्यानेहि होते अर्थात अल्लाह प्रत्येक ठिकाणी हजर आहे व पहात आहे व त्याची सत्ता आकाश व जमीनीच्या कणाकणावर कायम आहे.

राहीली आत्म्याच्या परकायां प्रवेशाची ही कल्पना की ईश्‍वरात्मा प्रत्येक वस्तूत संचारला आहे किंवा ही विचार प्रणाली की जे जे काही आहे ते सर्व ईश्‍वरच आहे तर ही अत्यंत अनेकेश्‍वरवादी कल्पना आहे आणि निर्मितीवरुन निर्मात्याचा कयास करण्याचे हे फल होय.

१०. आणि त्याच्या ज्ञानाची ही निकड आहे की त्याने मोबदल्याचा दिवस उदयास आणावा व प्रत्येकाला त्याच्या आचरणाचा मोबदला द्यावा. ती शक्ति की जिला प्रकट अप्रकट

सर्व गोष्टीचे ज्ञान आहे. तो त्यांचा हिशेब चुकता कसा करणार नाही?

११. क़ुरआनची प्रत्येक आयत अल्लाहची निशाणी आहे. यावरुन अल्लाहचा मार्ग स्पष्ट होतो व यासाठीहि की तो बोलका चमत्कार आहे, परंतु लोकांची अशी दशा आहे की या निशाण्यांबाबत त्यांनी उपेक्षा वर्तन अंगिकारले आहे.

१२. अर्थात प्रथम तर यांनी अल्लाहच्या आयतीसंबंधी उपेक्षा अंगिकारली परंतु जेव्हा यांच्यामुळे सत्य अगदी उघडपणे समोर आले तेव्हा त्यास खोटे ठरविण्यास प्रवृत्त झाले.

१३. अर्थात क़ुरआन ज्या गोष्टींवर ईमान बाळगण्याचे आवाहन करीत आहे त्यांची ते थट्टा उडवित आहेत परंतु जेव्हा याचा परिणाम त्यांच्यासमोर येईल तेव्हा त्यांना माहित होईल की वस्तुस्थिती काय होती.

१४. हे कुरेश जमातीस अर्थात मक्केच्या मूर्तिपूजकांना संबोधून म्हटले गेले आहे की तुम्ही कसल्या घमेंडीत आहात? जर तुम्हाला आपल्या जाती सामूहिक बाळाचा गर्व आहे तर तुम्हाला हे माहित झाले पाहिजे की तुमच्यापूर्वी तुमच्याहून कित्येक पटींनी शक्तिशाली जातीसमूह होऊन गेले आहेत ज्यांच्या ऐश्वर्याची त्या काळात मोठी ख्याति होती. परंतु जेव्हा त्यांनी प्रेषितांना खोटे ठरविले व बंड केले तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांचा नाश केला हीच गत तुमचीदेखील होऊ शकते जर तुम्ही स्वत:चा तोल सावरला नाही.ज्या जाती समूहांना गुन्ह्यांचा मोबदला म्हणून ठार केले गेले त्यांचा किस्सां पुढे सूरह अअराफ मध्ये वर्णिला गेला आहे.

१५. अर्थात त्या जाती समूहांना शक्ति सामर्थ्याखेरीज उपजीविकेची समृद्धताहि प्रदान केली गेली होती.

**(हे पैगंबर) जर आम्ही तुमच्यावर कागदावर लिहिलेला ग्रंथ अवतरीत केला असता आणि यांनी त्यास आपल्या हातांनी स्पर्शहि केला असता तरीहि ज्यांनी कुफ्र केले आहे ते हेच म्हणाले असते की ही तर स्पष्ट जादू आहे. आणि असे म्हणतात की यावर एख़ादा फिरिश्ता का उतरविला गेला नाही ? जर आम्ही एख़ादा फिरिश्ता अवतरीत केला असता तर या गोष्टीचा फैसलाच झाला असता मग यांना मोहलत दिली गेली नसती. *(अल-क़ुरआन)***

७. (हे पैगंबर) जर आम्ही तुमच्यावर कागदावर लिहिलेला ग्रंथ अवतरीत केला असता आणि यांनी त्यास आपल्या हातांनी स्पर्शहि केला असता तरीहि ज्यांनी कुफ्र केले आहे ते हेच म्हणाले असते की ही तर स्पष्ट जादू आहे. [१६]

وَلَوْ نَزَّلْنَا عَلَيْكَ كِتٰبًا فِيْ قِرْطَاسٍ فَلَمَسُوْهُ بِاَيْدِيْهِمْ لَقَالَ
الَّذِيْنَ كَفَرُوْٓا اِنْ هٰذَآ اِلَّا سِحْرٌ مُّبِيْنٌ ⑦

८. आणि असे म्हणतात की यावर एखादा फिरिश्ता का उतरविला गेला नाही ?– जर आम्ही एखादा फिरिश्ता अवतरीत केला असता तर या गोष्टीचा फैसलाच झाला असता मग यांना मोहलत दिली गेली नसती [१७]

وَقَالُوْا لَوْلَآ اُنْزِلَ عَلَيْهِ مَلَكٌ ؕ وَلَوْ اَنْزَلْنَا مَلَكًا لَّقُضِيَ
الْاَمْرُ ثُمَّ لَا يُنْظَرُوْنَ ⑧

९. आणि जर आम्ही फिरिश्त्यास पैगंबर बनवून पाठविले असते तर मनुष्य-स्वरुपातच पाठविले असते व यांना त्याच संशयात टाकले असते, जसा संशय ते आज करीत आहेत.[१८]

وَلَوْ جَعَلْنٰهُ مَلَكًا لَّجَعَلْنٰهُ رَجُلًا وَّلَلَبَسْنَا عَلَيْهِمْ مَّا
يَلْبِسُوْنَ ⑨

१०. आणि (हे पैगंबर) तुमच्या पूर्वीहि प्रेषितांची थट्टा उडविण्यात आली होती तर ज्या लोकांनी थट्टा उडविली होती त्यांना त्याच गोष्टीने येऊन घेरले ज्याची ते थट्टा उडवित होते. [१९]

وَلَقَدِ اسْتُهْزِئَ بِرُسُلٍ مِّنْ قَبْلِكَ فَحَاقَ
بِالَّذِيْنَ سَخِرُوْا مِنْهُمْ مَّا كَانُوْا بِهٖ يَسْتَهْزِءُوْنَ ⑩ ع

११. सांगा जमीनीवर हिंडून फिरुन पहा की खोटे ठरविणाऱ्यांचा कसा शेवट झाला. [२०]

قُلْ سِيْرُوْا فِي الْاَرْضِ ثُمَّ انْظُرُوْا كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ
الْمُكَذِّبِيْنَ ⑪

१२. यांना विचारा आकाशात व जमीनीवर जे काही आहे ते कोणाचे आहे ? सांगा अल्लाहचेच आहे [२१] त्याने स्वतः करिता दयेस अत्यावश्यक केले आहे. [२२] तो अवश्य तुम्हाला कियामतीच्या दिवशी एकत्र करील, ज्यात काहीहि शंका नाही [२३] ज्या लोकांनी स्वतःला तोट्यात टाकले आहे तेच ईमान बाळगत नाही. [२४]

قُلْ لِّمَنْ مَّا فِي السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ؕ قُلْ لِّلّٰهِ ؕ كَتَبَ عَلٰى
نَفْسِهِ الرَّحْمَةَ ؕ لَيَجْمَعَنَّكُمْ اِلٰى يَوْمِ الْقِيٰمَةِ لَا رَيْبَ فِيْهِ ؕ اَلَّذِيْنَ
خَسِرُوْٓا اَنْفُسَهُمْ فَهُمْ لَا يُؤْمِنُوْنَ ⑫

१३. रात्र आणि दिवसामध्ये जे काही सामावले आहे त्याच्याच करिता आहे [२५] आणि तो सर्व काही ऐकणारा व जाणणारा आहे.

وَلَهٗ مَا سَكَنَ فِي الَّيْلِ وَالنَّهَارِ ؕ وَهُوَ السَّمِيْعُ الْعَلِيْمُ ⑬

१६. अर्थात ज्या लोकांनी मान्य न करण्याची शपथ घेतली आहे त्यांना मग एखादी निशाणी दाखविली गेली तर ते मान्य करणार नाहीत.जर कुरआन लिखित स्वरुपात ग्रंथ रूपाने अवतरीत केले जाते तरीदेखील जे लोक हट्टीपणा बाळगून आहेत त्यांनी या ग्रंथास ईश ग्रंथ न मानण्याकरिता काही ना काही सबब मांडली असती. आणि तरीहि त्यांच्या मनासारखे झाले नसते तर याला जादू म्हटले असते यास्तव अशा लोकांच्या आक्षेपांना मुळीच भीक घालू नये.

१७. इन्कार करणाऱ्यांचा दुसरा आक्षेप हा होता की जर खरोखर हा मनुष्य पैगंबर आहे तर याच्यावर आकाशातून फिरिश्ता का नाही अवतरला की जेणेकरुन आम्हीहि त्याला पाहिले असते, आणि त्याने ऐलान केले असते की या मनुष्यास अल्लाहने पैगंबर बनवून पाठविले आहे त्याच्या या आक्षेपास हे उत्तर दिले गेले आहे. की फिरिश्त्यास अशा प्रकारे अवतरीत करण्याच्या स्थितीत आचरणाची ती मोहलत बाकी राहणार नाही जी तुम्हाला दिली गेली आहे, किंबहुना ती निर्णयाची वेळ ठरेल. कारण आचरणाची संधी तोपर्यंतच आहे जोपर्यंत कसोटी अवसर बाकी आहे परंतु जेव्हा फिरिश्ते उतरु लागावेत व अपरोक्ष अपरोक्ष न रहावे तर अशा स्थितीत ईमान बाळगण्याची कोणती गरज शिल्लक राहते? यास्तव फिरिशत्यांचे अशा प्रकारे अवतरित होणे सर्वश्रेष्ट अल्लाहच्या त्या योजेने विरूद्ध आहे जी त्याने माणसाची परीक्षा घेण्याच्या हेतुने बनविली आहे.

१८. अर्थात फिरिश्त्यांच्या अवतरित होण्याची दुसरी स्थिती ही असू शकत होती ही फिरिश्त्यास रसूल बनवून मनुष्य स्वरुपात पाठविले गेले असते. या स्थितीतहि या लोकांना तीच शंका आली असती जी आता येत आहे अर्थात त्यांनी असे म्हटले असते की हा तर मनुष्य आहे. हा पैगंबर कसा असू शकतो?

१९. अर्थात ज्या शिक्षेची ते थट्टा उडवित होते ती त्यांच्या वर लादली गेली.

२०. अर्थात ज्या जाती समूहांकडे प्रेषित पाठविले गेले व ज्यांनी त्यांना खोटे ठरविले ते अल्लाहच्या शिक्षा-कथेत आले. यांच्या त्या सर्वनाशाचे अवशेष भग्न इमारतींच्या स्वरूपात विद्यमान आहेत उदा. 'कुरा खिंड' मध्ये समूदच्या नाशाचे अवशेष व तेहि अवशेष जे इतिहासाच्या पृष्ठांमध्ये अंकित आहेत उदा. इजिप्तमध्ये फिरऔनची दुष्परिणिती (त्याचे शव आजदेखील धडा घेण्यासाठी अस्तित्वात आहे) इत्यादि.

कुरआन या प्रकारच्या ऐतिहासिक स्थळांचे अवलोकन करण्याकरिता प्रवास करण्याचे आवाहन करतो. मात्र यासाठी नव्हे की ही स्थळे मनोरंजनाची सामुग्री व्हावी. किंवा जास्त माहिती व्हावी किंबहुना यासाठी की या स्थळांचे अवलोकन बोध घेण्यास कारणीभुत व्हावे.

आज मनुष्य फार मोठ्या प्रमाणात प्रवास करतो व हा प्रवास तो वेगवेगळ्या उद्देश्यांनी करतो, परंतु बोध घेण्याच्या उद्देश्याने मात्र करीत नाही.

२१. अर्थात तुम्ही त्यांना हा प्रश्न अवश्य विचारा की आकाश व जमीनीवर जे काही अस्तित्वात आहे त्यांचा मालक कोण आहे? यासाठी की त्यांनी विचारचिंतन करावे व खऱ्या वस्तुस्थिती प्रत पोहचावे, तरीपण तुम्ही आपले हे उत्तर त्यांना ऐकवा की सर्व काही अल्लाहचेच आहे, अशासाठी की वस्तुस्थिती प्रकट व्हावी.

२२. अर्थात त्याला दया करण्यासाठी कोणी विवश केले नाही, तथापि त्याने स्वत:च हा निर्णय घेतला आहे की तो आपल्या दासांवर मेहरबान होईल.

२३. अर्थात कियामतीच्या दिवशी सर्वांना एकत्रित करणे ही त्याच्या दयेची निकड होय. कियामत जरी भयानक स्वरुपात प्रकट होईल व इन्कार करणाऱ्यांवर ईश-प्रकोप होईल, तरी मात्र कियामत प्रकट होण्याचा हा फक्त एक पैलू असेल. दुसरा पैलू जो याहून अधिक महत्वपूर्ण व प्रमाणित परिणामांनी युक्त आहे तो असा की अल्लाह आपल्या एकनिष्ठ दासांवर आपल्या अमर्याद कृपेचा वर्षाव करील आणि ते सदैव त्याच्या कृपेने लाभान्वित होतील.

२४. अर्थात ज्या लोकांना या गोष्टीत काहीहि स्वारस्य नाही की कियामतीच्या दिवशी अल्लाहच्या कृपेचा जो वर्षाव होणार आहे त्याचा लाभा घ्यावा, ते यापासून वंचित राहणार आहेत.आणि अल्लाहच्या कृपेपासून वंचित राहणे फार मोठ्या तोट्यास कारणीभूत ठरेल असा तोटा जो अनंत-नाशासमान आहे.

२५. अर्थात तो स्थळ काळावदि सर्वांचा स्वामी आहे. रात्र व दिवसांची अवस्था त्याच्याकरिता समान आहे कोणतीहि वस्तू कोणत्याहि स्थितीत त्याच्या अधिकारा पलिकडे नाही.

१४. सांगा-काय मी अल्लाहला सोडून जो आकाशांचा व जमीनीचा निर्माता आहे आणि जो (सार्वांना) खाऊ घालतो व असा कोणी नाही जो त्याला खाऊ घालील,[२६] इतर कोणास वली (गरज भागविणारा) बनवू. [२७] सांगा मला तर हाच आदेश दिला गेला आहे की मी सर्वात. प्रथम स्वतःला त्याच्या सुपूर्द करणारा व्हावे [२८] आणि (हे पैगंबर) तुम्ही कदापि अनेकेश्वर वाद्यांपैकी होऊ नका.[२९]

قُلْ اَغَيْرَ اللّٰهِ اَتَّخِذُ وَلِيًّا فَاطِرِ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَهُوَ
يُطْعِمُ وَلَا يُطْعَمُ ؕ قُلْ اِنِّيْٓ اُمِرْتُ اَنْ اَكُوْنَ اَوَّلَ مَنْ
اَسْلَمَ وَلَا تَكُوْنَنَّ مِنَ الْمُشْرِكِيْنَ ﴿١٤﴾

१५. सांगा जर मी आपल्या पालन कर्त्याची अवज्ञा करीन तर मला एका मोठ्या दिवसाच्या शिक्षेचे भय आहे.[३०]

قُلْ اِنِّيْٓ اَخَافُ اِنْ عَصَيْتُ رَبِّيْ عَذَابَ يَوْمٍ عَظِيْمٍ ﴿١٥﴾

१६. त्या दिवशी ज्याला या शिक्षेपासून वाचविले गेले त्यावर अल्लाहने दया केली. आणि ही उघड सफलता आहे.[३१]

مَنْ يُّصْرَفْ عَنْهُ يَوْمَئِذٍ فَقَدْ رَحِمَهٗ ؕ وَ ذٰلِكَ
الْفَوْزُ الْمُبِيْنُ ﴿١٦﴾

१७. आणि जर अल्लाह तुम्हाला एखाद्या संकटात टाकील तर त्यास दूर करणारा त्याच्या खेरीज कोणीहि नाही आणि जर एखादा भलेपणा पोहचविल तर तो प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो.[३२]

وَاِنْ يَّمْسَسْكَ اللّٰهُ بِضُرٍّ فَلَا كَاشِفَ لَهٗٓ اِلَّا هُوَ ؕ وَاِنْ
يَّمْسَسْكَ بِخَيْرٍ فَهُوَ عَلٰى كُلِّ شَيْءٍ قَدِيْرٌ ﴿١٧﴾

१८. आणि तो आपल्या दासांवर प्रभाव शक्ति बाळगणारा आहे [३३] आणि तो बुद्धि कौशल्य बाळगणाराहि आहे व जाणकारहि.[३४]

وَهُوَ الْقَاهِرُ فَوْقَ عِبَادِهٖ ؕ وَهُوَ الْحَكِيْمُ الْخَبِيْرُ ﴿١٨﴾

१९. (यांना) विचारा. सर्वात श्रेष्ट साक्ष कुणाची आहे? सांगा अल्लाह माझ्या व तुमच्या दरम्यान साक्षी आहे [३५] आणि हे क़ुरआन माझ्याकडे उतरविले गेले आहे अशासाठी की मी या द्वारे तुम्हाला सचेत करावे [३६] आणि त्यांनाहि ज्यांना हे पोहचेल [३७] काय तुम्ही साक्ष देता की अल्लाहसह इतर ईश्वर देखील आहेत? सांगा मी तर याची साक्ष देत नाही सांगा फक्त तोच एक ईश्वर आहे [३८]आणि तुम्ही ज्यांना सहभागी ठरविता मी त्यांच्यापासून उद्विग्न आहे.

قُلْ اَيُّ شَيْءٍ اَكْبَرُ شَهَادَةً ؕ قُلِ اللّٰهُ ۙ شَهِيْدٌۢ بَيْنِيْ وَبَيْنَكُمْ ۟
وَاُوْحِيَ اِلَيَّ هٰذَا الْقُرْاٰنُ لِاُنْذِرَكُمْ بِهٖ وَمَنْۢ بَلَغَ ؕ اَئِنَّكُمْ
لَتَشْهَدُوْنَ اَنَّ مَعَ اللّٰهِ اٰلِهَةً اُخْرٰى ؕ قُلْ لَّآ اَشْهَدُ ۚ قُلْ اِنَّمَا
هُوَ اِلٰهٌ وَّاحِدٌ وَّاِنَّنِيْ بَرِيْٓءٌ مِّمَّا تُشْرِكُوْنَ ﴿١٩﴾

२६. खाणेपिणे हा निर्मितीचा गुणधर्म आहे. निर्माणकर्त्याचा नव्हे अल्लाह निर्माण कर्ता आहे व त्याला खाण्यापिण्याची आवश्यकता लागू होत नाही. या उलट अनेकेश्वरवादी आपल्या देवादिकांसंबंधी खाण्यापिण्याची श्रद्धा बाळगतात. यास्तव भारतातील अनेकेश्वरवादाची आपल्या देवादिकांसंबंधी अशी कल्पना आहे की ते खास प्रकारचे पेय (सोमरस) पिऊन जिवंत राहतात आणि होहि मोठे विचित्र होय की मूर्त्रिपूर्जक आपल्या उपास्यांसमोर भोजन (नैवद्य) ठेवतात.

२७. अर्थात ज्याअर्थी आकाशांना व जमीनीला अभावतून अस्थित्वात आणणारा केवळ अल्लाह आहे आणि सर्वांच्या खाण्यापिण्याची व संगोपनाची व्यवस्था तोच एकटा करीत आहे मात्र स्वत: खाण्यापिण्याची गरज बाळगत नाही तेव्हा त्याच्याखेरीज इतर कुणाला ईश्वर ठरविण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. गरज पूर्ति करणारा ज्याअर्थी तोच एकटा आहे व सर्व त्याचे गरजवंत आहेत तर गरजवंतास गरजपूर्ति करणाऱ्यांचा दर्जा, यात शहाणपण कसले?

२८. पैगंबर इतरांना ईशोपासनेचे आवाहन देण्याआधी स्वत: यावर अनुसरण करणारा असतो. तो अल्लाहच्या आदेशानुसार आपल्या कार्याचा आरंभ स्वत:पासून करतो, म्हणजे तो स्वत:ला पूर्णत: अल्लाहच्या हवाली करतो. अशाप्रकारे की तो फक्त अल्लाहचीच उपासना करील व त्यांचा जो काही आदेश असेल तो अमलात आणील.

ईश्वराच्या या आदेशात व पैगंबराच्या या नितीत सत्यप्रिय असलेल्या प्रत्येक मनुष्याकरिता हे मार्गदर्शन आहे की सत्या धर्माबाबत त्याने सर्वप्रथम आपली ही जबाबदारी पार पाडावी जी त्याच्याशी संबंधित आहे, याचा विचार न करता की लोक आपल्या जबाबदारींना पूर्ण करतात किंवा नाही कारण सर्वात आधी त्याला ईश्वरासमोर आपल्या स्वत:संबंधी जाब द्यावा लागेल.

२९. यावरुन मुस्लिम व अनेकेश्वरवादी यांच्यातील फरक स्पष्ट होतो. मुस्लिम स्वत:ला पूर्णपणे अल्लाहच्या हवाली करतो याऊलट अनेकेश्वरवादी स्वत:ला अल्लाहच्या हवाली कधीहि करत नाही. तो ईश्वर मानत असला तरी काही राखीव (Reservations) ठेवूनच, कारण त्याची निष्ठा वेगवेगळ्या ईश्वरांमध्ये वाटलेली असते.

३०. आर्थात कियामतीच्या दिवसाच्या शिक्षेचे भय आणि हे भय प्रत्येक ईश दासाला असले पाहिजे पैगंबरदेखील याला अपवाद नाहीत.

३१. अर्थात खरी सफलता हीच आहे की मनुष्याने कियामतीच्या दिवशी अल्लाहच्या शिक्षेपासून सुरक्षित असावे. आज जरी लोकांना या गोष्टीची जाणीव नाही, तरी कियामतीच्या दिवशी त्यांना याची जाणीव निश्चितच होईल.

३२. अर्थात सुख दु:ख पोहचविणे सर्व काही अल्लाहच्या हाती आहे अन्य कोणाबाबत तो दु:ख निवारण करुन सुख प्रदान करु शकतो अशी श्रद्धा बाळगणे म्हणजे मूळातचा अस्तित्वात नसलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवणे ''मुश्किल कुशा'' (विघ्नहर्ता)''गौस'' (गाऱ्हाणे ऐकणारा) व ''बिगडी के बनाने वाले'' (बिघडलेले कार्य बनविणारा)या सर्व उपाध्या लोकांनी अल्लाह खेरीजच्या उपास्याकरिता वापरल्या आहेत त्या सर्व उपाध्या निरर्थक आहेत खरे पाहिले असता वस्तु स्थितीशी याचा दूरचा देखील संबंध नाही.

३३. अर्थात दास पूर्णत: त्याच्या ताब्यात व त्याच्या तावडीत आहेत तो ज्या दासाला ज्या स्थितीत राखू इच्छिल तर अशी कोणतीहि शक्ति नाही जी त्याला यापासून रोखू शकेल.

३४. या विशेषणांचा उल्लेख करण्याचा उद्देश हे स्पष्ट करणे होय की अल्लाह या गुण वैशिष्ट्यांनी युक्त आहे. म्हणून त्याचे उपासनीय असणे अगदी सत्य आहे. राहिलेत अनेकेश्वर वाद्यांची दैवते तर ज्या अर्थी या गुणवैशिष्ट्यांपैकी एकदेखील गुण त्यांच्यात आढळून येत नाही. तर ते देव म्हटले जाण्यास पात्र कसे? त्यांना उपासनीय कोणत्या आधारावर ठरवले जावे?

३५. अर्थ हा की ज्या अर्थी केवळ अल्लाह जमीन व आकाशांचा निर्माण कर्ता आहे तर तोच हे दर्शवू शकतो की त्याने आपल्या ईश्वरत्वात एखाद्यास सहभागी केले आहे किंवा नाही. त्याने दर्शविल्याविना तुमचा हा दावा की त्याने अमुक अमुक ला आपल्या ईश्वरत्वात सहभागी केले आहे. एक निराधार दावा आहे. ईश्वरत्वा संबंधी सृष्टीच्या निर्माण कर्त्याची साक्षच सर्वात जास्त विश्वसनीय व निर्णायक असू शकते आणि मी याची साक्ष सादर करीत आहे आणि साक्ष कुरआनच्या रूपाने तुमच्या समोर विद्यमान आहे.

३६. अर्थात कुरआन अल्लाहचा ग्रंथ आहे यास्तव तो अल्लाहची साक्ष असणे अगदी स्पष्ट आहे आणि त्याची साक्ष ही आहे की त्याच्या ईश्वरत्वात कोणीहि सहभागी नाही. आणि कुरआन यासाठी अवतरीत केले गेले आहे की ईश्वराचा सहभागी ठरविणाऱ्यांना या गोष्टीविषयी सावध केले जावे की त्यांना अपराधयाची कठोर शिक्षा भोगावी लागेल.

३७. याचा अर्थ कुरआन केवळ मक्केच्या लोकांकरिता किंवा अरब लोकांकरिताच नाही किंबहुना अरब व इतर सर्वांकरिता आहे. ज्या ज्या व्यक्तिपर्यंत आणि जाती समूहापर्यंत हे पोहचेल त्या सर्वांकरिता हे प्रमाण प्रस्थापित होईल की पैगंबराने त्यांना अल्लाहचा आदेश पोहचविला होता व त्याने शिर्क कुफ्र व विद्रोहाच्या दुष्परिणिती बाबत खबरदार केले होते.

३८. अर्थात खरी गोष्ट ही आहे की अल्लाह हाच ईश्वर आहे व तोच खराखुरा उपास्य आहे. त्याच्या खेरीज ना कोणी ईश्वर आहे ना कोणी उपासनीय.

२०. ज्या लोकांना आम्ही ग्रंथ दिला आहे ते यास अशाप्रकारे ओळखतात ज्याप्रमाणे आपल्या पुत्रांना ओळखतात [३९] (परंतु) ज्या लोकांनी स्वत:ला हानीग्रस्त केले आहे ते ईमान बाळगत नाहीत.

الَّذِينَ آتَيْنَاهُمُ الْكِتَابَ يَعْرِفُونَهُ كَمَا يَعْرِفُونَ أَبْنَاءَهُمُ
الَّذِينَ خَسِرُوا أَنفُسَهُمْ فَهُمْ لَا يُؤْمِنُونَ ﴿٢٠﴾

२१. आणि जो अल्लाहबाबत खोटे नाटे रचील किंवा त्याच्या आयतींना खोटे ठरविल तर त्याहून अधिक अत्याचारी कोण असेल?[४०]नि:संशय अत्याचारींना कधीहि सफलता प्राप्त होणार नाही.

وَمَنْ أَظْلَمُ مِمَّنِ افْتَرَىٰ عَلَى اللَّهِ كَذِبًا أَوْ كَذَّبَ بِآيَاتِهِ ۗ إِنَّهُ
لَا يُفْلِحُ الظَّالِمُونَ ﴿٢١﴾

२२. आणि ज्या दिवशी [४१] आम्ही या सर्वांना एकत्र करु तेव्हा सहभागी ठरविणाऱ्यांना विचारु की तुमचे ते सहभागी कोठे आहेत ज्याना तुम्ही (ईश्वराचा) सहभागी समजत होते?

وَيَوْمَ نَحْشُرُهُمْ جَمِيعًا ثُمَّ نَقُولُ لِلَّذِينَ أَشْرَكُوا أَيْنَ
شُرَكَاؤُكُمُ الَّذِينَ كُنتُمْ تَزْعُمُونَ ﴿٢٢﴾

२३. मग ते या खेरीज अन्य कोणतीहि सबब सांगू शकणार नाही की अल्लाह आमच्या पालन कर्त्याची शपथ आम्ही अनेकेश्वरवादी नव्हतो.[४२]

ثُمَّ لَمْ تَكُن فِتْنَتُهُمْ إِلَّا أَن قَالُوا وَاللَّهِ رَبِّنَا مَا كُنَّا
مُشْرِكِينَ ﴿٢٣﴾

२४. पहा, हे कसे स्वत: विरुद्धच खोटे बोलू लागले आणि यांनी जे काही रचले होते ते सर्व यांच्यापासून नाहीसे होईल.[४३]

انظُرْ كَيْفَ كَذَبُوا عَلَىٰ أَنفُسِهِمْ ۚ وَضَلَّ عَنْهُم
مَّا كَانُوا يَفْتَرُونَ ﴿٢٤﴾

२५. यांच्यात काही लोक असे आहेत जे तुमच्याकडे कान लावतात, परंतु आम्ही यांच्या अंत:करणावर आवरणे घातली आहेत की काहीच समजू नये आणि यांच्या कानात बधिरता टाकली आहे [४४] ते प्रत्येकप्रकारची निशाणी पाहतील, तरीहि त्यावर ईमान बाळगणार नाहीत, येथपावेतो की जेव्हा तुमच्याजवळ येऊन तुमच्याशी भांडतात तेव्हा हे काफीर असे म्हणू लागतात की या तर पूर्वीच्या लोकांच्या कथा आहेत.[४५]

وَمِنْهُم مَّن يَسْتَمِعُ إِلَيْكَ ۖ وَجَعَلْنَا عَلَىٰ قُلُوبِهِمْ أَكِنَّةً
أَن يَفْقَهُوهُ وَفِي آذَانِهِمْ وَقْرًا ۚ وَإِن يَرَوْا كُلَّ آيَةٍ لَّا يُؤْمِنُوا
بِهَا ۚ حَتَّىٰ إِذَا جَاءُوكَ يُجَادِلُونَكَ يَقُولُ الَّذِينَ كَفَرُوا إِنْ هَٰذَا
إِلَّا أَسَاطِيرُ الْأَوَّلِينَ ﴿٢٥﴾

२६. ते इतरांनाहि यापासून रोखतात आणि स्वत:देखील यापासून दूर राहतात (असे करुन) ते स्वत:वरच विनाश ओढवून घेत आहेत परंतु यांना त्याची जाणीव नाही.

وَهُمْ يَنْهَوْنَ عَنْهُ وَيَنْأَوْنَ عَنْهُ ۖ وَإِن يُهْلِكُونَ
إِلَّا أَنفُسَهُمْ وَمَا يَشْعُرُونَ ﴿٢٦﴾

३९. अर्थात ज्या प्रकारे एखाद्याला आपल्या संततीस ओळखण्यात संदेह नसतो तद्वतच जे लोक आकाशातून अवतरित झालेले ग्रंथ बाळगून आहेत त्यांना या पैगंबरास ओळखण्यात संदेह होत नाही, कारण त्यांना हे चांगल्या प्रकारे माहित आहे की ईश ग्रंथांमध्ये (तौरात व इंजीलमध्ये) येणाऱ्या पैगंबरासंबंधी जी सूचक चिन्हे आहेत त्याचे यथार्थ उदाहरण पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) होत.

या आयतीचा इशारा ग्रंथ बाळगणाऱ्यांच्या सत्यप्रिय समूहाकडे आहे व याद्वारे अनेकेश्वरवाद्यांना हे स्पष्ट करण्याचा उद्देश आहे की पैगंबर व क़ुरआन एखाद्या अंतरिक्षात प्रकट झाले नाही, किंबहुना त्याला ठोस आधार आहेत. याचा संबंध ईश्वराच्या याच मार्गदर्शन क्रमाशी आहे जो पहिल्या पासून चालत आला आहे.

४०. इन्कार करणाऱ्यांना विचार चिंतनाचे हे आवाहन आहे की जर तुमचा हा आरोप खरा आहे की या मनुष्याने (पैगंबराने) प्रेषितत्वाचा खोटा दावा केला आहे तर मग त्याने अल्लाह विषयी सर्वात मोठे असत्य रचले आहे यास्तव तो सर्वात मोठा अत्याचारी ठरतो. परंतु काय तुम्हाला हा मनुष्य खरोखरच या पातळीचा दिसून येतो? सत्याचे मूर्त स्वरूप असलेला हा मनुष्य एवढे मोठे असत्य रचू शकतो काय? जर याचे उत्तर आता नकारार्थी आहे तर मात्र विचार करा की तुमचे स्थान काय आहे? अल्लाहच्या आयतींचा इन्कार करुन तुम्ही स्वत:ला सर्वात मोठा अत्याचारी व अपराधी सिद्ध करीत नाही काय?

या आयतीच्या मतितार्थाचा एक पैलू हा हि आहे की जो मनुष्य ईश्वरावर हे कुभांड रचील की त्याने आपल्या ईश्वरत्वात अमुक एखाद्यास सहभागी केले आहे तर त्याहून मोठा अत्याचारी कोणी नाही. तद्वतच जो मनुष्य अल्लाहच्या आयतींना खोटे ठरवील तर त्याहून मोठा अपराधी कोणी नाही.

४१. अर्थात कियामतीच्या दिवशी.

४२. अर्थात आज तर हे अनेकेश्वरवादी आपल्या उपास्यांना सोडायला तयार नाहीत परंतु उद्या जेव्हा त्यांना आपण ईश-न्यायालयात हजर असल्याचे आढळून येईल तर त्यांना आपल्या अनेकेश्वरवादी कृत्यांबद्दल काहीच उत्तर देता येणार नाही आणि दु:खदायक शिक्षेचे भय त्यांना इतके बेभान करील की शिर्क संबंधी उद्विग्नता जाहीर करण्याकरिता ते खोटे बोलायला कचरणार नाहीत परंतु त्याचे हे असत्य त्यांच्याच तोंडावर मारले जाईल.

४३. अर्थात ज्यांना ज्यांना यांनी ईश-दर्जा देऊन ठेवला होता ते सर्व गायब होतील व त्यांचा कोणताही ईश्वर त्यांच्या सहाय्यार्थ धावून येणार नाही.

४४. अर्थात काही लोक पैगंबरांच्या गोष्टी ऐकतात परंतु सत्य स्वीकृतिच्या हेतूने नव्हे तथापि व्यर्थ विवादा करिता आणि अल्लाहचा हा निर्णय आहे की जो मनुष्य मुक्त बुद्धिने सत्य-गोष्टी ऐकण्यास व समजून घेण्यास. प्रवृत्त नसतो त्याला सत्य स्वीकृतिची सुबुद्धि प्रदान केली जात नाही आणि इच्छा आकांशाचे पडदे त्याच्या अंतक:रणावर असे पडतात की आवाहकाने किती ही सबळ प्रमाण प्रस्तुत केले तरी त्याच्या मनावर काहीहि परिणाम होत नाही. अर्थात हा परिणाम अल्लाहने निर्धारीत केलेल्या नियमानुसार म्हणजे स्वभाव-नियमानुसार व्यक्त होतो. म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाह याचे या प्रकारे वर्णन करतो की आम्ही त्यांच्या अंत:करणांवर आवरणे घातली आहेत किंवा आम्ही त्यांच्या कानांमध्ये बधिरता निर्माण केली आहे.

आधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. १५

४५. कुरआनात भुतकालीन जाती समूहांचा जो इतिहास प्रस्तुत केला गेला आणि पैगंबरांना खोटे ठरविणाऱ्यांच्या सर्वनाशाच्या ज्या घटना वर्णिल्या गेल्या आहेत त्या सर्व सत्याधारित आहेत व अशासाठी वर्णिल्या गेल्या आहेत की लोकांनी बोध घ्यावा आणि जातीसमूहांच्या उतकर्ष व-हासांच्या मूळ कारणापासून त्यांनी सचेत व्हावे. परंतु कुरआनचा इन्कार करणारे याउपरान्त म्हणत की प्राचीन कथा होत ज्या आम्हाला ऐकविल्या जात आहेत आणि आजचे इन्कार करणारेहि हीच कल्पना करतात की या सनातनी गोष्ट आहेत.

२७. जर तुम्ही त्या वेळेची स्थिती पाहिली असती जेव्हा त्यांना जहन्नम किनारी उभे केले जाईल. त्यावेळी ते म्हणतील. जर आम्हाला (जगात) पुन्हा परत पाठविले गेले व आपल्या पालन कर्त्याच्या आयती खोट्या न ठरविल्या व ईमान बाळगणारांमध्ये सामील झालो तर किती बरे होईल. [४६]

وَلَوْ تَرٰىٓ اِذْ وُقِفُوْا عَلَى النَّارِ فَقَالُوْا يٰلَيْتَنَا نُرَدُّ وَلَا نُكَذِّبَ
بِاٰيٰتِ رَبِّنَا وَنَكُوْنَ مِنَ الْمُؤْمِنِيْنَ ﴿٢٧﴾

२८. (ही हळहळ या कारणास्तव नसेल की सत्य त्यांना उमजले नव्हते) किंबहुना (यासाठी असेल की) ज्या गोष्टीस ते यापूर्वी लपवित असत ती उघडपणे त्यांच्यासमोर आलेली असेल [४७] त्यांना जर (इहलोकाकडे) परत पाठविले गेले तर पुन्हा तेच करतील ज्या विषयी त्यांना मनाई केली गेली होती [४८] नि:संशय हे अगदी खोटारडे आहेत.

بَلْ بَدَا لَهُمْ مَّا كَانُوْا يُخْفُوْنَ مِنْ قَبْلُ ۭ وَلَوْ رُدُّوْا لَعَادُوْا
لِمَا نُهُوْا عَنْهُ وَاِنَّهُمْ لَكٰذِبُوْنَ ﴿٢٨﴾

२९. ते म्हणतात जीवन केवळ इहलोकीय जीवन आहे आणि आम्हाला (मेल्यानंतर) उठविले जाणार नाही. [४९]

وَقَالُوْٓا اِنْ هِىَ اِلَّا حَيَاتُنَا الدُّنْيَا
وَمَا نَحْنُ بِمَبْعُوْثِيْنَ ﴿٢٩﴾

३०. आणि जर तुम्ही त्यांची त्या वेळेची स्थिती पाहिली असती जेव्हा त्यांना आपल्या पालनकर्त्या समोर उभे केले जाईल.त्यावेळी तो त्यांना विचारील काय ही वस्तुस्थिती नव्हे ?[५०] ते म्हणतील होय आमच्या पालन कर्त्याची शपथ ! तो फर्माविल तर आता आपल्या कुफ्रच्या मोबदल्यात शिक्षेची गोडी चाखा.

وَلَوْ تَرٰٓى اِذْ وُقِفُوْا عَلٰى رَبِّهِمْ ۭ قَالَ اَلَيْسَ هٰذَا بِالْحَقِّ ۭ
قَالُوْا بَلٰى وَرَبِّنَا ۭ قَالَ فَذُوْقُوا الْعَذَابَ بِمَا
كُنْتُمْ تَكْفُرُوْنَ ﴿٣٠﴾

३१. विनाशात पडले ते लोक ज्यांनी अल्लाहच्या भेटीस खोटे ठरविले, येथपावेतो की जेव्हा ती वेळ [५१] अकस्मात येऊन प्रकट झाली.[५२] तर म्हणतील अरेरे ! या व्यवहारात आमच्या कडून कशी उपेक्षा झाली ! आणि ते आपली ओझे [५३] आपल्या पाठींवर लादलेल्या स्थितीत असतील, तर किती वाईट ओझे आहे जे हया लोकांनी लादून घेतलेले असतील.

قَدْ خَسِرَ الَّذِيْنَ كَذَّبُوْا بِلِقَاۗءِ اللّٰهِ ۭ
حَتّٰٓي اِذَا جَاۗءَتْهُمُ السَّاعَةُ بَغْتَةً قَالُوْا يٰحَسْرَتَنَا عَلٰي مَا فَرَّطْنَا
فِيْهَا ۙ وَهُمْ يَحْمِلُوْنَ اَوْزَارَهُمْ عَلٰي ظُهُوْرِهِمْ ۭ
اَلَا سَاۗءَ مَا يَزِرُوْنَ ﴿٣١﴾

४६. अनेकेश्वरवादींच्या या दु:खपूर्ण परिणितीचे चित्र शब्दांच्या रूपाने आजच दाखविले गेले आहे यासाठी की जे लोक अनेकेश्वरवादात व्यस्त आहेत किंवा एखाद्या अनेकेश्वरवादी धर्माशी संबंधीत आहेत त्यांनी तोल सावरावा व आपली आचरण संहिता दुरुस्त करावी जेणेकरुन त्यांना कियामतीच्या दिवशी पश्चाताप करण्याची वेळ न यावी.

४७. अर्थात कियामतीच्या दिवशी त्यांची ही लालसा व इहलोकात दुसऱ्यांदा जाण्यांची इच्छा यामुळे नसेल की सत्य यांना स्पष्टात: कळाले नव्हते आणि आता यांच्यावर पहिल्यांदा स्पष्ट होत आहे. किंबहुना एवढ्यासाठी असेल की यांनी ज्या वाईट गरजा व ज्या चुकीच्या हेतुंमुळे सत्याचा स्वीकार केला नव्हता आणि त्यांना आपल्या मनात लपवून राहीले होते त्या सर्व उघडपणे समोर आलेल्या असतील आणि सबबी करिता कसलाहि वाव शिल्लक राहणार नाही.

४८. अर्थात जर दुसऱ्यांदा इहलोकात पाठविळे गेले तर तेथले वातावरण कसोटीचेच वातावरण असेल आणि जेव्हा हे दुसऱ्यांदा परिक्षेला येतील तेव्हा आपल्या इच्छा आकांशा व वाईट गरजांमुळे पुन्हा तेच आचरण पत्करतील जे त्यांनी आधी केले होते.

४९. मक्केचे अनेकेश्वरवादी मरणोत्तर जीवनास मानणारे नव्हते.ते ईश्वराला मानवाचा निर्माणकर्ता मानीत परंतु त्यांचे असे म्हणणे होते की हे जीवन जे माणसाला लाभले आहे ते पहिले व अखेरचे जीवन होय यानंतर दुसऱ्यांदा जीवन लाभणार नाही.भारतातील अनेकेश्वरवादी देखील मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांच्या अनुसरणावर आहेत. फरक एवढाच की हे पुनर्जन्माची श्रद्धा बाळगतात. अर्थात माणसाचे पशु पक्षी वगैरेच्या स्वरुपात स्थित्यंतर होते व पुनर्जन्म याच जगात मिळतो. ही श्रद्धा मनुष्यास मनुष्य या नात्याने दुसऱ्यांदा उठविले जाण्याचा निषेध करते यात ना कियामतीची कल्पना आहे ना ईश्वरासमोर हजर होऊन आपल्या आचरणाचा हिशेब देण्याची तसेच यात ईश्वराकडून प्रतिफळ प्राप्त करण्याची कल्पनाहि नाही.

राहिलेत आजच्या काळातील धर्मापासून उद्विग्न झालेले लोक तर ते भौतिक वादात एवढे ग्रस्त झाले आहेत की त्यांना दुसऱ्या जीवनाबद्दल विचार करायला सवडच नाही जीवनाच्या मौजमस्तीने त्यांना आखिरत बाबतीत अगदी गांभीर्यशून्य बनविले आहे. यास्तव एक शायर म्हणतो :

मय नोश कल के वादे पे क्या हिज़्ज़ उठाएगा
पी ले अभी कि कल को यह दिन न आएगा
ऐ चाँद,चाँदनी की क़सम पी भी ले कि चाँद
आए गा लौट लौट के हम को न पाए गा

५०. जे लोक मोबदल्याच्या दिवसास प्रमाणांच्या आधारावरहि मानावयास तयार नाहीत ते त्यावेळी मानतील जेव्हा त्यांना हा दिवस दाखविला जावा. अर्थात हा दिवस इहलोकात तर ते पाहू शकत नाही तथापि जेव्हा कियामत घडून येईल तेव्हा त्यांना निश्चितच या दिवसाचे दर्शन घडेल आणि त्यावेळी हेहि मान्य करतील की मोबदल्याचा दिवस एक वस्तुस्थिती आहे, परंतु त्या वेळची स्वीकृति त्यांना शिक्षेपासून वाचवू शकणार नाही.

५१. कियामतीकरिता कुरआनत बहुधा ''अस्साआह'' हा शब्द वापरला गेला आहे ज्याचा अर्थ विशिष्ट वेळ व निश्चित समय असा आहे.

५२. अर्थात कियामत या सृष्टीचा अकस्मत घडून येणारा प्रसंगा असेल, ही घटना घडून येण्याच्या काही मिनिटे आधी कोणाला तिची चाहुलहि लागणार नाही की त्या जबरदस्त विस्फोटाची वेळ जवळ येऊन ठेपली आहे.

५३. ''ओझे'' म्हणजे पाप कर्मांची ओझे.

३२. आणि इहलोकीय जीवन तर केवळ खेळ तमाशा आहे [५४] तथापि आखिरतचे घर त्या लोकांसाठी अधिक चांगले आहे जे ईश-भय बाळगतात. मग काय तुम्ही अकलेने काम घेत नाही.[५५]

وَمَا الْحَيٰوةُ الدُّنْيَآ اِلَّا لَعِبٌ وَّلَهْوٌ وَلَلدَّارُ الْاٰخِرَةُ خَيْرٌ لِّلَّذِيْنَ
يَتَّقُوْنَ اَفَلَا تَعْقِلُوْنَ ﴿٣٢﴾

३३. आम्ही जाणून आहोत की त्यांच्या गोष्टी तुमच्यासाठी दु:खकारक ठरतात परंतु खरे पाहता ते तुम्हाला खोटे ठरवित नाही किंबहुना हे अत्याचारी अल्लाहच्या आयतींचा इन्कार करीत आहेत.[५६]

قَدْ نَعْلَمُ اِنَّهٗ لَيَحْزُنُكَ الَّذِيْ يَقُوْلُوْنَ فَاِنَّهُمْ
لَا يُكَذِّبُوْنَكَ وَلٰكِنَّ الظّٰلِمِيْنَ بِاٰيٰتِ اللّٰهِ يَجْحَدُوْنَ ﴿٣٣﴾

३४. तुमच्या पूर्वीहि पैगंबरांना खोटे ठरविले गेले आहे परंतु या खोटे ठरविल्याबद्दल त्रास दिला जाण्यावर त्यांनी संयम पाळला. येथपावतो की त्यांच्याजवळ आमची मदत येऊन पोहचली. अल्लाहच्या वचनांना बदलू शकेल असा कोणीहि नाही [५७] आणि पैगंबरांच्या घटनांच्या वार्ता तुम्हाला पोहचल्याच आहेत. [५८]

وَلَقَدْ كُذِّبَتْ رُسُلٌ مِّنْ قَبْلِكَ فَصَبَرُوْا عَلٰى مَا كُذِّبُوْا
وَاُوْذُوْا حَتّٰۤى اَتٰىهُمْ نَصْرُنَا وَلَا مُبَدِّلَ لِكَلِمٰتِ اللّٰهِ
وَلَقَدْ جَآءَكَ مِنْ نَّبَاِى الْمُرْسَلِيْنَ ﴿٣٤﴾

३५. आणि जर यांनी केलेली उपेक्षा तुम्हाला असहय होत आहे तेव्हा जर तुमच्या सामर्थ्यात असेल की जमीनीत एखादा सुरंग किंवा आकाशात एखादी शिडी शोधून काढा ज्या योगे या लोकांकरिता एखादी निशाणी आणू शकाल तर असे करुन पहा [५९]अल्लाहने इच्छिले असते तर सर्वांना मार्गदर्शनाकडे एकत्रित केले असते. यास्तव त्या लोकांपैकी होऊ नका जे नादान आहेत.[६०]

وَاِنْ كَانَ كَبُرَ عَلَيْكَ اِعْرَاضُهُمْ فَاِنِ اسْتَطَعْتَ اَنْ تَبْتَغِيَ
نَفَقًا فِي الْاَرْضِ اَوْ سُلَّمًا فِي السَّمَآءِ فَتَاْتِيَهُمْ بِاٰيَةٍ وَلَوْ شَآءَ اللّٰهُ
لَجَمَعَهُمْ عَلَى الْهُدٰى فَلَا تَكُوْنَنَّ مِنَ الْجٰهِلِيْنَ ﴿٣٥﴾

३६. (सत्याला) तेच लोक कबूल करतात जे ऐकतात [६१] राहिलेत मुडदे तर अल्लाह त्यांना (कबरींमधून) उठवील [६२] मग त्याच्यासमोर परतविले जातील.[६३]

اِنَّمَا يَسْتَجِيْبُ الَّذِيْنَ يَسْمَعُوْنَ وَالْمَوْتٰى يَبْعَثُهُمُ اللّٰهُ ثُمَّ
اِلَيْهِ يُرْجَعُوْنَ ﴿٣٦﴾

३७. आणि असे म्हणतात की या (पैगंबरा) वर त्याच्या पालनकर्त्याकडून एखादी निशाणी [६४] का अवतरली नाही? अल्लाह निश्चितच निशाणी उतरविण्याबाबत समर्थ आहे परंतु अधिकांश लोक जाणत नाहीत.[६५]

وَقَالُوْا لَوْلَا نُزِّلَ عَلَيْهِ اٰيَةٌ مِّنْ رَّبِّهٖ قُلْ اِنَّ اللّٰهَ قَادِرٌ عَلٰۤى اَنْ
يُّنَزِّلَ اٰيَةً وَّلٰكِنَّ اَكْثَرَهُمْ لَا يَعْلَمُوْنَ ﴿٣٧﴾

५४. म्हणजे आखिरतचा दृष्टीआड केल्यानंतर इहलोकाची पात्रता खेळ तमाशाहून अधिक काहीच राहात नाही. म्हणून आखिरतचा इन्कार करणारे आजपर्यंत कोणत्याही गंभीर उद्दिष्टाकडे अंगुली निर्देश करु शकले नाहीत.

५५. आखिरतचा इन्कार शहाणपण नव्हे किंबहुना अकलेचा वापर न केल्याचा परिणाम आहे.

५६. कुरेश पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अमीन व सादिक समजत असत परंतु जेव्हा पैगंबरांनी अल्लाहचा संदेश पोहचविणे सुरु केले तेव्हा ते पैगंबरांना खोटे ठरवू लागले. अर्थात खरे पाहता पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना खोटे ठरविले जात नव्हते किंबहुना कुरआनच्या त्या आयतींना खोटे जात होते ज्या पैगंबर सादर करीत होते.

५७. अर्थात अल्लाहचा तो नियम होय ज्यानुसार ईश मदत प्रकट होते. सर्वश्रेष्ट अल्लाहने आपल्या पैगंबरांशी व ईमान बाळगणाऱ्यांशी मदततीचा जो वायदा केला आहे तो अपरिहार्यत: पूर्ण होतो मग विरोधांचे वादळ कितीका रौद स्वरूप धारण करेना परंतु ही मदत वेळे आधी प्रकट होत नाही. यास्तव सत्य आवाहनानंतर सत्य स्वीकृत करणाऱ्यांना कसोटीतून जाऊ दिल्याखेरीज विरोधकांवर वर्चस्व प्राप्त झाले असावे असे कधीही घडले नाही.

अल्लाहच्या वचनांमध्ये परिवर्तन अशक्य आहे म्हणजे त्याचे निर्णय, त्याचे वायदे आणि त्याच्या सर्व गोष्टी अगदी अटळ आहेत आणि त्यांना परिवर्तित करु शकेल अशी कोणतीही शक्ति नाही. त्याची प्रत्येक गोष्ट दगडावरची रेघ व त्याचा प्रत्येक निर्णय अपरिवर्तनीय आहे.

५८. अर्थात पैगंबरांचे जे वृत्तांत कुरआनात वर्णिले गेले आहेत त्यावरुन अल्लाहचा हा नियम स्पष्ट होतो की अल्लाहची मदत सत्याची कास बाळगणाऱ्यांचे कसोटीच्या भट्टीतून पार पडल्यानंतर व सत्य पूर्णत: स्पष्ट झाल्या नंतरच प्रकट होते, म्हणून विरोधकांनी दिलेल्या दु:ख यातनांनी प्रभावित होऊन सत्यानुयायींना विमनस्क होता कामा नये.

५९. काफ़ीर लोक पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याजवळ अशा चमत्काराची मागणी करीत की ज्यामुळे अपरोक्ष न रहावे उदा. फिरिश्त्यांचे आपल्या मूळ स्वरुपात अवतरणे वगैरे याच्या उत्तरादाखल ही गोष्ट सांगितली गेली आहे. ज्याचा उद्देश्य पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे सांत्वन करणे हाहि होय तसेच हे हि स्पष्ट करणे होय की चमत्कार दाखविणे पैगंबराच्या अधिकारात नाही. किंबहुना ही अल्लाहच्याच अधिकारात असलेली गोष्ट आहे. आणि त्याच्याच इच्छेवर अवलंबून आहे. आणि काफीरांनी अपेक्षिलेल्या चमत्कारांच्या संबंधानुसार जर ते दाखविले गेले तर मग बुद्धि व प्रज्ञा यांच्या कसोटीला कसलाहि वाव राहत नाही म्हणून ते दाखविणे अल्लाहच्या हिकमती विरूद्ध आहे.

या आयतीवरुन ओघाओघाने ही गोष्टदेखील स्पष्ट होते की जेव्हा पैगंबर अल्लाहच्या इच्छेशिवाय चमत्कार दाखविण्यास समर्थ नसतो तर एखाद्या वली किंवा एखाद्या बुजुर्गाच्या अवाक्यात कसे असू शकते की त्याने करामती दाखवाव्यात निसर्ग नियमांवर केवळ अल्लाहचेच अधिपत्य आहे आणि त्या नियमातून मुक्त होऊन एखादी असामान्य गोष्ट दाखविणे कोणत्याही माणसाच्या आवाक्यात नाही. मग तो पैगंबर असो किंवा वली असो. तथापि जेव्हा अल्लाह इच्छितो पैगंबराच्या हातून चमत्कार घडतो. आणि जेव्हा तो इच्छितो तेव्हा एखाद्या नेक व बुजुर्ग व्यक्तिचे समर्थन असामान्य पद्धतिने करतो अन्यथा कोणतीही महान बुजुर्ग व्यक्ति ना स्वत: करामत दाखविण्याचे सामर्थ्य बाळगतं ना करामत दाखविण्याचा दावा करु शकते. यास्तव आम्ही हे पाहतो की पैगंबराच्या सहवासात असलेल्या अनुयायींपैकी कोणीही करामत दाखविण्याचा दावा केला नाही.

६०. अर्थात अल्लाहची इच्छा ही नव्हे की लोकांनी नाईलाजास्तव सरळ मार्गावर एकत्रित व्हावे व त्यांच्या करिता बुद्धि आणि प्रज्ञेच्या कसोटीचा कोणताहि अवसर बाकी न राहावा जर अल्लाहची अशी इच्छा असती तर कोणताही मनुष्य सन्मार्गापासून तोंड फिरवू शकला नसता. परंतु त्याची इच्छा हीच की मनुष्याला बुद्धि आणि विवेकाद्वारे वागण्याचा अवसर दिला जावा म्हणून अशी निशाणी (चमत्कार) दाखविणे की ज्यामुळे बुद्धि व प्रज्ञेच्या कसोटीचा कोणताही अवसर बाकी न रहावा हे सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या त्या योजनेविरूद्ध आहे जी त्याने आपल्या बुद्धिकौशल्यान्वये इहलोकाकरिता तयार केली आहे. जे लोक अल्लाहच्या या योजनेला समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाही ते नादान-गोष्टी करु लागतात.

६१. ऐकण्याशी अभिप्रेत ते ऐकणे होय जे सत्य स्वीकृतिच्या हेतुने असेल म्हणजे ह्दय या गोष्टीकरिता प्रवृत्त असावे की जी गोष्ट ऐकविली जात आहे ती जर सत्य आहे तर मी तिचा निश्‍चित स्वीकार करीन आणि या संदर्भात आपल्या इच्छेला किंवा कोणत्यहि प्रकारच्या धार्मिक पक्षपातास अडथळा बनू देणार नाही.

६२. मुडदे अशा लोकांना म्हटले गेले आहे जे पैगंबराच्या सत्य आवाहनास ऐकून व समजून घेण्यास तयार नाहीत. मनाच्या निष्प्राण होण्याचा हा परिणाम होय आणि जेव्हा माणसाचे मनच मेले असेल तर त्याचे आस्तित्व कोठे राहिले? त्याची योग्यता एक निष्प्राण देहापेक्षा अधिक नाही. अशा

लोकांना कियामतीच्या दिवशी जेव्हा कबरीमधून उठविले जाईल तेव्हाच त्यांना सत्य स्पष्ट: उमजू शकेल.

६३. म्हणजे पेशीकरिता.

६४. म्हणजे असा चमत्कार होय जो जाणत यावा व ज्याने अपरोक्षाचे अभेद्य आवरण फाडून हे दाखवून द्यावे की या मनुष्याला अल्लाहने खरोखर पैगंबर बनवून पाठविले आहे.

६५. अर्थात असा चमत्कार न दाखविण्याचे कारण हे नव्हे की अल्लाह तो दाखविण्यास असमर्थ आहे तथापि त्याचे अन्य कारण आहे जे यांना माहितच नाही आणि ते कारण हे होय की ते असा चमत्कार अपेक्षित आहेत की जर तो दाखवला गेला तर मग अपरोक्ष अपरोक्ष राहत नाही.

राहिला हा प्रश्न की इतर प्रेषितांना अनुभूत चमत्कार कशा प्रकारे दिले गेले होते तर याचे उत्तर हे आहे की प्रथम तर मक्केच्या काफिरांची मागणी या प्रकारच्या अनुभूत चमतकारांची नव्हती किंबहुना ते हे इच्छित होते की एखादी अशी निशाणी जाहीर व्हावी ज्याद्वारे अपरोक्षाच्या काही वस्तुस्थितींना त्यांनी पाहू शकावे. उदा. फिरिश्त्यास त्याच्या मूळ स्वरुपात पाहणे, आकाशातून लिखित स्वरूपात ग्रंथ अवतरणे, प्रेषिताचे आकाशाला शिडी लावून वर जाणे, आकाशाचा एखादा तुकडा जमीनीवर पाडणे इत्यादि. उघड आहे की पूर्वीच्या पैगंबरांना जे चमत्कार प्रदान केले गेले होते त्यतील कोणताहि चमत्कार या स्वरुपाचा नव्हता, मात्र हे की पूर्वीच्या पैगंबरांना जे अनुभूत चमत्कार प्रदान केले गेले होते तेहि दोन प्रकारचे होते. एक ते जे मागणी शिवाय दिले गेले होते उदा. हजरत मूसा यांना हा चमत्कार दिला गेला होता की त्यांची काठी साप बनत असे आणि दुसऱ्या प्रकारचे चमत्कार जे काफिरांच्या मागणीनुसार दिले गेले होते उदा. समूद जाती समूहाच्या मागणीनुसार हजरत स्वालेह यांना उटांचा चमत्कार दिला गेला होता. पहिल्या प्रकारच्या चमत्कार संबंधाने पैगंबर (सल्ल्लाहु अलैहि वसल्लम) यांना या सर्व तात्पुरता चमत्कारांपेक्षा मोठा व सदैव टिकणारा चमत्कार प्रदान केला गेला आहे. व तो चमत्कार म्हणजे ''कुरआन'' म्हणूनच हे आव्हान दिले गेले आहे की जर कुरआन तुमच्या दृष्टीने चमत्कार नाही तर तुम्हीच यासारखे कुरआन लिहून आणा.

राहिला दुसऱ्या प्रकारचा चमत्कार तर हा काफीरांनी स्वत: अपेक्षिलेला चमत्कार असतो आणि जेव्हा तो प्रदान केला जातो व ते ईमान बाळगत नाही तर त्यांच्या कर्माची सवड संपते. मग अल्लाहचा प्रकोप त्यांना घेरतो यास्तव: अल्लाहच्या हितोपदेशाची ही निकड ठरली की मक्केच्या काफ़ीरांना त्यांनी अपेक्षिलेला चमत्कार दाखविला जाऊ नये,अशासाठी की त्यांची कर्म सवड त्वरीत संपू नये आणि नंतरच्या परिस्थितींनी हे स्पष्ट केले आहे की या प्रकारचे चमत्कार न दाखविले जाणे ''कुरैश'' जमातीकरिता अधिक चांगले सिद्ध झाले कारण हळूहळू त्यांच्यापैकी कित्येक लोकांच्या लक्षात पैगंबराच्या गोष्टी येऊ लागल्या आणि त्यांना ईमान बाळगण्याची सुबुद्धि लाभली.

**आणि जमीनीवर चालणारे कोणतेहि जनावर व पंखानी उडणारा एकहि पक्षी असा नाही की ज्याचे तुम्हा सारखे समूह नसावेत आम्ही लिखाणात कसली हि कसर राहू दिली नाही मग सर्व आपल्या पालन कर्त्याजवळ एकत्रित केले जातात. ज्या लोकांनी आमच्या चिन्हांना खोटे ठरविले ते बहीरे आणि मुके होत, अंध:कारात खितपत पडलेले अल्लाह ज्याला इच्छितो मार्गभ्रष्ट करतो व ज्याला इच्छितो सरळ मार्गाला लावतो.** ***(अल-क़ुरआन)***

३८. आणि जमीनीवर चालणारे कोणतेहि जनावर व पंखानी उडणारा एकहि पक्षी असा नाही की ज्याचे तुम्हा सारखे समूह नसावेत [६६] आम्ही लिखाणात कसली हि कसर राहू दिली नाही [६७] मग सर्व आपल्या पालन कर्त्याजवळ एकत्रित केले जातात.[६८]

وَمَا مِن دَآبَّةٍ فِي الْأَرْضِ وَلَا طَٰٓئِرٍ يَطِيرُ بِجَنَاحَيْهِ إِلَّآ أُمَمٌ
أَمْثَالُكُم ۚ مَّا فَرَّطْنَا فِي الْكِتَٰبِ مِن شَيْءٍ ۚ ثُمَّ
إِلَىٰ رَبِّهِمْ يُحْشَرُونَ ﴿٣٨﴾

३९. ज्या लोकांनी आमच्या चिन्हांना खोटे ठरविले ते बहीरे आणि मुके होत, अंध:कारात खितपत पडलेले [६९]अल्लाह ज्याला इच्छितो मार्गभ्रष्ट करतो व ज्याला इच्छितो सरळ मार्गाला लावतो.[७०]

وَالَّذِينَ كَذَّبُوا بِـَٔايَٰتِنَا صُمٌّ وَبُكْمٌ فِي الظُّلُمَٰتِ ۗ مَن يَشَإِ اللَّهُ
يُضْلِلْهُ وَمَن يَشَأْ يَجْعَلْهُ عَلَىٰ صِرَٰطٍ مُّسْتَقِيمٍ ﴿٣٩﴾

४०. सांगा, काय तुम्ही या गोष्टीचाहि विचार केला आहे की जर तुमच्याजवळ अल्लाहची शिक्षा आली किंवा ती वेळ (कियामत) येऊन ठेपली तर काय तुम्ही अल्लाहखेरीज अन्य कोणास साद घालाल ? सांगा जर तुम्ही खरे आहात.

قُلْ أَرَءَيْتَكُمْ إِنْ أَتَىٰكُمْ عَذَابُ اللَّهِ أَوْ أَتَتْكُمُ السَّاعَةُ أَغَيْرَ اللَّهِ
تَدْعُونَ إِن كُنتُمْ صَٰدِقِينَ ﴿٤٠﴾

४१. नव्हे किंबहुना (जेव्हा आपत्ति येते तेव्हा) तुम्ही त्याला पुकारतात. मग त्याने इच्छिल्यास त्या आपत्तिला जिच्याकरिता तुम्ही त्याला पुकारता दूर करतो आणि आपल्या ठरविलेल्या सहभागींना तुम्ही विसरुन जाता.[७१]

بَلْ إِيَّاهُ تَدْعُونَ فَيَكْشِفُ مَا تَدْعُونَ إِلَيْهِ إِن شَآءَ وَتَنسَوْنَ
مَا تُشْرِكُونَ ﴿٤١﴾

४२. तुमच्या पूर्वी आम्ही अनेक जातीसमूहांकडे पैगंबर पाठविले आणि त्या जाती समूहांना अडचणीत टाकले व कष्टग्रस्त केले, अशासाठी की त्यांनी आर्जवे करावीत.[७२]

وَلَقَدْ أَرْسَلْنَآ إِلَىٰٓ أُمَمٍ مِّن قَبْلِكَ فَأَخَذْنَٰهُم بِالْبَأْسَآءِ وَالضَّرَّآءِ
لَعَلَّهُمْ يَتَضَرَّعُونَ ﴿٤٢﴾

४३. मग असे का झाले नाही की जेव्हा आमच्याकडून कठोरता आली तर त्यांनी आर्जव केले? किंबहुना त्यांची अंत:करणे अधिक कठोर झालीत आणि जी (वाईट) कामे ते करीत होते, त्यांना त्यांच्या नजरेत सैतानाने सुशोभित बनविले. [७३]

فَلَوْلَآ إِذْ جَآءَهُم بَأْسُنَا تَضَرَّعُوا وَلَٰكِن قَسَتْ قُلُوبُهُمْ وَزَيَّنَ
لَهُمُ الشَّيْطَٰنُ مَا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿٤٣﴾

६६. अर्थात पशु असो वा पक्षी, जमीनीवरील प्राणी असोत किंवा पाण्यातील मूंग्या असोत कि फलपाखरे, सर्व वेगवेगळे वर्ग (समूह) आहेत. ज्याप्रमाणे मानव-जातीत सामूहिकता व एकसूत्रता आहे तसेच तिच्या संगोपनाची व आजीविकेची एक व्यवस्था आहे तद्वतच जनावरांच्या प्रत्येक जातीची एक आगळी सामूहिकता व एकसूत्रता आहे व तिच्या संगोपनाची व आजीवीकेचीहि एक व्यवस्था आहे. उदाहरणार्थ मूंग्यांचे व्यवस्थापन व मधमाशांचे व्यवस्थापन पाहिल्यास असे दिसून येते की कशा प्रकारे त्या एकमेकांशी संबंधित असतात आणि किती व्यवस्थितरित्या त्या मार्गावर चालू लागतात जो त्यांच्या उपजीविकेकरिता निर्धारीत केला गेला आहे.

या जाती प्रकारांचे मनुष्याने जर विचारपूर्वक अवलोकन केल्यास त्याला सृष्टी- निर्मात्याची एकाहून एक विचित्र चिन्हे दिसू लागतील आणि ही चिन्हे त्याला अशाच वस्तुस्थितींच्या दिशेने मार्गदर्शन करतील ज्याचे आमंत्रण कुरआन व पैगंबर देत आहेत.

६७. अर्थात अल्लाहने आपल्या निर्मित करिता जो भाग्य लेख तयार केला आहे त्यात लहान मोठ्या सर्व गोष्टी सामील आहेत. अशी एकहि गोष्ट नाही जी राहून गेली असेल. अर्थ असा की या सृष्टीत जे काही होत आहे ते एका योजनेखाली होत आहे आणि त्यामागे एका अशा शक्तिचा निश्चय व योजना कार्यान्वित आहे जी परिपूर्ण ज्ञान बाळगते.

६८. अर्थात समस्त सजीव प्राण्यांचे जीव ते मेल्यानंतर ईश्वराजवळच एकत्रित होतात कारण तोच सर्वांचा निर्माण कर्ता व आश्रयस्थान आहे.

६९. वास्तविकतेच्या दिशेने मार्गदर्शन करण्याकरिता सर्वश्रेष्ठ अल्लाहने ज्या ज्या निशाण्या या सृष्टीत राखल्या आहेत, मुनुष्य जेव्हा या निशाण्यांकडे दुर्लक्ष करतो व पैगंबराच्या म्हणण्याकडे लक्ष देत नाही तर त्याची दशा एखाद्या बहिऱ्या व मुक्या माणसासारखी होते की सत्य गोष्ट ना ऐकू शकतो,ना बोलू शकतो. असा मनुष्य अज्ञानाच्या अंध:कारात खितपत पडून राहतो, मग त्याला आपल्या ज्ञानावर किती का गर्व असेना.

७०. म्हणजे मार्गभ्रष्ट होणे किंवा सन्मार्गावर असणे अल्लाहच्याच इच्छेवर अवलंबून आहे. अन्य कोणाचाहि याबाबतीत हस्तक्षेप नाही. सर्वश्रेष्ठ अल्लाहची ही इच्छा त्याच्या या बुद्धिकौशल्यानुसार असते की ना कोणाला मार्गभ्रष्टतेच्या मार्गावर चालण्यास विवश केले जावे ना मार्गदर्शनाच्या मार्गावर चालण्याकरिता. किंबहुना जो मनुष्य मार्गदर्शनाचा इच्छुक असेल त्याला मार्गदर्शन दिले जावे व जो वणवण भटकू इच्छित असेल त्याला भटकत राहू देण्याचा अवसर द्यावा. दुसऱ्या शब्दात एखाद्यास मार्गदर्शन लाभणे किंवा त्याचे मार्गभ्रष्ट होणे अल्लाहच्या मार्गदर्शनाच्या व मार्गभ्रष्टतेच्या कायद्यानुसार घडून येते.

७१. हे एकेश्वरवादाचे ते चिन्ह आहे जे माणसात अंतर्भूत आहे. जेव्हा मनुष्य एखाद्या असामान्य संकटात सापडतो किंवा एखाद्या जबरदस्त धोक्याशी त्याचा सामना होतो तेव्हा त्याला ईश्वराचे स्मरण होते. आणि समस्त बनावटी दैवतांचे त्याला विस्मरण होते येथपावेतो की जे लोक ईश्वराला मानीत नाहीत त्यांना देखील अशा कठीण समयी ईश्वराचे स्मरण होते. हे या गोष्टीचे प्रमाण होय की माणसाच्या अंतरंगत एकमेव ईश्वराची साक्ष विद्यमान आहे.

मक्केचे अनेकेश्वरवादी मूर्तिपूजक होते, तरीदेखील जेव्हा एखाद्या असामान्य संकटात ग्रस्त होत तेव्हा अल्लाहचाच धावा करीत.

मनुष्याच्या आत्माच्या या साक्षीला प्रस्तुत करतांना त्याला विचार चिंतनाचे आवाहन केले जात आहे. हे की त्याने त्या संभाव्य गोष्टीवर विचार केला पाहिजे की जर अल्लाहचा प्रकोप येणारच आहे किंवा कियामतीचा स्फोट होणार आहे तेव्हा त्या कठीण प्रसंगी मनुष्य आपल्या बचावा करीता कोणाला साद घालील? जर माणसाने याची कल्पना केली तर आपोआप तो ईश्वराकडे धाव घेईल.

७२. आर्थिक तंगी व शारीरिक दु:खांमध्ये जातीसमूहांना जे ग्रस्त केले जाते ते उगीचच नव्हे, किंबहुना त्यामागे ईश्वराची ही हिकमत (बुद्धिकौशल्य) कार्यान्वित असते की त्यांना सावरण्याची संधी दिली जावी. अडचण व दु:खयातना माणसाला झिंझोडतात व त्याला आपल्या पालनकर्त्याकडे लक्ष देण्यास भाग पाडतात. व अल्लाहसमोर झुकण्याकरिता त्याच्या मनाला प्रवृत्त करतात.

७३. जेव्हा आत्यंतिक परिस्थितीदेखील एखाद्या जातीसमूहांच्या अंत:करणात मृदता निर्माण करु शकत नाही मग त्याची हृदये इतकी कठोर होतात की कसल्याही उपदेशाचा त्यांच्यावर परिणाम होत नाही व सैतानाची किमया अशी घडून येते की त्यांना आपले चुकीचे आचरण देखील उचित वाटू लागते. ते अपराध-कृत्यांना स्वत:चे अभिमानास्पद कार्य समजू लागतात. आणि त्यांच्या नजरेत मूल्ये परिवर्तित होतात.

''था जो नाखूब वही खूब हुवा''

४४. मग जेव्हा त्यांनी त्या आठवणीचे विस्मरण केले जी त्यांना केली गेली होती.तेव्हा आम्ही त्यांच्याकरिता प्रत्येक प्रकारच्या (सुस्थिती) चे दरवाजे उघडले येथपावेतो की जेव्हा ते या प्रदान केलेल्या गोष्टींवर वातरु लागले तेव्हा आम्ही त्यांना अकस्मात धरले व ते निराश होऊन राहिले. [७४]

فَلَمَّا نَسُوا مَا ذُكِّرُوا بِهِ فَتَحْنَا عَلَيْهِمْ أَبْوَابَ كُلِّ شَيْءٍ حَتَّىٰ إِذَا فَرِحُوا بِمَا أُوتُوا أَخَذْنَاهُم بَغْتَةً فَإِذَا هُم مُّبْلِسُونَ ﴿٤٤﴾

४५. तात्पर्य त्या लोकांचा समूळ नाश केला गेला ज्यांनी अत्याचार केला होता आणि प्रशंसा फक्त अल्लाहकरीता आहे जो सर्व सृष्टीचा पालन कर्ता आहे .[७५]

فَقُطِعَ دَابِرُ الْقَوْمِ الَّذِينَ ظَلَمُوا ۚ وَالْحَمْدُ لِلَّهِ رَبِّ الْعَالَمِينَ ﴿٤٥﴾

४६. सांगा, तुम्ही या गोष्टीवर हि विचार केला की जर अल्लाहने तुमची श्रवणशक्ति व दृष्टी हिरावून घेतली व तुमच्या अंत:करणांवर मोहर लावली [७६] तर अल्लाह शिवाय कोणता ईश्वर आहे जो या (देणग्यां) ना तुम्हाला परत देऊ शकेल ? पहा, आम्ही कशा प्रकारे आपल्या चिन्हांचे तऱ्हेतऱ्हेने वर्णन करतो [७७] तरीहि हे लोक आहेत की अलिप्त रहात आहेत.

قُلْ أَرَأَيْتُمْ إِنْ أَخَذَ اللَّهُ سَمْعَكُمْ وَأَبْصَارَكُمْ وَخَتَمَ عَلَىٰ قُلُوبِكُم مَّنْ إِلَٰهٌ غَيْرُ اللَّهِ يَأْتِيكُم بِهِ ۗ انظُرْ كَيْفَ نُصَرِّفُ الْآيَاتِ ثُمَّ هُمْ يَصْدِفُونَ ﴿٤٦﴾

४७. सांगा, तुम्ही (कधी) विचार केला की जर तुमच्याजवळ अल्लाहचा प्रकोप (अजाब) अचानक वा प्रत्यक्षपणे आला तर अत्याचारी शिवाय अन्य कोणता समूह आहे, ज्याचा विनाश केला जाईल ? [७८]

قُلْ أَرَأَيْتَكُمْ إِنْ أَتَاكُمْ عَذَابُ اللَّهِ بَغْتَةً أَوْ جَهْرَةً هَلْ يُهْلَكُ إِلَّا الْقَوْمُ الظَّالِمُونَ ﴿٤٧﴾

४८. आम्ही पैगंबरांना या कारणास्तव पाठवितो की त्यांनी शुभवार्ता देणारे व सावध करणारे व्हावे [७९] मग ज्यांनी ईमान बाळगले व ज्यांनी आपली सुधारणा केली, त्यांच्या करिता ना कसले भय राहील व ना ते दु:खी होतील.

وَمَا نُرْسِلُ الْمُرْسَلِينَ إِلَّا مُبَشِّرِينَ وَمُنذِرِينَ ۖ فَمَنْ آمَنَ وَأَصْلَحَ فَلَا خَوْفٌ عَلَيْهِمْ وَلَا هُمْ يَحْزَنُونَ ﴿٤٨﴾

४९. आणि ज्यांनी आमच्या आयतींना खोटे ठरविले त्यांना त्यांच्या आज्ञाभंगामुळे प्रकोप (शिक्षा) आपल्या लपेटीत घेईल.[८०]

وَالَّذِينَ كَذَّبُوا بِآيَاتِنَا يَمَسُّهُمُ الْعَذَابُ بِمَا كَانُوا يَفْسُقُونَ ﴿٤٩﴾

७४. जेव्हा एखादा जातीसमूह आत्यंतिक परिस्थितीन्वये धडा घेत नाही किंबहुना त्यांचा हा खुलासा करतो की या केवळ काळाच्या दुर्घटना होत आणि जातीसमूहांना शीत-उष्ण परिस्थिती उद्‌भवत असते. तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह कसोटीचे एक अन्य दार उघडतो आणि प्रत्येक प्रकारच्या सुस्थितीने त्यांना भाग्यशाली करतो,अशासाठी की त्यांच्यात आपल्या पालनकर्त्याविषयी कृतज्ञतेची भावना निर्माण व्हावी. परंतु जेव्हा ते कृतज्ञ होण्याऐवजी घमेंड करु लागतात व आढयता पूर्वक वागू लागतात, तेव्हा मात्र त्यांचा घडा भरतो आणि मग सर्वश्रेष्ठ अल्लाहचा प्रकोप अकस्मात त्यांना घेरतो. आणि मग अपयश व निराशेशिवाय काहीच त्यांच्या पदरी पडत नाही.

या स्वरुपाची परिस्थिती विशेषत: रसूलां (Messenger) च्या जातीसमूहा समोर येत राहिली, यासाठी की त्याची सत्यता स्पष्ट व्हावी, परंतु या प्रकारची परिस्थिती सामान्य जाती समूहांपुढेहि येत असते यासाठी की त्यांनी शुद्धिवर यावे.

७५. विद्रोही जाती-समूहांना नष्ट करणे न्यायाचीहि निकड आहे. व मानव-विश्वाच्या हक्कात भलेपणास कारकसुद्धा आहे. कारण अशाने कुफ्रचा (इन्कार-नितीचा) जोर तुटतो व दुराचारी तत्वांपासून वातावरण शुद्ध होते. यास्तव सर्वश्रेष्ट अल्लाहने या जाती समूहांशी जो व्यवहार केला त्याबद्दल तो केवळ प्रशंसेस पात्र आहे.

७६. अर्थात बुद्धि व आकलन शक्ति हिरावून घेतली.

७७. अर्थात कुरआनात एकेश्वरवादाची प्रमाणे विविध पैलूंद्वारे व विविध शैलीत प्रस्तुत केली जात आहेत. अशासाठी की ज्या लोकांना गोष्ट समजून घ्यायची इच्छा आहे त्यांनी सहजगत्या समजावे.

७८. येथे प्रकोपाशी (अजाब) अभिप्रेत तो प्रकोप (शिक्षा) होय जो पैगंबरांना खोटे ठरविणाऱ्या जाती समूहांकरिता प्रमाण प्रस्थापित झाल्यानंतर येतो. आणि ज्याअर्थी हा अजाब (प्रकोप) सत्य व असत्यात फरक करण्याकरिता येतो म्हणून त्याच्या नेमात फक्त असत्य पूजक येतात व ईमान बाळगणाऱ्यांचा त्यापासून बचाव केला जातो यास्तव समूद जाती समूह आद जाती समूह इत्यादिंवर जो प्रकोप झाला त्या प्रकोपाला (आपत्तीला) फक्त कुफ्फार (इन्कार करणारे) बळी पडले. ईमान बाळगणारे अशा प्रत्येक प्रसंगी सुरक्षित राहीले.

७९. अर्थात रसूलांना (प्रेषितांना) पाठविले जाण्याचे खरे कारण चमत्कार दाखविणे नव्हे किंबहुना सत्याचे आवाहन प्रस्तुत करणे हे होय. जे यास मान्य करतील त्यांना अनंत काळाची शुभवार्ता ऐकविणे, व जे याचा इन्कार करतील त्याना अनंतकालीन विनाशाबाबत सचेत करणे.चमत्कार जे दाखविले जातात. ते केवळ प्रमाण प्रस्थापित करण्याकरिता जेव्हा अल्लाहची हिकमत (बुद्धि कौशल्य) या गोष्टीची निकड बाळगते. म्हणून रसूलांसह चमत्कारांना अत्यावश्यक समजणे योग्य नव्हे.

८०. हीच ती गोष्ट होय ज्याबद्दल पैगंबर आपापल्या जाती समूहाना सावध करीत राहिले.

قُلْ لَّآ اَقُوْلُ لَكُمْ عِنْدِيْ خَزَآئِنُ اللّٰهِ وَلَآ اَعْلَمُ الْغَيْبَ
وَلَآ اَقُوْلُ لَكُمْ اِنِّيْ مَلَكٌ ۚ اِنْ اَتَّبِعُ اِلَّا مَا يُوْحٰٓى اِلَيَّ ۗ قُلْ
هَلْ يَسْتَوِي الْاَعْمٰى وَالْبَصِيْرُ ۗ اَفَلَا تَتَفَكَّرُوْنَ ﴿٥٠﴾

५०. सांगा, मी तुम्हाला असे म्हणत नाही की माझ्याजवळ अल्लाहचे खजिने आहेत आणि ना मला अपरोक्षाचे ज्ञान आहे, आणि ना मी असे म्हणतो की मी फिरिश्ता आहे. मी तर केवळ त्या ''वही'' चे अनुसरण करतो जी मजवर अवतरीत केली जाते. [८१] विचारा आंधळा आणि डोळस दोघेहि समान असू शकतात काय? मग काय तुम्ही विचार चिंतन करीत नाही?

وَاَنْذِرْ بِهِ الَّذِيْنَ يَخَافُوْنَ اَنْ يُّحْشَرُوْٓا اِلٰى رَبِّهِمْ لَيْسَ
لَهُمْ مِّنْ دُوْنِهٖ وَلِيٌّ وَّلَا شَفِيْعٌ لَّعَلَّهُمْ يَتَّقُوْنَ ﴿٥١﴾

५१. तुम्ही या ''वही'' द्वारे [८२] त्या लोकांना खबरदार [८३] करा जे या गोष्टीचे भय बाळगतात की आपल्या पालनकर्त्यासमोर एकत्रित केले जातील, अशा स्थितीत की त्याच्याखेरीज ना कोणी सहाय्यक असेल व ना शिफारस-कर्ता ज्यायोगे त्यांनी ईश भय पत्करावे. [८४]

وَلَا تَطْرُدِ الَّذِيْنَ يَدْعُوْنَ رَبَّهُمْ بِالْغَدٰوةِ وَالْعَشِيِّ
يُرِيْدُوْنَ وَجْهَهٗ ۗ مَا عَلَيْكَ مِنْ حِسَابِهِمْ مِّنْ شَيْءٍ وَّ
مَا مِنْ حِسَابِكَ عَلَيْهِمْ مِّنْ شَيْءٍ فَتَطْرُدَهُمْ فَتَكُوْنَ مِنَ
الظّٰلِمِيْنَ ﴿٥٢﴾

५२. आणि त्या लोकांना आपल्या पासून दूर करु नका जे सकाळ संध्याकाळ आपल्या पालन कर्त्यास त्याची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी पुकारतात [८५] त्यांच्या हिशेबाची कसलीहि जबाबदारी तुमच्यावर नाही आणि ना तुमच्या हिशेबाची जबाबदारी त्यांच्यावर आहे की तुम्ही त्यांना दुर करावे. जर तुम्ही असे केले तर अत्याचार करणाऱ्यांपैकी व्हाल.

وَكَذٰلِكَ فَتَنَّا بَعْضَهُمْ بِبَعْضٍ لِّيَقُوْلُوْٓا اَهٰٓؤُلَآءِ مَنَّ اللّٰهُ
عَلَيْهِمْ مِّنْۢ بَيْنِنَا ۗ اَلَيْسَ اللّٰهُ بِاَعْلَمَ بِالشّٰكِرِيْنَ ﴿٥٣﴾

५३. अशा प्रकारे आम्ही यांच्यापैकी काहींना काहींच्या द्वारे कसोटीत टाकले आहे आणि हा याचा परिणाम होय की ते म्हणतात, काय हेच ते लोक ज्यांना अल्लाहने आमच्यामधून निवडून आपल्या कृपेने उपकृत केले आहे ? [८६] काय अल्लाह चांगल्या प्रकारे जाणत नाही की कृतज्ञता दर्शविणारे कोण आहेत ?[८७]

وَاِذَا جَآءَكَ الَّذِيْنَ يُؤْمِنُوْنَ بِاٰيٰتِنَا فَقُلْ سَلٰمٌ عَلَيْكُمْ كَتَبَ
رَبُّكُمْ عَلٰى نَفْسِهِ الرَّحْمَةَ ۙ اَنَّهٗ مَنْ عَمِلَ مِنْكُمْ سُوْٓءًۢا بِجَهَالَةٍ
ثُمَّ تَابَ مِنْۢ بَعْدِهٖ وَاَصْلَحَ فَاَنَّهٗ غَفُوْرٌ رَّحِيْمٌ ﴿٥٤﴾

५४. (हे पैगंबर) जेव्हा ते लोक तुमच्याजवळ येतील जे आमच्या आयतींवर ईमान बाळगतात तर त्यांना सांगा तुम्हावर सलाम असो !तुमच्या पालन कर्त्याने स्वत:करिता दया अत्यावश्यक केली आहे. जो कोणी तुमच्यापैकी नादानीमुळे एखादे दुष्कृत्य करुन बसला असेल. मग त्याने तौबा व सुधारणा करुन घेतली असेल तर अल्लाह माफ करणारा व दया करणारा आहे.[८८]

८१. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे विरोधक विचित्र चमत्कार दाखविण्याची जी मागणी करीत होते त्याचे उत्तर म्हणून पैगंबरांच्या तोंडून ही घोषणा करविली गेली आहे. की मी हा दावाच केव्हा केला आहे की मी तुम्हाला एकापेक्षा एक विचित्र चमत्कार दाखवू शकतो जो तुम्ही माझ्याकडे अशा प्रकारच्या मागण्या करीत आहात. मी तर तुमच्यासमोर सत्य संदेश सादर केला आहे जो सर्वश्रेष्ठ अल्लाहने माझ्याकडे अशा माध्यमाने पाठविला आहे जे तुमच्या करिता अनावलोनीय आहे. वस्तुत:तुम्ही या संदेशाची सत्यता प्रमाणांच्या कसोटीवर पारखून बघावयास हवी परंतु तुम्ही सत्याला डोळस दृष्टीने पाहण्याऐवजी चमत्कार पाहु इच्छिता आणि चमत्कार दाखविणे माझ्या अधिकारक्षेत्रात नाही तथापि ईश्वराच्या अधिकार क्षेत्रातील गोष्ट आहे. मी तर केवळ पैगंबर असण्याचा दावा केला आहे मात्र हा दावा नव्हे की अल्लाहचे खजिने माझ्या ताब्यात आहेत की त्यात वाटेल तो बदल मी करावा आणि ना त्या गोष्टींना जाणतो ज्या अपरोक्षातल्या आहेत, त्या गोष्टीखेरीज ज्या अल्लाह आपल्या वहीद्वारे मला दर्शवितो. आणि ना मी असा दावा केला आहे की मी मनुष्य नव्हे फिरिश्ता आहे. माझी हकीकत या पलिकडे काहीच नव्हे की मला फक्त प्रेषितत्व-पद प्रदान केले गेले आहे आणि ज्याला प्रेषितत्व-पद प्रदान केले गेले असावे तो मानवच असतो. ना त्याच्या अंगी ईश-गुणधर्म निर्माण होतो व ना तो फिरिश्ता बनतो. परंतु माझ्या प्रेषितत्व-दाव्यात सत्यतेंचे दर्शन केवळ असाच मनुष्य करु शकतो ज्याने आपल्या डोळ्यांवर पट्टी बांधली नसेल, कारण वस्तुस्थिती कितीही प्रकाशमय असली तरी तिला असाच मनुष्य पाहू शकतो ज्याला डोळे आहेत. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या मुखाने وَلَآ اَعۡلَمُ الۡغَيۡبَ आणि ना मला ''गैब'' (अपरोक्षाचे) चे ज्ञान आहे, एक अशी स्पष्ट गोष्ट आहे ज्यात विवाद करण्यास काहीच जागा नाही. परंतु ज्या लोकांच्या बुद्धीत वक्रता आहे त्यांनी इतक्या स्पष्ट गोष्टीतहि मतभेद निर्माण केला यास्तव मुसलमानांच्या दरम्यान हा विवाद निर्माण झाला की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना गैबचे ज्ञान (अपरोक्ष-ज्ञान) होते वा नव्हते जे लोक ''गुलू'' (अतिशयोक्ति) व बिदअतमध्ये पडले आहेत ते असा दावा करतात की पैगंबरांना अपरोक्ष ज्ञान होते, वस्तुत: ही आयत या दाव्याचे खंडन करते आणि संपूर्ण कुरआनात असे कोठेहि म्हटले गेले नाही की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अपरोक्ष-ज्ञाता बनविले गेले आहे किंबहुना स्पष्टता: असे म्हटले गेले आहे की ग़ैब (अपरोक्षा) चे ज्ञान केवळ अल्लाहला आहे आणि तो आपल्या प्रेषितावर अपरोक्षातील अशा गोष्टी व्यक्त करतो ज्या प्रेषितत्व कर्तव्याशी संबंधित असतात. या दृष्टीने सर्वसामान्य माणसांच्या तुलनेने प्रेषितास ही महत्ता अवश्य प्राप्त असते, जेथपर्यंत एखाद्या मानवाला पोहचणे शक्य नाही. परंतु या सर्व गोष्टींचा संबंध अल्लाहच्या ''वही'' शी (अवतरीत आदेशाशी) आहे आणि अपरोक्ष ज्ञानाच्या संदर्भात प्रेषिताची ही महत्ता वस्तुत:मतभेदाची बाब नाही परंतु अकारण तक्रार निर्माण केली गेली आहे. आणि ज्याप्रकारे ग्रंथ बाळगणारे स्पष्ट शिकवणी आल्यानंतर मतभेदाचे शिकार झाले होते त्या प्रकारे गैब (अपरोक्ष) ज्ञानाच्या संदर्भात कुरआनाचे स्पष्ट वर्णन असतानाहि मुसलमान मतभेदात पडले आहोत.

८२. वहीचा शाब्दिक अर्थ आहे संकेत करणे. अल्लाह आपला संदेश आपल्या पैगंबरापर्यंत ज्या गुप्त माध्यमाने पाठवितो त्याचाच पारिभाषिक नाव ''वही'' असे आहे. येथे वहीशी अभिप्रेत कुरआन आहे.

८३. कुरआन द्वारे खबरदार करण्याचा जो आदेश दिला गेला आहे त्याचा अर्थ हा आहे की सचेत करण्याकरिता व प्रचाराकरिता प्रत्यक्ष कुरआनास प्रस्तुत केले जावे. कारण अल्लाहच्या ग्रंथाहून अधिक प्रभावी कोणतीहि गोष्ट असू शकत नाही आणि अल्लाहचे प्रमाणदेखील त्याच्या ग्रंथाद्वारेच होऊ शकते. हा आदेश पैगंबर ''सल्लल्लाहु अलैहि वसल्लम'' यांना दिला गेला होता, वस्तुत: संबोधित जाती समूहाची भाषा अरबी होती.

आजच्या परिस्थितीत या आदेशाच्या अंमल बजावणी करिता कुरआन बाळगणाऱ्यांनी कुरआनाचे भाषांतर लोकांसमोर त्यांच्या भाषेत प्रस्तुत करावे विशेषता त्या आयतींचे भाषांतर प्रस्तुत करावे, ज्यात कुफ्र व शिर्कच्या परलोकीय परिणिती बाबत खबरदार केले गेले आहे.

८४. अर्थात जे लोक आपल्या परलौकिक परिणिती बाबत बेपर्वा आहेत व त्यांच्या चेतना शून्यतेची ही दशा आहे की ते सावध करणाऱ्याची गोष्ट गंभीरतापूर्वक ऐकायलाहि तयार नाहीत. त्यांना त्यांच्या दशेवर सोडा आणि त्या लोकांकडे लक्ष द्या ज्यांची अंत:करणे अजून जिवंत आहेत. व जे आपल्या मुक्तिकरिता काळजी बाळगतात.

स्पष्ट असावे की ईश्वरासमक्षच्या उत्तरदायित्वाचे भय माणसाच्या स्वभावात ठेव रूपाने आहे. तथापि इच्छा आकांक्षाच्या प्रभावाने हे भय दाबले जावे ही गोष्ट वेगळी.

कुरआनाच्या तंबी करणाऱ्या आयती या स्वाभाविक भयाला मजबूत व कारक बनवितात परिणामी मनुष्य संयमतेचे जीवन व्यतीत करण्यायोग्य होतो.

८५.मक्केत कुरआनच्या आवाहनावर ''लब्बैक'' (हजर आहोत) म्हणणाऱ्यात अशा लोकांची संख्या विशेष होती ज्यांची ना कसली आर्थिक स्थिती होती आणि ना जे ऐहिक थाट वैभव

बाळगत होते, आणि काही जण तर गुलामीचे जीवन व्यतीत करीत होते. परंतु ते आपल्या पालनकर्त्यासाठी आपल्या अंतर्यामी, धडधडते हृदय बाळगत होते. ज्याने त्यांना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) भोवती जमा केले होते. आणि ते पैगंबरांच्या मजलीसमध्ये सहभागी होत. परंतु कुरेशचे सरदार त्यांना तुच्छ नजरेने पाहत असत. आणि त्यांची घमेंड या गोष्टीस सहन करीत नसे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बैठकीत यावे. ज्यात श्रीमंत गरीब सर्वांचा दर्जा समान होता. म्हणून त्यांची ही मागणी होती की या लोकांना आपण आपल्या जवळून दूर सारावे तर आम्ही आपणाजवळ यावे. त्यांच्या मागणीस येथे कठोरपणे रद्द केले गेले आहे व खऱ्या ईमान बाळगणाऱ्यांची प्रतिष्टा वाढविली गेली आहे, जरी ते गरीब व दरिद्री असोत.

८६. अर्थात समाजातील गरीब व निर्धन लोकांना ईमानची सुबुद्धि प्रदान करुन आम्ही सम्पत्ति थाट वैभव बाळगणाऱ्या लोकांना कसोटीत टाकले आहे. अशा प्रकारे की जर त्यांनी समंजसपणे काम घेतले तर ते ईमान-धनाची कदर बाळगणारे बनू शकतील आणि जर गर्वात गुरफटून राहू इच्छित असतील तर ईमान धनाची कदर करणार नाहीत या कसोटीत हे लोक असफल सिद्ध होत आहेत. म्हणून याचा हा परिणाम दिसत आहे की हे लोक गरीब ईमान धारकांची नाकदरी करीत त्यांच्यावर अशाप्रकारचे व्यंग करत आहेत की काय ईश्वराला, आपल्या कृपेने उपकृत करण्याकरिता हेच लोक लाभले?

८७. अर्थात ईमानच्या सुबुद्धिबाबत खरी गोष्ट माणसाची ऐहिक स्थिती नव्हे किंबहुना त्याची ती कृतज्ञतेची भावना आहे जी तो आपल्या पालन कर्त्यासाठी स्वहृदयात बाळगतो. यास्तव तो आपल्या कृतज्ञशील दासांनाच ईमान-धनाने उपकृत करतो मग ते ऐहिक दृष्ट्या अत्यंत हलाखीच्या दारिद्यावस्थेत का असेनात.

८८. काफ़ीर लोक गरीब ईमान धारकांना तुच्छ नजरेने बघतात व त्यांचा मनोभंग करण्यास टपून बसतात परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने या आयतीत त्यांना असा आत्मवर्धक संदेश ऐकविला आहे जो त्यांचे सर्व दु:ख दूर करण्याकरिता पुरेसा आहे. आणि त्यांना ती प्रतिष्ठा व मान्यता प्रदान केली आहे ज्याची कल्पनादेखील ऐहिक-वादी करु शकत नाही.

**अशा प्रकारे आम्ही आपल्या आयती सविस्तररित्या वर्णन करतो, अशासाठी की अपराधींचा मार्ग जाहीर व्हावा. सांगा, ज्यांना तुम्ही अल्लाह ऐवजी पुकारता त्यांची इबादत (उपासना) करण्याबाबत मला मनाई केली गेली आहे. सांगा मी तुमच्या अभिलाषांवर चालणारा नाही जर मी असे केले तर मार्गभ्रष्ट होईन आणि सन्मार्ग प्राप्त करणाऱ्यांपैकी राहणार नाही. *(अल-कुरआन)***

५५. अशा प्रकारे आम्ही आपल्या आयती सविस्तररित्या वर्णन करतो, अशासाठी की अपराधींचा मार्ग जाहीर व्हावा .

وَكَذٰلِكَ نُفَصِّلُ الْاٰيٰتِ وَلِتَسْتَبِيْنَ سَبِيْلُ الْمُجْرِمِيْنَ ﴿٥٥﴾ ع

५६. सांगा, ज्यांना तुम्ही अल्लाह ऐवजी पुकारता [८९] त्यांची इबादत (उपासना) करण्याबाबत मला मनाई केली गेली आहे. सांगा मी तुमच्या अभिलाषांवर चालणारा नाही [९०] जर मी असे केले तर मार्गभ्रष्ट होईन आणि सन्मार्ग प्राप्त करणाऱ्यांपैकी राहणार नाही.

قُلْ اِنِّيْ نُهِيْتُ اَنْ اَعْبُدَ الَّذِيْنَ تَدْعُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ ۭ
قُلْ لَّآ اَتَّبِعُ اَهْوَاۗءَكُمْ ۙ قَدْ ضَلَلْتُ اِذًا وَّمَآ اَنَا مِنَ
الْمُهْتَدِيْنَ ﴿٥٦﴾

५७. सांगा, मी आपल्या पालनकर्त्या तर्फे एका प्रकाशमान प्रमाणावर आहे [९१] आणि तुम्ही त्यास खोटे ठरविले आहे. तुम्ही ज्या गोष्टीकरिता घाई करीत आहात ती माझ्या अधिकारात नाही.[९२] निर्णय करणे तर केवळ अल्लाहच्या अधिकारात आहे. तो सत्य गोष्ट वर्णितो आणि तो सर्वोत्कृष्ट निर्णय करणारा आहे.

قُلْ اِنِّيْ عَلٰي بَيِّنَةٍ مِّنْ رَّبِّيْ وَكَذَّبْتُمْ بِهٖ ۭ مَا عِنْدِيْ مَا
تَسْتَعْجِلُوْنَ بِهٖ ۭ اِنِ الْحُكْمُ اِلَّا لِلّٰهِ ۭ يَقُصُّ الْحَقَّ وَهُوَ
خَيْرُ الْفٰصِلِيْنَ ﴿٥٧﴾

५८. सांगा, ज्या गोष्टीकरिता तुम्ही एवढी घाई माजवित आहात ती जर माझ्या अधिकारात असती तर माझ्या व तुमच्या दरम्यान (केव्हाच) निर्णय होऊन गेला असता आणि अल्लाह अत्याचारींना [९३] चांगल्या तऱ्हेने जाणतो.

قُلْ لَّوْ اَنَّ عِنْدِيْ مَا تَسْتَعْجِلُوْنَ بِهٖ لَقُضِيَ الْاَمْرُ بَيْنِيْ
وَبَيْنَكُمْ ۭ وَاللّٰهُ اَعْلَمُ بِالظّٰلِمِيْنَ ﴿٥٨﴾

५९. त्याच्याच जवळ अपरोक्षाच्या (गैबच्या) किल्ल्या आहेत, ज्यांना त्याच्या शिवाय कोणीहि जाणत नाही. [९४] जमीनीवर व समुद्रात जे काही आहे सर्व त्याला माहित आहे. असे एकहि पान गळून पडत नाही, परंतु हे की तो ते जाणतो [९५] जमीनीच्या अंध:कारात [९६] एकहि दाणा आणि कोणतीहि कोरडी वा ओलसर वस्तु अशी नाही जी एका स्पष्ट ग्रंथात [९७] समाविष्ट नसावी.

وَعِنْدَهٗ مَفَاتِحُ الْغَيْبِ لَا يَعْلَمُهَآ اِلَّا هُوَ ۭ وَيَعْلَمُ مَا فِي الْبَرِّ وَالْبَحْرِ ۭ وَمَا
تَسْقُطُ مِنْ وَّرَقَةٍ اِلَّا يَعْلَمُهَا وَلَا حَبَّةٍ فِيْ ظُلُمٰتِ الْاَرْضِ وَلَا رَطْبٍ
وَّلَا يَابِسٍ اِلَّا فِيْ كِتٰبٍ مُّبِيْنٍ ﴿٥٩﴾

६०. आणि तोच की जो रात्रीच्या वेळी तुम्हाला अचेतावस्था देतो [९८] आणि जे काही दिवसा तुम्ही केले होते ते जाणतो. मग तुम्हाला दिवसा उठवून उभे करतो, अशासाठी की निर्धारीत वेळ पूर्ण व्हावी [९९] मग तुम्ही त्याच्याकडे परतविले जाल, मग तो तुमच्या निदर्शनास आणील की तुम्ही काय करीत राहीलात.

وَهُوَ الَّذِيْ يَتَوَفّٰىكُمْ بِالَّيْلِ وَيَعْلَمُ مَا جَرَحْتُمْ بِالنَّهَارِ
ثُمَّ يَبْعَثُكُمْ فِيْهِ لِيُقْضٰٓى اَجَلٌ مُّسَمًّى ۚ ثُمَّ اِلَيْهِ مَرْجِعُكُمْ ثُمَّ
يُنَبِّئُكُمْ بِمَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ﴿٦٠﴾ ع

८९. पुकारणे शी अभिप्रेत गरजपूर्तिच्या उद्देश्याने पुकारणे, नाम जपणे व दुवा (प्रार्थना) मागणे होय हे पुकारणे उपासने समान आहे. आणि केवळ अल्लाह याबाबत पात्र आहे की त्याला पुकारले जावे परंतु अनेकेश्वरवादी अल्लाहला सोडून आपल्या कल्पित दैवतांना पुकारतात. त्यांच्या नावाचा जप करतात, त्यांच्याजवळ प्रार्थना करतात व त्यांच्या नावाचा जयजयकार करतात.

९०. शिर्क (अनेकेश्वरवाद) व धर्मात नव्या गोष्टी निर्माण करण्याचा ईश मार्गदर्शनाशी कसलाहि संबंध नाही, किंबहुना या माणसाच्या खोट्या इच्छा आहेत ज्यांना धर्माच्या नावाने प्रस्तुत करुन ईश्वराच्या दासांना मार्गभ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो.

९१. अर्थात कुरआन होय, जे अल्लाहतर्फे परिपूर्ण प्रमाण आहे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या एकेश्वरवादाचे आमंत्रण याच प्रमाणावर आधारीत आहे. ती अशी उचित गोष्ट आहे की प्रत्येक न्याय प्रिय व्यक्तिच्या लक्षात येऊ शकते स्वभावाचा आवाज व आत्म्याची पुकार आहे, याऊलट अनेकेश्वरवादी ज्या गोष्टीकडे बोलावितात ते कोणत्याहि प्रमाणावर आधारीत नाही. किंबहुना ही केवळ त्यांची बौद्धिक उपज व इच्छा-भक्ति होय.

९२. अर्थात ईश-प्रकोप (अज़ाब)

९३. येथे अत्याचारी म्हणजे अनेकेश्वरवादी होय यांना अत्याचारी यासाठी म्हटले गेले आहे की त्यांनी शिर्क व सत्य विरोधाचा मार्ग पत्करून आपल्या स्वभावाचा स्वर दाबला. आपल्या बुद्धिवर अज्ञानाचे परदे टाकले व आपल्या पालनकर्त्याशी निष्ठा हीनता केली अशाप्रकारे त्यांनी स्वत:ला दुष्परिणितीच्या हवाली करुन स्वत:वर अत्याचार करणारे बनले.

९४. अर्थात ग़ैब (अपरोक्षा) च्या खजिन्यांचा तोच मालक आहे व त्याचे दरवाजे त्याच्या उघडण्यानेच उघडतात.जी जी गोष्ट अपरोक्ष विश्वातून ज्ञात विश्वात येते ती अल्लाह आणतो म्हणून येते. समस्त सृष्टी रहस्यांना तोच जाणतो.

९५. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहचे ज्ञान प्रत्येक गोष्टीला घेरून आहे. तो केवळ मोठमोठ्या गोष्टीनाच नव्हे तर अगदी लहान सहान गोष्टीनाहि जाणतो. तो केवळ संग्रहाशीच नव्हे तर अणुरेणूशीहि परिचित आहे.

९६. अर्थात जमीनीच्या गर्भातील हिस्से व तिची आवरणे होत.

९७. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ सर्व अहवाल व घटनांचे या सर्व तपशीलांसह अत्यंत स्पष्ट स्वरुपात रेकार्ड उपलब्ध आहे.

मग ज्याच्याजवळ सर्व विश्वाचे तारीखवार प्रसंगाचे रेकाड (Chronology) उपस्थित आहे त्याच्याजवळ मनुष्य आचरणाचे रेकार्ड का बरे नसणार?

९८. निदेला अचेतावस्थेच्या अर्थाने घेतले गेले आहे. कारण निदावेस्थेत मनुष्य या जगापासून अशाप्रकारे बेखबर होतो जसा मरणावस्थेत होतो.

९९. म्हणजे जो ईश्वर रात्री तुमच्यावर झोपेचा अंमल चढवतो तो तुमच्या दिवसाच्या आचरणापासून अनभिज्ञ नाही आणि तोच तुम्हाला रात्र निघून गेल्यावर पुन्हा उठवून उभे करतो आणि हा झोपण्या-जागण्याचा क्रम चालू राहतो येथपावेतो की तुमचा निर्धारीत अवधि पूर्ण होतो व तुम्ही मृत्युपाशात जखडले जातात. जणू मेल्यानंतर दुसऱ्यांदा उठविले जाण्याचा अनुभव खऱ्या स्वरुपात तुम्ही दररोज करता, तेव्हा काय यावरुन मरणोत्तर जीवनाची सत्यता स्पष्ट होत नाही? आणि हा दैनंदिन अनुभव तुमच्या अंगी दुसऱ्यांदा उठविले जाण्याचा विश्वास निर्माण करीत नाही?

६१. तो आपल्या दासांवर वर्चस्व बाळगतो [१००] आणि तुम्हावर देखरेख करणारे पाठवितो, [१०१] येथपावेतो की जेव्हा तुमच्यापैकी एखाद्याचा मृत्यु येतो तेव्हा आमचे पाठविलेले (फिरिश्ते) त्याला (म्हणजे त्याचा प्राण) ताब्यात घेतात आणि ते (याआदेशाचे पालन करण्यात) कुचराई करीत नाही.[१०२]

وَهُوَ الْقَاهِرُ فَوْقَ عِبَادِهِ وَيُرْسِلُ عَلَيْكُمْ حَفَظَةً حَتَّىٰ إِذَا جَاءَ
أَحَدَكُمُ الْمَوْتُ تَوَفَّتْهُ رُسُلُنَا وَهُمْ لَا يُفَرِّطُونَ ﴿٦١﴾

६२. मग सर्व अल्लाहकडे परतविले जातात जो त्यांचा खराखूरा स्वामी आहे. [१०३] सावधान ! निर्णयाचा सर्वाधिकार त्यालाच आहे [१०४] आणि हिशेब घेण्यात तो अति शीघ्र आहे.[१०५]

ثُمَّ رُدُّوا إِلَى اللَّهِ مَوْلَاهُمُ الْحَقِّ أَلَا لَهُ الْحُكْمُ وَهُوَ أَسْرَعُ
الْحَاسِبِينَ ﴿٦٢﴾

६३. यांना विचारा, असा कोण आहे जो तुम्हाला जमीनीच्या व समुद्राच्या अंध:कारापासून [१०६] मुक्ति देतो जेव्हा तुम्ही गयावया करीत व सौम्य स्वरात त्यालाच साद घालता की जर त्याने आम्हाला या (संकटा) पासून मुक्ति दिली तर खचितच आम्ही त्याचे कृतज्ञ बनू?

قُلْ مَنْ يُنَجِّيكُمْ مِنْ ظُلُمَاتِ الْبَرِّ وَالْبَحْرِ
تَدْعُونَهُ تَضَرُّعًا وَخُفْيَةً لَئِنْ أَنْجَانَا مِنْ هَٰذِهِ لَنَكُونَنَّ
مِنَ الشَّاكِرِينَ ﴿٦٣﴾

६४. सांगा, केवळ अल्लाह तुम्हाला या (संकाटा) पासून व प्रत्येक यातनेपासून मुक्ति देतो, परंतु तुम्ही पुन्हा शिर्क करु (सहभागी ठरवू) लागता [१०७]

قُلِ اللَّهُ يُنَجِّيكُمْ مِنْهَا وَمِنْ كُلِّ كَرْبٍ ثُمَّ أَنْتُمْ تُشْرِكُونَ ﴿٦٤﴾

६५. संगा. तो हे करण्यास समर्थ आहे की तुमच्यावर वरुन एखादी शिक्षा पाठवावी किंवा तुमच्या पायाखालून एखादी शिक्षा उभी करावी. अथवा तुम्हाला समूहा समूहात विभाजित करुन आपसात जुंपवावे व एकाला दुसऱ्याच्या शक्तिची मजा चाखवावी [१०८] पहा, कशाप्रकारे आम्ही आपल्या आयती विविधरित्या वर्णितो, अशासाठी की त्यांनी समजावे [१०९]

قُلْ هُوَ الْقَادِرُ عَلَىٰ أَنْ يَبْعَثَ عَلَيْكُمْ عَذَابًا مِنْ فَوْقِكُمْ
أَوْ مِنْ تَحْتِ أَرْجُلِكُمْ أَوْ يَلْبِسَكُمْ شِيَعًا وَيُذِيقَ بَعْضَكُمْ
بَأْسَ بَعْضٍ انْظُرْ كَيْفَ نُصَرِّفُ الْآيَاتِ لَعَلَّهُمْ يَفْقَهُونَ ﴿٦٥﴾

६६. तुमच्या जाती समूहाने त्यास [११०] खोटे ठरविले आहे वस्तुतः ते सत्य आहे. सांगा मी काही तुमच्याजवर देखरेख ठेवणारा म्हणून नियुक्त झालो नाही.[१११]

وَكَذَّبَ بِهِ قَوْمُكَ وَهُوَ الْحَقُّ قُلْ لَسْتُ عَلَيْكُمْ بِوَكِيلٍ ﴿٦٦﴾

१००. अर्थात सर्व दास त्याच्या काबूत आहेत व दुष्ट माणसे व सैतानांवर त्याचे नियंत्रण आहे.

१०१. अर्थात ते फिरिश्ते होत जे मनुष्याच्या आचरणाचे रेकॉर्ड सुरक्षित राखण्यासाठी नियुक्त आहेत. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा. सूरह इनफितार टीप -१०

१०२. मानवाचा मृत्यु अल्लाहच्याच हाती आहे यात कोणाचा किंबहुना फिरिशत्यांचाहि कसलाहि हस्तक्षेप नाही. फिरिश्ते केवळ अल्लाहच्या आदेशाचे पालन करीत प्राण ताब्यात घेतात.

१०३. अर्थात मेल्यानंतर मनुष्याची समाप्ति होत नाही किंबहुना तो अल्लाह समक्ष पोहचतो.

१०४. म्हणजे सावध व्हा ! यासाठी की तुमच्या मृत्युनंतर तुमची भाग्ये त्याच्याच हाती असतील आणि अशी भ्रामक कल्पनेत राहू नका की एखाद्याचा पदर धरून मुक्ति प्राप्त करु शकाल.

१०५. म्हणजे अब्जावधि माणसांचा हिशेब घेण्यात अल्लाहला जराहि विलंब लागणार नाही.

१०६. अंध:करांशी अभिप्रेत ते अंध:कार होत जे सकंटांचे स्वरुप धारण करतात उदा. जेव्हा निबीड अंध:कार पसरावा व वादळी वारे वाहू लागावीत किंवा वाळवंटात वादळ उमळावे अथवा सागरी लाटांनी माणसाला आपल्या कुशीत घ्यावे.

१०७. अर्थात संकटातून मुक्ति केल्यानंतर अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त करावयास हवी होती परंतु तुम्ही कृतज्ञतेचा नजराणा आपल्या कल्पित दैवतांसमोर सादर करता.

१०८. अल्लाहची अवज्ञा करणारे जेव्हा असे पाहतात की अपराध कृत्ये करीत राहूनहि ईश-प्रकोप येत नाही तेव्हा ते चैन-बासुरी वाजवू लागतात त्यांना वाटते आता कोणताही अजाब (शिक्षा यातना) येणार नाही अशाच लोकांना येथे सचेत केले जात आहे की धोक्याची घंटी सतत वाजत आहे परंतु ज्या लोकांनी आपल्या कानात बोटे घातली आहेत त्यांना तिचा आवाज ऐकू येता नाही. अल्लाहची शिक्षा-यातना यायला विलंब तरी किती लागतो. सोसाट्याचे एक वादळ (Cyclone) अकस्मात प्रकट होऊन तुमचे तुकडे उडवू शकतो. महापूराचा प्रवाह तुमच्या पिकांसह तुम्हाला वाहून नेण्यास पुरेसा ठरु शकतो. भूकंपाचा एक झटका तुमच्या वसाहतींना भग्नावशेषात परिवर्तित करु शकतो. आणि हे हि अशक्य नव्हे की तुमच्या दरम्यान फूट पडावी व तुम्ही परस्परात झोंबाझोंबी व्हावी. अथवा जातीसमूहांच्या लढाईचा परिणाम म्हणून तुम्हाला एकमेकाच्या शक्तिची मजा चाखावी लागावी.

१०९. अर्थात ही वस्तुस्थिती जी कुरआनच्या आयतीमध्ये वर्णिली गेली आहे. विविध शैली व विविध पैलूंनी सादर केली गेली आहे. अशासाठी की लोकांना गोष्ट सहजगत्या समजावी.

११०. अर्थात कुरआनास.

१११. म्हणजे जे काम माझ्या सूपूर्द केले गेले आहे ते प्रचार व उपदेश करण्याचे आहे. ईमान बाळगण्याकरिता जबरदस्ती करण्याची जबाबदारी मजवर सोपवली गेली नाही.

لِكُلِّ نَبَاٍ مُّسْتَقَرٌّ وَّسَوْفَ تَعْلَمُوْنَ ﴿٦٧﴾

**६७.** प्रत्येक खबर घडून येण्याची एक वेळ निर्धारीत आहे.[११२] आणि लवकरच तुम्हाला माहित होईल.

وَاِذَا رَاَيْتَ الَّذِيْنَ يَخُوْضُوْنَ فِيْٓ اٰيٰتِنَا فَاَعْرِضْ عَنْهُمْ حَتّٰى
يَخُوْضُوْا فِيْ حَدِيْثٍ غَيْرِهٖ ۭ وَاِمَّا يُنْسِيَنَّكَ الشَّيْطٰنُ فَلَا تَقْعُدْ
بَعْدَ الذِّكْرٰى مَعَ الْقَوْمِ الظّٰلِمِيْنَ ﴿٦٨﴾

**६८.** आणि जेव्हा तुम्ही पहाल की लोक आमच्या आयतीमध्ये वक्र विवाद करीत आहेत तर तुम्ही यांच्यापासून विभक्त व्हा, येथपावेतो की त्यांनी दुसऱ्या एखाद्या गोष्टीवर बोलू लागावे. आणि जर सैतानाने तुम्हाला विसर पाडला तर आठवण आल्यानंतर अत्याचारी लोकांसह बसू नका. [११३]

وَمَا عَلَى الَّذِيْنَ يَتَّقُوْنَ مِنْ حِسَابِهِمْ مِّنْ شَيْءٍ وَّلٰكِنْ
ذِكْرٰى لَعَلَّهُمْ يَتَّقُوْنَ ﴿٦٩﴾

**६९.** अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांवर त्यांच्या हिशेबाची कसलीहि जबाबदारी नाही, तथापि उपदेश केला पाहिजे अशासाठी की त्यांनीहि भय बाळगू लागावे.[११४]

وَذَرِ الَّذِيْنَ اتَّخَذُوْا دِيْنَهُمْ لَعِبًا وَّلَهْوًا وَّغَرَّتْهُمُ الْحَيٰوةُ
الدُّنْيَا وَذَكِّرْ بِهٖٓ اَنْ تُبْسَلَ نَفْسٌۢ بِمَا كَسَبَتْ ڰ لَيْسَ لَهَا
مِنْ دُوْنِ اللّٰهِ وَلِيٌّ وَّلَا شَفِيْعٌ ۚ وَاِنْ تَعْدِلْ كُلَّ عَدْلٍ
لَّا يُؤْخَذْ مِنْهَا ۭ اُولٰۗىِٕكَ الَّذِيْنَ اُبْسِلُوْا بِمَا كَسَبُوْا ۚ لَهُمْ
شَرَابٌ مِّنْ حَمِيْمٍ وَّعَذَابٌ اَلِيْمٌۢ بِمَا كَانُوْا يَكْفُرُوْنَ ﴿٧٠﴾

**७०.** त्या लोकांना सोडा ज्यांनी आपल्या धर्माला खेळ व तमाशा बनविले आहे.[११५] आणि ज्यांना इहलोकीय जीवनाने धोक्यात टाकले आहे [११६] तुम्ही या (कुरआन) द्वारे आठवण करुन द्या, ज्यायोगे असे न व्हावे की एखादा मनुष्य आपल्या आचरण दुर्दशेत ग्रस्त व्हावा या स्थितीत की अल्लाहच्या शिवाय याचा ना कुणी दोस्त असावा, ना शिफारस करणारा- आणि जर तो फिदया (मुक्ती-द्रव्य) म्हणून सर्व काही देऊ इच्छिल तरीहि कबूल केले जाणार नाही [११७] हेच लोक होत जे आपल्या आचरण दुर्दशेत ग्रस्त असतील त्यांना पिण्याकरिता उकळते पाणी मिळेल व त्यांना दु:ख दायक शिक्षा भोगावी लागेल, या कुफ्रचा मोबदला म्हणून जे ते करीत राहीलेत.

११२. अर्थात कुरआन ज्या खबरी तुम्हाला देत आहे उदा. पैगंबरास खोटे ठरविण्याच्या स्थितीत शिक्षा-यातनेची खबर, कियामतीची खबर, काफीर लोकांकरीता जहन्नमची खबर वगैरे. तेव्हा यापैकी प्रत्येक खबर प्रकट होण्याकरिता एक वेळ निश्चित आहे आणि ती खचितच आपल्या वेळेवर जाहीर होऊन राहील.

११३. हे इस्लामचे आवाहन व उपदेश करण्याच्या संदर्भात एक महत्व पूर्ण मार्गदर्शन आहे जे ईमान बाळगणाऱ्यांना दिले गेले आहे–एखाद्या अशा बैठकीत जेथे कुरआनची वा त्याच्या आदेशाची मस्करी केली जात असेल किंवा लोक विवादात गुरफटून कुफ्र बोलू लागले असतील तर अशा ठिकाणी बसणे इमान शीला विरूद्ध आहे कोणताही सच्चा मुसलमान अशा लोकांशेजारी बसणे सहन करणार नाही जेथे त्याच्या धर्माला घायाळ केले जात असेल. येथे या आज्ञेबरोबर ही ताकीद देखील केली गेली आहे की जर सैतानाने विसर पाडल्यामुळे ह्या आज्ञेचे स्मरण झाले नाही तर आठवण होताच अशा बैठकीचा त्याग करावा.

एकीकडे ही ताकीदपूर्वक आज्ञा आहे व दुसरीकडे आजच्या काळातील सेक्युलेरीस्ट मुसलमान आहेत जे मुस्लिमेतरांना आपल्या सभेत बोलावून अशी भाषणे करवितात, ज्यात शरीअतची थट्टा उडविली जाते आणि जेथे अवसर लाभल्यास स्वत:देखील धर्मावर घाव घालतात अशासाठी की त्यांच्या सेक्युलॅरीझमची लाज रहावी.

या आयतीत जी आज्ञा दिली गेली आहे त्याचा हवाला सूरह निसाच्या आयत क्र. १४० मध्येहि दिला गेला आहे.

११४. अर्थात ईमान बाळगणाऱ्यांवर या इन्कार करणाऱ्यांच्या आचरणाची कसलीहि जबाबदारी टाकली गेली नाही, किंबहुना फक्त स्मरणाची जबाबदारी टाकली गेली आहे मग त्यांनी का म्हणून त्यांच्या बाबतीत अनुचित सहिष्णुतेने काम घ्यावे? त्यांचे काम हे आहे की उपदेश करण्याचा जर एखादा मौका आहे तर तो हातून जाता कामा नये आणि जर संबोधित लोक गांभीर्य घालवून बसले आहेत व धर्माला निंदा नालस्तीचे लक्ष्य बनवित आहेत तर यांच्यातून उठून जावे व त्यांना त्यांच्या दशेवर सोडावे.

११५. धर्माशी अभिप्रेत ''इस्लाम'' होय आणि याचा त्या लोकांकडे यासाठी संबंध दाखविला गेला आहे की अल्लाहने इस्लाम धर्माला संपूर्ण मानव-जातीच्या मार्गदर्शनार्थ अवतरीत केले होते म्हणून हा धर्म प्रत्येक मनुष्याचा स्वत:चा आपला धर्म आहे. परंतु या गुण न जाणणाऱ्यांनी आपल्या या धर्मास आपला मार्गदर्शक बनविण्याऐवजी खेळ तमाशा बनविले, तद्नुसार याची थट्टा उडवितात.

या विचार सरणीचे लोक प्रत्येक काळात दिसून आले आहेत. आणि आजचा ''मॉडर्न'' मनुष्य देखील इस्लामला सनातनी ठरवून त्याच्या शिकवणींचा उपहास करतो आणि असे समजतो की ही ''उज्वल विचार सरणी'' आहे.

११६. अर्थात अल्लाहच्या धर्माची नाकदरी ते या कारणास्तव करतात की इहलोकीय जीवन त्यांच्या नजरेत इतके भरले आहे की ते याहून उच्चतम अशा कोणत्याहि जीवनाची कल्पना देखील करायला तयार नाहीत.

११७. खरे तर त्यादिवशी फिदीया म्हणून द्यावयाला त्याच्याजवळ काहीहि नसेल परंतु समजा त्याच्याजवळ साऱ्या जगाची सम्पत्ति असती तर तो सर्व फिदीया म्हणून देऊन आपला जीव सोडविण्या करीता तयार झाला असता, वस्तुत: इहलोकात सम्पत्तिसाठी त्याने आपल्या जीवनाला चुकीच्या मार्गावर लावले होते व आपल्या दुष्परिणितीची पर्वा केली नव्हती.

७१. सांगा, काय आम्ही अल्लाहला सोडून अशांना पुकारावे जे आम्हाला ना फायदा पोहचवू शकतात ना नुकसान [११८] आणि ज्याअर्थी अल्लाहने आम्हाला सरळ मार्ग दाखवून दिला आहे तर काय आम्ही उलट पावली फिरावे व आमची दशा त्या माणसासारखी व्हावी ज्याला सैतानांनी निबीड अरण्यात भटकवून दिले असावे [११९] आणि तो हैराण व विमनस्क असावा व त्याचे साथीदार त्याला सरळ मार्गाकडे बोलावित असावेत की आमच्या जवळ ये [१२०] सांगा, अल्लाहचे मार्गदर्शन हेच खरे मार्गदर्शन आहे. [१२१] आणि आम्हाला आदेश दिला गेला आहे की आम्ही स्वत:ला सर्व विश्वांच्या पालनकर्त्याच्या हवाली करावे. [१२२]

قُلْ أَنَدْعُوا مِنْ دُونِ اللَّهِ مَا لَا يَنْفَعُنَا وَلَا يَضُرُّنَا وَنُرَدُّ عَلَىٰ
أَعْقَابِنَا بَعْدَ إِذْ هَدَانَا اللَّهُ كَالَّذِي اسْتَهْوَتْهُ الشَّيَاطِينُ
فِي الْأَرْضِ حَيْرَانَ لَهُ أَصْحَابٌ يَدْعُونَهُ إِلَى الْهُدَى ائْتِنَا ۗ
قُلْ إِنَّ هُدَى اللَّهِ هُوَ الْهُدَىٰ ۖ وَأُمِرْنَا لِنُسْلِمَ لِرَبِّ الْعَالَمِينَ ﴿٧١﴾

७२. आणि हे की नमाज़ क़ायम करा व त्याचे भय बाळगून रहा [१२३] त्याच्याचजवळ तुम्हाला एकत्रित केले जाईल.

وَأَنْ أَقِيمُوا الصَّلَاةَ وَاتَّقُوهُ ۚ وَهُوَ الَّذِي إِلَيْهِ
تُحْشَرُونَ ﴿٧٢﴾

७३. तोच की ज्याने आकाशांना व जमीनीला सत्य (हेतु) सह निर्माण केले [१२४] आणि ज्या दिवशी तो फर्माविल 'हो' तेव्हा घडून येईल [१२५] त्याचे म्हणणे सत्य आहे [१२६] आणि ज्या दिवशी सूर फूंकला जाईल राज्यसत्ता त्याचीच राहील. तो अदृष्ट व दृष्ट सर्व काहि जाणणारा आहे आणि तो बुद्धि कौशल्य बाळगणारा व जाणकार आहे.

وَهُوَ الَّذِي خَلَقَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ بِالْحَقِّ ۖ وَيَوْمَ
يَقُولُ كُنْ فَيَكُونُ ۚ قَوْلُهُ الْحَقُّ ۚ وَلَهُ الْمُلْكُ يَوْمَ يُنْفَخُ
فِي الصُّورِ ۚ عَالِمُ الْغَيْبِ وَالشَّهَادَةِ ۚ وَهُوَ الْحَكِيمُ الْخَبِيرُ ﴿٧٣﴾

७४. आणि (स्मरण करा) जेव्हा इब्राहीमने [१२७] आपला पिता आजर यास म्हटले होते, काय आपण मूर्त्यांना देव ठरविता, मी तर आपणास व आपल्या जातीसमूहास उघड अशा मार्गभ्रष्टतेत पाहत आहे. [१२८]

وَإِذْ قَالَ إِبْرَاهِيمُ لِأَبِيهِ آزَرَ أَتَتَّخِذُ أَصْنَامًا آلِهَةً ۖ إِنِّي
أَرَاكَ وَقَوْمَكَ فِي ضَلَالٍ مُبِينٍ ﴿٧٤﴾

७५. अशाप्रकारे आम्ही इब्राहीमला आकाशांचे व जमीनीचे शासन (व्यवस्था) दाखवित होतो. अशासाठी की त्याने विश्वास बाळगणाऱ्यांपैकी व्हावे. [१२९]

وَكَذَٰلِكَ نُرِي إِبْرَاهِيمَ مَلَكُوتَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ وَلِيَكُونَ
مِنَ الْمُوقِنِينَ ﴿٧٥﴾

११८. अभिप्रेत ''मूर्त्या'' होत ज्या केवळ दगडाचे तुकडे आहेत वा मातीचे ढीग यांच्यात हे सामर्थ्य कसले की एखाद्याला लाभ वा हानि पोहचवू शकतील देवी देवतांची कल्पनासुद्धा केवळ मनोकल्पना आहे. ना एखादी धनाची देवी आहे जी माणसाला धनवान बनविते आणि ना दु:खयातना व रोगांची देवी आहे जी माणसाला ''देवी'' वगैरे रोगात व अन्य दु:ख यातनेत ग्रस्त करते ही केवळ भ्रम पूजा आहे. वस्तुत: या देवांचे कसलेहि अस्तित्व नाही.

११९. सैतानाद्वारे माणसाला निबीड अरण्यात भटकाविणे या अर्थाने आहे ज्या अर्थाने सैतानाद्वारे माणसाला विस्मरण घडविणे.

१२०. हे उदाहरण आहे सैतानाच्या प्रभावाखाली भटकणाऱ्यांचे इन्कार करणाऱ्यांची हीच दशा आहे की त्यांना सैतानांनी भटकविले आहे आणि ते इतके विमनस्क आहेत की त्यांचे जे साथीदार त्यांना सरळ मार्गाकडे बोलावित आहेत. त्यांच्या बोलविण्यावर ते कान द्यायला देखील तयार नाहीत.

हे उदाहरण प्रस्तुत करुन ईमान बाळगणारे इन्कार करणाऱ्यांना सांगत आहेत की तुम्ही स्वत: भटकलेले आहात आणि ही इच्छा बाळगता की आम्हीहि तुमच्यासारखे भटकून जावे वस्तुत: हे व्हावयास हवे होते की तुम्ही आमची पुकार ऐकली असती व आमच्याजवळ येऊन सरळ मार्ग प्राप्त करणाऱ्यात सामील झाले असते.

१२१. अर्थात ईश्वरापर्यंत पोहचण्याचे मार्ग ते नव्हेत जे लोकांनी आपल्या इच्छा आकांक्ष वा भ्रम कल्पना किंवा धार्मिक कल्पना अथवा तत्वज्ञानी विचारांच्या आधारे योजिले आहेत किंबहुना त्याच्यापर्यंत पोहचण्याचा एकमेव मार्ग तो आहे ज्याचा चिन्हनिर्देश त्याने स्वत:केला आहे, अर्थात तो एकमेव मार्ग म्हणजे ''इस्लाम'' होय.

१२२. आणि इस्लामची वस्तुस्थिती हीच की स्वत:ला पूर्णपणे अल्लाहच्या सूपूर्द केले जावे.

१२३. स्वत:ला अल्लाहच्या हवाली करण्याची सर्वप्रथम जाहीर गोष्ट नमाज होय, जोपर्यंत मनुष्य नमाज़ क़ायम करत नाही. तोपर्यंत त्याच्या अधीन करण्याला काहीहि अर्थ नाही. आणि ''त्याचे भय बाळगत रहा'' (ईश-भया) चा कृतिशील पुरावा मनुष्य शरीयतच्या आदेशांचे पालन करूनच देऊ शकतो.

१२४. म्हणजे अल्लाहने या सृष्टीला हेतुविरहीत व अकारण निर्माण केले नाही. किंबहुना याचे एक उद्दिष्ट व कारण आहे आणि ते म्हणजे मोबदला व शिक्षेचा व्यवहार ज्याकरिता नवी जमीन, नवे आकाश व नव्या व्यवस्थेची गरज आहे ही नवी व्यवस्था याच सृष्टीच्या उदरातून बाहेर पडेल आणि ''कियामत'' याच सृष्टीच्या क्रान्तीचे नाव आहे.

१२५. अर्थात ''कियामत'' हश्र व आखिरत-विश्व उभे करण्यात अल्लाहला कसलीही अडचण येणार नाही किंबहुना ज्याप्रकारे त्याच्या एक आदेशाने ही सृष्टी आस्तित्वात आली तद्वतच त्याच्या एक आदेशाने क़ियामत् हश्र व आखिरतचे विश्व क़ायम होईल.

१२६. अर्थात त्यांची गोष्ट अपरिहीर्यत: सत्य सिद्ध होते म्हणून क़ियामतीच्या बाबतहि त्याची गोष्ट खरी होईलच.

१२७. हजरत इब्राहीम यांचा काळ हा हजरत ईसा यांच्या सुमारे दोन हजार वर्षापूर्वीचा काळ होय. त्यांचा निवास इराकच्या ''उर'' शहरात होता जे फ़ुरात नदीच्या किनारी वसले होते.

''आज़र'' हज़रत इब्राहीम यांच्या पित्याचे नाव होय आज़र मूर्तिपूजक होता. बायबलमध्ये याचे नाव तारह असे आहे. असे दिसून येते की हे नाव बायबलच्या रचनाकारांनी किंवा अनुवादकांनी चुकीने लिहिले आहे आणि संभवत: कुरआनने त्याच्या खऱ्या नावाचे स्पष्टीकरण याचसाठी केले ज्यायोगे चुकीची दुरूस्ती व्हावी आणि इब्राहीमचे खानदान उचितपणे सुरक्षित रहावे.

१२८. हज़रत इब्राहीम यांचा जातीसमूह मूर्तिपूजक होता आणि जेव्हा त्यांनी मूर्तिपूजा व शिर्कविरूद्ध आवाज उठविण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याचा आरंभ स्वगृहापासूनच केला म्हणून सर्वात आधी आपल्या पित्याला ही मार्गभ्रष्टता विशद केली व त्यांना एकेश्वरवाद कबूल करण्याचे आमंत्रण दिले. शब्द दर्शवितात की हे आमंत्रण निर्बंधपणे व पूर्ण ईमान धारिष्ट्यासह अशाप्रकारे सादर केले होते की मूर्तिपूजा व शिर्कची अयोग्यता व त्यांची असत्यता स्पष्ट व्हावी.

''मूर्तिपूजेला'' खुली मार्गभ्रष्टता म्हटले गेले आहे कारण साधारण बुद्धि (Common Sense) अशा कोणत्याहि वस्तूस ईश्वर मानण्यास इन्कार करते जिला माणसाने स्वत: घडविले असेल.

१२९. हज़रत इब्राहीम यांचा जन्म जरी एका मूर्तिपूजक वंशात मूर्तिपूजक जातीसमूहात झाला होता तरी अल्लाहने प्रदान केलेल्या बुद्धिने काम घेतल्यामुळे ज्याप्रकारे यांना मूर्तिपूजेची मार्गभ्रष्टता स्पष्ट कळली होती, तद्वतच आकाशांच्या व जमीनीच्या व्यवस्थेवर विचार चिंतन केल्याने त्यांना अल्लाहच्या एकमेवतेचाहि पूर्ण विश्वास झाला होता. कारण ही सृष्टी-व्यवस्था साक्ष देते की येथे फक्त एकाच सामर्थ्याची राज्य सत्ता आहे. ज्याने समस्त वस्तूंना आपल्या कायद्यात जखडून ठेवले आहे इब्राहीमने ईश्वर आणि धर्म संबंधात आपल्या पूर्वजांचे अंधानुकरण केले नाही किंबहुना विवेकबुद्धीने काम घेतले. व सृष्टीव्यवस्थेच्या अवलोकनाने योग्य परिणामाप्रत पोहचण्याचा प्रयत्न केला यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना अंतर्दृष्टीने उपकृत केले व त्यांना मार्गदर्शन केले. कुरआनात अन्य एका स्थानी फर्माविले

गेले आहे !

وَلَقَدْ اٰتَيْنَآ اِبْرٰهِيْمَ رُشْدَهٗ مِنْ قَبْلُ (الانبياء-٥١)

''आणि आम्ही इब्राहीमला आधीच सन्मार्गबुद्धि प्रदान केली होती'' (अल-अंबिया - ५१)

पैगंबर शांत स्वभावावर कायम असतो म्हणून हज़रत इब्राहीम देखील यावर कायम होते. ते केवळ अल्लाहला आपला पालनकर्ता मानीत होते व याविषयी ते कसल्याहि संशयात पडले नव्हते परंतु ईश-शासनाच्या अवलोकनाने त्यांच्या एकेश्वरवाद कल्पनेस अधिक मजबूत केले व त्यांच्या अंतर्यामी दृढविश्वासाची कैफियत निर्माण झाली. कुरआन ह्याच अवलोकनाचे आमंत्रण देते.जो मनुष्य सृष्टी व्यवस्थेवर या पैलूने विचार चिंतन करील की कोणी निर्माण कर्ता आहे किंवा नाही व तिच्यावर एकाच ईश्वराचे अधिपत्य आहे वा अनेक ईश्वराचे? तर सहजगत्या त्याला एकेश्वर वादाचा रहस्याच्या उलगडा होईल.

आजच्या काळातील शस्त्रज्ञ व खगोल शास्त्रवेत्ते (Astronomers) कारण की या पैलूने सृष्टीचे अवलोकन करीत नाही व त्यांचा अभ्यास आधिभौतिक (Objective) स्वरूपाचा नसतो किंहबुना ते ईश्वराशी बेपर्वा होऊन किंवा पक्षपाती बुद्धिने अभ्यास करतात आणि म्हणूनच ते तौहीद (एकेश्वरवादा) च्या दर्शनापासून वंचित राहतात. व त्यांच्या अंतर्यामी ईमान व दृढविश्वासाची कैफियत निर्माण होत नाही.

**म्हणून जेव्हा रात्र त्याच्यावर पसरली तेव्हा त्याने एक तारा पाहिला. म्हणाला, हा माझा पालनकर्ता आहे. मग जेव्हा तो मावळला तेव्हा म्हणाला मावळणाऱ्यांस मी पसंत करीत नाही. मग जेव्हा चंद्राला चमकतांना पाहिले तेव्हा म्हणाला हा माझा पालनकर्ता आहे. परंतु जेव्हा तो देखील बुडाला तेव्हा म्हणाला जर माझ्या पालनकर्त्याने मला मार्गदर्शन केले नाही तर मी मार्गभ्रष्ट लोकांपैकी होईन.**
***(अल-क़ुरआन)***

७६. म्हणून जेव्हा रात्र त्याच्यावर पसरली तेव्हा त्याने एक तारा पाहिला. म्हणाला, हा माझा पालनकर्ता आहे. मग जेव्हा तो मावळला तेव्हा म्हणाला मावळणाऱ्यांस मी पसंत करीत नाही.

فَلَمَّا جَنَّ عَلَيْهِ الَّيْلُ رَاٰ كَوْكَبًا ۚ قَالَ هٰذَا رَبِّيْ ۚ فَلَمَّآ اَفَلَ
قَالَ لَآ اُحِبُّ الْاٰفِلِيْنَ ﴿٧٦﴾

७७. मग जेव्हा चंद्राला चमकतांना पाहिले तेव्हा म्हणाला हा माझा पालनकर्ता आहे. परंतु जेव्हा तो देखील बुडाला तेव्हा म्हणाला जर माझ्या पालनकर्त्याने मला मार्गदर्शन केले नाही तर मी मार्गभ्रष्ट लोकांपैकी होईन.

فَلَمَّا رَاَ الْقَمَرَ بَازِغًا قَالَ هٰذَا رَبِّيْ ۚ فَلَمَّآ اَفَلَ قَالَ لَىِٕنْ
لَّمْ يَهْدِنِيْ رَبِّيْ لَاَكُوْنَنَّ مِنَ الْقَوْمِ الضَّاۤلِّيْنَ ﴿٧٧﴾

७८. मग जेव्हा सूर्याला तळपतांना पाहिले तेव्हा म्हणाला हा माझा पालनकर्ता आहे. हा सर्वात मोठा आहे, परंतु जेव्हा तो देखील बुडाला तेव्हा म्हणाला, हे माझ्या जातीसमूहाच्या लोकांनो मी त्या सर्वांपासून बंधमुक्त आहे ज्यांना तुम्ही सहभागी ठरविता.[१३०]

فَلَمَّا رَاَ الشَّمْسَ بَازِغَةً قَالَ هٰذَا رَبِّيْ هٰذَآ اَكْبَرُ ۚ فَلَمَّآ اَفَلَتْ
قَالَ يٰقَوْمِ اِنِّيْ بَرِيْۤءٌ مِّمَّا تُشْرِكُوْنَ ﴿٧٨﴾

७९. मी एकचित्त होऊन आपले तोंड त्या सामर्थ्याकडे वळविले ज्याने आकाशांना व जमीनीला निर्माण केले आहे आणि मी शिर्क करणाऱ्यांपैकी नाही.[१३१]

اِنِّيْ وَجَّهْتُ وَجْهِيَ لِلَّذِيْ فَطَرَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ حَنِيْفًا وَّمَآ
اَنَا مِنَ الْمُشْرِكِيْنَ ﴿٧٩﴾

८०. आणि त्याचा जातीसमूह त्याच्याशी भांडू लागला तेव्हा तो म्हणाला, काय तुम्ही अल्लाह बाबत माझ्याशी भांडण करता, वस्तुतः त्याने मला मार्ग दाखविला आहे.[१३२] आणि मी त्यांचे भय बाळगत नाही ज्यांना तुम्ही त्याचा सहभागी ठरवित आहात. होय,जर माझा पालनकर्ता काही (नुकसान पोहचवू) इच्छिल तर गोष्ट बेळगी. [१३३] माझा पालनकर्ता आपल्या ज्ञानाने प्रत्येक वस्तूस व्यापून आहे.[१३४] मग काय तुम्ही बोध आठविणाऱ्या गोष्टी प्राप्त करणार नाही?

وَحَاۤجَّهٗ قَوْمُهٗ ۗ قَالَ اَتُحَاۤجُّوْۤنِّيْ فِى اللّٰهِ وَقَدْ هَدٰىنِ ۗ
وَلَآ اَخَافُ مَا تُشْرِكُوْنَ بِهٖٓ اِلَّآ اَنْ يَّشَاۤءَ رَبِّيْ شَيْـًٔا ۗ
وَسِعَ رَبِّيْ كُلَّ شَيْءٍ عِلْمًا ۗ اَفَلَا تَتَذَكَّرُوْنَ ﴿٨٠﴾

८१. आणि मी त्यांचे भय कसे बाळगू ज्यांना तुम्ही त्याचा सहभागी ठरविता? वस्तुतः तुम्ही या गोष्टीचे भय बाळगत नाही की अल्लाह सोबत इतरांनाहि सहभागी ठरवावे ज्याकरिता त्याने तुमच्यावर कोणतेहि प्रमाण अवतरित केले नाही. [१३५] आम्हा उभय पक्षापैकी कोणता पक्ष शांतीचा अधिक हक्कदार आहे? [१३६] जर तुम्ही जाणत असाल तर दाखवा.

وَكَيْفَ اَخَافُ مَآ اَشْرَكْتُمْ وَلَا تَخَافُوْنَ اَنَّكُمْ اَشْرَكْتُمْ بِاللّٰهِ
مَا لَمْ يُنَزِّلْ بِهٖ عَلَيْكُمْ سُلْطٰنًا ۗ فَاَيُّ الْفَرِيْقَيْنِ اَحَقُّ بِالْاَمْنِ ۚ
اِنْ كُنْتُمْ تَعْلَمُوْنَ ﴿٨١﴾

१३०. या घटनेला चांगल्याप्रकारे समजून घेण्याकरिता खालील गोष्टींना समोर ठेवणे आवश्यक आहे.

**(अ)** हज़रत इब्राहीम यांचा जाती समूह ताऱ्यांची पूजा करणारा समूह होता. शुक्र ताऱ्यास अश्तरा म्हटले जात असे ही सौंदर्य व प्रेमाची देवी होती. चंद्राला नन्नार हे नाव होते व तो संपन्नतेचा दैवत होता व सूर्य (शम्श) त्यांच्यादृष्टीने सर्वात मोठे दैवत होते आणि ज्याअर्थी त्यांच्यादृष्टीने तारे व नक्षत्रे दैवत स्वरुप होते तेव्हा त्यांनी त्यांच्या नावे अनेक मूर्त्या घडविल्या होत्या जे त्यांच्या धारणेनुसार त्यांचे नेतृत्व करीत होते आणि या कल्पनेसह की या मूर्त्यांपुढे उपासनेच्या प्रथा सादर करणे, म्हणजे या देवतांना खुश करण्याचा व त्यांच्या अपाया पासून सुरक्षित राहण्याचे साधन आहे. ते त्यांची पूजा करीत, त्यांच्याशी तो संबंध जोडीत जो ईश्वरासह जोडला जातो व त्यांच्यापुढे निष्ठेचे असे नजराणे सादर करीत जे ईश्वरापुढे सादर केले जातात. अशाप्रकारे त्यांनी आपल्या ईश्वरांना स्वत:च घडविले होते.

**(ब)** मूर्तिपूजेचा संबंध ज्याअर्थी नक्षत्र पूजेशी होता.

म्हणून हज़रत इब्राहीम यांनी असे प्रमाण प्रस्तुत केले ज्याने त्या समस्त आकाशस्थ ईश्वरांना बुडून जाण्यास विवश केले व जेव्हा ते बुडाले तेव्हा आपल्यासह जमीनीवरील ईश्वरांनाहि घेऊन बुडाले.

**(क)** तारे, चंद्र व सूर्याच्या अवलोकनाची घटना एकाच दिवशी व रात्री घडली असेल असे नाही किंबहुना शक्य आहे की दरम्यान काही काळ गेला असेल म्हणजे एका रात्री ताऱ्यांच्या उदय-अस्ताचे अवलोकन केले गेले असावे आणि दुसऱ्या रात्री चंद्राला व मग अन्य एका दिवशी सूर्याला विवादाखाली आणले गेले असेल.

**(ड)** ही घटना वादविवादात्मक होय. वर्णन शैलीच्या अनुरोधाने हे उघड आहे म्हणून यास हज़रत इब्राहीम यांची वैचारिक उन्नति कल्पिणे आणि अशी कल्पना करणे की त्यांनी तारा, चंद्र या विषयी هٰذَا رَبِّی ''हा माझा पालनकर्ता आहे'' असे जे फर्माविले होते ती सत्य शोधाच्या मार्गातील एक अवस्था होती. तर हा फार मोठा गैरसमज आहे आणि हे मोठे दु:ख आहे की ही ठोकर काही भाष्याकारांनीहि खाल्ली आहे. तथापि अल्लामा इब्ने कसीर यांनी स्पष्टीकरण केल्याप्रमाणे हा हजरत इब्राहीम यांचा आपल्या जातीसमूहाशी वाद होता आपली व्यक्तिगत साक्ष नव्हे म्हणून هٰذَا رَبِّی ''हा माझा पालनकर्ता आहे'' ही गोष्ट त्यांनी वाद करतांना म्हटली होती, ज्याचा अर्थ हा होता की काय खरोखर हा माझा पालनकर्ता आहे? नक्षत्रादिंना पालनकर्ता ठरविण्याबद्दल आश्चर्याचे प्रकटीकरणहि होते. आणि जातीसमूहा समोर हा प्रश्न देखील की काय खरोखर या वस्तु 'उपास्य' बनविल्याजाण्या योग्य आहेत?

जेथपर्यंत वर्णन शैलीचा संबंध आहे, याच्याआधी हजरत इब्राहीम यांचे आपल्या पित्यासमोर सत्य-आवाहन प्रस्तुत करण्याचा उल्लेख आला आहे आणि या घटनेच्या लागोपाठ म्हणजे आयत क्र.८० मध्ये जातीसमूहाचा हजरत इब्राहीम यांच्याशी झालेल्या भांडण तंट्याचा उल्लेख आहे. मग ही घटना होत असताना हजरत इब्राहीम चंद्राला पाहून जेथे हा माझा पालनकर्ता आहे फर्मावितात तिथेच हे देखील फर्मावितात की जर माझ्या पालनकर्त्याने मला मार्गदर्शन केले नाही तर मी मार्गभ्रष्ट लोकांपैकी होईन याचा अर्थ याखेरीज काय होता की केवळ अल्लाहच माझा पालनकर्ता आहे आणि मार्गदर्शनासाठी त्याच्याकडे रूजू केले पाहिजे अन्यथा मार्गभ्रष्टतेशिवाय काहिहि पदरी पडू शकत नाही. ही गोष्ट तर हजरत इब्राहीम यांच्या एकेश्वरवादी बुद्धीचे चित्रण करते. म्हणून यानंतर सूर्याला पाहून त्याला आपला पालनकर्ता म्हणणे, संबोधिताच्या प्रमाणास त्यांच्यावरच उलटून देण्याच्या उद्देशाने होते आणि चर्चेच्या वेळी ज्या गोष्टी मनुष्य गृहीत धरून सांगतो त्या गोष्टी म्हणजे त्याचे खरे विचार नव्हेत. आणि येथे शब्दशैली प्रमाण आहे की हज़रत इब्राहीम यांनी ही गोष्ट आपल्या जाती समूहाला निष्प्रमाण करण्याकरिता सांगितली होती. ज्याप्रमाणे त्यांनी एका दुसऱ्या प्रसंगी मूर्त्यांना तोडण्याच्या कृत्याचा संबंध मोठ्या मूर्तीकडे केला होता. वस्तुत: त्यांनीच मूर्त्या तोडल्या होत्या.

**(इ)** हज़रत इब्राहीम यांनी नक्षत्रभक्ति खोटी असण्याबद्दल जो युक्तिवाद केला त्याचा खुलासा हा की तारे असोत वा ग्रह, चंद्र असो वा सूर्य त्यांच्या चकाकीत तेजाने लोक धोक्यात पडून त्यांना ईश्वर वा देवी देवता समजू लागले आहेत. मग त्यांची पूजा करायला सूरवात होते. परंतु जेथे लोक त्यांना उगवतांना पाहतात तिथे जर त्यांनी त्यांच्या मावळण्यासहि पाहिले तर त्यांना हे स्पष्ट दिसून येईल की यांच्यापैकी कोणीहि ईश्वर वा देवी देवता नाही कारण हे सर्व एका संलग्न व्यवस्थेच्या नियंत्रणात आहे. ते ना वेळेच्या पूर्वी उगवू शकतात ना वेळेपूर्वी अस्ताला जाऊ शकतात मग तो ईश्वर कसा जो एखाद्या नियमात जखडलेला असावा. त्यांची ही नैसर्गिक अवस्था या गोष्टीचे प्रमाण आहे की त्यांच्यावर एका उच्चतम अधिपत्याची राज्यसत्ता आहे. ज्याच्या कायद्यात ते जखडलेले आहेत म्हणून उपासनेस पात्र आहे जो या सर्वांच्या निर्माणकर्ता व अधितपति आहे. आकाशात बंदिस्त असलेले नव्हेत जे अगदी अधिकारहीन आहेत.

**(ई)** हज़रत इब्राहीम यांनी तारे व ग्रहच्या देवी देवता असण्याच्या कल्पनेचा जो नकार केला होता त्याचे सत्यसमर्थन आज सायन्स द्वारेहि होत आहे कारण सायन्सने मोठ्या विवरणासह ही गोष्ट आमच्या समोर ठेवली आहे. ग्रह नक्षत्रे कशाप्रकारे

सूर्यमालेत जखडलेले आहेत व ज्या ग्रहांच्या चमकण्याने मनुष्य प्रभावित होऊन त्यांना देवी देवता समजत राहीला त्यांची वस्तुस्थिती ही आहे की ते आपल्या प्रकाश करिता सूर्याचे गरजवंत आहेत आणि सूर्य याशिवाय काहीच नाही. की त्यात अग्नि धगधगत राहते व स्फोट होत राहतात, मग काय ईश्वर असाहि असतो ज्याच्या उदरात स्फोट होत असतात. तद्वतच चंद्रावर पोहचून त्याच्या जमीनीला तुडविण्याचा अनुभव मानवाने घेतला आहे. मग काय ईश्वर असाहि असू शकतो की ज्याला मनुष्य आपल्या पायाखाली तुडविण्यात सफल व्हावा?

१३१. ही एकेश्वर वादाची घोषणा होय ज्यात शिर्कपासून उद्विग्नता व्यक्त केली गेली आहे व एकेश्वरवादाचे प्रमाणहि अर्थात हे की जो आकाश व जमीनीचा निर्माणकर्ता आहे तोच खरा उपास्य होय. म्हणून सर्व खोट्या उपास्यापासून विभक्त होऊन मी त्याच्याकडे वळलो आहे व त्याला आपले उपास्य बनविले आहे. या वचनांची ही अध्यारुतता लक्षात घेता यांना नमाजच्या आरंभी अदा केले जाते.

१३२. निष्पन्न हे की भांडण तंट्याची ही घटना जिचा उल्लेख वर आला आहे, त्या वेळेची आहे जेव्हा हज़रत इब्राहीम प्रेषितत्वाने सम्मानित केले गेले होते.

१३३. जेव्हा लोकांनी इब्राहीम यांच्या मुखाने देवी देवतांविरूद्ध गोष्टी ऐकल्या तेव्हा त्यांना भिती दाखवू लागले की यांच्याकडून तुमच्यावर कोणते ना कोणते संकट जरुर येईल आणि तुम्ही दुर्दैवाची शिकार व्हाल याच्या उत्तरात हजरत इब्राहीमने फर्माविले की मी तुमच्या कल्पित ईश्वारांना मुळीच भीत नाही. नुकसान पोहचविण्याचा अधिकार केवळ अल्लाहला आहे. तो इच्छिल तर नुकसान पोहचविल अन्यथा या बनावटी ईश्वरांच्या हातात काहिहि नाही.

१३४. अर्थात स्वामीत्वाकरिता व्यापक ज्ञानाची गरज आहे आणि हा गुण अल्लाहखेरीज अन्य कोणाचाहि नाही. मग त्याला सोडून एखाद्याला पालनकर्ता बनविण्यात काय योग्यता आहे? काय त्या मूर्त्या लोकांच्या अहवालशी परिचित आहेत की ज्यायोगे ते लोकांना नफा वा नुकसान पोहचवू शकतील?

१३५. म्हणजे जे ग्रंथ सर्वश्रेष्ट अल्लाह पैगंबरांवर अवतरीत करीत आला आहे यांच्यापैकी कोणत्याहि ग्रंथात या गोष्टीचा संकेत निर्देश केला जाऊ शकत नाही की त्याने हे फर्माविले असावे की माझ्या ईशत्वात अमुक अमुक सहभागी आहेत. तद्वतच एखादे प्रमाण व पुरावाहि शिर्कच्या समर्थनार्थ सादर केला जाऊ शकत नाही मग सनदीशिवाय व प्रमाणाशिवाय तुम्ही इतरांना ईश्वराचा दर्जा कसा देऊन ठेवला आहे?

१३६. अर्थात विचार करा की ईश प्रकोपाचे भय एक ईश्वराला मानणाऱ्यांकरिता आहे कि प्रमाणविना त्याच्या ईशत्वात इतरांना सहभागी ठरविणाऱ्यांकरिता.

**ज्या लोकांनी ईमान बाळगले व आपल्या ईमानात अत्याचाराने मिश्रित केले नाही त्यांच्याच करिता शांती आहे आणि तेच सन्मार्गावर आहेत. हे आहे आमचे प्रमाण जे आम्ही इब्राहिमला त्याच्या जातीसमूहाच्या विरोधात प्रदान केले होते. आम्ही ज्याच्या करिता इच्छितो दर्जे उंच करतो नि:संशय तुमचा पालनकर्ता अत्यंत बुद्धिकौशल्या बाळगणारा व ज्ञानी आहे.** *(अल-क़ुरआन)*

८२. ज्या लोकांनी ईमान बाळगले व आपल्या ईमानात अत्याचाराने मिश्रित केले नाही [१३७] त्यांच्याच करिता शांती आहे आणि तेच सन्मार्गावर आहेत.

الَّذِينَ آمَنُوا وَلَمْ يَلْبِسُوا إِيمَانَهُم بِظُلْمٍ أُولَٰئِكَ لَهُمُ الْأَمْنُ
وَهُم مُّهْتَدُونَ ﴿٨٢﴾

८३. हे आहे आमचे प्रमाण जे आम्ही इब्राहिमला त्याच्या जातीसमूहाच्या विरोधात प्रदान केले होते. [१३८] आम्ही ज्याच्या करिता इच्छितो दर्जे उंच करतो [१३९] निःसंशय तुमचा पालनकर्ता अत्यंत बुद्धिकौशल्या बाळगणारा व ज्ञानी आहे. [१४०]

وَتِلْكَ حُجَّتُنَا آتَيْنَاهَا إِبْرَاهِيمَ عَلَىٰ قَوْمِهِ ۚ نَرْفَعُ دَرَجَاتٍ
مَّن نَّشَاءُ ۗ إِنَّ رَبَّكَ حَكِيمٌ عَلِيمٌ ﴿٨٣﴾

८४. आणि आम्ही त्याला इसहाक व याकूब प्रदान केलेत [१४१] व प्रत्येकास मार्गदर्शन दिले [१४२] आणि नूह ला देखील यापूर्वी मार्गदर्शन दिले होते [१४३] आणि त्याच्या वंशातून [१४४] दाऊद, सुलेमान, अय्यूब, युसूफ, मूसा व हारुनला देखील [१४५] (मार्गदर्शन प्रदान केले होते ) आणि आम्ही सदाचाराचे वर्तन अंगिकारणाऱ्यांना अशा तऱ्हेने मोबदला प्रदान करतो.

وَوَهَبْنَا لَهُ إِسْحَاقَ وَيَعْقُوبَ ۚ كُلًّا هَدَيْنَا ۚ وَنُوحًا هَدَيْنَا
مِن قَبْلُ ۖ وَمِن ذُرِّيَّتِهِ دَاوُودَ وَسُلَيْمَانَ وَأَيُّوبَ وَيُوسُفَ
وَمُوسَىٰ وَهَارُونَ ۚ وَكَذَٰلِكَ نَجْزِي الْمُحْسِنِينَ ﴿٨٤﴾

८५. आणि ज़करिया, यहया, ईसा व इलयासला देखील [१४६] हे सर्व सदाचारी लोकांपैकी होते. [१४७]

وَزَكَرِيَّا وَيَحْيَىٰ وَعِيسَىٰ وَإِلْيَاسَ ۖ كُلٌّ مِّنَ الصَّالِحِينَ ﴿٨٥﴾

८६. आणि इस्माईल, अलयसआ, [१४८] यूनूस व लूत [१४९] ला देखील या सर्वांना आम्ही विश्ववासीयांवर श्रेष्ठत्व प्रदान केले.

وَإِسْمَاعِيلَ وَالْيَسَعَ وَيُونُسَ وَلُوطًا ۚ وَكُلًّا فَضَّلْنَا
عَلَى الْعَالَمِينَ ﴿٨٦﴾

८७. तसेच त्यांचे वाडवडील, त्यांची संतती व त्यांच्या भाऊबंदापैकी कित्येकाना आम्ही मार्गदर्शन प्रदान केले व त्यांची निवड केली [१५०] आणि त्यांना सरळ मार्ग [१५१] दाखविला.

وَمِنْ آبَائِهِمْ وَذُرِّيَّاتِهِمْ وَإِخْوَانِهِمْ ۖ وَاجْتَبَيْنَاهُمْ وَهَدَيْنَاهُمْ
إِلَىٰ صِرَاطٍ مُّسْتَقِيمٍ ﴿٨٧﴾

८८. हे अल्लाहचे मार्गदर्शन [१५२] आहे, ज्याने तो उपकृत करतो आपल्या दासांपैकी ज्याला इच्छितो. जर या लोकांनी शिर्क केले असते तर त्यांचे सर्व केले सवरले वाया गेले असते. [१५३]

ذَٰلِكَ هُدَى اللَّهِ يَهْدِي بِهِ مَن يَشَاءُ مِنْ عِبَادِهِ ۚ وَلَوْ
أَشْرَكُوا لَحَبِطَ عَنْهُم مَّا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿٨٨﴾

१३७. येथे अत्याचाराशी अभिप्रेत शिर्क आहे. हदीसच्या उल्लेखानुसार जेव्हा ही आयत अवतरीत झाली तेव्हा पैगंबरांच्या सहवासात असलेल्या अनुयायींना ही गोष्ट जड वाटली आणि म्हणाले आमच्यापैकी असा कोण आहे ज्याने स्वत:ला अत्याचारग्रस्त केले नसावे? हे एकून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले या आयतीचा हा अर्थ नव्हे तुम्ही लुकमानच्या गोष्टीवर लक्ष दिले नाही. त्यांनी म्हटले होते "शिर्क हा सर्वात मोठा अत्याचार आहे." (बुखारी)

ही आयत स्पष्ट करते की अल्लाहजवळ तेच ईमान विश्वसनीय आहे जे श्रद्धा व कर्माच्या शिर्कपासून मुक्त असावे. त्या मुसलमाना करिताहि फार मोठी सावधगिरीची सूचना आहे ज्यांनी ईमानासह शिर्कचे मिश्रण करुन ठेवले आहे.

१३८.अर्थात हे आमचे प्रमाण होते ज्याचे आकलन आम्ही इब्राहीमला प्रदान केले होते यासाठी की त्यांनी शिर्क खोटे असण्याबद्दल व एकेश्वरवाद सत्य असण्याबद्दल युक्तिवाद करावा. व युक्तिवादाद्वारे आपल्या जाती समूहा करिता प्रमाण प्रस्थापित करावे.

यावरुन स्पष्ट झाले की वर वर्णन केलेली घटना हज़रत इब्राहीमची आपल्या जातीसमूहाशी भांडण तंट्याची घटना होती, स्वत:साठी सत्यशोध घेण्याची नव्हे. म्हणून ताऱ्याला पाहून त्याला आपला पालनकर्ता म्हणणे या समजूतीने होते की, काय हा तुमचा तो ईश्वर आहे ज्याला मी आपला पालनकर्ता मानावे? यानंतर जेव्हा तो अस्त पावला तेव्हा त्यांनी संबोधितांचे प्रमाण त्यांच्यावरच उलटविले. या स्पष्टीकरणा नंतर त्या बिनबुडाच्या कथनांचा (रिवायतींचा) आधार घेण्याची गरज उरत नाही ज्यात या प्रसंगाला हजरत इब्राहीम यांच्या लहानपणाची घटना म्हणून सादर केले गेले आहे, आणि काल्पनिक कथा रचली गेली आहे की हजरत इब्राहीम यांचे बालपण एका बंदिस्त गुहेत व्यतित झाले, म्हणून जेव्हा ते पहिल्यांदा गुहेतून बाहेर आले तेव्हा तारा पाहून त्याला ते ईश्वर समजले. खेदाची गोष्ट ही की या प्रकारच्या यहुदी कथना (इस्त्राईलियात) ने अनेक भाष्यांत स्थान प्राप्त केले आहे.

१३९. अर्थात हजरत इब्राहीम यांना हे प्रमाण, ही समज, ही अंतर्दृष्टी आणि एका अनेकेश्वरवादी जातीसमूहास एकेश्वरवादाचे आमंत्रण देण्याचे साहस प्रदान करून आम्ही त्यांचे दर्जे खूप उंचाविले होते आणि आम्ही याचप्रकारे ज्यास इच्छितो त्याचे दर्जे उंचावितो.

१४०. संकेत या गोष्टीकडे आहे की दर्जाची ही उंची जी सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या विशिष्ट दासांना प्रदान करतो हा त्याच्या ज्ञान व बुद्धिकौशल्याचा लाभ आहे.

१४१. हज़रत इसहाक, हज़रत इब्राहीमचे पुत्र होत. व याकूब नातू होत. दोघे पैगंबर होते. हज़रत याकूब यांचे दुसरे नाव इस्त्राईल आहे. त्यांचा "वंश" "बनी इस्त्राईल" या नावाने ओळखला जातो.

१४२. म्हणजे त्यांनादेखील याच एकेश्वरवादी धर्माचे मार्गदर्शन प्रदान केले गेले होते.

१४३. हज़रत नूह यांचा काळ हज़रत इब्राहीम यांच्या फार पूर्वीचा आहे. येथे त्यांच्या उल्लेखाचा हेतु हा आहे की ज्या एकेश्वरवादी धर्माचे मार्गदर्शन हज़रत इब्राहीम व त्यांच्या संततीस केले गेले होते, हा तोच धर्म होय ज्याचे मार्गदर्शन त्यांच्या फार पूर्वी हज़रत नूहला केले गेले होते. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे अल्लाहने अवतरित केलेला धर्म एकच आहे ज्याचा क्रम वरुन खालपर्यंत चालत आला आहे. कोणत्याही पैगंबरावर अन्य कोणताहि धर्म अवतरीत केला गेला नव्हता. आणि कुरआन याच धर्माचा ध्वजरोहक आहे, जो समस्त पैगंबरांचा समाईक धर्म आहे.

१४४. अर्थात हजरत इब्राहीम यांच्या वंशातून.

१४५. बनी इस्त्राईलचे हे प्रसिद्ध व अत्यंत प्रतिष्ठित पैगंबर आहेत. दाऊद, सुलेमान, अय्यूब, यूसूफ, मूसा व हारुन त्या प्रेषित समूहाशी संबंधित आहेत ज्यांना राजकिय वर्चस्व किंवा नेवृत्व प्राप्त होते.

१४६. हे देखील बनी इस्त्राईलचे अत्यंत प्रतिष्ठीत पैगंबर आहेत ज्यांचा धर्मदेखील एकेश्वरवादी धर्म म्हणजे इस्लाम होता.

हज़रत इलयास यांचे नाव बायबलमध्ये "एलया" असे आहे ज्यांनी बनी इस्त्राईलच्या अनेकेश्वरवादी हरकतींवर अंकुश लावीत एकेश्वरवादावर जोर दिला होता. यांचा उल्लेख सलातीन (राजे-१) मध्ये आहे.

"संध्याकाळच्या यज्ञसमयी एलीया संदेष्टापुढे होऊन म्हणाला, हे परमेश्वरा, अब्राहम, इसहाक व इस्त्राएल यांच्या देवा, इस्त्राएलामध्ये तूच देव आहेस मी तुझा सेवक आहे आणि मी ह्या सर्व गोष्टी तुझ्याच आज्ञेने केल्या आहेत हे सर्वास विदीत कर. हे परमेश्वरा एक माझी विनंती एक, हे परमेशवरा, तुच देव आहेस आणि तूच यांची हृदये परांडमुख केली आहेस याची या लोकास जाणीव होऊ दे." (१ राजे १८ : ३६, ३७)

ज़करीया, यहया, ईसा व इलयास प्रेषितांच्या त्या समूहाशी संबंधित आहेत ज्यांनी फकीरीतहि (दारिद्रातहि) बादशाही केली.

१४७. म्हणजे हे मोठे बुजुर्ग लोक होते, पण त्यांच्यापैकी कोणीहि ईश्वर नव्हता, तथापि सर्व ईश्वराचे नेक बंदे होते.

१४८. "अलयसआ" चा उल्लेख बायबलचे पुस्तक "राजे" मध्ये "अलयशअ" नावाने व पैगंबर इलयास (अेलयाह) यांचा सहाय्यक म्हणून आला आहे. (पहा राजे १६ :१९)

१४९. हज़रत लूत हज़रत इब्राहीम यांच्या वंशापैकी नव्हते किंबहुना त्यांचे पुतणे होते, ज्यांनी हज़रत इब्राहीमवर ईमान बाळगले होते. आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना प्रेषितत्वाने सम्मानित केले होते म्हणून त्यांचा उल्लेख इब्राहीमच्या घराण्याचे पैगंबर या नात्याने केला गेला आहे.

१५०. म्हणजे धर्माचे आमंत्रण व त्यांच्या सेवेकरीता निवडले.

१५१. अभिप्रेत इस्लाम धर्म होय.

१५२. अल्लाहच्या मार्गदर्शनाचा अर्थ एकेश्वरवादी धर्म म्हणजेच इस्लाम धर्म होय.

१५३. अर्थात ह्या उच्चदर्जाच्या लोकांनीहि जर शिर्क केले असते तर त्यांचे हे स्थान कदापि बाकी राहिले. नसते व त्यांचे समस्त आचरण वाया गेले असते कारण शिर्क हा माफ न करण्याजोगा अपराध आहे. जो कोणी शिर्क करील शिक्षेस पात्र ठरला जाईल मग जेव्हा मोठमोठे बुजुर्गहि या नियमाला अपवाद नाहीत तर तुम्ही त्याच्या तावडीतून का म्हणून सुरक्षित राहू शकता.

हे असे लोक होत ज्यांना आम्ही ग्रंथ, ''हुकम'' आणि प्रेषितत्व प्रदान केले होते, आता जर हे लोक याचा इन्कार करीत आहेत तर (काही पर्वा नाही) आम्ही या (धर्म देणगी) ला अशा लोकांच्या हवाली केले आहे जे याचा इन्कार करणारे नाहीत. हे असे लोक आहेत ज्यांना अल्लाहने मार्गदर्शन प्रदान केले यास्तव तुम्हीदेखील त्यांच्याच मार्गाचे अनुसरण करा. आणि (सांगा) मी याबद्दल तुमच्याकडून कोणताही मोबद्दला मागत नाही. ही तर विश्वासीयांकरिता एक आठवण करुन देणारी वाणी आहे. *(अल-क़ुरआन)*

८९. हे असे लोक होत ज्यांना आम्ही ग्रंथ, ''हुकम'' आणि [१५४] प्रेषितत्व प्रदान केले होते, आता जर हे लोक याचा [१५५] इन्कार करीत आहेत तर (काही पर्वा नाही) आम्ही या (धर्म देणगी) ला अशा लोकांच्या हवाली केले आहे जे याचा इन्कार करणारे नाहीत.[१५६]

أُولَٰئِكَ الَّذِينَ آتَيْنَاهُمُ الْكِتَابَ وَالْحُكْمَ وَالنُّبُوَّةَ ۚ فَإِن
يَكْفُرْ بِهَا هَٰؤُلَاءِ فَقَدْ وَكَّلْنَا بِهَا قَوْمًا لَّيْسُوا
بِهَا بِكَافِرِينَ ﴿٨٩﴾

९०. हे असे लोक आहेत ज्यांना अल्लाहने मार्गदर्शन प्रदान केले यास्तव तुम्हीदेखील त्यांच्याच मार्गाचे अनुसरण करा. [१५७] आणि (सांगा) मी याबद्दल तुमच्याकडून कोणताही मोबद्दला मागत नाही. [१५८] ही तर विश्वासीयांकरिता एक आठवण करुन देणारी वाणी आहे.[१५९]

أُولَٰئِكَ الَّذِينَ هَدَى اللَّهُ ۖ فَبِهُدَاهُمُ اقْتَدِهْ ۗ
قُل لَّا أَسْأَلُكُمْ عَلَيْهِ أَجْرًا ۖ إِنْ هُوَ إِلَّا ذِكْرَىٰ
لِلْعَالَمِينَ ﴿٩٠﴾

९१. त्यांनी अल्लाहची योग्य कदर जाणली नाही जेव्हा म्हणाले की अल्लाहने कोणत्याही मनुष्यावर काहीहि अवतरीत केले नाही. सांगा, मग तो ग्रंथ कोणी अवतरीत केला ज्यास मूसा घेऊन आले होते [१६०]आणि जो लोकांकरिता प्रकाश व मार्गदर्शन होता, ज्यास तुम्ही वेगवेगळी पाने बनवून दाखविता आणि बहुतेक गोष्टी लपविता. आणि तुम्हाला (याद्वारे) त्या गोष्टींची शिकवण दिली गेली ज्या न तुम्ही जाणत होते, ना तुमचे वाडवडील सांगा (तो ग्रंथ) अल्लाहनेच अवतरीत केला आहे आणि मग त्यांना त्यांच्या वक्र विवादात सोडा की त्यांनी खेळत रहावे.[१६१]

وَمَا قَدَرُوا اللَّهَ حَقَّ قَدْرِهِ إِذْ قَالُوا
مَا أَنزَلَ اللَّهُ عَلَىٰ بَشَرٍ مِّن شَيْءٍ ۗ
قُلْ مَنْ أَنزَلَ الْكِتَابَ الَّذِي جَاءَ بِهِ مُوسَىٰ نُورًا وَهُدًى
لِّلنَّاسِ ۖ تَجْعَلُونَهُ قَرَاطِيسَ تُبْدُونَهَا وَتُخْفُونَ كَثِيرًا ۖ
وَعُلِّمْتُم مَّا لَمْ تَعْلَمُوا أَنتُمْ وَلَا آبَاؤُكُمْ ۖ قُلِ اللَّهُ ۖ ثُمَّ ذَرْهُمْ
فِي خَوْضِهِمْ يَلْعَبُونَ ﴿٩١﴾

९२. हा ग्रंथ आहे ज्याला आम्ही अवतरीत केले आहे [१६२] समृद्धशाली [१६३] आणि मागील ग्रंथांची सत्यता दर्शविणारा [१६४] आणि यासाठी आम्ही अवतरित केले आहे की तुम्ही ''उम्मुल कुरा'' [१६५] (मक्का) व त्याच्या आसपास राहणाऱ्यांना सचेत करावे [१६६] जे लोक आखिरतवर ईमान बाळगतात ते यावरहि ईमान बाळगतात [१६७] आणि आपल्या नमाजींचे रक्षण करतात.[१६८]

وَهَٰذَا كِتَابٌ أَنزَلْنَاهُ مُبَارَكٌ مُّصَدِّقُ الَّذِي بَيْنَ يَدَيْهِ وَلِتُنذِرَ
أُمَّ الْقُرَىٰ وَمَنْ حَوْلَهَا ۚ وَالَّذِينَ يُؤْمِنُونَ بِالْآخِرَةِ يُؤْمِنُونَ بِهِ ۖ
وَهُمْ عَلَىٰ صَلَاتِهِمْ يُحَافِظُونَ ﴿٩٢﴾

१५४. ''हुकम'' म्हणजे निर्णय शक्ति,बुद्धिकौशल्य व अल्लाहच्या मार्गदर्शनान्वये शरीअतचे आदेश देण्याचा अधिकार.

१५५. म्हणजे मक्केचे लोक होत.

१५६. म्हणजे ज्याप्रकारे आम्ही या पैगंबरांना ज्यांचा उल्लेख वर आला आहे. ग्रंथ,''हुकम'' व प्रेषितत्वाने सम्मानित केले होते आज हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना याद्वारे सम्मानित केले आहे आणि ही मक्कावासीयांकरिता त्यांच्या माध्यमाने फार मोठी ईश-देणगी आहे. परंतु जर हे लोक याचा इन्कार करीत आहेत तर त्यांनी खुशाल करावा ते स्वत:लाच त्याच्या लाभापासून वंचित ठेवतील. आम्ही तर या धर्म देणगीला अशा लोकांच्या हवाली केले आहे व त्यांना याची जबाबदारी सोपविली आहे. जे त्याची नाकदरी करणारे नाहीत. हा संकेत पैगंबरांच्या त्या साथीदारांकडे आहे ज्यांनी त्यांच्यावर ईमान बाळगले व त्यांनी आणलेल्या धर्माची कदर करणारे बनले.

१५७.म्हणजे त्या धर्माचा अवलंब करा जो समस्त पैगंबरांचा समाईक धर्म होता. हा धर्म एकेश्वरवादी धर्म होय. आणि त्याचे नाव ''इस्लाम'' आहे.

१५८. म्हणजे मी या सेवेबद्दल जी मानव जातीची सर्वात मोठी सेवा आहे तुमच्याकडून कसलाहि मोबदला इच्छित नाही, किंबहुना मी हे तुमच्याच फायद्यासाठी करीत आहे. मानाल तर यात तुमचेच हीत आहे आणि न मानाल तर स्वत:च नुकसान ओढवून घ्याल.

१५९.म्हणजे कुरआन हे जगातील सर्व मनुष्यांकरिता स्मरणिका व उपदेश आहे. त्याचा संदेश सर्वांकरिता जगाच्या अंतापर्यंत आहे. क़ुरआन एखाद्या जाती समूहाकरिता वा एखाद्या कालखंडा करिता विशिष्ट नाही.

१६०.संकेत यहुदींकडे आहे ज्यांनी मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांचे अंधसमर्थन करतांना असे म्हटले होते. ते जरी प्रेषितत्व- क्रमास मानणारे होते आणि मूसाला पैगंबर व 'तौरात'ला ईश-ग्रंथ मानीत होते परंतु हे मानायला मात्र तयार नव्हते की त्यांच्या गोत्र वंशा बाहेरूनहि एखादा पैगंबर पाठविला जाऊ शकतो म्हणून जिद्द व हट्टामुळे त्यांनी या वस्तुस्थितीलाच मान्य करण्यास इन्कार केला की अल्लाहने कोणत्याहि मनुष्यावर आपली वाणी अवतरीत केली आहे. त्यांच्या या कथनाची पकड घेतांना दोन गोष्टी येथे सांगितल्या आहेत एक ही की वही-अवतरणाचा नकार करणारा खरे पाहता अल्लाहच्या बुद्धिकौशल्याचा इन्कार करणारा आहे कारण ही गोष्ट बुद्धिकौशल्याची कशा प्रकारे असू शकते की अल्लाहने मानवाच्या तमाम आवश्यकता पूर्तिची व्यवस्था करावी परंतु त्याच्या मार्गदर्शनाची कसलीहि व्यवस्था न करावी. आणि दुसरी गोष्ट अशी की ते परस्पर विरोधी गोष्टी सांगतात, एकीकडे ते वहीच्या अवतरणाचा इन्कार करतात तर दुसरीकडे मूसाला पैगंबर व तौरातला अल्लाहने अवतरीत केलेला ग्रंथ देखील मानतात.

१६१. अर्थात हे दर्शविल्यानंतर की अल्लाहनेच हज़रत मूसावर आपली वाणी अवतरीत केली होती व त्यानेच आज आपल्या पैगंबरावर क़ुरआन अवतरीत केले आहे, त्यांना त्यांच्या दशेवर सोडा. जे लोक प्रमाणान्वये गोष्ट समजून घेऊ इच्छित नाही किंबहुना केवळ पुरावेबाजी करू इच्छितात अशा लोकांशी वादविवाद करणे व्यर्थ आहे.

१६२. म्हणजे हा ग्रंथ मनुष्य लिखित नाही किंबहुना सृष्टीच्या सर्वसत्ताधिकाऱ्याने अवतरीत केलेला आहे आणि या आधारे आपले विशेष योग्यतेची शान राखतो.

१६३. अर्थात हा ग्रंथ मांगल्या व समृद्धीचे उगम स्थान आहे. ज्यापासून जगातील जन समूह लाभ घेत राहतील आणि ज्याच्या तेजोवल्यांनी मनुष्य जीवनाचे समस्त क्षेत्रे उज्वल होतील.

१६४. अभिप्रेत ''तौरात'' होय.

१६५. ''उम्मुल कुरा'' म्हणजे वस्ती आणि वसाहतींचे केंद्रस्थान म्हणजेच मक्का शहर होय, याला उम्मुल कुरा याकरिता म्हटले गेले आहे की येथे अल्लाहचे घर आहे जेथे हज्जचा विश्वव्यापी मेळावा भरतो या वैशिष्ट्यांमुळे समस्त विश्वाकरिता ते एक धार्मिक व अध्यात्मिक केंद्र ठरले आहे.

१६६. म्हणजे कुरआनच्या संदेशास सर्वात प्रथम मक्केच्या रहिवाश्यांपर्यंत पोहचवा व नंतर त्याच्या आसपासच्या लोकांपर्यंत. अशासाठी की तुमचे प्रचार क्षेत्र अधिकाधिक व्यापक होत जावे.

प्रेषितत्व प्रसाराकरिता मध्यवर्ति शहर मक्केची निवड अशासाठी केली गेली की जो ध्वनी केंद्रस्थानातून उंच होईल त्याने जगाच्या डोंगर दऱ्या निनादू लागतील व त्याच्या प्रतिध्वनि जगाच्या कानाकोपऱ्यातून ऐकू येईल.

१६७. अर्थात हे अशक्य आहे की जो मनुष्य खरोखर आखिरत मानत असेल व ईश्वरासमोरील उत्तरदायित्वाचे भय बाळगत असेल त्याने या ग्रंथाला ईश ग्रंथ मानण्यास इन्कार करावा. असा मनुष्य जर या ग्रंथाचा थोडादेखील अभ्यास करील तर त्याला हे कळून येईल की हा अल्लाहचाच ग्रंथ आहे मग तदनंतर त्याच्या ईमान बाळगण्यात कसलाहि विलंब राहणार नाही.

येथे संकेत प्रामुख्याने ग्रंथ बाळगणाऱ्यांपैकीच्या सदाचारी लोकांकडे आहे; जे आखिरतवर ईमान बाळगत होते. अशा लोकांविषयी फर्माविले गेले की ते क़ुरआनवर देखील ईमान बाळगतील.

१६८. अर्थात जो मनुष्य खरोखर आखिरतवर ईमान बाळगत असेल त्याच्या जीवनातून ईश-भक्ति खचितच होईल आणि ईश भक्ति चे पहिले लक्षण नमाज़चे वक्तशीर पालन होय.

९३. आणि त्यापेक्षा अधिक अत्याचारी कोण असेल जो अल्लाहवर खोटे रचील[१६९] किंवा दावा करील की मजवर ''वही'' केली गेली आहे, खरे पाहता त्यावर कसलीहि वही केली नसावी [१७०] किंवा असे म्हणेल मी देखील अशी वाणी अवतरीत करीन जशी वाणी अल्लाहने अवतरीत केली आहे.[१७१] तुम्ही अत्याचारींच्या त्या अवस्थेस पाहिले असते तर बरे झाले असते जेव्हा ते मरणासन्न यातनेत असतील व फिरिश्त्यांनी हात वाढविले असतील की काढा आपले प्राण आज तुम्हाला अपमानित करणारी शिक्षा दिली जाईल, या कारणास्तव की तुम्ही अल्लाहकडे सत्य विरोधी गोष्टींचा निर्देश करीत होते. आणि त्याच्या आयतींच्या विरोधात गर्व करीत होते.[१७२]

وَمَنْ أَظْلَمُ مِمَّنِ افْتَرَىٰ عَلَى اللَّهِ كَذِبًا أَوْ قَالَ أُوحِيَ إِلَيَّ
وَلَمْ يُوحَ إِلَيْهِ شَيْءٌ وَمَن قَالَ سَأُنزِلُ مِثْلَ مَا أَنزَلَ اللَّهُ ۗ
وَلَوْ تَرَىٰ إِذِ الظَّالِمُونَ فِي غَمَرَاتِ الْمَوْتِ وَالْمَلَائِكَةُ بَاسِطُو
أَيْدِيهِمْ أَخْرِجُوا أَنفُسَكُمُ ۖ الْيَوْمَ تُجْزَوْنَ عَذَابَ الْهُونِ بِمَا
كُنتُمْ تَقُولُونَ عَلَى اللَّهِ غَيْرَ الْحَقِّ وَكُنتُمْ عَنْ آيَاتِهِ
تَسْتَكْبِرُونَ ﴿٩٣﴾

९४. (मग अल्लाह फर्मावेल) आणि तुम्ही आमच्या समोर एकट्यानेच आले [१७३] ज्याप्रमाणे आम्ही तुम्हाला पहिल्यांदा निर्माण केले होते आणि जे काही आम्ही तुम्हाला दिले होते ते सर्व तुम्ही मागे सोडून आले. आणि आम्ही तुमच्यासह तुमच्या त्या शिफारस करणाऱ्यांनाहि पहात नाही ज्यांच्याविषयी तुमची अशी कल्पना होती की तुमच्या बाबतीत ते (अल्लाहचे) सहभागी आहेत. [१७४] तुमचे नाते तुटले [१७५] आणि तुमचे सर्व दावे अवास्तव ठरले.

وَلَقَدْ جِئْتُمُونَا فُرَادَىٰ كَمَا خَلَقْنَاكُمْ أَوَّلَ مَرَّةٍ وَتَرَكْتُم
مَّا خَوَّلْنَاكُمْ وَرَاءَ ظُهُورِكُمْ ۖ وَمَا نَرَىٰ مَعَكُمْ شُفَعَاءَكُمُ الَّذِينَ
زَعَمْتُمْ أَنَّهُمْ فِيكُمْ شُرَكَاءُ ۚ لَقَد تَّقَطَّعَ بَيْنَكُمْ وَضَلَّ عَنكُم
مَّا كُنتُمْ تَزْعُمُونَ ﴿٩٤﴾

९५. नि:संशय अल्लाहच दाणा व आठळीस उकलणारा आहे.[१७६] तोच जिवितास मृतातून बाहेर काढतो आणि तोच मृतास जिवितांतून काढणारा आहे.[१७७] तोच अल्लाह होय, मग तुम्ही कोठे भटकत जात आहात?

إِنَّ اللَّهَ فَالِقُ الْحَبِّ وَالنَّوَىٰ ۖ يُخْرِجُ الْحَيَّ مِنَ الْمَيِّتِ وَمُخْرِجُ
الْمَيِّتِ مِنَ الْحَيِّ ۚ ذَٰلِكُمُ اللَّهُ ۖ فَأَنَّىٰ تُؤْفَكُونَ ﴿٩٥﴾

९६. तोच (अंध:कारास) विदीर्ण करुन प्रात:काळ उदयास आणतो [१७८] त्यानेच रात्रीला विश्रांतीचे निमित आणि सूर्य -चंद्राला हिशेबाचे स्तर बनविले आहे. [१७९] हे नियोजन आहे त्याचे जो प्रभावशाली आहे व ज्ञानीहि. [१८०]

فَالِقُ الْإِصْبَاحِ وَجَعَلَ اللَّيْلَ سَكَنًا وَالشَّمْسَ وَالْقَمَرَ حُسْبَانًا ۚ
ذَٰلِكَ تَقْدِيرُ الْعَزِيزِ الْعَلِيمِ ﴿٩٦﴾

१६९. एखाद्या धर्माला गढणे किंवा एखादी गोष्ट रचून तिला धर्माचे स्वरूप देणे म्हणजे त्याचा अल्लाहकडे असत्या निर्देश करणे होय. आणि असे कृत्य करणारा सर्वात मोठा अपराधी होय, त्याच्या अपराधाचे उदाहरण असे आहे जणू एखाद्याने खोटी नाणी बनवून ती चालनात आणण्याचा प्रयत्न करावा आणि ज्या अर्थी हे धारिष्ट तो ईश्वराविरुद्ध करतो म्हणून तो अत्यंत भंकर अपराधी ठरतो.

१७०. स्पष्ट झाले की प्रेषितत्वाचे खोटे दावेदार सर्वात मोठे अपराधी आहेत कारण ते ईश्वर व ईश-निर्मिती या दोघांशीहि धोकेबाजी करतात.

१७१. सत्य अवाहनाच्या विरोधात जेव्हा मनुष्य विरोधासाठी विरोधाचा मार्ग अवलंबितो तेव्हा त्याच्या अंगी गंभिरता राहत नाही मग तो वायफळ आणि अनुचित गोष्टी बोलू लागतो. आयतीत विरोधकांचा जो कौल उल्लेखिला गेला आहे तो या गोष्टीचे स्पष्ट उदाहरण आहे.

१७२. हे उत्तर आहे कुरआन-विरोधकांच्या कल्पित आक्षेपांचे व निरर्थक दाव्यांचे की जेव्हा हे अत्याचारी प्रमाणाद्वारे एखादी गोष्ट समजू इच्छित नाही तर खुशाल ना समजा, त्यांना त्यावेळी शुद्धी येईल जेव्हा मृत्यु समय येऊन ठेपेल व फिरिश्त्ये (ईश-दूत) यांच्या श्रीमुखात भडकावतील.

आयतीने ही गोष्ट देखील स्पष्ट झाली की मृत्यु समयी माणसाला त्या वस्तुस्थितींचे ज्ञान होते ज्यांच्यावर ईमान बाळगण्यासंबंधी अपेक्षा केली गेली आहे. तसेच हेहि की मृत्यु म्हणजे केवळ आत्म्याचे शरीरातून बाहेर जाणे होय आणि सत्य विरोधकांचे आत्मे मरणोत्तर विश्वात यातना ग्रस्त राहतात.

१७३. म्हणजे कियामतीच्या दिवशी अल्लाह असे फर्माविल.

१७४. अर्थात इहलोकात तुम्ही ही कल्पना बाळगली होती की तुमची कामे केवळ अल्लाहद्वारेच होत नाही किंबहुना यात नकारहि सामील आहे ज्यांची तुम्हाला निष्ठा होती. तुम्ही असे समजत होता की त्यांचा ईश्वराजवळ जोर आहे व त्यांना खुश केल्याने तुमचा बेडा पार होईल. परंतु आज हे तुमचे ठरविलेले सहभागी कोठे गायब झालेत की तुमच्या मदतीकरिता कोणीहि हजर नाही?

१७५. म्हणजे खोट्या ईश्वरांसह प्रेम व निष्ठा आणि भक्ति व दास्यत्वाचे जे नाते तुम्ही कायम केले होते ते भंग पावले.

१७६. याद्वारे अल्लाहच्या सामर्थ्य चमत्कृतिकडे संकेत करण्याचा उद्देश आहे. तो कोण आहे जो दाणा आठळी उकलून कोंब बाहेर काढतो व मग हिरवी रोपटे व विशाला वृक्ष उभा करतो? काय त्याच्या या ईशत्वात अन्य कोणाचा हस्तक्षेप आहे? जर नाही तर मग तुमचे भाग्य उजळविण्यात व बिघडविण्यात आणि तुम्हाला लाभहानि पोहचविण्यात कोणाचा काय हस्तक्षेप असू शकतो?

१७७. ही देखील अल्लाहची सामर्थ्य चमत्कृति आहे. अर्थात हे की तो जिवितांस मृतांतून व मृतांस जिवितातून बाहेर काढतो. मनुष्य अहोरात्र या गोष्टीचे अवलोकन करतो. वनस्पतींमध्ये आठळीतून हरेभरे वृक्ष व वृक्षातून आठळी, प्राण्यांमध्ये अंड्यापासून पक्षी व पक्षी पासून अंडे, तसेच पदार्थापासून मनुष्य व मनुष्यापासून पदार्थ या संदर्भात एक स्पष्ट उदाहरण म्हणजे जिवंत स्त्रीच्या उदरातून मृत अर्भकाचा जन्म होय.

१७८. वरील आयतीत जमीनीवर प्रकट होणाऱ्या सामर्थ्य चमत्कृतिंचा उल्लेख होता या आयतीत आकाशात जाहीर होणाऱ्या सामर्थ्यचमत्कृतिंचा उल्लेख आहे. क्षितिजावर प्रात:कालीन प्रकाश रात्रीच्या अंध:काराचे आवरण फाडून प्रकट होतो. आणि गाढ झोपेत असलेल्या मनुष्याला जागृत करतो की त्याने आपल्या जीवन प्रभातीचा आरंभ आपल्या पालनकर्त्याच्या चमत्कृतिंना मान्यता देऊन करावा.

१७९. सूर्य आणि चंद्र वेळ व तारीख जाणून घेण्याचे साधन आहे. दिवस आणि रात्रीचे मापन सूर्याच्या उदयाद्वारे होते आणि चंद्राच्या विविध स्वरूपाने तारखांचे मापन होते. मग याद्वारे महीने वर्ष कायम केले गेले आहे व जे मानवाची एक महत्वपूर्ण गरज भागविते. अल्लाहच्या सामर्थ्याचा हा केवढा मोठा चमत्कार आहे!

१८०. अर्थात जमीन व आकाशाची ही व्यवस्था व्यर्थ नाही ना यात अन्य एखाद्याच्या ईशत्वाचा काही हस्तक्षेप आहे किंबहुना ही सर्व त्या सामर्थ्याची योजना (Planning)आहे ज्याचे सामर्थ्य जबरदस्त आहे आणि ज्याचे ज्ञानहि सर्व व्यापी आहे.

९७. आणि तोच आहे ज्याने तुमच्या करिता तारे बनविलेत यासाठी की तुम्ही जमीनीच्या व समुद्राच्या अंध:कारात यांच्याद्वारे मार्ग जाणून घ्यावा. [१८१] जाणणाऱ्यांकरिता आम्ही आपली चिन्हे उघडरित्या वर्णिली आहेत. [१८२]

وَهُوَ الَّذِيْ جَعَلَ لَكُمُ النُّجُوْمَ لِتَهْتَدُوْا بِهَا فِيْ ظُلُمٰتِ
الْبَرِّ وَالْبَحْرِ ۗ قَدْ فَصَّلْنَا الْاٰيٰتِ لِقَوْمٍ يَّعْلَمُوْنَ ﴿٩٧﴾

९८. आणि तोच होय ज्याने तुम्हाला एक जीवापासून निर्माण केले [१८३] मग प्रत्येकारिता एक निवास-स्थान आहे आणि एक सूपूर्द केले जाण्याचे. [१८४] समजणाऱ्यांकरिता आम्ही आपल्या निशाण्यांना उघडरित्या वर्णिले आहे. [१८५]

وَهُوَ الَّذِيْٓ اَنْشَاَكُمْ مِّنْ نَّفْسٍ وَّاحِدَةٍ فَمُسْتَقَرٌّ
وَّمُسْتَوْدَعٌ ۗ قَدْ فَصَّلْنَا الْاٰيٰتِ لِقَوْمٍ يَّفْقَهُوْنَ ﴿٩٨﴾

९९. आणि तोच होय ज्याने आकाशातून पाणी वर्षविले, [१८६] मग आम्ही [१८७] यापासून प्रत्येक प्रकारची वनस्पति उगविली मग यापासून हिरव्यागार फांद्या काढल्या ज्यापासून आम्ही थरावर थर चढलेले दाणे निर्माण करतो. आणि खजुराच्या गाभ्यातून लोंबकळत असलेले गुच्छे आणि द्राक्षांच्या बागा व जैतून व डाळिंब एकमेकांशी मिळती जुळतीहि व एकमेकांपासून भिन्न देखील. [१८८] यांच्या फळांना जेव्हा ते फळाला येत असतांत पहा व त्यांच्या पिकण्यास हि पहा [१८९] यात त्या लोकांकरिता निशाण्या आहेत जे ईमान बाळगतात.

وَهُوَ الَّذِيْٓ اَنْزَلَ مِنَ السَّمَآءِ مَآءً ۚ فَاَخْرَجْنَا بِهٖ نَبَاتَ كُلِّ
شَيْءٍ فَاَخْرَجْنَا مِنْهُ خَضِرًا نُّخْرِجُ مِنْهُ حَبًّا مُّتَرَاكِبًا ۚ وَمِنَ النَّخْلِ
مِنْ طَلْعِهَا قِنْوَانٌ دَانِيَةٌ وَّجَنّٰتٍ مِّنْ اَعْنَابٍ وَّالزَّيْتُوْنَ
وَالرُّمَّانَ مُشْتَبِهًا وَّغَيْرَ مُتَشَابِهٍ ۗ اُنْظُرُوْٓا اِلٰى ثَمَرِهٖٓ
اِذَآ اَثْمَرَ وَيَنْعِهٖ ۗ اِنَّ فِيْ ذٰلِكُمْ لَاٰيٰتٍ لِّقَوْمٍ يُّؤْمِنُوْنَ ﴿٩٩﴾

१००. या लोकांनी जिन्नांना अल्लाहचा सहभागी ठरविले आहे,वस्तुत:त्यानेच यांना निर्माण केले आहे.[१९०]आणि यांनी अजाणपणे त्याच्याकरिता पुत्र आणि मुली कल्पिल्या [१९१] तो पाक (पवित्र) व श्रेष्ठतम आहे त्या गोष्टींपासून ज्यांचे हे वर्णन करीत आहेत.

وَجَعَلُوْا لِلّٰهِ شُرَكَآءَ الْجِنَّ وَخَلَقَهُمْ وَخَرَقُوْا لَهٗ بَنِيْنَ وَبَنٰتٍۢ
بِغَيْرِ عِلْمٍ ۗ سُبْحٰنَهٗ وَتَعٰلٰى عَمَّا يَصِفُوْنَ ﴿١٠٠﴾

१०१.तो आकाशांचा व जमीनीचा निर्माता आहे. [१९२] त्याची संतती कशी असू शकते जेव्हा त्याची एखादी पत्नी नाही. [१९३] आणि त्याने समस्त वस्तूंना निर्माण केले व तो प्रत्येक गोष्टीचे ज्ञान बाळगतो.

بَدِيْعُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۗ اَنّٰى يَكُوْنُ لَهٗ وَلَدٌ وَّلَمْ تَكُنْ لَّهٗ
صَاحِبَةٌ ۗ وَخَلَقَ كُلَّ شَيْءٍ ۚ وَهُوَ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيْمٌ ﴿١٠١﴾

१८१. वाळवंटात व समुद्रात प्रवास करणारे अंध:कारात ताऱ्यांच्या प्रकाशाची मदत घेतात व यांच्याद्वारे दिषा निश्‍चितीहि होते. म्हणून शास्त्रीय संशोधनापूर्वी मनुष्य ताऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवास पार पाडीत असे. आणि आजही नौकागमनात (Navigation) ताऱ्यांच्या मदत घेतली जाते. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे ताऱ्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने मानवाच्या सेवेसाठी निर्माण केले आहे. परंतु मानवाने आपल्या मूर्खपणामुळे यांना आपले सेवक समजण्याऐवजी स्वामी मानले,आणि त्यांची पूजा करू लागला.

१८२. अर्थात जे लोक बुद्धिने व प्रज्ञेने काम घेतात ते या निशाण्यावंर विचार चिंतन करुन वस्तुस्थितीला जाणून घेतात.

१८३. याचे स्पष्टीकरण सूरह निसा टीप क्र. २ व ३ मध्ये केले गेले आहे.

१८४. निवास स्थानाशी अभिप्रेत इहलोकात वास्तव्य करण्याचे स्थान होय. आणि सुपूर्द केले जाण्याचे स्थान म्हणजे ती जागा होय जेथे तो मृत्युनंतर सुपूर्द केला जातो. अर्थात मनुष्य अल्लाहच्याच जमीनीवर वास्तव्य करतो व अल्लाहच्याच जमीनीत दफन केला जातो. आणि जेव्हा मनुष्य पाळण्यापासून कबरीपर्यंत त्याच्याच साम्राज्यात राहतो तर मग त्याच्याशी बंड करण्याचे दु:साहस कसे करतो!

१८५. अर्थात जे लोक समंजसपणे वागतात ते या निशाण्यांद्वारे एकेश्वर वादास प्राप्त करतात ज्याचे आवाहन कुरआनने केले आहे.

१८६. पाणी ज्याअर्थी आकाशाकडून म्हणजे उंचावरून पडते म्हणून वाक्‌प्रचारात ''आकाशातून पाणी पडणे'' असे म्हणतात. अशावेळी शाब्दिक अर्थ अभिप्रेत नसतो.

१८७. पहिल्या वाक्यात सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्वत:करिता तृतीय पुरुषी सर्वनाम 'ज्याने' वापरले आहे. आणि दुसऱ्या वाक्यात प्रथम पुरुषी सर्वनाम 'आम्ही' असे वापरले आहे. सर्वनामांचा हा बदल शब्द शैलीच्या दृष्टीनेहि होत असतो आणि इतर पैलूंनीहि येथे सर्वनामांचा हा बदल अशासाठी झाला आहे की वाणीचा ओघ अल्लाहच्या सामर्थ्याच्या वर्णनाकडून पालकत्वाच्या वर्णनाकडे गेला आहे.

१८८. अर्थात स्वरूपात मिळते जुळते परंतु स्वादात व गुणविशिष्ट्यांत विभिन्न.

१८९. मानवाकरिता जमीनीवर जे भोजन-पत्र बिछविले गेले आहे. यात प्रत्येक प्रकारचे धान्यहि आहे, व विविध प्रकारची फळेहि. या वस्तू ज्याप्रकारे निर्माण होतात, वाढतात व पिकतात त्यांच्यावर जर मनुष्य विचार चिंतन करील तर त्याला प्रत्येक गोष्टीत कारीगीरीचे अजब नमुने व ईशत्वाचे आश्‍चर्यजनक चमत्कार दिसून येतील. त्याचे डोळे जर उघडे आहेत व विवेक जागृत आहे तर त्याची बुद्धि या कारीगिरीकडून त्याच्या कलाकौशल्याकडे आणि या ईशत्व-व्यवस्थेकडून, सृष्टी पालनकर्त्याकडे परिवर्तित होईल व त्याची खरी ओळख त्याला होईल.

आज वनस्पती शास्त्राने (Botony)ने मानवाला वनस्पति विश्‍वाचा इतका उलगडा केला आहे की निसर्गाचे अगणित चमत्कार त्याच्या ज्ञानात आले आहेत परंतु ज्याअर्थी या वस्तूंचा अभ्यास या अवघड बुद्धिने केला जातो की त्यांना या गोष्टींवर विचारच करावयाचा नाही की त्यांचा कोणी निर्माणकर्ता आहे किंवा नाही आणि ना त्याचा परिचय करुन घेण्यात याना कसले स्वारस्य आहे. म्हणून माहितीच्या या संग्रहात खरी वस्तुस्थिती दबलेल्या स्थितीत राहते. आणि या कारिगिरी मागे एक महान कलाकौशल्य आणि या ईशत्व व्यवस्थेत सृष्टी-निर्मात्याचा साक्षात्कार घडून येत नाही.

१९०. वहम (शंकावृत्ति) बाळगणारे लोक जिन्नांबद्दल ही धारणा बाळगतात की ते यांच्यावर भूतप्रेत (बला) होऊन अवतरू शकतात, त्यांच्या भाग्यांवर प्रभावकारी होऊ शकतात व त्यांना रोग इत्यादित ग्रस्त करू शकतात. अरब देशतील अनेकेश्वरवादी या प्रकारच्या शंकावृत्तित ग्रस्त होते व या आपत्तिपासून सुरक्षित राहण्याकरिता ते जिन्नांची पूजा करीत व त्यांना भेट चढवित हिंदुस्तानातील अनेकेश्‍वरवादी देखील या बाबतीत अरब अनेकेश्वरवादींच्या मागे नाहीत, किंबहुना दोन पावले पुढेच आहेत. जिन्नांसंबंधी त्यांची कप्लना भूत व राक्षस स्वरूपात दिसून येते व त्यांच्या अपायापासून सुरक्षित राहण्याकरिता ते त्यांची पूजा देखील करतात त्यांना भेट चढवितात व त्यांच्या नावाचा जयजयकार करतात.

कुरआन या सर्व गोष्टींना निरर्थक बाबी ठरवितो. जिन्नांविषयी ही वस्तुस्थिती व्यक्त करतो की त्याना अल्लाहने निर्माण केले आहे. म्हणून त्यांना निर्माण कर्त्यासमान समजणे पराकोटीचे अज्ञान होय, ज्याप्रकारे मनुष्य एक विवश निर्मिती आहे तद्वतच जिन्नदेखील सृष्टी निर्मात्याची विवश निर्मिती होय. म्हणजे हानि त्यांच्या अधिकारात नाही. ते ना रोग आणू शकतात, ना भाग्ये बनवू वा बिघडवू शकतात म्हणून त्यांचे भय बाळगणे व त्यांची पूजा करणे असत्य आहे.

१९१. मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांची फिरिशत्या (ईश-दुर्ता) संबंधी अशी कल्पना होती की त्या ईश्‍वराच्या मुली आहेत आणि ख्रिश्‍चन धर्मीय हजरत ईसा यांना ईश-पुत्र ठरवितात परंतु याला एकहि शस्त्रीय पुरावा नाही. किंबहुना केवळ अज्ञानाने लोकांनी या प्रकारच्या कल्पना निर्माण केल्या.

१९२. अर्थात अभावातून आस्तित्वात आणणारा व कसल्याहि उदाहरणाशिवाय व नमुन्याशिवाय निर्माण करणारा.

१९३. ईश्वराची पत्नी असण्याच्या कल्पनेला ना मक्केचे अनेकेश्वरवादी मान्य करणारे होते ना ग्रंथ बाळगणारे तरीहि ते ईश्वराकरिता संतती योजित असत. जणू ते अशी जाणीव बाळगत होते की ईश्वरकरिता पत्नीची कल्पना बाळगणे ईश्वराला साजेलशी नाही. किंबहुना एक तुच्छ कल्पना आहे जी ईश कल्पनेशी मेळ खात नाही. परंतु त्यांची ही अनुभूति त्यावेळी मृत होत असे जेव्हा ते ईश्वराकरिता संत्तती योजित. येथे त्यांच्या बुद्धिच्या या विरोधाभासास स्पष्ट केले गेले आहे.

ही होती अरबदेशीय अनेकेश्वरवाद्यांची ईश-कल्पना परंतु भारताच्या अनेकेश्वरवाद्याची ईश कल्पना तर याहून हि विचित्र आहे. यांनी जे अगणित ईश्वर रचून ठेवले आहेत त्यांच्याकरिता त्यांच्या पत्न्याहि कल्पिल्या आहेत आणि काही देवतांच्या बाबतीत तर त्यांची अशी कल्पना आहे की त्यांच्या कित्येक अर्धांगिन्या होत्या अशाप्रकारे त्यांनी ईश्वरास मनुष्य-पातळीवर आणण्यात कसलीही कसर बाकी ठेवली नाही. वस्तुस्थिती ही आहे की मनुष्य जेव्हा शिर्क (अनेकेश्वर वादा) मध्ये गुरफटला जातो. तेव्हा तो ईशमूल्यदेखील घटवितो. व त्यासोबतच आपल्या बौद्धिक दिवाळखोरीचाहि पुरावा देतो.

# खजुरांच्या फांद्यापासून लटकत असलेले गुच्छे

**(आयत क्र. ९९)**





**आणि तोच होय ज्याने आकाशातून पाणी वर्षविले, मग आम्ही यापासून प्रत्येक प्रकारची वनस्पति उगविली मग यापासून हिरव्यागार फांद्या काढल्या ज्यापासून आम्ही थरावर थर चढलेले दाणे निर्माण करतो. आणि खजुराच्या गाभ्यातून लोंबकळत असलेले गुच्छे आणि द्राक्षांच्या बागा व जैतून व डाळिंब एकमेकांशी मिळती जुळतीहि व एकमेकांपासून भिन्न देखील. यांच्या फळांना जेव्हा ते फळाला येत असतांत पहा व त्यांच्या पिकण्यास हि पहा यात त्या लोकांकरिता निशाण्या आहेत जे ईमान बाळगतात.(अल-क़ुरआन)**

१०२. हाच अल्लाह तुमचा पालनकर्ता आहे. त्याच्याखेरीज कोणी उपासनीय नाही. प्रत्येक वस्तूस निर्माण करणारा, यास्तव तुम्ही त्याचीच उपासना करा [१९४] तो प्रत्येक वस्तूची काळजी वाहणारा आहे.[१९५]

ذَٰلِكُمُ اللَّهُ رَبُّكُمْ ۖ لَا إِلَٰهَ إِلَّا هُوَ ۖ خَالِقُ كُلِّ شَيْءٍ فَاعْبُدُوهُ ۚ وَهُوَ
عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ وَكِيلٌ ﴿١٠٢﴾

१०३. दृष्टि त्याच्यापर्यंत पोहोचू शकत नाही, मात्र तो दृष्टींना पकडतो [१९६] तो मोठा सूक्ष्मदर्शी व जाणकार आहे.

لَا تُدْرِكُهُ الْأَبْصَارُ وَهُوَ يُدْرِكُ الْأَبْصَارَ ۖ وَهُوَ اللَّطِيفُ
الْخَبِيرُ ﴿١٠٣﴾

१०४. तुमच्या पालनकर्त्या तर्फे तुमच्याजवळ अंतर्दृष्टिच्या गोष्टी आल्या आहेत तर जो कोणी समंजसरित्या वागेल तो आपलेच भले करील आणि जो आंधळा बनून राहील तो आपलेच नुकसान करील. मी तुमच्यावर निरीक्षक म्हणून नियुक्त केलो गेलो नाही. [१९७]

قَدْ جَاءَكُم بَصَائِرُ مِن رَّبِّكُمْ ۖ فَمَنْ أَبْصَرَ فَلِنَفْسِهِ ۖ وَمَنْ
عَمِيَ فَعَلَيْهَا ۚ وَمَا أَنَا عَلَيْكُم بِحَفِيظٍ ﴿١٠٤﴾

१०५. अशाप्रकारे आम्ही विविधरित्या आयतींचे वर्णन करतो आणि अशासाठी वर्णन करतो ज्यायोगे त्यानी असे म्हणावे की तुम्ही (चांगल्या प्रकारे) वाचून ऐकविले, तसेच यासाठी की जे लोक जाणतात त्यांच्याकरिता आम्ही यास उज्वल करावे. [१९८]

وَكَذَٰلِكَ نُصَرِّفُ الْآيَاتِ وَلِيَقُولُوا دَرَسْتَ وَلِنُبَيِّنَهُ
لِقَوْمٍ يَعْلَمُونَ ﴿١٠٥﴾

१०६. तुमच्या पालनकर्त्या तर्फे तुमच्यावर जी ''वही'' अवतरीत झाली आहे. तिचे अनुसरण करा. त्याच्याखेरीज कोणीहि उपासनीय नाही व अनेकेश्वर वाद्यांपासून तोंड फिरवा. [१९९]

اتَّبِعْ مَا أُوحِيَ إِلَيْكَ مِن رَّبِّكَ ۖ لَا إِلَٰهَ إِلَّا هُوَ ۖ وَأَعْرِضْ
عَنِ الْمُشْرِكِينَ ﴿١٠٦﴾

१०७. जर अल्लाहने इच्छिले असते तर यांनी शिर्क केले नसते [२००] आणि आम्ही यांना तुमच्यावर निरीक्षक म्हणून नियुक्त केले नाही आणि ना तुम्ही यांचे जबाबदार आहात.[२०१]

وَلَوْ شَاءَ اللَّهُ مَا أَشْرَكُوا ۗ وَمَا جَعَلْنَاكَ عَلَيْهِمْ حَفِيظًا ۖ
وَمَا أَنتَ عَلَيْهِم بِوَكِيلٍ ﴿١٠٧﴾

१९४. युक्तिवादाचा खुलासा हा आहे की ज्याअर्थी अल्लाह तुमचा व प्रत्येक वस्तूचा निर्माणकर्ता आहे तर तोच सर्वांचा पालनकर्ताहि आहे. जेव्हा दुसरा कोणी निर्माणकर्ता नाही तर तो पालनकर्ता कसा होऊ शकतो व उपासनेस योग्य कसा ठरु शकतो यास्तव माणसाकरिता खरी विचारसरणी हीच आहे की त्याने केवळ अल्लाहला आपला पालनकर्ता व उपास्य मानावे व त्याचीच उपासना करावी.

१९५. केवळ अल्लाह हाच पालक आहे म्हणून त्याच्याशीच अपेक्षा बाळगा.

१९६. म्हणजे जरी तुम्ही ईश्वरास आपल्या डोळ्यांनी पाहू शकत नाही. परंतु तो तुम्हाला चांगल्याप्रकारे पाहत आहे. म्हणून कोणीही या भ्रमात राहू नये की जेव्हा ईश्वर दिसून येत नाही तेव्हा त्याचे अस्तित्वच नाही. खरी वस्तुस्थिती ही आहे की माणसाच्या नजरा ईश्वराला पाहण्यास कार्यक्षम असू शकत नाही. जेव्हा मनुष्य-दृष्टी भौतिक विश्वाच्या कित्येक वस्तूंना पाहण्यास अक्षम असते उदा. माणसाच्याच देहात वास्तव्य करणाऱ्या आत्मास पाहू शकत नाही. हवा आणि विद्युत प्रवाह या जाणवणाऱ्या गोष्टी आहेत परंतु त्यांना पाहण्याचे सामर्थ्य नेत्रात नाही, आकाशाच्या वर जी सृष्टी अस्तित्वात आहे तिला पाहण्यासहि डोळे अक्षम आहेत. मग ते सर्वशक्तिमान व महाप्रतापी ईश्वराला पाहण्याचे सामर्थ्य कोठून आणतील?

यास्तव बाह्य नेत्रांनी ईश-दर्शनाचा प्रयत्न एक निरर्थक प्रयत्न आहे. मग याकरिता कितीही वा कशीही तपस्या केली जावी. तथापि क्षितीजांवर पसरलेल्या निशाणयांचे अवलोकन करुन मनुष्य ईश्वराचा परिचय प्राप्त करु शकतो. आणि अंत:चक्षू प्रकाशित असतील तर प्रत्येक पाना फुलात त्याचा साक्षात्कार घडू शकतो.

१९७. हे अल्लाहनेच फर्माविले आहे. परंतु येथे संभाषण करणारे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे आहेत ''मी तुमच्यावर निरीक्षक नाही'' म्हणजे तुमच्या आचरणाची कसलीही जबाबदारी माझ्यावर टाकली गेली नाही.

१९८. म्हणजे एकेश्वरवादाचे हे प्रमाण जे वर वर्णिले गेले आहे ते कुरआनात विविध पैलूंनी व विविध शैलीत वारंवार वर्णिले गेले आहे. त्यात दोन हेतु आहेत, त्या पैकी एक हेतु हा की लोकांवर प्रमाण प्रस्थापित व्हावे आणि त्यांनी आज ना उद्या हे मान्य करावे की पैगंबरांनी आम्हाला एकेश्वरवादाचा पाठ देण्यात कसलीहि कसर बाकी ठेवली नाही, किंबहुना चांगल्याप्रकारे शिकवण दिली होती दुसरी गोष्ट अशी की जे लोक बुद्धिने काम घेतात आणि जाणतात की केवळ अल्लाह हाच त्यांचा पालनकर्ता आहे. त्यांच्यावर एकेश्वर वादाची वस्तुस्थिती पूर्णत: प्रकट व्हावी.

१९९. येथे अनेकेश्वरवाद्यांची उपेक्षा करण्याचा अर्थ हा आहे की एकेश्वरवादाची ही स्पष्ट प्रमाणे प्रस्तुत केल्यानंतरहि जर अनेकेश्वरवाद्यांना आपल्या श्रद्धा व आचरणाविषयी आग्रह आहे तर त्यांना त्यांच्या दशेवर सोडा.

२००. अर्थात अल्लाहने जर धर्म संबंधात लोकांना लाचार करू इच्छिले असते तर कोणताहि मनुष्य शिर्क करु शकला नसता. परंतु अल्लाहची ही इच्छा नव्हती, किंबहुना त्याने इच्छिले की मनुष्याची कसोटी घेतली जावी व याकरिता त्याला सत्य व असत्य मार्गाची स्पष्ट समज देऊन मार्ग निवडण्याचे स्वातंत्र्य दिले जावे यास्तव अल्लाहने प्रदान केलेल्या या स्वातंत्र्याचा जर कोणी गैर वापर करु इच्छित असेल व तुमच्या म्हणण्याकडे लक्ष द्यायलाहि तयार नसेल तर त्याला त्याच्या दशेवरच सोडा तो त्याच्या दुष्परिणीतिस स्वत: भोगील. त्यासाठी तुम्हाला त्रस्त व्हायची गरज नाही.

२०१. म्हणजे आम्ही तुम्हाला संदेश पोहचविणारा बनविले आहे. लोकांच्या श्रद्धा आचरणास जबाबदार ठरविले नाही की ज्यायोगे यांच्या वर्तनासंबंधी तुमची विचारपूस व्हावी.

१०८. आणि हे लोक अल्लाहशिवाय ज्यांना पुकारतात त्यांना बरेवाईट म्हणू नका कारण मग तेहि मर्यादेचे उल्लंघन करुन अजाणता अल्लाहला बरेवाईट बोलू लागतील.[२०२] अशाप्रकारे आम्ही प्रत्येक समूहाकरिता त्याच्या आचरणास शोभायमान बनविले आहे.[२०३] मग त्यांना आपल्या पालनकर्त्याकडेच परतून जायचे आहे त्यावेळी तो त्यांना दाखवून देईल की ते काय करीत राहीलेत.[२०४]

وَلَا تَسُبُّوا الَّذِينَ يَدْعُونَ مِن دُونِ اللَّهِ فَيَسُبُّوا اللَّهَ عَدْوًا
بِغَيْرِ عِلْمٍ ۗ كَذَٰلِكَ زَيَّنَّا لِكُلِّ أُمَّةٍ عَمَلَهُمْ ثُمَّ إِلَىٰ رَبِّهِم
مَّرْجِعُهُمْ فَيُنَبِّئُهُم بِمَا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿١٠٨﴾

१०९. हे लोक अल्लाहच्या कठोर शपथा खाऊन म्हणतात की जर यांच्याजवळ एखादी निशाणी आली तर ते अवश्य ईमान बाळगतील. सांगा निशाण्या तर केवळ अल्लाहजवळच आहेत [२०५] आणि तुम्हाला काय माहित की त्या आल्या तरी ते ईमान बाळगणार नाहीत.[२०६]

وَأَقْسَمُوا بِاللَّهِ جَهْدَ أَيْمَانِهِمْ لَئِن جَاءَتْهُمْ آيَةٌ لَّيُؤْمِنُنَّ
بِهَا ۚ قُلْ إِنَّمَا الْآيَاتُ عِندَ اللَّهِ ۖ وَمَا يُشْعِرُكُمْ أَنَّهَا إِذَا
جَاءَتْ لَا يُؤْمِنُونَ ﴿١٠٩﴾

११०. आम्ही अशाप्रकारे त्यांच्या हृदयांना व त्यांच्या दृष्टीला पलटवित आहोत ज्याप्रकारे त्यांनी पहिल्यांदा यावर ईमान बाळगले नाही [२०७] आणि आम्ही त्यांना सोडून देत आहोत की त्यांनी आपल्या विद्रोहात भटकत रहावे.

وَنُقَلِّبُ أَفْئِدَتَهُمْ وَأَبْصَارَهُمْ كَمَا لَمْ يُؤْمِنُوا بِهِ أَوَّلَ
مَرَّةٍ وَنَذَرُهُمْ فِي طُغْيَانِهِمْ يَعْمَهُونَ ﴿١١٠﴾

१११. जर आम्ही यांच्याकडे फिरिश्ते अवतरीत केले असते आणि मेलेले लोक यांच्याशी संभाषण करु लागले असते व यांच्या समोर सर्व गोष्टी एकत्र केल्या असत्या तरीदेखील हे ईमान बाळगणारे झाले नसते, परंतु हे की अल्लाहची इच्छा असावी.[२०८] परंतु अधिकांश लोक अज्ञानाच्या गोष्टी करतात. [२०९]

وَلَوْ أَنَّنَا نَزَّلْنَا إِلَيْهِمُ الْمَلَائِكَةَ وَكَلَّمَهُمُ الْمَوْتَىٰ وَ
حَشَرْنَا عَلَيْهِمْ كُلَّ شَيْءٍ قُبُلًا مَّا كَانُوا لِيُؤْمِنُوا إِلَّا أَن يَشَاءَ
اللَّهُ وَلَٰكِنَّ أَكْثَرَهُمْ يَجْهَلُونَ ﴿١١١﴾

११२. आणि अशाप्रकारे आम्ही मनुष्यांपैकी व जिन्नांपैकी सैतानांना प्रत्येक पैगंबराचा शत्रू बनविले आहे [२१०] जे धोका देण्याकरिता एकमेकांच्या मनात मनोहर गोष्टी भरवितात [२११] जर तुमच्या पालनकर्त्याने इच्छिले असते तर ते असे करु शकले नसते.यास्तव तुम्ही त्यांना सोडा की त्यांनी असत्य रचीत रहावे.

وَكَذَٰلِكَ جَعَلْنَا لِكُلِّ نَبِيٍّ عَدُوًّا شَيَاطِينَ الْإِنسِ وَالْجِنِّ
يُوحِي بَعْضُهُمْ إِلَىٰ بَعْضٍ زُخْرُفَ الْقَوْلِ غُرُورًا ۚ وَلَوْ شَاءَ
رَبُّكَ مَا فَعَلُوهُ ۖ فَذَرْهُمْ وَمَا يَفْتَرُونَ ﴿١١٢﴾

२०२. ईमान बाळगणाऱ्यांना ही आज्ञा दिली गेली आहे की त्यांनी प्रचार-उत्साहात अनेकेश्वरवाद्यांच्या उपास्यांना बरेवाईट म्हणू नये अन्यथा नवल नाही की प्रक्षोभित होऊन त्यांनीहि अल्लाहचा उपमर्द करावयास आरंभ करावा. अरबचे अनेकेश्वरवादी अल्लाहला मानीत असत पण तरीहि ही शक्यता होती की ते भडकून जाऊन अल्लाहलाहि शिवीगाळ करू लागले असते.

याचा अर्थ हा नव्हे की यांच्या बरोबर सहिष्णुतेने वागताना त्यांच्या उपास्यांना खोटे म्हटले न जावे. कारण सत्य स्पष्ट करण्याकरिता असत्याला असत्य म्हणणे आवश्यक आहे. विषाला प्राणघातक न म्हटले गेले तर न जाणो कित्येक लोक विष खाऊन प्राणाला मुकतील. आणि जर आगीपासून बालकाला दूर न ठेवले गेले तर तो त्याच्या प्रकाशाने प्रभावित होऊन आपला हात आगीत खचितच टाकेल. यास्तव लोकांना जर विनाशापासून वाचवायचे आहे तर अवास्तव सहिष्णूतो शिवाय व चुकीच्या पक्षपाताशिवाय घातक गोष्टींना घातक म्हणावेच लागेल. म्हणून कुरआनात मूर्त्यांची विवशता व मूर्तिपूजेच्या दुष्परिणीतिस विशिष्ट शैलीत प्रस्तुत केले गेले आहे.

२०३. म्हणजे ज्याप्रकारे अनेकेश्वरवाद्यांना आचरणास आम्ही त्यांच्या नजरेत सुशोभित केले आहे तद्वतच प्रत्येक समूहासाठी त्याच्या आचरणास शोभायमान बनविले आहे.

अर्थात प्रत्येक समूह आपल्या आचरणास चांगले समजून उमजूनच त्यावर कार्यरत असतो, मग ते खरे पाहता चांगले नसले तरी यासाठी कोणत्याहि समूहाच्या रीती रिवाजांवर असहय आक्रमण केल्याने त्याची सुधारणा होऊ शकत नाही, किंबहुना गांभीर्य व बुद्धिकौशल्यासह त्यांचे चुकीचे व असत्य असणे त्यांना स्पष्ट समजाविल्याने सुधारणेची अपेक्षा केली जाऊ शकते.

स्पष्ट असावे की प्रत्येक समूहाला आपले आचरण सुशोभित दिसणे हेहि निसर्ग नियमानुसार होते. आणि हा निसर्ग नियम अल्लाहनेच बनविलेला आहे याकरिता सर्वश्रेष्ठ अल्लाहने सुशोभित करून दाखविण्याचा संबंध स्वत:शी जोडला आहे.

२०४. येथे निशाणीशी अभिप्रेत जाणवणारी निशाणी म्हणजे चमत्कार होय.

२०५. याचे स्पष्टीकरण टीप क्र. ६५ मध्ये केले गेले आहे.

२०६. मुसलमानांना संबोधून आहे. जे असे इच्छित होते की चमत्कार प्रकट व्हावा ज्यायोगे काफीरांनी ईमान बाळगावे.

२०७. म्हणजे ज्याप्रकारे पहिल्यांदा ईमान बाळगण्यात यांच्या हृदयांची व दृष्टीची वक्रता बाधक होती तद्वतच आताहि बाधक आहे आणि अल्लाहचा (स्वभाव नियम ) हा आहे की जो उलट्या बुद्धीने विचार करतो त्याला प्रत्येक गोष्ट उलटी दिसावी. यासाठी अशा लोकांना चमत्कार दाखविणेहि परिणामकारक होऊ शकत नाही. तथापि त्यांनी जर समंजसपणा अंगिकारला तर जी प्रमाणे प्रस्तुत केली गेली आहेत त्यांच्या प्रकाशात ते सत्य प्राप्त करु शकतात.

२०८. ज्या लोकांनी जिद्द किंवा घमेंडीमुळे सत्याचा स्वीकार न करण्याचा बौद्धिक निर्णय घेतला आहे त्यांना सत्यास मानणारे म्हटले जाऊ शकत नाही मग त्यांना एकाहून एक विचित्र चमत्कार दाखविले का जाईनात कारण ज्याअर्थी त्यांना मान्य करायचेच नाही तर ते प्रत्येक चमत्काराचा खुलासा मागतील तथापि जर अल्लाहने ईमान बाळगण्यारा ना विवश करु इच्छिले असते तर एकहि मनुष्य ईमान बाळगल्याशिवाय राहिला नसता, परंतु ही गोष्ट अल्लाहच्या त्या योजनेविरूद्ध आहे ज्यानुसार त्याने मानवाला ईमान बाळगण्याचा किंवा न बाळगण्याचा अधिकार दिला आहे.

२०९. म्हणजे अल्लाहच्या या योजनेस दृष्टीआड करुन ते ज्या गोष्टी करतात त्या केवळ भावनात्मक असतात. त्या ज्ञान आणि वस्तुस्थितीवर नव्हे किंबहुना अज्ञानावर आधारीत असतात.

२१०. अर्थात आज पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याविरूद्ध विरोधाचे जे वादळ उठले आहे ज्यात मनुष्य व जिन्नांमधील सैतान अग्रभागी आहेत तर ही काही नवी गोष्ट नाही किंबहुना हा व्यवहार प्रत्येक पैगंबराबरोबर झाला आहे.

सैतानांना डोके वर काढण्याची संधी सर्वश्रेष्ठ अल्लाहने दिलेल्या सवलतीच्या परिणामी मिळते म्हणून या वस्तुस्थितीस पैगंबरांचा शत्रू बनविण्याच्या अर्थाने घेतले गेले आहे. अर्थ हा की जर अल्लाहने ही संधी दिली नसती तर सैतान हा अपाय क़ायम करु शकले नसते परंतु अल्लाहने यांना याची संधी याकरिता दिली आहे ज्यायोगे सत्य-असत्याच्या या ओढाताणीत खरे मोती वेगळे होऊन दिसावेत.

२११. मनोहर गोष्टी शी अभिप्रेत अशा खोट्या गोष्टी होत ज्यांना चित्ताकर्षक बनविले गेले असावे उदा. कुरआनात जेव्हा मेलेल्या जनावराच्या निषिद्ध असण्याबाबत आदेश अवतरला तेव्हा काफ़ीरांनी लोकांना बहकाविण्या करिता हा चुटका सोडला की ज्या जनावरास मनुष्याने मारले असावे ते हलाल परंतु ज्याला अल्लाहने मारले असेल ते

हराम ही किती विचित्र गोष्ट आहे!

आणि आजच्या काळात नव्या शैलीने रसभरीत गोष्टी प्रस्तुत केल्या जात आहेत. उदा. हे की ''सर्व धर्म खरे आहेत'' किंवा हे की ईश्वरापर्यंत पोहचण्याचे मार्ग वेगवेगळे आहेत, परंतु अंतिम टप्पा मात्र सर्वांचा एकच आहे. किंवा मानव वंश मर्यादित करण्याकरिता ही मनमोहक घोषणा की ''हम दो हमारे दो'' तिसरे ''आता नाही व त्यानंतर कधीच नाही'' तद्वतच ''धर्माचा संबंध व्यक्तिगत जीवनाशी आहे'' ''स्त्री-पुरुष समानता'' आणि ''धर्म अफूची गोळी आहे'' यासारख्या मनोरम घोषणा मनमौजी व विघ्नसंतोषी लोकांच्याच अधिकारात आहेत.

**आणि (त्यांना ही ढील) अशासाठी (दिली जात आहे) की जे लोक आखिरतवर ईमान बाळगत नाही त्यांची हृदये अशा गोष्टींकडे आकर्षित व्हावीत आणि त्यास पसंत करावे आणि जी कमाई त्यांना करायची ती त्यांनी करावी. काय मी अल्लाहशिवाय अन्य एखादा निर्णय कर्ता शोधू वस्तुतः तोच आहे ज्याने तुमच्याकडे ग्रंथ अवतरीत केला आहे. जो स्पष्टपणे गोष्टी वर्णन करणारा आहे. आणि ज्यांना आम्ही (या पूर्वी) ग्रंथ प्रदान केला ते जाणतात की हा तुमच्या पालनकर्त्याकडून सत्यासह अवतरीत झाला आहे. यास्तव तुम्ही संशय करणाऱ्यांपैकी न व्हावे.** *(अल-क़ुरआन)*

**११३.** आणि (त्यांना ही ढील) अशासाठी (दिली जात आहे) की जे लोक आखिरतवर ईमान बाळगत नाही त्यांची हदये अशा गोष्टींकडे आकर्षित व्हावीत [२१२] आणि त्यास पसंत करावे आणि जी कमाई त्यांना करायची ती त्यांनी करावी.

وَلِتَصْغَىٰٓ إِلَيْهِ أَفْـِٔدَةُ ٱلَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ بِٱلْـَٔاخِرَةِ
وَلِيَرْضَوْهُ وَلِيَقْتَرِفُوا۟ مَا هُم مُّقْتَرِفُونَ ﴿١١٣﴾

**११४.** काय मी अल्लाहशिवाय अन्य एखादा निर्णय कर्ता शोधू वस्तुतः तोच आहे ज्याने तुमच्याकडे ग्रंथ अवतरीत केला आहे. जो स्पष्टपणे गोष्टी वर्णन करणारा आहे.[२१३] आणि ज्यांना आम्ही (या पूर्वी) ग्रंथ प्रदान केला [२१४] ते जाणतात की हा तुमच्या पालनकर्त्याकडून सत्यासह अवतरीत झाला आहे. यास्तव तुम्ही संशय करणाऱ्यांपैकी न व्हावे. [२१५]

أَفَغَيْرَ ٱللَّهِ أَبْتَغِى حَكَمًا وَهُوَ ٱلَّذِىٓ أَنزَلَ إِلَيْكُمُ ٱلْكِتَٰبَ
مُفَصَّلًا ۚ وَٱلَّذِينَ ءَاتَيْنَٰهُمُ ٱلْكِتَٰبَ يَعْلَمُونَ أَنَّهُۥ مُنَزَّلٌ
مِّن رَّبِّكَ بِٱلْحَقِّ ۖ فَلَا تَكُونَنَّ مِنَ ٱلْمُمْتَرِينَ ﴿١١٤﴾

**११५.** आणि तुमच्या पालन कर्त्याची गोष्ट सत्य आणि न्यायासह पूर्ण झाली [२१६] असा कोणीहि नाही जो त्याच्या गोष्टी बदलू शकेल आणि तो सर्व काही ऐकणारा, जाणणारा आहे. [२१७]

وَتَمَّتْ كَلِمَتُ رَبِّكَ صِدْقًا وَعَدْلًا ۚ لَّا مُبَدِّلَ لِكَلِمَٰتِهِۦ ۚ
وَهُوَ ٱلسَّمِيعُ ٱلْعَلِيمُ ﴿١١٥﴾

**११६.** आणि जमीनीवर वास्तव्य करणाऱ्यांमध्ये अधिकांश लोक असे आहेत की जर तुम्ही त्यांच्या म्हणण्यानुसार चालाल तर ते तुम्हाला अल्लाहच्या मार्गापासून भटकवतील ते केवळ गृहीतावर चालतात व अटकळीच्या गोष्टी करतात. [२१८]

وَإِن تُطِعْ أَكْثَرَ مَن فِى ٱلْأَرْضِ يُضِلُّوكَ عَن سَبِيلِ ٱللَّهِ ۚ
إِن يَتَّبِعُونَ إِلَّا ٱلظَّنَّ وَإِنْ هُمْ إِلَّا يَخْرُصُونَ ﴿١١٦﴾

**११७.** निःसंशय, तुमचा पालनकर्ताच उत्तमरित्या जाणतो की कोणते लोक त्याच्या मार्गापासून विचलीत झालेले आहेत व कोणते सरळ मार्गावर आहेत ? [२१९]

إِنَّ رَبَّكَ هُوَ أَعْلَمُ مَن يَضِلُّ عَن سَبِيلِهِۦ ۖ وَهُوَ أَعْلَمُ
بِٱلْمُهْتَدِينَ ﴿١١٧﴾

**११८.** तेव्हा ज्या (जबीहा) वर अल्लाहचे नाव घेतले गेले असेल ते खा, जर तुम्ही त्याच्या आयतींवर ईमान बाळगत असाल. [२२०]

فَكُلُوا۟ مِمَّا ذُكِرَ ٱسْمُ ٱللَّهِ عَلَيْهِ إِن كُنتُم بِـَٔايَٰتِهِۦ مُؤْمِنِينَ ﴿١١٨﴾

२१२. आणि ही वस्तुस्थिती आहे की धर्माविषयी वाईट मते पसरविणाऱ्यांच्या मनमोहक गोष्टी अशाच लोकांना अपील करतात ज्यांची बुद्धि आखिरतच्या कल्पनेविरहित असते.

२१३. अर्थात सत्य काय आहे व असत्य काय, याच्या निर्णयाचा पूर्ण अधिकार केवळ अल्लाहला आहे, तो सृष्टीचा निर्माण कर्ताहि आहे व पालनकर्ता देखील व त्याने आपला निर्णय कुरआनच्या रूपाने अवतरीत केला आहे. म्हणून सर्व झगड्याच्या व्यवहारात हा ग्रंथ निर्णायक वस्तु आहे. व ईश-प्रमाणपत्राचे स्वरूप बाळगतो. परंतु तुम्ही असे इच्छिता की मी अल्लाहला सोडून अन्य एखाद्यास निर्णयकर्ता मान्य करावे आणि श्रद्धा व हलाल-हराम संदर्भात एखाद्या अशा गोष्टीकडे रूजू करावे ज्याला ईश्वरी सनदीचा दर्जा प्राप्त नाही. उदा. त्या गोष्टी ज्या धर्माच्या नावाने प्रचलीत आहेत किंवा ती संस्कृती जी वाडवडीलानी वारसा म्हणून सोडली आहे अथवा ते भ्रम व कटकटी ज्या केवळ अज्ञाना पोटी जन्मास आल्या आहेत.

२१४. अर्थात ग्रंथ बाळगणाऱ्यांच्या समूहाशी संबंध ठेवणारे सच्चे व ईमानदार लोक होत.

२१५. हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना उद्देश्यून असले तरी संभाषाणाचा रोख कुरआन वाचकाकडे आहे. आणि हे समजाविण्याचा हेतु आहे की कुरआन अवतरण काही अद्‌भूत बाब नव्हे. याच्यापूर्वीहि सर्वश्रेष्ठ अल्लाहने ग्रंथ अवतरीत केले होते ज्यांचा समूह ग्रंथ बाळगणारा आहे व त्यांच्यात जे लोक सत्यनिष्ठ आहेत ते कुरआनची वाणी ऐकून ओळखतात की ही आकाश-वाणी आहे म्हणून कुरआन ईश-ग्रंथ असण्याबद्दल तिळमात्र संशयाला जागा नाही.

२१६. म्हणजे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पाठविण्या संबंधी जो वायदा सर्वश्रेष्ठ अल्लाहने ग्रंथ बाळगणाऱ्यांशी केला होता व ज्याचा उल्लेख तौरात व बायबलमध्ये विद्यमान आहे तो अखेर पूर्ण झाला. अशाप्रकारे ईश्वराच्या फर्मानाची सत्यताहि सिद्ध झाली व न्यायाची निकडहि पूर्ण झाली म्हणजे कुरआन अवतरणाने अल्लाहचे प्रमाण लोकांवर कायम झाले.

२१७. म्हणजे अल्लाह हे जाणतो की कोण त्याच्या गोष्टीने खोटे ठरवितो व कोण त्याच्या गोष्टींच्या सत्यतेवर विश्वास करतो.

२१८. सत्य व असत्या बाबतचे स्तर, प्रमाण व पुरावा होय लोकांची अधिकता व कमतरता नव्हे ईश्वर आणि धर्म या सारख्या मूलभूत महत्व बाळगणाऱ्या बाबीत जगातील बहुसंख्य लोक नेहमी अज्ञानात राहिले आहेत व अनुमानाचे बाण चालवीत राहीलेत. याच कारणास्तव मानव जातीचा इतिहास नैतिक व आचरणीय ऱ्हासाचा इतिहास बनला. आणि आजच्या काळात तर असे कोणतेहि दुष्कर्म नाही की ज्याने सार्वत्रिक संकटाचे रूप धारण केले नसेल अशा स्थितीत अधिकांशा माणसे लोकांना मार्गदर्शन करण्याचे तर राहू द्या पण त्यांच्या मार्ग भ्रष्टतेत वाढ नक्की करु शकतात म्हणून कुरआनचे म्हणणे आहे की सत्य असल्याबाबात सार्वजनिक वा जनमत प्रमाण होऊ शकत नाही किंबहुना प्रमाण एक तर त्या निशाण्या होऊ शकतात ज्या क्षितिजात म्हणजे सृष्टीव्यवस्थेत व माणसाच्या आपल्या स्वभावात पसरलेल्या आहेत किंवा ईश- ग्रंथ जो ईश्वरीय सनद बाळगतो.

२१९. म्हणून आपल्या पालनकर्त्याचे मार्गदर्शन प्राप्त करा आणि लोक ज्या दिशेने अधिक संख्येने जात आहेत त्याच्याबद्दल धोका खाऊ नका.

२२०. अर्थात लोकांनी अनुमानाच्या आधारावर जे रीतीरिवाज प्रचलित केले आहेत त्यात खाण्यासंबंधीची अनावश्यक बंधने देखील आहेत, म्हणून अरबच्या अनेकेश्वरवाद्यांनी गुरांच्या एका प्रकारास हराम ठरविले होते उदा.अशी सांडणी की जिने अमुक इतक्या पिलांना जन्म दिला सावा, जरी अल्लाहच्या नावाने तिला जबह केले असेल तरी तिचे मांस खाणे ते हराम समजत, म्हणून फर्माविले गेले की ज्या जनावरांना अल्लाहने हलाल ठरविले आहे त्यांना जबह करतांना जर अल्लाहचे नाव घेतले गेले असेल तर त्यांचे मांस खाण्यात ईमान बाळगणाऱ्यांना कसलाहि संकोच वाटू नये. याबाबतीत मागेपुढे करण्याचा अर्थ हा आहे की अनेकेश्वरवादी विचारांचा पगडा अजूनहि बाकी आहे.

खाण्यासंबंधीची भ्रमपूजा भारतीय अनेकेश्वरवाद्यांच्या नसानसात इतकी भिनली आहे की काही हलाल गुरांसंबंधी ते भावनाशील आहेत,किंबहुना मूलत: त्यांनी मांसाहार निषिद्ध ठरविला आहे.

**११९. आणि तो (जबीहा) तुम्ही का खाऊ नये ज्यावर अल्लाहचे नाव घेतले गेले असेल वस्तुत:त्याने तुमच्यावर जे काही हराम केले आहे त्याचे उघडरित्या वर्णन केले आहे, त्या सोबतच लाचारीच्या स्थितीत त्याची अनुज्ञा देखील दिली आहे.[२२१] आणि कित्येक लोक असे आहेत जे ज्ञानाशिवाय केवळ आपल्या इच्छा अभिलाषांच्या आधारे लोकांना मार्गभ्रष्ट करतात. मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या या लोकांना तुमचा पालनकर्ता चांगल्याप्रकारे जाणतो.**

وَمَا لَكُمْ أَلَّا تَأْكُلُوا مِمَّا ذُكِرَ اسْمُ اللَّهِ عَلَيْهِ وَقَدْ فَصَّلَ
لَكُم مَّا حَرَّمَ عَلَيْكُمْ إِلَّا مَا اضْطُرِرْتُمْ إِلَيْهِ ۗ وَإِنَّ كَثِيرًا
لَّيُضِلُّونَ بِأَهْوَائِهِم بِغَيْرِ عِلْمٍ ۗ إِنَّ رَبَّكَ هُوَ أَعْلَمُ
بِالْمُعْتَدِينَ ﴿١١٩﴾

**१२०. आणि उघड पापालाहि सोडून द्या व गुप्त पापाला देखील [२२२] जे लोक पाप कमवितात त्यांना निश्चितच आपल्या कमाईचा मोबदला मिळेल.**

وَذَرُوا ظَاهِرَ الْإِثْمِ وَبَاطِنَهُ ۚ إِنَّ الَّذِينَ يَكْسِبُونَ الْإِثْمَ
سَيُجْزَوْنَ بِمَا كَانُوا يَقْتَرِفُونَ ﴿١٢٠﴾

**१२१. आणि ज्या जबीहावर अल्लाहचे नाव घेतले गेले नसेल त्यास खाऊ नका. ही अवज्ञा आहे [२२३] आणि सैतान आपल्या साथीदारांच्या मनात कुविचार निर्माण करतात अशासाठी की त्यांनी तुमच्याशी भांडावे.परंतु जर तुम्ही त्यांचे आज्ञापालन केले तर तुम्ही देखील अनेकेश्वरवादी (मुशरिक) व्हाल.[२२४]**

وَلَا تَأْكُلُوا مِمَّا لَمْ يُذْكَرِ اسْمُ اللَّهِ عَلَيْهِ وَإِنَّهُ لَفِسْقٌ ۗ وَإِنَّ
الشَّيَاطِينَ لَيُوحُونَ إِلَىٰ أَوْلِيَائِهِمْ لِيُجَادِلُوكُمْ ۖ وَإِنْ
أَطَعْتُمُوهُمْ إِنَّكُمْ لَمُشْرِكُونَ ﴿١٢١﴾

**१२२. काय असा मनुष्य जो मेलेला होता, मग आम्ही त्याला जिवंत केले व त्याला प्रकाश प्रदान केला ज्यासह तो लोकांच्या दरम्यान चालतो, त्या माणसा सारखा असू शकतो जो अंध:कारात पडलेला असेल व त्यातून निघूच शकत नसेल [२२५] अशाप्रकारे काफिरांकरिता त्यांची कृत्ये शोभायमान बनविली गेली आहेत.[२२६]**

أَوَمَن كَانَ مَيْتًا فَأَحْيَيْنَاهُ وَجَعَلْنَا لَهُ نُورًا يَمْشِي بِهِ
فِي النَّاسِ كَمَن مَّثَلُهُ فِي الظُّلُمَاتِ لَيْسَ بِخَارِجٍ مِّنْهَا ۚ
كَذَٰلِكَ زُيِّنَ لِلْكَافِرِينَ مَا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿١٢٢﴾

**१२३. अशाप्रकारे आम्ही प्रत्येक वस्तीत मोठमोठे गुन्हेगार उभे केले अशासाठी की त्यांनी कावेबाजी माजवावी [२२७] आणि खरे पाहता ही कावेबाजी ते स्वत:विरूद्धच करीत आहेत. परंतु त्यांना याची जाणीव नाही.[२२८]**

وَكَذَٰلِكَ جَعَلْنَا فِي كُلِّ قَرْيَةٍ أَكَابِرَ مُجْرِمِيهَا لِيَمْكُرُوا
فِيهَا ۖ وَمَا يَمْكُرُونَ إِلَّا بِأَنفُسِهِمْ وَمَا يَشْعُرُونَ ﴿١٢٣﴾

२२१. येथे सूरह नहलच्या आयत क्र. ११५ कडे संकेत आहे ज्यात हा आदेश दिला गेला आहे.

اِنَّمَا حَرَّمَ عَلَيْكُمُ الْمَيْتَةَ وَالدَّمَ وَلَحْمَ الْخِنْزِيْرِوَمَآ اُهِلَّ لِغَيْرِ اللّٰهِ بِهٖ فَمَنِ اضْطُرَّ غَيْرَ بَاغٍ وَّلَا عَادٍ فَاِنَّ اللّٰهَ غَفُوْرٌ رَّحِيْمٌ .(النحل-۱۱۵)

''त्यांने तुमच्याकरिता निषिंद्ध ठरविले आहे केवळ मुरदाड, रक्त, डुकराचे मांस आणि तो (कत्तल केलेला पशू) ज्यावर अल्लाहखेरीज दुसऱ्यांचे नाव घेतले गेले असावे तथापि जो मनुष्य अगतिक व्हावा आणि ना तो याचा इच्छुक असावा व ना मर्यादेचे उल्लंघन करणारा तर अल्लाह माफ करणारा व दया करणारा आहे।''

यावरुन हेहि कळून आले की सूरह नहल सूरह अन-आमच्या आधी अवतरीत झाली होती.

२२२. म्हणजे अपराधाच्या केवळ बाह्य पैलू पासून अलिप्तता पुरेशी नाही,किंबहुना त्याच्या अंतरीक परिणामांपासूनहि अलिप्त राहणे अगत्याचे आहे.प्रत्येक प्रकारच्या गुन्ह्याबाबतही सर्वसाधारण आज्ञा आहे परंतु शब्दशैलीच्या दृष्टीने संकेत त्या गुन्ह्याकडे आहे ज्याचा वर उल्लेख झाला अर्थात ज्या जनावरांना अल्लाहने हलाल ठरविले आहे त्यांचे मांस केवळ अनेकेश्वरवादी संशयवृत्तीच्या आधारावर न खाणे, येथे ताकीद केली गेली आहे की या अनेकेश्वरवादी रिती रिवाजांना सोडा, इतकेच नव्हे तर आपल्या मन मस्तिकास देखील त्याच्या परिणामापासून स्वच्छ शुध्द करा. अनेकेश्वरवादी संशयाकडे ओढ किंवा मनावर त्याचा अस्तित्वात असलेला परिणाम हा गुन्हाच होय मग तो गुप्तावस्थेत का असेना.

२२३. जर एखाद्या जनावराला ज़बह करतांना अल्लाहचे नाव घेतले गेले नसेल तर त्या जनावराचे मांस खाणे हराम होय. या आदेशात अगदी पराकाष्ठा दर्शविली गेली आहे. आणि स्पष्ट केले गेले आहे की असे करणे म्हणजे अल्लाहची उघड अवज्ञा होय.

जनावराची कत्तल करतांना अल्लाहचे नाव घेणे अशासाठी आवश्यक ठरविले गेले आहे की आमच्या अंतर्यामी ही भावना जागृत रहावी की एखाद्या जनावराचा जीव घेणे ही काही सामान्य बाब नव्हे. हा हक्क आम्हाला अल्लाहच्याच अनुज्ञेने प्राप्त झाला आहे, जो जीवाचा निर्माण कर्ता आहे. यात कृतज्ञतेचे प्रगटीकरणहि आहे व एकेश्वरवादाच्या श्रद्धेस पोषक सामुग्रीहि तसेच याद्वारे शिर्क (अनेकेश्वरवादा) चा दरवाजाहि बंद होतो. कारण अनेकेश्वरवादी लोक जनावरांना अल्लाह खेरीजच्या उपास्यांच्या नावावर जबह करतात आणि त्यांचा बळी देतात, अर्थात ही पद्धत भक्ति-उपासने पैकीच आहे. म्हणून कुरआनने या पद्धतिस अल्लाह करिताच खास केले आहे. व या गोष्टीस ईश-भक्तिचे लक्षण ठरविले आहे.

२२४. ज्या अर्थी जनावराला जबह करताना अल्लाहचे नाव घेणे एकेश्वरवादाचे प्रतिक व त्याचे नाव न घेणे अनेकेश्वरवादाचे प्रतिक ठरले तर या बाबतीत ईमान बाळगणाकरिता कसल्याहि प्रकारची सवलत देण्याचा किंवा सहिष्णुता दर्शविण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही आणि जर ते या संदर्भात गफलत करतील तर ही एक अपराधात्मक गफलत ठरेल जर त्यांना हे माहीत असेल की जबह करताना अल्लाहचे नाव घेतले गेले नाही किंवा त्यांना हे माहीत असेल की ज्या लोकांच्या हाताचा हा जबीहा (कत्तल केलेला पशू) आहे. त्यांची अल्लाहच्या नावाने जबह करण्याची पद्धतच नाही तर जबीहाचे मांस खाण्याबाबत साहजिकच संयम पाळला पाहिजे. या बाबतीत एखाद्या मुसलमानाने ढील बाळगण्याचा अर्थ हाच की तो अशा व्यवहारात ढील बाळगत आहे ज्याची टोके अनेकेश्वर वादाला मिळाली आहेत आणि अनेकेश्वरवादाशी उदारता दर्शविणे म्हणजे स्वत:ला अनेकेश्वरवादाच्या हवाली करणे होय. म्हणू येथे सावध केले गेले आहे की जर तुम्ही सैतानांचे म्हणणे मान्य केले तर तुम्ही देखील अनेकेश्वरवादी व्हाल.

२२५. या उदाहरणात ''मृत'' शी अभिप्रेत अज्ञान व गफलतीची अवस्था होय व जिवित म्हणजे ज्ञान व अंतदृष्टि व ईश्वर-परिचयाची कैफियत आहे. प्रकाशाचा अर्थ मार्गदर्शनाचा प्रकाश व अंध:काराचा अर्थ मार्गभ्रष्टता होय.

या उदाहरणाने हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की ईमान बाळगणारे ज्यांच्या करिता इस्लामचा संदेश जीवन-दायक सिद्ध होत आहे,त्याला सोडून ते अज्ञानाच्या गोष्टी का म्हणून स्वीकारू शकतील ज्या त्यांच्या करिता मृत्यु संदेश होत.

२२६. जे लोक सत्य स्पष्ट झाल्यानंतरहि त्याला कबूल करण्यास तयार होत नाही तर अल्लाहचा हा कायदा आहे की जो ज्या गोष्टीस पसंत करतो, त्याच्या नजरेत ती गोष्ट शोभिवंत दाखवावी, दुसऱ्या शब्दात सत्याला रद्द केल्यानंतर माणसाचा स्वभाव धर्म असा बनतो की दृष्कृत्यांना तो जीवन ध्येय समजू लागतो.

२२७. जेव्हा एखाद्या वस्तीत सत्याचे आवाहन उंच होऊ लागते तेव्हा अपराधात्मक बुद्धि बाळगणारे लोक सत्य आवाहनास आपल्या लाभाविरूद्ध पाहून त्याचा विरोध करू लागतात व त्यांचे प्रमुख सत्य बाळगणाऱ्यांविरूद्ध धूर्त चाली चालू लागतात. ही वस्तुस्थिति अर्थात त्या

सवडीच्या नियमानुसार प्रकट होते जो सर्वश्रेष्ठ अल्लाहने इहलोकाकरिता निर्धारित केला आहे.

म्हणून या वस्तुस्थितीस सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशाप्रकारे वर्णिले आहे की,

''आम्ही प्रत्येक वस्तीत मोठ मोठ्या गुन्हेगारांना उभे केले आहे, अशासाठी की त्यांनी कावेबाजी माजवावी.''

२२८. अर्थात ही कृत्ये करुन ते स्वत: साठीच सर्व नाशाची सामुग्री करीत आहेत परंतु परिणामावर यांची दृष्टी नाही म्हणून त्यांना ही अनुभूति होत नाही की आपण कोणत्या दुष्परिणितीकडे जात आहोत.

**आणि ज्या दिवशी तो या सर्व लोकांना एकत्रित करील, फर्माविल हे जिन्न समूह !तुम्ही मानवांच्या मोठ्या संख्येला मार्गभ्रष्ट केले. मानवांपैकी जे त्यांच्या सोबत होते ते म्हणतील, हे आमच्या पालनकर्त्या ! आम्ही (मार्गभ्रष्टतेच्या कामात) एकमेकांचा खूप उपयोग केला आणि (शेवटी) आम्ही त्या वेळेप्रत येऊन ठेपलो जी तू आमच्याकरिता निर्धारीत केली होती. फर्माविल तुमचे ठिकाण आग आहे. ज्यात तुम्ही सदैव रहाल परंतु अल्लाह जे इच्छिल. निःसंशय तुमचा पालनकर्ता बुद्धिकौशल्य बाळगणारा व ज्ञानी आहे.*(अल-क़ुरआन)***

१२४. जेव्हा यांच्याजवळ एखादी आयत येते तर ते म्हणतात की जोपर्यंत आम्हाला तशीच गोष्ट दिली जात नाही जशी अल्लाहच्या प्रेषितांना दिली गेली, आम्ही मान्य करणार नाही अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो की प्रेषितत्वा (चे पद) कोणास प्रदान करावे.[२२९] ज्या लोकांनी अपराध केला आहे त्यांना त्यांच्या कावेबांजपणाच्या मोबदल्यात अल्लाहजवळ अपमान व सक्त शिक्षा यातनेला तोंड द्यावे लागेल.[२३०]

وإذا جاءتهم آية قالوا لن نؤمن حتى نؤتى مثل
ما أوتي رسل الله الله أعلم حيث يجعل رسالته
سيصيب الذين أجرموا صغار عند الله وعذاب
شديد بما كانوا يمكرون ﴿١٢٤﴾

१२५. अल्लाह ज्याला मार्गदर्शन करु इच्छितो त्याचे हृदय इस्लामकरिता खुले करतो [२३१] व ज्याला मार्गभ्रष्ट करु इच्छितो त्याच्या हृदयाला संकुचित व आखूड करतो. (मग त्याला असे वाटू लागते) जणू त्याला फार उंचावर चढावे लागत आहे. [२३२] तद्वतच अल्लाह त्या लोकांवर नापाकी (अस्वच्छता व अशुद्धता) टाकतो जे ईमान बाळगत नाही.[२३३]

فمن يرد الله أن يهديه يشرح صدره للإسلام
ومن يرد أن يضله يجعل صدره ضيقا حرجا كأنما
يصعد في السماء كذلك يجعل الله الرجس على الذين
لا يؤمنون ﴿١٢٥﴾

१२६. आणि हा तुमच्या पालनकर्त्याचा मार्ग आहे अगदी सरळ आम्ही आपल्या आयतींचे विवरणासह वर्णन केले आहे त्या लोकांकरिता जे मनन करतात.[२३४]

وهذا صراط ربك مستقيما قد فصلنا الآيات لقوم
يذكرون ﴿١٢٦﴾

१२७. त्यांच्याकरिता शांती-गृह आहे [२३५] त्यांच्या पालनकर्त्या जवळ आणि तो त्यांचा मित्र असेल त्यांच्या (उत्तम) आचरणामुळे.

لهم دار السلام عند ربهم وهو وليهم بما كانوا
يعملون ﴿١٢٧﴾

१२८. आणि ज्या दिवशी तो या सर्व लोकांना एकत्रित करील, फर्माविल हे जिन्न समूह ![२३६] तुम्ही मानवांच्या मोठ्या संख्येला मार्गभ्रष्ट केले. मानवांपैकी जे त्यांच्या सोबत होते ते म्हणतील, हे आमच्या पालनकर्त्या ! आम्ही (मार्गभ्रष्टतेच्या कामात) एकमेकांचा खूप उपयोग केला [२३७] आणि (शेवटी) आम्ही त्या वेळेप्रत येऊन ठेपलो जी तू आमच्याकरिता निर्धारीत केली होती.[२३८] फर्माविल तुमचे ठिकाण आग आहे. ज्यात तुम्ही सदैव रहाल परंतु अल्लाह जे इच्छिल.[२३९] निःसंशय तुमचा पालनकर्ता बुद्धिकौशल्य बाळगणारा व ज्ञानी आहे.

ويوم يحشرهم جميعا يا معشر الجن قد
استكثرتم من الإنس وقال أولياؤهم من الإنس ربنا
استمتع بعضنا ببعض وبلغنا أجلنا الذي أجلت لنا
قال النار مثواكم خالدين فيها إلا ما شاء الله إن
ربك حكيم عليم ﴿١٢٨﴾

२२९. काफ़ीरांचे म्हणणे असे होते की जर अल्लाहतर्फे प्रेषितांवर वही (ईश-संदेश) अवतरीत होते तर मग आमच्यावरहि अवतरीत झाले पाहिजे जोपर्यंत आमच्यावर सरळसरळ वही अवतरीत होत नाही. तोपर्यंत आम्ही अल्लाहच्या आयतींवर ईमान बाळगणार नाही. याचे उत्तर असे दिले गेले आहे की प्रेषितत्व ही एखादी अशी गोष्ट नाही की प्रत्येक गुणी अवगुणी व्यक्तिस प्रदान केली जावी. अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो की या प्रतिष्टेस सर्वाधिक योग्य कोण आहे आणि अशाच मनुष्याला तो या देणगीने उपकृत करतो.

अनुषंगाने यावरुन हे हि स्पष्ट होते की प्रेषितत्व ही काही अशी गोष्ट नव्हे की जिला प्राप्त करण्याचा मनुष्याने प्रयत्न करावा किंबहुना ही ईश्वरीय देणगी आहे. तो ज्याला इच्छिल प्रदान करील.

२३०. अर्थात या प्रकारच्या मागण्या करणारे गुन्हेगार आहेत, आणि त्यांना आपल्या अपराधाची शिक्षा भोगावीच लागेल.

२३१. मूळ शब्द ''छाती'' (ह्दय) खुली करण्याचा अर्थ इस्लाम हा सत्य धर्म असण्याबद्दल मनाला अशा परिपूर्ण समाधानाने उपकृत करणे की ज्यात कसल्याहि संशयाला जागा नसावी आणि मनुष्याने इस्लामला किंचितहि कां कूं न करता मान्य करावे.

२३२. अर्थात अशा लोकांना इस्लामचा मार्ग एक कठीण चढ वाटू लागतो. या कल्पनेने त्यांची छाती (हदय) संकुचित होऊ लागते व जीव कासावीस होतो.

२३३. 'नापाकी' चा अर्थ कुफ्रची नापाकी होय. अर्थ हा की त्यांच्या इमान न बाळगण्याचे खरे कारण कुफ्रची अस्वच्छता व अशुद्धता होय. जिने त्यांच्या मनमस्तिष्कास नापाक (अस्वच्छ अशुद्ध) करून ठेवले आहे यास्तव अल्लाहचा स्वच्छ शुद्ध धर्म त्याच्या हदयात प्रेवशकरीत नाही.

२३४. अर्थात इस्लामचा मार्ग अगदी सरळ आहे. यात कोणतेहि घाट-वळण नाही. आणि ही गोष्ट सप्रमाण कुरआनात मोठ्या विवरणासह वर्णिली गेली आहे. परंतु यापासून केवळ तेच लोक लाभ घेऊ शकतात जे प्रमाणांना समजून घेण्याची व स्मरणिका प्राप्त करण्याची इच्छा बाळगतात.

२३५. ''शांतीगृह'' म्हणजे ''जन्नत'' जेथे शांतीच शांती असेल व मनुष्य पूर्णत:आनंदायक जीवन व्यतीत करील ना एखादे संकट येईल ना एखादा धोका उद्‌भवेल किंबहुना प्रत्येक प्रकारच्या त्रासापासून व भयापासून मनुष्य सुरक्षित राहील.

२३६. हे जिन्न-सैतानांना सबोधून म्हटले जाईल.

२३७. बंडखोर जिन्न मार्गभ्रष्टता पसरविण्याकरिता मनुष्यांना आपला कार्यकर्ता बनवित राहिले व या कार्यासाठी त्यांनी कुविचार निर्मिती व मनोवेधक पण धोका रूप गोष्टींनी मन मस्तिष्कास आकर्षित करण्याचा मार्ग पत्करला. राहिलेत बंडखोर मनुष्य तर त्यांनी जिन्नांना ईश्वराचा सहभागी ठरवून, कुर्बानी व नजराणे प्रस्तुत करून त्यांच्या गर्वात वाढ केली. तसेच जादूटोणा व काळीविद्या या बाबतीत त्यांच्याकडे रुजू करीत राहीले आणि त्यांच्या इशऱ्यांवर लोकांना धोका देत राहिले व स्वत:चा स्वार्थ साधीत राहिले.

२३८. अर्थात कियामतीचा दिवस.

२३९. हा अपवाद अल्लाहच्या सामर्थ्यास स्पष्ट करण्याकरिता आहे की बंडखोर जिन्न व मनुष्यांना जरी नेहमीकरिता जहन्नममध्ये टाकले जाईल,तरी या संदर्भात शेवटचा शब्द अल्लाहची इच्छा हाच होय व त्याचा प्रत्येक निर्णय ज्ञान व बुद्धिकौशल्यावर आधारित असतो.

१२९. अशाप्रकारे आम्ही अत्याचारींना एकमेकांचे साथीदार बनवू त्या कमाईमुळे जी ते करीत राहीले. [२४०]

وَكَذٰلِكَ نُوَلِّيْ بَعْضَ الظّٰلِمِيْنَ بَعْضًاۢ بِمَا كَانُوْا
يَكْسِبُوْنَ ﴿۱۲۹﴾

१३०. हे जिन्न व मनुष्य समूह ! काय तुमच्याजवळ तुमच्यातूनच रसूल आले नाहीत जे [२४१] तुम्हाला माझ्या आयती ऐकवित होते, आणि या दिवसाचा सामना होण्यापासून तुम्हाला भय दाखवित होते. ते म्हणतील आम्ही आपल्या विरूद्ध स्वत:च साक्ष देतो. वस्तुत:त्यांना इहलोकीय जीवनाने भ्रमात ठेवले आणि ते आपल्याविरूद्ध साक्ष देतील की ते काफ़ीर (सत्याचा इन्कार करणारे) होते.

يٰمَعْشَرَ الْجِنِّ وَالْاِنْسِ اَلَمْ يَاْتِكُمْ رُسُلٌ مِّنْكُمْ
يَقُصُّوْنَ عَلَيْكُمْ اٰيٰتِيْ وَيُنْذِرُوْنَكُمْ لِقَآءَ يَوْمِكُمْ
هٰذَا ؕ قَالُوْا شَهِدْنَا عَلٰٓى اَنْفُسِنَا وَغَرَّتْهُمُ الْحَيٰوةُ
الدُّنْيَا وَشَهِدُوْا عَلٰٓى اَنْفُسِهِمْ اَنَّهُمْ كَانُوْا كٰفِرِيْنَ ﴿۱۳۰﴾

१३१. हे अशासाठी की तुमचा पालनकर्ता असा नव्हे की वस्त्यांना अन्यायपूर्वक नष्ट करील जेव्हा त्यातील रहिवाशी अनभिज्ञ असावेत. [२४२]

ذٰلِكَ اَنْ لَّمْ يَكُنْ رَّبُّكَ مُهْلِكَ الْقُرٰى بِظُلْمٍ وَّاَهْلُهَا
غٰفِلُوْنَ ﴿۱۳۱﴾

१३२. आणि प्रत्येकासाठी त्याच्या आचरणानुसार दर्जा आहे [२४३] आणि जे काम हे लोक करीत आहेत त्यापासून तुमचा पालनकर्ता गाफील नाही.

وَلِكُلٍّ دَرَجٰتٌ مِّمَّا عَمِلُوْا ؕ وَمَا رَبُّكَ بِغَافِلٍ
عَمَّا يَعْمَلُوْنَ ﴿۱۳۲﴾

१३३. आणि तुमचा पालनकर्ता निरपेक्ष आहे, दयाशील. त्याने इच्छिल्यास तो तुम्हाला घेऊन जाईल व तुमच्याजागी इच्छिल त्याला आणील (असे की) ज्याप्रकारे त्याने एका दुसऱ्या समूहाच्या वंशातून तुम्हाला निर्माण केले आहे. [२४४]

وَرَبُّكَ الْغَنِيُّ ذُو الرَّحْمَةِ ؕ اِنْ يَّشَاْ يُذْهِبْكُمْ
وَيَسْتَخْلِفْ مِنْۢ بَعْدِكُمْ مَّا يَشَآءُ كَمَآ اَنْشَاَكُمْ مِّنْ
ذُرِّيَّةِ قَوْمٍ اٰخَرِيْنَ ﴿۱۳۳﴾

१३४. ज्या गोष्टीचा तुमच्याशी वायदा केला जात आहे ती निश्चितच येईल [२४५] आणि तुम्ही आमच्या ताब्यातून निघून जाणारे नाहीत.

اِنَّ مَا تُوْعَدُوْنَ لَاٰتٍ ۙ وَّمَآ اَنْتُمْ بِمُعْجِزِيْنَ ﴿۱۳۴﴾

१३५. सांगा हे माझ्या जातीसमूहातील [२४६] लोकांनो ! तुम्ही आपल्या जागी कार्य करा,मी आपल्या जागी कार्य करीत आहे.लवकरच तुम्हाला कळून येईल की अंतिम परिणिती कोणाची उत्तम आहे. नि:संशय अत्याचारी कधीहि यशस्वी होणार नाहीत.

قُلْ يٰقَوْمِ اعْمَلُوْا عَلٰى مَكَانَتِكُمْ اِنِّيْ عَامِلٌ ۚ فَسَوْفَ
تَعْلَمُوْنَ ۙ مَنْ تَكُوْنُ لَهٗ عَاقِبَةُ الدَّارِ ؕ
اِنَّهٗ لَا يُفْلِحُ الظّٰلِمُوْنَ ﴿۱۳۵﴾

२४०. अर्थात हे अत्याचारी ज्या प्रकारे अत्याचारात एकमेकांचे सहभागी राहिलेत तद्वतच त्याची शिक्षा भोगण्यातहि एकमेकांचे भागीदार राहतील.

२४१. हे जिन्न व मनुष्यांच्या समाईक समूहांना उद्देश्यून म्हटले जाईल म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहचे हे फर्माविणे, काय तुमच्याजवळ तुमच्यातूनच रसूल (प्रेषित) आले नाहीत?याचा अर्थ-आणि सत्यस्थितीचे ज्ञान केवळ अल्लाहला आहे-अर्थात हे की रसूल जरी मानव वशांपैकी होते, तरी त्यांना पाठविले जाण्याचे प्रयोजन मनुष्य व जिन्न या दोघां समूहांकरिता होते.कारण जिन्न या संदर्भात मनुष्यांच्या पश्चात आहेत व याचे समर्थन कुरआनच्या अनेक आयतीमध्ये झाले आहे. उदा. जिन्नांचे हे वर्णन की 'आम्ही असा ग्रंथ ऐकला जो हजरत मूसा यांच्यानंतर अवतरीत झाला आहे' (अल-अहकाफ-२०) 'त्यांचे हज़रत सुलेमान यांच्या ताब्यात असणे (अन्-नमल-१७) त्यांचे कुरआन ऐकणे व त्यावर ईमान बाळगणे (सूरह जिन्न-१३)

कुरआन व सत्य हदीसमध्ये कोठेहि हे स्पष्टीकरण नाही की जिन्नांकडे जिन्नांमधूनच प्रेषित बनवून पाठविले गेले होते. तथापि काही भाष्यकारांनी ही गोष्ट निश्चित सांगितली आहे परंतु ही एकाकी उक्ति होय.

२४२. अर्थात पैगंबरांना पाठविले जाण्याचे प्रयोजन हे की अल्लाहचे प्रमाण लोकांकरिता कायम व्हावे व तरीदेखील ते सावरले नाहीत तर आपल्या सर्वनाशास ते स्वत: जबाबदार ठरावेत अल्लाहची ही रीत नव्हे की एखाद्या वस्तीवर आपले प्रमाण प्रस्थापित केल्याखेरीज लोक सत्यमार्गापासून अगदी अनभिज्ञ असतांना, अत्याचारपूर्वक त्यांना नष्ट करावे.

२४३. अर्थात ज्या दर्जाचे आचरण असेल चांगले वा वाईट त्याच दर्जाचे यश प्राप्त होईल.

२४४. अर्थात अल्लाह तुमचा गरजवंत आहे असे समजू नका कारण तुम्ही नसाल तर त्याच्या राज्यात काहीहि कमी होणार नाही किंबहुना तो प्रत्येक बाबतीत निरपेक्ष आहे, आणि ही त्याची कृपा होय की तुमचे आचरण चुकीचे असूनहि तुम्हाला आचरण-संधी देत आहे यासाठी की तुम्ही आपल्या आचरणात सुधारणा करावी अन्यथा तो तुम्हाला नेस्तनाबूत करून तुमच्या जागी दुसऱ्या जाती समूहांना आणू शकतो याचे उदाहरण तुमचे स्वत:चे जाती सामूहिक आस्तित्व होय की हा क्रम मानव वंशाशीच संबंधित आहे. एक समूह जातो तर दुसरा समूह त्याची जागा घेतो. म्हणून कोणीही आपल्या जाती सामूहिक आस्तीत्वाविषयी दुराभिमान बाळगू नये. उलट हे ध्यानी घ्यावे की ज्याने आम्हाला अस्तीत्वात आणले आहे त्याचा एक संकेत मात्र आम्हाला आस्तीत्वहीन करण्यास पुरेसा आहे.

२४५. अर्थात कियामतीचा दिवस जेव्हा ईश्वरासमोर सर्वांची पेशी होईल.

२४६. पैगंबर ज्या लोकांमध्ये जन्माला येतो त्यांना ''माझ्या जाती समूहातील लोकांनो'' असे संबोधितो ज्याने आपुलकी, मनुष्य सहानुभूति व हितचिंतानाचा भाव जाहीर होतो अशा प्रसंगी हे माझ्या लोकांनो हे शब्द साध्या अर्थाने वापरले जातात. म्हणून याला पारिभाषिक राष्ट्रीयत्वाच्या अर्थाने घेणे व त्यासह धार्मिक वा राजकिय दृष्टीकोनात्मक जाती समूहासंदर्भात युक्तिवाद करणे अगदी चुकीचे आहे.

१३६. यांनी अल्लाहनेच निर्मिलेल्या शेती व गुरांमध्ये अल्लाहचा एक हिस्सा निर्धारीत केला आहे व केवळ आपल्या भ्रमाच्या आधारे म्हणतात की हा अल्लाहचा आहे आणि हा आमच्या (ठरविलेल्या) सहभागींचा. मग जो हिस्सा त्यांच्या सहभागी ईश्वरां (दैवतां) चा असतो तर तो अल्लाहकडे जाऊ शकत नाही, परंतु जो अल्लाहचा असतो तो त्यांच्या सहभागी (देवतां) कडे जाऊ शकतो. किती वाईट निर्णय आहे जो हे लोक करीत आहेत ! [२४७]

وَجَعَلُوا لِلّٰهِ مِمَّا ذَرَاَ مِنَ الْحَرْثِ وَالْاَنْعَامِ نَصِيْبًا
فَقَالُوْا هٰذَا لِلّٰهِ بِزَعْمِهِمْ وَهٰذَا لِشُرَكَآئِنَا ۚ
فَمَا كَانَ لِشُرَكَآئِهِمْ فَلَا يَصِلُ اِلَى اللّٰهِ ۚ وَمَا كَانَ
لِلّٰهِ فَهُوَ يَصِلُ اِلٰى شُرَكَآئِهِمْ ۗ سَآءَ مَا يَحْكُمُوْنَ ﴿١٣٦﴾

१३७. आणि अशाचप्रकारे बहुतेक अनेकेश्वर-वाद्यांकरिता त्यांच्या (ठरविलेल्या) सहभागीनी त्यांच्या संततीच्या हत्येस सुशोभित बनविले आहे. [२४८] अशासाठी की त्यांना विनाशात टाकावे [२४९] व त्यांच्या धर्मास त्यांच्यासाठी भ्रांतिमूलक करावे [२५०] अल्लाहने इच्छिले असते तर त्यांनी असे केले नसते. तेव्हा त्यांना सोडा जेणेकरून त्यांनी खोटे रचीत रहावे.

وَكَذٰلِكَ زَيَّنَ لِكَثِيْرٍ مِّنَ الْمُشْرِكِيْنَ قَتْلَ
اَوْلَادِهِمْ شُرَكَآؤُهُمْ لِيُرْدُوْهُمْ وَلِيَلْبِسُوْا عَلَيْهِمْ
دِيْنَهُمْ ۗ وَلَوْ شَآءَ اللّٰهُ مَا فَعَلُوْهُ فَذَرْهُمْ
وَمَا يَفْتَرُوْنَ ﴿١٣٧﴾

१३८. ते म्हणतात हे शेत व ही गुरे वर्ज्य आहेत, यांना केवळ तेच लोक खाऊ शकतात ज्यांना आम्ही खाऊ द्यावे या गोष्टी त्यांनी केवळ भ्रमाने ठरविल्या आहेत [२५१] आणि काही गुरांच्या पाठी (स्वारी व ओझे लादणे) हराम ठरविल्या गेल्या आहेत. आणि काही गुरांवर ते (जबह करतांना) अल्लाहचे नाव घेत नाही. या सर्व त्यांच्या कल्पित गोष्टी आहेत ज्यांचा संबंध त्यांनी त्याच्याकडे दर्शविला आहे [२५२] लवकरच अल्लाह त्यांना या खोट्या गोष्टी रचण्याबद्दल शिक्षा देईल.

وَقَالُوْا هٰذِهٖۤ اَنْعَامٌ وَّحَرْثٌ حِجْرٌ ۖ لَّا يَطْعَمُهَاۤ اِلَّا مَنْ
نَّشَآءُ بِزَعْمِهِمْ وَاَنْعَامٌ حُرِّمَتْ ظُهُوْرُهَا وَاَنْعَامٌ
لَّا يَذْكُرُوْنَ اسْمَ اللّٰهِ عَلَيْهَا افْتِرَآءً عَلَيْهِ ۗ سَيَجْزِيْهِمْ
بِمَا كَانُوْا يَفْتَرُوْنَ ﴿١٣٨﴾

१३९. आणि म्हणतात या गुरांच्या पोटात जो (जिवंत पिलू) आहे ते खास आमच्या पुरुषांकरिता आहे आणि आमच्या स्त्रीयांसाठी हराम आहे. आणि जर ते (पिलू) मृत असेल तर यात सर्वजण सहभागी आहेत [२५३] लवकरच अल्लाह यांना या स्वरचित गोष्टींची शिक्षा देईल. निसंशय तो बुद्धिकौशल्य बाळगणारा व जाणणारा आहे. [२५४]

وَقَالُوْا مَا فِيْ بُطُوْنِ هٰذِهِ الْاَنْعَامِ خَالِصَةٌ لِّذُكُوْرِنَا
وَمُحَرَّمٌ عَلٰۤى اَزْوَاجِنَا ۚ وَاِنْ يَّكُنْ مَّيْتَةً فَهُمْ فِيْهِ
شُرَكَآءُ ۗ سَيَجْزِيْهِمْ وَصْفَهُمْ ۗ اِنَّهٗ حَكِيْمٌ عَلِيْمٌ ﴿١٣٩﴾

२४७. अनेकेश्वरवाद्यांनी धार्मिक प्रथांची जी शरीअत रचून ठेवली होती तिचा एक महत्वपूर्ण भाग म्हणजे त्यांचा तो दानधर्म जो ते ईश्वर व अन्य उपास्यांच्या (मूर्ति वगैरेच्या) नावाने करीत या उद्देश्याकरिता त्यांनी पिकपाण्यात व गुराढोरांमध्ये एक हिस्सा निश्चित केला होता. ज्याचे प्रमाण त्यांनी आपल्यातर्फेच निर्धारित करून ठेवले होते.

ईश्वराच्या हिश्श्याचे दान गोरगरीबांमध्ये वाटले जाई. राहिले अल्लाहखेरीजच्या उपास्यांच्या हिश्श्याचे दान तर ते मूर्तिंना नजराणा रूपाने सादर केले जाई मग पुजारी व पुरोहित त्यात भागीदार बनत. जर एखाद्या दुर्घटनेमुळे मूर्त्यांच्या हिश्श्यात काही कमतरता होईल तर त्याची पूर्तता ईश्वराच्या हिश्श्यातून केली जाई तथापि ईश्वराच्या हिश्श्यात कमी पडल्यास त्याची पूर्तता मूर्तिंच्या हिश्श्यातून केली. जाऊ शकत नव्हती. म्हणजे त्याच्या दृष्टीने हक्काचा अग्रक्रम मूर्त्यांचा होता, नंतर ईश्वराचा.

त्यांची ही पद्धत अनेकेश्वरवादीय होती व मूर्खपणाचीहि ईश्वराने दिलेल्या उपजिविकेत त्यांच्या स्वरचित उपास्यांचा हिस्सा कोठून आला? तसेच शरीयत घडविण्याचा अधिकार यांना कोणी दिला? आणि त्यांची ही वाटणी किती विचित्र होती !

मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांच्या अज्ञानाचा हा एक नमुना आहे इतर अनेकेश्वरवाद्यांकडेहि अज्ञानाचे असे अनेक नमुने आढळून येतिल आणि मुसलमानांमध्येहि बुजुर्गांना नजराणा भेट चढविण्याच्या नावाने जे काही होते त्यामागेहि चुकीची बुद्धी काम करीत आहे. परंतु ''बुजुर्गपूजा'' ''अवलीया पूजा'' व ''कब्रपूजा'' वर इस्लामचे सुंदर लेबल लावून या पूजा प्रकारांना मुसलमानांमध्ये प्रचलीत केले गेले आहे.

२४८. अर्थात ज्याप्रकारे सैतानांनी त्यांना या गोष्टीची प्रेरणा दिली की त्यांनी आपल्या मालमत्तेचा एक हिस्सा आपल्या उपास्यांना नजराणा चढविण्याकरिता दान करावा तद्वतच त्यांनी आपल्या उपास्यांकरिता आपल्या संततीस भेट चढवावे.

आयतीत شُرَكَاۤؤُهُمْ ''शुरकाउहुम'' (त्यांचे सहभागी) शी अभिप्रेत सैतान होत ज्यांच्या इशाऱ्यावर अनेकेश्वरवादी प्रत्येक प्रकारची अयोग्य हरकत करतात. येथपावेतो की त्यांना आपल्या मुलांची हत्या करण्यातहि संकोच वाटत नाहीं. ते त्यांच्या मनात ही धारणा उत्पन्न करतात की अमुक अमुक उपास्या (जिन्न, देवीवगैरे) च्या अपाया पासून सुरक्षित रहाण्याकरिता तुम्हाला आपल्या मुलांचा बळी द्यावा लागेल. अरब लोकांमध्ये सैतानांच्या प्रभावाखाली मुलींना जिवंतपणे गाडले जात होते. तसेच एक प्रथा ही देखील प्रचलित होती की मनुष्य नवस मानत असे की मला जर अमुक इतकी मुले बाळे झाली तर मी त्यापैकी एकाला अमुक दैवतावर भेट चढवीन.यास्तव सीरत इब्ने इसहाकमध्ये ही घटना उल्लेखित आहे की अब्दुल मुत्तलिब ने या प्रकारचा नवस 'हुबल' मूर्ति जवळ उभे राहून मानला होता आणि जेव्हा त्यांना बरीच मुले बाळे झाली तेव्हा त्यांनी अब्दुल्लाहस' जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे पिता होते भेट देण्याची इच्छा केली परंतु कुरैश लोकांनी त्यांना त्याचा 'फिदया' (प्राण्याचा मोबदला म्हणून दिले जाणारे धन) देण्यास प्रवृत्त केले. म्हणून त्यांचा जीव वाचला. (सीरतुन्नबी-इब्ने हिशाम खंड -१)

आजदेखील या प्रकारच्या घटना घडत असतात. भ्रमपूजक लोक एखाद्या जिन्न किंवा दैवताला खूश करण्याकरिता वा एखाद्या अपायापासून सुरक्षित रहाण्याकरिता अथवा एखाद्या काळ्या विद्येचा उद्देश्याने निष्पाप जीवांचा बळी घेतात. त्यांचे मन हे अघोर कृत्य करण्यास या कारणास्तव धजावते की सैतान या गोष्टीला धार्मिक स्वरूप देऊन किंवा त्यासंबंधी मनमोहक विश्लेषण करून त्यांच्या नजरेत सुशोभित करतो.

या सैतानांना सहभागी एवढ्यासाठी म्हटले गेले आहे की अनेकेश्वरवादी विकृत श्रद्धेपायी यांचे अशाप्रकारे आज्ञापालन करतात ज्याप्रकारे अल्लाहचे आज्ञापालन केले गेले पाहिजे या सैतानांच्या प्रभावान्वये ते मोठ्या अपराध करायलाहि चुकत नाही याचे उदाहरण निष्पाप कोवळ्या वयाच्या मुलांना भेट चढविणे किंवा दारिद्र-भयाने त्यांना जिवंत-स्थितीत जमीनीत गाडणे हे होय.

२४९. अपत्य-हत्येचा परिणाम याखेरीज आणखी काय असू शकतो की मनुष्य संतती सारख्या देणगीपासून वंचित व्हावा व अल्लाहच्या प्रकोपास पात्र ठरावा.

२५०. मक्केचे अनेकेश्वरवादी ज्या धर्माचे वारसदार होते. तो हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल यांचा धर्म अर्थात इस्लाम होता. परंतु सैतानांच्या कह्यात येऊन त्यांनी आपल्या धर्मात निरनिराळ्या प्रकारच्या नवीन गोष्टींची वाढ केली. परिणामत: अल्लाहचा धर्म आपल्या मूळ स्थितीत बाकी राहिला नाही, किंबहुना असत्याचे मिश्रण असलेला झाला.

२५१. अरब देशीय अनेकेश्वरवाद्यांनी काही प्रथा तर अल्लाहखेरीजच्या उपास्यांच्या नवस भेटी करिता प्रचलीत करून ठेवल्या होत्या आणि काही प्रथा अशा होत्या ज्या शंका-वृत्तिशी संबंधित होत्या. उत्पन्नाचा जो हिस्सा ते अल्लाहखेरीजच्या उपास्यांच्या नवस भेटीकरिता खास करीत त्यासंबंधी त्यांनी एक प्रणाली कायम केली होती. की त्यास कोण खाऊ शकातात. व कोण खाऊ शकत नाही. तद्वतच एक विधिनियम जनावरांचे मांस खाण्यासंबंधीचाहि होता. ज्याचे विवरण पुढील आयतीत आले आहे.ह्या केवळ व्यर्थ कल्पना होत्या ज्यांचा अल्लाहच्या धर्माशी तिळमात्र संबंध नव्हता. यावरुन ज्या तत्वावर प्रकाश

पडतो ते हे की त्या सर्व प्रथा रद्द बातल आहेत, ज्यांना धार्मिक वा शरीअतचे स्वरूप देऊन प्रचलित केले गेले असावे कारण ईश्वरीय शरीअतचा त्यांना कसलाही प्रमाणाधार नाही.

२५२.अर्थात या गोष्टी त्यांनी स्वत: रचलेल्या आहेत परंतु त्यांना धार्मिक रंग देऊन अशाप्रकारे त्यांचे पालन करविले जात आहे. की लोकांना असे वाटावे की ही अल्लाहची शरीअत होय.

२५३. काही गुरांच्या उदरातून जे पिलू जन्माला येते ते जिवंत स्थितीत जन्माला आल्यास पुरुषांकरिता हलाल होई म्हणजे ते त्याचे मांस खाऊ शकत असत. परंतु स्त्रीयांकरिता ते हराम ठरत असे आणि जर पिलू मृतावस्थेत जन्मल्यास स्त्री पुरुष दोघांकरिता ही त्यांचे भक्षण योग्य ठरत असे.

२५४. अर्थात अल्लाहच्या बुद्धि कौशल्याची ही निकड आहे की शरीअत घडविणाऱ्यांना दण्ड द्यावा आणि ज्या लोकांनी हे दु:साहस केले आहे त्यांना तो जाणतो.

**आणि गुरांमध्ये ओझे वाहणारेहि निर्माण केले व जमीनीशी लागून असलेलेहि अल्लाहने तुम्हाला जे काही प्रदान केले आहे त्यातून खा आणि सैतानाच्या पद चिन्हांचे अनुसरण करू नका कारण तो तुमचा उघड शत्रू आहे. आठ नर व मादी आहेत मेंढीच्या प्रकारातून दोन व शेळीच्या प्रकारातून दोन यांना विचारा की अल्लाहने यांचे नर हराम केले आहेत कि मादी वा ती पिले जी या मादींच्या पोटात असतील? जर तुम्ही सच्चे असाल तर मला ज्ञानाधारे तसे दाखवा.*(अल-कुरआन)***

१४०. निःसंशय ते लोक नाश पावले ज्यांनी आपल्या संततीची केवळ मूखपणाने व अज्ञानाने हत्त्या केली आणि अल्लाहने त्यांना जी उपजिविका दिली होती तिला अल्लाहशी असत्य संबंध दर्शवून हराम केले. ते मार्गभ्रष्ट झालेत व मार्गदर्शनाचा स्वीकार करणारे बनले नाहीत.

قَدْ خَسِرَ الَّذِينَ قَتَلُوا أَوْلَادَهُمْ سَفَهًا بِغَيْرِ
عِلْمٍ وَحَرَّمُوا مَا رَزَقَهُمُ اللَّهُ افْتِرَاءً عَلَى اللَّهِ ۚ قَدْ
ضَلُّوا وَمَا كَانُوا مُهْتَدِينَ ﴿١٤٠﴾

१४१. आणि तोच होय ज्याने बाग निर्माण केले ते देखील ज्यांना मांडवांवर चढविले जाते [२५५] आणि तेहि ज्यांना चढविले जात नाही.[२५६] आणि खजूर व शेती ज्यांची उत्पन्ने विविध प्रकारची असतात आणि जैतून व डाळींब एकमेकाशी मिळतीजुळती देखील व (स्वादात) वेगवेगळीहि [२५७] खा त्यांची फळे जेव्हा ती फळाला येतील व पीक कापणीच्या दिवशी त्याचा हक्क अदा करा [२५८] आणि उधळपट्टी करु नका उधळपट्टी करणाऱ्यांना [२५९] अल्लाहं पसंत करीत नाही.

وَهُوَ الَّذِي أَنْشَأَ جَنَّاتٍ مَعْرُوشَاتٍ وَغَيْرَ
مَعْرُوشَاتٍ وَالنَّخْلَ وَالزَّرْعَ مُخْتَلِفًا أُكُلُهُ
وَالزَّيْتُونَ وَالرُّمَّانَ مُتَشَابِهًا وَغَيْرَ مُتَشَابِهٍ ۚ
كُلُوا مِنْ ثَمَرِهِ إِذَا أَثْمَرَ وَآتُوا حَقَّهُ يَوْمَ
حَصَادِهِ ۖ وَلَا تُسْرِفُوا ۚ إِنَّهُ لَا يُحِبُّ الْمُسْرِفِينَ ﴿١٤١﴾

१४२. आणि गुरांमध्ये ओझे वाहणारेहि निर्माण केले व जमीनीशी लागून असलेलेहि. [२६०] अल्लाहने तुम्हाला जे काही प्रदान केले आहे त्यातून खा आणि सैतानाच्या पद चिन्हांचे अनुसरण करू नका कारण तो तुमचा उघड शत्रू आहे.

وَمِنَ الْأَنْعَامِ حَمُولَةً وَفَرْشًا ۚ كُلُوا مِمَّا رَزَقَكُمُ اللَّهُ
وَلَا تَتَّبِعُوا خُطُوَاتِ الشَّيْطَانِ ۚ إِنَّهُ لَكُمْ عَدُوٌّ مُبِينٌ ﴿١٤٢﴾

१४३. आठ नर व मादी आहेत [२६१] मेंढीच्या प्रकारातून दोन व शेळींच्या प्रकारातून दोन यांना विचारा की अल्लाहने यांचे नर हराम केले आहेत कि मादी वा ती पिले जी या मादींच्या पोटात असतील? जर तुम्ही सच्चे असाल तर मला ज्ञानाधारे तसे दाखवा.[२६२]

ثَمَانِيَةَ أَزْوَاجٍ ۖ مِنَ الضَّأْنِ اثْنَيْنِ وَمِنَ الْمَعْزِ اثْنَيْنِ ۗ
قُلْ آلذَّكَرَيْنِ حَرَّمَ أَمِ الْأُنْثَيَيْنِ
أَمَّا اشْتَمَلَتْ عَلَيْهِ أَرْحَامُ الْأُنْثَيَيْنِ ۖ نَبِّئُونِي بِعِلْمٍ
إِنْ كُنْتُمْ صَادِقِينَ ﴿١٤٣﴾

१४४. (अशाप्रकारे) उंटाच्या प्रकारातून दोन व गायीच्या प्रकारातून दोन. विचारा त्यातले नर हराम केले आहेत कि माद्या कि ती अर्भके जी या माद्यांच्या उदरात असावीत? काय तुम्ही त्यावेळी हजर होता जेव्हा अल्लाहने तुम्हाला याचा आदेश दिला होता?[२६३] मग त्या माणसाहून अधिक अत्याचारी कोण असेल जो अल्लाहकडे असत्य गोष्टीचा संबंध दर्शवील यासाठी की ज्ञानाशिवाय लोकांना मार्ग भ्रष्ट करावे. निःसंशय अल्लाह अत्याचारी लोकांना सरळमार्ग दाखवित नाही.

وَمِنَ الْإِبِلِ اثْنَيْنِ وَمِنَ الْبَقَرِ اثْنَيْنِ ۗ قُلْ آلذَّكَرَيْنِ
حَرَّمَ أَمِ الْأُنْثَيَيْنِ أَمَّا اشْتَمَلَتْ عَلَيْهِ أَرْحَامُ الْأُنْثَيَيْنِ ۖ
أَمْ كُنْتُمْ شُهَدَاءَ إِذْ وَصَّاكُمُ اللَّهُ بِهَٰذَا ۚ فَمَنْ أَظْلَمُ مِمَّنِ
افْتَرَىٰ عَلَى اللَّهِ كَذِبًا لِيُضِلَّ النَّاسَ بِغَيْرِ عِلْمٍ ۗ إِنَّ اللَّهَ لَا
يَهْدِي الْقَوْمَ الظَّالِمِينَ ﴿١٤٤﴾

२५५. अर्थात द्राक्ष वगैरे ज्यांच्या वेली मांडवांवर चढविल्या जातात.

२५६. ''ज्यांना मांडवांवर चढविले जात नाही'' याचा अर्थ जाडजुड वृक्षेहि होत व ती रोपे देखील जी जमीनीवर पसरतात उदा. काकडी, तरबूज इत्यादि.

२५७. याद्वारे ज्या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधण्याचा उद्देश आहे ती ही की मानवाकरिता जमीनीवर जे ''दस्तरखान'' (भोजन थाली) बिछविले गेले आहे त्यात अनेक प्रकारच्या खाद्य वस्तु आहेत. ज्या केवळ मानवाची मूल भूत गरज पूर्ण करीत नाही तर त्याच्या आवडी निवडी भागविण्याचे कामहि करतात अन्यथा जिवंत राहण्यासाठी केवळ भाकरी पुरेशी होती. परंतु मानवाला जी उच्च अभिरूची प्रदान केली गेली आहे तद्नुषंगाने प्रत्येक प्रकारची फळे देखील निर्माण केली गेली. ही सर्व सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या ईशत्वाची व त्याच्या कृपेची देणगी होय, यासाठी की मानवाने त्याच्याशी कृतज्ञ व्हावे, परंतु मानवाचा मामला मोठा विचित्र होय. कारण तो अल्लाहने प्रदान केलेल्या देणग्यांचा लाभ तर घेतो परंतु कृतघ्न बनतो अथवा कृतज्ञता व्यक्त करतो तर अल्लाहशी नव्हे तर अल्लाहखेरीजच्या उपास्यांशी यास्तव उत्पन्नाचा एक हिस्सा तो आपल्या कल्पित दैवतांकरिता खास करून ठेवतो या उद्देश्याने की अमुक एक धनद्रव्य लक्ष्मी देवीने, प्रदान केलेले आहे व अमुक एक सम्पत्ति दुसऱ्या एका देवीने म्हणून त्यांची कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता हा दानधर्म केला जावा. याच्याशी मिळते जुळते उदाहरण अहले बिदअत म्हणजे धर्मात नवनवीन प्रथा, रीतीरिवाज प्रचलीत करणाऱ्यांचे होय. ते आपल्या पीर, वली व बुजुर्गांकरिता नवस-नजराणे करतात व स्पष्टीकरण असे करतात की यांच्यामुळेच आम्हाला या देणग्या लाभल्या. या प्रकारे दोन्ही वर्गांचे सामाईक वैशिष्ट हे होय की यांना ज्या देणग्या लाभल्या आहेत. त्यांना ते सरळ सरळ अल्लाहने प्रदान केलेल्या समजत नाही व प्रत्यक्षत: अल्लाहशी कृतज्ञता दर्शवित नाही. ते माध्यम आणि वसील्याच्या भोवऱ्यात अशाप्रकारे राहतात की त्यांची कृतज्ञता केवळ यांच्यापर्यंतच पोहचते, अल्लाहपावेतो पोहचत नाही.

२५८. येथे एक गोष्ट मनावर बिंबविण्याचा उद्देश आहे ती ही की, मानवाने हे गृहीत धरणे अगदी चुकीचे आहे की ईश्वराच्या या देणग्यांपासून लाभ घेण्याचा हक्क तर मला पोहचतो परंतु यात ईश्वराचा कसलाहि हक्क नाही की जो अदा करण्याची जबाबदारी मला लागू पडत असावी. या सर्व देणग्या ईश्वराने परीक्षा घेण्याच्या हेतुने मानवाला प्रदान केल्या आहेत व यात आपला हक्क निर्धारीत केला आहे, या हेतुने की कोण त्याचा हक्क अदा करुन त्यच्याशी कृतज्ञ असण्याचा पुरावा देतो व कोण त्यच्याशी बेपर्वा होऊन कुफ्रनिती अंगिकारतो हे पाहिले जावे.

शेतीचे उत्पन्न व फळफळावळ यात अल्लाहचा हक्क किती आहे याचे विवरण हदीसमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी वर्णिले आहे. येथे अल्लाहचा हक्क अदा करण्याचा संक्षिप्त आदेश दिला गेला आहे. ज्यायोगे सर्वप्रथम मानवाला ही जाणीव व्हावी की अल्लाहचा हक्क अदा करावयाचा आहे. यानंतर तत्संबंधीच्या विवरणाकरिता तो शरीअतकडे रूजू करु शकतो.

ही सूरह मक्की (मक्केत अवतरलेली) आहे. ज्यात अल्लाहचा हक्क अदा करण्याचा आदेश दिला गेला आहे. ज्यावरून हे स्पष्ट झाले  की उत्पन्न व फळफळावळ यात ज़कात अदा करण्याविषयीचा आदेश मक्केतच अवतरला होता. यावरुन हे दिसून येते की ज़कातला इस्लामने किती उच्च स्थान दिले आहे.

आयतीत शेती व फळफळावळीचा उल्लेख आला आहे व सोबतच हा आदेश दिला गेला आहे. की पीक ज्या दिवशी कापले जाईल त्या दिवशी त्याचा हक्क अदा करा. यावरुन शरीअतचा नियम स्पष्ट झाला की प्रत्येक प्रकारच्या अन्न-धान्यामध्ये व प्रत्येक प्रकारच्या फळ व मेव्यांमध्ये अल्लाहचा हक्क आहे. या हक्काचे स्पष्टीकरण पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अशाप्रकारे फर्माविले आहे.

فيما سقت السماء والعيون او كان عثريا العُشر و فيما سقى بالنضح نصف العشر (بخارى)

''जिला पावसाने वा झऱ्यांनी तृप्त केले असेल किंवा जी महापूर इत्यादिच्या पाण्याने तृप्त झालेली असेल, तिच्यात दहावा व जिला पाणी पुरवण्याद्वारे तृप्त केले गेले असेल तिच्यात वीसांवा (हिस्सा) होय.'' (बुखारी)

हदीस मधील मूळ शब्द ''उश्र'' याचा अर्थ उत्पन्नाचा दहावा हिस्सा (दहा प्रतिशत) व ''निस्फउश्र'' म्हणजे बीसावा हिस्सा (पाच प्रतिशत) जकात म्हणून द्यावा लागेल.

दुसरा एक नियम स्पष्ट झाला तो हा की शेतीचे उत्पन्न व फळफळादिंची ज़कात पीक कापणी झाल्यावर बंधनकारक ठरते. वर्षाकाठी जेवढी पीके घेतली जातील. त्यातल्या प्रत्येक पीकामागे ज़कात द्यावी लागेल.

आणि तिसरा नियम हा की पीक कापणी नंतर विनाविलंब ज़कात अदा केली गेली पाहिजे.

२५९. उधळपट्टीचा अर्थ खर्च करण्यात मध्यम मार्गाचे मर्यादोल्लंघन करणे होय. जो मनुष्य वारेमापखर्च करतो तो आपला छंदच पूर्ण करु शकत नाही तर ईश्वराच्या दासांचे हक्काधिकार कोठून अदा करील.

२६०. गुरांमध्ये काही उंच काठीचे आहेत जे वाहनाकरिता

व ओझे लादण्याकरिता उपयोगी पडतात उदा. उंट, बैल इत्यादि आणि काही गुरे अगदी ठेंगणी आहेत जणू ती जमीनीला लागून चालतात. उदा. शेळी मेंढी ज्यांचे मांस दूध इत्यादिंचा मनुष्य लाभ घेतो.

२६१. ज्या जनावरांना मांस व दूध प्राप्त करण्याहेतुने पाळले जाते आणि ज्यांना अरब-वासी अनआम (गुरे) म्हणत ते चार प्रकारचे होत. मेंढी, शेळी, उंट व गाय. म्हशीचा समावेशहि गायीच्या वर्गात होतो परंतु अरब देशात ती आढळून येत नव्हती.

या चार पाळीव पशूंचे नरमादा एकंदर आठ झालेत ज्यांना अरबवासी हलाल तर मानीत परंतु अनेकेश्ववादी भ्रमाच्या आधारे काही परिस्थितीत त्यांनाहि निषिद्धतेचा आदेश लागू करत, उदा. काही गुरांच्या पोटी जर अर्भक जिवंत स्थितीत जन्माला येईल तर ते पुरुषांकरिता हलाल परंतु स्त्रीयांकरिता त्याचा मांसाहार हराम ठरत असे. आणि अर्भक मृतावस्थेत जन्मल्यास स्त्री पुरुष दोघानाहि खाण्यास योग्य असे. तद्वतच त्यांच्या दृष्टीने काही जनावरांचे दूध व काहींचा वाहन-प्रयोग निषिद्ध होता (पहा सूरह मायदा आयत-१०३ टीप क्र. २४९) येथे त्यांच्या या भ्रम-वृत्तिची वस्तुस्थिती स्पष्ट केली जात आहे.

२६२. अर्थात केवळ कल्पनाधारावर एखाद्या वस्तूला हराम समजणे योग्य नाही कारण एखाद्या वस्तूला हराम समजण्याचा अर्थ हा आहे की अल्लाहने ती हराम ठरविली आहे. आणि केवळ कल्पनेच्या आधारे एखाद्या गोष्टीचा अल्लाहकडे संबंध दर्शविणे अगदी असत्य कथन होय. अल्लाहकडे केवळ अशाच गोष्टीचा निर्देश केला जाऊ शकतो जिचा ज्ञानाधार असेल अर्थात हा ज्ञानाधार फक्त ईश-आदेश असू शकतो म्हणून जर हजरत इब्राहीम यांच्या शिकवणीत या गोष्टीकडे संकेत केला जाऊ शकत असेल किंवा पूर्वीच्या ईश-ग्रंथामध्ये याविषयीचा एखादा आदेश उपलब्ध असेल या अटींवर की तो सप्रमाण असावा तर प्रस्तूत करा.

ज्ञानविषयक पुरावा सादर करण्याची ही जी मागणी कुरआनने केली आहे ती केवळ अरब वासीयांकडेच नव्हे तर त्या समस्त जाती समूहांकडे आहे ज्या आपल्या इच्छा आभिलाषांच्या आधारे किंवा अनेकेश्वरवादी भ्रमांच्या आधारे काही गुरांचे मांस हराम ठरवितात उदा. गाईचे मांस किंवा तत्सम मांसालाच हराम समजतात मग ते कोणत्याहि पशू वा पक्षीचे मांस असो.

२६३. म्हणजे शेवटी तुम्हाला हे माहित कसे झाले की अमुक प्रकारची सांडणी किंवा अमुक प्रकारची गाय अथवा त्यांची अनुभव प्रकारची अर्भके अल्लाहने तुमच्याकरिता हराम ठरविली आहेत? पूर्वीच्या शरीअतमध्ये तुम्ही तसा उल्लेख दर्शवू शकत नाही मग काय ईश्वराने हा प्रत्यक्षत: आदेश दिला होता व तुम्ही तो स्वत: आपल्या कानांनी ऐकला होता. आणि मग जर या दोन्ही गोष्टी खऱ्या नाहीत तर त्या वस्तूंना निषिद्ध-आदेश लागू करण्याचा अर्थ याशिवाय आणखी काय आहे की तुम्ही रितीरिवाजांची एक शरीअत रचली आहे जिचा खोटे बोलून ईश्वराकडे संबंध दर्शवित आहात.

**सांगा जो ईश आदेश मजवर अवतरीत केला गेला आहे त्यात मला अशी कोणतीही वस्तू आढळून येत नाही जी एखाद्या खाण्याऱ्याकरिता जी तो खाईल, हराम असावी तथापि हे की ती मुरदाड असेल किंवा वाहविलेले रक्त असेल किंवा डुकराचे मांस असेल की ते नापाक (अशुद्ध) होय अथवा गुन्हा असेल की अल्लाह शिवाय अन्य कोणाचे नाव त्यावर घेतले गेले असेल मग जो मनुष्य (ते खाण्यास) अगतिक व्हावा व ना तो या गोष्टीचा इच्छुक असावा व ना मर्यादेचे उल्लंघन करणारा तर निःसंशय तुमचा पालनकर्ता माफ करणारा दया करणारा आहे.***(अल-क़ुरआन)*

قُل لَّآ أَجِدُ فِى مَآ أُوحِىَ إِلَىَّ مُحَرَّمًا عَلَىٰ طَاعِمٍ يَطْعَمُهُۥٓ
إِلَّآ أَن يَكُونَ مَيْتَةً أَوْ دَمًا مَّسْفُوحًا أَوْ لَحْمَ
خِنزِيرٍ فَإِنَّهُۥ رِجْسٌ أَوْ فِسْقًا أُهِلَّ لِغَيْرِ ٱللَّهِ بِهِۦ ۚ فَمَنِ
ٱضْطُرَّ غَيْرَ بَاغٍ وَلَا عَادٍ فَإِنَّ رَبَّكَ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿١٤٥﴾

**१४५.** सांगा जो ईश आदेश मजवर अवतरीत केला गेला आहे त्यात मला अशी कोणतीही वस्तू आढळून येत नाही जी एखाद्या खाणाऱ्याकरिता जी तो खाईल, हराम असावी तथापि हे की ती मुरदाड असेल किंवा वाहविलेले रक्त असेल किंवा डुकराचे मांस असेल की ते नापाक (अशुद्ध) होय अथवा गुन्हा असेल की अल्लाह शिवाय अन्य कोणाचे नाव त्यावर घेतले गेले असेल [२६४] मग जो मनुष्य (ते खाण्यास) अगतिक व्हावा व ना तो या गोष्टीचा इच्छुक असावा व ना मर्यादेचे उल्लंघन करणारा तर निःसंशय तुमचा पालनकर्ता माफ करणारा दया करणारा आहे.[२६५]

وَعَلَى ٱلَّذِينَ هَادُوا۟ حَرَّمْنَا كُلَّ ذِى ظُفُرٍ ۖ وَمِنَ ٱلْبَقَرِ
وَٱلْغَنَمِ حَرَّمْنَا عَلَيْهِمْ شُحُومَهُمَآ إِلَّا مَا حَمَلَتْ
ظُهُورُهُمَآ أَوِ ٱلْحَوَايَآ أَوْ مَا ٱخْتَلَطَ بِعَظْمٍ ۚ
ذَٰلِكَ جَزَيْنَٰهُم بِبَغْيِهِمْ ۖ وَإِنَّا لَصَٰدِقُونَ ﴿١٤٦﴾

**१४६.** आणि आम्ही त्या लोकांकरिता जे यहुदी झाले समस्त नखधारी जनावरे हराम केली होती आणि गाय व बकरी ची चरबीदेखील, मात्र त्याशिवाय जी त्यांच्या पाठीला वा आतडींना लागून असावी किंवा एखाद्या हाडाशी मिळालेली असावी. ही त्यांच्या बंडखोरीची शिक्षा होती जी आम्ही त्यांना दिली होती [२६६] आणि निःसंशय आम्ही खरे आहोत. [२६७]

فَإِن كَذَّبُوكَ فَقُل رَّبُّكُمْ ذُو رَحْمَةٍ وَٰسِعَةٍ وَلَا يُرَدُّ
بَأْسُهُۥ عَنِ ٱلْقَوْمِ ٱلْمُجْرِمِينَ ﴿١٤٧﴾

**१४७.** मग जर हे लोक तुम्हाला खोटे ठरवतील तर सांगा की तुमचा पालनकर्ता व्यापक दया बाळगणारा आहे [२६८] परंतु त्याची शिक्षा अपराधी लोकांवरून टाळली जाऊ शकत नाही.

سَيَقُولُ ٱلَّذِينَ أَشْرَكُوا۟ لَوْ شَآءَ ٱللَّهُ مَآ أَشْرَكْنَا وَلَآ
ءَابَآؤُنَا وَلَا حَرَّمْنَا مِن شَىْءٍ ۚ كَذَٰلِكَ كَذَّبَ ٱلَّذِينَ
مِن قَبْلِهِمْ حَتَّىٰ ذَاقُوا۟ بَأْسَنَا ۗ قُلْ هَلْ عِندَكُم
مِّنْ عِلْمٍ فَتُخْرِجُوهُ لَنَآ ۖ إِن تَتَّبِعُونَ إِلَّا ٱلظَّنَّ وَإِنْ
أَنتُمْ إِلَّا تَخْرُصُونَ ﴿١٤٨﴾

**१४८.** हे अनेकेश्वरवादी म्हणतील की जर अल्लाहने इच्छिले असते तर ना आम्ही शिर्क केले असते ना आमच्या वाडवडीलांनी व ना आम्ही एखाद्या वस्तूला हराम ठरविले असते. अशाप्रकारे त्या लोकांनीहि खोटे ठरविले होते जे त्यांच्या पूर्वी होऊन गेले आहेत. येथपावेतो की त्यांनी आमच्या शिक्षेची गोडी चाखली, सांगा तुमच्याजवळ एखादे ज्ञान आहे [२६९] की ज्यास आमच्या समोर प्रस्तुत करू शकाल ? तुम्ही तर केवळ अनुमानावर चालत आहात [२७०] आणि अटकळीच्या गोष्टी करीत आहात.

२६४. आयतीचा अर्थ समजण्याकरिता हा आयत क्रम समोर ठेवणे आवश्यक आहे जो वरून चालत आला आहे. वाद गुरांच्या हलाल व हराम असण्यासंबंधी उत्पन्न झाला होता. अरबवासी या गुरांचे मांस ज्यांचा उल्लेख वर आयत १४३ व १४४ मध्ये आला,खाद्य म्हणून प्रयोगात आणीत परंतु काही स्थितीत केवळ भ्रामक कल्पनांच्या आधारे त्यांनी या गुरांचे मांस हराम ठरविले होते. त्यासोबतच काही निषिद्ध वस्तूंना त्यांनी हलाल ठरविले होते, त्या म्हणजे मुरदाड, वाहिलेले रक्त, डुकरांचे मांस व अल्लाहखेरीजच्या उपास्यांच्या नावे केलेले बलीदान. येथे याच विवादात्मक वस्तूंसंबंधी फर्माविले गेले आहे की पैगंबरावर जे आदेश अवतरित झाले आहेत त्यात तुम्ही हराम ठरविलेल्या वस्तूंपैकी कोणतीहि वसतू हराम नाही, मात्र या चार वस्तूशिवाय म्हणजे मुरदाड इत्यादि, म्हणून आयतीचा हा अर्थ घेणे योग्य ठरणार नाही की इस्लाममध्ये या चार गोष्टींच्या व्यतिरिक्त कोणतीहि वस्तू हराम नाही. कुरआनने दुसऱ्या जागी ही तात्विक बाब स्पष्टत: फर्माविली आहे की

وَيُحِلُّ لَهُمُ الطَّيِّبٰتِ وَيُحَرِّمُ عَلَيْهِمُ الْخَبٰٓئِثَ (الاعراف:١٥٧)

''हा पैगंबर त्यांच्या करिता स्वच्छशुद्ध वस्तूना हलाल ठरवितो आणि अस्वच्छ अशुद्ध वस्तू त्यांच्याकरिता हराम ठरवितो'' (अल अअराफ-१५७)

आणि हदीसमध्ये याचे विवरण वर्णिले गेले आहे उदा. सही मुस्लिम' या हदीस संग्रहात उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले.

كلّ ذى نابٍ من السباع فأكله حرامٌ

''कोणत्याहि तीक्षणदंती श्वापदाचे मांस खाणे हराम होय''

نهٰى رسول الله ﷺ عن كلّ ذى ناب من السباع وعن كل ذى مخلبٍ من الطير۔ (صحيح مسلم كتاب الصيد والذبائح)

''पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी प्रत्येक तीक्षण दंती श्वापद व प्रत्येक पंजा असलेल्या पक्षी (चे मांस खाण्या) विषयी मनाई केली आहे'' (सहीह् मुस्लिम किताबुस सैद)

कुरआन अवतरणाच्या काळी हा वाद निर्माण झाला नव्हता की श्वापदाचे मास खाणे कसे काय आहे किंवा उंदिर साप विंचू व कृमिकिटक मनुष्य खाऊ शकतो किंवा नाही कारण मनुष्य स्वभाव या वस्तूंना मलिनतेचा नियम लागू करतो आणि स्वभाव सामान्यत: या वस्तू खाणे तिरस्करणीय समजतो. आणि मग यांच्यापैकी कोणतीहि वस्तू अशी नव्ही जिचा बळी मूर्तिच्या पुढे दिला जात असावा म्हणून या प्राण्यांच्या निषिद्धतेचा आदेश एवढ्या इतमामाने वर्णन करण्याची गरज नव्हती जेवढ्या इतमामाने रक्त व अल्लाहखेरीजच्या उपास्याकरिता दिल्या जाणाऱ्या बळीसारख्या गोष्टींची निषिद्धता वर्णन करणे आवश्यक होते आणि याच कारणास्तव कुरआनने या चार गोष्टींची निषिद्धता ज्यांचा उल्लेख या आयतीत आला आहे मोठ्या तीव्रतेने वर्णन केली आहे तसेच अनेक सूरतींमध्ये याची पुनरावृत्ति केली अशासाठी की लोकांची बौद्धिक व आचरण विषयक सुधारणा व्हावी.

राहीलेत इतर मलीन पशू तर त्यांची निषिद्धता वर्णन करण्याचे काम पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर सोपविले गेले आहे. अर्थात हे सूरह अअराफ ची आयत१५७

وَيُحَرِّمُ عَلَيْهِمُ الْخَبٰٓئِثَ

''(हा पैगंबर यांच्याकरिता मलीन वस्तुंना हराम करतो) वरून स्पष्ट होते यास्तव निषिद्धतेचे विवरण आम्हाला सप्रमाण हदीसद्वारे मिळते.''

२६५. याची तसेच मुरदाड इत्यादिचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. २०९ ते २१४ मध्ये आले आहे

२६६. जनावरांच्या निषद्धते संबंधी कुरआनने चार बाबींना अपवाद ठरवून इतर सर्व गुरांना जे हलाल ठरविले तर याचा संकेत या गोष्टीकडे होता की इब्राहीमच्या शरीअतीत जातीसमूहात हयाच चार बाबी हराम होत्या यात जो काही फेरफार झाला आहे तो अरब अनेकेश्वरवाद्यांनी स्वत:केलेला होय. ईश्वराच्या शरीअतशी याचा काहीहि संबंध नाही.कुरआनाच्या या निवेदनाने हा प्रश्न निर्माण होऊ शकला असता की जर पूर्वीपासूनच या चार बाबी हराम ठरत आल्या तर मग ग्रंथ बाळगणाऱ्या यहुद्यांकरिता कशाप्रकारे अन्य बाबी हराम ठरल्या?याचे उत्तर या आयतीत दिले गेले आहे की चार बाबीव्यतिरिक्त यहुदींकरिता अन्य काही बाबीदेखील निश्चितच हराम केल्या गेल्या होत्या परंतु यासाठी नव्हे की त्या बाबी मूलत: अशुद्ध होत्या. किंबहुना त्या स्वच्छ शुद्ध होत्या परंतु त्यांच्या बंडखोरीमुळे शिक्षा म्हणून त्यांच्याकरिता शरीअत सक्त केली गेली होती. हा एक तात्पुरता आदेश होता जो त्यांच्या दुषित मनोवृत्तास अनुसरून दिला गेला होता. ज्याप्रमाणे एक वैद्य रोगाचे प्राबल्य ध्यानी घेऊन रोगी इसमाला चांगल्या अन्नापासूनहि पथ्य बाळगायला सांगतो. म्हणून आता ज्याअर्थी कुरआनच्या स्वरूपात एक सदैवकालीन शरीअतचे अवतरण होत आहे तर यात त्या सर्व तात्पुरता बंधनांना सम्पुष्टात आणले गेले आहे यास्तव यात समस्त स्वच्छ शुद्ध वस्तू हलाल आहेत आणि केवळ मलीन (घाणेरड्या) वस्तूच हराम आहेत.

यहुदींना ज्याप्रमाणे या आयतीत स्पष्ट केले गेले आहे, दोन स्वच्छशुद्ध वस्तू हराम केल्या गेल्या होत्या. एक प्रत्येक प्रकारची नखे असलेली जनावरे मग ते पशू वर्गातील असोत वा पक्षी आणि दुसरी गाय व बकरीची चरबी, अर्थात पाठ, आतडी व हाडाला लागून असलेली चरबी वगळता. कारण याखेरीजची चरबी सहजपणे अलग केली जाऊ शकत नव्हती.

या आयतीवरून हेहि दिसून येते की या दोन गोष्टींना बनी इस्राईलवर अशावेळी हराम केले गेले जेव्हा त्यांनी बंडखोरी करून यहुदीयत्व पत्करले अन्यथा त्यापूर्वी या गोष्टी त्यांच्यकरिता हराम नव्हत्या.

२६७. हा संकेत या गोष्टीकडे आहे की जर याहून भिन्न एखादी गोष्ट आजच्या तौरातमध्ये आढळून येते तर चुकीची आहे व तिचा संबंध अल्लाहशी जोडणे सर्वथा अनुचित होय.

२६८. यासाठी तुमच्या अपराधी हरकती नंतरहि तुमच्यावर तत्क्षणी शिक्षा अवतरीत करत नाही, किंबहुना तुम्हाला सुधारणेची संधी देत आहे.

२६९. एखाद्या वस्तूला हराम ठरविण्याचा अर्थ हा निघतो की अल्लाहला ती गोष्ट पसंत नाही म्हणून त्याने मनाई केली आहे. जर एखादा मनुष्य वा एखादा जातीसमूह एखाद्या गोष्टीबाबत अशी श्रद्धा बाळगतो की ती हराम आहे तर त्याने सिद्ध करावे की त्याला आधार काय आहे. म्हणजे अल्लाहने या गोष्टीला हराम ठरविले हे आपणाला कसे ज्ञात झाले ते सप्रमाणात दर्शविले पाहिजे.आणि जर त्याचीच सनद वा प्रमाणे उपलब्ध नाही तर मग ही संशयखोरी किंवा अंधारात बाण मारणे नव्हे तर आणखी काय आहे? ईश्वराबाबत एखादी गोष्ट ज्ञानाधारेच सांगितली जाऊ शकते. अन्यथा अत्यंत बेजबाबदारपणाची गोष्ट ठरेल.

२७०. म्हणजे तुमची श्रद्धा-तत्वे ज्ञानावर आधारित नाहीत किंबहुना निव्वळ मनोकल्पना होत कारण ईश्वरेच्छा जाणून घेण्याचे तुमच्याजवळ कोणतेहि साधन नाही.

**यांना सांगा आपल्या साक्षींना आणा ज्यांनी या गोष्टीची साक्ष द्यावी की अल्लाहने या वस्तूंना हराम ठरविले आहे. मग जर ते साक्ष देतील तर तुम्ही त्यांच्या सोबत साक्ष देऊ नका आणि त्या लोकांच्या इच्छा अभिलाषांचे अनुसरण करू नका ज्यांनी आमच्या आयतींना खोटे ठरविले आहे जे आखिरतवर ईमान बाळगत नाही आणि आपल्या पालनकर्त्याचा समकक्ष ठरवितात.** *(अल-क़ुरआन)*

१४९. सांगा हृदयात उतरणारे प्रमाण तर फक्त अल्लाहच्या जवळ आहे. जर त्याने इच्छिले असते तर सर्वानाच त्याने मार्गदर्शन केले असते.[२७१]

قُلْ فَلِلّٰهِ الْحُجَّةُ الْبَالِغَةُ ۚ فَلَوْ شَاءَ لَهَدٰىكُمْ أَجْمَعِينَ ﴿١٤٩﴾

१५०. यांना सांगा आपल्या साक्षींना आणा ज्यांनी या गोष्टीची साक्ष द्यावी की अल्लाहने या वस्तूंना हराम ठरविले आहे. मग जर ते साक्ष देतील तर तुम्ही त्यांच्या सोबत साक्ष देऊ नका [२७२] आणि त्या लोकांच्या इच्छा अभिलाषांचे अनुसरण करू नका ज्यांनी आमच्या आयतींना खोटे ठरविले आहे जे आखिरतवर ईमान बाळगत नाही आणि आपल्या पालनकर्त्याचा समकक्ष ठरवितात.

قُلْ هَلُمَّ شُهَدَاءَكُمُ الَّذِينَ يَشْهَدُونَ أَنَّ اللّٰهَ حَرَّمَ هٰذَا ۖ فَإِنْ شَهِدُوا فَلَا تَشْهَدْ مَعَهُمْ ۚ وَلَا تَتَّبِعْ أَهْوَاءَ الَّذِينَ كَذَّبُوا بِآيَاتِنَا وَالَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ بِالْآخِرَةِ وَهُمْ بِرَبِّهِمْ يَعْدِلُونَ ﴿١٥٠﴾

१५१. सांगा, या मी तुम्हाला ऐकवू की तुमच्या पालन कर्त्याने तुमच्याकरिता कोणकोणत्या गोष्टी हराम केल्या आहेत.[२७३] हे की कोणत्याही वस्तूस त्याचा सहभागी ठरवू नका [२७४] मातापित्याशी चांगली वागणूक ठेवा [२७५] आपल्या संततीची दारिद्र्यामुळे हत्या करू नका. आम्ही तुम्हालाहि उपजिविका देतो व त्यांना देखील देऊ [२७६] निर्लज्जतेच्या गोष्टींजवळहि जाऊ नका मग त्या उघड असोत वा गुप्त [२७७] आणि कोणत्यहि जीवाची, ज्याला अल्लाहने हराम ठरविले आहे. हत्या करू नका तथापि हे की सत्य कारणास्तव ठार करणे भाग पडावे [२७८] या आहेत त्या गोष्टी ज्यांची त्याने तुम्हाला आज्ञा केली आहे यासाठी की तुम्ही बुद्धीने काम घ्यावे. [२७९]

قُلْ تَعَالَوْا أَتْلُ مَا حَرَّمَ رَبُّكُمْ عَلَيْكُمْ ۖ أَلَّا تُشْرِكُوا بِهِ شَيْئًا ۖ وَبِالْوَالِدَيْنِ إِحْسَانًا ۖ وَلَا تَقْتُلُوا أَوْلَادَكُمْ مِنْ إِمْلَاقٍ ۖ نَحْنُ نَرْزُقُكُمْ وَإِيَّاهُمْ ۖ وَلَا تَقْرَبُوا الْفَوَاحِشَ مَا ظَهَرَ مِنْهَا وَمَا بَطَنَ ۖ وَلَا تَقْتُلُوا النَّفْسَ الَّتِي حَرَّمَ اللّٰهُ إِلَّا بِالْحَقِّ ۚ ذٰلِكُمْ وَصّٰىكُمْ بِهِ لَعَلَّكُمْ تَعْقِلُونَ ﴿١٥١﴾

१५२. आणि अनाथाच्या सम्पत्ति जवळहि जाऊ नका, परंतु योग्य रित्या, येथपावेतो की ते आपल्या तारुण्यावस्थेस पाहोचावेत,[२८०] आणि माप-तोल न्यायासह पूरेपूर करा,[२८१] आम्ही कोणावरहि त्याच्या शक्ति पलीकडे जबाबदारी टाकत नाही, [२८२] आणि जेव्हा बोलाल तेव्हा न्याय्य बोला मग (तुमचा) एखाद्या नातेवाईक का असेना[२८३] आणि अल्लाहची प्रतिज्ञा पूर्ण करा. या गोष्टी आहेत ज्यांची अल्लाहने तुम्हाला आज्ञा केली आहे अशासाठी की तुम्ही बोध प्राप्त करावा.[२८४]

وَلَا تَقْرَبُوا مَالَ الْيَتِيمِ إِلَّا بِالَّتِي هِيَ أَحْسَنُ حَتّٰى يَبْلُغَ أَشُدَّهُ ۖ وَأَوْفُوا الْكَيْلَ وَالْمِيزَانَ بِالْقِسْطِ ۖ لَا نُكَلِّفُ نَفْسًا إِلَّا وُسْعَهَا ۖ وَإِذَا قُلْتُمْ فَاعْدِلُوا وَلَوْ كَانَ ذَا قُرْبٰى ۖ وَبِعَهْدِ اللّٰهِ أَوْفُوا ۚ ذٰلِكُمْ وَصّٰىكُمْ بِهِ لَعَلَّكُمْ تَذَكَّرُونَ ﴿١٥٢﴾

२७१. अर्थात ईश्वराने जर इच्छिले असते तर सर्वांनाच त्याने सन्मार्ग दर्शविला असता परंतु त्याच्या इच्छेने हा निर्णय घेतला नाही किंबहुना त्याने मनुष्याला ही संधी दिली की त्याने मार्गदर्शन व मार्गभ्रष्टता दोघांपैकी जो वाटेल तो मार्ग पत्करावा. आणि मार्गदर्शनाचा मार्ग स्पष्ट करण्याकरिता त्याने असे प्रमाण अवतरीत केले आहे जे मनात उतरणारे आहे. या प्रमाणाच्या तुलनेने तुमचे हे प्रमाण की जर अल्लाहने इच्छिले असते तर आम्ही शिर्क केले नसते आणि या प्रकारची तुमची अन्य प्रमाणे अगदी निरर्थक, प्रभावशून्य व परिणामहीन आहेत.

२७२. अर्थात साक्ष ज्ञानाच्या आधारे दिली गेली पाहिजे जर हे लोक या जबाबदारीला समजत नाही व खोटी साक्ष देण्यास प्रवृत्त होतील तर तुम्ही त्यांच्या साक्षीचे समर्थन करू नका, कारण अल्लाहच्या प्रमाणाच्या तुलनेने त्यांची साक्ष व्यर्थ व खोटी आहे. खरे पाहता यांच्याकडे साक्ष एवढ्याकरिता मागितली गेली आहे की त्यांनी आत्मपरिक्षण करावे व त्याना याची कल्पना व्हावी की केवढ्या धारिष्ट्याने हा दावा करीत आहेत की ईश्वराने अमुक अमुक वस्तूला हराम ठरविले आहे, वस्तुत: याचा कसलाहि पुरावा त्यांच्याजवळ उपलब्ध नाही.

२७३. अर्थात अटकळ गोष्टींवर चालण्या ऐवजी व रीतीरिवाजांच्या बंधनात अडकून राहण्याऐवजी त्या बंधनाचा स्वीकार करा ज्यांचा आदेश खरोखरच अल्लाहने दिला आहे व ते आदेश अल्लाहतर्फे असण्याबाबत कुरआनाची साक्ष पुरेशी आहे. बंधने केवळ खानपानाच्या बाबींवरच नाही तर यांचा संबंध संपूर्ण वैचारीक व कृतिशील जीवनाशी आहे यासाठी की मानवाच्या विचारांत शुचिर्भूतता व स्वच्छता निर्माण व्हावी व एक नियमबद्ध साफसुथरे जीवनजगणे त्याला शक्य व्हावे.

येथे जे आदेश दिले गेले आहेत ते मुसलमानांना उद्देशून नव्हे तर अनेकेश्वरवाद्यांना उद्देशून दिले गेले आहेत म्हणून यावर अंमलबजावणी करण्याची मागणी पत्येक माणसाकडे आहे की त्याने आपल्या पालनकर्त्याच्या या आदेशांना कबूल करून त्याचा आज्ञाधारक दास बनावे.

२७४. म्हणजे हराम (अवैध) गोष्टीत सर्वप्रथम हराम गोष्ट शिर्क आहे ज्यावरून या गुन्ह्याची तीव्रता किती आहे याची कल्पना होऊ शकते.

शिर्क'च्या स्पष्टीकरण्यासाठी पहा सूरह निसा टीप क्र. १११

२७५. मातापित्यांशी सद्व्यवहार करण्याचा आदेश ईश्वरेच्छेच्या शैलीत दिला गेला आहे यासाठी की प्रभावी व्हावा. यावरून ही गोष्ट आपोआप स्पष्ट होईल की मातापित्यांशी दुर्व्यवहार हराम होय.

२७६. संतती हत्त्येचे एक स्वरूप अरब लोकांमध्ये असे होते की गरीबीमुळे ते आपल्या मुलांना ठार करीत. त्यांची अशी धारणा होती की आम्ही आपल्या मुलांच्या उपजिविकेस जबाबदार आहोत, वस्तुत: पित्याची पात्रता याहून अधिक नाही की तो आपल्या मुलांचा पालक असतो, अन्नदाता नव्हे. अन्नदाता तर केवळ अल्लाह आहे. राहिली सुसंपन्ना किंवा दारिद्ग्र तर ते देखील त्याच्याच आधिकारात आहे आणि दोन्हीहि स्थितीत मनुष्याची कसोटी होते.

अल्लाह अन्नदाता आहे याविषयी ज्यांना विश्वास बसत नाही ते मुलांच्या जन्माने गांगरून जातात व मग त्यांची संख्या मर्यादित करण्याकरिता चुकीचे मार्ग पत्करू लागतात. वस्तुस्थिती ही आहे की मूल केवळ पोट घेऊन जगात येत नाही तर दोन हात व दोन पाय घेऊनहि जन्माला येतो यास्तव आम्ही हे पाहतो की लोकसंख्येत होणाऱ्या वृद्धि बरोबरच उपजिविकेच्या साधनांमध्येहि वृद्धि होत आहे. काय हा अल्लाह अन्नदाता असण्याचा डोळस पुरावा नव्हे?

२७७. निर्लज्जतेच्या गोष्टींमध्ये व्यभिचार, कुकर्म, नग्न आणि अश्लिल चित्रे किंवा चित्रपट पहाणे, प्रेमचाळे करणे, शारीरिक आकर्षण निर्माण करणारी गाणी गाणे, किंवा ऐकणे, स्त्रीयांचे नृत्य आणि अश्लीलता यासारख्या सर्व गोष्टी सामील आहेत. आणि या सर्वांमध्ये व्यभिचार प्रथम दर्जाची निर्लज्जता आहे.

निर्लज्जतेच्या गोष्टी करण्याबाबतच मनाई केली गेली नाही किंबहुना त्यांच्या जवळपासहि जाण्यास प्रतिबंध घातला गेला आहे. म्हणजे त्यांना चालना देणाऱ्या गोष्टी व त्याकडे उद्युक्त करणाऱ्या वस्तुंपासूनहि अलिप्त राहिले पाहिजे. व याबाबतीत इतके सावध असले पाहिजे की या अपराधपासून केवळ बाह्यांगच नव्हे तर अंतरंगदेखील स्वच्छ शुद्ध असले पाहिजे. आपल्या आत्म्यावर इतके मजबूत नियंत्रण ठेवले पाहिजे की कुविचारांना थारा मिळता कामा नये, व निर्लज्जतेच्या कल्पनेपासून मनाला गोडी वाटू नये. निर्लज्जतेचा हाच गुप्त पैलू होय ज्याबाबत या आयतीत सचेत केले गेले आहे.

इमाम राजी यांनी या आयतीच्या विवरण संदर्भात मोठी महत्वपूर्ण गोष्ट वर्णन केली आहे. ते म्हणतात :

''मनुष्य जेव्हा बाह्यत: अपराधापासून अलिप्त राहतो परंतु अंतर्यामाने राहत नाही तेव्हा याचा अर्थ हा की त्याचे हे अलिप्त राहणे अल्लाहचे दास्यत्व व आज्ञापालन करण्याच्या हेतुने नसते किंबहुना तो यासाठी अलिप्त राहतो की त्याला लोकांकडून अपमानित होण्याचे भय असते आणि ही गोष्ट खोटी आहे कारण ज्याच्या दृष्टीने लोकांनी प्रताडीत करणे अल्लाहच्या शिक्षेहून मोठे असावे त्याच्या बाबतीत तर कुफ्रचे भय होय. परंतु जो मनुष्य दुराचाराचा बाह्यात: देखील त्याग

करतो व अंतर्यामानेहि त्याग करतो तर तो या गोष्टीचे प्रमाण प्रस्तुत करतो की त्याने या अपराधास केवळ अल्लाहच्या आज्ञापालनार्थ, त्याच्या शिक्षेचे भय बाळगून व त्याच्या ईशत्वास प्रवृत्त होऊन त्यागले आहे.

(अत्तफसीरुल कबीर -राजी खं. १३ पा. २३३)

२७८. म्हणजे प्रत्येक मानव-जीव आदरणीय आहे. एखाद्यास केवळ त्याच स्थितीत ठार केले जाऊ शकते जेव्हा शरीअतने तसा हक्क दिला असेल.

२७९. अर्थात जर तुम्ही बुद्धीने काम घ्याल तर तुम्हाला हे आदेश अगदी योग्य दिसून येतील व तुमच्या लक्षात येईल की हे मनुष्य जीवनाकरिता सर्वोत्कृष्ट आदेश आहेत.

२८०. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह निसा टीप क्र. १७

२८१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अल-मूतफ्फिफीन टीप क्र.१

२८२. ही एक महत्वपूर्ण व तात्विक बाब होय जी येथे वर्णिली गेली आहे जिचा संबंध माप तोलाशीहि आहे व इतर सर्व जबाबदारींशीहि मापतोल व्यवहारात जी जबाबदारी टाकली गेली आहे ती अशी की मनुष्याने मापे व तराजू यथायोग्य वापरावी व मापतोल करतांना किंचितहि कमी करू नये या उपरान्त जर अजाणतेपणी एखादी भूलचूक झाल्यास त्यावर कसलीहि पकड होणार नाही. हाच नियम-इतर जबाबदारींबाबतहि आहे. तो असा की मनुष्याने शक्यतो आपल्या जबाबदारींना उचितरित्या पार पाडण्याचा प्रयत्न करावा, व तरीहि काही कमी राहिल्यास त्याची विचारपूस होणार नाही. दुसऱ्या शब्दात कोणत्याही जबाबदारीच्या पार पाडण्यासंबंधी मनुष्याच्या आवाक्यात जे काही आहे ते व त्याच्या इराद्याला पाहिले जाईल. हा एक मार्गदर्शक नियम आहे ज्यावरून आजच्या परिस्थितीत अर्थात इस्लामेतर समाज व इस्लामेतर व्यवस्थापनाने इस्लामचे अनुसरण करणाऱ्यांच्या मार्गात पावलो पावली अडथळे उभे केले आहेत आणि मानव-निर्मित कायद्यांची बंधने शरीअत-आदेशांच्या पालनात अडसर बनत आहेत. तेव्हा हे मार्गदर्शन लाभते की जर मनुष्य इमानदारीने अल्लाहच्या आदेशांचे पालन करण्याचा प्रयत्न करील तर जेथपर्यंत खरी लाचारी असेल तेथपर्यंत अल्लाहकडून पकड होणार नाही. कारण प्रत्येक मनुष्य आपल्या सामर्थ्यानुसार कार्य करण्यास जबाबदार आहे.

२८३. म्हणजे मुखातून जे काही बोल निघतील ते सत्य व न्याय असावेत. मग संबंध एखाद्या नातेवाईकाशी का असेना त्या स्थितीतहि कसलाहि पक्षपात व विशेष सवलतीने काम न घेता न्यायावर आधारीत असेल तीच गोष्ट बोलावी.

२८४. म्हणजे हा धडा काही नवीन धडा नाही. मनुष्य स्वभाव या धड्याशी अगदी पहिल्यापासून परिचित आहे. आणि प्रेषितांच्या शिकवणीत या गोष्टी तर मूलभूत तत्वांच्या रूपाने सामील राहिल्या आहेत. यास्तव कुरआनाचे हे आदेश म्हणजे दिलेल्या धड्याचीच उजळणी होय.

**आणि हे की हाच माझा मार्ग आहे, अगदी सरळ म्हणून याचेच अनुसरण करा आणि अन्य मार्गावर चालू नका की ज्यायोगे तुम्हाला त्याच्या मार्गापासून दूर करून विखुरलेल्या स्थितीत टाकतील. या आहेत त्या गोष्टी ज्यांची ताकीद त्याने तुम्हाला केली आहे अशासाठी की तुम्ही ईश-भय अंगिकारावे.** *(अल-क़ुरआन)*

१५३. आणि हे की हाच माझा मार्ग आहे, अगदी सरळ म्हणून याचेच अनुसरण करा आणि अन्य मार्गावर चालू नका की ज्यायोगे तुम्हाला त्याच्या मार्गापासून दूर करून विखुरलेल्या स्थितीत टाकतील. [२८५] या आहेत त्या गोष्टी ज्यांची ताकीद त्याने तुम्हाला केली आहे अशासाठी की तुम्ही ईश- भय अंगिकारावे. [२८६]

وَاَنَّ هٰذَا صِرَاطِيْ مُسْتَقِيْمًا فَاتَّبِعُوْهُ ۚ وَلَا تَتَّبِعُوا السُّبُلَ
فَتَفَرَّقَ بِكُمْ عَنْ سَبِيْلِهٖ ؕ ذٰلِكُمْ وَصّٰىكُمْ بِهٖ لَعَلَّكُمْ تَتَّقُوْنَ ﴿۱۵۳﴾

१५४. मग आम्ही मूसाला ग्रंथ प्रदान केला होता [२८७] जो सदाचरण अंगिकारणाऱ्याच्या हक्कात देणगीची पूर्णता होती व ज्यात प्रत्येक गोष्ट उघड उघड वर्णन केली गेली होती [२८८] व जो परिपूर्ण मार्गदर्शन व दया होती, अशासाठी की लोकांनी आपल्या पालनकर्त्याच्या भेटीविषयी ईमान बाळगावे.

ثُمَّ اٰتَيْنَا مُوْسَى الْكِتٰبَ تَمَامًا عَلَى الَّذِيْٓ اَحْسَنَ وَتَفْصِيْلًا
لِّكُلِّ شَيْءٍ وَّهُدًى وَّرَحْمَةً لَّعَلَّهُمْ بِلِقَآءِ رَبِّهِمْ يُؤْمِنُوْنَ ﴿۱۵۴﴾

१५५. आणि (आता) आम्ही हा ग्रंथ अवतरीत केला आहे समृद्धशाली [२८९] यास्तव याचे अनुसरण करा आणि अल्लाहचे भय बाळगा यासाठी की तुमच्यावर दया केली जावी.

وَهٰذَا كِتٰبٌ اَنْزَلْنٰهُ مُبٰرَكٌ فَاتَّبِعُوْهُ وَاتَّقُوْا لَعَلَّكُمْ
تُرْحَمُوْنَ ﴿۱۵۵﴾

१५६. (आणि हा ग्रंथ एवढ्यासाठी अवतरीत केला आहे) ज्यायोगे तुम्ही असे न म्हणावे की ग्रंथ तर आमच्या पूर्वीच्या दोन समूहांवर अवतरीत केला गेला होता [२९०] आणि ते जे काही शिकत शिकवीत होते त्यापासून आम्ही अगदी अनभिज्ञ होतो. [२९१]

اَنْ تَقُوْلُوْٓا اِنَّمَآ اُنْزِلَ الْكِتٰبُ عَلٰى طَآئِفَتَيْنِ مِنْ قَبْلِنَا ۪
وَاِنْ كُنَّا عَنْ دِرَاسَتِهِمْ لَغٰفِلِيْنَ ﴿۱۵۶﴾

१५७. किंवा असे न म्हणावे की जर आमच्यावर ग्रंथ अवतरीत केला गेला असता तर आम्ही त्यांच्याहून अधिक मार्गदर्शन लाभलेले झालो असतो. तर पहा, तुमच्याजवळ तुमच्या पालनकर्त्याकडून खुले प्रमाण, व मार्गदर्शन व दया आली आहे. मग त्या माणसाहून अधिक अत्याचारी कोण असेल जो अल्लाहच्या आयतींना खोटे ठरवील व त्यांच्याकडून तोंड फिरवील. जे लोक आमच्या आयतींशी पराड मुख होतील त्यांना लवकरच आम्ही या पराड मुखतेच्या बदल्यात अत्यंत निकृष्ट शिक्षा देऊ.

اَوْ تَقُوْلُوْا لَوْ اَنَّآ اُنْزِلَ عَلَيْنَا الْكِتٰبُ
لَكُنَّآ اَهْدٰى مِنْهُمْ ۚ فَقَدْ جَآءَكُمْ بَيِّنَةٌ مِّنْ رَّبِّكُمْ
وَهُدًى وَّرَحْمَةٌ ۚ فَمَنْ اَظْلَمُ مِمَّنْ كَذَّبَ بِاٰيٰتِ اللّٰهِ
وَصَدَفَ عَنْهَا ؕ سَنَجْزِي الَّذِيْنَ يَصْدِفُوْنَ عَنْ اٰيٰتِنَا سُوْٓءَ
الْعَذَابِ بِمَا كَانُوْا يَصْدِفُوْنَ ﴿۱۵۷﴾

२८५. सरळ मार्गाचा अर्थ ''इस्लाम धर्म'' होय जो अल्लाहच्या दास्यत्वाचा खरा मार्ग आहे. व ज्यावर चालण्याचे आवाहन पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) देत आहेत आणि अन्य मार्गांशी अभिप्रेत अल्लाहच्या दास्यत्वाकडे पाठ फिरविणारे मार्ग होत. मग तो मार्ग धर्माचा असो वा धर्मविहीनतेचा किंवा कुफ्र मार्ग असो वा नास्तिकतेचा. इस्लामऐवजी जो मार्ग देखील अंगिकारला जाईल तो ईश-मार्ग नसेल आणि खऱ्या राजमार्गापासून हटण्याचा अपरिहार्य परिणाम विखुरणे हा होय. यास्तव आम्ही असे पाहतो की इस्लामच्या मार्गावर चालण्यास इन्कार करून मानवजातीचा काफीला अगदी अस्ताव्यस्त झाला आहे आणि अगणित पंथ अस्तित्वात आले आहेत. म्हणून मानवजातीला विखरून टाकणारे हेच ''जातीयवादी लोक'' होत. इस्लामचे सच्चे पाईक नव्हेत. कारण खऱ्या मानव-काफील्यापासून जो सुरवाती पासूनच इस्लामच्या राजमार्गावर होता विभक्त होणारे व आपला वेगळा पंथ बनविणारे लोक ते होत ज्यांनी नवनवीन मार्ग निर्माण केले. (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. ३०९)

२८६. ईश-भयाचा मार्ग हा होय की मनुष्याने त्या गोष्टीपासून अलिप्त रहावे ज्यांची या आयतीत मनाई केली गेली आहे. व त्या गोष्टी आचरणात आणाव्यात ज्यांच्यावर आचरण करण्याची ताकीद केली गेली आहे.

वर जे आदेश वर्णिले गेले ते एकून दहा आहेत व त्यांची योग्यता भूलभूत आदेशांची आहे ज्यांचे पालन पत्करल्याशिवाय कोणताहि मनुष्य संयमी (ईश-भीरू) बनू शकत नाही.

बनी इस्राईलला देखील दहा आदेश (Ten-Commandments) दिले गेले होते. ज्यांचे वर्णन तौरात' मध्ये पुढीलप्रमाणे आले आहे:-

माझ्याखेरीज तुला वेगळे देव नसावेत आपल्यासाठी कोरीव मूर्ती करू नको......... त्यांच्या पाया पडू नको किंवा त्यांची सेवा करू नको...... तुझा देव परमेश्वर ह्याचे नाव व्यर्थ घेऊ नको.... शब्बाथ दिवसाची आठवण ठेवून तो पवित्रपणे पाळ...आपल्या बापाचा व आपल्या आईचा मान राख.... खून करु नको.... व्यभिचार करू नको..... चोरी करू नको..... अपल्या शेजाऱ्याविरूद्ध खोटी साक्ष देऊ नको.' (निर्गम-२०) यातल्या बहुतेक गोष्टी दोघांमध्ये सामाईक आहेत परंतु कुरआनाचे आदेश अधिक सर्वांगपूर्ण आहेत.

२८७. अर्थात माणसाकरिता हलाल काय आहे व हराम काय आहे हे जाणून घेण्याचे योग्य साधन ईश्वरी आदेशच होय. आणि या ईश-आदेशाद्वारे आम्ही नेहमी मानवाचे मार्गदर्शन करीत राहिलो आहेत.यास्तव हजरत इब्राहीम यांच्या शरीअतीद्वारे आम्ही मानवाचे मार्गदर्शन केले होते आणि हजरत मूसा यांना तर एक विवरणात्मक ग्रंथ प्रदान केला होता ज्यात स-स्पष्टीकरण धर्माच्या सर्व बाबींचे वर्णन केले गेले होते. म्हणून ही कल्पना करणे योग्य नाही की हलाल व हराम संदर्भात मानवाच्या मार्गदर्शनाचा कोणताही उपाय अल्लाहतर्फे योजला गेला नव्हता किंवा योजला गेला नाही.

२८८. म्हणजे धर्म व शरीअत संबंधीच्या सर्व गोष्टी स्पष्टता: सादर केल्या गेल्या होत्या.

२८९. याचे स्पष्टीकरण टीप क्र. १६३ मध्ये आले आहे.

२९०. दोन समूहांशी अभिप्रेत यहूदी व ख्रिश्चन होत. कुरआन अवतरण प्रसंगी हेच दोन समूह असे होते जे ईश ग्रंथ बाळगणारे होते म्हणून त्यांनाच ग्रंथ-धारी म्हटले गेले आहे. राहिलेत जगातील इतर धार्मिक समूह तर त्यांच्याजवळ धर्म ग्रंथ राहिले असोत वा नसोत ईश ग्रंथाचा कोणताही अंश त्यांच्याजवळ नव्हता म्हणून त्यांच्या कोणताही ग्रंथाला ईश-ग्रंथ ठरविले गेले नाही. उदा. अग्निपूजक (पारशी) ज्यांच्याजवळ धार्मिक-ग्रंथ होते आणि अरब लोक जे आपल्या धर्माचा हजरत इब्राहीमकडे निर्देश करीत परंतु यांच्यापैकी कोणाचाहि समावेश ग्रंथधारी लोकांमध्ये केला गेला नाही.

२९१. अर्थात कुरआनाच्या अवतरणाने ही सबब लोप पावली गेली आहे आणि केवळ अरबांचीच सबब नाहीशी केली गेली नाही तर इतर जातीसमूहांनाहि सबब पुढे करण्याची संधी बाकी राहिली नाही कारण या ग्रंथाला सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशी प्रसिद्धी प्रदान केली व त्याच्या संदेशास विश्वातील जातीसमूहापर्यंत पोहचविण्याची अशी व्यवस्था केली की जगातील कोणताहि जातीसमूह यापासून अपरिचित नाही आणि अशी साधने निर्माण केलीत की ज्या जातीसमूहाचे लोक या ग्रंथाला समजून घेऊ इच्छितील ते सहजगत्या समजू शकतील.

१५८. काय या लोकांना या गोष्टीची प्रतीक्षा आहे की फिरिश्त्यांनी त्यांच्यासमोर यावे किंवा तुमच्या पालनकर्त्याने स्वत: यावे किंवा तुमच्या पालनकर्त्याची काही चिन्हे प्रकट व्हावीत. [२९२] ज्यादिवशी तुमच्या पालनकर्त्याची काही चिन्हे प्रकट होतील तर एखाद्या अशा माणसाकरिता त्याचे ईमान बाळगणे काहीहि लाभप्रद होणार नाही ज्याने आधी ईमान बाळगले नसेल किंवा ज्याने आपल्या ईमानामध्ये नेकी कमविली नसेल. [२९३] सांगा तुम्ही वाट पहा आम्हीहि वाट पाहतो.

هَلْ يَنْظُرُوْنَ اِلَّآ اَنْ تَاْتِيَهُمُ الْمَلٰٓئِكَةُ اَوْ يَاْتِيَ رَبُّكَ اَوْ يَاْتِيَ
بَعْضُ اٰيٰتِ رَبِّكَ ؕ يَوْمَ يَاْتِيْ بَعْضُ اٰيٰتِ رَبِّكَ لَا يَنْفَعُ نَفْسًا
اِيْمَانُهَا لَمْ تَكُنْ اٰمَنَتْ مِنْ قَبْلُ اَوْ كَسَبَتْ فِيْۤ اِيْمَانِهَا خَيْرًا ؕ قُلِ
انْتَظِرُوْۤا اِنَّا مُنْتَظِرُوْنَ ﴿۱۵۸﴾

१५९. ज्या लोकांनी [२९४] आपल्या धर्मात वेगवेगळे मार्ग काढलेत व समूहांमध्ये विभागले गेले त्यांच्याशी तुमचा कसलाहि संबंध नाही [२९५] त्यांचा मामला अल्लाहच्याच हवाली आहे मग तो त्यांना दाखविल की ते काय करीत राहिलेत.[२९६]

اِنَّ الَّذِيْنَ فَرَّقُوْا دِيْنَهُمْ وَكَانُوْا شِيَعًا لَّسْتَ مِنْهُمْ فِيْ شَيْءٍ ؕ
اِنَّمَآ اَمْرُهُمْ اِلَى اللّٰهِ ثُمَّ يُنَبِّئُهُمْ بِمَا كَانُوْا يَفْعَلُوْنَ ﴿۱۵۹﴾

१६०. जो नेकी (सत्कर्म) घेऊन येईल त्याच्याकरिता दहापट मोबदला आहे व जो दुष्कर्म घेऊन येईल त्याला त्याच प्रमाणात मोबदला दिला जाईल आणि लोकांशी अन्याय केला जाणार नाही.[२९७]

مَنْ جَآءَ بِالْحَسَنَةِ فَلَهٗ عَشْرُ اَمْثَالِهَا ۚ وَمَنْ جَآءَ بِالسَّيِّئَةِ
فَلَا يُجْزٰۤى اِلَّا مِثْلَهَا وَهُمْ لَا يُظْلَمُوْنَ ﴿۱۶۰﴾

१६१. सांगा माझ्या पालन कर्त्याने मला सरळ मार्ग दाखविला आहे. अगदी खरा धर्म [२९८] इब्राहीमचा मार्ग जो सदाचारी होता व अनेकेश्वर वाद्यांपैकी मुळीच नव्हता. [२९९]

قُلْ اِنَّنِيْ هَدٰىنِيْ رَبِّيْۤ اِلٰى صِرَاطٍ مُّسْتَقِيْمٍ ۚ دِيْنًا قِيَمًا مِّلَّةَ
اِبْرٰهِيْمَ حَنِيْفًا ۚ وَمَا كَانَ مِنَ الْمُشْرِكِيْنَ ﴿۱۶۱﴾

१६२. सांगा, माझी नमाज़, माझी क़ुर्बानी माझे जगणे व माझे मरणे (सर्व काही) अल्लाह करिता आहे जो विश्वाचा रब्ब' (पालनकर्ता) आहे.[३००]

قُلْ اِنَّ صَلَاتِيْ وَنُسُكِيْ وَمَحْيَايَ وَمَمَاتِيْ لِلّٰهِ
رَبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿۱۶۲﴾

१६३. त्याचा कोणी सहभागी नाही. मला याचा आदेश दिला गेला आहे. आणि मी सर्वप्रथम मुस्लिम आहे .[३०१]

لَا شَرِيْكَ لَهٗ ۚ وَبِذٰلِكَ اُمِرْتُ وَاَنَا اَوَّلُ الْمُسْلِمِيْنَ ﴿۱۶۳﴾

२९२. अर्थात अशी चिन्हे जी अपरोक्षातील वस्तुस्थितीवरून पडदा हटवतील व मनुष्य आपल्या नेत्रांनी त्यांचे अवलोकन करील.

२९३. अर्थात ज्यादिवशी ईश्वराची ती विशिष्ट चिंन्हे प्रकट होतील जी अपरोक्ष-वस्तुस्थितीना अनावरीत करणारी असतील तर कसोटीची संधी बाकी राहणार नाही मग ना एखाद्या काफीराचे ईमान बाळगणे विश्वासार्ह ठरेल व ना एखाद्या अशा माणसाचे ईमान त्याला लाभदायक ठरेल जो ईमानाचा दावेदार तर होता पण त्याच्या आचरणात ईमानाचा कोणताही प्रभाव प्रकट झाला नाही.

क़ुरआनमध्ये दुसऱ्या जागी फर्माविले गेले आहे की ज्या जातीसमूहांवर अल्लाहचा प्रकोप उतरला त्यांनी अल्लाहच्या शिक्षेस पाहून घेतल्यानंतर ईमान बाळगले होते. परंतु त्यावेळी त्यांचे ते ईमान बाळगणे लाभ शून्य होते. (सूरह मोमीन आयत ८४-८५)

हदीसमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या आयतीच्या संदर्भाने सावध केले आहे की क़ियामत जवळ येऊन ठेपल्यावर सूर्य पश्चिमेकडून उगवेल आणि अशा उघड व जबरदस्त निशाणीला पाहून कोणाचेहि ईमान बाळगणे त्याच्याकरिता लाभदायक ठरणार नाही. यास्तव ''बुखारी'' या हदीस संग्रहात उल्लेखित आहे की, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले:

لاَ تَقُوْمُ السَّاعَةُ حَتّٰى تَطْلُعَ الشَّمْسُ مِنْ مَغْرِبِهَا ، فَاِذَا طَلَعَتْ فَرَآهَا النَّاسُ آمَنُوْا اَجْمَعُوْنَ فَذٰلِكَ حِيْنَ لاَ يَنْفَعُ نَفْسًا اِيْمَانُهَا ـ (بخاری کتاب الرقاق)

''क़ियामत उद्‌भवणार नाही, जोपर्यंत सूर्यपश्चिमेकडून उदयाला येत नाही. जेव्हा सूर्य पश्चिमेकडून उदयाला येईल व लोक पाहतील तर सर्व ईमान बाळगतील परंतु त्यावेळी कोणाचेहि ईमान बाळगणे त्याच्याकरिता लाभदायक ठरणार नाही.'' (बुखारी किताबुर रिक़ाक़)

२९४. सूरहच्या आरंभापासून अनेकेश्वरवाद्यांशी जो वाद चालत आला होता तो येथे काही तात्विक बाबींचे वर्णन करून संपविला गेला आहे.या तात्विक बाबी धर्माच्या राजमार्गला दृगोचर करतात व यावरून स्पष्ट होते की धर्म काय आहे व काय नाही.

२९५. अर्थात अल्लाहतर्फे माणसाच्या मार्गदर्शनाकरिता जो धर्म अवतरला होता तो म्हणजे निखालस, तोहीदचा (एकेश्वरवादाचा मार्ग होता परंतु लोकांनी आपल्या या धर्मात वेगवेगळ्या व नवनवीन मार्ग काढले ज्याचा परिणाम असा झाला की ते समूहांमध्ये विभागले गेले यहुदीमत असो, ख्रिश्चनमत असो, अरबांचा अनेकेश्वरवादी धर्म असो किंवा एखाद्या देश व एखाद्या जाती समूहाचा अन्य एखादा धर्म सर्वांची हकीगत अशी की धर्म बाळगणाऱ्यांनी ईश-धर्माचा राजमार्ग सोडून वेगवेगळ्या पाऊलवाटा काढल्या, त्यामुळे इबादत (उपासनेची) जागा ''बिदअत'' (नवनवीन रूढ्यांनी) व ईश्वरी शरीअतची जागा स्वयंरचित शरीअतने घेतली. येथपावेतो की एक ईश्वराच्या जागी अनेक ईश्वर बसविले गेले आता विविध धर्मांच्या नावाने जी जातीयता आढळून येते त्यांच्यापैकी कोणाचाहि मार्ग सत्यामार्ग नाही म्हणून अल्लाहचा रसूल (प्रेषित) या सर्व मार्गांपासून अगदी विभक्त आहे. आणि सत्यमार्गावर चालू इच्छिणाऱ्या प्रत्येक मनुष्याने या सर्व धर्मांपासून व जातीयते पासून विभक्त झाले पाहिजे.

२९६. अर्थात पैगंबरांचे काम सत्यमार्ग स्पष्ट दाखविणे हे होय. तरीदेखील जर अन्यधर्मीय आपल्या सांप्रदायिकते पासून माघार घेत नाही तर त्यांना त्यांच्या दशेवर सोडा. त्यांचा मामला अल्लाहच्या हवाली आहे. ते कियामतीच्या दिवशी आपली परिणिती पाहतील.

२९७. म्हणजे कियामतीच्या दिवशी प्रत्येक मनुष्याला आपल्या पाप पुण्याचा मोबदला मिळेल आणि या मोबदल्याचा नियम हा असेल की नेकी (पुण्या) च्या मोबदला कमीतकमी दहा पटीनी, मात्र पापाचा बदला पापाच्या प्रमाणात आणि यावरून हे स्पष्ट करण्याचा उद्देश आहे की मोबदला व शिक्षेबाबत अन्याय तर कोणावरहि केला जाणार नाही तथापि पुण्याचा नजराणा घेऊन येणाऱ्यांची सर्वश्रेष्ठ अल्लाह अशाप्रकारे कदर वाढवील की त्यांना प्रत्येक सत्कर्माचा कमीतकमी दहा पट मोबदला मिळेल.

स्पष्ट असावे की सत्कर्म तेच खरे ठरेल जे अल्लाहला एकमेव ईश्वर मानून त्याची प्रसन्नता प्राप्त करण्याच्या हेतुने केले गेले असेल.

२९८. अर्थात जो धर्म हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर अवतरीत केला गेला आहे. तो खऱ्या अर्थाने अल्लाहचा धर्म आहे. हा धर्म प्रत्येक प्रकारच्या वक्रतेपासून शुद्ध आहे. यहुदी, ख्रिश्चन व अनेकेश्वरवाद्यांनी अल्लाहच्या धर्माचे जे स्वरूप बिघाडले होते, तो त्या बिघाडापासून स्वच्छ शुद्ध करून त्याच्या मूळ स्वरूपात सादर केला गेला आहे. आता त्याचे स्वरूप पाहूनच ओळखले जाऊ शकते की हाच तो खरा धर्म.

२९९. येथे संकेत ह्या गोष्टीकडे आहे की अरब अनेकेश्वरवादी आपल्या धर्माचा संबंध हज़रत इब्राहीमशी जोडतात परंतु हजरत इब्राहीम अनेकेश्वरवादी कदापि नव्हते

किंबहुना हनीफ म्हणजे एक अल्लाहला मानणारे व सरळरित्या अल्लाहच्या धर्मावर चालणारे होते आणि हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा धर्म देखील तोच दीने तौहिद (एकेश्वरवादी धर्म) होय जो हजरत इब्राहीम यांचा धर्म होता.

स्पष्ट असावे की हज़रत इब्राहीम हे केवळ अरबांचेच नेते नव्हते किंबहुना समस्त विश्वाचे नेते होते. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना लोकांचा इमाम बनविले होते म्हणून त्यांचा धर्म त्यांचा अनुयायींद्वारे विविध देशात व विविध जाती समूहापर्यंत पोहचला होता. ही गोष्ट वेगळी की या जाती समूहांनी नंतर नवनवीन प्रथा निर्माण करून इब्राहीमी धर्माला बिघडविले व त्याचे एक नवीन नाव ठेवले.

३००. स्पष्ट झाले की हा धर्म दोनरंगी व पाचरंगी नाही किंबहुना एकरंगी असण्यास मानतो. फक्त ईश-भक्ति चा रंग जो संपूर्ण जीवनावर चढलेला असावा. उपासना जी अत्यंत उच्च भावना आहे ती केवळ अल्लाहकरिता असावी. जीवन अल्लाहच्या आदेशांनुसार व्यतीत केले जावे व हेच ध्येय कल्पून जीवन कंठावे व प्राणीची बाजी लावावी तर त्याच्याच मार्गात व त्याच्याच खातीर धर्म पालन केवळ परंपरेनुसार नव्हे तर याच ध्येयाने व याच भावनेने केले जावे.

३०१. म्हणजे कोणी त्याच्या आदेशाला मानो वा ना मानो व त्याच्या धर्माला कबूल करो वा ना करो मी सर्वप्रथम त्याच्या आदेशास मानले आहे व त्याचा धर्म इस्लामला सर्वप्रथम कबूल करणारा (मुस्लिम) मी होय.

**सांगा, काय मी अल्लाह शिवाय एखादा अन्य पालनकर्ता शोधू वस्तुतः तो प्रत्येक वस्तूचा पालनकर्ता आहे. आणि प्रत्येक मनुष्यावर त्याच्या स्वतःच्या कमाईची जबाबदारी आहे. कोणताहि ओझे उचलणारा दुसऱ्याचे ओझे उचलणार नाही. मग तुमच्या पालनकर्त्याकडेच तुम्हाला परतून जावे लागेल. त्यावेळी तो तुम्हाला दाखविल की ज्या गोष्टीमध्ये तुम्ही मतभेद करीत होता त्यांची वास्तविकता काय होती.** *(अल-कुरआन)*

قُلْ أَغَيْرَ اللَّهِ أَبْغِي رَبًّا وَهُوَ رَبُّ كُلِّ شَيْءٍ ۚ وَلَا تَكْسِبُ كُلُّ نَفْسٍ
إِلَّا عَلَيْهَا ۚ وَلَا تَزِرُ وَازِرَةٌ وِزْرَ أُخْرَىٰ ۚ ثُمَّ إِلَىٰ رَبِّكُمْ مَرْجِعُكُمْ
فَيُنَبِّئُكُمْ بِمَا كُنْتُمْ فِيهِ تَخْتَلِفُونَ ﴿١٦٤﴾

**१६४. सांगा, काय मी अल्लाह शिवाय एखादा अन्य पालनकर्ता शोधू वस्तुत: तो प्रत्येक वस्तूचा पालनकर्ता आहे. आणि प्रत्येक मनुष्यावर त्याच्या स्वत:च्या कमाईची जबाबदारी आहे. कोणताहि ओझे उचलणारा दुसऱ्याचे ओझे उचलणार नाही.[३०२] मग तुमच्या पालनकर्त्याकडेच तुम्हाला परतून जावे लागेल. त्यावेळी तो तुम्हाला दाखविल की ज्या गोष्टीमध्ये तुम्ही मतभेद करीत होता त्यांची वास्तविकता काय होती.**

وَهُوَ الَّذِي جَعَلَكُمْ خَلَائِفَ الْأَرْضِ وَرَفَعَ بَعْضَكُمْ فَوْقَ بَعْضٍ
دَرَجَاتٍ لِيَبْلُوَكُمْ فِي مَا آتَاكُمْ ۗ إِنَّ رَبَّكَ سَرِيعُ الْعِقَابِ وَإِنَّهُ
لَغَفُورٌ رَحِيمٌ ﴿١٦٥﴾

**१६५. तोच होय ज्याने तुम्हाला जमीनीवर सत्ताधिकारी[३०३] बनविले आणि तुमच्यापैकी काहींचे दर्जे काहींच्यापेक्षा उंच केले अशासाठी की त्याने जे काही तुम्हाला प्रदान केले आहे त्यात तुमची कसोटी घ्यावी.[३०४] नि:संशय तुमचा पालनकर्ता शिक्षा देण्यातहि शीघ्र आहे व माफ करणारा, दया करणाराहि आहे.**

३०२. अर्थात अपराधाचे ओझे.

३०३.खलीफ़ा म्हणजे अधिकार बाळगणारा. माणसाला जमीनीवर अधिकारशील निर्मिती बनविले गेले आहे. हे अधिकार अल्लाहतर्फे अनामत होत आणि तो या गोष्टीस जबाबदार आहे की त्याने या अधिकारांना त्याच्या मार्गदर्शनानुसार प्रयोगात आणावे.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र.४१

३०४. अर्थात योग्यता, सामर्थ्य कारकिर्द व साधने या दृष्टीने माणसा-माणसांत विभिन्न दर्जे आहेत व हा फरक यासाठी ठेवला गेला आहे की ज्यायोगे त्यांची कसोटी घेतली जावी की कोण ईश्वराचा कृतज्ञ दास बनतो व कोण कृतघ्न, कोण न्याय करतो व कोण अत्याचार, थोडक्यात हे की दर्जांच्या तफावतीशिवाय ना मानव जातीचे वैशिष्ट्य दृगोचर होऊ शकते व ना तिचे अवगुण उघड झाले असते.

# सूरह
# अल-अअराफ

# ७. अल-अअराफ

**नावः** आयत क्र.४६ मध्ये अअराफ उंच स्थाने चा उल्लेख झाला आहे. जो एक विशेष महत्व बाळगतो, तदनुषांगाने या सूरहचे नाव ''अल-अअराफ'' असे आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे आणि मजकूरांवरून असे दिसून येते की ही सूरह, सूरह अनआम नंतर अवतरीत झाली असेल. सूरह अनआम मध्ये प्रेषितत्व संदर्भातील काही शंकांचे निरसन केले गेले होते. या सूरहमध्ये प्रेषितत्व समस्येवर ऐतिहासिक साक्षी सादर केल्या गेल्या आहेत.

**मध्यवर्ति कल्पनाः** प्रेषितत्वाविषयी ईमान बाळगण्याचे आवाहन आहे आणि सचेत करण्याचा पैलू प्रभावशाली आहे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ते १० प्रस्तावनास्वरूप आहेत. ज्यात कुरआन-अवतरणाचे उद्दिष्ट स्पष्ट केले गेले आहे, अर्थात हे की निचेष्ट स्थितीत पडलेल्या माणसांना सावध व जागृत करावयाचे आहे.

आयत क्र.११ते२५मध्ये आदम व इब्लिसचा किस्सा वर्णिला गेला आहे. ज्यावरुन सैतानाची धोकेबाजी स्पष्ट कळते.व यावरुन हा धडा मिळतो की माणसाने सैतानाच्या कहयात येऊ नये अन्यथा तो नेहमीकरिता जन्नत पासून वंचित होईलय.

आयत क्र. २६ ते ३४ मध्ये त्या मार्गभ्रष्टतेबाबत सचेत केले गेले आहे ज्याकडे सैतान मनुष्याला धोक्यात घेऊन जाऊ इच्छितो.

आयत क्र.३५ ते ५३ मध्ये या वस्तुस्थितीस स्पष्ट करतांना की सर्वश्रेष्ठ अल्लाहने सुरवातीसच माणसाला या गोष्टीविषयी सचेत केले होते की तो मार्गदर्शनाकरिता प्रेषितांना पाठविल आणि सफल तेच होतील जे त्यांचे अनुसरण करतील. याच उद्दिष्टाकरिता पैगंबरांचे आगमन होत राहिले, म्हणून यांचे अनुसरण करणाऱ्यांची व याचा इन्कार करणाऱ्यांची परिणिती आखिरतमध्ये एकमेकाहून अगदी भिन्न असेल. या परिणितीची एक झलक या आयतीमध्ये दाखविली गेली आहे. अशासाठी की जो मनुष्य आपली परिणिती चांगली व्हावी अशी इच्छा बाळगत असेल तर त्याने प्रेषित-अनुसरणाचा मार्ग पत्करावा.

आयत क्र. ५४ ते ५८ मध्ये संक्षिप्तरित्या तौहीद (अनेकेश्वरवादा) चे प्रमाण वर्णिले गेले आहेत अशासाठी की समस्त प्रेषितांच्या सामाईक आवाहनास म्हणजे एकेश्वरवादाच्या आवाहनास कबूल करण्याकरिता मन प्रवृत्त व्हावे.

आयत क्र. ५९ ते ९३ मध्ये काही प्रसिद पैगंबरांचा वृत्तांत वर्णन केला गेला आहे. ज्यांनी एकेश्वरवादी आवाहन प्रस्तुत केले होते. आणि जेव्हा यांच्या जाती समूहांनी नकारात्मक भूमिका अंगिकारली तर त्यांना कशाप्रकारे जगातच ईश-प्रकोपाचा सामना करावा लागला.

आयत क्र. ९४ ते १०२ मध्ये मानव वसत्यांना झिंझोडले गेले आहे. अर्थात हे की त्यांनी या घटनांपासून बोध घ्यावा.

आयत क्र. १०३ ते १३७ मध्ये हजरत मूसा व फिरऔन चा वृत्तांत सादर केला गेला आहे जो या गोष्टीचा ऐतिहासिक पुरावा होय की अल्लाहचा प्रकोप बिघाड निर्माण करणाऱ्यांवरच कोसळला आहे आणि अल्लाहच्या पैगंबरांचे अनुसरण अंगिकारणाऱ्यांवर त्याची दयाच अवतरीत होत राहिली.

आयत क्र. १३८ ते १७१ मध्ये बनी इस्राईलच्या बंडखोराची काही उदाहरणे प्रस्तुत केली गेली आहेत, ज्याद्वारे हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की अल्लाहची दया ही केवळ अशाच लोकांचा हिस्सा आहे. जे प्रेषिताचे मन पूर्वक अनुसरणाचा केवळ दावा केल्याने कोणतीहि व्यक्ति वा समूह अल्लाहच्या दयेस पात्र ठरत नाही. बनीइस्राईल याचे जिवंत उदाहरण होय, आणि आज देखील हे लोक अल्लाहच्या कृपा-छत्राचा आश्रय घेऊ शकतात मात्र या अटीवर की यांनी अल्लाहचे प्रेषित हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याविषयी ईमान बाळगून त्यांचे अनुसरण करावे. हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याविषयी पूर्वीपासून ईष्ट ग्रंथांमध्ये भविष्यवाणी आहे. परंतु जर हे या पैगंबराविषयी ईमान बाळगण्यास इन्कार दर्शवितात तर यांच्या भूतकालीन बंडखोर वर्तनाला पाहता त्यांचा इन्कार म्हणजे आशचर्य कारक बाब नव्हे यास्तव लोकांनी त्यांच्या वर्तनापासून प्रभावित होऊ नये, किंबहुना या पैगंबरावर ईमान बाळगण्याविषयीची बाब प्रमाण व साक्षींच्या आधारावर निश्चित केली पाहिजे.

आयत क्र. १७२ ते १९८ मध्ये अनेकेश्वरवाद्यांना हे स्पष्ट करीत की शिर्क (अनेकेश्वरवाद) स्वभाव-प्रतिज्ञेच्या उलट वर्तन होय, तौहीद (एकेश्वरवादा) ला मनोवेधक शैलीत प्रस्तुत केले गेले आहे. कियामती संबंधीचा त्यांचा हा प्रश्न की ती केव्हा येईल याचे उत्तर दिले गेले आहे. आणि त्यांच्या इतर शंकांचे निरसन करीत शिर्क (अनेकेश्वरवाद) ची अयोग्यता व त्याचे पूर्णतः खोटे असणे स्पष्ट केले गेले आहे.

आयत क्र. १९९ ते २०६ संभाषणाचा शेवट आहे. ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना व त्यांच्या माध्यमाने त्यांच्या अनुयायींना सबूरी व स्थैर्य आणि ईश-स्मरणाची आज्ञा दिली गेली आहे.

# ७. सूरह अल अअराफ

سُوْرَةُ الْاَعْرَافِ

आयती २०६

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. अलिफ, लाम, मीम, साद [१]

الٓمٓصٓ ۝١

२. हा एक ग्रंथ आहे जो तुमच्यावर अवतरीत केला गेला आहे [२] तेव्हा (पहा) यामुळे तुमच्या मनात कसला संकोच उद्‌भवू नये [३] हा ग्रंथ अशासाठी अवतरीत केला गेला आहे की तुम्ही याद्वारे लोकांना सचेत करावे [४] आणि ईमान बाळगणाऱ्यांकरिता बोध ठरावा. [५]

كِتٰبٌ اُنْزِلَ اِلَيْكَ فَلَا يَكُنْ فِيْ صَدْرِكَ حَرَجٌ
مِّنْهُ لِتُنْذِرَ بِهٖ وَذِكْرٰى لِلْمُؤْمِنِيْنَ ۝٢

३. (लोक हो) तुमच्या पालन कर्त्याकडून तुमच्यावर जे काही अवतरीत झाले आहे त्याचे अनुसरण करा आणि याला सोडून अन्य संरक्षकाचे अनुसरण करू नका [६] तुम्ही किंचितच अपदेश मान्य करता.

اِتَّبِعُوْا مَآ اُنْزِلَ اِلَيْكُمْ مِّنْ رَّبِّكُمْ وَلَا تَتَّبِعُوْا مِنْ
دُوْنِهٖٓ اَوْلِيَآءَ ۗ قَلِيْلًا مَّا تَذَكَّرُوْنَ ۝٣

४. आणि अशा कित्येक वस्त्या होत ज्यांचा आम्ही नायनाट करून टाकला तर त्यांच्यावर आमचा अजाब (शिक्षा) रात्रीच्यावेळी आली अथवा दुपारच्यावेळी जेव्हा ते आराम करीत होते. [७]

وَكَمْ مِّنْ قَرْيَةٍ اَهْلَكْنٰهَا فَجَآءَهَا بَاْسُنَا بَيَاتًا
اَوْ هُمْ قَآئِلُوْنَ ۝٤

५. आणि जेव्हा आमचा अजाब (शिक्षा) आला तेव्हा त्यांचे म्हणणे याशिवाय काहीहि नव्हते की खरोखर आम्ही अत्याचारी होतो. [८]

فَمَا كَانَ دَعْوٰىهُمْ اِذْ جَآءَهُمْ بَاْسُنَآ اِلَّآ اَنْ قَالُوْٓا اِنَّا كُنَّا
ظٰلِمِيْنَ ۝٥

६. तर (लक्षात ठेवा) आम्ही लोकांची अवश्य विचारपूस करणार ज्यांच्याकडे पैगंबर पाठविले गेले आणि नि:संशय पैगंबरांनाहि विचारणार. [९]

فَلَنَسْـَٔلَنَّ الَّذِيْنَ اُرْسِلَ اِلَيْهِمْ وَلَنَسْـَٔلَنَّ الْمُرْسَلِيْنَ ۝٦

७. मग आम्ही पूर्ण ज्ञानासह समस्त वृत्तांत त्यांच्यासमोर वर्णन करणार आणि आम्ही कोठे गायब तर नव्हतो.

فَلَنَقُصَّنَّ عَلَيْهِمْ بِعِلْمٍ وَّمَا كُنَّا غَآئِبِيْنَ ۝٧

१. ही वेगवेगळी अक्षरे आहेत. यांचे स्पष्टीकरण सूरह बकराच्या टीप क्र. १ मध्ये व सूरह आले इमरानच्या टीप क्र. १ मध्ये केले गेले आहे.

ही अक्षरे सूरहच्या काही मजकूरांकडे संकेत करतात जे विशिष्ट महत्व बाळगतात. या सूरहच्या मजकूरांवर विचार केल्यावर असे दिसून येते की अलिफचा संकेत अल्लाहकडे म्हणजे तौहीद (एकेश्वरवादा) च्या मजकूरांकडे आणि लामचा संकेत **''ला इलाहा इल्लल्लाहु''** (आयत क्र. १५८) अर्थात शिर्कचा इन्कार दर्शविणाऱ्या मजकूरांकडे आहे. तदवतच 'मीम'चा संकेत मुर्सलीन (आयत ६) म्हणजे प्रेषितत्व क्रमाच्या मजकूरांकडे आहे. राहिला 'साद' तर त्याचा संकेत त्या घटनांकडे आहे ज्या सूरहमध्ये वर्णिल्या गेल्या आहेत,या संदर्भात पैगंबरांच्या आवाहनास इन्कार केल्याचा परिणाम. म्हणून वसत्यांच्या विनाशाच्या घटना ऐकविल्यानंतर फर्माविले

تِلْكَ الْقُرٰى نَقُصُّ عَلَيْكَ مِنْ اَنْۢبَآئِهَا

''या वस्त्या होत ज्यांच्या घटना आम्ही तुम्हाला ऐकवित आहोत'' (आयत-१०१) या आयतीत نَقُصُّ 'नकुस्सु'या शब्दाचे शेवटचे अक्षर साद आहे तसेच आयत १७६ मध्ये فَاقْصُصِ الْقَصَصَ ''फक्सुसिल कसस'' (हे किस्से ऐकवा) चा शेवटचा शब्द 'साद' आहे. तात्पर्य ही अक्षरे सूरहचा एकत्रित परिचय सादर करतात कारण यात चार महत्वपूर्ण विषय वर्णिले गेले आहेत. ऐकेश्वरवादाचे आवाहन, अनेकेश्वरवादाचे खंडन, प्रेषितत्वाविषयी ईमान बाळगण्याचे आवाहन आणि नकारात्मक भूमिका अंगिकारणाऱ्या वसत्यांच्या विनाशाचे प्रसंग (आणि अल्लाहच आपल्या वाणीचे रहस्य चांगल्या प्रकारे जाणतो)

२. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधिले गेले आहे.

३. अर्थात खरी वस्तुस्थिती ही आहे की हा ग्रंथ अल्लाहनेच अवतरीत केला आहे. परंतु विरोधक याला ईश ग्रंथ मानावयास तयार नाहीत ते या ग्रंथास तुमचा लिखित ग्रंथ समजतात.या स्थितीने तुम्ही त्रस्त व दु:खी न व्हावे. सत्य शेवटी सत्यच राहील याबाबत तुम्ही संतुष्ट रहा, मग कोणी मान्य करो वा न करो.

४. हे आहे कुरआन-अवतरणाचे सर्वप्रथम उद्दिष्ट, अर्थात गफलतीत पडलेल्या मानव जातीस जागृत करणे की तिने मोबदल्याच्या दिवसाबाबत सावध असावे, तसेच इन्कार करणाऱ्यांना ईश-शिक्षेपासून सचेत करणे.

५. कुरआन-अवतरणाचे हे दुसरे महत्वपूर्ण उद्दिष्ट होय. जे लोक तंबी दिली गेल्यामुळे कुरआनाचे आवाहन मान्य करतील त्यांच्याकरिता स्मरण पत्र व उपदेशाची सामुग्री आहे. दुसऱ्या शब्दात कुरआनपासून खराखुरा लाभ घेणारे केवळ तेच लोक असतील जे त्यावर ईमान आणतील.

६. अर्थात समस्त जीवन-व्यवहारात ईश-ग्रंथ (कुरआन) चेच अनुसरण केले गेले पाहिजे. त्याला सोडून कोणत्याहि धार्मिक पुढारी वा राजकिय नेता किंवा सत्यविरोधकाची श्रद्धा, विचार, दृष्टीकोन किंवा कल्पना मान्य करणे व त्याच्या पावलो पावली चालणे, ईश्वराला सोडून त्याला आपला पालक बनविणे होय व खरे पाहता हे सैतानाचेच अनुसरण होय.

७. म्हणजे ईश शिक्षेची कठोरता अचानक प्रकट झाली आणि अशावेळी प्रगटली जी त्यांच्या आरामाची वेळ होती. आणि आरामच्या वेळी जी यातना पोहचते ती प्रकर्षाने जाणवते.

८. अर्थात शिक्षेची लक्षणे दिसून येताच त्यांनी आपण वाममार्गी व अपराधी असल्याचे मान्य केले, परंतु आचरणाची संधी समाप्त जाल्यानंतर मान्य करण्याचा फायदा काय?

९. ज्या लोकांकडे पैगंबर पाठविले गेले त्यांना कियामतीच्या दिवशी विचारले जाईल की, काय आमचे पैगंबर तुमच्याजवळ आले नव्हते?आणि काय त्यांनी या धर्माविषयी तुम्हाला जाणकार केले नव्हते? मग तुम्ही यांच्याशी कोणती वागणूक केली? आणि पैगंबरांना विचारले जाईल की काय त्यांनी अल्लाहचा संदेश कमी अधिक न करता आपल्या जाती-समूहांपर्यंत पोहचविला होता व जाती समूहाकडून त्यांना काय उत्तर मिळाले?

❖❖❖❖❖❖

८. वजन त्या दिवशी सत्य असेल तर ज्यांची पारडे भारी असतील तेच यशस्वी ठरतील. [१०]

وَالْوَزْنُ يَوْمَئِذٍ الْحَقُّ ۚ فَمَنْ ثَقُلَتْ مَوَازِينُهُ فَأُولَٰئِكَ هُمُ الْمُفْلِحُونَ ﴿٨﴾

९. आणि ज्यांची पारडे हलकी असतील [११] तर हे तेच लोक असतील ज्यांनी स्वत:ला हानि-ग्रस्त केले, कारण ते आमच्या आयतींशी अन्याय करीत राहिले.

وَمَنْ خَفَّتْ مَوَازِينُهُ فَأُولَٰئِكَ الَّذِينَ خَسِرُوا أَنْفُسَهُمْ بِمَا كَانُوا بِآيَاتِنَا يَظْلِمُونَ ﴿٩﴾

१०. आणि आम्ही तुम्हाला जमीनीवर सामर्थ्यशील बनविले [१२] आणि तुमच्या करिता उदरनिर्वाहाची सामुग्री एकत्र केली परंतु तुम्ही किंचितच आभार मानता.

وَلَقَدْ مَكَّنَّاكُمْ فِي الْأَرْضِ وَجَعَلْنَا لَكُمْ فِيهَا مَعَايِشَ ۗ قَلِيلًا مَا تَشْكُرُونَ ﴿١٠﴾

११. आम्ही तुम्हाला निर्माण केले, मग तुमचा चेहरा बनविला मग फिरिशत्यांना (ईश दूतांना) म्हटले, आदमला सजदा करा तेव्हा सर्वांनी सजदा केला [१४] परंतु इब्लीस [१५] तो सजदा करणाऱ्यामध्ये सामील झाला नाही.

وَلَقَدْ خَلَقْنَاكُمْ ثُمَّ صَوَّرْنَاكُمْ ثُمَّ قُلْنَا لِلْمَلَائِكَةِ اسْجُدُوا لِآدَمَ فَسَجَدُوا إِلَّا إِبْلِيسَ لَمْ يَكُنْ مِنَ السَّاجِدِينَ ﴿١١﴾

१२. फर्माविले कोणत्या गोष्टीने तुला सजदा करण्यापासून रोखले ज्याअर्थी मी तुला आदेश दिला होता? तो म्हणाला, मी याहून अधिक चांगला आहे. तू मला आगीपासून निर्माण केलेस व याला मातीपासून.[१६]

قَالَ مَا مَنَعَكَ أَلَّا تَسْجُدَ إِذْ أَمَرْتُكَ ۖ قَالَ أَنَا خَيْرٌ مِنْهُ خَلَقْتَنِي مِنْ نَارٍ وَخَلَقْتَهُ مِنْ طِينٍ ﴿١٢﴾

१३. फर्माविले, येथून खाली उतर तुला हक्क नाही के येथे घमेंड करावी जा निघ, की तू अपमानित होणाऱ्यांपैकी आहेस. [१७]

قَالَ فَاهْبِطْ مِنْهَا فَمَا يَكُونُ لَكَ أَنْ تَتَكَبَّرَ فِيهَا فَاخْرُجْ إِنَّكَ مِنَ الصَّاغِرِينَ ﴿١٣﴾

१४. म्हणाला, मला त्या दिवसापर्यंत मोहलत दे जेव्हा लोक (मेल्यानंतर) उठविले जातील.

قَالَ أَنْظِرْنِي إِلَىٰ يَوْمِ يُبْعَثُونَ ﴿١٤﴾

१५. फर्माविले, तूला मोहलत दिली गेली. [१८]

قَالَ إِنَّكَ مِنَ الْمُنْظَرِينَ ﴿١٥﴾

१६. म्हणाला, तू मला मार्गभ्रष्ट केले आहे [१९] म्हणून मी तुझ्या सरळ मार्गावर यांच्याकरिता टपून बसेन.[२०]

قَالَ فَبِمَا أَغْوَيْتَنِي لَأَقْعُدَنَّ لَهُمْ صِرَاطَكَ الْمُسْتَقِيمَ ﴿١٦﴾

१०. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अलकारिआ टीप क्र.६

११. स्टीकरणासाठी पहा सूरह अलकारिया टीप क्र.७

१२. अर्थात दुसऱ्या निर्मितीच्या तुलनेले मनुष्याला ही प्रतिष्ठा लाभली आहे की तो जमीनीवर अधिकार व सत्ता बाळगणारी निर्मिती आहे. उघड आहे की ही अल्लाहची फार मोठी देणगी आहे. या देणगीने उपकृत केले जाण्याची निकड ही की माणसाने अल्लाहचा कृतज्ञ दास बनून रहावे.

१३. अर्थात मनुष्य-निर्मिती अशाप्रकारे झाली की प्रथम त्याच्या शरीराचा सापळा तयार केला गेला मग चेहरा मोहरा घडविला गेला.

येथे मानव जातीच्या निर्मितीचा उल्लेख आला आहे. चिजे सर्वप्रथम पुरुष हजरत आदम आहेत त्यांची निर्मिती मातीपासून झाली होती.

१४. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ४७ मध्ये केले गेले आहे.

१५. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र.४८ मध्ये केले गेले आहे.

१६. आग एक सुक्ष्म वस्तू आहे व माती स्थूल. इब्लीस (सैतान) जिन्नांपैकी होता आणि जिन्नांना आगी पासून निर्माण केले गेले आहे म्हणून इब्लीस केवळ आपल्या निर्मितीच्या माध्यमास पाहून या भ्रमात पडला की तो आदमपेक्षा श्रेष्ठ आहे; आणि जेव्हा ईश्वराने त्याला आदमपुढे सजदा करण्याचा आदेश दिला तेव्हा आपला हा तर्क ईश्वरासमोर मांडून सजदा करण्यास त्याने नकार दर्शविला वस्तुत: त्याचा हा तर्क खरा नव्हता व ईश आदेशापुढे कसलाहि तर्क चालविणे योग्य नाही. दासाचे काम तर ईश आदेशाचे पालन करणे हे होय त्याच्यासमोर वादविवाद करणे हे नव्हे. यास्तव सर्व फिरिश्त्यांनी (ईश-दुतांनी) का कू न करता ईश आदेशाचे पालन केले यावरून हे उघड झाले की ईश्वराच्या आज्ञापालनाचा खराखुरा मार्ग तोच होय जो फिरिश्त्यांनी अंगिकारला. राहिले इब्लीसचे आपल्या निर्मितीचे माध्यम पाहून श्रेष्ठत्वाच्या जाणीवेत ग्रस्त होणे तर ही त्याची अदूरदार्शिता होती,अन्यथा जिन्नांच्या तुलनेने उच्च वैशिष्ट्ये बाळगणारी ईश-निर्मिती मानवाचीच होय. म्हणून पृथ्वीत खिलाफतीचा मुकुट मानवाच्याच शिरावर ठेवला गेला आहे; जिन्नांच्या शिरावर नव्हे.

१७. इब्लीसने ईश्वराची आज्ञा पाळली नाही किंबहुना त्याने घमेंड केली, म्हणून त्याला जन्नतमधून निघून जाण्याचा आदेश दिला गेला यावरुन आचरणाच्या मोबदल्याचा हा नियमहि स्पष्ट झाला की जो कोणी जाणून बुजून ईशादेशाची पायमल्ली करील आणि दास्यत्व वर्तन अंगिकारण्याऐवजी गर्वाचे वर्तन अंगिकारील तो जन्नत सारख्या उच्च स्थानी पोहचण्यास मुळीच पात्र नाही. अर्थात अधोगति हेच त्याचे नशीब.

१८. इब्लीसला ही संधी कियामतीपर्यंत दिली गेली आहे आणि ही संधी त्या योजनेनुसार आहे जिचा विचार करुन सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाला जमीनीचा प्रतिनिधी बनविले आहे. (पहा सूरह बकरा टीप क्र. ४६)

१९. इब्लीसने आपल्या मार्गभ्रष्टतेची जबाबदारी सर्वश्रेष्ठ अल्लाहवर टाकली वस्तुत: अल्लाहने त्याच्या विद्रोहापायी त्याला मार्गभ्रष्ट केले म्हणून इब्लीस जरी अल्लाहच्या नियमान्वये मार्गभ्रष्ट झाला. तरी आपल्या मार्गभ्रष्टतेस तो स्वत:च जबाबदार आहे.

१७. मग त्यांच्या पुढूनहि त्यांच्यावर हल्ला करीन व मागूनहि, उजव्या बाजूनेहि हल्ला करीन व डाव्या बाजूनेहि.[२१] आणि यांच्यापैकी बहुतेक जण तुला कृतज्ञ आढळणार नाहीत.

ثُمَّ لَآتِيَنَّهُم مِّن بَيْنِ أَيْدِيهِمْ وَمِنْ خَلْفِهِمْ وَعَنْ أَيْمَانِهِمْ وَعَن
شَمَائِلِهِمْ ۖ وَلَا تَجِدُ أَكْثَرَهُمْ شَاكِرِينَ ﴿١٧﴾

१८. फर्माविले,जा निघ येथून अपमानित व धिःक्कारलेला. यांच्यापैकी जे तुझे अनुसरण करतील तर मी तुम्हा सर्वांद्वारे जहन्नमला भरीन[२२]

قَالَ اخْرُجْ مِنْهَا مَذْءُومًا مَّدْحُورًا ۖ لَّمَن تَبِعَكَ مِنْهُمْ لَأَمْلَأَنَّ
جَهَنَّمَ مِنكُمْ أَجْمَعِينَ ﴿١٨﴾

१९. आणि हे आदम ! तू आणि तुझी पत्नी दोघेहि जन्नत मध्ये रहा [२३] आणि वाटेल तेथून खा, मात्र या झाडाच्या जवळहि न जावे [२४] अन्यथा अत्याचारी लोकांपैकी व्हाल.

وَيَا آدَمُ اسْكُنْ أَنتَ وَزَوْجُكَ الْجَنَّةَ فَكُلَا مِنْ حَيْثُ شِئْتُمَا
وَلَا تَقْرَبَا هَٰذِهِ الشَّجَرَةَ فَتَكُونَا مِنَ الظَّالِمِينَ ﴿١٩﴾

२०. मग सैतानाने त्यांच्या मनात कुविचार टाकला [२५] अशासाठी की त्यांची लज्जास्थाने, जी त्यांच्यापासून लपविली गेली होती त्यांना उघड करावी [२६] तो म्हणाला तुमच्या पालनकर्त्याने तुम्हाला या झाडापासून केवळ एवढ्यासाठीच रोखले आहे की तुम्ही यदाकदाचित फिरिश्ते न बनावे किंवा तुम्हाला सदैव जीवन न लाभो.

فَوَسْوَسَ لَهُمَا الشَّيْطَانُ لِيُبْدِيَ لَهُمَا مَا وُورِيَ عَنْهُمَا مِن
سَوْآتِهِمَا وَقَالَ مَا نَهَاكُمَا رَبُّكُمَا عَنْ هَٰذِهِ الشَّجَرَةِ
إِلَّا أَن تَكُونَا مَلَكَيْنِ أَوْ تَكُونَا مِنَ الْخَالِدِينَ ﴿٢٠﴾

२१. आणि त्याने शपथपूर्वक त्यांना सांगितले की मी तुमचा हितचिंतक आहे.[२७]

وَقَاسَمَهُمَا إِنِّي لَكُمَا لَمِنَ النَّاصِحِينَ ﴿٢١﴾

२२. अशाप्रकारे त्याने त्यांना आपल्या धूर्ततेत जखडले [२८] मग जेव्हा त्यांनी झाडाचा स्वाद घेतला तेव्हा त्यांची लज्जास्थाने त्यांच्यावर उघडली [२९] व ते स्वतःला जन्नतच्या पानांनी झाकू लागले.[३०] आणि त्यांच्या पालन कर्त्याने त्यांना साद घातली काय मी तुम्हाला या झाडापासून रोखले नव्हते व हे सांगितले नव्हते की सैतान तुमचा उघड शत्रू आहे ?

فَدَلَّاهُمَا بِغُرُورٍ ۚ فَلَمَّا ذَاقَا الشَّجَرَةَ بَدَتْ لَهُمَا سَوْآتُهُمَا وَطَفِقَا
يَخْصِفَانِ عَلَيْهِمَا مِن وَرَقِ الْجَنَّةِ ۖ
وَنَادَاهُمَا رَبُّهُمَا أَلَمْ أَنْهَكُمَا عَن تِلْكُمَا الشَّجَرَةِ وَأَقُل لَّكُمَا إِنَّ الشَّيْطَانَ
لَكُمَا عَدُوٌّ مُّبِينٌ ﴿٢٢﴾

२३. त्यांनी म्हटले, हे आमच्या पालनकर्त्या ! आम्ही स्वतःवर अत्याचार केला आणि जर तू आम्हाला माफ केले नाही व दया केली नाही तर आमचा सर्वनाश होईल. [३१]

قَالَا رَبَّنَا ظَلَمْنَا أَنفُسَنَا وَإِن لَّمْ تَغْفِرْ لَنَا وَتَرْحَمْنَا لَنَكُونَنَّ مِنَ
الْخَاسِرِينَ ﴿٢٣﴾

२०. सरळ मार्गाशी अभिप्रेत तौहीद (एकेश्वरवाद) व सत्य धर्माचा मार्ग होय. इब्लीसच्या मनात मानवाबद्दल मत्सर निर्माण झाला होता व त्याला मार्गभ्रष्ट करण्याकरिता मोहलतदेखील मिळाली होती. म्हणून त्याने हे आव्हान दिले की मी मानवजातीस एकेश्वरवादाच्या मार्गापासून हटवून शिर्क (अनेकेश्वरवाद) ग्रस्त करण्यात व सत्यधर्मापासून फिरवून मार्गभ्रष्ट करण्यात काहीहि कसर बाकी ठेवणार नाही.

२१. अर्थात सैतानाचे आक्रमण माणसावर प्रत्येक दिशेने होईल. तो माणसाला खोट्या विचार व कल्पनांनी प्रभावित होण्यास, त्याला दुष्कृत्यांसाठी तयार करण्यास व जगात उत्पात माजविण्यास प्रवृत्त करण्याकरिता प्रत्येक प्रकारचे कट कारस्थान रचील. तात्पर्य माणसाला सैतानी हल्ल्यांपासून सुरक्षित राहण्याकरिता चहुबाजूंनी तोंड द्यावे लागेल.

२२. अल्लाहकडून सैतानाच्या आव्हानाला दिलेले हे उत्तर की मानव जातीस मार्गभ्रष्ट करण्याकरिता सर्व सामर्थ्य लाव, परंतु जे जे तुझ्या मार्गाचे अनुसरण करतील मग त्यांची संख्या किती का मोठी असेना, त्या सर्वांना मी तुझ्यासमवेत जहन्नम मध्ये फेकून देईल.

इहलोकात ज्यार्थी माणसाला कसोटीसाठी पाठविले जात आहे म्हणून सैतानाला ही संधी राहिल की त्याने माणसाला आमिष दाखवावे आणि माणसाला हे स्वातंत्र्य राहिल की जे लोक त्याच्या कह्यात येऊ इच्छितात त्यांनी खुशाल यावे, मात्र त्यांनी लक्षात असू द्यावे की या सर्वांची परिणिती अल्लाहच्याच हाती आहे व तो कियामतीच्या दिवशी सैतान व त्याचे अनुसरण करणाऱ्या सर्व माणसांना जहन्नमची शिक्षा निश्चितच देईल.

२३. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र.५० मध्ये केले गेले आहे.

२४. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ५१ मध्ये केले गेले आहे.

२५. इब्लीसचे दुसरे नाव सैतान आहे ज्याचा उल्लेख वर आला, त्याला जन्नतमधून काढून टाकले गेले होते परंतु ज्याअर्थी आदमची परिक्षा घ्यावयाची होती अर्थात ही की तो सैतानाच्या कह्यात येतो किंवा नाही म्हणून सैतानाला मनात कुविचार टाकण्याची अशी शक्ति प्रदान केली गेली होती की तो जन्नत बाहेर राहूनहि आदमशी संबंध ठेवू शकत होता. आजच्या काळात जेव्हा मनुष्य अवकाशात राहून पृथ्वीवर राहणाऱ्यांशी वार्तालाप करू शकतो व टेलीव्हीजन वर प्रकट होऊ शकतो तेव्हा सैतानाचे जन्नतबाहेरून आदमकरिता प्रकटणे किंवा संदेश वहनाची कल्पना काही असंभव गोष्ट नव्हे अर्थात सैतानाचे संदेश वहन मोठ्या गुप्त रीतीने होते यास्तव त्याच्या मनात कुविचार टाकण्याकरिता अरबी भाषेत यथार्थ असलेला शब्द वस्वस: हा आहे.

२६. जन्नतमध्ये हजरत आदम व त्यांच्या पत्नीला सन्मानाचा असा पोषाख घातला गेला होता की त्यांना आपल्या नग्नतेची जाणीव कधीहि झाली नाही परंतु सैतानाच्या कह्यात आल्यानंतर त्याचा सन्मान-पोषाख गळून पडला व त्यांना आपल्या नग्नतेची जाणीव झाली.

२७. अगदी विचार करण्यासारखी बाब आहे की सैतान कशाप्रकारे हितचिंतक बनून येतो व कशाप्रकारे धोका देतो.

२८. आदम आणि हव्वा यांच्या हातून जो अपराध घडला तो या गोष्टीमुळे की ते सैतानाच्या फसवणूकीस बळी पडले याउलट सैतानाने जो गुन्हा केला होता तो गर्वच्या आधारे केला.

स्पष्ट व्हावे की कुरआनाच्या या वर्णनानुसार सैतानाच्या फसवणुकीला आदम व हव्वा दोघेहि बळी पडले म्हणून हे जे ऐकवित आहे की सैतानाने हव्वाला बहकाविले आणि हव्वाने आदमला झाडाचे फळ खाण्यास प्रोत्साहित केले खरे नाही.

२९. म्हणजे जन्नतचा पोषाख त्यांच्या अंगावरून उतरला म्हणून त्यांना नग्नतेची जाणीव झाली.

३०. यावरून हे स्पष्ट झाले की लज्जा मनुष्याचा स्वाभाविक गुणधर्म आहे व लज्जास्थाने लपविणे हे स्वभाव धर्माशी अगदी निगडीत आहे.

३१. पहा सूरह बकरा टीप क्र. ५४

२४. फर्माविले, उतरा खाली [३२] तुम्ही एकमेकांचे शत्रू आहात [३३] आणि तुमच्याकरिता एका विशिष्ट वेळेपर्यंत जमीनीवर ठिकाण व उदरनिर्वाहाची सामुग्री आहे.[३४]

قَالَ اهْبِطُوا بَعْضُكُمْ لِبَعْضٍ عَدُوٌّ ۚ وَلَكُمْ فِي الْأَرْضِ
مُسْتَقَرٌّ وَمَتَاعٌ إِلَىٰ حِينٍ ﴿٢٤﴾

२५. आणि फर्माविले, यातच तुम्ही जगाल, यातच मराल व यातूनच तुम्हाला काढले जाईल.[३५]

قَالَ فِيهَا تَحْيَوْنَ وَفِيهَا تَمُوتُونَ وَمِنْهَا تُخْرَجُونَ ﴿٢٥﴾

२६. हे आदमच्या मुलांनो !आम्ही तुमच्यावर पोषाख अवतरित केला आहे [३६] की तुमची लज्जा स्थानेहि झाकावीत व शोभेचे साधनहि व्हावे [३७] आणि ईश-भयाचा पोषाख तर सर्वोत्कृष्ट पोषाख होय. [३८] हे अल्लाहच्या निशाण्यांपैकी आहे यासाठी की लोकांनी बोध घ्यावा. [३९]

يَا بَنِي آدَمَ قَدْ أَنْزَلْنَا عَلَيْكُمْ لِبَاسًا يُوَارِي سَوْآتِكُمْ وَرِيشًا ۖ
وَلِبَاسُ التَّقْوَىٰ ذَٰلِكَ خَيْرٌ ۚ ذَٰلِكَ مِنْ آيَاتِ اللَّهِ لَعَلَّهُمْ
يَذَّكَّرُونَ ﴿٢٦﴾

२७. हे आदम संतती ! असे न व्हावे की सैतानाने तुम्हाला बहकावून द्यावे [४०] ज्याप्रमाणे त्याने तुमच्या मातापिताना (बहकावून) जन्नत मधून बाहेर घालविले होते व त्यांचे पोषाख उतरविले होते. अशासाठी की त्यांची लज्जा स्थाने त्यांना दाखवून द्यावीत [४१] तो आणि त्याचा समूह तुम्हाला तेथून पाहतो जेथून तुम्ही त्यांना पाहू शकत नाही.[४२] आम्ही सैतानांना अशा लोकांचा पालक बनविले आहे जे ईमान बाळगत नाही.

يَا بَنِي آدَمَ لَا يَفْتِنَنَّكُمُ الشَّيْطَانُ كَمَا أَخْرَجَ أَبَوَيْكُمْ مِنَ الْجَنَّةِ
يَنْزِعُ عَنْهُمَا لِبَاسَهُمَا لِيُرِيَهُمَا سَوْآتِهِمَا ۗ إِنَّهُ يَرَاكُمْ هُوَ وَقَبِيلُهُ مِنْ
حَيْثُ لَا تَرَوْنَهُمْ ۗ إِنَّا جَعَلْنَا الشَّيَاطِينَ أَوْلِيَاءَ لِلَّذِينَ
لَا يُؤْمِنُونَ ﴿٢٧﴾

२८. आणि हे लोक जेव्हा निर्लज्जतेचे एखादे कृत्य करतात तर म्हणतात, आम्हाला याच मार्गावर आपले वाड वडील आढळून आले आहेत. आणि अल्लाहने आम्हाला याचा आदेश दिला आहे. सांगा, अल्लाह कधीहि निर्लज्जतेचा आदेश देत नाही. काय तुम्ही अल्लाहशी संबंध जोडून अशी गोष्ट सांगता जिचे तुम्हाला काहीहि ज्ञान नाही.[४३]

وَإِذَا فَعَلُوا فَاحِشَةً قَالُوا وَجَدْنَا عَلَيْهَا آبَاءَنَا وَاللَّهُ أَمَرَنَا
بِهَا ۗ قُلْ إِنَّ اللَّهَ لَا يَأْمُرُ بِالْفَحْشَاءِ ۖ أَتَقُولُونَ عَلَى اللَّهِ
مَا لَا تَعْلَمُونَ ﴿٢٨﴾

२९. सांगा माझ्या पालनकर्त्याने न्यायाचा आदेश दिला आहे.[४४]आणि हे की आपले तोंड (त्याच्याकडे) प्रत्येक उपासना स्थानावर सरळ राखा.[४५] आणि त्यालाच पुकारा दीन (आज्ञापालन) ला त्याच्या करीताच शुद्ध ठेवून [४६] ज्याप्रकारे त्याने तुमच्या निर्मितीचा आरंभ केला तद्‌वतच तुम्ही परताल.

قُلْ أَمَرَ رَبِّي بِالْقِسْطِ ۖ وَأَقِيمُوا وُجُوهَكُمْ عِنْدَ كُلِّ
مَسْجِدٍ وَادْعُوهُ مُخْلِصِينَ لَهُ الدِّينَ ۚ كَمَا بَدَأَكُمْ
تَعُودُونَ ﴿٢٩﴾

३२. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ५५ मध्ये केले गेले आहे.

३३. अर्थात मनुष्य व सैतान दोघेहि एकमेकांचे शत्रू आहेत सैतानाचे मनुष्य-वैर बाळगणे उघडच आहे. राहिले माणसाचे सैतानाशी वैर बाळगणे तर जी घटना मानव इतिहासाच्या आरंभातच घडली ती लक्षात घेता मानवाचे स्थान सैतानाच्या शत्रूचेच आहे. म्हणून मनुष्य त्याचा धिक्कार करीत असतो, ज्याअर्थी त्याने मनुष्याला मार्गभ्रष्ट करण्याचा विडा उचलला आहे तरीही त्याच्याशी मैत्री संबंध केवळ तेच लोक राखू शकतात जे मित्र आणि शत्रूमध्ये फरक करण्याची योग्यता बाळगत नाही.

३४. मानव जाती करिता जमीनीलाच ठिकाण बनविले गेले आहे व मनुष्य जीवनाच्या समस्त गरजा पृथ्वीवरच उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत. अवकाशात किंवा एखाद्या ग्रहावर माणसाचे जाणे ही एक तात्पुरती व प्रासंगिक बाब होय मनुष्य वस्तीला कियामतीपर्यंत पृथ्वीवरच रहावयाचे आहे.

३५. अर्थात क़ियामतीच्या दिवशी माणसाला जे दुसऱ्यांदा जिवंत केले जाईल तर त्याला जमीनीतूनच बाहेर काढले जाईल व हीच जमीन तेव्हा हश्‌र (जमाहोण्या)चे मैदान होईल.

३६. ज्या वस्तूंनी पोषाख तयार केला जातो त्या अल्लाहनेच निर्माण केल्या आहेत आणि पोषाख तयार करण्यात जी गुणवत्ता मनुष्य खर्च करतो ती सुद्धा अल्लाहनेच प्रदान केली आहे.

आणि ज्याअर्थी पोषाख मानवाकरिता सर्वश्रेष्ठ अल्लाहची अनमोल देणगी व कृपा आहे, यास्तव याला अवतरीत करण्याच्या अर्थाने घेतले आहे.

३७. येथे पोषाखाची दोन महत्वपूर्ण उद्दिष्टे वर्णिली गेली आहेत, एक हे की मनुष्याने आपली लज्जा स्थाने झाकावित व दुसरे असे की त्याच्याकरिता शोभादायक ठरावे. यावरून त्या धार्मिक कल्पनेचेहि खंडन होते जी नग्नतेला धार्मिक पावित्र्याचा दर्जा देते आणि हीप्पीइजम सारखे विचार देखील जे माणसापासून मानवतेचा पोषाख हिरावून त्याला पशुतेच्या पातळीवर आणू इच्छितात.

पोषाखाला सर्वश्रेष्ठ अल्लाहने शोभेचे साधन बनविले आहे म्हणून चांगला व शोभादायक पोषाख, मात्र जो संतुलित असावा, एक प्रिय वस्तू आहे. यावरून त्या सक्तीचेहि खंडन होते जी वैराग्य पत्कारणाऱ्याबाबत दिसून येते.

३८. प्रसंगानुषांगाने शरीरिक पोषाखाकडून मानसिक पोषाखाकडे लक्ष केंद्रित केले गेले आहे. की ज्याप्रकारे बाहय पोषाख मनुष्याकरिता शोभादायक आहे तद्‌वतच किंबहुना याहून कित्येक पटींनी तकवा म्हणजे ईश भयाचा पोषाख माणसाच्या अंतरंगाला सुशोभित करणारा व त्यास खरे सौंदर्य प्रदान करणारा आहे. यास्तव मनुष्याने स्वत:ला ईश भयाच्या पोषाखानेच सुशोभित केले पाहिजे.

३९. पोषाख मनुष्य स्वभावाची गरज आहे. व याच्या पूर्ततेची सामुग्री ज्या विपुल प्रमाणात व ज्या कुशलतेसह केली गेली आहे त्यावर मनुष्याने विचार चिंतन केल्यास त्याला हे स्पष्टपणे दिसून येईल की त्याच्या निर्मात्याने त्याला पशू नाही बनविले, किंबहुना मनुष्य बनविले आहे. आणि त्याला सुशोभित करून व सुसंस्कृत बनवून मानवतेच्या उच्च स्तरावर राखण्याची इच्छा बाळगली आहे. अशाप्रकारे सर्वश्रेष्ठ अल्लाहने पोषाखातहि आपली निशाणी ठेवली आहे. ज्यायोगे माणसाने आपल्या निर्मात्यास ओळखावे व आपल्या खऱ्या स्थानाशी परिचित व्हावे.

४०. सैतानाद्वारे आदमला बहकविण्याचा जो किस्सा वर वर्णन केला गेला आहे ती एक खरी घटना व मानव इतिहासातील ती पृष्ठे होत जी अपरोक्षाच्या पडद्या आड लपलेली होती. त्यांना कुरआनने एवढ्यासाठी उजेडात आणले की मनुष्याने आपल्या अनादि वैरी असलेल्या सैतानाला ओळखावे व त्याच्या भडकाविण्यापासून सावध रहावे.

सैतान (इब्लीस) चा परिचय कुरआन अशा पद्धतिने करविते की त्याचे व्यक्तिमत्व प्रज्ञा व निश्चय बाळगणारे आहे ज्याचा संबंध जिन्नजातीशी आहे. इतर समस्त लाचार निर्मितीप्रमाणेच तो देखील अल्लाहची निर्मिती होय. सैतानाने सर्वश्रेष्ठ अल्लाहची अवज्ञा केली व बंडखोर झाला म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याला पथभ्रष्ट केले त्याला या गोष्टीचा मत्सर वाटत होता की आदमला आपल्याहून अधिक श्रेष्ठत्व का दिले गेले आणि या मत्सरापायीच तो मानवाचा अगदी आरंभापासून शत्रू बनला. सर्वश्रेष्ठ आल्लाहची इहलोकीय योजना अशी होती की माणसाची चांगल्या-वाईट व्यवहारात कसोटी घेतली जावी म्हणून सैतानाने मोहलत मागितली असतांना त्याने ती दिली. अशासाठी की त्याने जगात आपली उपद्रवता पसरवित रहावे व माणसांपैकी जे लोक त्याच्या बहकाविण्यात येऊ इच्छितात त्यांनी यावे तथापि त्याला हे सामर्थ्य दिले गेले नाही की त्याने बलपूर्वक एखाद्यास मार्गभ्रष्ट करावे. उपद्रव पसरविण्याची त्याला जी संधी दिली गेली आहे. ती अल्लाहच्या बुद्धि कौशल्याशी निगडीत आहे, अन्याथा तो अल्लाहच्या काबूबाहेर किंचितहि नाही. आणि कियामतीच्या दिवशी अल्लाह त्याला व त्याच्या समस्त लष्करासमेत व अनुयायींसमेत जहन्नमच्या भडकत्या

आगीत झोकून देईल.

या वस्तुस्थितीचा विचार करता हा विचार करणे उचित नव्हे की सैतानाचे एखादे व्यक्तिगता अस्तित्व नाही किंबहुना हे एक उदाहरण आहे व जे दुष्टते पासून सुरक्षित राहण्याकरिता प्रस्तुत केले गेले आहे. तसेच सैतानाला ईश्वराचा प्रतिद्वंद्वि समजणेहि योग्य नव्हे. अग्निपूजक अशी धारणा बाळगतात व त्यासाठी त्यांनी ''अहरमन'' हे नाव योजिले आहे. त्याचप्रमाणे सैतानाला अपायांचा देवता समजणेहि योग्य नव्हे. जसे अनेकेश्वरवादी धर्मांमध्ये समजले जाते. ह्या सर्व कल्पना वस्तुस्थिती विरूद्ध व खोट्या आहेत.

४१. आदम व हव्वा एक जोडीच्या रूपाने जन्नतमध्ये रहात होते. जेथे ना निसर्गजन्य गरजेचा एखादा प्रश्न होता, ना लज्जारक्षणाचा कारण जन्नतच्या पोषाखाद्वारे त्यांची लज्जास्थाने अशाप्रकारे लपवून ठेवली गेली होती की त्यांना स्वत:ला उमगून येऊ शकत नव्हते, परंतु सैतान जेव्हा त्यांना धोका देण्यात सफळ झाला व त्यांच्या हातून अपराध घडला तेव्हा त्यांची लज्जास्थाने त्यांना उमगली व त्यांना जन्नतमधून निघावे लागले. जन्नतमधून हे निघणे ज्याअर्थी सैतानाच्या फसवणूकीचा परिणाम होता म्हणून याचे अशाप्रकारे वर्णन केले गेले आहे की सैतानाने दोघांना जन्नतमधून बाहेर काढले.

४२. सैतान एक असा शत्रू आहे ज्याला मनुष्य पाहू शकत नाही. परंतु त्याच्या अवलोकनात न येण्याचा अर्थ तो अस्तित्वात नाही असा नव्हे, जेव्हा सृष्टी निर्माता त्याच्या आस्तित्वाची आम्हाला खबर देत आहे. आणि मानव-इतिहासात चांगल्या वाईट घटनांची जी रणांगणे गाजत राहिलीत आणि जगात उपद्रव व उत्पाताची जी अत्याधिकता आहे. ती या गोष्टीचा डोळस पुरावा होय की एक अदृश्य उपद्रवप्रिय शक्ति माणसांना बहकाविण्यात व त्यांना उपद्रव व उत्पाताचे उत्तेजन देण्यास कार्यरत आहे.

आज कित्येक वस्तूना सूक्ष्मदर्शक यंत्राद्वारे व दुर्बिणीद्वारे पाहिले जाते परंतु या यंत्रांच्या संशोधनापूर्वी मनुष्य या वस्तुविषयी अनभिज्ञ होता म्हणून अनुभवात न आलेल्या एखाद्या अशा गोष्टीचा नकार दर्शविणे उचित नव्हे, जिच्या आस्तित्वाची खबर आम्हाला विश्वसनीय माध्यमाद्वारे मिळत असावी.

या आयतीद्वारे हेहि माहित झाले की सैतान व त्याच्या समूहाला जो जिन्न जातीशी संबंधित आहे. मनुष्य पाहू शकत नाही याखेरीज की सर्वश्रेष्ठ अल्लाहने एखादी असाधारण स्थिती निर्माण केली असावी ज्याप्रकारे हजरत सुलेमान यांच्याकरिता त्याने निर्माण केली होती. यास्तव सैतान किंवा जिन्नांना पाहण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. तसेच सर्वसाधारणपणे जिन्नांना पाहण्यासंबंधी ज्या विचित्र गोष्टी वर्णिल्या जातात त्याहि विश्वासार्ह नाहीत.

४३. अरब लोक काबागृहाची प्रदक्षिणा नग्नावस्थेत करीत असत. पुरुष दिवसा व स्त्रीया रात्री नग्नावस्थेत प्रदक्षिणा करीत तथापि कुरेश याला अपवाद होते. या प्रथेला धार्मिक पावित्र्याचे स्थान प्राप्त झाले होते. कारण ते आपल्या धर्माला जो त्यांच्या वाडवडीलांपासून चालत अला होता व ज्यात अन्य मार्गभ्रष्टतेखेरीज नग्नावस्थेत प्रदक्षिणा करण्याची बिदअताहि सामील झाली होती, अल्लाहकडून समजत होते. अर्थात या धर्मबाह्य प्रथेमागे ही कल्पना कार्यरत होती की कपडे शोभेच्या वस्तू होत व प्रदक्षिणेसारख्या उपासनेला या ऐहीक शोभेपासून अल्पित ठेवले पाहिजे. अशाप्रकारे धर्माचे आवरण ओढून ते एक लज्जास्पद कृत्य करीत होते. कारण विवेक बुद्धि नग्नतेला लज्जास्पद कृत्य ठरविते. राहिला हा दावा की ईश्वराने असे करण्याचा आदेश दिला आहे तर याचा काहीच पुरावा नाही व ना हे मान्य केले जाऊ शकते की ईश्वराने निर्लज्जतेचे प्रदर्शन करण्याचा आदेश दिला असेल. म्हणून हा दावा ज्ञानावर नव्हे तर अज्ञानावर आधारीत आहे.

नग्नतेला धार्मिक पावित्र्याचा दर्जा देणारे आज देखील आढळून येतात. साधू सन्यासी केवळ एका लंगोटीवरच समाधान मानतात आणि यांच्यापैकी काही लोक तर संपूर्णत: नग्नावस्थेत राहून आपल्या धार्मिकतेचे निदर्शन करतात. वस्तुस्थिती ही आहे की मनुष्य जेव्हा शिर्क (अनेकेश्वरवाद)व कुफ्र (सत्य- विरोधा)च्या मार्गावर चालू लागतो.तेव्हा त्याची मति कुंठित होते.

४४. येथे ''किस्त'' (न्याय) हा शब्द व्यापक अर्थाने प्रयोगात आला आहे. सरळपणा संतुलन औचित्य व न्याय इत्यादि याच्या अर्थात सामील आहेत. अर्थात हे की अल्लाह अशा लज्जास्पद व असभ्य गोष्टींचा आदेश देत नाही की त्याच्या उपासनेकरिता नग्न व्हावे. किंबहुना त्याचे आदेश न्यायावर आधारीत असतात. व त्यांच्याद्वारे मुष्य स्वभावाशी पूरेपूर न्याय केला जातो. तो असा कोणताहि आदेश देत नाही जो मनुष्य स्वभावावर व त्याच्या नैतिक पात्रतेवर अत्याचार करणारा असेल त्याच्या आदेशात कमी अधिक होत नाही किंबहुना अत्याधिक दर्जाचे संतुलन असते. व ते मनुष्य जीवनाकरिता लाभप्रद ठरतात. त्याने प्रत्येक बाबतीत सरळपणा आंगिकारण्याचा आदेश दिला आहे. मग मनुष्य आंधळा होऊन त्या रीतीरिवाजांना का म्हणून मान्य करतो ज्यांना धर्मांच्या नावाने सादर केले जाते परंतु त्याच्या नैतिक दृष्ट्या वाईट असण्याचा पैलू इतका स्पष्ट असतो की कोणत्याहि

बुद्धिशील व भान राखणाऱ्या मनुष्याला हे जाणवल्या खेरीज राहणार नाही.

४५. अर्थात उपासनेत तुमचा रोख अल्लाहकडेच असला पाहिजे मग तुम्ही मसजिदे हराममध्ये असा किंवा अन्य एखाद्या उपासना स्थळी अल्लाहखेरीजच्या उपास्यांच्या उपासनेचा कसलाहि विचार मनात न यावा. अल्लाहकडे आपला रोख सरळ राखण्याच्या अर्थात हेहि सामील आहे की माणसाने अल्लाहची सरळसरळ उपासना करावी. आणि एखाद्यास माध्यम वा वसीला ठरवून त्याची उपासना करु नये.

४६. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बय्यिना टीप क्र.९

३०. एका समूहास त्याने मार्ग दाखविला व दुसऱ्या समूहावर मार्गभ्रष्टता साबित झाली. त्यांनी अल्लाहला सोडून सैतानांना आपला मित्र बनविले आहे. आणि समजतात की आम्ही सरळ मार्गावर आहोत.

فَرِيْقًا هَدٰى وَ فَرِيْقًا حَقَّ عَلَيْهِمُ الضَّلٰلَةُ ؕ اِنَّهُمُ
اتَّخَذُوا الشَّيٰطِيْنَ اَوْلِيَآءَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ
وَيَحْسَبُوْنَ اَنَّهُمْ مُّهْتَدُوْنَ ﴿۳۰﴾

३१. हे आदम संतती ! प्रत्येक मसजिदीत उपस्थित राहतांना स्वत:ला वस्त्र प्रावरणाने सुशोभित करा [४७] आणि खा व प्या [४८] मात्र मर्यादेचे उल्लंघन करू नका कारण अल्लाह मर्यादोल्लंघन करणाऱ्यांना पसंत करीत नाही.

يٰبَنِيْٓ اٰدَمَ خُذُوْا زِيْنَتَكُمْ عِنْدَ كُلِّ مَسْجِدٍ وَّكُلُوْا وَاشْرَبُوْا وَلَا
تُسْرِفُوْا ۚ اِنَّهٗ لَا يُحِبُّ الْمُسْرِفِيْنَ ﴿۳۱﴾

३२. सांगा, अल्लाहच्या त्या शोभेला जी त्याने आपल्या दासांकरिता निर्माण केली आहे व उपजिविकेच्या स्वच्छशुद्ध वस्तुंना कोणी हराम केले आहे ?[४९] सांगा या वस्तु इहलोकीय जीवनात ईमान बाळगणाऱ्यांकरिता आहेत आणि कियामतीच्या दिवशी तर निव्वळ त्यांच्याच करिता असतील [५०] अशाप्रकारे आम्ही आपल्या आदेशांना त्या लोकांकरिता स्पष्टत: वर्णितो जे जाणणारे आहेत.[५१]

قُلْ مَنْ حَرَّمَ زِيْنَةَ اللّٰهِ الَّتِيْٓ اَخْرَجَ لِعِبَادِهٖ وَالطَّيِّبٰتِ مِنَ
الرِّزْقِ ؕ قُلْ هِيَ لِلَّذِيْنَ اٰمَنُوْا فِي الْحَيٰوةِ الدُّنْيَا خَالِصَةً
يَّوْمَ الْقِيٰمَةِ ؕ كَذٰلِكَ نُفَصِّلُ الْاٰيٰتِ لِقَوْمٍ يَّعْلَمُوْنَ ﴿۳۲﴾

३३. सांगा, माझ्या पालनकर्त्याने ज्या गोष्टींना हराम ठरविले आहे त्या तर ह्या होत निर्लज्जतेच्या गोष्टी मग त्या उघड असोत वा लपलेल्या [५२] आणि गुन्हा,[५३] आणि नाहक अतिरेक [५४] आणि हे की तुम्ही अल्लाह सोबत एखाद्यास सहभागी ठरवावे ज्याच्याकरिता त्याने कोणती सनद (प्रमाणपत्र) अवतरीत केली नाही [५५] तसेच हे की अल्लाहच्या नावाने अशी गोष्ट सांगावी जिचे तुम्हाला काहीहि ज्ञान नाही.[५६]

قُلْ اِنَّمَا حَرَّمَ رَبِّيَ الْفَوَاحِشَ مَا ظَهَرَ مِنْهَا وَمَا بَطَنَ وَ الْاِثْمَ
وَالْبَغْيَ بِغَيْرِ الْحَقِّ وَاَنْ تُشْرِكُوْا بِاللّٰهِ مَا لَمْ يُنَزِّلْ بِهٖ سُلْطٰنًا
وَّاَنْ تَقُوْلُوْا عَلَى اللّٰهِ مَا لَا تَعْلَمُوْنَ ﴿۳۳﴾

३४. आणि प्रत्येक जाती समूहाकरिता एक निर्धारीत समय आहे मग जेव्हा त्यांची निर्धारीत वेळ आली तर ते ना एक क्षण मागे राहू शकतात व ना एक क्षण पुढे. [५७]

وَلِكُلِّ اُمَّةٍ اَجَلٌ ۚ فَاِذَا جَآءَ اَجَلُهُمْ لَا يَسْتَاْخِرُوْنَ سَاعَةً
وَّلَا يَسْتَقْدِمُوْنَ ﴿۳۴﴾

४७. म्हणजे मसजिदे हराम असो वा अन्य एखादी मसजिद तिच्यात उपस्थित होतांना पोषाख उतरवून नव्हे तर पोषाख घालून गेले पाहिजे. कारण ईश्वराच्या दरबारात उपस्थित होण्याकरीता सभ्यता अत्यावश्यक आहे.

४८. उद्दिष्ट हे की, धर्माच्या त्या सन्यासीपणाच्या, विरक्तपणाच्या व योगीपणाच्या कल्पनांचे खंडन करणे होय जे पोषख व खाण्यापिण्या बाबतीत माणसाला सक्तिवादी बनवित जणू ही इहलोकीय मलीनता आहे जिचा त्याग करणेच अधिक चांगले, मग ही कल्पना माणसाला या गोष्टीकरिता प्रवृत्त करते की त्या राहणी मानाच्या वस्तू आहेत. त्या उपलब्ध असतांनाहि माणसाने आपल्या आत्म्यास मारावे. याउलट इस्लाम ज्या वस्तुंना अल्लाहने प्रदान केलेल्या देणग्या ठरवितो ज्या मानवाच्या फायद्यासाठीच निर्माण केल्या गेल्या आहेत, तथापि ज्याप्रमाणे आयतीत पुढे फर्माविले गेले आहे. उधळपट्टी पासून अलिप्त राहिले पाहिजे.

४९. हा प्रश्न धर्माच्या योगी कल्पनेवर व विरक्तिच्या विचार सरणीवर आघात करतो. अर्थात हे की पोषाख सारखी वस्तू जी माणसाला सौंदर्य प्रदान करते आणि खाण्यापिण्याच्या स्वच्छ शुद्ध वस्तू माणसा करिता उपजिविकेची सामुग्री आहे म्हणून निर्माण केली गेली आहे. ज्यायोगे मनुष्याने सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या या देणगींचा लाभ घ्यावा, मग या वस्तूंना अल्लाहच्या दासांकरिता हराम ठरविण्याचा, किंवा ईश्वर व धर्मांच्या नावाने या वस्तूंच्या वापराबाबत आपल्यातर्फे बंधने लागू करण्याचा कोणाला काय अधिकार आहे? ही आयत या प्रकारच्या समस्त बंधनांना रद्द ठरविते.

५०. अर्थात जगात या ईश देणग्या सर्व ईश- दासांकरिता आहेत, परंतु ईश्वराच्या निष्ठावंत (ईमान बाळगणाऱ्या) दासांना यांचा लाभ घेण्याचा सर्वप्रथम हक्क पोहचतो आणि कियामतीच्या दिवशी तर या देणग्या यांच्याच हिश्श्यता येतील. काफ़ीर (सत्य-विरोधक) या देणग्यांपासून अगदी वंचित राहतील.

५१. अर्थात हे आदेश जे इतक्या स्पष्टीकरणासह कुरआनात वर्णिले गेले आहेत, सर्वसामान्यात: तेच लोक मार्गदर्शन प्राप्त करु शकतील. जे अज्ञानात खितपत पडलेले नाहीत किंबहुना ज्यांनी आपली जीवन यात्रा ज्ञानाच्या प्रकाशात पार पाडण्याचा निश्चय केला आहे.

५२. याचे स्पष्टीकरण सूरह अनआम टीप क्र. २७७ मध्ये केले गेले आहे. येथे धर्मपूजकांच्या या वर्तनावर अंकुश ठेवला गेला आहे की ज्या चांगल्या व स्वच्छ शुद्ध वस्तु अल्लाहने हलाल ठरविल्या होत्या त्यांना तुम्ही हराम ठरविले. परंतु ज्या वाईट व लज्जास्पद गोष्टी अल्लाहने हराम ठरविल्या होत्या त्या तुम्ही हलाल ठरविल्या.

५३. अर्थात प्रत्येक प्रकारची दुष्कृत्ये.

५४. अर्थात अत्याचार व अतिरेकाची कामे जी पूर्णपणे सत्य-विरोधी आहेत. ज्यांच्याकरिता कोणतेहि शस्त्रविहित कारण नाही.

५५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. १३५

५६. अर्थात ईश्वराकडे अशा गोष्टीचा संबंध दाखविणे ज्याविषयी माहीत नाही की त्या खरोखरच ईश्वराने सांगितल्या आहेत. वा तसा आदेश दिला आहे. धर्मात नव्या प्रथांना प्रचलीत करणे धर्म स्थापित करणे व आपल्या मनाला पटेल त्या पद्धतिनुसार शरीयत रचना करणे इत्यादि सर्व गोष्टींना लागू पडते.

५७. येथे जाती समूहाशी अभिप्रेत पैगंबराचा जातीसमूह होय जसे की सूरह युनूस आयत ४७ मध्ये फर्माविले गेले आहे.

وَلِكُلِّ أُمَّةٍ رَّسُولٌ فَإِذَا جَاءَ رَسُولُهُمْ قُضِيَ بَيْنَهُم بِالْقِسْطِ وَهُمْ لَا يُظْلَمُونَ۔

''प्रत्येक जाती समूहाकरिता एक पैगंबर आहे मग जेव्हा पैगंबर त्यांच्याजवळ येतो, तेव्हा त्यांच्या दरम्यान न्यायासह निर्णय केला जातो व त्यांच्याशी अन्याय कदापी केला जात नाही.''

अर्थात हे की जेव्हा एखादा पैगंबर एखाद्या जातीसमूहाकडे पाठविला जातो.तर त्या जाती समूहाकरिता अल्लाह एक मुदत निर्धारीत करतो. ज्यायोगे त्या जातीसमूहाने या मुदतीत पैगंबराचे आवाहन स्वीकारावे व बंडखोरपणा पासून माघार घ्यावी. परंतु जेव्हा तो समूह या निर्धारीत काळात पैगंबराचे आवाहन स्वीकारीत नाही. किंबहुना सत्य-विरोधाचे वर्तन अंगिकारतो तेव्हा निर्धारीत मुदत पूर्ण होताच इहलोकातच त्याची पकड होते. व ही पकड अशाप्रकारे योग्य वेळी होते की एक क्षण देखील मागे पुढे होत नाही.

३५. हे आदमा संतती ! जर तुमच्याजवळ तुमच्यामधूनच पैगंबर येतील जे तुम्हाला माझ्या आयती ऐकवतील तर जो कोणी अल्लाहचे भय बाळगील व आपली सुधारणा करील तर अशा लोकांकरिता ना कसले भय असेल ना ते दु:खी होतील. [५८]

يَٰبَنِيٓ ءَادَمَ إِمَّا يَأۡتِيَنَّكُمۡ رُسُلٞ مِّنكُمۡ يَقُصُّونَ عَلَيۡكُمۡ ءَايَٰتِي فَمَنِ
ٱتَّقَىٰ وَأَصۡلَحَ فَلَا خَوۡفٌ عَلَيۡهِمۡ وَلَا هُمۡ يَحۡزَنُونَ ٣٥

३६. आणि जे लोक आमच्या आयतींना खोटे ठरवतील व त्यांच्या विरोधात गर्व करतील ते जहन्नमवाले आहेत सदैव जहन्नम (अग्नि) मध्ये राहणारे.

وَٱلَّذِينَ كَذَّبُواْ بِـَٔايَٰتِنَا وَٱسۡتَكۡبَرُواْ عَنۡهَآ أُوْلَٰٓئِكَ أَصۡحَٰبُ ٱلنَّارِۖ
هُمۡ فِيهَا خَٰلِدُونَ ٣٦

३७. मग त्या माणसाहून अधिक अत्याचारी कोण असेल जो अल्लाहच्या नावाने खोटे नाटे रचील किंवा त्याच्या आयतींना खोटे ठरवील ? अशा लोकांना अल्लाहच्या लिखितानुसार आपला हिस्सा मिळत राहील [५९] येथपावेतो की आमचे दूत (फिरिश्ते) त्यां (च्याप्राणां)ना ताब्यात घेण्याकरिता पोहचतील त्यावेळी ते त्यांना विचारतील, कोठे आहेत तुमची ती दैवते ज्यांना तुम्ही अल्लाहला सोडून पुकारीत होता ?ते म्हणतील की,ते आमच्यापासून हरवले गेले व ते स्वत: आपल्या विरूद्ध साक्ष देतील की खरोखर ते काफिर (सत्याचा इन्कार करणारे) होते. [६०]

فَمَنۡ أَظۡلَمُ مِمَّنِ ٱفۡتَرَىٰ عَلَى ٱللَّهِ كَذِبًا أَوۡ كَذَّبَ بِـَٔايَٰتِهِۦٓۚ
أُوْلَٰٓئِكَ يَنَالُهُمۡ نَصِيبُهُم مِّنَ ٱلۡكِتَٰبِۖ حَتَّىٰٓ إِذَا جَآءَتۡهُمۡ
رُسُلُنَا يَتَوَفَّوۡنَهُمۡ قَالُوٓاْ أَيۡنَ مَا كُنتُمۡ تَدۡعُونَ مِن
دُونِ ٱللَّهِۖ قَالُواْ ضَلُّواْ عَنَّا وَشَهِدُواْ عَلَىٰٓ أَنفُسِهِمۡ أَنَّهُمۡ
كَانُواْ كَٰفِرِينَ ٣٧

३८. आदेश दिला जाईल: जिन्न आणि मनुष्यांचे जे समूह तुमच्यापूर्वी होऊन गेले आहेत त्यांच्याच सोबत तुम्ही देखील जहन्नमच्या आगीत दाखल व्हा. जेव्हा एखादा समूह यात दाखल होईल. आपल्या सोबतच्या समूहाची निर्भत्सना करील [६१] येथपावेतो की जेव्हा सर्व तेथे एकत्रित होतील तेव्हा मागील समूह आपल्या आधीच्या समूहाबद्दल म्हणेल की हे आमच्या पालनकर्त्या ! याच लोकांनी आम्हाला मार्गभ्रष्ट केले. म्हणून यांना आगीची दुप्पट शिक्षा दे . फर्माविले, प्रत्येकासाठी दुप्पट शिक्षा आहे [६२] परंतु तुम्ही जाणत नाही.

قَالَ ٱدۡخُلُواْ فِيٓ أُمَمٖ قَدۡ خَلَتۡ مِن قَبۡلِكُم مِّنَ ٱلۡجِنِّ وَٱلۡإِنسِ
فِي ٱلنَّارِۖ كُلَّمَا دَخَلَتۡ أُمَّةٞ لَّعَنَتۡ أُخۡتَهَاۖ حَتَّىٰٓ إِذَا ٱدَّارَكُواْ فِيهَا
جَمِيعٗا قَالَتۡ أُخۡرَىٰهُمۡ لِأُولَىٰهُمۡ رَبَّنَا هَٰٓؤُلَآءِ أَضَلُّونَا فَـَٔاتِهِمۡ
عَذَابٗا ضِعۡفٗا مِّنَ ٱلنَّارِۖ قَالَ لِكُلّٖ ضِعۡفٞ
وَلَٰكِن لَّا تَعۡلَمُونَ ٣٨

५८. ही त्या धड्याची उजळणी होय जो मानव जातीला प्रारंभी दिला गेला होता.

५९. अर्थात जेवढे दिवस व ज्याप्रकारचे जीवन यांच्या भाग्यात लिहिले आहे तेवढे पूर्ण करतील.

६०. हे प्रशानोत्तर मृत्युचे फिरिश्ते व आत्मा यांच्या दरम्यान होते, आणि अनेकेश्वरवाद्याचा आत्मा हे मान्य करतो की ज्यांना तो ईश्वर समजून पुकारत राहिला आहे ते सर्व खोटे ईश्वर होते, आणि खऱ्या ईश्वराचा इन्कार करून त्याने फार मोठा गुन्हा केला आहे.

तात्पर्य, डोळे मिटताच अपरोक्ष वस्तुस्थिती व्यक्त होऊ लागते.

६१. जगात मार्गभ्रष्ट समूह संस्कृति, कल्चर व इतर व्यवहारात आपल्या समकालीन मार्गभ्रष्ट समूहांचे समर्थन करीत राहिले आहेत, आणि असेहि घडले आहे की मार्गभ्रष्ट समूह आपल्या समकालीन समूहांचे नेतृत्व करीत राहिला. समर्थक आपल्या समकालीनांशी श्रद्धा व्यक्त करीत राहिले, व आपल्या मार्गभ्रष्ट नेत्यांना आदरांजली वाहत राहिले परंतु कियामतीच्या दिवशी जेव्हा जहन्नममध्ये सर्व एकत्रित होतील तेव्हा आपल्या अनुयायांवर व नेत्यांवर निर्भत्सनेचे पहाड कोसळवतील की त्यांनीच चुकीची उदाहरणे कायम केली होती, ज्यामुळे ते मार्गभ्रष्ट झाले.

६२. अर्थात जो समूह मार्गभ्रष्ट झाला त्याने अन्य समूह व अगामी पिढ्यांकरिता मार्गभ्रष्टतेची सामुग्री केली म्हणून प्रत्येक समूह दुप्पट गुन्हेगार झाला, यास्तव दुप्पट शिक्षेस पात्र आहे.

३९. आणि पहिला समूह मागच्या समूहाशी म्हणेल की तुम्हाला आमच्यावर कसलेहि वर्चस्व प्राप्त झाले नाही, म्हणून तुम्ही देखील आपल्या कमाईच्या मोबदल्यात शिक्षेची गोडी चाखा. [६३]

وَقَالَتْ أُولَاهُمْ لِأُخْرَاهُمْ فَمَا كَانَ لَكُمْ عَلَيْنَا مِنْ فَضْلٍ
فَذُوقُوا الْعَذَابَ بِمَا كُنْتُمْ تَكْسِبُونَ ﴿٣٩﴾

४०. नि:संशय ज्या लोकांनी आमच्या आयतींना खोटे ठरविले व त्यांच्या विरोधात गर्व केला त्यांच्याकरिता आकाशाचे दरवाजे कदापि उघडले जाणार नाहीत [६४] व ना ते जन्नतमध्ये दाखल होऊ शकतील, जोपर्यंत उंट सूईच्या छिद्रातून पार होत नाही.[६५] आम्ही अपराध्यांना अशीच शिक्षा देतो.

إِنَّ الَّذِينَ كَذَّبُوا بِآيَاتِنَا وَاسْتَكْبَرُوا عَنْهَا لَا تُفَتَّحُ لَهُمْ
أَبْوَابُ السَّمَاءِ وَلَا يَدْخُلُونَ الْجَنَّةَ حَتَّىٰ يَلِجَ الْجَمَلُ فِي
سَمِّ الْخِيَاطِ ۚ وَكَذَٰلِكَ نَجْزِي الْمُجْرِمِينَ ﴿٤٠﴾

४१. त्यांच्याकरिता जहन्नमचाच बिछाना असेल व वरून पांघरुणहि त्याचेच असेल.आम्ही अत्याचारींना अशाचप्रकारे मोबदला देतो.

لَهُمْ مِنْ جَهَنَّمَ مِهَادٌ وَمِنْ فَوْقِهِمْ غَوَاشٍ ۚ وَكَذَٰلِكَ نَجْزِي
الظَّالِمِينَ ﴿٤١﴾

४२. आणि ज्या लोकांनी ईमान बाळगले व सदाचरण केले आणि आम्ही कोणावरहि त्यांच्या सामर्थ्याहून अधिक ओझे टाकत नाही [६६] ते जन्नतवाले आहेत जिथे ते सदैव राहतील.

وَالَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ لَا نُكَلِّفُ نَفْسًا إِلَّا وُسْعَهَا
أُولَٰئِكَ أَصْحَابُ الْجَنَّةِ ۖ هُمْ فِيهَا خَالِدُونَ ﴿٤٢﴾

४३. त्यांच्या मनात जी मलीनता असेल ती आम्ही काढून घेऊ [६७] त्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील आणि ते म्हणतील अल्लाहचा आभार ज्याने आम्हाला याचे मार्गदर्शन दिले [६८] जर अल्लाहने आम्हाला मार्गदर्शन दिले नसते तर आम्हाला कधीहि मार्गदर्शन प्राप्त झाले नसते. आमच्या पालनकर्त्याचे पैगंबर सत्य घेऊन आले होते. व त्यांना पुकारून सांगितले जाईल की ही आहे जन्नत जिचे, तुम्ही आपल्या आचरणाच्या मोबदल्यात वारस ठरविले गेले आहात.

وَنَزَعْنَا مَا فِي صُدُورِهِمْ مِنْ غِلٍّ تَجْرِي مِنْ تَحْتِهِمُ الْأَنْهَارُ ۖ
وَقَالُوا الْحَمْدُ لِلَّهِ الَّذِي هَدَانَا لِهَٰذَا وَمَا كُنَّا لِنَهْتَدِيَ لَوْلَا
أَنْ هَدَانَا اللَّهُ ۖ لَقَدْ جَاءَتْ رُسُلُ رَبِّنَا بِالْحَقِّ ۖ وَنُودُوا أَنْ
تِلْكُمُ الْجَنَّةُ أُورِثْتُمُوهَا بِمَا كُنْتُمْ تَعْمَلُونَ ﴿٤٣﴾

४४. आणि जन्नतवासी दोजख वासीयांना पुकारून म्हणतील की आमच्या पालनकर्त्याने आमच्याशी जो वायदा केला होता, तो आम्हाला खरा दिसून आला मग काय तुम्हाला देखील तो वायदा खरा दिसून आला जो तुमच्या पालनकर्त्याने तुमच्याशी केला होता ? ते उत्तर देतील 'होय' त्यावेळी एक पुकारणारा त्यांच्या दरम्यान पुकारील की अल्लाहचा शाप असो अत्याचाऱ्यांवर.[६९]

وَنَادَىٰ أَصْحَابُ الْجَنَّةِ أَصْحَابَ النَّارِ أَنْ قَدْ وَجَدْنَا مَا وَعَدَنَا
رَبُّنَا حَقًّا فَهَلْ وَجَدْتُمْ مَا وَعَدَ رَبُّكُمْ حَقًّا ۖ قَالُوا نَعَمْ ۚ فَأَذَّنَ
مُؤَذِّنٌ بَيْنَهُمْ أَنْ لَعْنَةُ اللَّهِ عَلَى الظَّالِمِينَ ﴿٤٤﴾

६३. म्हणजे आम्ही जर तुमच्याकरिता मोठे उदाहरण कायम केले होते तर तुम्ही इतरांकरिता कोणते चांगले उदाहरण कायम केले की तुमचा अपराध कमी व्हावा. जर तुम्ही आमचे समर्थन करुन मार्गभ्रष्ट झालात तर तुमचे समर्थन करून इतर समूह मार्गभ्रष्ट झाले यास्तव तुमचा अपराध आपल्या जागी आहे व त्याच्या परिणामांना तुम्ही स्वत: जबाबदार आहात.

६४. अर्थात त्यांच्या नशीबी उच्चता नव्हे किंबहुना अधोगती आहे. त्यांच्याकरिता प्रगतीचे सर्व मार्ग खुंटले ते ना आकाशस्थ विश्वात दाखल होऊ शकतील, ना त्यांना मान्यतेचे स्थान प्राप्त होऊ शकेल.

६५. म्हणजे ज्याप्रकारे सूईच्या छिद्रातून उंटाचे जाणे असंभव आहे. तद्वतच त्या काफ़ीर व अनेकेश्वरवादी लोकांचे जन्नतमध्ये दाखल होणे अशक्य होय. बायबलमध्येहि यास मिळती जुळती गोष्ट वर्णिली गेली आहे.

''तेव्हा येशू आपल्या शिष्यास म्हणाला, मी तुम्हाला खचित सांगतो स्वर्गाच्या राज्यात  धनवानाचा प्रवेश होणे कठीण आहे मी आणखी तुम्हाला सांगतो, देवाच्या राज्यात धनवानाचा प्रवेश होणे ह्यापेक्षा उंटाला सूईच्या नाकातून जाणे सोपे आहे. (मत्तय १९ : २३ - २४)

६६. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ४८२ मध्ये केले गेले आहे.

६७. म्हणजे ईमान बाळगणाऱ्यांच्या दरम्यान आपसात जो मनमुटाव राहीला असेल तो दूर केला जाईल. आणि कटुतेचे जे व्रण असतील ते मिटवले जातील. सर्वश्रेष्ठ अल्लाह यांची मने स्वच्छ शुद्ध करून त्यांना जन्नतमध्ये दाखल करील म्हणून त्यांना आपण खऱ्याखुऱ्या मित्र-गणात असल्याचे दिसून येईल.

६८. ईमान बाळगणारे जन्नतमध्ये दाखल झाल्यानंतर आपल्या आचरणाबद्दल घमेंड करणार नाहीत की आम्ही कर्तबगारीच अशी दाखवली की ज्यामुळे जन्नतचे हक्कदार झालो. किंबहुना ते याला अल्लाहची कृपा व अनुग्रह समजतील व त्याशी कृतज्ञता व्यक्त करतील. कारण त्याच्या मार्गदर्शनाने व त्याने प्रदान केलेल्या सुबुद्धिमुळे ते या यशा पर्यंत पोहचण्यास योग्य झाले.

६९. जन्नत वाल्यांचे दोजख वाल्यांशी संभाषण जेव्हा त्यांच्या दरम्यान फार मोठे अंतर असेल हे दर्शविते की आखिरतच्या विश्वात ऐकण्याची व पाहण्याची शक्ति इहलोकाच्या तुलनेने कित्येक पटींनी जास्त असेल व निवेदनाची साधनेहि मर्यादित स्वरुपाची नसतील. ही गोष्ट आजच्या विज्ञान काळातील मनुष्याला किंचितहि आश्चर्य चक्ति करणारी नाही कारण तो टेलीफोन व टेलीविजनद्वारे हजारो मैल दूरपर्यंत आपला आवाज व प्रतिमा परिवर्तित करू शकतो. आणि अवकाशात उड्डाण करणाऱ्या मनुष्याशी संभाषण करू शकतो.

४५. जे अल्लाहच्या मार्गापासून रोखत होते. व त्यात वक्रता निर्माण करू इच्छित होते [७०] आणि आखिरतचा इन्कार करणारे होते.

الَّذِينَ يَصُدُّونَ عَن سَبِيلِ اللَّهِ وَيَبْغُونَهَا عِوَجًا وَهُم
بِالْآخِرَةِ كَافِرُونَ ﴿٤٥﴾

४६. आणि दोघांच्या दरम्यान एक आड पडदा असेल [७१] आणि अअराफ (उंची) वर काही लोक असतील जे प्रत्येकाला त्याच्या लक्षणावरून ओळखतील [७२] ते जन्नत वासीयांना पुकारून म्हणतील. तुम्हावर शांती असो [७३] ते अजून यात दाखल झाले नाहीत परंतु याची अपेक्षा बाळगत असतील.[७४]

وَبَيْنَهُمَا حِجَابٌ ۚ وَعَلَى الْأَعْرَافِ رِجَالٌ يَعْرِفُونَ كُلًّا بِسِيمَاهُمْ ۚ
وَنَادَوْا أَصْحَابَ الْجَنَّةِ أَن سَلَامٌ عَلَيْكُمْ ۚ لَمْ يَدْخُلُوهَا
وَهُمْ يَطْمَعُونَ ﴿٤٦﴾

४७. आणि जेव्हा त्यांच्या नजरा दोज़ख़ वासीयांकडे वळविल्या जातील तेव्हा म्हणतील, हे आमच्या पालनकर्त्या, आम्हाला या अत्याचारी लोकांत सामील करू नकोस.

وَإِذَا صُرِفَتْ أَبْصَارُهُمْ تِلْقَاءَ أَصْحَابِ النَّارِ قَالُوا رَبَّنَا لَا
تَجْعَلْنَا مَعَ الْقَوْمِ الظَّالِمِينَ ﴿٤٧﴾

४८. आणि अअराफवाले काही व्यक्तिंना त्यांच्या लक्षणांवरून ओळखून पुकारतील की ना तर तुमचे जथे तुमच्या कामी आले आणि ना त्या वस्तू ज्यांच्याविषयी तुम्हाला घमेंड होती.[७५]

وَنَادَىٰ أَصْحَابُ الْأَعْرَافِ رِجَالًا يَعْرِفُونَهُم بِسِيمَاهُمْ قَالُوا
مَا أَغْنَىٰ عَنكُمْ جَمْعُكُمْ وَمَا كُنتُمْ تَسْتَكْبِرُونَ ﴿٤٨﴾

४९. आणि काय हे (ईमान बाळगणारे) तेच लोक नव्हेत ज्यांच्याविषयी तुम्ही शपथ घेऊन सांगत होते की यांना अल्लाह कधीहि आपल्या कृपेने उपकृत करणार नाही ?(परंतु आज त्यांना सांगितले गेले की) दाखल व्हा जन्नतमध्ये तुमच्याकरिता ना कसली भिती आहे, ना कसल्याही प्रकारचे दुःख.[७६]

أَهَٰؤُلَاءِ الَّذِينَ أَقْسَمْتُمْ لَا يَنَالُهُمُ اللَّهُ بِرَحْمَةٍ ۚ ادْخُلُوا الْجَنَّةَ
لَا خَوْفٌ عَلَيْكُمْ وَلَا أَنتُمْ تَحْزَنُونَ ﴿٤٩﴾

५०. आणि दोज़ख़वासी जन्नतवासीयांना पुकारतील की थोडेसे पाणी आमच्यावर टाकून द्या किंवा जी उपजिविका अल्लाहने तुम्हाला दिली आहे त्यातून काही द्या.ते उत्तर देतील की या वस्तु अल्लाहने काफीरांकरिता हराम केल्या आहेत.[७७]

وَنَادَىٰ أَصْحَابُ النَّارِ أَصْحَابَ الْجَنَّةِ أَنْ أَفِيضُوا عَلَيْنَا مِنَ
الْمَاءِ أَوْ مِمَّا رَزَقَكُمُ اللَّهُ ۚ قَالُوا إِنَّ اللَّهَ حَرَّمَهُمَا عَلَى
الْكَافِرِينَ ﴿٥٠﴾

५१. ज्यांनी आपल्या धर्माला खेळ तमाशा बनविले होते [७८] आणि ज्यांना ऐहीक-जीवनाने धोक्यात ठेवले होते, तर आज आम्ही देखील त्यांना त्याच प्रकारे विसरून जाऊ [७९] ज्याप्रकारे ते या दिवसाच्या भेटीस विसरले होते, व आमच्या आयतींचा इन्कार करीत राहिले.

الَّذِينَ اتَّخَذُوا دِينَهُمْ لَهْوًا وَلَعِبًا وَغَرَّتْهُمُ الْحَيَاةُ الدُّنْيَا ۚ
فَالْيَوْمَ نَنسَاهُمْ كَمَا نَسُوا لِقَاءَ يَوْمِهِمْ هَٰذَا وَمَا كَانُوا بِآيَاتِنَا
يَجْحَدُونَ ﴿٥١﴾

७०. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह आले-इमरान टीप क्र. १२५.

७१. जन्नत व दोजखच्या दरम्यान एक आडपडदा (Border) असेल जो अंतराचे काम करील. एका बाजूला जन्नत-विश्व असेल तर दुसऱ्या बाजूला दोजख-विश्व.

७२. या आडपडद्याच्या (Border)उंचीवरून ज्याला ''अअराफ'' म्हटले गेले आहे काही लोकांना जन्नत व दोजख दाखविले जाईल. मग ते त्या लोकांना, ज्यांच्याशी जगात संबंध होता, पाहून ओळखतील की ही अमुक व्यक्ति आहे व ही अमुक, जन्नत व जहन्नम मध्ये लोकांची मोठी संख्या असताना देखील खास खास लोकांना ओळखणे यामुळे शक्य होईल की प्रत्येक जन्नती व जहन्नमीकरिता एक विशिष्ट चिन्ह असेल, जी त्याच्या व्यक्तिमत्वास दृगोचर करीत असेल.

७३ अअराफ वाले जेव्हा त्या जन्नत वसीयांना पाहतील ज्यांना ते जगात ओळखत होते तर त्यांना शांतिचा संदेश देतील जणू त्यांच्या या यशाबद्दल अअराफ वाल्यांतर्फे त्यांचे हे अभिनंदन असेल.

७४. अर्थात अअराफ वाल्यांचा जन्नतमध्ये अजून प्रवेश झाला नसेल, परंतु तिची आशा बाळगणारे असतील. सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या या वर्णनावरून हे दिसून येते की तो त्यांना जन्नतवासीयांचे व दोजखवासीयांचे अवलोकन करवून जन्नतमध्ये दाखल करील.

अर्थात ''अअराफ वाले'' लोक कोणते याचे स्पष्टीकरण कुरआनने केले नाही, तथापि वाक्य संबंधावरून हे दिसून येते की ईमान बाळगणाऱ्यांपैकी हे असे लोक असतील. ज्यांचे आचरण अशा दर्जाचे नसेल की जन्नतमध्ये पुढाकाराने जावेत, म्हणून त्यांना जन्नतवाल्यांची व दोजख वाल्यांची स्थिती दाखवून दिल्यानंतर जन्नतमध्ये दाखल केले जाईल.

७५.म्हणजे दोजख वाल्यांपैकी ते त्या लोकांना ओळखतील ज्यांना ते जगात ओलखत होते, ज्यांनी सम्पत्ति व सत्ताधिकार वगैरेविषयी घमेंड होती व त्यांची ही घमेंड सत्य-आवाहन स्वीकारण्यात अडसर बनली. अशा लोकांना त्यांच्या विशिष्ट लक्षणांवरून ओळखून घेतल्यानंतर ते त्यांना आठवण करवतील की या वस्तू ज्यांच्याविषयी तुम्हाला अभिमान होता, आज तुमच्या काय कामी आल्यात?

तात्पर्य, फिरऔन, हामान, अबुलहब, अबुजहल व या प्रकारचे इतर नेते आपल्या विशिष्ट लक्षणांमुळे जहन्नममध्ये ओळखले जातील आणि जेव्हा अअराफवाले यांना आठवण करून देतील की त्यांचा अभिमान-सम्पत्ति त्यांच्या काहीच कामी आली नाही. तर अशाने त्यांच्या अपमान व अवहेलनेत अधिक भर पडेल.

७६. म्हणजे ईमान बाळगणाऱ्यांना जगात तुम्ही तुच्छतेने पाहत होता व हा दावा करीत होता की अल्लाहच्या दृष्टीनेहि त्यांची काहीहि किंमत नाही व ना ते अल्लाहच्या कृपेस पात्र आहेत,परंतु आज डोळे उघडून पहा की ह्याच लोकांना अल्लाहने सन्मानित केले आहे. व या प्रतिष्ठेने उपकृत केले आहे की, जन्नतमध्ये दाखल व्हा, तुमच्याकरिता ना कसले भय आहे, ना कसले दु:ख.

७७. अर्थात जन्नतमध्ये खाण्यापिण्याच्या ज्या वस्तु उपलब्ध असतील, त्यांपासून सर्वश्रेष्ठ अल्लाहने काफ़ीरांना (सत्याचा इन्कार करणाऱ्यांना) वंचित ठेवलेले असेल. म्हणून त्यांना कोणतीहि वस्तू दिली जाऊ शकणार नाही.

७८. हे सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे स्पष्टीकरण आहे जगात काफ़ीरांच्या अशा हरकती होत राहिल्या, मग ते आखिरतमध्ये बक्षिसांना कसे पात्र होऊ शकतात?

७९. सर्वश्रेष्ठ अल्लाह कोणत्याहि गोष्टीस विसरत नाही. येथे जे फर्मावि‌ले. की आम्ही यांना विसरून जाऊ तर याचा अर्थ सर्वश्रेष्ठ अल्लाहचे यांना दृष्टीआड करणे, व आपल्या दया- दृष्टीपासून त्यांना वंचित ठेवणे होय.

५२. आणि आम्ही या लोकांकडे एक असा ग्रंथ घेऊन आलो आहोत ज्यात आम्ही ज्ञानाच्या आधारे उघडपणे गोष्टींचे वर्णन केले आहे [८०] आणि जो ईमान बाळगणाऱ्यांकरिता मार्गदर्शन व कृपा आहे.

وَلَقَدْ جِئْنٰهُمْ بِكِتٰبٍ فَصَّلْنٰهُ عَلٰى عِلْمٍ هُدًى وَّرَحْمَةً
لِّقَوْمٍ يُّؤْمِنُوْنَ ﴿٥٢﴾

५३. काय हे लोक या गोष्टीची वाट पाहत आहेत की याची वास्तविकता जाहीर व्हावी? ज्या दिवशी याची वास्तविकता दृष्टीसमोर येईल तेव्हा ते लोक जे यास पूर्वी विसरून बसले होते. म्हणू लागतील की, नि:संशय आमच्या पालनकर्त्याचे प्रेषित सत्य घेऊन आले होते [८१] मग काय आता कोणी शिफारस करणारा जो आमची शिफारस करील किंवा (आहे एखादा मार्ग की जगात आम्हाला) परत पाठविले जावे, अशासाठी की जे काम आम्ही करीत राहीलो त्याहून वेगळे काम करावे. त्यांनी स्वत:ला हानिग्रस्त केले व ज्या गोष्टी ते रचीत होते त्या सर्व यांच्यापासून हरवल्या.

هَلْ يَنْظُرُوْنَ اِلَّا تَاْوِيْلَهٗ ؕ يَوْمَ يَاْتِيْ تَاْوِيْلُهٗ يَقُوْلُ
الَّذِيْنَ نَسُوْهُ مِنْ قَبْلُ قَدْ جَآءَتْ رُسُلُ رَبِّنَا بِالْحَقِّ ۚ
فَهَلْ لَّنَا مِنْ شُفَعَآءَ فَيَشْفَعُوْا لَنَآ اَوْ نُرَدُّ فَنَعْمَلَ غَيْرَ الَّذِيْ
كُنَّا نَعْمَلُ ؕ قَدْ خَسِرُوْٓا اَنْفُسَهُمْ وَضَلَّ عَنْهُمْ مَّا
كَانُوْا يَفْتَرُوْنَ ﴿٥٣﴾

५४. नि:संशय तुमचा पालनकर्ता अल्लाहच आहे. ज्याने आकाशांना व जमीनीला सहा दिवसात निर्माण केले [८२] मग तो सिंहासनावर विराजमान झाला [८३] तो रात्रीला दिवसावर आच्छादित करतो जो त्याच्या पाठोपाठ धावत येतो आणि त्याने सूर्य व चंद्र व तारे निर्माण केले जे त्याच्या आदेशाने कार्यरत आहेत [८४] लक्षात ठेवा निर्माण करणेहि निव्वळ त्याच्याच करिता आहे व हुकुम देणेहि. [८५]अल्लाह मोठा धन्य आहे [८६] सर्व विश्वांचा पालनकर्ता.

اِنَّ رَبَّكُمُ اللّٰهُ الَّذِيْ خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ فِيْ سِتَّةِ
اَيَّامٍ ثُمَّ اسْتَوٰى عَلَى الْعَرْشِ ۫ يُغْشِي الَّيْلَ النَّهَارَ يَطْلُبُهٗ
حَثِيْثًا ۙ وَّالشَّمْسَ وَالْقَمَرَ وَالنُّجُوْمَ مُسَخَّرٰتٍۭ بِاَمْرِهٖ ؕ اَلَا
لَهُ الْخَلْقُ وَالْاَمْرُ ؕ تَبٰرَكَ اللّٰهُ رَبُّ الْعٰلَمِيْنَ ﴿٥٤﴾

५५. आपल्या पालनकर्त्याचा गयावया करीत व हळू स्वरात धावा करा [८७] तो मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांना पसंत करीत नाही.[८८]

اُدْعُوْا رَبَّكُمْ تَضَرُّعًا وَّخُفْيَةً ؕ اِنَّهٗ لَا يُحِبُّ الْمُعْتَدِيْنَ ﴿٥٥﴾

५६. आणि जमीनीवर तिच्या सुधारणेनंतर उत्पात माजवू नका [८९] आणि भय व आशेसह त्यालाच साद घाला.[९०] नि:संशय अल्लाहची दया सदाचारी लोकांच्या समीप आहे.

وَلَا تُفْسِدُوْا فِي الْاَرْضِ بَعْدَ اِصْلَاحِهَا وَادْعُوْهُ خَوْفًا
وَّطَمَعًا ؕ اِنَّ رَحْمَتَ اللّٰهِ قَرِيْبٌ مِّنَ الْمُحْسِنِيْنَ ﴿٥٦﴾

८०. अर्थात या ग्रथांत मार्गदर्शनाच्या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरणासह वर्णन  केले गेले आहे कोणतीहि गोष्ट अशी नाही की जिच्यावर मार्गदर्शन प्राप्त करणे अवलंबून असावे आणि अस्पष्ठ व गुंतागुंतीच्या शैलीत प्रस्तुत केली गेली असावी. अर्थात या ग्रंथांचे हे वैशिष्ट्य आहे की यात अनुमानाच्या काल्पनिक गोष्टी वर्णिल्या गेल्या नाहीत. किंबहुना जे काही वर्णिले गेले आहे अगदी ज्ञानाच्या आधारावर वर्णिले गेले आहे, कारण याला अवतरीत करणारा सर्वश्रेष्ठ अल्लाह आहे. ज्याचे ज्ञान परिपक्व व अटळ आहे.

कुरआनाचे हे वैशिष्ट्य त्याला जगातील त्या सर्व ग्रंथापेक्षा श्रेष्ठ ठरविते. जे सृष्टीची वास्तविकता व माणसाच्या अस्तित्वाचे उद्दिष्ट या विषयी अनुमानाचे आराखडे, विचार, आणि तत्वज्ञानाच्या रिक्ततेवर आधारीत आहेत.

८१. अर्थात कुरआन ज्या गोष्टींची खबर देत आहे. त्यांना काय हे लोक घटना घडल्याच्या रूपाने पाहू इच्छितात? असे असेल तर त्यांनी हे जाणून घेतले पाहिजे की ज्या दिवशी या गोष्टी वास्तविकताच्या रूपाने त्यांच्या समोर येतील व हकीगत अगदी अनावरीत होऊन त्यांच्यासमोर येईल तर हेच लोक जे आज या अदृश्य वास्तविकताच्या दृष्टीआड करीत आहेत तत्क्षणीच त्यांच्या सत्यतेस मान्य करू लागतील. परंतु ती वेळ आचरणाची नव्हे तर परिणाम व मोबदला प्राप्त करण्याची असेल म्हणून त्यावेळी त्यांचे मान्य करणे त्यांच्या हक्कात किंचितहि लाभदायक ठरणार नाही.

८२. अभिप्रेत ईश्वरीय दिवस होय कारण आमच्या २४ तासांच्या दिवसाचे अस्तित्व आकाश व जमीनीच्या उत्पत्तिपूर्वी नव्हते, तसेच पवित्र कुरआनात दुसऱ्या एका जागी फर्माविले गेले आहे की अल्लाहजवळ एक दिवस एक हजार वर्षाचा असतो (अलहज्ज- ४७) अन्य एका स्थानी एक दिवसाशी अभिप्रेत पन्नास हजार वर्षे असेहि वर्णिले गेले आहे. यावरुन असे दिसून येते की कुरआनात अशा प्रसंगी ''दिवस'' शब्द काळ (Period) या अर्थाने वापरला आहे म्हणून सहा दिवसांशी अभिप्रेत सहा काळ होत. ज्यांचे प्रमाण केवळ अल्लाहला माहित आहे.

८३. सर्वश्रेष्ठ अल्लाहची सिंहासनारूढ होण्याची स्थिती आमच्या ज्ञान व कल्पनेबाहेरची आहे म्हणून ज्याप्रमाणे ''सलफ सालेहीन'' (पृर्वीच्या सदाचारी लोकांची) पद्धति राहिली तद्नुसार यावर विवाद करण्यापासून व त्याचा खोल अर्थ निश्चित करण्यापासून अलिप्त राहणे हे ईमानाच्या सुरक्षिते करिता आवश्यक आहे. हजरत इमाम मालीक यांना जेव्हा यासंबंधी विचारले गेले तेव्हा त्यांनी फर्माविले, अल्लाहचे सिंहासनारूढ होणे ज्ञात आहे, त्याच्या कैफीयतीची आकलन बुद्धीच्या अवाक्यात नाही. त्यावर ईमान बाळगणे आवश्यक आहे. व त्या संबंधी प्रश्न विचारणे बिद्अत (नवी प्रथा) होय (रूहुल मआनी खंड ८- पृ. १३४)

राहिला हा प्रश्न की मग याच्या उल्लेखामागे कुरआनाचा हेतु कोणता? तर त्याचा हेतु वाक्य संबंधावरून अगदी स्पष्ट होतो. येथे या वस्तुस्थितीस बुद्धिवर बिंबवण्याचा उद्देश्य आहे की आकाशांना व जमीनीला निर्माण केल्यानंतर सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्याशी संबंध विच्छेद केला नाही, किंबहुना समस्त निर्मिती त्याची राज्यसत्ता ठरली व तो राजसिंहासनावर विराजमान होऊन सृष्टी-व्यवस्था चालवू लागला. त्याचे शासन समस्त सृष्टीवर कायम आहे. व तोच तिच्यावर नियंत्रण राखत आहे. या सृष्टीच्या व्यवस्थापनेत कोणाचा कसलाहि हस्तक्षेप नाही, किंबहुना एकाच ईश्वराचे आदेश आकाशापासून जमीनीपर्यंत प्रत्येक ठिकाणी व कोनाकोपऱ्यातत लागू होतात. क़ुरआनात अनेक ठिकानी अल्लाहचे सिंहासनावर विराजमान होण्याचा उल्लेख झाला आहे. व त्यासोबतच कार्य व्यवस्था वगैरेचाहि उल्लेख आहे उदा. सूरह युनूस आयत ३ मध्ये फर्माविले:

ثُمَّ اسۡتَوٰی عَلَی الۡعَرۡشِ یُدَبِّرُ الۡاَمۡرَ

''मग तो सिंहासनावर विराजमान झाला व कार्य-योजना करीत आहे.''

म्हणजे अधिकाराची वेसण त्याच्याच हाती आहे. आणि तोच समस्त गोष्टींची व्यवस्था राखीत आहे. अशाप्रकारे वाक्यसंदर्भावरून विराजमान होण्याचा प्राथमिक अर्थ चांगल्यारितीने स्पष्ट होतो.

८४. अर्थात त्या सेवेस लागलेले आहेत जी त्यांच्या सूपूर्द केली गेली आहे.

८५. म्हणजे कोणत्याही वस्तूला अभावातून अस्तित्वात आणण्याचा गुणधर्म त्याच्याच जवळ आहे. आणि त्याच्या निर्मितीवर त्याचे आदेश लागू होतात. त्याच्या राज्यात अन्य कोणाचाहि आदेश चालत नाही.

८६. म्हणजे तो मोठमोठे गुण बाळगणारा आहे. व त्याची सर्व कामे भलेपणा व समृद्धीस कारक ठरतात. म्हणून असे समजू नका की या सृष्टीला निर्माण करून त्याने उपद्रव अस्तित्वात आणला. असे नव्हते तर त्याने फार मोठ्या भलेपणास अस्तित्वात आणले आहे. दुसऱ्या शब्दात सृष्टीनिर्मिती मागे जे उद्दिष्ट कार्यरत आहे ते अत्यंत महान व पूर्णपर्ण मंगल आहे.

८७. अर्थात ज्याअर्थी अल्लाह हाच तुमचा पालनकर्ता आहे तर तोच तुमचा गरज भागविणाराहि आहे. म्हणून त्यालाच आर्जव घाला. व त्याच्याच पुढे नम्रतेचा नजराणा

सादर करा.

अल्लाहला पुकारण्याची जी पद्धत दास्यत्वाची शान पूर्णत:प्रकट करते ती म्हणजे त्याच्यासमोर गयावया करणे म्हणून दासाने आपल्या पालनकर्त्याशी काहीहि मागताना गयावया करीत मागावे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे अल्लाहला मन:पूर्वक पुकारावे म्हणजे दासाची दुआ ढोंग किंवा देखावा विरहित असावी हळूस्वरात अल्लाहला पुकारण्याच्या स्थितीत मनुष्य देखावच्या उपद्रवापासून सुरक्षित राहतो. म्हणून हळूस्वरात दुआ करणे अधिक चांगले आहे.

८८. आर्थात जे लोक अल्लाहसोबत अन्य उपास्यांना साद घालू लागतात किंवा ईश्वराचा इन्कार करून मूळातच त्याला पुकारीत नाही. पहिली गोष्ट शिर्क आहे तर दुसरी नास्तिकता आणि दोन्हीस्थिती दास्यत्व मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या आहेत.

८९. जमेनीशी अभिप्रेत जमीनीवर राहणारे म्हणजेच मनुष्य-समाज होय. आणि 'तिच्या सुधारणेनंतर तिच्यात उत्पात माजवू नका'चा अर्थ हा की सर्वश्रेष्ठ अल्लाहने मानव समाजास दुरुस्त-स्थितीत निर्माण केले आहे, तेव्हा स्वभाविकपणे तो एकेश्वरवादाशीच परिचित आहे व भलेपणालाच पसंत करतो. तसेच त्याला दुरुस्त स्थितीत कायम राखण्यासाठी ईश्वर आपल्या प्रेषितांद्वारे एकेश्वरवादाची शिकवण व न्याय-व्यवस्था अवतरित करीत राहीला आहे. एवढे असताना मानव समाजात शिर्क व उपद्रव पसरविणे म्हणजे त्याच्या विधायक कार्यास विध्वंसक कार्यात परिवर्तित करणे होय. अर्थात हा घोर अपराध अनेकेश्वरवादी व सत्याचा इन्कार करणाऱ्यांच्या हातून घडतो.

९०. अल्लाहला आशा आणि भयासह पुकारण्याचा अर्थ असा की दासाने आपल्या मनात अल्लाहचे भय बाळगावे आणि त्याच्याशीच अपेक्षा बाळगावी आणि अल्लाहला पुकारतांना किंवा दुआ मागतांना याच संमिश्र भावनेसह मागावी.

**तोच आहे जो आपल्या कृपेच्या पुढे वाऱ्यांना खुशखबरी सह पाठवितो. मग जेव्हा ते भारदस्त ढगांना उचलतात तेव्हा आम्ही त्याना एकाद्या मृत-भूमीकडे हाकून नेतो व तेथे पाणी वर्षवून प्रत्येक प्रकारचे फळ निर्माण करतो. अशाप्रकारे आम्ही मेलेल्यांना जिवंत करतो अशासाठी की तुम्ही बोध ग्रहण करावा.*(अल-क़ुरआन)***

५७. तोच आहे जो आपल्या कृपेच्या [९१] पुढे वाऱ्यांना खुशखबरी सह पाठवितो. मग जेव्हा ते भारदस्त ढगांना उचलतात तेव्हा आम्ही त्याना एकाद्या मृत-भूमीकडे हाकून नेतो व तेथे पाणी वर्षवून प्रत्येक प्रकारचे फळ निर्माण करतो. अशाप्रकारे आम्ही मेलेल्यांना जिवंत करतो अशासाठी की तुम्ही बोध ग्रहण करावा. [९२]

وَهُوَ الَّذِي يُرْسِلُ الرِّيٰحَ بُشْرًا بَيْنَ يَدَيْ رَحْمَتِهِ ۚ
حَتّٰى إِذَا أَقَلَّتْ سَحَابًا ثِقَالًا سُقْنٰهُ لِبَلَدٍ مَّيِّتٍ
فَأَنْزَلْنَا بِهِ الْمَآءَ فَأَخْرَجْنَا بِهِ مِنْ كُلِّ الثَّمَرٰتِ ۚ
كَذٰلِكَ نُخْرِجُ الْمَوْتٰى لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ ﴿٥٧﴾

५८. आणि चांगल्या जमीनीतून तिच्या पालनकर्त्याच्या आदेशाने (भरपूर) उत्पन्न निघते व निकृष्ट जमीनीतून दुषित उत्पन्नाखेरीज काहीहि निघत नाही.[९३] अशाप्रकारे आम्ही आपल्या निशाण्यांचे विविधरित्या वर्णन करतो, त्या लोकांकरिता जे कृतज्ञता दर्शविणारे आहेत.

وَالْبَلَدُ الطَّيِّبُ يَخْرُجُ نَبَاتُهُ بِإِذْنِ رَبِّهِ ۚ وَالَّذِي خَبُثَ
لَا يَخْرُجُ إِلَّا نَكِدًا ۚ كَذٰلِكَ نُصَرِّفُ الْاٰيٰتِ لِقَوْمٍ يَّشْكُرُوْنَ ﴿٥٨﴾

५९. आम्ही [९४] नूह यास त्याच्या जन-समूहाकडे पाठविले [९५] तो म्हणाला, हे माझ्या समूहातील बाधवांनो ![९६] अल्लाहची उपासना करा, त्याच्याशिवाय तुमचा कोणीहि ईश्वर (उपास्य) नाही [९७] मला भीती आहे की एका भयानक दिवसाची शिक्षा [९८] यातना तुमच्यावर आच्छादित न होवो.

لَقَدْ أَرْسَلْنَا نُوْحًا إِلٰى قَوْمِهِ فَقَالَ يٰقَوْمِ اعْبُدُوا اللّٰهَ مَا
لَكُمْ مِّنْ إِلٰهٍ غَيْرُهُ ۚ إِنِّيْ أَخَافُ عَلَيْكُمْ عَذَابَ يَوْمٍ عَظِيْمٍ ﴿٥٩﴾

६०. त्याच्या समूहाच्या प्रमुखांनी म्हटले, आम्ही तर पाहात आहोत की तुम्ही स्पष्ट अशा मार्गभ्रष्टतेत पडला आहात. [९९]

قَالَ الْمَلَأُ مِنْ قَوْمِهِ إِنَّا لَنَرٰىكَ فِيْ ضَلٰلٍ مُّبِيْنٍ ﴿٦٠﴾

६१. तो म्हणाला, हे माझ्या लोकांनो ! मी मार्गभ्रष्टतेत पडलेलो नाही किंबहुना सर्व विश्वांच्या पालनकर्त्याचा पैगंबर आहे.

قَالَ يٰقَوْمِ لَيْسَ بِيْ ضَلٰلَةٌ وَّلٰكِنِّيْ رَسُوْلٌ مِّنْ رَّبِّ
الْعٰلَمِيْنَ ﴿٦١﴾

६२. तुम्हाला आपल्या पालनकर्त्याचे संदेश पोहचवितो, आणि तुमचे हित चिंतितो आणि अल्लाहच्यातर्फे अशा गोष्टी जाणतो, ज्या तुम्ही जाणत नाही.[१००]

أُبَلِّغُكُمْ رِسٰلٰتِ رَبِّيْ وَأَنْصَحُ لَكُمْ وَأَعْلَمُ مِنَ
اللّٰهِ مَا لَا تَعْلَمُوْنَ ﴿٦٢﴾

९१. कृपेशी अभिप्रेत फायदेशीर पाऊस होय.

९२. अर्थात ही गोष्ट अहोरात्र आमच्या अवलोकनात येते की जमीन मृतावस्थेत पडलेली होती, पाऊस येताच तिच्यात जिवंतपणाची लक्षणे दिसू लागतात. व ती आपल्या आतील खजिने बाहेर काढू लागते.ज्या ईश्वराचा सामर्थ्याचा हा चमत्कार तुम्ही पाहत असता तर त्याच्याकरिता मृत माणसाला जिवंत करणे काय कठीण आहे, तेव्हा कियामतीची जी खबर कुरआन देत आहे ती तुम्ही मान्य का करीत नाही?

९३. पावसाच्या उदाहरणाने मरणोत्तर जीवनाविषयी युक्तिवाद केल्यानंतर याचा एक दुसरा बोधप्रद पैलू समोर मांडला जात आहे. पावसाचा लाभ सर्वसामान्य आहे. परंतु केवळ तीच जमीन टवटवीत व हिरवीगार होते जी सुपीक असेल, निकृष्ट जमीन यापासून काहीच लाभ घेत नाही. तद्‌वतच वहीच्या रूपाने ईश्वराची जी कृपा अवतरित होते तिच्यापासून केवळ तेच लोक लाभान्वित होतात. ज्यांच्या अंगी सत्य-स्वीकृत करण्याची पात्रता असते,परंतु जे लोक सत्य स्वीकृत करण्याचे सामर्थ्य हरवून बसलेले असतात ते यापासून काहीच लाभ घेत नाही. या वस्तुस्थितीस पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हदीस मध्ये या शब्दात वर्णिले आहे:-

''सर्वश्रेष्ठ अल्लाहने ज्या ज्ञान व मार्गदर्शनासह मला पाठविले आहे त्याचे उदाहरण पावसासारखे आहे, ते असे की जेव्हा पाऊस पडला तेव्हा जमीनीने पाण्याला शोषून घेतले आणि तिच्यावर गवत उगवून आले आणि जमीनीचा जो भाग सखल होता त्याने पाणी थोपवून ठेवले अशाप्रकारे अल्लाहने याद्वारे लोकांना लाभ पोहचविला तेव्हा ते स्वत:देखील पाणी प्यायले व इतरांनाहि पाजले. परंतु जमीनीचा जो भाग खडकाळ मैदान होता, त्यावर जेव्हा पाऊस पडला तेव्हा तो पाण्याला थोपवू शकला नाही कि त्यावर गवत उगवले नाही, तेव्हा हे (पहिले) उदाहरण अशा लोकांचे आहे ज्यांनी अल्लाहच्या धर्माचे सामजंस्य प्राप्त केले आणि अल्लाहने या ज्ञान व मार्गदर्शनाने ज्यासह मला पाठविले गेले आहे त्यांना लाभ घडविला तेव्हा त्यांनी स्वत:देखील (धर्माचे) ज्ञान प्राप्त केले आणि इतरांनाहि त्याचे शिक्षण दिले आणि हे (दुसरे) उदाहरण अशा लोकांचे आहे ज्यांनी या ज्ञानाकडे किंचितहि ध्यान दिले नाही आणि ज्या मार्गदर्शनासह मला पाठविले गेले आहे ते स्वीकारले नाही'' (मुस्लिम, किताबुल फजाइल)

९४. येथे प्रेषित इतिहासाचे ते भाग प्रस्तुत केले जात आहे ज्यांनी हे सिद्ध होते की अल्लाह माणसांच्या मार्गदर्शनाकरिता प्रेषित पाठवित राहिला. या प्रेषितांनी अल्लाहचे प्रमाण आपापल्या समूहावर प्रस्थापित केले होते आणि जेव्हा त्यांनी प्रेषितत्व मान्य करण्यास इन्कार केला व त्या संदेशास कबूल करण्याकरिता तयार झाले नाही ज्यास प्रेषित सादर करीत राहिले तेव्हा अल्लाहचा दण्ड-नियम लागू पडला व त्याने या इन्कार करणाऱ्यांना अशी शिक्षा दिली की ते अस्तित्वालाहि उरले नाहीत तथापि इतिहासाच्या पृष्ठांवर बोध-चिन्हे बाकी राहतील.

९५. हजरत आदम यांनी आपल्या संततीस त्या मार्गदर्शनावर सोडले होते जे सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे त्यांना मिळाले होते. परंतु जेव्हा त्यांचा वंश वाढला व त्याने एक जाती समूह अर्थात मानव-समाजाचे रूप धारण केले,तर हळू हळू हा मानव समाज, मार्ग दर्शनाच्या त्या मार्गापासून दूर होत गेला ज्यावर हजरत आदम यांनी सोडले होते. परिणामी यांच्यात जबरदस्त मार्गभ्रष्टता निर्माण झाली, त्यांना या मार्गभ्रष्टतेतून बाहेर काढण्याकरिता व त्यांना मार्ग दर्शनाचा मार्ग पुन्हा खुला करण्याकरिता सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत नूह यांना पैगंबर बनवून त्यांच्याकडे पाठविले अर्थात हजरत नूह, हजरत आदम नंतरचे पहिले पैगंबर होत. ज्यांना पहिल्या मानव-वस्तीकडे पाठविले गेले.

हजरत नूह यांचा काळ ख्रिस्तपूर्व सुमारे चार पाच हजार वर्षांचा असेल (आणि खरेज्ञान केवळ अल्लाहला आहे) नूहच्या जनसमूहाचे निवास स्थान दजला व फुरात या नदींच्या दरम्यान अर्थात इराकच्या उत्तर विभागात मौसिल शहराच्या आसपास होते.

९६. कौम (जनसमूह) हा शब्दप्रयोग येथे मानव-समाज या साध्या अर्थाने केला गेला आहे.

९७. नूहच्या जनसमूहात मूर्तिपूजा प्रचलीत झाली होती, ज्यामागे अशी कल्पना होती की अल्लाहच्या शिवाय आणखी काही गरज भागविणारे आहेत व त्यांना प्रसन्न करण्याकरिता त्यांची भक्ति (पूजा) आवश्यक आहे. हजरत नूह यांनी त्यांना या मार्गभ्रष्टतेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला व त्यांच्यासमोर एकेश्वरवादाचे आवाहन प्रस्तुत केले.

९८. भयानक दिवसाशी अभिप्रेत आपत्तिचा दिवस होय.

९९. हजरत नूह यांच्या सत्य-आवाहनाच्या विरोधात त्यांच्या जनसमूहाच्या प्रमुखांनी मोठा पुढाकार घेतला त्यांच्या दृष्टीने हजरत नूह यांचे मूर्तिच्या ईशत्वावर विश्वास न ठेवणे अपश्रद्धा होती. जिला ते मार्गभ्रष्टता ठरवित होते.

१००. पैगंबराला अल्लाहतर्फे एक विशिष्ट ज्ञान साधन प्राप्त होते जे सर्वसामान्यांना लाभत नाही. म्हणून अपरोक्षाच्या ज्या हकीगतींचे रहस्य त्याला कळते त्यांची खबर तो लोकांना देतो आणि ज्याअर्थी या वार्तेचे समर्थन पुराव्यांद्वारे होते तसेच त्या मागे पैगंबराचे निष्कलंक जीवन व त्याची सत्यशिलता असते म्हणून गैबच्या (अपरोक्षाच्या) ज्या गोष्टी तो ऐकवितो, त्यांबाबत शंकेला वाव नसतो. व या द्वारे मनुष्यावर अल्लाहचे प्रमाण प्रस्थापित होते.

६३. काय तुम्हाला या गोष्टीचे आश्चर्य वाटले की तुमच्या जवळ तुमच्या पालन कर्त्याचा, बोध, तुमच्या पैकीच एका व्यक्तिद्वारे पोहचला [१०१] यासाठी की तुम्हाला खबरदार करावे [१०२] व तुम्ही भय बाळगावे आणि तुम्हावर दया केली जावी?

أَوَعَجِبْتُمْ أَن جَاءَكُمْ ذِكْرٌ مِّن رَّبِّكُمْ عَلَىٰ رَجُلٍ مِّنكُمْ
لِيُنذِرَكُمْ وَلِتَتَّقُوا وَلَعَلَّكُمْ تُرْحَمُونَ ﴿٦٣﴾

६४. परंतु त्यांनी त्याला खोटे ठरविले, तेव्हा आम्ही त्याला व त्या लोकांना जे त्याच्याबरोबर नावेत (स्वार झाले) होते, वाचविले व ज्या लोकांनी आमच्या निशाण्यांना खोटे ठरविले होते त्यांना बुडविले [१०३] नि:संशय ते आंधळे लोक होते.[१०४]

فَكَذَّبُوهُ فَأَنجَيْنَاهُ وَالَّذِينَ مَعَهُ فِي الْفُلْكِ وَأَغْرَقْنَا
الَّذِينَ كَذَّبُوا بِآيَاتِنَا ۚ إِنَّهُمْ كَانُوا قَوْمًا عَمِينَ ﴿٦٤﴾

६५. आणि आदकडे [१०५] आम्ही त्यांचा भाऊ हूद यास [१०६] पाठविले तो म्हणाला, हे माझ्या जनसमूहाच्या लोकांनो !अल्लाहची इबादत (उपासना) करा, त्याच्याशिवाय तुमचा कोणीहि खुदा (ईश्वर) नाही, मग काय तुम्ही भय बाळगत नाही.[१०७]

وَإِلَىٰ عَادٍ أَخَاهُمْ هُودًا ۗ قَالَ يَا قَوْمِ اعْبُدُوا اللَّهَ مَا لَكُم
مِّنْ إِلَٰهٍ غَيْرُهُ ۚ أَفَلَا تَتَّقُونَ ﴿٦٥﴾

६६. त्याच्या जनसमूहाचे सरदार ज्यांनी कुफ्रमार्ग अंगिकारला होता म्हणाले, आम्ही तर पाहत आहोत की तुम्ही मूर्खपणात पडला आहात [१०८] आणि आमच्या मते तुम्ही खोटारडे आहात.

قَالَ الْمَلَأُ الَّذِينَ كَفَرُوا مِن قَوْمِهِ إِنَّا لَنَرَاكَ فِي
سَفَاهَةٍ وَإِنَّا لَنَظُنُّكَ مِنَ الْكَاذِبِينَ ﴿٦٦﴾

६७. तो म्हणाला, हे माझ्या जनसमूहाच्या लोकांनो मी मूर्खपणात पडलेलो नाही, किंबहुना मी सर्व विश्वांच्या पालन कर्त्याचा पैगंबर आहे.

قَالَ يَا قَوْمِ لَيْسَ بِي سَفَاهَةٌ وَلَٰكِنِّي رَسُولٌ مِّن
رَّبِّ الْعَالَمِينَ ﴿٦٧﴾

६८. तुम्हाला आपल्या पालनकर्त्याचे संदेश पोहचवितो आणि तुमचा हितचिंतक आहे, विश्वसनीय.[१०९]

أُبَلِّغُكُمْ رِسَالَاتِ رَبِّي وَأَنَا لَكُمْ نَاصِحٌ أَمِينٌ ﴿٦٨﴾

६९. काय तुम्हाला या गोष्टीचे आश्चर्य वाटले की तुमच्याजवळ तुमच्या पालनकर्त्याचा बोध तुमच्याच पैकी एका व्यक्तिद्वारे आला ज्यायोग त्याने तुम्हाला खबरदार करावे? स्मरण करा जेव्हा त्याने नूहच्या जनसमूहानंतर तुम्हाला सत्ताधारी बनविले व तुम्हाला जबरदस्त शरीरिक बल प्रदान केले [११०] तर अल्लाहच्या उपकारांचे स्मरण करा अशासाठी की तुम्ही सफल व्हावे.

أَوَعَجِبْتُمْ أَن جَاءَكُمْ ذِكْرٌ مِّن رَّبِّكُمْ عَلَىٰ رَجُلٍ مِّنكُمْ
لِيُنذِرَكُمْ ۚ وَاذْكُرُوا إِذْ جَعَلَكُمْ خُلَفَاءَ مِن بَعْدِ
قَوْمِ نُوحٍ وَزَادَكُمْ فِي الْخَلْقِ بَسْطَةً ۖ
فَاذْكُرُوا آلَاءَ اللَّهِ لَعَلَّكُمْ تُفْلِحُونَ ﴿٦٩﴾

१०१. हजरत नूह यांच्या प्रेषितत्व संदर्भात त्यांचा जनसमूह हा संशय व्यक्त करीत होता की आपल्या सारख्याच एका व्यक्तिला अल्लाहने कशाप्रकारे आपला पैगंबर बनविले असेल. हाच संशय मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रेषितत्वाविषयी त्यांचे विरोधकहि व्यक्त करीत असत. तात्पर्य, हा आक्षेप नवा नाही., किंबहुना हजारो वर्षापूर्वीचा आहे, जो हजरत नूह यांच्या काळापासून चालत आला आहे.

१०२. यात त्यांच्या आक्षेपाचे उत्तर अध्यारुत आहे हे की पैगंबर पाठविण्याचा उद्देश्य एखादा चमत्कार दाखविणे हा नव्हे, किंबहुना असावध स्थितीत पडलेल्या माणसांना चुकीच्या श्रद्धा व आचरणाच्या दुष्परिणितीपासून सावध करणे होय, व हे कार्य पार पाडण्याकरिता मनुष्याला पैगंबर बनवून पाठविणे हेच उचित व तर्कसंगत आहे.

१०३. ही एक निर्णायक शिक्षा होती ज्यावरून हज़रत नूह यांची सत्यताहि सिद्ध झाली व त्यांच्या आवाहनाची यथार्थता देखील. कारण ही आपत्ति हजरत नूह यांच्या पूर्व सूचनेनंतर आली, महापूराच्या रूपाने येणाऱ्या या आपत्तिपासून सुरक्षित राहण्यासाठी त्यांनी आधीपासूनच एक फार मोठी नाव तयार केली होती. तसेच या शिक्षेला केवळ तेच लोक बळी पडले ज्यांनी हजरत नूह यांना खोटे ठरविले होते. हजरत नूह यांच्याविषयी ईमान बाळगणारा एकही मनुष्य या अजाबात (ईश-प्रकोपात) सापडला नाही. जर ही जमीनीवर घडणाऱ्या सर्वसामान्य घटनांपैकी एक घटना असती तर ना हजरत नूह यांना यासंबंधी पूर्व सूचना मिळाली असती व ना या शिक्षेच्या तावडीत फक्त काफ़ीर सापडले असते. कारण सर्वसामान्य घटनेत ईमान बाळगणारे व काफ़ीर सगळेच बळी पडतात. पण एखाद्या पैगंबराच्या स्वत:च्या जनसमूहावर प्रमाण प्रस्थापित झाल्यानंतर जी शिक्षा येते, तिचे वैशिष्ट्य एकदम वेगळे असते म्हणून या घटनेला सर्वसामान्य घटनांपैकी समजणे वास्तविकतेला धरून नव्हे.

१०४. अर्थात अंत: करणाने ते आंधळे होते.

१०५. आदचा काळ व त्याचे निवास स्थान इत्यादिच्या विवरणाकरिता पहा सूरह फज्र टीप क्र. ८ ते ११.

१०६. अर्थात हूद हे आद जनसमूहापैकी एक होते.

१०७. हे तेच आवाहन होते जे सर्वप्रथम हजरत नूह यांनी प्रस्तुत केले होते.

१०८. मूर्तिपूजा हा आदचा जनसामूहीक धर्म होता. म्हणून जेव्हा हजरत हूद यांनी लोकांना या मार्गभ्रष्टतेतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला व त्यांच्यासमोर एकेश्वरवादाचे आवाहन प्रस्तुत केले तेव्हा त्यांनी याला 'मूर्खपणा' म्हटले.

१०९. स्पष्ट व्हावे की जनसमूहाचे खरे हितचिंतन हेच की ईश-संदेशांना काहीहि कमी अधिक न करता त्याच्यासमोर प्रस्तुत केले जावे व याला मान्य करण्याचे आमंत्रण दिले जावे.

११०. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना जे सामर्थ्य व अधिकार प्रदान केला होता त्याची ही निकड होती की ते अल्लाहचे कृतज्ञ दास बनून राहिले असते, परंतु ते आपल्या शक्तिवर गर्व करू लागले व असा दावा करू लागले की आहे कोणी आमच्यापेक्षा अधिक शक्तिशाली?

وَقَالُوْا مَنْ اَشَدُّ مِنَّا قُوَّةً ـ (حٰمٓ السَّجدة ـ ١٥)

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह फज्र टीप ११)



40⁰ Long.
45⁰ Long.
अरमीनिया
40⁰ Lat.
40⁰ Lat.
अरारात पर्वत
तुर्की
तबरेज़
दियारे बक्र
मार्दिन
इब्नेउमर क्षेत्र
जूदी पर्वत
ईरान
नैन्वा
फ़ुरात नदी
हल्ब
अल-मौसिल
सीरिया
35⁰ Lat.
35⁰ Lat.
इराक़
दजला नदी
बग़दाद
Scale
N
0
100 km.
नूह जन-समूहाचे निवास स्थान
उत्तरेकडील इराक मध्ये दजला नदीच्या किनारी

**ते म्हणाले, काय तुम्ही एवढ्यासाठी आमच्या जवळ आले की आम्ही एक अल्लाहचीच उपासना करावी व त्यांना सोडून द्यावे ज्यांची उपासना आमचे वाडवडील करीत आलेत? जर तुम्ही सच्चे आहात तर आणून दाखवा ती आपत्ति जिची आम्हाला धमकी देत आहात. *(अल-क़ुरआन)***

७०. ते म्हणाले, काय तुम्ही एवढ्यासाठी आमच्या जवळ आले की आम्ही एक अल्लाहचीच उपासना करावी व त्यांना सोडून द्यावे ज्यांची उपासना आमचे वाडवडील करीत आलेत?[१११] जर तुम्ही सच्चे आहात तर आणून दाखवा ती आपत्ति जिची आम्हाला धमकी देत आहात.

قَالُوٓا أَجِئْتَنَا لِنَعْبُدَ ٱللَّهَ وَحْدَهُۥ وَنَذَرَ مَا كَانَ يَعْبُدُ
ءَابَآؤُنَا ۖ فَأْتِنَا بِمَا تَعِدُنَآ إِن كُنتَ مِنَ ٱلصَّٰدِقِينَ ٧٠

७१. तो म्हणाला, तुमच्यावर तुमच्या पालनकर्त्याचा धि:कार व प्रकोप कोसळला. काय तुम्ही माझ्याशी त्या नावां बाबत झगडता,जी तुम्ही व तुमच्या वाडवडीलांनी ठेवली आहेत, ज्यांच्याकरीता अल्लाहने कोणती ही प्रमाण अवतरीत केले नाही,[११२] बरे, तुम्हीहि प्रतीक्षा करा व मी देखील तुमच्या सोबत प्रतीक्षा करतो.[११३]

قَالَ قَدْ وَقَعَ عَلَيْكُم مِّن رَّبِّكُمْ رِجْسٌ وَغَضَبٌ ۖ
أَتُجَٰدِلُونَنِى فِىٓ أَسْمَآءٍ سَمَّيْتُمُوهَآ أَنتُمْ وَءَابَآؤُكُم مَّا
نَزَّلَ ٱللَّهُ بِهَا مِن سُلْطَٰنٍ ۚ فَٱنتَظِرُوٓا إِنِّى مَعَكُم مِّنَ
ٱلْمُنتَظِرِينَ ٧١

७२. मग आम्ही हूदला व त्याच्या साथीदारांना आपल्या क्रूपेने वाचविले. आणि त्या लोकांचे समूळ उच्चाटन केले ज्यांनी आमच्या निशाण्यांना खोटे ठरविले होते, व ईमान बाळगणारे नव्हते.[११४]

فَأَنجَيْنَٰهُ وَٱلَّذِينَ مَعَهُۥ بِرَحْمَةٍ مِّنَّا وَقَطَعْنَا دَابِرَ
ٱلَّذِينَ كَذَّبُوا بِـَٔايَٰتِنَا ۖ وَمَا كَانُوا مُؤْمِنِينَ ٧٢

७३. आणि समूदकडे [११५] आम्ही त्यांचा भाऊ सालेह याला पाठविले [११६] तो म्हणाला, हे माझ्या जनसमूहातील लोकांनो, अल्लाहची इबादत (उपासना) करा त्याच्या शिवाय तुमचे अन्य कोणतेही उपास्य (ईश) नाही [११७] तुमच्याजवळ तुमच्या पालन कर्त्यातर्फे एक स्पष्ट प्रमाण आले आहे [११८] ही अल्लाहची सांडणी तुमच्याकरिता एक निशाणी आहे [११९] म्हणून तिला सोडून द्या की अल्लाहच्या जमीनीवर तिने चरत फिरावे. तिला कशाहि प्रकारची हानी पोहचवू नका, अन्यथा एक दु:खदायक यातना तुम्हाला येऊन धरील.

وَإِلَىٰ ثَمُودَ أَخَاهُمْ صَٰلِحًا ۗ قَالَ يَٰقَوْمِ ٱعْبُدُوا ٱللَّهَ مَا
لَكُم مِّنْ إِلَٰهٍ غَيْرُهُۥ ۖ قَدْ جَآءَتْكُم بَيِّنَةٌ مِّن رَّبِّكُمْ ۖ
هَٰذِهِۦ نَاقَةُ ٱللَّهِ لَكُمْ ءَايَةً ۖ فَذَرُوهَا تَأْكُلْ فِىٓ
أَرْضِ ٱللَّهِ ۖ وَلَا تَمَسُّوهَا بِسُوٓءٍ فَيَأْخُذَكُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ٧٣

७४. स्मरण करा, जेव्हा अल्लाहने आद नंतर तुम्हाला सत्ताधारी बनविले व जमीनीवर वसविले ज्यायोगे तुम्ही तिच्या मैदानांवर महाल उभे करता व पहाडांची काटछाट करून घर बनविता[१२०] तेव्हा अल्लाहच्या उपकारांचे स्मरण राखा व जमीनीवर उत्पात माजू नका.[१२१]

وَٱذْكُرُوٓا إِذْ جَعَلَكُمْ خُلَفَآءَ مِنۢ بَعْدِ عَادٍ وَبَوَّأَكُمْ
فِى ٱلْأَرْضِ تَتَّخِذُونَ مِن سُهُولِهَا قُصُورًا وَتَنْحِتُونَ
ٱلْجِبَالَ بُيُوتًا ۖ فَٱذْكُرُوٓا ءَالَآءَ ٱللَّهِ وَلَا تَعْثَوْا فِى ٱلْأَرْضِ
مُفْسِدِينَ ٧٤

१११. सत्य स्वीकृतिच्या मार्गात सर्वात मोठा अडथळा अंधानुकरणाचा आहे. पैगंबराचे आवाहन प्रमाणांवर आधारीत असते आणि त्याचा मार्ग बुद्धि व दृष्टीचा मार्ग असतो परंतु जे लोक वाडवडीलांच्या रिती रिवाजंना आपला जातीसंमूहीक खरा आधार व खरी संस्कृति समजतात ते नाकासमोर चालणारे बनतात. आणि ज्याअर्थी ते प्रमाणांच्या आधारावर कोणतीहि गोष्ट ऐकावयास तयार होत नाहीत तर त्यांच्याकरिता मार्गदर्शनाचे द्वार उघडत नाही.

११२. अर्थात हे केवळ नाममात्र होत. त्यांना कसलाहि आधार नाही. दुसऱ्या शब्दात ही काल्पनिक उपास्ये होत ज्यांचे वास्तविक जगात कसलेहि आस्तित्व नाही. अनेकेश्वरवादी अल्लाहला सोडून ज्यांना उपास्ये बनवितात, ती त्यांची केवळ काल्पनिक उपास्ये असतात.परंतु बुद्धिवर हे अशाप्रकारे आच्छादित होतात की मनुष्य सत्य-प्रियतेच्या गुणधर्माला पारखा होतो, मग कोणतेहि प्रमाण त्याला प्रभावित करत नाही. आणि याच कारणास्तव आजच्या काळातील अनेकेश्वरवादी देखील ज्ञानाचे मार्ग विपुलतेने खुले असतांनाहि काल्पनिक ईश्वरांपासून मुक्ति प्राप्त करू शकले नाहीत.

११३. म्हणजे प्रमाणांनी जर तुम्ही मान्य करू इच्छित नाही व आपल्या परिणितीलाच पाहू इच्छिता तर मग प्रतिक्षा करा मी देखील तुमच्या सोबत परिणितीची प्रतिक्षा करतो.

११४. अर्थात त्यांना असे नष्ट केले की त्याचे नाम अवशेषहि शिल्लक राहीले नाही, हूद यांच्या जनसमूहाच्या या परिणितीने हजरत हूद यांची सत्यता व त्याच्या आवाहनाची यथार्थता सिद्ध केली.

११५०. समूदाचा काळ व त्याचे निवास स्थान या विषयीच्या तपशीला करिता पहा सूरह फज्र टीप क्र.१२व१३.

११६. अर्थात हजरत सालेह यांना पैगंबर बनवून समूद जनसमूहाकडे पाठविले, जे या जनसमूहापैकी होते.

११७. समूद समाज देखील एक मूर्तिपूजा करणारा जनसमूह होता. म्हणून हजरत सालेह यांनी अनेक ईश्वर व उपास्यांच्या कल्पनेला खोटे ठरवित त्यांच्यासमोर एकेश्वरवादाचे आवाहन मांडले

११८. अर्थात हजरत सालेह यांचे चारित्र्य व त्यांचे आवाहन या गोष्टीचा स्पष्ट पुरावा होय की ते अल्लाहतर्फे पैगंबर नियुक्त केले गेले होते.

११९. सांडणीचा उदय एक निणाशी म्हणून झाला होता. तेव्हा ती खचितच एक असामान्य सांडणी राहिली असेल आणि प्रत्येक दुसऱ्या दिवस जो तिच्या पाणी पिण्याकरिता निर्धारीत केला गेला होता त्यावरुनहि हे जाहीर होते की ती एक विशिष्ट प्रकारची सांडणी होती, जी विपुल प्रमाणात पाणी पीत असे. सांडणीचा हा चमत्कार सर्वश्रेष्ठ अल्लाहने समूद जनसमूहाच्या मागणीवर प्रस्तुत केला होता, म्हणून ती त्यांच्याकरिता एक जबरदस्त कसोटी बनली होती. सांडणीच्या चमत्कारासंबंधी याहून अधिक तपशील ना कुरआन ने वर्णिली आहे व ना एखाद्या सही हदीसमध्ये वर्णिली गेली आहे यास्तव असमर्थनीय कथनांचा आधार न घेता आम्हाला कुरआनच्या वर्णनाला पर्याप्त मानले पाहिजे.

१२०. समूद जनसमूहास वास्तु-कलेत मोठे कौशल्य प्राप्त होते. मैदानात ते मोठे भव्य महाल उभारित व पहाडांची काटछाट करून घरे बनवित असत. वास्तु उभारणीचे हे कार्य एक मर्यादेपर्यंत तर निवासाची गरज भागविण्याकरिता होते, म्हणून त्यांनी अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त करावयास हवी होती, की त्याने प्रदान केलेल्या साधनांद्वारे त्यानेच प्रदान केलेल्या गुणांमुळे ते ह्या योग्यतेचे झाले की स्वत:साठी सुरक्षित घरे उभारू शकतील, परंतु त्यांच्या अंगी कृतज्ञतेऐवजी अहंकार-भाव निर्माण झाला होता, व चारित्र्य-उभारणी ऐवजी वास्तु-उभारणीचा छंद वाढीस लागला, मग ते भव्य इमारती व स्मारके उभारण्यास आपले मूल कार्य समजू लागले त्यांचे हे कार्य आजदेखील भग्नावशेषांच्या रूपाने त्यांचे हे विद्यमान आहे. आणि असे आवाहन करीत आहे की

**देखो मुझे जो दीद ए इब्रत निगाह हो'**

(जर बोध प्राप्त करण्यायोग्य दृष्टी तुम्ही बाळगत असाल तर बघा मला)

१२१. येथे संकेत या गोष्टीकडे आहे की अल्लाहने प्रदान केलेल्या अधिकारांचा चुकीचा वापर व त्याने दिलेल्या वास्तुकला प्राविण्याचा व्यर्थ व प्रदर्शनार्थ उपयोग, मानव समाजात बिघाड होण्यास कारक आहे व अशाने एक वाईट संस्कृति जन्मास येते.

७५. त्याच्या जनसमूहाच्या सरदारांनी जे गर्वोन्मत्त होते निर्बल लोकांशी जे त्यांच्यापैकी ईमान बाळगणारे होते म्हणाले काय तुमचा विश्वास आहे की सालेह आपल्या पालनकर्त्याकडून पाठविला गेला आहे? त्यांनी उत्तर दिले, ज्या संदेशासह त्यांना पाठविले गेले आहे त्यावर आम्ही ईमान बाळगतो.

قَالَ الْمَلَاُ الَّذِيْنَ اسْتَكْبَرُوْا مِنْ قَوْمِهٖ لِلَّذِيْنَ
اسْتُضْعِفُوْا لِمَنْ اٰمَنَ مِنْهُمْ اَتَعْلَمُوْنَ اَنَّ صٰلِحًا مُّرْسَلٌ
مِّنْ رَّبِّهٖ ؕ قَالُوْۤا اِنَّا بِمَاۤ اُرْسِلَ بِهٖ مُؤْمِنُوْنَ ﴿۷۵﴾

७६. जे लोक मोठेपणाच्या घमेंडीत पडले होते ते म्हणाले, ज्या गोष्टींवर तुम्ही ईमान बाळगले आहे आम्ही त्याचा इन्कार करणारे आहोत.

قَالَ الَّذِيْنَ اسْتَكْبَرُوْۤا اِنَّا بِالَّذِيْۤ اٰمَنْتُمْ بِهٖ
كٰفِرُوْنَ ﴿۷۶﴾

७७. मग त्यांनी त्या सांडणीचे पाय कापले [१२२] आणि पूर्ण धिटाईनिशी आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेचे उल्लंघन केले आणि म्हणाले हे सालेह, आणून दाखवा तो अजाब (आपत्ति) ज्याची आम्हाला तुम्ही धमकी देत आहात, जर तुम्ही सच्चे पैगंबर असाल !

فَعَقَرُوا النَّاقَةَ وَعَتَوْا عَنْ اَمْرِ رَبِّهِمْ وَقَالُوْا
يٰصٰلِحُ ائْتِنَا بِمَا تَعِدُنَاۤ اِنْ كُنْتَ مِنَ
الْمُرْسَلِيْنَ ﴿۷۷﴾

७८. शेवटी त्यांना एका हादरवून टाकणाऱ्या आपत्तिने येऊन धरले [१२३] आणि ते आपल्या घरांमध्ये तोंडघशी पडून राहिले.[१२४]

فَاَخَذَتْهُمُ الرَّجْفَةُ فَاَصْبَحُوْا فِيْ دَارِهِمْ جٰثِمِيْنَ ﴿۷۸﴾

७९. आणि तो त्यांना सोडून असे म्हणत निघून गेला [१२५] की,हे माझ्या जनसमूहाच्या लोकांनो ! मी आपल्या पालनकर्त्याचा संदेश तुम्हाला पोहचविला आणि तुमचे हित चिंतिले, परंतु तुम्ही हितचिंतकांना पसंत करीत नाही.[१२६]

فَتَوَلّٰى عَنْهُمْ وَقَالَ يٰقَوْمِ لَقَدْ اَبْلَغْتُكُمْ رِسَالَةَ رَبِّيْ
وَنَصَحْتُ لَكُمْ وَلٰكِنْ لَّا تُحِبُّوْنَ النّٰصِحِيْنَ ﴿۷۹﴾

८०. आणि लूत[१२७] ला आम्ही पैगंबर बनवून पाठविले जेव्हा त्याने आपल्या [१२८] जनसमूहास म्हटले, काय तुम्ही असे निर्लज्जतेचे काम करता जे तुमच्या पूर्वी जगात कोणीहि केले नाही?[१२९]

وَلُوْطًا اِذْ قَالَ لِقَوْمِهٖۤ اَتَاْتُوْنَ الْفَاحِشَةَ مَا سَبَقَكُمْ
بِهَا مِنْ اَحَدٍ مِّنَ الْعٰلَمِيْنَ ﴿۸۰﴾

८१. तुम्ही स्त्रीयांना सोडून पुरुषांद्वारे आपली कामवासना पूर्ण करता ! तुम्ही मर्यादेचे उल्लंघन करणारे लोक आहात. [१३०]

اِنَّكُمْ لَتَاْتُوْنَ الرِّجَالَ شَهْوَةً مِّنْ دُوْنِ النِّسَآءِ ؕ
بَلْ اَنْتُمْ قَوْمٌ مُّسْرِفُوْنَ ﴿۸۱﴾

१२२. स्पष्टीकरणासाठी पहा-सूरह शम्स टीप-१५

१२३. अभिप्रेत वीजेचा भयंकर गडगडाट, जिच्यामुळे हादरण्याची व कंपायमान होण्याची अवस्था झाली कुरआनात एका दुसऱ्या ठिकाणी या शिक्षेकरिता ''साअेका'' (विजेचा भयंकर गडगडाट) चा शब्द प्रयोग झाला आहे.

१२४. या हादरवून सोडणाऱ्या आपत्तिने त्यांना तोंड घशी पाडले व मग त्याच स्थितीत ते ठार झाले.

१२५. म्हणजे हजरत सालेह आपत्ति येण्यापूर्वी त्या वस्तीतून निघून गेले.

१२६. कशी संवेदनाशील वचने आहेत, जी आपल्या जनसमूहाचा निरोप घेतांना हज़रत सालेह यांच्या मुखातून निघाली याहून अधिक एखाद्या जनसमूहाचे हित आणखी काय असू शकते ही त्याला सत्य मागे दाखविला जावा व चुकीच्या मार्गानुसरणाच्या परिणितीविषयी सचेत केले जावे. परंतु जनसमूहाच्या दृष्टीने हितचिंतक व एकनिष्ट असण्याचे स्तर जाती-प्रवाहात सामील होणे असते मग तो जाती-प्रवाह जहन्नम मध्ये का जाऊन पडेना.

१२७. हज़रत लूत हे हज़रत इब्राहीम यांच्या समकालीन होते, व ते हज़रत इब्राहीम यांचे पुतणे होते आणि ईराकहून त्यांच्यासह हिजरत (स्थलांतर) करण्यासाठी निघाले होते. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना ''सदूम'' वस्तीकडे पैगंबर बनवून पाठविले होते. सदूमचा इलाका मृत-सागार (Dead Sea) च्या किनाऱ्याशी होता; जो जॉर्डन नदीकडे आहे. बायबलमध्ये हज़रत लूत व सदूम आणि अमूराह च्या वस्त्यांचा उल्लेख आहे. (निर्मिती-प्रकरण-१४ व १९)

१२८. हजरत लूत यांचा जन्म सदूम जनसमूहात झाला नव्हता. परंतु ज्याअर्थी त्यांनी तेथेच निवास पत्करला होता. आणि तेथल्या भाषेलाहि आत्मसात केले होते म्हणून त्या जनसमूहाचा निर्देश हजरत लूत यांच्याकडे अशा रीतिने केला गेला की जणू तो त्यांचा स्वत:चा समूह होता.

१२९. लूत जनसमूह एका किळसवाण्या विकृतित पडला होता. आणि ती किळसवाणी विकृति म्हणजे पुरुषांनी पुरुषांशी शारीरिक संबंध (Homo Sexuality) कायम करणे. या अनैतिकतेने जणू सांसर्गिक रोगाचे स्वरुप धारण केले होते. अर्थात हा पहीला जनसमूह होय ज्याने जगात निर्लज्जतेचे अत्यंत हीन उदाहरण क़ायम केले.

असे दिसून येते की हा जनसमूह मूर्तिपूजक नव्हता. किंबहुना ईश्वराशी निर्भय होऊन मलीनतेत पडला होता. म्हणून हजरत लूत यांनी सर्वप्रथम या वाईटाविरुद्ध आवाज उठविला, तथापि तात्विक दृष्ट्या त्यांचे आमंत्रणहि तेच होते जे इतर पैगंबराचे होते. यास्तव सूरह शुअरामध्ये स्पष्टीकरण आहे की त्यांनी आपल्या जातीसमूहाला अल्लाहचे भय बाळगण्याविषयी व पैगंबरांचे आज्ञापालन करण्याविषयी आमंत्रण दिले होते.

فَاتَّقُوا اللّٰهَ وَاَطِيْعُوْنِ

''अल्लाहचे भय बाळगा व माझे आज्ञापालन करा'' (अश् शुअरा-१६३)

१३०. अर्थात नितिमत्ता, स्वभाव व धर्म या सर्वांच्या मर्यादा ओलांडून तुम्ही आपल्या इच्छांचे दास बनले.

# लूत जन-समूह व शुऐब जन-समूह यांची निवास स्थान



# ''समूद'' चे भग्नावशेष

**पर्वताला छाटून बनविलेली एक वास्तु**



(٠٠ وتنحتون الجبال بيوتا ٠٠) كما قد
ذكر فى القرآن الكريم حول قصه قوم ثمود .
ولا زالت بيوتهم كما نراها في هذه الصورة شاهدة
بتصديق آيات القرآن الكريم رغم مضي الاف
السنين ٠٠

८२. तेव्हा त्याच्या जातीसमूहाचे उत्तर या शिवाय काहीच नव्हते की, घालवून लावा यांना वस्तीतून. हे मोठे स्वच्छ शुद्ध बनत आहेत.[१३१]

وَمَا كَانَ جَوَابَ قَوْمِهِۦٓ إِلَّآ أَن قَالُوٓا۟ أَخْرِجُوهُم
مِّن قَرْيَتِكُمْ ۖ إِنَّهُمْ أُنَاسٌ يَتَطَهَّرُونَ ﴿٨٢﴾

८३. शेवटी आम्ही त्याला व त्याच्या कुटुंबियांना वाचवले मात्र त्याची पत्नी की ती मागे राहून जाणाऱ्यांपैकी होती.[१३२]

فَأَنجَيْنَٰهُ وَأَهْلَهُۥٓ إِلَّا ٱمْرَأَتَهُۥ كَانَتْ
مِنَ ٱلْغَٰبِرِينَ ﴿٨٣﴾

८४. आणि त्यांच्यावर एक विशिष्ट प्रकारचा पाऊस वर्षविला [१३३] तर पहा, अपराध्यांचा कसा अंत झाला.

وَأَمْطَرْنَا عَلَيْهِم مَّطَرًا ۖ فَٱنظُرْ كَيْفَ كَانَ عَٰقِبَةُ
ٱلْمُجْرِمِينَ ﴿٨٤﴾

८५. आणि मदयन [१३४] कडे आम्ही त्यांचा भाऊ शुअैबला पाठविले [१३५] तो म्हणाला, हे माझ्या जनसमूहाच्या लोकांनो ! अल्लाहची उपासना करा. त्याच्याखेरीज तुमचा कोणीहि ईश्वर नाही. तुमच्या जवळ तुमच्या पालनकर्त्यातर्फे स्पष्ट प्रमाण आले आहे.[१३६] तेव्हा माप व तोल पूरेपूर करा लोकांना त्यांच्या वस्तू घटवून देऊ नका.[१३७] आणि जमीनीवर तिच्या सुधारणेनंतर उत्पात माजवू नका [१३८] हे तुमच्यासाठी अधिक चांगले आहे, जर तुम्ही ईमान बाळगणारे असाल.[१३९]

وَإِلَىٰ مَدْيَنَ أَخَاهُمْ شُعَيْبًا ۗ قَالَ يَٰقَوْمِ ٱعْبُدُوا۟ ٱللَّهَ
مَا لَكُم مِّنْ إِلَٰهٍ غَيْرُهُۥ ۖ قَدْ جَآءَتْكُم بَيِّنَةٌ مِّن
رَّبِّكُمْ ۖ فَأَوْفُوا۟ ٱلْكَيْلَ وَٱلْمِيزَانَ وَلَا تَبْخَسُوا۟ ٱلنَّاسَ
أَشْيَآءَهُمْ وَلَا تُفْسِدُوا۟ فِى ٱلْأَرْضِ بَعْدَ إِصْلَٰحِهَا ۚ
ذَٰلِكُمْ خَيْرٌ لَّكُمْ إِن كُنتُم مُّؤْمِنِينَ ﴿٨٥﴾

८६. आणि मार्गांवर या हेतुने जाऊन बसू नका की, (लोकांना) भितीग्रस्त करण्यास, [१४०] ईमानशील लोकांना अल्लाहच्या मार्गापासून रोखण्यास व त्यात वक्रता निर्माण करण्याकरिता टपून बसावे, स्मरण करा जेव्हा तुम्ही अल्प संख्येत होता तेव्हा त्याने तुमची संख्या वाढविली.[१४१] आणि हेहि पहा कि उत्पात माजविणाऱ्यांचा कसा अंत झाला.

وَلَا تَقْعُدُوا۟ بِكُلِّ صِرَٰطٍ تُوعِدُونَ وَتَصُدُّونَ عَن
سَبِيلِ ٱللَّهِ مَنْ ءَامَنَ بِهِۦ وَتَبْغُونَهَا عِوَجًا ۚ
وَٱذْكُرُوٓا۟ إِذْ كُنتُمْ قَلِيلًا فَكَثَّرَكُمْ ۖ وَٱنظُرُوا۟
كَيْفَ كَانَ عَٰقِبَةُ ٱلْمُفْسِدِينَ ﴿٨٦﴾

८७. आणि जर तुमच्यापैकी एका समूहाने या संदेशावर ईमान बाळगले, ज्यासह मला पाठविले गेले आहे व दुसऱ्या समूहाने ईमान बाळगलेले नाही तर प्रतिक्षा करा, येथपावेतो की अल्लाहने आमच्या दरम्यान निर्णय करावा आणि तो सर्वोत्कृष्ट निर्णय करणारा आहे.

وَإِن كَانَ طَآئِفَةٌ مِّنكُمْ ءَامَنُوا۟ بِٱلَّذِىٓ
أُرْسِلْتُ بِهِۦ وَطَآئِفَةٌ لَّمْ يُؤْمِنُوا۟ فَٱصْبِرُوا۟ حَتَّىٰ
يَحْكُمَ ٱللَّهُ بَيْنَنَا ۚ وَهُوَ خَيْرُ ٱلْحَٰكِمِينَ ﴿٨٧﴾

१३१. ही थट्टा होती जी हे लोक हजरत लूत व त्यांच्या साथीदारांची उडवित होते. ते मलीनतेत असे लथपथ झाले होते की कोणत्याही व्यक्तिस सदाचारी असल्याचे बघणे पसंत करीत नव्हते मग या स्थितीत ते हजरत लूतचे आमंत्रण जे साक्षात आत्मशुद्धीचे व सदाचरणाचे आमंत्रण होते, कशा रितीने सहन करु शकले असते.

१३२. लूतच्या पत्नीने काफ़िरांची साथ दिली होती. म्हणून ती देखील शिक्षेस पात्र ठरली. हजरत लूत जेव्हा आपल्या संबंधितांसह या वस्तीतून निघाले तेव्हा ती त्यांच्यासोबत निघाली नाही, किंबहुना त्याच वस्तीत राहिली. म्हणून जेव्हा अल्लाहची शिक्षा आली तेव्हा ती देखील त्या शिक्षेला बळी पडली. यावरुन असे दिसून येते की पैगंबरांशी नाते मग ते पत्नीच्या रुपाने का असेना, अल्लाहच्या शिक्षेपासून वाचवू शकत नाही. अर्थात अल्लाहच्या शिक्षेपासून वाचविणारी गोष्टी म्हणजे पैगंबराचे अनुसरण होय, त्यासह असलेला नाते-संबंध नव्हे.

१३३. लूत जातीसमूहावर जी शिक्षा-आपत्ति कोसळली, तिचे विवरण सूरह हूद (आयत-८२) व इतर सूरती मध्ये वर्णिले गेले आहे. येथे तिला एका विशिष्ट प्रकारच्या पावसाने अभिप्रेत केले गेले आहे. अर्थात दगडांचा पाऊस.

१३४. मदयन हे नाव कबिल्याचेहि आहे व प्रांताचेहि आहे. हा कबीला हज़रत इब्राहीम यांचे पुत्र मदयन यांच्या वंशापासून होता, जो त्याची तिसरी पत्नी कतुरापासून झाला होता.

बायबल मध्ये याचा उल्लेख आहे:-

''अब्राहमने दुसरी बायको केली, तिचे नाव कटूरा तिला त्याच्यापासून जिम्रान, यक्षान, मदान, मिद्यान, इश्बाक व शुह हे मुलगे झाले.''(उत्पत्ति -२५ :१)

प्रांताचे नाव या कबिल्याच्या नावाने प्रसिद्ध झाले. मदयनचे स्थान तांबड्या समुद्राच्या किनारी अरबस्तानच्या पश्चिमोत्तर आहे. याचा काळ सुमारे १६०० वर्षे इ.स पूर्वी म्हणजे हजरत मूसा यांच्या प्रेषितत्वापूर्वीचा आहे.

१३५. हज़रत शुअैब मदयन जनसमूहापैकी होते. त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबर बनवून त्यांच्या जनसमूहाकडे पाठविले.

१३६. प्रेषित आपल्या चारीत्र्याचा दृष्टीने अत्यंत उच्च स्थानावर असतो. आणि जेव्हा तो अल्लाहच्या संदेशास, जो त्यावर ''वही'' द्वारे अवतरीत होतो, लोकांसमोर प्रस्तुत करतो, तेव्हा त्याचे अस्तित्व अल्लाहचे प्रमाण बनून त्यांच्यासमोर येते, मग त्याला ओळखण्यात त्या लोकांना कसलीहि अडचण येत नाही जे आपल्या सद्सदविवेकबुद्धीवर कायम असतात.

१३७. मदयन एक व्यापारी जातीसमूह होता, ज्याच्या अंगी बेइमानी सार्वत्रिक होती. ते अगदी धोक्याने मापघटवित व खरेदी करणारांना वस्तू कमी प्रमाणात देत.

माप तोल करण्यात कमी करणे हा एक जबरदस्त गुन्हा आहे. त्याच्या कठोरतेचे अनुमान सूरह मुतफ्फ़िफ़ीनच्या प्राथमिक आयतींच्या अध्यानाने होते.

१३८. याचे स्पष्टीकरण टीप क्र. १८९ मध्ये आले आहे.

१३९. अर्थात जर तुम्ही ईमान बाळगाल तर तुम्हाला असे स्पष्ट दिसून येईल की जीवन व्यवहारात जे वर्तन अंगिकारण्याची तुम्हाला आज्ञा केली जात आहे, तीच तुमच्या हक्कात अधिक चांगली आहे.

१४०. असे दिसून येते की मदयनचे लोक अपराधी वृत्तीचे होते. ते मार्गात वाटसरुंना लुटण्यासाठी टपून बसत व जेव्हा एखादा वाटसरु व टोळी त्या रस्त्याने जात असे तेव्हा ते त्याला धाक दपटशा दाखवून लुटीत असत.

१४१. अर्थात मदयनचा वंश सुरवातीला एक छोटासा वंश होता. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांचे व्यक्तिगत सामर्थ्य अशा प्रकारे वाढविले की त्यांनी एका मोठ्या कबिल्याचे व जातीसमूहाचे स्वरुप धारण केले परंतु या ईश-देणगीबद्दल कृतज्ञ होण्याऐवजी त्यांनी कृतघ्नतेला आपला परिपाठ बनविला.

८८. त्याच्या जनसमूहाच्या सरदारांनी जी घमेंडीत पडले होते.[१४२] म्हणाले हे शुऐब आम्ही तुम्हाला आणि त्या लोकांना ज्यांनी तुमच्यासह ईमान बाळगले आहे आपल्या वस्तीतून बाहेर घालवून देऊ अथवा तुम्हा लोकांना आमच्या धर्मात परत यावे लागेल. तो म्हणाला काय या स्थितीतहि की जेव्हा आम्ही तुमच्या धर्मापासून उद्विग्न असावे ?[१४३]

قَالَ الْمَلَأُ الَّذِينَ اسْتَكْبَرُوا مِنْ قَوْمِهِ لَنُخْرِجَنَّكَ
يَا شُعَيْبُ وَالَّذِينَ آمَنُوا مَعَكَ مِنْ قَرْيَتِنَا أَوْ لَتَعُودُنَّ فِي مِلَّتِنَا
قَالَ أَوَلَوْ كُنَّا كَارِهِينَ ﴿٨٨﴾

८९. आम्ही अल्लाहवर खोटे नाटे रचणारे ठरु जर तुमच्या धर्मात परत येऊ, ज्याअर्थी अल्लाहने आम्हाला यापासून मुक्ति दिली आहे. [१४४] आमच्याकरिता शक्य नाही की यात परतून जावे मात्र हे की अल्लाह आमचा पालनकर्ताच जर तसे इच्छिल [१४५] आमच्या पालनकर्त्याचे ज्ञान प्रत्येक गोष्टीस व्यापून आहे. आम्ही अल्लाहवरच भरवसा केला आहे. हे आमच्या पालन कर्त्या ! आमच्या व आमच्या जन समूहाच्या दरम्यान सत्यासह निर्णय कर आणि तू सर्वोत्कृष्ट निर्णय करणारा आहेस.

قَدِ افْتَرَيْنَا عَلَى اللَّهِ كَذِبًا إِنْ عُدْنَا فِي مِلَّتِكُمْ بَعْدَ إِذْ نَجَّانَا
اللَّهُ مِنْهَا وَمَا يَكُونُ لَنَا أَنْ نَعُودَ فِيهَا إِلَّا أَنْ يَشَاءَ اللَّهُ رَبُّنَا
وَسِعَ رَبُّنَا كُلَّ شَيْءٍ عِلْمًا عَلَى اللَّهِ تَوَكَّلْنَا رَبَّنَا افْتَحْ بَيْنَنَا
وَبَيْنَ قَوْمِنَا بِالْحَقِّ وَأَنْتَ خَيْرُ الْفَاتِحِينَ ﴿٨٩﴾

९०. त्याच्या जनसमूहाचे सरदार जे काफीर होते (लोकांना) म्हणू लागले, जर तुम्ही शुऐबचे अनुसरण केले तर तुम्ही नाश पावाल,[१४६]

وَقَالَ الْمَلَأُ الَّذِينَ كَفَرُوا مِنْ قَوْمِهِ لَئِنِ اتَّبَعْتُمْ
شُعَيْبًا إِنَّكُمْ إِذًا لَخَاسِرُونَ ﴿٩٠﴾

९१. शेवटी त्यांना थरकाप उडविणाऱ्या आपत्तिने येऊन धरले [१४७] आणि ते आपल्या घरांमध्ये तोंडघशी पडून राहीले.

فَأَخَذَتْهُمُ الرَّجْفَةُ فَأَصْبَحُوا فِي دَارِهِمْ جَاثِمِينَ ﴿٩١﴾

९२. ज्या लोकांनी शुऐबला खोटे ठरविले होते, त्यांची दशा अशी झाली की जणू ते त्यांमध्ये कधी वसलेच नव्हते. शुऐबला खोटे ठरविणारेच नष्ट झाले.[१४८]

الَّذِينَ كَذَّبُوا شُعَيْبًا كَأَنْ لَمْ يَغْنَوْا فِيهَا الَّذِينَ كَذَّبُوا
شُعَيْبًا كَانُوا هُمُ الْخَاسِرِينَ ﴿٩٢﴾

९३. आणि शुऐब असे म्हणत तेथून निघाला की [१४९] हे माझ्या जन-समूहाच्या लोकांनो ! मी आपल्या पालन कर्त्याचे संदेश तुम्हाला पोहचविले व तुमचे हीत चिंतिले. आता मी त्या जन समूहाविषयी दुःख कसे व्यक्त करू जो काफ़ीर आहे.

فَتَوَلَّى عَنْهُمْ وَقَالَ يَا قَوْمِ لَقَدْ أَبْلَغْتُكُمْ رِسَالَاتِ رَبِّي
وَنَصَحْتُ لَكُمْ فَكَيْفَ آسَى عَلَى قَوْمٍ كَافِرِينَ ﴿٩٣﴾

१४२. सम्पत्ति असो किंवा सत्ता प्रतिष्ठा, माणसाच्या अंगी मोठेपणा व घमेंड निर्माण करतात. मग तो सत्याला महत्वशून्य व त्याचा स्वीकार करणाऱ्यांना तुच्छ समजू लागतो. हा मानसिक गुण केवळ गतकालीन सरदारांच्या व जाती-प्रमुखांच्याच अंगी होता असे नव्हे,आजच्या काळातही हा दोष मोठमोठ्या नेत्यांमध्ये व धनवानांमध्ये आढळून येतो.

१४३. अर्थात हा जुलूम कशासाठी? काय केवळ एवढ्या साठी की तो तुमचा जनसामूहिक धर्म आहे?जर कोणी आपल्या जनसमूहाच्या धर्माला खोटे समजत असेल व त्या धर्माशी संबंध राखू इच्छित नसेल तर काय त्याला त्या धर्मात राहण्याकरिता विवश केले जाईल?जर असे केले गेले तर विवेक स्वातंत्र्य कोठे बाकी राहते जो माणसाचा स्वभाविक हक्क आहे आणि श्रद्धेच्या बाबतीत 'जुलूम' बुद्धीच्या तराजूत कोणते वजन राखतो?

१४४. याचा हा अर्थ नव्हे की हजरत शुऐब पूर्वी अनेकेश्वरवादी धर्माशी संबंधित होते, व नंतर यापासून मुक्त होऊन इस्लाम धर्मात आले, किंबहुना ही गोष्ट त्यांनी आपल्या साथीदारांचा विचार करून फर्माविली ज्यांनी अनेकेश्वरवादी धर्माचा त्याग करून इस्लाम धर्म अंगिकारला होता, कारण जोपर्यंत पैगंबराचा संबंध आहे तो प्रेषितत्वापूर्वीहि स्वाभाविक धर्माशी (म्हणजे एकेश्वरवादाशी) च संबंधित असतो. आणि त्याचे आचरण कधीही शिर्क रंजित नसते.

१४५. अर्थात आमचा हा ठाम निर्णय आहे की एकेश्वरवादी धर्माला आम्ही कोणत्याहि स्थितीत सोडणार नाही, तथापि आम्ही भरवसा स्वत:वर नव्हे तर केवळ अल्लाहवर करतो. कारण कुफ्र व ईमानच्या धडपडीत ईमान वर स्थैर्यशील राहणे हे केवळ प्रणित सुबुद्धिवर अवलंबून आहे.

१४६. म्हणजे तुमचे जग नाश पावेल. ऐहिक भक्ति लीन असलेले लोक नेहमी पैगंबराच्या शिकवणींना आचरणात आणण्यास व सत्य-शुद्ध जीवन व्यतीत करण्यास भौतिक प्रगतीत अडथळा व ऐहीक हानीस कारणीभूत समजतात.

१४७. दुसऱ्या ठिकाणी याला ''सैहा'' म्हणजे भयानक आवाज असे संबोधिले आहे.असे दिसून येते की वीज अत्याधिक कडकडाटासह त्यांच्यावर कोसळली होती आणि तिने त्यांचा असा थरकाप उडविला की ते तोंडघशी जमीनीवर पडले व असे पडले की पुन्हा उठू शकले नाहीत.

१४८. त्यांनी असे म्हटले होते की शुऐबचे अनुसरण करणारे नाश पावतील परंतु ते स्वत:च नाश पावले.

ही शिक्षा जी शुऐबच्या जनसमूहावर आली तिच्या तावडीत फक्त तेच लोक सापडले ज्यांनी शुऐबला खोटे ठरविले होते व अल्लाहचा संदेश मान्य करण्यास नकार दर्शविला होता.

१४९. हजरत शुऐब यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने शिक्षा आपत्ति येण्याच्या वेळेपूर्वीच सुचित केले होते म्हणून ते आपल्या मोमीन (ईमान बाळगणाऱ्या) साथीदारांना घेऊन शिक्षा आपत्ति येण्यापूर्वीच त्या वस्तीतून निघून गेले होते, आणि निघतांना त्यांनी अगदी हळहळयुक्त वचनानी आपल्या जन समूहाला संबोधिले होते.

९४. आणि आम्ही ज्या ज्या वस्तीत एखादा पैगंबर पाठविला, तेथील राहणाऱ्यांना अडचणी व आपत्तिग्रस्त केले अशासाठी की त्यांनी गयावया करावी. [१५०]

وَمَآ أَرْسَلْنَا فِي قَرْيَةٍ مِّن نَّبِيٍّ إِلَّآ أَخَذْنَآ أَهْلَهَا بِالْبَأْسَآءِ
وَالضَّرَّآءِ لَعَلَّهُمْ يَضَّرَّعُونَ ﴿٩٤﴾

९५. मग आम्ही वाईट स्थितीला सुस्थितीत परिवर्तित केले. येथपावेतो की ते संपन्न-समृद्ध झाले आणि म्हणू लागले की दुःख आणि सुख तर आमच्या वाडवडीलांनाहि पोहचत राहीले. तेव्हा आम्ही त्यांना अचानक धरले आणि ते अगदी अनभिज्ञ होते. [१५१]

ثُمَّ بَدَّلْنَا مَكَانَ السَّيِّئَةِ الْحَسَنَةَ حَتَّىٰ عَفَوا وَّقَالُوا قَدْ مَسَّ
آبَآءَنَا الضَّرَّآءُ وَالسَّرَّآءُ فَأَخَذْنَاهُم بَغْتَةً وَهُمْ لَا يَشْعُرُونَ ﴿٩٥﴾

९६. जर वस्त्यांमधील लोकांनी ईमान बाळगले असते व ईश-भय अंगिकारले असते तर आम्ही आकाश व जमीनीच्या समृद्धींची दालने त्यांच्यासाठी उघडली असती.[१५२] परंतु त्यांनी खोटे ठरविले म्हणून आम्ही त्यांना त्यांच्या कमाईच्या मोबदल्यात पकडले.

وَلَوْ أَنَّ أَهْلَ الْقُرَىٰٓ آمَنُوا وَاتَّقَوْا لَفَتَحْنَا عَلَيْهِم بَرَكَاتٍ
مِّنَ السَّمَآءِ وَالْأَرْضِ وَلَٰكِن كَذَّبُوا فَأَخَذْنَاهُم
بِمَا كَانُوا يَكْسِبُونَ ﴿٩٦﴾

९७. मग काय वस्त्यांमधील लोक या गोष्टीपासून निर्भय झाले आहेत की आमची शिक्षा रात्रीच्या वेळी यावी जेव्हा ते झोपी गेलेले असावेत?

أَفَأَمِنَ أَهْلُ الْقُرَىٰٓ أَن يَأْتِيَهُم بَأْسُنَا بَيَاتًا وَهُمْ
نَآئِمُونَ ﴿٩٧﴾

९८. किंवा वस्त्यांमधील लोक या गोष्टीपासून निर्धास्त झाले आहेत की आमची शिक्षा भरदिवसा यावी जेव्हा ते खेळत असावेत?

أَوَأَمِنَ أَهْلُ الْقُرَىٰٓ أَن يَأْتِيَهُم بَأْسُنَا ضُحًى
وَهُمْ يَلْعَبُونَ ﴿٩٨﴾

९९. काय हे लोक अल्लाहच्या युक्ति पासून निर्भय झाले आहेत.[१५३] अल्लाहच्या युक्तिपासून केवळ तेच लोक निर्भय होतात जे नाश पावणारे असावेत.

أَفَأَمِنُوا مَكْرَ اللَّهِ ۚ فَلَا يَأْمَنُ مَكْرَ اللَّهِ إِلَّا الْقَوْمُ
الْخَاسِرُونَ ﴿٩٩﴾

१००. काय त्या लोकांना जे जमीनीवरील पूर्वी होऊन गेलेल्या रहीवाश्यांनंतर तिचे वारस होतात, हा बोध लाभला नाही की आम्ही इच्छिल्यास त्यांच्या अपराधांमुळे त्यांना तावडीत घेऊ, [१५४] परंतु आम्ही त्यांच्या हृदयांवर मोहर लावून देतो, [१५५] ज्यामुळे ते काहिहि ऐकत नाही.

أَوَلَمْ يَهْدِ لِلَّذِينَ يَرِثُونَ الْأَرْضَ مِن بَعْدِ أَهْلِهَآ
أَن لَّوْ نَشَآءُ أَصَبْنَاهُم بِذُنُوبِهِمْ ۚ وَنَطْبَعُ عَلَىٰ قُلُوبِهِمْ
فَهُمْ لَا يَسْمَعُونَ ﴿١٠٠﴾

१५०. याचे स्पष्टीकरण सूरह अनआम टीप क्र. ७२ मध्ये आले आहे.

१५१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप ७४.

१५२. आर्थिक सुस्थिती उत्पन्नाच्या विपुलतेवर अवलंबून असते. अर्थात विपुल उत्पन्नाकरिता पाऊस व हवामानाची योग्य साथ लाभणे आवश्यक आहे. परंतु पाऊस व हवामानाचा उचित लाभ घडविणे माणसाच्या अवाक्यातली गोष्ट नाही, किंबहुना ती अल्लाहच्या निश्चयावर निर्भर आहे. जर एखाद्या इलाक्यातील वा देशातील लोक सामुदायिक रित्या ईमान बाळगून अल्लाहशी एकनिष्ठतेचा संबंध जोडतील व त्याचे भय बाळगून जीवन व्यतीत करू लागतील तर सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्या करीता आकाश व जमीनीला लाभदायक बनवील आणि अत्याधिक उत्पन्नामुळे त्यांना आर्थिक सुस्थिती लाभेल व ही सुस्थिती ज्याअर्थी मांगल्य समृद्धीच्या खजिन्यांनी युक्त असेल म्हणून त्या सुस्थितीहून अगदी भिन्न असेल जी काफीरांना वेळेपुरती लाभते, व जिचा उद्देश त्यांना ढील देणे हा असतो. यासाठी की त्यांनी आपले माप भरावे.

स्पष्ट झाले की इहलोकातील खऱ्या खुऱ्या सुस्थितीचे रहस्य भौतिक वादात नाही किंबहुना इशोपासनेत सुप्त आहे.

१५३. अर्थ हा की अल्लाहची शिक्षा एखाद्या जाती समूहावर अशा वेळी येऊ शकते जेव्हा बाह्यत: शिक्षेची लक्षणे दिसून येत नसावीत आणि लोक ऐहीक सुखोपभोगात इतके मग्न असावेत की एखाद्या शिक्षेच्या येण्याविषयी त्यांना कल्पनाहि नसावी, तथापि ईश्वराचा गुप्त हात त्या जातीसमूहा विरूद्ध काम करीत असावा व त्याने विनाशाच्या सबबी अशा प्रकारे निर्माण कराव्यात की त्या जन समूहाला किंचितहि जाणीव न व्हावी की त्याचा विनाश-काल जवळ येऊन ठेपला आहे. यालाच अल्लाहची सुप्त उपाय योजना (युक्ति) म्हटले गेले आहे.

१५४. अर्थात नंतर येणारे जनसमूह आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या जन समूहांच्या पतनापासून बराच बोध घेऊ शकतात जो जो जन समूह नष्ट झाला आहे त्याने आपल्या पश्चात विनाशाची कारणे सोडली आहेत ज्यांचा संबंध श्रद्धा व नितिच्या बिघाडाशी असतो. परंतु नंतर येणारे जनसमूह घटनांना त्यांच्या मूळ स्वरूपात पाहण्याचा प्रयत्न करीत नाही किंबहुना त्या घटनांचा चुकीचा खुलासा देऊ लागतात.

१५५. हृदयांवर मोहर लावण्याचा अर्थ सूरह बकरा टीप क्र. १५ मध्ये केला गेला आहे.

१०१. या वस्त्या होत ज्यांच्या घटना आम्ही तुम्हाला ऐकवित आहोत. त्यांच्याजवळ त्यांचे पैगंबर उघड निशाण्या घेऊन आले होते, परंतु ज्याअर्थी त्यांनी पूर्वी खोटे ठरविले होते म्हणून ते ईमान बाळगणारे नव्हते [१५६] अशा प्रकारे अल्लाह काफ़ीरांच्या हृदयांवर मोहर लावतो.

تِلْكَ الْقُرٰى نَقُصُّ عَلَيْكَ مِنْ اَنْۢبَآئِهَا ۚ وَلَقَدْ جَآءَتْهُمْ رُسُلُهُمْ بِالْبَيِّنٰتِ ۚ فَمَا كَانُوْا لِيُؤْمِنُوْا بِمَا كَذَّبُوْا مِنْ قَبْلُ ؕ كَذٰلِكَ يَطْبَعُ اللّٰهُ عَلٰى قُلُوْبِ الْكٰفِرِيْنَ ﴿۱۰۱﴾

१०२. आणि आम्हाला त्यांच्यापैकी बहुतेक वचननिष्ठ आढळले नाहीत.[१५७] आणि आम्हाला कित्येक तर दुराचारीच आढळले. [१५८]

وَمَا وَجَدْنَا لِاَكْثَرِهِمْ مِّنْ عَهْدٍ ۚ وَاِنْ وَّجَدْنَآ اَكْثَرَهُمْ لَفٰسِقِيْنَ ﴿۱۰۲﴾

१०३. मग त्यांच्यानंतर आम्ही मूसाला आपल्या निशाण्यांसह फिरऔन [१५९] व त्याच्या दरबारींकडे पाठविले परंतु त्यांनी देखील आमच्या निशाण्यांवर अत्याचार केला तर पहा या गर्विष्ठ लोकांचा शेवट कसा झाला. [१६०]

ثُمَّ بَعَثْنَا مِنْۢ بَعْدِهِمْ مُّوْسٰى بِاٰيٰتِنَآ اِلٰى فِرْعَوْنَ وَمَلَا۟ئِهٖ فَظَلَمُوْا بِهَا ۚ فَانْظُرْ كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ الْمُفْسِدِيْنَ ﴿۱۰۳﴾

१०४. मूसा म्हणाला, हे फिरऔन ! मी सर्व विश्वांच्या पालनकर्त्याचा पैगंबर आहे.

وَقَالَ مُوْسٰى يٰفِرْعَوْنُ اِنِّيْ رَسُوْلٌ مِّنْ رَّبِّ الْعٰلَمِيْنَ ۙ﴿۱۰۴﴾

१०५. माझे (दर्जानुसार) कर्तव्य आहे की अल्लाहच्या नावाने कोणतीहि गोष्ट सत्याशिवाय न सांगावी. मी तुम्हा लोकांजवळ तुमच्या पालनकर्त्याकडून स्पष्ट निशाणी घेऊन आलो म्हणून तू बनी इस्राईलला माझ्या सोबत जाऊ दे.[१६१]

حَقِيْقٌ عَلٰٓى اَنْ لَّآ اَقُوْلَ عَلَى اللّٰهِ اِلَّا الْحَقَّ ؕ قَدْ جِئْتُكُمْ بِبَيِّنَةٍ مِّنْ رَّبِّكُمْ فَاَرْسِلْ مَعِيَ بَنِيْٓ اِسْرَآءِيْلَ ؕ﴿۱۰۵﴾

१०६. तो म्हणाला: जर तू एखादी निशाणी [१६२] घेऊन आला आहे व सच्चा आहेत तर तिला सादर कर.

قَالَ اِنْ كُنْتَ جِئْتَ بِاٰيَةٍ فَاْتِ بِهَآ اِنْ كُنْتَ مِنَ الصّٰدِقِيْنَ ﴿۱۰۶﴾

१०७. मूसाने आपली लाठी टाकून दिली तेव्हा अचानक ती अजगराच्या स्वरूपात प्रकट झाली.[१६३]

فَاَلْقٰى عَصَاهُ فَاِذَا هِيَ ثُعْبَانٌ مُّبِيْنٌ ۚ﴿۱۰۷﴾

१०८. आणि आपला हात बाहेर काढला तेव्हा पाहणाऱ्यांनी पाहीले की तो चमकत होता [१६४]

وَّنَزَعَ يَدَهٗ فَاِذَا هِيَ بَيْضَآءُ لِلنّٰظِرِيْنَ ﴿۱۰۸﴾

१०९. फिरऔनच्या जन समूहाचे सरदार म्हणू लागले निःसंशय हा मोठा निष्णात जादूगर आहे.

قَالَ الْمَلَاُ مِنْ قَوْمِ فِرْعَوْنَ اِنَّ هٰذَا لَسٰحِرٌ عَلِيْمٌ ۙ﴿۱۰۹﴾

१५६. मनुष्य जेव्हा पहिल्यांदा पक्षपात किंवा घमेंडी मुळे सत्य कबूल करण्यास नकार दर्शवितो तेव्हा त्याची मानसिक अवस्था अशी होते की पुन्हा ते कबूल करणे त्याच्यासाठी सोपे राहात नाही.

१५७. वचनाशी अभिप्रेत स्वभाव वचनहि होय आणि ते वचन देखील जे मनुष्य संकटात असतांना आपल्या पालनकर्त्याशी करतो.

१५८. येथे 'दुराचारी' म्हणजे आपल्या स्वभावाशी बंड करणारा, नैतिक मर्यादांचे उल्लंघन करणारा व आपल्या पालन कर्त्याची आज्ञा न जुमानणारा.

१५९. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह नाजिआत टीप १३.

१६०. येथे हा किस्सा वर्णन करण्याचे महत्वपूर्ण उद्दीष्ट म्हणजे गर्विष्ठांच्या परिणीती पासून बोध देणे.

१६१. हजरत मूसा यांच्या मागणीचा मतितार्थ समजून घेण्याकरिता त्या परिस्थितीस डोळ्यासमोर ठेवणे अगत्याचे आहे ज्यात ही मागणी सादर केली गेली होती. तसेच ईश्वराच्या त्या योजनेलाहि दृष्टीपथात ठेवणे आवश्यक आहे जी त्याने बनी इस्राईलला पवित्रभूमी (पॅलेस्टीन) मध्ये वसविण्याबाबत योजिली होती.

बनी इस्राईलचा मूळ देश किनआन (पॅलेस्टीन) होता. हजरत याकूब (इस्राईल) यांचे पुत्र हजरत युसुफ जेव्हा इजिप्तमध्ये सत्ताधिकारावर आले तेव्हा त्यांच्या अमंत्रणावरून हे सर्व कुटुंब इज्पित मध्ये आले जेथे त्यांना प्रतिष्ठेचे स्थान लाभले व ते प्रभावी राहीलेत. तेथे त्यांचा वंश खूप वाढीस लागला, येथपावेतो की काही शतकातच त्यांचे एका विशाल जन समूहात रूपांतर झाले. परंतु इजिप्तच्या अनेकेश्वरवादी वातावरणात व ऐहीक भक्तिच्या संस्कृतीत राहून त्यांच्यात नैतिक व आचरणा संबंधीचे दोष निर्माण झाले आणि तेथला जुलमी शासक ''फिरऔन'' याने त्यांना गुलाम बनवून घेतले व त्यांच्यावर कठीण अत्याचार करायला सुरवात केली. त्यांच्याकडून सक्त मजुरीची कामे घेतली जात, व त्यांना निरनिराळ्या प्रकारे त्रास यातना दिल्या जात. त्यांची लोकसंख्या घटविण्याकरीता त्याने अशी जुलमी उपाय योजना केली होती की त्यांच्या मुलांना जन्म होताच ठार केले जावे. या कठीण कसोटीतून पार पडल्यानंतरहि ते अल्लाहच्या धर्मावर, जो त्यांना त्यांचे पूर्वज इब्राहीम, इसहाक व याक़ूब कडून वारसा रूपाने लाभला होता. कायम राहीले येथ पावेतो की सर्वश्रेष्ठ अल्लाहची कृपा आवेशात आली व त्याने यांना फिरऔनच्या तावडीतून सोडविण्याकरिता हजरत मूसा यांना जे बनी इस्राईल पैकीच होते पैगंबर बनवून पाठविले. बनी इस्राईलच्या बाबतीत सर्वश्रेष्ठ अल्लाहची योजना ही होती की त्यांना फिरऔनी सत्तेपासून मुक्त केले जावे; म्हणजे त्यांनी इजिप्तहून स्थलांतर करून जावे व या स्थलांतरात फिरऔनने कसली बाधा आणू नये. तद्नंतर काही काळपर्यंत सीना अरण्यात तंबू उभारून त्यांना अशा प्रकारे प्रशिक्षण दिले जावे की त्यांच्या गुलामीच्या बुद्धीचा शेवट व्हावा व त्यांच्या अंगी असे गुण निर्माण व्हावेत जे त्यांना अल्लाहच्या शरीअतचा खऱ्या अर्थाने धारक बनवू शकतील. या प्रशिक्षण कॅम्प मधून पार पडल्यानंतर व तूर पर्वतावर ''शरीअत'' प्रदान केल्यानंतर त्यांना पॅलेस्टीन-भूमीवर वसविले जावे, जी त्यांची वाडवडीलांची भूमी आहे अशासाठी की तिची इस्लामचे आमंत्रण केंद्र होण्याची पात्रता जी हजरत इब्राहीमने तिला दिली होती बहाल व्हावी आणि विश्व वासीयांकरिता एकेश्वरवादी धर्माची सत्यता स्पष्ट होत रहावी.

''तौरात'' मध्ये असा उल्लेख आहे की ज्यावेळी हजरत मूसा यांना प्रेषितत्व प्रदान केले गेले त्यावेळी त्यांना हे सूचित केले गेले होते की बनी इस्राईलला इजिप्तमधून काढून किनआन (पॅलेस्टीन) घेऊन जायचे आहे.

> ''परमेश्वर म्हणाला, मिसर देशात असलेल्या माझ्या लोकांची विपत्ति मी खरोखर पाहिली आहे. त्यांच्या मुकादमांच्या जाचामुळे त्यांनी केलेला आक्रोश मी ऐकला आहे, त्यांचे क्लेश मी जाणून आहे त्यास मिसऱ्यांच्या हातातून सोडवावे आणि त्या देशातून चांगल्या व मोठ्या देशात, दुधा, मधाचे प्रवाह जेथे वाहत आहेत अशा देशात म्हणजे कनानी, हिती, अमोरी, परिज्जी, हिव्वी व यबूसी यांच्या देशात त्यास घेऊन जावे म्हणून मी उतरलो आहे. पाहा इस्राइल वंशजांचा आक्रोश माझ्यापर्यंत आला आहे. मिसरी लोक त्यांच्यावर कसा जाच जुलूम करीत आहेत हेहि मी प्रत्यक्ष पाहिले आहे तर आता चल, तू मिसर देशातून माझे लोक इस्राइल वंशज यास बाहेर काढावे म्हणून मी तुला फारोकडे पाठवितो.''
> (निर्गम ३: ७ ते १०)

आणि हा आदेश देखील दिला होता की त्यांनी बनी इस्राईलच्या प्रौढांना स्पष्ट सांगावे की ईश्वर त्यांना पॅलेस्टीन घेऊन जाऊ इच्छितो.

> ''तू जा आणि इस्राएलाच्या वडील जनास जमवून सांगा, तुमच्या पूर्वजांचा देव अब्राहामाचा, इसहाकाचा व याकोबाचा देव परमेश्वर याने मला दर्शन देऊन म्हटले की मिसर देशात तुमचे काय होत आहे हे मला कळले आहे. मिसर देशातल्या विपत्तीतून सोडवून कनानी, हित्ती, अमोरी, परिज्जी, हिव्वी व यबूसी यांच्या देशात घेऊन जाईन.''
>
> (निर्गम - ३: १६-१७)

तथापि फिरऔनला याचा उलगडा केला गेला नव्हता की बनी इस्राईलची अंतिम मजल कोणती आहे कारण असे करणे हिताविरुद्ध झाले असते. पॅलेस्टीन त्यांची अंतिम मजल आहे ही गोष्ट जाहीर करण्याचा अर्थ हा होता की ठरलेल्या वेळे आधीच पॅलेस्टीनीयांना युद्धाचे आमंत्रण दिले जावे. म्हणून हजरत मूसा यांनी फिरऔनजवळ फक्त प्राथमिक टप्प्याचा उल्लेख केला . उदा. हे की ते (हजरत मूसा) बनी इस्राईलला वाळवंटात घेऊन जाऊ इच्छितात अशासाठी की त्यांनी अशा जनावरांची कुर्बानी करावी ज्यांची ते इजिप्तमध्ये राहून करू शकत नाही किंवा हे की ते अल्लाहच्या उपासनेकरीता व ईद साजरी करण्याकरिता घेऊन जाऊ इच्छितात. यास्तव 'तौरात' मध्ये उल्लेखिले आहे:

> ''नंतर मोशे व अहरोन फारोकडे जाऊन म्हणाले, इस्राएलाचा देव परमेश्वर सांगत आहे की माझ्या लोकांनी माझ्या प्रीत्यर्थ रानात उत्सव करावा म्हणून त्यास जाऊ द्यावे तेव्हा फारो म्हणाला, हा कोण परमेश्वर की ज्याचे ऐकून मी इस्राएलास जाऊ द्यावे, मी त्या परमेश्वराला जाणत नाही आणि इस्राएलास काही जाऊ देणार नाही. ते म्हणाले इब्रयांच्या देवाने आम्हास भेट दिली तर आता आम्हास तीन दिवसांच्या वाटेवर रानात जाऊ द्यावे आणि आमचा देव परमेश्वर यास यज्ञ करू द्यावा.' (निर्गम ५: १ ते ३ )
>
> ''नंतर परमेश्वर मोशेस म्हणाला, फारोकडे जाऊन त्यास सांग परमेश्वर असे म्हणतो की माझ्या लोकांनी माझी सेवा करावी म्हणून त्यास जाऊ द्यावे'' (निर्गम ८ : १)

यावरून ही गोष्ट अगदी स्पष्टत: ध्यानी येते की हजरत मूसा यांची ही मागणी जातीय मागणी नव्हती, किंबहुना ही अशी मागणी होती, जिच्या मागे सर्वश्रेष्ठ अल्लाहची महान योजना होती, व तिच्याशी महत्वपूर्ण धार्मिक बाबी संबंधित होत्या. केवळ याच कारणास्तव या मागणीला पूर्ण सामर्थ्यानिशी व आरंभातच फिरऔन समोर प्रस्तुत करण्याचा आदेश दिला गेला होता. ही गोष्ट पवित्र कुरआनाच्या अनेक आयती व तौरातच्या वर्णनावरून स्पष्ट आहे. या मागणी बरोबर एकेश्वरवादाचे आमंत्रणहि सादर करण्याचा आदेश दिला गेला होता, यासाठी की फिरऔन करिता अल्लाहचे प्रमाण प्रस्थापित व्हावे. म्हणून सूरह नाजिआत मध्ये आहे.

اِذْهَبْ اِلٰی فِرْعَوْنَ اِنَّهٗ طَغٰی۔ فَقُلْ هَلْ لَّکَ اِلٰۤی اَنْ تَزَکّٰی۔
وَ اَهْدِیَکَ اِلٰی رَبِّکَ فَتَخْشٰی۔ (سورہ النازعات ۱۷ تا ۱۹)

> ''फिरऔन जवळ जा, तो बंडखोर झाला आहे आणि त्याला सांगा काय तू असे इच्छितोस की स्वच्छ शुद्धता पत्करावी व मी तुला तुझ्या पालनकर्त्याचा मार्ग दाखवू. ज्यायोगे तू त्याचे भय बाळगावे.' (अन-नाजिआत : १७ ते १९)

आणि हजरत मूसा व हजरत हारून यांनी जे आमंत्रण फिरऔन समोर सादर केले होते ते सूरह ताहा मध्ये विवरणासह वर्णिले गेले आहे. हेच ते आमंत्रण ज्याला इतर पैगंबर सादर करीत राहीले. तथापि हजरत मूसा यांचा संबंध केवळ काफ़िर जाती समूहाशीच नव्हता तर मुस्लिम जन समूहाशी देखील होता म्हणून त्यांना एका खास मोहिमेवर पाठवितो गेले होते. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाह पैगंबरांना केवळ आमंत्रण व प्रसाद कार्याकरीता पाठवितो अशी कल्पना करणे चुकीचे आहे, किंबहुना इतर महत्वपूर्ण कार्ये देखील विभिन्न पैगंबरांना सोपवित राहिला आहे. यास्तव हजरत इब्राहीम यांच्या हातून काबागृहाची उभारणी, हजरत दाऊद यांच्या हातून खिलाफतीची स्थापना, हजरत सुलेमान द्वारे विशाल व भव्य इस्लामी साम्राज्याची स्थापना व जिन्न आणि पक्षांवर त्यांचे शासन यासारखी महान कार्ये याविषयीची स्पष्ट उदाहरणे होत. हजरत मूसा यांच्या मागणीचे एक कारण असे की सुरवातीस फिरऔन समक्ष फक्त एकेश्वरवाद मान्य करण्याचे आमंत्रण सादर केले गेले होते, व बनी इस्राईलच्या सुटकेची मागणी नंतरच्या अवस्थेत जेव्हा फिरऔनच्या ईमान बाळगण्याबाबत निराशा झाली होती; सादर केली गेली. जर फिरऔनने ईमान बाळगले असते तर ना सुटकेची मागणी सादर केली गेली असती व ना बनी इस्राईलला इजिप्त सोडून जाण्याची गरज भासली असती, तथापि ही पूरेपूर बनवा-बनवी आहे व कुरआनाच्या वर्णनानुसार यात कसलेहि औचित्य नाही.

कुरआनाचे वर्णन असे की ,हजरत मूसा यांनी फिरऔनला ईश–चमत्कार दाखविण्यापूर्वीच बनी इस्राईलच्या सुटकेची मागणी प्रस्तुत केली होती. जसे भाष्यार्तगत आयतींच्या संबधान्वये नंतरच्या आयती करून स्पष्ट होते.

यावरून या विचाराचेही खंडन होते जो आवाहन-कार्य करणाऱ्यांच्या मनात सर्वसामान्यपणे उद्‌भवतो. तो विचार असा की, एका अशा देशात जेथे मुस्लिमेतर बहुसंख्यांक व मुस्लिम अल्पसंख्य आहेत तेव्हा फक्त आवाहन कार्याकडेच लक्ष दिले गेले पाहिजे आणि मुस्लिमांच्या समस्यांशी सत्याच्या आवाहकांनी रस घेऊ नये अन्यथा त्यांचे चित्र सांप्रदायिक (आजच्या परिभाषेत जातीयवादी) ठेरल. प्रश्न हा निर्माण होतो की पैगंबराहून अधिक श्रेष्ठ सत्याचा आवाहक कोण असू शकतो, परंतु आम्हाला असे दिसून येते की हजरत मूसा यांनी दोन्ही कामे एकाच वेळी पार पाडलीत, आणि असे करतांना याची तमा बाळगली नाही की फिरऔनच्या नजरेत त्यांचे चित्र निमंत्रकाचे

ठरते कि बनी इस्राईलच्या नेत्याचे. वस्तुस्थिती ही आहे की एखाद्या देशात जेथे कुफ्रचा गवगवा असावा मुसलमानांच्या त्या समस्यांशी ज्या त्यांच्या प्राण-वित्त व धर्म-शरीअतच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वपूर्ण असाव्यात दृष्टीआड करणे व असे समजणे की आमची जबाबदारी केवळ इस्लामचे आमंत्रण सादर करण्यापुरती आहे किंवा हे की त्या समस्यामध्ये रस घेण्यात आमची ''तात्विक भूमिका'' बाकी राहणार नाही. ही एक अशी गोष्ट आहे जिचे समर्थन ना कुरआन व सुन्नाह द्वारे होते ना पैगंबरांच्या आदर्शाने 'तात्विक भुमिके'ची ही कल्पना वैचारीक अतिशयोक्तिवर आधारीत आहे व असे करणे म्हणजे धर्माच्या काही महत्वपूर्ण कार्यासंबंधीच्या निकडीपासून अलीप्त रहाणे होय.

१६२. अभिप्रेत चमत्कार होय.

१६३. अर्थात हजरत मूसा यांची लाठी खरोखर साप बनली होती.

१६४. हा दुसरा ईश-चमत्कार होता; जो हजरत मूसा यांना दिला गेला होता. त्या चमत्कारांना पाहून हा विश्वास निर्माण होत असे की हजरत मूसा यांना सृष्टीच्या सत्ताधिकाऱ्याने आपला पैगंबर बनवून पाठविले आहे.

११०. तुम्हाला तुमच्या देशातून बाहेर घालवू इच्छितो [१६५] तेव्हा तुमचे काय मत आहे?

يُّرِيْدُ اَنْ يُّخْرِجَكُمْ مِّنْ اَرْضِكُمْ ۚ فَمَاذَا تَاْمُرُوْنَ ﴿١١٠﴾

१११. त्यांनी (फिरऔनला) म्हटले: मूसा व त्याच्या भावाला सध्या सोडून द्यावे आणि शहरांमध्ये हारकारे रवाना करावे.

قَالُوْٓا اَرْجِهْ وَاَخَاهُ وَاَرْسِلْ فِى الْمَدَاۗىِٕنِ حٰشِرِيْنَ ﴿١١١﴾

११२. ज्यायोगे त्यांनी तमाम निष्णात जादूगारांना एकत्रित करून तुझ्याजवळ आणावे.

يَاْتُوْكَ بِكُلِّ سٰحِرٍ عَلِيْمٍ ﴿١١٢﴾

११३. यास्तव जादूगर फिरऔन जवळ आले. ते म्हणाले:जर आम्ही प्रभावशाली झालो तर आम्हाला बक्षीस निश्चित मिळेल?[१६६]

وَجَاۗءَ السَّحَرَةُ فِرْعَوْنَ قَالُوْٓا اِنَّ لَنَا لَاَجْرًا اِنْ كُنَّا نَحْنُ الْغٰلِبِيْنَ ﴿١١٣﴾

११४. फिरऔन म्हणाला: हो. अवश्य मिळेल आणि तुम्ही (आमच्या) निकटवर्ति लोकांमध्ये सामील व्हाल.

قَالَ نَعَمْ وَاِنَّكُمْ لَمِنَ الْمُقَرَّبِيْنَ ﴿١١٤﴾

११५. (मग जेव्हा सामना झाला तेव्हा) ते म्हणाले, मूसा एकतर तुम्ही (आधी) टाका किंवा आम्ही टाकतो.

قَالُوْا يٰمُوْسٰٓى اِمَّآ اَنْ تُلْقِيَ وَاِمَّآ اَنْ نَّكُوْنَ نَحْنُ الْمُلْقِيْنَ ﴿١١٥﴾

११६. तो म्हणाला, तुम्हीच टाका-मग जेव्हा त्यांनी (आपल्या दोऱ्या व काठ्या) टाकल्या तेव्हा लोकांच्या डोळ्यांना जादूने भारावून टाकले [१६७] व त्यांना भयग्रस्त केले व फार मोठी जादू दाखविली.

قَالَ اَلْقُوْا ۚ فَلَمَّآ اَلْقَوْا سَحَرُوْٓا اَعْيُنَ النَّاسِ وَاسْتَرْهَبُوْهُمْ وَجَاۗءُوْ بِسِحْرٍ عَظِيْمٍ ﴿١١٦﴾

११७. आणि आम्ही मूसावर आदेश अवतरीत केला की टाका आपली लाठी त्याने लाठी टाकताच ती त्यांच्या त्या खोट्या जादूला गिळंकृत करू लागली. [१६८]

وَاَوْحَيْنَآ اِلٰى مُوْسٰٓى اَنْ اَلْقِ عَصَاكَ ۚ فَاِذَا هِىَ تَلْقَفُ مَا يَاْفِكُوْنَ ﴿١١٧﴾

११८. अशा प्रकारे सत्य साबीत झाले व त्यांनी जे काही बनविले होते मिथ्या होऊन राहीले. [१६९]

فَوَقَعَ الْحَقُّ وَبَطَلَ مَا كَانُوْا يَعْمَلُوْنَ ﴿١١٨﴾

१६५. ही त्यांची आपसातील चर्चा आहे. जेव्हा ते वस्तुस्थितीस मान्य करू शकले नाहीत तेव्हा एक राजकीय आरोप हजरत मूसा यांच्यावर ठेवला गेला. मात्र असे करतांना आपण परस्पर विरुद्ध विधाने करीत आहोत याचा त्यांनी विचार केला नाही. कारण ज्या व्यक्तिला ते जादूगार म्हणत होते तिच्यापासून हा धोका कसा असू शकत होता की ती देशातून देशवासीयांनाच बाहेर घालवील? काय जादूच्या बळावर सत्ताधिकार प्राप्त केला जाऊ शकतो? आणि काय एखाद्या जादूगाराने चमत्कार दाखवून एखादा देश पादाक्रांत केला आहे?

१६६. यावरून जादुगारांच्या नितीमत्तेचा अंदाज लागतो. ते इनामाच्या लालसेने चमत्कार दाखवायला आले होते सत्य आणि असत्याशी त्यांना कसलीहि गोडी नव्हती.

१६७. तात्पर्य,जादूची वास्तविकता डोळ्यात धूळ फेकणे व फसवेगिरी याहून जास्त काहीच नाही. जादूगारांच्या दोऱ्या व लाठ्या खरोखर साप बनल्या नव्हत्या, किंबहुना लोकांना तसा भास झाला की त्यांचे सापात रूपांतर झाले आहे.

१६८. म्हणजे हजरत मूसा यांच्या अजगराने जादूगारांच्या जादूला बघता बघता नष्ट केले. हा किस्सा ''तौरात'' मध्येहि संक्षिप्तरित्या वर्णिला गेला आहे:-

> ''मग मोशे व अहरोन यांनी फारोजवळ जाऊन परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे केले, अहरोनाने आपली काठी फारो व त्याचे सेवक यांच्यापुढे टाकिली तेव्हा तिचा साप झाला मग फारोने जाणते व मांत्रिक बोलाविले मिसराच्या त्या जादूगारांनी सुद्धा आपल्या मंत्र तंत्राच्या योगे तसाच प्रकार केला. त्यांनीहि आपापल्या काठ्या खाली टाकताच त्यांचे साप झाले. पण अहरोनाच्या काठीने त्यांच्या काठ्या गिळून टाकल्या तथापि फारोचे मन कठीण झाले आणि परमेश्वराने म्हटले होते त्याप्रमाणे तो मोशे व अहरोन यांचे म्हणणे ऐकना. (निर्गम ७: १० ते १३)

१६९. फिरऔन ने हजरत मूसा यांच्या चमत्कारास जादू ठरविले होते, तथापि त्या सामन्यामुळे जादू आणि ईश-चमत्कार यामधील भेद स्पष्ट झाला. जादू एखाद्या गोष्टीची वास्तविकता व मूलतत्वास परिवर्तित करीत नाही किंबहुना तो एक आभास मात्र असतो. याउलट ईश-चमत्कार वस्तुच्या वास्तवतेस व मूलतत्वास परिवर्तित करतो. तो डोळ्यांना होणारा भास किंवा फसवेगिरी नसते. जादू दाखविणारे नैतिक दृष्ट्या खालावलेले व अविश्वसनीय लोक असतात. या तुलनेने ईश-चमत्कार दाखविणारे लोक स्वच्छ शुद्ध चारित्र्याचे व नैतिक दृष्ट्या उच्च पातळीचे असतात. आणि जेव्हा त्यांच्या हातून ईश-चमत्कार प्रकट होतो तेव्हा विश्वास होऊ लागतो की हे सृष्टीच्या शासकाचे चिन्ह आहे जे प्रकट झाले आहे. आणि जेव्हा ईश-चमत्काराचा सामना जादूशी होतो तेव्हा तो जादूवर प्रभावशाली ठरतो.

فَغُلِبُوْا هُنَالِكَ وَانْقَلَبُوْا صٰغِرِيْنَ ﴿١١٩﴾

११९. त्यांना प्रभावित व्हावे लागले व ते अपमानित झाले. [१७०]

وَاُلْقِيَ السَّحَرَةُ سٰجِدِيْنَ ﴿١٢٠﴾

१२०. आणि जादूगार आपोआप सजध्यात पडले.[१७१]

قَالُوْٓا اٰمَنَّا بِرَبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿١٢١﴾

१२१. म्हणू लागले: आम्ही सर्व विश्वांच्या पालनकर्त्यावर ईमान बाळगले. [१७२]

رَبِّ مُوْسٰى وَهٰرُوْنَ ﴿١٢٢﴾

१२२. मूसा व हारूनच्या पालनकर्त्यावर. [१७३]

قَالَ فِرْعَوْنُ اٰمَنْتُمْ بِهٖ قَبْلَ اَنْ اٰذَنَ لَكُمْ ۚ اِنَّ هٰذَا
لَمَكْرٌ مَّكَرْتُمُوْهُ فِي الْمَدِيْنَةِ لِتُخْرِجُوْا مِنْهَآ اَهْلَهَا ۚ فَسَوْفَ
تَعْلَمُوْنَ ﴿١٢٣﴾

१२३. फिरऔन म्हणाला: माझी अनुमति न घेता तुम्ही त्यावर ईमान बाळगले [१७४] हा एक कट आहे जो तुम्ही या शहरात केला आहे यासाठी की येथल्या रहिवाश्यांना येथून बाहेर घालवावे. [१७५] आता तुम्हाला (याचा परिणाम) माहित होईल.

لَاُقَطِّعَنَّ اَيْدِيَكُمْ وَاَرْجُلَكُمْ مِّنْ خِلَافٍ
ثُمَّ لَاُصَلِّبَنَّكُمْ اَجْمَعِيْنَ ﴿١٢٤﴾

१२४. मी तुमच्या हाता-पायांना उलट-सुलट कापून टाकीन व नंतर तुम्हा सर्वांना सूळावर चढवीन.[१७६]

قَالُوْٓا اِنَّآ اِلٰى رَبِّنَا مُنْقَلِبُوْنَ ﴿١٢٥﴾

१२५. ते म्हणाले: आम्हाला अखेरीस आपल्या पालनकर्त्याकडेच परतून जायचे आहे.[१७७]

وَمَا تَنْقِمُ مِنَّآ اِلَّآ اَنْ اٰمَنَّا بِاٰيٰتِ رَبِّنَا لَمَّا جَآءَتْنَا ۗ رَبَّنَآ
اَفْرِغْ عَلَيْنَا صَبْرًا وَّتَوَفَّنَا مُسْلِمِيْنَ ﴿١٢٦﴾

१२६. तू आमच्याशी केवळ या गोष्टीचा सूड घेत आहेस की जेव्हा आमच्या पालनकर्त्याची चिन्हे आमच्या समोर आली तेव्हा आम्ही त्यांच्याविषयी ईमान बाळगले. हे आमच्या पालनकर्त्या ! आम्हाला सहनशक्तिचा लाभ घडव आणि अशा स्थितीत मरण दे की आम्ही मुस्लिम असावे.[१७८]

وَقَالَ الْمَلَاُ مِنْ قَوْمِ فِرْعَوْنَ اَتَذَرُ مُوْسٰى وَقَوْمَهٗ
لِيُفْسِدُوْا فِي الْاَرْضِ وَيَذَرَكَ وَاٰلِهَتَكَ ۗ قَالَ سَنُقَتِّلُ
اَبْنَآءَهُمْ وَنَسْتَحْيٖ نِسَآءَهُمْ ۚ وَاِنَّا فَوْقَهُمْ قٰهِرُوْنَ ﴿١٢٧﴾

१२७. आणि फिरऔनच्या जन समूहाच्या सरदारांनी (फिरऔनला) म्हटले: काय तू मूसा व त्याच्या जन समूहाला सोडून देशील की त्यांनी देशभर उपद्रव माजवावा?[१७९]आणि तुझा व तुझ्या उपास्यांचा त्याग करावा ?[१८०] तो म्हणाला: आम्ही यांच्या मुलांना ठार करू [१८१] व यांच्या मुलींना जिवंत ठेवू. आम्ही तर यांच्यावर पूर्णपणे सत्ताधीश आहोत.

१७०. फिरऔनने दाव्यासह म्हटले होते की हजरत मूसा यांचा ईश चमत्कार हा ईश-चमत्कार नव्हे किंबहुना जादू आहे; व आव्हान दिले होते की हजरत मूसा यांनी जादूगारांशी सामना जिंकून दाखववावा. तद्नुसार हजरत मूसा यांनी फिरऔनचे आव्हान स्वीकारले. फिरऔनला खात्री होती की तो जादूगारांकरवी लाठीचा साप करून दाखविण्यात सफल ठरेल, मग हजरत मूसा यांच्या ईश-चमत्कृतिचे काहीच मोल राहणार नाही. यास्तव त्याने प्रोग्राम असा बनविला की लोकांच्या जबरदस्त गर्दीत याचे प्रात्यक्षिक व्हावे परंतु जेव्हा हजरत मूसा यांनी बाजाजिंकली व जादूगारांचा पराभव झाला तेव्हा फिरऔनची युक्ति धुळीस मिळाली व त्या अफाट जमावात त्याला वाईटरित्या अपमानाला तोंड द्यावे लागले.

१७१. जेव्हा जादूगारांची जादू फोल झाली तेव्हा त्यांची खात्री झाली की हज़रत मूसा यांच्या लाठीचे साप होणे जादू नव्हे, किंबहुना एक ईश-चिन्ह आहे. यास्तव त्यांनी आपोआप ईश्वरासमोर सजदा केला (नतमस्तक झाले) ते जरी जादूगर होते तरीहि त्यांच्या अंगी सत्य प्रियतेची भावना काही ना काही प्रमाणात होती. म्हणूनच सत्य-स्वीकृतीची सुबुद्धि त्यांना लाभली.

१७२. हा या गोष्टीचा पुरावा होय की ईमानामुळे माणसाच्या अंगी असामान्य धैर्य निर्माण होते मग तो आपल्या पालनकर्त्याशी एकनिष्ठ असण्यांचे घोषित करण्याबाबत एखाद्या फिरऔनची खातीरजमा करीत नाही.

१७३. म्हणजे हज़रत मूसा व हज़रत हारून ज्याला आपला पालनकर्ता म्हणतात त्याला आम्ही आपला पालनकर्ता मानले आहे. या स्पष्टीकरणाचा उद्देश फिरऔन समक्ष सत्याचे निरंकुश व्यक्तिकरण करणे हे होते.

१७४. तात्पर्य, फिरऔनच्या जुलमी-शासनात धर्मांतराचे स्वातंत्र्य नव्हते.

१७५. जेव्हा भर गर्दीत लोकांसमोर फिरऔनची फजिती झाली तेव्हा आपल्या अवहेलनेवर पांघरूण घालण्यासाठी त्याने हजरत मूसा व जादूगारांवर कट केल्याचा आरोप ठेवला व तोहि राजकीय स्वरूपाचा, यासाठी की त्यांना देशद्रोही ठरवून, लोकांना त्यांच्यापासून दूर राखले जावे. राजकारणी लोक सत्यनिष्ठ लोकांविरुद्ध अशाच प्रकारचे तोडगे वापरीत असतात.

१७६. बहुधा फिरऔनच्या शसनात विद्रोहाची हीच शिक्षा होती.

१७७. किती ईमान-वर्धक उत्तर आहे जे जादूगारांनी दिले आणि कशी ईश्वराशक्ति आहे जी ईमान बाळगताच जादूगारांच्या अंगी निर्माण झाली.

१७८. फिरऔनकडून मोठे बक्षिस मिळेल या लालसेनेच जादूगार सामन्याकरिता आले होते. ज्यावरून त्यांच्या खालावलेल्या नैतिकतेचा अंदाज होतो. परंतु ईमानामुळे बघता बघता त्यांच्या बुद्धित व आचरणात जबरदस्त क्रांती झाली आणि आता ते निश्‍चिततेच्या उच्च स्थानावर पोहोचले होते व त्यांच्या अंगी असे ईमानी सामर्थ्य निर्माण झाले की ते फिरऔनच्या शक्तिशीहि टक्कर घेण्याकरिता तयार झाले. जणू ते म्हणत असावेत–

**'सरफरोशी की तमन्ना अब हमारे दील में है**
**देखना है ज़ोर कितना बाज़ु ए क़ातिल में है'**

(आता आमच्या अंत: करणात आत्मबलीदानाची भावना आहे. मारेकरीच्या बाहूत किती शक्ति आहे हेच पहायचे आहे.)

१७९. पैगंबराहून अधिक चांगले ईहलोकीय सुधारणेचे कार्य कोण करू शकतो, परन्तु काफ़ीरांच्या दृष्टीने त्यांचे हे कार्य उत्पात कार्य असते, वस्तुत: ते फार लाभप्रद असते.

१८०. स्पष्ट झाले की फिरऔन स्वत: देखील एक उपास्य होऊन बसला होता व त्याने इतरहि उपास्ये बनवून ठेवली होती. प्राचीन काळात सर्व सामान्यत: बादशहा (शासक) प्रजेकडून आपली पूजा करवित आणि जेथ पर्यंत फिरऔनचा संबंध आहे तो स्वत:ला सूर्यदेवतेचा अवतार असण्यासंबंधी दावा करीत होता. तसेच इजिप्तमधील समाज हा नक्षत्र पूजा व मूर्तिपूजा करणारा समाज होता.

इजिप्तमध्ये देखील पहिल्या सामी वंशाच्या काळात या सारखीच नक्षत्र पूजा चालू होती. सर्वात मोठे दैवत 'सूर्य' होते ज्याला ते आपल्या भाषेत 'रअ' म्हणत, त्यांच्या राजधानीचे नाव मदीनतुश-शम्स (सूर्याचे शहर) असे होते. ज्याला ते ''उन'' असे म्हणत. येथेच सूर्य देवतेचे मंदीर होते. राजा हा सूर्यदेवतेचा पुत्र समजला जाई म्हणून त्याचे उपनाव रअ्म्सीस म्हणजे ''सूर्य पुत्र''असे होते. याच कारणास्तव इजिप्तचे शासक राजे आपण देव असल्याचा दावा करीत. (अर्जुल् कुरआन-अल्लामा सैयद सुलैमान नदवी खंड-२ पृष्ठ १६०)

इन्सायक्लोपिडीया ऑफ रिलीजन अँड एथिक्सच्या खालील उदघृत गोष्टींवरून हे स्पष्ट होईल की इजिप्तमध्ये 'रअ' म्हणजे सूर्य देवतेची पूजा केली जात होती व राजे स्वत:ला 'सूर्य देवतेची संतति' असे म्हणवित.

''Ra, The sun-god, was specially worshipped at Heliopolis.....Every king of Egypt after wards had a Ra-name-Ra was thus more constantly recognised than any other god.''

(Ency. of Religion & Ethics Vol. V. Page 248)

''Thenceforward the Pharaos regularly designated themselves as sons of Ra'' (do Vol. VI P. 278)

या व्यतिरिक्त इजिप्त-वासी गाईचीहि पूजा करीत असत. राहिला फिरऔनचा हा दावा की-

اَنَا رَبُّكُمُ الْاَعْلٰى ـ (النازعات ـ ٢٤)

''मी आहे तुमचा सर्वश्रेष्ठ रब्ब (ईश्वर)'' (अन नाजिआत-२४)

तर हे केवळ हजरत मूसा यांना निरुत्तर करण्याकरिता म्हटले होते कारण हजरत मूसा म्हणाले होते की मी सर्व विश्वांच्या पालनकर्त्याचा पैगंबर आहे. हाच तो तर्क जो नमरूदने हज़रत इब्राहीम यांच्या एकेश्वरवादी आमंत्रणाच्या उत्तरादाखल लढविला होता तेव्हा हजरत इब्राहीम यांनी फर्माविले:

رَبِّيَ الَّذِىْ يُحْيٖ وَيُمِيْتُ ـ (البقرة ـ ٢٥٨)

''माझा पालनकर्ता तो होय तो जिवित राखतो व मारतो.''

त्यावर नमरूद लगेच म्हणाला,

اَنَا اُحْيٖ وَاُمِيْتُ ـ (البقرة ـ ٢٥٨)

''मी देखील जिवित राखतो व मारतो''. (अल् बकरा-२५८)

तात्पर्य, हे उत्तर हजरत इब्राहीम यांना निरुत्तर करण्याकरिता होते, अन्यथा तो अशी निरर्थक गोष्ट कशी सांगू शकत होता, ज्याअर्थी तो स्वत: आपल्या जीवन-मरणाविषयी सामर्थ्य बाळगत नव्हता.

फिरऔनने इजिप्तमध्ये देवी-देवतांची पूजा वर्ज्य ठरवली नाही कारण ही पूजा त्याच्या ईश्वरी-दाव्यात अडथळा बनली नव्हती. तथापि हजरत मूसा यांच्या ईश्वराला मान्य करण्याच्या स्थितीत फिरऔन सहीत सर्वच उपास्यांची वाट लागणार होती व केवळ एक अल्लाहचा अधिकार त्यांना मान्य करावा लागणार होता. त्यानंतर त्याच्या आदेशानाहि मान्य करावे लागणार होते. प्रामुख्याने या आदेशास की मूसासह बनी इस्राईलला जाऊ द्यावे. यास्तव तो ना स्वत: मूसाच्या ईश्वराला मान्य करण्यास तयार झाला व ना आपल्या प्रजेला तशी अनुमति दिली. त्याच्या परीने त्या काळचा सर्वात मोठा ईश्वर बादशहा होता, जो पूजा करण्या योग्यही होता व आज्ञा पालनासहि योग्य होता. त्याची ही घोषणा:

مَا عَلِمْتُ لَكُمْ مِّنْ اِلٰهٍ غَيْرِىْ ـ (القصص ـ ٣٨)

''मी नाही जाणत की माझ्याशिवाय तुमचा अन्य कोणी ईश्वर आहे.'' (अल कसस-३८)

याच अर्थाची होती. म्हणून असे समजणे उचित नव्हे की फिरऔन नास्तिक होता किंवा त्याने या अर्थाने स्वत: ईश्वर असल्याचा दावा केला होता की तो आकाश व जमीनीचा निर्माता आहे व त्यांवर त्याची हुकुमत आहे, किंबहुना तो या गोष्टीचा दावेदार होता की इजिप्तवर त्याचा सत्ताधिकार कायम आहे म्हणून तो उपासनेसहि पात्र आहे व आज्ञापालनासहि योग्य:

وَنَادٰى فِرْعَوْنُ فِىْ قَوْمِهٖ قَالَ يٰقَوْمِ اَلَيْسَ لِىْ مُلْكُ مِصْرَ وَهٰذِهِ الْاَنْهٰرُ تَجْرِىْ مِنْ تَحْتِىْ ۚ اَفَلَا تُبْصِرُوْنَ ـ (الزخرف ـ ٥١)

''आणि फिरऔनने आपल्या जातीसमूहाच्या दरम्यान पुकारून म्हटले-माझ्या जाती समूहाच्या लोकांनो! काय इज्पितवरील सत्ताधिकार माझा नाही? आणि काय या नद्या माझ्या खाली वाहत नाहीत? मग काय तुम्ही पाहात नाही?'' (अल जुखरूफ-५१)

(अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह नाजिआत, टीप १३, १८)

१८१. बनी इस्राईलची संख्या घटविण्याकरिता फिरऔनने हे शस्त्र पूर्वी देखील वापरले होते, पण त्यात त्याला मोठे यश लाभले नाही. आता पुन्हा ते वापरण्याचा निश्चय त्याने जाहीर केला. बायबल मधील उल्लेखानुसार:

तेव्हा फारोने आपल्या सर्व लोकांस आज्ञा केली की, जन्मेल तो प्रत्येक मुलगा नदीत टाका आणि प्रत्येक मुलगी जिवंत ठेवा. (निर्गम-१ : २२)

**मूसा आपल्या जन समूहास म्हणालाः अल्लाह कडून मदत मागा; व धीर धरा जमीन अल्लाहची आहे तो आपल्या दासांपैकी ज्याला इच्छितो तिचा वारस बनवितो. आणि चांगला शेवट ईश-भय बाळगणाऱ्यां करीताच आहे.** *(अल-क़ुरआन)*

१२८. मूसा आपल्या जन समूहास म्हणालाः अल्लाह कडून मदत मागा; व धीर धरा [१८२] जमीन अल्लाहची आहे तो आपल्या दासांपैकी ज्याला इच्छितो तिचा वारस बनवितो. आणि चांगला शेवट ईश-भय बाळगणाऱ्यां करीताच आहे.[१८३]

قَالَ مُوسٰى لِقَوْمِهِ اسْتَعِيْنُوْا بِاللّٰهِ وَاصْبِرُوْا ۚ اِنَّ
الْاَرْضَ لِلّٰهِ ۙ يُوْرِثُهَا مَنْ يَّشَآءُ مِنْ عِبَادِهٖ ؕ
وَالْعَاقِبَةُ لِلْمُتَّقِيْنَ ﴿۱۲۸﴾

१२९. ते म्हणालेः आपण येण्यापूर्वीहि आम्हाला गांजले गेले व आपल्या आगमनानंतरहि गांजले जात आहोत. तो म्हणाला-लवकरच तुमचा पालनकर्ता तुमच्या शत्रूला ठार करील व तुम्हाला जमीनीवर [१८४] सत्ताधिकारी बनविल, मग पाहील की तुम्ही कशा स्वरूपाचे आचरण अंगिकारता.[१८५]

قَالُوْۤا اُوْذِيْنَا مِنْ قَبْلِ اَنْ تَاْتِيَنَا وَمِنْۢ بَعْدِ مَا جِئْتَنَا ؕ
قَالَ عَسٰى رَبُّكُمْ اَنْ يُّهْلِكَ عَدُوَّكُمْ وَيَسْتَخْلِفَكُمْ فِى
الْاَرْضِ فَيَنْظُرَ كَيْفَ تَعْمَلُوْنَ ﴿۱۲۹﴾

१३०. आणि आम्ही फिरऔनच्या लोकांना दुष्काळ व उत्पन्नाच्या कमतरेत ग्रस्त केले, यासाठी की त्यांना ताकीद व्हावी.

وَلَقَدْ اَخَذْنَاۤ اٰلَ فِرْعَوْنَ بِالسِّنِيْنَ وَنَقْصٍ مِّنَ
الثَّمَرٰتِ لَعَلَّهُمْ يَذَّكَّرُوْنَ ﴿۱۳۰﴾

१३१. परंतु जेव्हा सुस्थिती येत असे तर म्हणत की आम्ही यास पात्र आहोत व जर एखादे संकट येत असे तर त्यास मूसा व त्याच्या सहकाऱ्यांचा अशुभपणा ठरवित. वस्तुतः त्यांची अशुभता अल्लाहच्याच जवळ होती.[१८६] परंतु त्यांच्यापैकी बहुतेक हे जाणत नव्हते.

فَاِذَا جَآءَتْهُمُ الْحَسَنَةُ قَالُوْا لَنَا هٰذِهٖ ۚ وَاِنْ تُصِبْهُمْ سَيِّئَةٌ
يَّطَّيَّرُوْا بِمُوْسٰى وَمَنْ مَّعَهٗ ؕ اَلَاۤ اِنَّمَا طٰٓئِرُهُمْ عِنْدَ اللّٰهِ
وَلٰكِنَّ اَكْثَرَهُمْ لَا يَعْلَمُوْنَ ﴿۱۳۱﴾

१३२. ते म्हणालेः आमच्यावर आपली जादू चालविण्याकरिता तुम्ही कसलीहि निशाणी आणा, आम्ही तुमची गोष्ट मान्य करणारे नव्हेत.

وَقَالُوْا مَهْمَا تَاْتِنَا بِهٖ مِنْ اٰيَةٍ لِّتَسْحَرَنَا بِهَا ۙ فَمَا نَحْنُ
لَكَ بِمُؤْمِنِيْنَ ﴿۱۳۲﴾

१३३. मग आम्ही त्यांच्यावर वादळ [१८७] व टोळ [१८८] व उवा [१८९] व बेडूक[१९०] आणि रक्त [१९१] पाठविले की सर्व वेगवेगळ्या निशाण्या होत्या [१९२] परंतु त्यांनी गर्व केला आणि ते होतेच अपराधी लोक.[१९३]

فَاَرْسَلْنَا عَلَيْهِمُ الطُّوْفَانَ وَالْجَرَادَ وَالْقُمَّلَ وَالضَّفَادِعَ
وَالدَّمَ اٰيٰتٍ مُّفَصَّلٰتٍ ۫ فَاسْتَكْبَرُوْا وَكَانُوْا
قَوْمًا مُّجْرِمِيْنَ ﴿۱۳۳﴾

१३४. जेव्हा त्यांच्यावर शिक्षा आपत्ति कोसळत असे तेव्हा ते म्हणत, हे मूसा तुमच्या पालनकर्त्याने तुम्हाला जे वचन दिले आहे त्याआधारे आमच्यासाठी प्रार्थना करा [१९४]जर तुम्ही ही शिक्षा आमच्यावरून दूर सारली तर आम्ही निश्चित तुमचे म्हणणे मान्य करू आणि बनी इस्राईलला तुमच्या सोबत पाठवू.

وَلَمَّا وَقَعَ عَلَيْهِمُ الرِّجْزُ قَالُوْا يٰمُوْسَى ادْعُ لَنَا رَبَّكَ بِمَا
عَهِدَ عِنْدَكَ ۚ لَئِنْ كَشَفْتَ عَنَّا الرِّجْزَ لَنُؤْمِنَنَّ لَكَ
وَلَنُرْسِلَنَّ مَعَكَ بَنِىْۤ اِسْرَآءِيْلَ ﴿۱۳۴﴾

१८२. एखाद्या जुलुमी शासनात राहून मुसलमानांनी जे खरे काम करायचे ते हेच की त्यांनी अल्लाहशी नाते मजबूत जोडून त्याच्या मदतीचे इच्छुक व्हावे व याचे उत्कृष्ट स्वरूप नमाज़ होय आणि कसल्याही परिस्थितीने प्रभावित न होता सत्यावर स्थैर्यशील रहावे.

१८३. म्हणजे राज्य व अधिकार प्रदान करणे हे केवळ अल्लाहच्या हाती आहे आणि तो आपले बुद्धिकौशल्यानुसार ज्याला इच्छितो सत्ताधिकार प्रदान करतो. जर त्याने एखाद्या जुलमी शासकाला सत्ताधिकार दिला आहे तर त्याचा असा अर्थ नव्हे की तो त्याच्याशी प्रसन्न आहे किंबहुना याचा उद्देश्य हा की ऐहिक जीवनासह ज्या कसोटीच्या हेतुंचा संबंध आहे त्या लक्षात घेता सुधारणेची संधी दिली जावी. नंतर अत्याचारींना कर्म-फळापर्यंत पोहचवावे आणि त्या अत्याचार-पिडीतांना ज्यांनी कसोटीच्या अग्निदिव्यातून पार पडून स्वत:ला अल्लाहचा एकनिष्ठ व सदाचारी दास म्हणून सिद्ध केले, त्यांना सदैव क़ायम राहणाऱ्या ईश-देणग्यांनी उपकृत करावे.

१८४. अभिप्रेत पॅलेस्टीनची भूमी होय.

१८५. ईमान बाळगणाऱ्यांना जो सत्ताधिकार प्रदान केला जातो त्यातहि त्याची कसून परीक्षा घेतली जाते यासाठी की, ते सत्ताधिकार प्राप्त करून अल्लाहचे कृतज्ञ-दास बनतात कि कृतघ्न तसेच या सत्ताधिकारास अल्लाहचे आदेश व विधि-नियम लागू करण्याकरीता व न्याय प्रस्थापित करण्याकरिता वापरतात कि बंडखोरी व अत्याचाराकरिता.

१८६. म्हणजे आपल्या वाईट श्रद्धेमुळे या आपत्तिंना हजरत मूसा व त्यांच्या साथीदारांची अशुभता ठरवित. वस्तुत: याची खरी हकीगत अशी होती की सर्वश्रेष्ठ अल्लाह यांच्या दुराचारामुळे त्यांना ताकीद व्हावी म्हणून ही संकटे उतरवित होता.

१८७. वादळाचे विवरण बायबल मध्ये पुढील प्रमाणे वर्णिले गेले आहे.

> ''मोशेने आपली काठी आकाशाकडे उगारली तेव्हा परमेश्वराने मेघगर्जना व गारांची वृष्टि केली आणि अग्नीचा लोक जमीनीकडे येऊ लागला,या प्रकारे परमेश्वराने मिसर देशावर गारांचा वर्षाव केला..........ही गारांची वृष्टि एवढी भारी होती की मिसरी राष्ट्राची स्थापना झाल्यापासून त्यात कोठेहि तशी कधी झाली नव्हती.सर्व मिसर देशात मनुष्ये,गुरेढोरे वगैरे जे काही वनात होते त्या सर्वांवर गारांचा मारा झाला, शेतातील सर्व वनस्पतीवर मारा झाला आणि वनातील सर्व वृक्ष मोडून गेले मात्र गोशेन प्रांतात इस्राएल लोक राहत होते तेथे मुळीच गारा पडल्या नाहीत'
>
> (निर्गम-९: २३ ते २६)

१८८. टोळ धाडी संबंधी बायबल मधील उल्लेख असा:

> ''मोशेने मिसर देशावर आपली काठी उगारिली तेव्हा परमेश्वराने दिवसभर व रात्रभर देशावर पूर्वेचा वारा वाहविला, आणि सकाळ झाली तेव्हा पूर्वेच्या वाऱ्याबरोबर टोळ आले सर्व मिसर देशावर टोळांनी धाड घातली आणि ते सर्व देशावर उतरले ते असंख्य होते ह्यापूर्वी एवढे टोळ कधी आले नव्हते व ह्यापुढेहि कधी येणार नाहीत त्यांनी सर्व भूमी झाकून टाकल्यामुळे साऱ्या देशावर अंधार पडला आणि त्यांनी भूमीवरील सर्व वनस्पति आणि गारांच्या वृष्टीतून बचावून राहिलेली सर्व फळेहि खाऊन टाकीली किंवा शेतातील वनस्पतींपैकी हिरवे म्हणून काही उरले नाही.'' (निर्गम १०: १३ ते १५)

१८९. उवांच्या आपत्ति विषयी बायबल मधील उल्लेख असा:

> ''मग परमेश्वराने मोशेला म्हटले, अहरोनाला सांगा की आपली काठी उगारून जमीनीच्या धुळीवर मार म्हणजे मिसर देशभर त्या धुळीच्या उवा बनतील. त्यांनी तसे केले. अहरोनाने आपल्या हातातील काठी उगारून जमिनीच्या धुळीवर मारिली तेव्हा मनुष्यांवर पशुंवर उवा झाल्या सर्व मिसर देशभर जमिनी वरल्या धुळीच्या उवाच उवा बनल्या.'' (निर्गम ८ : १६-१७)

१९० बेडकांची शिक्षा ज्या स्वरूपात आली तिचे विवरण बायबल मध्ये पुढील प्रमाणे आले आहे:

''नंतर परमेश्वर मोशेस म्हणाला, फारोकडे जाऊन त्यास सांगा, परमेश्वर असे म्हणतो की, माझ्या लोकांनी माझी सेवा करावी म्हणून त्यास जाऊ द्यावे तू त्यांस जाऊ देणार नाही तर पाहा, मी तुझ्या सगळ्या देशाला बेडकांनी पीडीन. नील नदीत बेडकांचा सुळसुळाट होईल आणि तुझ्या वाड्यात, तुझ्या निजण्याच्या खोलीत, तुझ्या अंथरूणावर तुझ्या चाकर नोकरांच्या घरात, तुझ्या लोकांवर, तुझ्या भट्ट्यात आणि काथवटीत बेडूकच बेडूक होतील तुझ्या व तुझ्या लोकांच्या आणि तुझ्या सर्व सेवकांच्या अंगावर बेडूक चढतील. परमेश्वर मोशेला म्हणाला अहरोनाला सांगा की, आपली काठी हाती घेऊन नद्या, नाले व तलाव यावर आपला हात उगार आणि

बेडूक मिसर देशावर चढून येतील असे कर अहरोनाने मिसरातील जलाशयांवर आपला हात उगारिला तेव्हा बेडूक बाहेर निघाले आणि त्यांनी मिसर देश व्यापून टाकीला.' (निर्गम-८ : १ ते ६)

१९१. रक्ताच्या शिक्षेसंबंधी बायबलचे वर्णन असे:-

'तेव्हा मोशे व अहरोन यांनी परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे केले, त्यांनी काठी उचलून फारोच्या व त्याच्या सेवकांच्या समक्ष पाण्यावर मारिली तेव्हा नदीतल्या सर्व पाण्याचे रक्त बनले. नदीतले मासे मेले तिला घाण सुटली आणि मिसरी लोकांस नदीतले पाणी पिववेना साऱ्या मिसर देशात रक्तच रक्त झाले.' (निर्गम-७ : २०-२१)

१९२. म्हणजे ह्या निशाण्या एकसाथ नव्हे तर विलंबा विलंबाने दाखविल्या गेल्या होत्या, यासाठी की त्यांना वारंवार ताकीद व्हावी व पहिल्यांदा नाही तर दुसऱ्यांदा तरी त्यांना आपल्या वाईट वर्तनाची जाणीव व्हावी.

१९३. अर्थात अपराध करता करता त्यांची बुद्धी अपराधी बनली होती; यास्तव या तबींचा त्यांच्यावर कसलाही परिणाम झाला नाही.

१९४. फिरऔन व त्याचा जातीसमूह मूसाच्या पालन कर्त्याशी म्हणजे सृष्टी-निर्मात्याशी अगदी अनभिज्ञ नव्हता, अन्यथा त्यांनी हजरत मूसा यांना ही प्रार्थना केली नसती की आमच्यासाठी आपल्या पालनकर्त्याजवळ दुआ कर.

**मग जेव्हा आम्ही त्यांच्यावरून, एका अवधि पावेतो, ज्याप्रत ते पोहचणारच होते, शिक्षा दूर सारीत तेव्हा ते लगेच वचनभंग करू लागत. शेवटी आम्ही त्यांना शिक्षा दिली व त्यांना समुद्रात बुडविले कारण त्यांनी आमच्या निशाणींना खोटे ठरविले होते व त्यांच्याबाबतीत बेपर्वा झाले होते.** *(अल-क़ुरआन)*

فَلَمَّا كَشَفْنَا عَنْهُمُ الرِّجْزَ إِلَىٰ أَجَلٍ هُم بَالِغُوهُ إِذَا
هُمْ يَنكُثُونَ ﴿١٣٥﴾

१३५. मग जेव्हा आम्ही त्यांच्यावरून, एका अवधि पावेतो, ज्याप्रत ते पोहचणारच होते, शिक्षा दूर सारीत तेव्हा ते लगेच वचनभंग करू लागत.

فَانتَقَمْنَا مِنْهُمْ فَأَغْرَقْنَاهُمْ فِي الْيَمِّ بِأَنَّهُمْ كَذَّبُوا
بِآيَاتِنَا وَكَانُوا عَنْهَا غَافِلِينَ ﴿١٣٦﴾

१३६. शेवटी आम्ही त्यांना शिक्षा दिली व त्यांना समुद्रात बुडविले [१९५] कारण त्यांनी आमच्या निशाणींना खोटे ठरविले होते व त्यांच्याबाबतीत बेपर्वा झाले होते.

وَأَوْرَثْنَا الْقَوْمَ الَّذِينَ كَانُوا يُسْتَضْعَفُونَ مَشَارِقَ
الْأَرْضِ وَمَغَارِبَهَا الَّتِي بَارَكْنَا فِيهَا ۖ وَتَمَّتْ كَلِمَتُ رَبِّكَ
الْحُسْنَىٰ عَلَىٰ بَنِي إِسْرَائِيلَ بِمَا صَبَرُوا ۖ وَدَمَّرْنَا
مَا كَانَ يَصْنَعُ فِرْعَوْنُ وَقَوْمُهُ وَمَا كَانُوا يَعْرِشُونَ ﴿١٣٧﴾

१३७. आणि ज्या लोकांना कमजोर बनवून ठेवले गेले होते त्यांना आम्ही या भूमीच्या पश्चिम व पूर्वेचे वारस बनविले, ज्यात आम्ही समृद्धि राखली होती.[१९६] आणि (हे पैगंबर !) तुमच्या पालनकर्त्याचे सर्वोत्कृष्ट वचन बनी इस्राईलच्या बाबतीत पूर्ण झाले [१९७] कारण त्यांनी सहनशीलतेने काम घेतले होते.[१९८] व फिरऔन आणि त्याच्या जाती समूहाने जे काही बनविले होते व ज्या इमारती उंच उभारल्या होत्या त्या सर्व आम्ही मातीत मिळविल्या.[१९९]

وَجَاوَزْنَا بِبَنِي إِسْرَائِيلَ الْبَحْرَ فَأَتَوْا عَلَىٰ قَوْمٍ يَعْكُفُونَ
عَلَىٰ أَصْنَامٍ لَّهُمْ ۚ قَالُوا يَا مُوسَى اجْعَل لَّنَا إِلَٰهًا كَمَا لَهُمْ
آلِهَةٌ ۚ قَالَ إِنَّكُمْ قَوْمٌ تَجْهَلُونَ ﴿١٣٨﴾

१३८. आणि बनी इस्राईलला आम्ही समुद्रापार पोहचवले [२००] मग त्यांचे जाणे एका अशा जाती समूहातून झाले जो आपल्या मूर्तिपूजेत मग्न होता. [२०१] म्हणू लागले,हे मूसा !आमच्याकरीताहि एक असे उपास्य (देव) बनवा ज्याप्रमाणे यांची उपास्ये (देव) आहेत.[२०२] तो म्हणालाः तुम्ही फारच अडाणी लोक आहात.

إِنَّ هَٰؤُلَاءِ مُتَبَّرٌ مَّا هُمْ فِيهِ وَبَاطِلٌ مَّا كَانُوا
يَعْمَلُونَ ﴿١٣٩﴾

१३९. हे लोक ज्याच्या उपासनेत मग्न आहेत तो नाश पावणारा आहे.[२०३] आणि जे कृत्य ते करीत आहेत पूर्णपणे खोटे आहे.

قَالَ أَغَيْرَ اللَّهِ أَبْغِيكُمْ إِلَٰهًا وَهُوَ فَضَّلَكُمْ عَلَى
الْعَالَمِينَ ﴿١٤٠﴾

१४०. तसेच तो म्हणालाः काय मी अल्लाह शिवाय अन्य एखादे उपास्य तुमच्या करिता शोधू ,वस्तुतः तोच होय की ज्याने जगातील सर्व जनसमूहांवर तुम्हाला प्राधान्य प्रदान केले आहे. [२०४]

१९५. समुद्रात बुडून जाण्याची घटना विवरणासह सूरह युनूस आयत ९० ते ९३ मध्ये, तसेच इतर सुरतीतही वर्णिली गेली आहे.

१९६. अभिप्रेत पॅलेस्टीनची भूमी होय जी अल्लाहच्या धार्मिक समृद्धीने संपन्न आहे. म्हणून येथे कित्येक प्रतिष्ठीत पैगंबरांचा उदय झाला. हजरत इब्राहीम यांनी आपले पुत्र हजरत इसहाक यांना येथेच वसविले होते. त्यांचा वंश अल्लाहने मोठ्या प्रमाणात वृद्धिंगत केला व त्यास सर्वाधिक प्रतिष्ठीत जाती समूहाचे स्वरूप दिले. याच ठिकाणी हजरत सुलेमान यांच्या हातून ''बैतूल-मकदिस'' ची उभारणी झाली. ज्यायोगे येथील वातावरण अध्यात्मिक झाले.

१९७. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने बनी इस्राईलला सत्ताधिकार बहाल करण्याचा जो वायदा केला होता तो पूर्ण झाला. बायबल मध्ये या 'वचना' चा उल्लेख बऱ्याच ठिकाणी आला आहे.उदाहरणार्थ-

> ''ज्या कनान देशात ते उपरी होते तो परदेश त्यास वतन देण्याविषयींचा करार मी त्यांच्याशी केला आहे...... आणि जो देश अब्राहाम, इसहाक व याकोब यास देण्याची शपथ हात उभारून मी वाहिली होती त्यात मी तुम्हास नेईन आणि तो तुम्हास वतन करून देईन, मी परमेश्वर आहे.'' (निर्गम-६ : ४ ते ८)

हजरत मूसा यांच्या जीवनाच्या शेवटच्या काळात बनी इस्राईलने मोआब चा इलाका जिंकला होता, जो पॅलेस्टीनच्या हद्दीला लागून आहे व हजरत सुलेमान यांच्या निधनानंतर योशेअ बिन नून च्या नेतृत्वात किनआन देशा (पॅलेस्टीन)ला जिंकले.

> ''परमेश्वराने मोशेला सांगितले होते त्या प्रमाणे यहोशवाने (येशूने) सर्व देश काबीज केला. यहोशवाने तो इस्राएलला त्याच्या वंशांच्या हिश्श्याप्रमाणे वतन म्हणून वाटून दिला, तेव्हा देशाला युद्धापासून विसावा मिळाला.''(यहोशवा-११ : २३)

१९८. बनी इस्राईल मध्ये जरी काही दोष होते तरी फिरऔनचा अत्याचार सहन करूनहि ते आपल्या धर्मावर स्थिर राहीले व हजरत मूसा यांच्या नेतृत्वात त्यांनी इजिप्तहून स्थलांतर केले.

१९९. म्हणजे त्यांची संपूर्ण सांस्कृतिक प्रगती धुळीस मिळाली व त्या भव्य इमारती ज्या त्यांनी बनी इस्राईल कडून कठोर परिश्रम करवून बनविल्या होत्या, विनाशास बळी पडल्या. हा विनाश बहुधा पूर्वेकडून वाहणाऱ्या वादळामुळे झाला होता, ज्याने एका बाजूला इजिप्तमध्ये विध्वंस माजविला तर दुसरीकडे फिरऔन व त्याच्या लष्करास समुद्रात बुडविण्याचा उपाय केला.

२००.बनी इस्राईलला सर्वश्रेष्ठ अल्लाहाने चमत्कारीकरित्या समुद्रा पलीकडे नेले होते.

२०१. जेव्हा ते तांबड्या समुद्राला पार करून 'सीना' रानात आले तेव्हा ते (होरेब) पर्वताकडे वळले, या प्रवासात त्यांचे जाणे अशा लोकांजवळून झाले जे आपल्या मूर्त्यांच्या पूजेत मग्न होते.

२०२. या आधी हे वर्णिले गेले आहे की बनी इस्राईलने सहनशीलतेने काम घेतले, म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना फिरऔनच्या तावडीतून सोडविले व त्यांना प्रतिष्ठित केले. येथे हे दर्शविले जात आहे की फिरऔनपासून मुक्ति मिळविल्यानंतर अल्लाहशी ते कसे कृतघ्न झाले की हजरत मूसा जवळ एका उपास्याची मागणी करून बसले या दोन्ही गोष्टी या परीने सत्य आहेत की बनी इस्राईलमध्ये भिन्न-भिन्न चारित्र्याचे लोक होते. उच्च-चारित्र्या असलेलेहि व नैतिकदृष्ट्या खालावलेलेहि. आणि सामोहिक रूपाने ते फिरऔनच्या विरोधात दृढ राहीले व त्यांनी मूसाला आपला मार्गदर्शक म्हणून मान्य केले होते म्हणून ते प्रतिष्ठा व सन्मानास पात्र ठरले. परंतु यांच्यापैकी जे लोक इजिप्तच्या अनेकेश्वरवादी वातावरणात राहून श्रद्धा व आचरण विषयक वैगुण्यात पडले होते ते अशा हरकती करीत राहीले ज्या अगदी अडाणी पणाच्या व बनी इस्राईलच्या जाती-सामूहीक अस्तित्वावर गालबोट होत्या. अशाच एका अज्ञानजन्य हरकतीचा उल्लेख येथे आला आहे व त्यांच्या इतर हरकतींचा उल्लेख कुरआनात अन्य ठिकाणी आला आहे.

२०३. म्हणजे त्यांनी घडविलेली मूर्ति जिला ते ईश्वर समजून बसले आहेत. मातीत मिळून नष्ट होणार आहे जेव्हा तुमचा ईश्वर नेहमी जिवंत व कायम राहणारा ईश्वर आहे.

२०४. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने कुम्हाला नेतृत्व-स्थानी बसविले आहे. यासाठी की तुम्ही विश्वातील राष्ट्रांच्या मार्गदर्शनाचे माध्यम व्हावे, परंतु तुम्ही मात्र मार्गभ्रष्ट जन समूहांचे अनुकरण करू इच्छिता. तुम्हाला ना आपल्या स्थानाची चाड आहे व ना तुम्ही आपल्या उपकार कर्त्याशी कृतज्ञ आहात.

وَإِذْ أَنجَيْنٰكُم مِّنْ اٰلِ فِرْعَوْنَ يَسُومُونَكُمْ سُوٓءَ الْعَذَابِ ۚ
يُقَتِّلُونَ أَبْنَآءَكُمْ وَيَسْتَحْيُونَ نِسَآءَكُمْ ۚ وَفِي ذٰلِكُم
بَلَآءٌ مِّن رَّبِّكُمْ عَظِيمٌ ﴿١٤١﴾

१४१. आणि स्मरण करा जेव्हा आम्ही फिरऔनच्या लोकांपासून तुम्हाला मुक्ति दिली, जे तुम्हाला सक्त शिक्षा देत होते.तुमच्या पुत्रांना ठार करीत व तुमच्या मुलींना जिवंत राहू देत.[२०५] आणि यात तुमच्या पालनकर्त्या तर्फे मोठी परीक्षा होती.

وَوٰعَدْنَا مُوسٰى ثَلٰثِينَ لَيْلَةً وَّأَتْمَمْنٰهَا بِعَشْرٍ فَتَمَّ
مِيقٰتُ رَبِّهِۦٓ أَرْبَعِينَ لَيْلَةً ۚ وَقَالَ مُوسٰى لِأَخِيهِ
هٰرُونَ اخْلُفْنِي فِي قَوْمِي وَأَصْلِحْ وَلَا تَتَّبِعْ سَبِيلَ
الْمُفْسِدِينَ ﴿١٤٢﴾

१४२. आणि आम्ही मूसाकडून तीस रात्रींचा वायदा केला व दहा रात्री वाढवून तो पूर्ण केला [२०६] अशा प्रकारे त्याच्या पालनकर्त्याने निर्धारीत केलेली मुदत चाळीस रात्रींमध्ये पूर्ण झाली. त्याने आपल्या भाऊ हारून यास म्हटले होते: माझ्या जन-समूहात माझे प्रतिनिधित्व पार पाड [२०७] आणि सुधारणेची कामे कर व बिघाड निर्माण करणाऱ्यांच्या मार्गाचे अनुसरण करू नकोस.[२०८]

وَلَمَّا جَآءَ مُوسٰى لِمِيقٰتِنَا وَكَلَّمَهُۥ رَبُّهُۥ قَالَ رَبِّ أَرِنِيٓ
أَنظُرْ إِلَيْكَ ۚ قَالَ لَن تَرٰىنِي وَلٰكِنِ انظُرْ إِلَى الْجَبَلِ
فَإِنِ اسْتَقَرَّ مَكَانَهُۥ فَسَوْفَ تَرٰىنِي ۚ فَلَمَّا تَجَلّٰى رَبُّهُۥ
لِلْجَبَلِ جَعَلَهُۥ دَكًّا وَّخَرَّ مُوسٰى صَعِقًا ۚ فَلَمَّآ أَفَاقَ
قَالَ سُبْحٰنَكَ تُبْتُ إِلَيْكَ وَأَنَا۠ أَوَّلُ الْمُؤْمِنِينَ ﴿١٤٣﴾

१४३. आणि जेव्हा मूसा आम्ही निर्धारीत केलेल्या वेळेवर उपस्थित झाला व त्याच्या पालनकर्त्याने त्याच्याशी संभाषण केले[२०९] तेव्हा विनंती केली हे माझ्या पालनकर्त्या !आपले दर्शन घडव यासाठी की मी तुला पाहू शकावे [२१०] फर्माविले, तुम्ही मला कदापि पाहू शकणार नाहीत.[२११] तथापि पर्वताकडे पहा, जर तो आपल्या जागी कायम राहिला तर मला पाहू शकाल. मग जेव्हा त्याच्या पालनकर्त्याने पर्वतावर दिव्य तेज प्रगट केले तेव्हा त्याला अगदी चकनाचूर करून टाकले आणि मूसा मुर्छित होऊन पडला [२१२] जेव्हा भानावर आला तेव्हा म्हणाला: पवित्र आहेस तू-मी तुझ्या हुजुरात क्षमायाचना करतो [२१३]आणि सर्वप्रथम ईमान बाळगणारा मी आहे.[२१४]

قَالَ يٰمُوسٰىٓ إِنِّي اصْطَفَيْتُكَ عَلَى النَّاسِ بِرِسٰلٰتِي وَ
بِكَلٰمِي فَخُذْ مَآ اٰتَيْتُكَ وَكُن مِّنَ الشّٰكِرِينَ ﴿١٤٤﴾

१४४. फर्माविले: हे मूसा मी तुम्हाला प्रेषितत्व आणि सह-संभाषणाची देणगी प्रदान करून लोकांमध्ये निवडक केले आहे तेव्हा जे काही मी देत आहे [२१५] ते घ्या व आभार मानाणारे व्हा.

२०५. यासाठी की त्यांनी मोठे होऊन फिरऔन वाल्यांची सेवा करावी.

२०६. हजरत मूसा यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने कोहीतूर वर तीस रात्री व तीस दिवसांकरिता बोलाविले होते. यासाठी की त्यांना आपल्याशी संभाषण करण्याचा मान दिला जावा; जसे की या नंतरच्या आयतींवरून स्पष्ट होते.ओ नंतर या एकांतवासाच्या (ऐतेकाफ) मुदतीत सर्वश्रेष्ठ अल्लाहने अधिक दहा दिवसांची वाढ केली. ही जणू सर्वश्रेष्ठ अल्लाहची कृपा होती जी हजरत मूसा यांच्यावर झाली. कारण त्यांचे आपल्या पालनकर्त्याशी प्रत्यक्ष संभाषण करणे, त्यांना दया व समृद्धि ने सम्पन्न करण्याच्या अर्थाने होती. म्हणून मुदतीत झालेली वाढ हजरत मूसा यांच्या करीता सद्भाग्याची गोष्ट होती या घटनेचा उल्लेख ''तौरात'' मध्येहि आहे.

> ''मोशे मेघातं प्रवेश करून पर्वतावर चढला,
> मोशे पर्वतावर चाळीस दिवस व चाळीस रात्री
> होता.'' (निर्गम - २४ : १८)

२०८. ही ताकीद त्यांनी हजरत हारून यांना केली होती वस्तुत: ही बनी इस्राईलला संबोधून होती. कारण हजरत हारून तर पैगंबर होते. त्यांच्याकडून बिघाड होण्याची भिती कशी असू शकत होती परन्तु बनी इस्राईल बाबत हे भय होते की ते कदाचित बिघाड निर्माण करणारे न व्हावेत?

२०९. स्पष्टीकरणासाठी पहा. सूरह निसा टीप. २७४

२१०. संभाषण गोडी ने हजरत मूसा यांच्या अंगी दर्शनाभिलाषा देखील निर्माण केली व या अभिलाषेमुळे त्यांनी आपली ही इच्छा व्यक्त केली. तौरात मध्ये आहे की:-

> ''तो म्हणाला, कृपा करून मला तुझे तेज दाखीव''
> (निर्गम-३३ -१८)

२११. कारण ईश्वराला प्रत्यक्ष पाहण्याचे सामर्थ्य डोळे कोठून आणतील. तौरात मध्ये उल्लिखित आहे.

> ''तरीपण तो म्हणाला, की तुला माझे मुख पाहवणार
> नाही. कारण माझे मुख पाहिल्यास कोण मनुष्य
> जिवंत राहणार नाही.'' (निर्गम - ३३-२०)

२१२. यावरून हे उघड झाले की पर्वतासारखी कठीण वस्तूदेखील ईश्वराला पाहण्याचे सामर्थ्य बाळगू शकत नाही. मग हाडामासांच्या मनुष्याची काय कथा !

या वस्तुस्थितीस लक्षात घेता ना सूफींची तपस्या ईश्वराचे अवलोकन करू शकते ना योगीचे योगासन. खरे म्हणजे माणसाने या जगी ईश्वराला आपल्या डोळ्यांनी बघण्याचा प्रयत्न करण्याऐवजी त्याच्या आयती (निशाण्या) ना बघण्यावर समाधान बाळगावे. व त्या आयतींद्वारे ईश्वराचा जो परिचय त्याला लाभेल त्यावर त्याने ईमान ठेवावे.

२१३. आपण सत्य दर्शनाची विनंती ईश्वराला केली ती योग्य नव्हे याची हजरत मूसा यांना जाणीव होताच त्यांनी ईश्वरासमोर पश्चाताप केला.

२१४. म्हणजे कोणी ईमान बाळगो, वा ना बाळगो मी सर्वप्रथम ईमान बाळगतो. हे आपल्या ईमानाला ताजे करणे होते जे हजरत मूसा यांनी त्या प्रसंगी दर्शविले.

२१५. अभिप्रेत 'तौरात' होय.

१४५. आणि आम्ही त्याच्याकरिता शिलांवर [२१६] प्रत्येक प्रकारचा उपदेश आणि प्रत्येक गोष्टीचे विवरण लिहून दिले [२१७] (व फर्माविले) यांना दृढपणे धरा व आपल्या समाजास आदेश द्या की त्यांच्या उत्कृष्ट अर्थाचे अनुसरण करावे [२१८] लवकरच मी तुम्हाला दुराचाऱ्यांचे घर दाखवीन. [२१९]

وَكَتَبْنَا لَهُ فِي الْأَلْوَاحِ مِن كُلِّ شَيْءٍ مَّوْعِظَةً وَتَفْصِيلًا
لِّكُلِّ شَيْءٍ فَخُذْهَا بِقُوَّةٍ وَأْمُرْ قَوْمَكَ يَأْخُذُوا
بِأَحْسَنِهَا ۚ سَأُرِيكُمْ دَارَ الْفَاسِقِينَ ﴿١٤٥﴾

१४६. मी आपल्या निशाणींपासून त्या लोकांना पराङ्गमुख करीन जे नाहक जमीनीवर गर्व करतात. त्यांनी प्रत्येक प्रकारची निशाणी बघावी, तरीहि ईमान न बाळगावे, जर मार्गदर्शनाचा मार्ग बघावा तर त्यास न पत्करावे, आणि मार्गभ्रष्टतेचा मार्ग पहिल्यास तो पत्करावा. हे अशासाठी की त्यांनी आमच्या निशाण्यांना खोटे ठरविले व त्यांच्याबाबतीत बेपर्वा झाले.

سَأَصْرِفُ عَنْ آيَاتِيَ الَّذِينَ يَتَكَبَّرُونَ فِي الْأَرْضِ بِغَيْرِ
الْحَقِّ وَإِن يَرَوْا كُلَّ آيَةٍ لَّا يُؤْمِنُوا بِهَا وَإِن يَرَوْا
سَبِيلَ الرُّشْدِ لَا يَتَّخِذُوهُ سَبِيلًا وَإِن يَرَوْا سَبِيلَ الْغَيِّ
يَتَّخِذُوهُ سَبِيلًا ۚ ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ كَذَّبُوا بِآيَاتِنَا وَكَانُوا
عَنْهَا غَافِلِينَ ﴿١٤٦﴾

१४७. आणि ज्या लोकांनी आमच्या निशाणींना व अखिरतच्या भेटीस खोटे ठरविले त्यांची आचरणे व्यर्थ गेलीत. त्यांना या शिवाय आणखी कोणता मोबदला मिळेल की त्यांना आपल्या कृतकर्माचे फळ लाभावे.

وَالَّذِينَ كَذَّبُوا بِآيَاتِنَا وَلِقَاءِ الْآخِرَةِ حَبِطَتْ
أَعْمَالُهُمْ ۚ هَلْ يُجْزَوْنَ إِلَّا مَا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿١٤٧﴾

१४८. आणि मूसा (तूर पर्वतावर) निघून गेल्यानंतर त्याच्या जन समूहाने आपल्या दागिन्यांपासून एक वासरू घडविले जे केवळ एक शरीर होते व त्यातून गायीसारखा आवाज निघत असे[२२०] त्यांनी एवढेहि बघितले नाही की ते ना त्यांच्याशी बोलू शकते व ना त्यांचे मार्गदर्शन करू शकते [२२१] त्यांनी त्यास उपास्य (दैवत) बनविले आणि ते अत्याचारी होते.

وَاتَّخَذَ قَوْمُ مُوسَىٰ مِن بَعْدِهِ مِنْ حُلِيِّهِمْ عِجْلًا جَسَدًا
لَّهُ خُوَارٌ ۚ أَلَمْ يَرَوْا أَنَّهُ لَا يُكَلِّمُهُمْ وَلَا يَهْدِيهِمْ سَبِيلًا ۘ
اتَّخَذُوهُ وَكَانُوا ظَالِمِينَ ﴿١٤٨﴾

१४९. मग जेव्हा त्यांना आपल्या दुष्कृत्याची जाणीव झाली व पाहिले की आपण मार्गभ्रष्ट झालो आहोत तर म्हणू लागले,जर आमच्या पालनकर्त्याने आम्हावर दया केली नाही व आम्हाला माफ केले नाही तर आम्ही नष्ट होऊन जाऊ.

وَلَمَّا سُقِطَ فِي أَيْدِيهِمْ وَرَأَوْا أَنَّهُمْ قَدْ ضَلُّوا قَالُوا
لَئِن لَّمْ يَرْحَمْنَا رَبُّنَا وَيَغْفِرْ لَنَا لَنَكُونَنَّ مِنَ
الْخَاسِرِينَ ﴿١٤٩﴾

२१६. बायबल मध्ये असा उल्लेख आहे की ह्या पाट्या दोन होत्या व त्या दगडाच्या शिला होत्या व त्याच्या दोन्ही बाजूंनी लेख कोरलेला होता. तथापि कुरआनने ''अलवाह'' हा शब्दप्रयोग केला आहे. जो अरबी व्याकरणानुसार अनेकवचनी म्हणजे दोनपेक्षा अधिक करिता वापरला जातो. म्हणून ह्या पाट्या कमीत कमी तीन असाव्यात.

२१७. तात्पर्य, या शिलांवर केवळ दहा आदेश (Ten Commandment) च नव्हते, किंबहुना आदेशा व्यतिरिक्त धर्म आणि शरीयतच्या समस्त मूलभूत गोष्टी कोरलेल्या होत्या.

२१८. म्हणजे केवळ शब्दांना घेऊन न बसावे व असे करू नये की ज्या शब्दांचे अनेक अर्थ होत असावेत त्यातल्या त्या अर्थांना घ्यावे ज्यांचा वर्णन शैलीशी कसलाहि ताळमेळ नसावा व ना ते ईश वाणीला शोभण्यासारखे असावेत. या पूर्व सूचनेनंतरहि बनी इस्राईलने पुढे तेच केले ज्याचे भय होते म्हणजे ईश-वचनाला त्यांनी तो अर्थ जोडला जो त्याच्या उद्दिष्टा-विपरीत होता. याप्रकारे त्यांनी बुद्धियुक्त वाणीला वायफळ गोष्टींच्या पातळीवर आणले. परिणामी जेथून त्यांना मार्गदर्शन लाभावे तेथून त्यांनी मार्गभ्रष्टता आत्मसात केली. याची स्पष्ट उदाहरणे तौरातच्या अलीकडील अनुवादात आढळून येतील. कुरआनचे अनुसरण करणाऱ्या करिता हि यात सावधगिरीचा इशारा आहे की कुरआनाच्या एखाद्या शब्दाचा असा अर्थ व एखाद्या आयतीचा असा मतितार्थ घ्यावा जो सर्वोत्कृष्ट व सम्पूर्ण कुरआनाशी सुसंगत असावा. या नियमाला जर पूर्णपणे विचाराधीन राखले गेले तर भाष्याविषयीचे अनेक मतभेद आपोआप मिटतील.

२१९. दुराचाऱ्यांचे घराशी अभिप्रेत जसे की नंतरच्या आयतींवरून स्पष्ट आहे. दुराचाऱ्यांचे स्थळ व त्यांची परिणिती आहे.

२२०. बनी इस्राईल इजिप्तच्या अनेकेश्वरवादी वातावरणात राहून श्रद्धाविषयक व नैतिकदृष्ट्या बरेच खालावले होते, म्हणून कोणत्याही उत्पातास ते सहजगत्या बळी पडू शकत होते. ज्याअर्थी हजरत मूसा त्यांच्यावर पूर्णपणे नियंत्रण (Hold) राखीत होते म्हणून ते असे पावेतो कोणताही उत्पात डोके वर काढू शकला नाही, परंतु हज़रत मूसा तूर पर्वतावर जाताच सामिरी याने सोन्याच्या दागीन्यांना वितळवून त्यापासून वासराचे शरीर बनवून त्यांच्याकरिता एक संकट उभे केले. सामिरी हा एक ढोंगी मनुष्य होता. त्याचा किस्सा सूरह ''ताहा'' मध्ये विवरणात्मकरित्या आला आहे. त्याने वासराला घडविण्यात आपल्या त्या कला नैपुण्याचे प्रमाण दिले होते की हवा गेल्यास त्यातून गाय किंवा बैलासारखा आवाज निर्माण होत असे.

२२१. म्हणजे एवढी ढोबळ गोष्टही त्यांच्या लक्षात आली नाही वासरात ईशत्वाचा कोणताही गुणधर्म नसतो, तेव्हा अशा वस्तूला आपले उपास्य बनविण्यात काय अर्थ ज्यात ईश्त्वाचा एकहि गुणधर्म नसावा. वस्तुस्थिती ही आहे की मनुष्य जेव्हा श्रद्धेच्या बाबतीत चुकीचा निर्णयघेतो तेव्हा तो दृष्टीहीन बनतो. मग त्याला दगड, वीटा, गाय, बैल, आग,नाग अशा कोणत्याहि वस्तूची पूजा करण्यात संकोच वाटत नाही. ज्याअर्थी मनुष्य डोळसपणे हे पाहतो की या सर्व गोष्टींमध्ये ईशत्वाचा कसलाही गुणधर्म आढळून येत नाही.

१५०. आणि जेव्हा मूसा क्रोध व दुःख युक्त स्थितीत आपल्या जन समूहाकडे परतले तेव्हा म्हणाले, माझ्या पश्चात किती वाइट प्रतिनिधित्व केले तुम्हा लोकांनी ![२२२] काय तुम्ही एवढी घाई केली व आपल्या पालनकर्त्याच्या आदेशाची वाट पाहिली [२२३] आणि तक्ते खाली टाकले व आपल्या भावाच्या डोक्याचे केस धरून त्याला आपल्याकडे ओढू लागले. [२२४] तो म्हणाला, हे माझ्या सहोदरा ! या लोकांनी मला दुर्बल जाणले व बहुतेक त्यांनी मला ठारच केले असते,[२२५]तेव्हा मजवर हसण्याची संधी शूत्रंना देऊ नकोस व या जुलमी-समूहात मला सामील करू नकोस.

وَلَمَّا رَجَعَ مُوسَىٰ إِلَىٰ قَوْمِهِ غَضْبَانَ أَسِفًا قَالَ بِئْسَمَا
خَلَفْتُمُونِي مِن بَعْدِي ۖ أَعَجِلْتُمْ أَمْرَ رَبِّكُمْ ۖ وَأَلْقَى الْأَلْوَاحَ
وَأَخَذَ بِرَأْسِ أَخِيهِ يَجُرُّهُ إِلَيْهِ ۚ
قَالَ ابْنَ أُمَّ إِنَّ الْقَوْمَ اسْتَضْعَفُونِي وَكَادُوا يَقْتُلُونَنِي
فَلَا تُشْمِتْ بِيَ الْأَعْدَاءَ وَلَا تَجْعَلْنِي مَعَ الْقَوْمِ الظَّالِمِينَ ﴿١٥٠﴾

१५१. (मूसा) म्हणाला, हे माझ्या पालनकर्त्या, मला व माझ्या भावाला क्षमा कर [२२६] व आम्हाला आपल्या कृपेत सहभागी कर.निःसंशय तू सर्वाधिक कृपा करणारा आहेस.

قَالَ رَبِّ اغْفِرْ لِي وَلِأَخِي وَأَدْخِلْنَا فِي رَحْمَتِكَ ۖ وَأَنتَ
أَرْحَمُ الرَّاحِمِينَ ﴿١٥١﴾

१५२. (अल्लाहने फर्माविले) ज्या लोकांनी वासरास उपास्य बनविले त्यांच्यावर निश्चितच ईश-प्रकोप कोसळेल आणि इहलोकिय जीवनात त्यांना अपमान लाभेल, खोटे नाटे रचणाऱ्यांना आम्ही अशीच शिक्षा देत असतो. [२२७]

إِنَّ الَّذِينَ اتَّخَذُوا الْعِجْلَ سَيَنَالُهُمْ غَضَبٌ مِّن رَّبِّهِمْ وَذِلَّةٌ
فِي الْحَيَاةِ الدُّنْيَا ۚ وَكَذَٰلِكَ نَجْزِي الْمُفْتَرِينَ ﴿١٥٢﴾

१५३. आणि ज्या लोकांनी दुष्कृत्ये केलीत मग तद्नंतर तौबा केली (म्हणजे पुन्हा तसे न करण्याचा ठाम निश्चय केला) आणि ईमान बाळगले तर खचितच यानंतर तुमचा पालनकर्ता माफ करणारा आहे.

وَالَّذِينَ عَمِلُوا السَّيِّئَاتِ ثُمَّ تَابُوا مِن بَعْدِهَا وَآمَنُوا
إِنَّ رَبَّكَ مِن بَعْدِهَا لَغَفُورٌ رَّحِيمٌ ﴿١٥٣﴾

१५४. जेव्हा मूसाचा राग शांत झाला तेव्हा त्याने शिलांना उचलून घेतले. त्यांच्यावरील लेखात मार्गदर्शन व ईश-दया होती,अर्थात त्या लोकांकरिता जे आपल्या पालन कर्त्याचे भय बाळगतात.

وَلَمَّا سَكَتَ عَن مُّوسَى الْغَضَبُ أَخَذَ الْأَلْوَاحَ ۖ وَفِي نُسْخَتِهَا
هُدًى وَرَحْمَةٌ لِّلَّذِينَ هُمْ لِرَبِّهِمْ يَرْهَبُونَ ﴿١٥٤﴾

२२२. हे हजरत मूसा यांनी आपल्या जाती-समूहाला संबोधून म्हटले व ''वाईट प्रतिनिधित्व केले'' याचा अर्थ असा की ज्या स्थितीत मी तुम्हाला सोडले होते त्या स्थितीत तुम्ही स्थैर्यशील राहिला नाहीत किंबहुना माझ्या अनुपस्थितीत बिघाड व मार्गभ्रष्टतेच्या मार्गावर चालू लागले.

२२३. हजरत मूसा तीस दिवसांकरिता तूर पर्वतावर गेले होते. परंतु जेव्हा या मुदतीत दहा दिवसांची वाढ झाली तेव्हा सामिरीला संधी मिळाली की त्यामुळे लोकांची मने हजरत मूसा विषयी कलुषित करावी आणि लोकांनी आपल्या पालनकर्त्याच्या आदेशाची वाट बघण्याऐवजी की कदाचित ईश्वराने मुदत वाढविली असेल, ते सामिरीच्या बहकाविण्यात आले.

२२४. हजरत मूसा यांचा हा क्रोधावेश जो शिलाना एका बाजूला टाकण्यात व हजरत हारून यांना आपल्याकडे ओढण्याच्या रूपाने व्यक्त झाला; तो ईमानाविषयीचा स्वभिमान व सत्यसमर्थना पोटी होता; आणि ही कल्पना खरी नव्हे की हजरत मूसा यांनी शिलांना अक्षरश: फेकून दिले होते व ते दुभंगले होते अर्थात या स्वरूपाचा उल्लेख बायबलमध्ये आहे. किंबहुना त्यांनी क्रोधातिरेकाने शिलांना खाली टाकले होते व जसे पुढे आयत क्र.१५४ मध्ये वर्णिले गेले आहे. त्यांनी नंतर त्या शिलांना उचलून घेतले.

२२५. हजरत हारून यांच्या या वर्णनावरून स्पष्ट होते की त्यांनी बनी इस्राईलला वासरू-पूजेपासून रोखण्याचा पूरेपूर प्रयत्न केला: परंतु लोकांनी त्यांची आज्ञा मान्य केली नाही, उलट त्यांच्या वधारिता टपून बसले. जन समूहाचा हा रोख पाहून त्यांनी हे उचित जाणले की हजरत मूसा यांच्या परत येण्याची प्रतिक्षा करावी. ते बनी इस्राईलवर वर्चस्व बाळगून होते, म्हणून त्यांना जे योग्य वाटेल ते करतील. यास्तव वासराची पूजा करणाऱ्यांविरूद्ध हजरत मूसा यांनी अल्लाहच्या आदेशान्वये जी कारवाई केली तिचा उल्लेख सूरह बकरा-आयत क्र. ५४ मध्ये आला आहे. (स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा-टीप-७३)

बायबल मध्ये हा लज्जास्पद आरोप हजरत हारून यांच्यावर ठेवला गेला आहे की त्यांनी वासरू बनविले होते (इन्ना लिल्लाहि व इन्ना इलैहि राजिऊन) यहुदी,पैगंबरावरहि आरोप ठेवण्यास कचरत नाही. परंतु कुरआनने हजरत हारून यांच्या निवेदनाचा उल्लेख केला आहे. यावरून हे सिद्ध होते की हजरत हारून निष्कलंक होते व त्यांच्यावरील हा आरोप अगदी खोटा आहे.

२२६. म्हणजे क्रोधावेशात जर एखादी चूक माझ्या हातून घडली असेल किंवा माझा भाऊ हारून याच्याकडून प्रतिनिधत्वाच्या जबाबदारींना पूर्ण करण्यात कमी झाली असेल तर आम्हाला क्षमा कर.

२२७. गोमाता पूजा असो वा मूर्तिपूजा सर्व शिर्क (अनेकेश्वरवाद) आहे, व शिर्क पूर्णत: मिथ्या आहे. जे अल्लाहविषयी रचले जाते कारण शिर्क करणारा खरे पाहता या गोष्टीचा दावेदार असतो की ईश्वराच्या ईशत्वात व अधिकारात अन्य सहभागी आहेत, किंवा हे की मूर्त्यांची पूजा ही ईशोपासनेसमान आहे, किंवा हे की त्यांची पूजा ईश्वराने हराम ठरविली नाही,यातील कोणताहि प्रकार असो, ईश्वराविषयी खोटेनाटे रचण्याखेरीज दुसरे काहीही नाही. अर्थात शिर्क करणाऱ्यांकरिता अल्लाहचा प्रकोप व ऐहीक जीवनात अपमान नशीबी असतो.

बनी इस्राईलच्या ज्या लोकांनी वासराला दैवत बनविले होते, त्यांना जी अपमानदायक शिक्षा दिली गेली तिचा उल्लेख सूरह बकरा टीप. ७३ मध्ये आला आहे.

**१५५.** आणि मूसाने आपल्या जन समूहातील सत्तर माणसांना आम्ही ठरवून दिलेल्या वेळेवर हजर होण्याकरिता निवडले [२२८] जेव्हा त्यांना भूकंपाने येऊन गाठले तेव्हा (मूसाने) म्हटले, हे माझ्या पालनकर्त्या ! जर तू इच्छिले असते तर यापूर्वीच यांना व मला ठार केले असते. [२२९] काय तू अशा हरकतीच्या मोबदल्यात जी आमच्यातील मूर्खांनी केली आहे आम्हा सगळ्यांनाच ठार करशील? ही तर तुझी एक परीक्षा होती, ज्याद्वारे तू ज्याला इच्छिशील मार्गभ्रष्ट करशील व ज्याला इच्छिशील सरळ मार्गाला लावशील. तूच आमचा कार्यवाह आहेस. आम्हाला क्षमा कर व आमच्यावर दया कर. तू सर्वोत्कृष्ट क्षमा करणारा आहेस.

وَاخْتَارَ مُوسٰى قَوْمَهٗ سَبْعِيْنَ رَجُلًا لِّمِيْقَاتِنَا ۚ فَلَمَّآ اَخَذَتْهُمُ
الرَّجْفَةُ قَالَ رَبِّ لَوْ شِئْتَ اَهْلَكْتَهُمْ مِّنْ قَبْلُ وَاِيَّايَ ۭ اَتُهْلِكُنَا
بِمَا فَعَلَ السُّفَهَاۗءُ مِنَّا ۚ
اِنْ هِيَ اِلَّا فِتْنَتُكَ ۭ تُضِلُّ بِهَا مَنْ تَشَاۗءُ وَتَهْدِيْ مَنْ تَشَاۗءُ ۭ
اَنْتَ وَلِيُّنَا فَاغْفِرْ لَنَا وَارْحَمْنَا وَاَنْتَ خَيْرُ الْغٰفِرِيْنَ ﴿١٥٥﴾

**१५६.** आणि आमच्याकरिता या जगातहि कल्याण लिह व आखिरतमध्येहि, आम्ही तुझ्याकडे रुजु केले.[२३०] फर्माविले. मी आपल्या शिक्षेत ज्याला इच्छितो ग्रस्त करतो तथापि माझी कृपा प्रत्येक गोष्टीवर आच्छादित आहे [२३१] तर मी तिला त्या लोकांकरीता लिहीन जे ईश-भय अंगिकारतील, ज़कात देतील व आमच्या निशाणींवर ईमान बाळगतील. [२३२]

وَاكْتُبْ لَنَا فِيْ هٰذِهِ الدُّنْيَا حَسَنَةً وَّفِي الْاٰخِرَةِ اِنَّا
هُدْنَآ اِلَيْكَ ۭ قَالَ عَذَابِيْٓ اُصِيْبُ بِهٖ مَنْ اَشَاۗءُ ۚ وَرَحْمَتِيْ
وَسِعَتْ كُلَّ شَيْءٍ ۭ فَسَاَكْتُبُهَا لِلَّذِيْنَ يَتَّقُوْنَ وَيُؤْتُوْنَ
الزَّكٰوةَ وَالَّذِيْنَ هُمْ بِاٰيٰتِنَا يُؤْمِنُوْنَ ﴿١٥٦﴾ۚ

**१५७.** (आणि आज [२३३] या कृपेला असे लोक पात्र आहेत) जे या रसूलाचे की जो निरक्षर-पैगंबर आहे, [२३४] अनुसरण करतील. ज्याचा उल्लेख त्यांना आपल्या येथे तौरात व इंजिलमध्ये लिहिलेला दिसून येतो. [२३५] तो यांना भलाईचा आदेश देतो व दुष्कर्मापासून रोखतो. यांच्याकरिता स्वच्छ शुद्ध वस्तू हलाल व अस्वच्छ अशुद्ध वस्तू हराम ठरवितो. [२३६] यांच्यावरील ते ओझे व ते जोखड उतरवितो जे त्यांच्यावर लादलेले होते.[२३७] तेव्हा ज्या लोकांनी यावर ईमान बाळगले व याचे समर्थन आणि सहाय्य केले व त्या प्रकाशाचे अनुसरण केले, जो त्यासह अवतरीत केला गेला आहे [२३८] तेच यश प्राप्त करणारे लोक होत.

اَلَّذِيْنَ يَتَّبِعُوْنَ الرَّسُوْلَ النَّبِيَّ الْاُمِّيَّ الَّذِيْ
يَجِدُوْنَهٗ مَكْتُوْبًا عِنْدَهُمْ فِي التَّوْرٰىةِ وَالْاِنْجِيْلِ ۡ
يَاْمُرُهُمْ بِالْمَعْرُوْفِ وَيَنْهٰىهُمْ عَنِ الْمُنْكَرِ وَيُحِلُّ
لَهُمُ الطَّيِّبٰتِ وَيُحَرِّمُ عَلَيْهِمُ الْخَبٰۗىِٕثَ وَيَضَعُ عَنْهُمْ
اِصْرَهُمْ وَالْاَغْلٰلَ الَّتِيْ كَانَتْ عَلَيْهِمْ ۭ فَالَّذِيْنَ
اٰمَنُوْا بِهٖ وَعَزَّرُوْهُ وَنَصَرُوْهُ وَاتَّبَعُوا النُّوْرَ
الَّذِيْٓ اُنْزِلَ مَعَهٗٓ ۙ اُولٰۗىِٕكَ هُمُ الْمُفْلِحُوْنَ ﴿١٥٧﴾ۧ

२२८. हज़रत मूसा यांनी ७० लोकांची निवड अशासाठी केली होती की वासरु-पूजा करून जातीसमूहाने जो अपराध केला होता त्यासंबंधी ह्या निवडक व्यक्तिसह तूर पर्वतावर हजर होऊन ईश्वराजवळ क्षमा मागावी.

२२९. जेव्हा हे सत्तर जण तूर पर्वतावर हजर झाले तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने भूकंपाची स्थिती निर्माण केली, यासाठी की त्यांच्यावर दहशत बसावी व त्यांनी विशुद्ध मनाने अल्लाहशी माफी मागावी.

२३०. हजरत मूसा यांची ही दुआ (प्रार्थना) जिचा प्रत्येक शब्द व्यथा व करूणा आणि पश्चातापाने युक्त होता, ढगांना छेदीत आकाशापर्यंत पोहचली.

**जो बात दिलसे निकलती हे असर रखती है**
**पर नही ताकते परवाज़ मगर रखती है**

(अगदी अंत: करणापासून निघालेले बोल मोठे परिणाम कारक असतात, त्यांना पंख नसले तरी ते उत्तुंग भरारी मारण्याची क्षमता बाळगतात.)

२३१. म्हणजे शिक्षा विशिष्ट व कृपा सार्वत्रिक जेथपर्यंत शिक्षेचा संबंध आहे तिच्या तावडीत तेच लोक सापडतात ज्यांना तावडीत घेण्याचा निर्णय सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो अर्थात हा निर्णय त्याच्या न्याय व बुद्धि कौशल्याला अनुसरून असतो, तथापि त्याच्या अमर्याद कृपेपासून कोणीहि वंचित नाही. मनुष्य असो वा झाड प्रत्येक वस्तू त्याच्या कृपा-छत्राखाली वावरते.

सृष्टीचे अवलोकन केल्यास सगळीकडे त्याच्या कृपेचे झरे खळखळून वाहतांना दिसतील.

२३२. म्हणजे जेथपर्यंत अल्लाहच्या या कृपेचा संबंध आहे; जी आचरणाचा मोबदला म्हणून प्रदान केली जाईल तर ती त्याच लोकांच्या हिश्श्यात असेल ज्यांचे अशा प्रकारचे गुणधर्म असतील.

ईश-भय अंगिकारण्याचा अर्थ अल्लाहचे भय बाळगून जीवन व्यतीत करणे, व त्याच्या अवज्ञेपासून अलिप्त राहणे. यात शिर्कपासून अलिप्त राहणे आवश्यकरित्या आले.

२३३. ही आणि यानंतरची आयत आक्षेप-विधान म्हणून आहे, म्हणजे बनी इस्राईलची जी आत्म कथा वर्णन केली जात होती, ती जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या कृपा-वचनाच्या उल्लेखाप्रत पोहचली तेव्हा हे स्पष्ट करण्याचा अवसर निर्माण झाला की आज अल्लाहच्या कृपेस पात्र असणारे लोक कोण आहेत या संबंधान्वये येथे निरक्षर पैगंबर हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रेषितत्वावर ईमान बाळगण्याचे व त्यांचे आज्ञापालन करण्याचे आमंत्रण दिले गेले आहे.

२३४. ''उम्मी'' (निरक्षर) या शब्दाचे स्पष्टीकरण सूरह आले इमरान टीप क्र.२९ मध्ये आले आहे येथे हा शब्द पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे वैशिष्ट या नात्याने सादर केला गेला आहे, कारण अशिक्षित असणे ही जरी गुणवैशिष्ट्याची गोष्ट नाही, परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बाबतीत ही गोष्ट यासाठी गुणवैशिष्ट्याची झाली आहे की याद्वारे त्यांचे चमत्कारीक वैभव उदयास आले. निरक्षर असूनहि त्यांनी जी शिकवण दिली, तिला पाहून ज्ञान-क्षेत्रातील मोठ मोठे प्रकांड पंडीतहि दंग झाले आहेत आणि विद्वान, विचारवंत, व तत्ववेत्ते सर्वच त्यांच्या ज्ञानामृताचा लाभ घेत आहेत अर्थात त्यांची निरक्षरता त्यांच्या प्रेषितत्वाचे प्रमाण बनले, व प्रमाणहि असे की ज्याचे उत्तर देण्यास संपूर्ण जग असमर्थ आहे.

पैगंबराची निरीक्षरता ग्रंथ बाळगणाऱ्यांकरिता यापरीनेहि प्रेषितत्व प्रमाण होते की सर्वश्रेष्ठ अल्लाहने जिथे इब्राहीम वंशाची शाखा असलेल्या बनी इस्राईलला ईश ग्रंथ देऊन उपकृत केले होते व त्यांच्या दरम्यान पैगंबर पाठविले होते, तेथे वंशाची दुसरी शाखा असलेल्या बनी इस्माईलला ना ईश-ग्रंथ दिला गेला व ना त्यांच्यात पैगंबर पाठविले गेले, किंबहुना हे वचन फर्माविले की या इब्राहीम वंशाच्या शाखेत, जो ईश ग्रंथाशी अपरिचित आहे व ज्याच्या मार्गदर्शनाचे साधन केवळ ती पद्धति होय जी इब्राहीम व इस्माईलने त्यांच्याकरिता मागे सोडली आहे. एका अशा पैगंबराला त्यांच्यात उदयास आणीन जो निरक्षर असूनहि ईश ग्रंथ धारण करणारा असेल यास्तव तौरात' मध्ये उल्लिखित आहे की:

> ''मी त्यांच्यासाठी त्यांच्या भाऊ बंदातून तुझ्यासारखा एक संदेष्टा उभा करीन, त्याच्या मुखात मी आपली वचने घालीन आणि त्यांना ज्या आज्ञा मी देईन त्या सगळ्या तो त्यांना निवेदन करील. तो माझ्या नावाने बोलेल ती वचने जो कोणी ऐकावयाचा नाही त्याला मी जाब विचारीन.''
> (अनुवाद १८ : १८-१९)

ही गोष्ट बनी इस्राईलच्या प्रेषितांपैकी कोणावरहि सिद्ध होत नाही. कारण येथे बनी इस्राईलच्या भावांमध्ये. पैगबंर पाठविण्याविषयी सांगितले गेले आहे बनी इस्राईल मध्ये नव्हे. म्हणून जर तौरातच्या (जुन्या कराराच्या) या भाकिताला अनुसरून हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे नव्हते तर आणखी कोण आहे? दुसरी गोष्ट अशी की हजरत मूसा शरीअत बाळगणारे पैगंबर होते व हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हेही शरीअत बाळगणारे पैगंबर होत. वस्तुत: बनी इस्राईलचे पैगंबर हजरत मूसा यांच्या शरीअतीचे अधीन होते. म्हणून तौरातच्या उल्लिखित भाकितामध्ये मूसा सारखा पैगंबर उदयास आणण्याविषयी जे सांगितले गेले आहे ते हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनाच लागू पडते.

२३५. तौरातच्या भाकिताचा हवाला उपरोक्त टिपमध्ये आला आहे. राहिले इंजिल (नवा करार) तर त्यात बऱ्याच ठिकाणी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) विषयी भाकिते उपलब्ध आहेत.

उदाहरणार्थ-

''येशू त्यास म्हणाला, जो दगड बांधणाऱ्यांनी नापसंत केला तोच कोनशिला झाला हे परमेश्वराकडून झाले आणि ते आमच्या दृष्टीने आशचर्यकारक आहे, असे शास्त्रात तुमच्या वाचण्यात कधी आले नाही काय? म्हणून मी तुम्हास सांगतो की, देवाचे राज्य तुम्हापासून काढून घेतले जाईल व जी प्रजा त्याचे फळ देईल तिला ते दिले जाईल. (जो ह्या धोंड्यावर पडेल त्याचा चुराडा होईल, परंतु ज्या कोणावर हा पडेल त्याचा हा भुगा भुगा करून टाकील)'' (मत्तय- २१ ४२ ते ४४)

''या भाकिताचा शब्द न शब्द हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बाबतीत खरा ठरतो. म्हणजे ते कोनशिलेचा दगड अर्थात अंतिम प्रेषित होत. ईश्वराची बादशाही म्हणजे इमामत (नेतृत्व) बनी इस्राईल पासून हिरावून घेतली गेली व मुस्लिम जन समूहाकडे सोपवले गेले. अंतिम प्रेषिताशी ज्याने विरोध केला तो नाश पावला व ज्यावर अंतिम प्रेषिताने हल्ला केला त्याला पराभूत करून दाखविले. योहन्नाच्या बायबलमध्ये आहे की जेव्हा यहुदींनी हजरत यहया (योहन्ना) यांना विचारले काय तू मसीह आहेस? तेव्हा तो म्हणाला नाही त्यांनी विचारले काय तू इलीयाह आहेस तो म्हणाला, नाही त्यांनी विचारले, आपण तो संदेष्टा आहा काय? त्यावर त्याने नाही असे उत्तर दिले.'

(योहान-१: २१)

यावरून अगदी स्पष्ट होते की ग्रंथधारकांना मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे व्यक्तित्व त्यांच्या आगमनापूर्वी ''तो पैगंबर'' या स्वरूपात परिचित होते आणि ज्याअर्थी हजरत मसीह (येशू) नंतर हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशिवाय कोणताही पैगंबर उदायास आला नाही तर तो नबी' शी अभिप्रेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) नव्हे तर आणखी कोण असू शकतो? एका दुसऱ्या ठिकाणी हजरत ईसा यांच्या या निवेदनाचा उल्लेख आला आहे :-

''ह्यापुढे मी तुम्हाबरोबर फार बोलणार नाही, कारण जगाचा अधिकारी येतो, परंतु माझ्यात त्याचे काही हि नाही.'' (बायबलच्या उर्दू भाषांतरावरून : योहान १४: ३०)

अन्य एका ठिकाणी असा उल्लेख आहे :-

''परंतु तो कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो माझ्या विषयी साक्ष देईल.''(योहान - १५:२६)

अर्थात हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे शुभ-व्यक्तित्व होय की त्यांनी हजरत ईसा संबंधी यथायोग्य साक्ष दिली म्हणजे त्यांच्या प्रेषित्वाचे सत्यत्व पटविले; त्यांच्या व्यक्तिमत्वास योग्यरित्या दृगोचर केले व त्यांच्या मूल आमंत्रणास उजळणी दिली.

दुसऱ्या एका जागी उल्लिखित आहे:-

''तरी तो सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो तुम्हाला मार्ग दाखवून सर्व सत्यात नेईल कारण तो आपल्या स्वत:चे सांगणार नाही तर जे काही ऐकेल, तेच सांगेल, आणि होणाऱ्या गोष्टी तुम्हाला कळवील.'' (योहान- १६:१३)

आणखी एका ठिकाणी तर स्पष्ट: असे म्हटले गेले आहे की तो अनंतकाळापर्यंत तुमच्या सोबत राहील म्हणजे त्याची शरीअत कियामती पर्यंत राहील.

'' मग तो तुम्हाले दुसरा कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा देईल, अशासाठी की त्याने तुम्हांबरोबर सदा सर्वदा राहावे.'' (योहान - १४ : १६)

२३६. म्हणजे यहुदींकरिता त्यांच्या बंडखोरीमुळे ज्या वस्तू हराम केल्या गेल्या होत्या त्यांची अवैधता या प्रेषितास पाठविल्याने नष्ट केली गेली. या पैगंबरासह ज्या अर्थी अनंतकालीन शरीअत अवतरीत केली गेली आहे म्हणून केवळ तीच बंधने लागू केली गेली आहेत जी स्वभाविक आहेत म्हणजे केवळ अस्वच्छ अशुद्ध (नापाक) वस्तु हराम होत.

२३७. 'ओझे'शी अभिप्रेत बनी इस्राईलच्या विद्वानांचा व धर्मशास्त्र पंडीतांचा फिकह बाबतीत काथ्याकूट होय ज्याने शरीअतीस अवघड व भारदस्त बनविले होते. याची कल्पना विद्यमान तौरातच्या अध्ययनावरून येते. आणि 'जोखंड' शी अभिप्रेत धर्माप्रविष्ट नव्या गोष्टी (बिदअत) व शंकावृत्ती (वहमपरस्ती) होत ज्यांनी त्यांना जखडून ठेवले होते.

२३८. अभिप्रेत 'कुरआन' होय.

सांगा लोकहो ! मी तुम्हा सर्वांकरिता त्या अल्लाहचा पैगंबर आहे. ज्याच्यासाठी आकाशांची व जमीनीची राज्यसत्ता आहे. त्याच्याशिवाय कोणताहि ईश्वर नाही. तोच जिवित राखतो व मारतो, यास्तव अल्लाहवर ईमान बाळगा, त्याचे रसूल निरक्षर प्रेषितावर जो अल्लाह व त्याच्या फर्मानांवर ईमान बाळगतो आणि अनुसरण करा त्याचे ज्यायोगे तुम्हाला मार्गदर्शन लाभावे. (अल-कुरआन)

१५८. सांगा लोकहो ! मी तुम्हा सर्वांकरिता त्या अल्लाहचा पैगंबर [२३९] आहे. ज्याच्यासाठी आकाशांची व जमीनीची राज्यसत्ता आहे. त्याच्याशिवाय कोणताहि ईश्वर नाही. तोच जिवित राखतो व मारतो, यास्तव अल्लाहवर ईमान बाळगा, त्याचे रसूल निरक्षर प्रेषितावर जो अल्लाह व त्याच्या फर्मानांवर ईमान बाळगतो आणि अनुसरण करा त्याचे ज्यायोगे तुम्हाला मार्गदर्शन लाभावे.

قُلْ يَٰٓأَيُّهَا ٱلنَّاسُ إِنِّى رَسُولُ ٱللَّهِ إِلَيْكُمْ جَمِيعًا
ٱلَّذِى لَهُۥ مُلْكُ ٱلسَّمَٰوَٰتِ وَٱلْأَرْضِ ۖ لَآ إِلَٰهَ إِلَّا هُوَ يُحْىِۦ
وَيُمِيتُ ۖ فَـَٔامِنُوا۟ بِٱللَّهِ وَرَسُولِهِ ٱلنَّبِىِّ ٱلْأُمِّىِّ ٱلَّذِى
يُؤْمِنُ بِٱللَّهِ وَكَلِمَٰتِهِۦ وَٱتَّبِعُوهُ لَعَلَّكُمْ تَهْتَدُونَ ﴿١٥٨﴾

१५९. मूसाच्या [२४०] जन समूहात एक गट असाहि होता, जो सत्याला अनुसरून मार्गदर्शन करीत असे व तद्नुसार न्याय करीत असे.[२४१]

وَمِن قَوْمِ مُوسَىٰٓ أُمَّةٌ يَهْدُونَ بِٱلْحَقِّ وَبِهِۦ
يَعْدِلُونَ ﴿١٥٩﴾

१६०. आणि आम्ही त्यांना बारा कुटुंबात विभागून त्यांचे वेगवेगळे समूह अमलात आणले होते [२४२] आणि जेव्हा मूसाच्या जाती समूहाने त्याच्याजवळ पाणी मागितले तेव्हा आम्ही त्याच्यावर आदेश अवतरीत केला की आपली काठी दगडावर मार. तेव्हा त्यापासून बारा स्त्रोत निघाले व प्रत्येक समूहाने आपले पाणी घेण्याचे स्थान जाणून घेतले. [२४३] आणि आम्ही त्यांच्यावर अभ्र-छाया केली व त्यांच्याकरिता मन्न व सलवा अवतरीत केले [२४४] खा या स्वच्छशुद्ध वस्तू ज्या आम्ही तुम्हाला प्रदान केल्या आहेत. परंतु त्यांनी (कृतघ्नता व्यक्त करून) आमचे काहिच नुकसान केले नाही, उलट स्वत:वरच अत्याचार करीत राहिले.

وَقَطَّعْنَٰهُمُ ٱثْنَتَىْ عَشْرَةَ أَسْبَاطًا أُمَمًا ۚ وَأَوْحَيْنَآ إِلَىٰ
مُوسَىٰٓ إِذِ ٱسْتَسْقَىٰهُ قَوْمُهُۥٓ أَنِ ٱضْرِب بِّعَصَاكَ ٱلْحَجَرَ ۖ
فَٱنۢبَجَسَتْ مِنْهُ ٱثْنَتَا عَشْرَةَ عَيْنًا ۖ قَدْ عَلِمَ كُلُّ أُنَاسٍ
مَّشْرَبَهُمْ ۚ وَظَلَّلْنَا عَلَيْهِمُ ٱلْغَمَٰمَ وَأَنزَلْنَا عَلَيْهِمُ
ٱلْمَنَّ وَٱلسَّلْوَىٰ ۖ كُلُوا۟ مِن طَيِّبَٰتِ مَا رَزَقْنَٰكُمْ ۚ وَ
مَا ظَلَمُونَا وَلَٰكِن كَانُوٓا۟ أَنفُسَهُمْ يَظْلِمُونَ ﴿١٦٠﴾

१६१. आणि जेव्हा त्यांना सांगितले गेले की त्या वस्तीत जाऊन राहा [२४५] व जेथून इच्छा होईल खा आणि ''हित्ततुन'' (क्षमा क्षमा) म्हणत जा [२४६] व दरवाज्यातून सजदा करीत दाखल व्हा [२४७] आम्ही तुमच्या अपराधांना माफ करू आणि सद्वर्तन अंगिकारणाऱ्यांना आम्ही अधिक पुरस्कृत करू.

وَإِذْ قِيلَ لَهُمُ ٱسْكُنُوا۟ هَٰذِهِ ٱلْقَرْيَةَ وَكُلُوا۟ مِنْهَا
حَيْثُ شِئْتُمْ وَقُولُوا۟ حِطَّةٌ وَٱدْخُلُوا۟ ٱلْبَابَ سُجَّدًا
نَّغْفِرْ لَكُمْ خَطِيٓـَٰٔتِكُمْ ۚ سَنَزِيدُ ٱلْمُحْسِنِينَ ﴿١٦١﴾

२३९. म्हणजे बनी इस्राईल असो वा बनी इस्माईल अरब देशीय असोवा अन्यदेशीय,वंश,रंग,देश,जाती,धर्म इत्यादिंच्या कसल्याहि बंधनाशिवाय समस्त मनुष्यांकडे मला पैगंबर बनवून पाठविले गेले आहे. या वस्तुस्थितीस लक्षात घेता पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) भारतीय लोकांकरिताहि तशाच प्रकारे पैगंबर होत ज्याप्रकारे अरब वासीयांकरिता आहेत.

२४०. संभाषणाचा ओघ पुन्हा बनी इस्राईल कडे वळत आहे.

२४१. हे स्पष्ट करण्याचा उद्देश असा की बनी इस्राईलच्या ज्या अपराधांचा व ज्या मूर्खतेचा वर उल्लेख आला आहे तो खचितच त्यांचा सामुदायिक अपराध होय. तथापि याचा हा अर्थ नव्हे की त्यांच्या दरम्यान सत्यनिष्ठांचा एकहि समूह नव्हाता, किंबहुना त्यांच्यात सत्यनिष्ठांचा एक समूह संख्येने तो अल्पसा असला तरी निश्चित होता. हा समूह सत्य आणि न्यायाच्या निकडी भागवित असतांना लोकांना मार्गदर्शन करी व त्यांच्या दरम्यान शरीअत संबंधित कर्तव्ये पार पाडीत असे.

२४२. हजरत मूसा यांनी सीना वाळवंटात बनी इस्राईलचे संघटन केले होते.व त्यांच्या बारा कबिल्यांवर, जसे सूरह मायदा आयत क्र.१२मध्ये वर्णिले गेले आहे, बारा सरदार नियुक्त केले होते. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह मायदा टीप क्र.६१ बाइबल मध्येहि याचे विवरण ''गणना'' प्रकरण १ मध्ये वर्णिले गेले आहे.

२४३. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ८१ मध्ये केले गेले आहे.

२४४. याचे स्पष्टीकरण हि सूरह बकरा टीप क्र. ७६ मध्ये केले गेले आहे.

२४५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप ७७.

२४६. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप ७९.

२४७. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप ७८.

**१६२.** परंतु जे लोक यांच्यात अत्याचारी होते, त्यांनी त्या गोष्टीला जी त्यांना सांगितली गेली होती बदलून काही वेगळेच रूप दिले.[२४८] शेवटी आम्ही त्यांच्या अत्याचाराचा मोबदला म्हणून त्यांच्यावर आकाशातून शिक्षा पाठविली.

فَبَدَّلَ الَّذِينَ ظَلَمُوا مِنْهُمْ قَوْلًا غَيْرَ الَّذِي قِيلَ
لَهُمْ فَأَرْسَلْنَا عَلَيْهِمْ رِجْزًا مِّنَ السَّمَاءِ بِمَا
كَانُوا يَظْلِمُونَ ﴿١٦٢﴾

**१६३.** आणि त्यांना त्या वस्तीची दशा विचारा जी समुद्र किनारी वसली होती.[२४९] जिथे 'सब्त'च्या बाबतीत [२५०] लोक (शरीअत) मर्यादेचे उल्लंघन करीत असत जेव्हा त्यांचा ''सब्त'' दिवस राही तेव्हा मासे पाण्यावर तरंगत त्यांच्या समोर येत असत आणि जेव्हा ''सब्त'' दिवस नसे तेव्हा येत नसत. अशा प्रकारे आम्ही त्यांच्या अवज्ञेमुळे त्यांना आजमावीत होतो.[२५१]

وَسْأَلْهُمْ عَنِ الْقَرْيَةِ الَّتِي كَانَتْ حَاضِرَةَ
الْبَحْرِ إِذْ يَعْدُونَ فِي السَّبْتِ إِذْ تَأْتِيهِمْ حِيتَانُهُمْ
يَوْمَ سَبْتِهِمْ شُرَّعًا وَيَوْمَ لَا يَسْبِتُونَ ۙ لَا تَأْتِيهِمْ ۚ
كَذَٰلِكَ ۚ نَبْلُوهُم بِمَا كَانُوا يَفْسُقُونَ ﴿١٦٣﴾

**१६४.** आणि जेव्हा त्यांच्यातील एका समूहाने (उपदेश करणाऱ्यांना) म्हटले. तुम्ही अशा लोकांना उपदेश का करता ज्यांना अल्लाह एकतर नष्ट करणार आहे किंवा कठोर शिक्षा देणार आहे? त्यांनी उत्तर दिले, यासाठी की या लोकांनी अपराधांपासून अलिप्त रहावे.[२५२]

وَإِذْ قَالَتْ أُمَّةٌ مِّنْهُمْ لِمَ تَعِظُونَ قَوْمًا ۙ اللَّهُ مُهْلِكُهُمْ أَوْ
مُعَذِّبُهُمْ عَذَابًا شَدِيدًا ۖ قَالُوا مَعْذِرَةً إِلَىٰ رَبِّكُمْ وَلَعَلَّهُمْ
يَتَّقُونَ ﴿١٦٤﴾

**१६५.** मग जेव्हा ते त्या उपदेशाला अगदी विसरून गेले जो त्यांना केला गेला होता तेव्हा आम्ही त्या लोकांना वाचविले जे दुराचारापासून रोखत होते आणि दुष्कृत्य करणाऱ्या लोकांना त्यांच्या अवज्ञेमुळे कठोर शिक्षेत धरले.[२५३]

فَلَمَّا نَسُوا مَا ذُكِّرُوا بِهِ أَنجَيْنَا الَّذِينَ يَنْهَوْنَ عَنِ السُّوءِ
وَأَخَذْنَا الَّذِينَ ظَلَمُوا بِعَذَابٍ بَئِيسٍ
بِمَا كَانُوا يَفْسُقُونَ ﴿١٦٥﴾

**१६६.** मग जेव्हा ते अशा कामास ज्यापासून त्यांना मनाई केली गेली होती, पूर्ण धाडसाने करू लागले तेव्हा आम्ही म्हटले: तुच्छ, अपमानित माकडे व्हा.[२५४]

فَلَمَّا عَتَوْا عَن مَّا نُهُوا عَنْهُ قُلْنَا لَهُمْ كُونُوا
قِرَدَةً خَاسِئِينَ ﴿١٦٦﴾

**१६७.** आणि स्मरण करा जेव्हा तुमच्या पालनकर्त्याने सचेत केले होते की तो कियामतीच्या दिवसापावेतो अशा लोकांना त्यांच्यावर उभारीत राहील जे त्यांना अत्यंत वाईट शिक्षेची गोडी चाखवीत राहतील [२५५] निःसंशय तुमचा पालनकर्ता शिक्षा देण्यात अति शीघ्र आणि माफ करणारा व दया करणाराहि आहे.

وَإِذْ تَأَذَّنَ رَبُّكَ لَيَبْعَثَنَّ عَلَيْهِمْ إِلَىٰ يَوْمِ الْقِيَامَةِ مَن
يَسُومُهُمْ سُوءَ الْعَذَابِ ۗ إِنَّ رَبَّكَ لَسَرِيعُ الْعِقَابِ ۖ وَإِنَّهُ
لَغَفُورٌ رَّحِيمٌ ﴿١٦٧﴾

२४८. म्हणजे शहरात विजेता या नात्याने दाखल होतांना जीभेवर क्षमा याचनेचे वचन न राखता त्यांनी गर्वोन्मत शैलीत विनोदी गोष्टी करायला सुरवात केली.

२४९. हा ज्या वस्तीचा उल्लेख होत आहे, तिच्याशी अभिप्रेत भाष्यकारांच्या एका समूहाच्या मते ऐला शहर होय जे खलीज अकबाच्या किनारी वसले आहे. ज्याचे आधुनिक नाव ''अक्बा'' असे आहे. येथे बनी इस्राईलचा एक समूह वसत होता. आणि ज्या घटनेचा येथे उल्लेख केला गेला आहे ती हजरत मूसा यांच्या नंतरची घटना होय.

२५०. सब्त म्हणजे शनीवारचा दिवस हा दिवस बनी इस्राईल करीता विशिष्ट ठरविला गेला होता व यादिवशी त्यांना काम करण्यास मनाई केली गेली होती; त्यात शिकार करणे वगैरेचाहि समावेश होता. तात्पर्य, हा दिवस उपासने करीता विशिष्ट होता. या दिवसाची प्रतिष्ठा बाळगण्या बाबत त्यांना अत्यंत सक्त आदेश दिले गेले होते. तौरात मध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख आहे:-

> ''मग परमेश्वर मोशेला म्हणाला, तू इस्राईल लोकांना आणखी असे सांग की, तुम्ही माझे शब्बाथ अवश्य पाळावे..... म्हणून तुम्ही शब्बाथ पाळावा; तो तुमच्यासाठी पवित्र आहे. जो कोणी तो भ्रष्ट करील त्याला अवश्य जिवे मारावे, जो कोणी त्या दिवशी काही काम करील त्याचा स्वजनातून उच्छेद व्हावा.'' (निर्गम-३१: १२ ते १४)

१५१. जेव्हा एखाद्या जन समूहाचा तोल एखाद्या अपराधाकडे असतो तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या जन समूहाकरिता अपराध ग्रस्त होण्याचे अवसर निर्माण करतो. यासाठी की त्याच्या मनातील खोट जाहीर व्हावी, व अपराधी बुद्धी उघडपणे दिसून यावी. अर्थात ही त्या बुद्धिकौशल्याची निकड आहे, जिच्याद्वारे मनुष्याला कसोटीतून पार पाडले जात आहे.

सब्तच्या अवहेलनेचा कल जेव्हा बनी इस्राईलच्या त्या समूहात वाढीस लागला, जो समुद्र किनारी वसत होता तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना कठीण परीक्षेत टाकले व या स्थितीत की केवळ शनिवारीच मासे पाण्यावर येत, इतर दिवशी येत नसत; ज्या लोकांची समस्त अभिरूची अर्थोपार्जनाशी निगडीत होती ते 'सब्त' च्या आदेशाची पर्वा न करता माशांची शिकार करू लागले. अशा प्रकारे सब्तची अवहेलना सामूहीकरित्या होऊ लागली.

२५२. म्हणजे जरी शहरातले लोक बंडखोर झाले होते तरी त्यांच्यात एक समूह निश्चित असा होता, ज्याच्या अंगी ईश-भय होते व जो सब्त बाबतीत शरअी आदेशांच्या विरुद्ध वागण्यापासून अलिप्त राहिला. सदाचारींच्या त्या समूहात काही असेहि लोक होते जे सब्तच्या आदेशाची पायमल्ली करणाऱ्यांना उपदेश करणे व्यर्थ जाणत; कारण त्यांच्या दु:साहसामुळे ते त्यांच्याबाबत अगदी निराश झाले होते; तथापि या सदाचारी लोकांमध्ये एक वर्ग असा देखील होता, ज्यांना आपल्या कर्तव्य-पूर्ततेची यथार्थ जाणीव होती, हा वर्ग शेवटपर्यंत दुष्कृत्यांपासून अलिप्त राहण्याविषयी उपदेश करीत राहिला.

२५३. ही आयत स्पष्ट करते की शिक्षेला केवळ तेच लोक बळी पडले जे अवज्ञा करणारे होते आणि जे लोक दुष्कृत्यांपासून रोखत होते ते शिक्षेच्या तावडीत आले नाहीत. राहिला हा प्रश्न की सदाचारींच्या समूहापैकी जे लोक दुराचारी लोकांच्या सुधारणेबाबत निराश झाले होते व त्यांना उपदेश करणे व्यर्थ समजत होते त्यांना शिक्षेपासून वाचविले गेले कि ते शिक्षेच्या तावडीत सापडले? तेव्हा या संदर्भात भाष्यकारांचे दुमत आहे तथापि आम्ही खालील प्रमाणांच्या आधारावर असे समजतो की ते शिक्षेपासून सुरक्षित राहणाऱ्यांमध्ये सामील होते :-

१) त्यांनी हे जे म्हटले होते की 'अशा लोकांना उपदेश करून काय लाभ कि ज्यांना अल्लाह एकतर नष्ट करणार आहे किंवा कठोर शिक्षा देणार आहे.' यावरून साफ जाहीर होते की हे ईश-भय बाळगणारे लोक होते, मग ईश-भय बाळगणाऱ्यांची परिणिती बंडखोर लोकांसारखी कशाप्रकारे होऊ शकते?

२) त्यांनी जे सांगितले त्याचा हा अर्थ कोठून निघतो की त्यांनी दुराचाराविरुद्ध प्रथमपासून आवाज उठविलाच नव्हता; किंवा दुराचाऱ्यांना प्रतिबंध घालण्याची ते इच्छा बाळगत नेव्हते, किंबहुना त्याचे कथन खरे पाहता अशा लोकांना उद्देश्यून होते जे दुष्कर्म करीत होते. त्यांनी जी घोर निराशा व्यक्त केली, त्यावरून साफ जाहीर होते की दुराचारी लोकांना वाममार्गापासून रोखण्याचा प्रयत्न काही प्रमाणात केला गेला होता. परंतु जेव्हा ते दुराचारापासून परावृत्त झाले नाहीत तेव्हा अधिक उपदेश करण्यात त्यांना काही लाभ जाणवला नाही. परंतु जे लोक अधिक कर्तव्य निष्ठ होते त्यांनी शेवट पावेतो उपदेश करण्याचे कार्य जारी ठेवले. यावरून कर्तव्य-पूर्ततेत दोघांचा भिन्न दर्जा तर दिसून येतो, परंतु जे लोक निराशा व्यक्त करीत होते ते आपल्या जबाबदारी विषयी अगदी बेपर्वा होते व त्यांनी दुराचारा विरुद्ध तिरस्कार दर्शविला नाही असा अर्थ कोठे निघतो?

३) त्यांच्याकडून जी निराश व्यक्त झाली आहे ती स्वत: हे दर्शवितो की त्यांना दुराचाराविषयी अत्याधिक तिरस्कार होता; मग ज्यांना दुराचाराविषयी अत्याधिक तिरस्कार असावा, त्यांची गणना अशा लोकांमध्ये कशी होऊ शकते जे दुराचारास निर्माण करणारे असावेत. त्यांनी उपदेश करणाऱ्यांना जे काही म्हटले ते आपल्यातर्फे दुराचाराविरुद्ध तिरस्कार दर्शविणेच

होते; म्हणून ते केवळ दुराचाराचा तमाशा बघत बसणारे होते असे म्हणणे उचित नव्हे.

४) क़ुरआनाचे निवेदन आहे की, शिक्षाच्या तावडीत केवळ तेच लोक सापडले जे अत्याचारी व दुराचारी होते. अर्थात निराशा व्यक्त करणारे ना अत्याचारी होते ना दुराचारी किंबहुना सदाचारी लोक होते जसे की त्यांच्या मुखातून निघालेल्या वचनांवरून जाहीर होते: तसेच याहि गोष्टीने जाहीर होते की जर ते अत्याचारी व दुराचारी असते तर उपदेशकांनी सर्वप्रथम यांना उपदेश केला असता, परंतु उपदेशकांनी यांना कसलाहि उपदेश केला नाही किंबहुना असे सांगितले की आम्ही या दुराचारी लोकांना एवढ्यासाठी उपदेश करीत आहोत की आपल्या जबाबदारीतून अल्लाहजवळ मुक्त व्हावे व ज्यायोगे ह्या दुराचारी लोकांनी आपल्या अपराधी हरकतींपासून अलिप्त व्हावे. यास्तव ज्याअर्थी निराशा व्यक्त करणारे ना अत्याचारी होते ना दुराचारी तर ते शिक्षेला कशाप्रकारे पात्र ठरले जी अत्याचारी व दुराचारी लोकांकरिता खास होती.

५) इब्ने जरीर तबरी यांनी इकरमा द्वारे उल्लिखित केले आहे की हजरत इब्ने अब्बास यांना आयतीच्या खऱ्या स्पष्टीकरणा बाबत दुष्करता जाणवत होती. व सुधारणेबाबत निराशा झालेल्यांचा शिक्षा ग्रस्त होण्यासंबंधीचा विचार त्याना इतका सतावित होता की त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्या प्रसंगी इकरमा जे त्यांचे शिष्य होते त्यांनी हा आधार मांडला की हे लोक दुराचाराची मनाई करणाऱ्यांच्या समूहातच सामील होते कारण त्याच्या या कथनावरून की, तुम्ही लोकांना उपदेश कां करता ज्यांना अल्लाह नष्ट करणार आहे किंवा कठोर शिक्षा देणार आहे. स्पष्ट जाहीर होते की ते दुराचाराविषयी तिरस्कार बाळगीत व रोखणाऱ्यांमध्येच त्यांचा समावेश होता. हा पुरावा ऐकून हजरत इब्ने अब्बास यांना इतका आनंद झाला की त्यांनी इकरमा यांना देणगी म्हणून पोषाखाची एक जोडी दिली.

२५४. पहिली शिक्षा बहुधा सांसर्गिक रोगाच्या स्वरूपाची असावी आणि जेव्हा त्यांनी यापासून बोध घेतला नाही तर त्यांचे चेहरे विकृत झाले व त्यांना माकड बनविले गेले.

राहिला हा प्रश्न की मनुष्य माकड कसा बनू शकतो. तर याचे उत्तर हे की, जो ईश्वर मातीतून मनुष्य निर्माण करू शकतो तो माणसाला माकड का बनवू शकत नाही? जरी सर्वसामान्यत: असे घडत नाही, तरी याचा हा अर्थ नव्हे की असे कधी घडूच शकत नाही. खरी गोष्ट अल्लाहची इच्छा व त्याचे सामर्थ्य होय. त्याने मानव-इतिहासाच्या पृष्ठांवर बोधकारक शिक्षेचा एक प्रकार असाहि अंकित केला, की जिचे भावी काळातील मानव-वंशांनी स्मरण राखावे.

स्पष्ट व्हावे की या घटनेवरून आवागमन दृष्टीकोनाच्या समर्थनाचा कोणताहि पैलू निघत नाही कारण आवागमनात माणसाचे शरीरच नव्हे तर आत्मा देखील परिवर्तित होतो. जेव्हा या घटनेत ज्या लोकांना माकड बनविले गेले होते, त्यांचा आत्मा बदलला नव्हता. अर्थात याचा पुरावा म्हणजे कुरआनाचे हे निवेदन की त्यांना तुच्छ व अपमानित बनविले गेले होते, तेव्हा उघड आहे की अवहेलनेची जाणीव तर त्यावेळी त्यांना होऊ शकत होती जेव्हा त्यांच्या अंगी मनुष्य आत्मा त्यांच्या ठायी असावा अन्यथा जर त्यांचा आत्मा देखील माकड-आत्मा झाला असता तर त्यांना ही जाणीव कशी होऊ शकली असती की आम्ही पूर्वी मनुष्य होतो व आता आमचे चेहरे विद्रुप करून आम्हाला माकड बनविले गेले आहे.उघड आहे, स्वाद व दु:ख, मान व अपमानाची जाणीव केवळ मानव आत्म्यासच होते; माकड-आत्म्याला नव्हे. दुसरी गोष्ट अशी की कियामतीच्या दिवशी यांना देखील त्याचप्रकारे कबरीतून उठविले जाईल ज्याप्रमाणे इतर समस्त मनुष्यांना तसेच त्यांना सुद्धा ईश्वरासमोर हजर व्हावे लागेल व आपल्या कृतकर्माचे फळ भोगावे लागेल. परंतु पुनर्जन्माची कल्पना, माणसाला दुसऱ्यांदा उठविले जाण्याविषयी ईश्वरासमोर हजर केले जाण्याविषयी व आचरणाचा मोबदला जन्नत वा जहन्नमच्या रूपाने मिळण्या विषयी नकार दर्शविते.

२५५. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने बनी इस्राईलला या गोष्टीपासून सचेत केले होते की जेव्हां त्यांचे सामूहिक अस्तित्व बंडखोर व वचन भंग करणाऱ्या समाजाचे रूप धारण करील तेव्हा त्याचे सारे ऐश्वर्य वैभव लयाला जाईल, मग सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्या विरुद्ध अशा लोकांना उभारीत राहील जे त्यांची चांगली मुस्कटदाबी करतील. यास्तव गेल्या दोन हजार वर्षाचा इतिहास साक्षी आहे की यहुदीवर कोणाच्या न कोणाच्या हातून अपमानाचा प्रहार होत राहिला. आजचे इस्राईल राज्य तर फार मोठ्या विनाशाची प्रस्तावना होय. क़ुरआन अवतरीत होत असतानाहि मदीनेच्या परिसरात कबिल्यांची राज्ये कायम होती. परंतु त्याची जी दुष्परिणीती झाली ती सर्वश्रुत होय.

# ऐला जे सब्तवाल्यांचे निवासा स्थान होते



وَقَطَّعْنٰهُمْ فِي الْاَرْضِ اُمَمًا ۚ مِنْهُمُ الصّٰلِحُوْنَ وَمِنْهُمْ دُوْنَ
ذٰلِكَ ۡ وَبَلَوْنٰهُمْ بِالْحَسَنٰتِ وَالسَّيِّاٰتِ لَعَلَّهُمْ يَرْجِعُوْنَ ﴿١٦٨﴾

**१६८. आणि आम्ही त्यांना समूहा-समूहात विभागून वेग वेगळे केले [२५६] त्यांच्यापैकी काही सदाचारी होते तर काही याहून भिन्न आणि आम्ही त्यांना बऱ्या वाईट स्थितीत टाकून त्यांची परीक्षा घेत राहिलो यासाठी की त्यांनी रुजू करावे.**

فَخَلَفَ مِنْۢ بَعْدِهِمْ خَلْفٌ وَّرِثُوا الْكِتٰبَ يَاْخُذُوْنَ عَرَضَ
هٰذَا الْاَدْنٰى وَيَقُوْلُوْنَ سَيُغْفَرُ لَنَا ۚ وَاِنْ يَّاْتِهِمْ عَرَضٌ مِّثْلُهٗ
يَاْخُذُوْهُ ؕ اَلَمْ يُؤْخَذْ عَلَيْهِمْ مِّيْثَاقُ الْكِتٰبِ اَنْ لَّا يَقُوْلُوْا عَلَى
اللّٰهِ اِلَّا الْحَقَّ وَدَرَسُوْا مَا فِيْهِ ؕ
وَالدَّارُ الْاٰخِرَةُ خَيْرٌ لِّلَّذِيْنَ يَتَّقُوْنَ ؕ اَفَلَا تَعْقِلُوْنَ ﴿١٦٩﴾

**१६९. मग त्यांच्यानंतर असे कुपूत्र लोक त्यांचे प्रतिनिधी व ईश-ग्रंथाचे वारस बनले जे या तुच्छ जगाचा लाभ अधाशी पणाने धरतात आणी म्हणतात आम्हाला माफ केले जाईल आणि जर तसलीच इहलोक सामुग्री पुन्हा त्यांच्या हाती येते तर पुन्हा तिचा स्वीकार करतात [२५७] काय यांच्याकडून ईश-ग्रंथात वचन घेतले गेले नाही की अल्लाहशी संबंध जोडून 'सत्या' शिवाय अन्य कोणतीहि गोष्ट न सांगावी?[२५८] आणि त्यात जे काही आहे ते त्यांनी चांगल्या प्रकारे वाचले आहे.[२५९] आखिरतचे घर तर त्या लोकांकरीता अधिक चांगले आहे. जे ईश-भय बाळगतात.[२६०] काय ही गोष्ट तुमच्या लक्षात येत नाही ?[२६१]**

وَالَّذِيْنَ يُمَسِّكُوْنَ بِالْكِتٰبِ وَاَقَامُوا الصَّلٰوةَ ؕ اِنَّا لَا نُضِيْعُ
اَجْرَ الْمُصْلِحِيْنَ ﴿١٧٠﴾

**१७०. आणि ज्या लोकांनी ईश-ग्रंथाला मजबूतपणे धरून ठेवले आहे व नमाज़ कायम करतात, अशा सुधारणा करणाऱ्यांचा मोबदला आम्ही व्यर्थ जाऊ देणार नाही.[२६२]**

وَاِذْ نَتَقْنَا الْجَبَلَ فَوْقَهُمْ كَاَنَّهٗ ظُلَّةٌ وَّظَنُّوْۤا اَنَّهٗ وَاقِعٌ ۢ بِهِمْ ۚ
خُذُوْا مَاۤ اٰتَيْنٰكُمْ بِقُوَّةٍ وَّاذْكُرُوْا مَا فِيْهِ لَعَلَّكُمْ تَتَّقُوْنَ ﴿١٧١﴾

**१७१. आणि स्मरण करा जेव्हा आम्ही पहाडाला छता सारखे यांच्यावर आच्छादिले आणि ते समजत होतो की त्यांच्यावर कोसळण्याच्याच बेतात आहे.[२६३] त्यावेळी आम्ही त्यांना आदेश दिला होता की जो ग्रंथ आम्ही तुम्हाला देत आहोत त्यास मजबूतपणे धरा व त्यात जे काही आहे स्मरणात असू द्या ज्यायोगे तुम्ही ईश भय बाळगणारे व्हावे.**

२५६. म्हणजे बनी इस्राईलची एकता दुभंगून गेली. जे स्थैर्य त्यांना हजरत सुलैमान यांच्या काळापर्यंत पॅलेस्टीन मध्ये होते, ते शिल्लक राहिले नाही; व येरूशलमच्या पतनाने त्याना इतके पस्त केले की त्याची कसलीहि केंद्रियता शिल्लक राहिली नाही आणि जमीनीच्या विविध भागात ते आश्रय घेण्यास अगतिक झाले. खैबर, मदीना व यमन इत्यादि ठिकाणी असलेल्या त्यांच्या वसत्या, म्हणजे त्यांच्या राष्ट्रीय फाटाफूटीचा परिणाम होय.

२५७. हा संकेत यहुदींच्या नैतिक बिघाडाकडे आहे. अर्थात हे की, जगाच्या तुच्छ फायद्यासाठी त्यांना नैतिक व शरीअतच्या मर्यादा तोडण्यात काहीच संकोच राहिला नाही. हराम व हलालचे तारतम्य राहिले नाही. ऐहीक सुख सामुग्रीचे ते एवढे रसिक बनले की धनसंपदा समेटण्याची एकहि संधी वाया जावू देत नव्हते. जर त्यांच्या मनात हा विचार येईल की अशा प्रकारे ते अपराध कार्य करीत आहे किंवा त्याच्या दुष्कृत्यांबद्दल कोणी त्यांना सावध करी तर ते असे म्हणून स्वत:चे समाधान करीत की आमची 'मुक्ति' निश्चित होईल कारण आम्ही प्रतिष्ठीत जाती समूहाशी संबंधित आहोत किंवा हे की ईश्वराच्या अमुक एका दासांवर श्रद्धा बाळगतो, म्हणून त्याच्या वशिल्याने आम्हाला मोक्षप्राप्ती सहज होईल. त्यानंतर त्यांना पुन्हा हरामात बरबटण्याची संधी लाभल्यास ते पुन्हा त्यात तोंड खुपसत, अशा प्रकारे त्यांच्या व्यावसायिक व आर्थिक जीवनात, किंबहुना संपूर्ण जीवनात धर्माशी असंबद्धता तेवढी राहीली होती.

खेदाची गोष्ट ही आहे की आज मुसलमानांची स्थितीहि काहीशी याच स्वरूपाची झाली आहे. आणि अमुक एखाद्याच्या वशिल्याने वा अमुक एखाद्याच्या ''सदकयांत'' मुक्ति प्राप्त होण्याच्या कल्पनेने त्यांना अपराधा वर अपराध करण्यास धीट बनविले आहे.

२५८. म्हणजे ही त्यांची आनंदायक श्रद्धा व ह्या स्वरचित गोष्टी आहेत, ईश-ग्रंथाशी या गोष्टींचा काहीहि संबंध नाही आणि धर्मात कोणतीहि श्रद्धा वा गोष्ट आपल्यातर्फे समाविष्ट करणे म्हणजे अल्लाहशी तिच्या मिथ्या संबंध जोडणे होय आणि हे त्या वचनाविरुद्ध होय जे 'तौरात' मध्ये त्यांच्याकडून घेतले गेले होते.

> ''तुझा देव परमेश्वर ह्याचे नाव व्यर्थ घेऊ नको कारण जो परमेश्वराचे नाव व्यर्थ घेईल त्याची तो गय करणार नाही.'' (निर्गम -२०: ७)
>
> ''मी तुम्हाला आज्ञापीत आहे ती प्रत्येक गोष्ट लक्षपूर्वक पाळा, तिच्यात अधिक उणे काही करू नका.'' (अनुवाद-१२:३२)

२५९. अर्थात जेव्हा त्यांनी ईश ग्रंथातील आदेश व मार्गदर्शनास चांगल्या प्रकारे वाचले आहे तर मग ते त्यानुसार आचरण का करीत नाही? काय ईश-ग्रंथ केवळ पठणाकरिता व तोंडपाठ करण्या करीताच आहे? ही यहुदींची दशा होती व आज मुसलमानांची अवस्थाहि काहीशी अशीच आहे. ते कुरानच्या पठणास व तोंडपाठ करण्यासच पुण्यकार्य समजतात आणि आचरणापासून मैलोगणती दूर राहतात.

२६०. म्हणजे जे इहलोका मागे (ऐहीक सुखामागे) धावत नाही किंबहुना आखिरतला आपले ध्येय बनवतात व ऐहिक लाभ प्राप्त करण्यात शरीअतीच्या मर्यादा पाळतात व ईश-भय अंगिकारून जीवन व्यतीत करतात.

२६१. तात्पर्य ईश ग्रंथ समजून घेण्याकरीता व त्यानुसार आचरण करण्याकरिता आहे. केवळ रटण्यासाठी नव्हे.

२६२. येथे ग्रंथ बाळगणाऱ्या त्या समूहाकडे संकेत आहे, जो सार्वजनिक दुराचाराचा परिणाम आत्मसात न करता ईश ग्रंथाचे मन:पूर्वक अनुसरण करीत होता, व लोकांच्या सुधारणेकरिता प्रयत्नशील होता. नंतर जेव्हा त्या लोकांसमोर कुरआनाचे आमंत्रण आले तेव्हा त्यांनी यावर मन: पूर्वक होकर दिला.

२६३. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. ८८मध्ये केले गेले आहे. बायबलमध्ये या घटनेचे वर्णन पुढील प्रमाणे आले आहे:-

> मोशेने लोकांना देवाला भेटण्यासाठी छावणीतून बाहेर आणिले आणि ते पर्वताच्या पायथ्याशी उभे राहिले सर्व सीनाय पर्वतावर धूर पसरला कारण परमेश्वर अग्नीतून त्याच्यावर उतरला भट्टीच्या धुरासांरखा त्याचा धूर वर चढला व सर्व पर्वत थरथरू लागला. (निर्गम- १९ : १७-१८)

तथापि कुरआनाचे स्पष्ट निवेदन असे आहे की पर्वतास त्यांच्यावर उचलले गेले होते, जर भूकंपासह पर्वताचे शिखर त्यांच्या डोक्यावर अंधातरीत केले गेले असले तर त्यात नवल करण्यासारखे काहीच नाही कारण सृष्टी साधनांवर अल्लाहचेच शासन आहे आणि जेव्हा त्याच्या बुद्धिकौशल्याची निकड असते तेव्हा तो असामान्य घटना दृष्टोत्पत्तीस आणतो, ज्यावरून या गोष्टीची खात्री होते की या सृष्टीची व्यवस्था आपोआप चालत आलेली नाही किंबहुना त्यावर एक जबरदस्त सामर्थ्य बाळगणारा शासन करीत आहे व तो जेव्हा इच्छिल तेव्हा या व्यवस्थेत फेरफार वा परिवर्तन करू शकतो. बनी इस्राईल ज्याअर्थी बुद्धि व सामंजस्याच्या दृष्टीने एक अपरिपक्व जनसमूह होता, म्हणून त्यांच्यासमोर अनुभूत निशाण्या वारंवार व्यक्त होत राहिल्या.

१७२. आणि जेव्हा तुमच्या पालन कर्त्याने आदम पुत्रांकडून त्यांच्या पाठीतून त्यांची संतती बाहेर काढून वचन घेतले [२६४] होते व त्यांना स्वत: त्यांच्यावर साक्षी ठेवून विचारले होते की, काय मी तुमचा पालनकर्ता (रब्ब) नव्हे? त्यांनी म्हटले होते की, होय. निश्चितच तू आमचा पालनकर्ता आहेस. (आणि) आम्ही यावर साक्षी आहोत [२६५] (हे वचन आम्ही एवढ्यासाठी घेतले) ज्यायोगे तुम्ही कियामतीच्या दिवशी असे न म्हणावे की आम्ही या (वस्तुस्थिती) बाबत अनभिज्ञ होतो.

وَإِذْ أَخَذَ رَبُّكَ مِنْ بَنِيٓ ءَادَمَ مِنْ ظُهُورِهِمْ ذُرِّيَّتَهُمْ وَأَشْهَدَهُمْ عَلَىٰٓ أَنْفُسِهِمْ أَلَسْتُ بِرَبِّكُمْ ۖ قَالُوا بَلَىٰ ۛ شَهِدْنَآ ۛ أَنْ تَقُولُوا يَوْمَ الْقِيَٰمَةِ إِنَّا كُنَّا عَنْ هَٰذَا غَٰفِلِينَ ﴿١٧٢﴾

१७३. किंवा असे न म्हणावे की शिर्क तर आमच्या पूर्वी आमच्या वाडवडीलांनी केले होते व आम्ही तर त्यांच्या नंतर त्यांच्या वंशापासून झालो तर काय असत्य पूजकांच्या चुकांबद्दल तू आम्हाला नष्ट करशील ?[२६६]

أَوْ تَقُولُوٓا إِنَّمَآ أَشْرَكَ ءَابَآؤُنَا مِنْ قَبْلُ وَكُنَّا ذُرِّيَّةً مِّنْ بَعْدِهِمْ ۖ أَفَتُهْلِكُنَا بِمَا فَعَلَ الْمُبْطِلُونَ ﴿١٧٣﴾

१७४. अशा प्रकारे आम्ही आपल्या आयती उघडरित्या वर्णन करतो [२६७] यासाठी की त्यांनी रुजू करावे.

وَكَذَٰلِكَ نُفَصِّلُ الْءَايَٰتِ وَلَعَلَّهُمْ يَرْجِعُونَ ﴿١٧٤﴾

१७५. आणि यांना त्या व्यक्तिचा वृत्तांत ऐकवा, जिला आम्ही आपल्या आयती प्रदान केल्या होत्या, परंतु तिने हे आवरण उतरविले मग सैतान तिच्यामागे लागला व ती मार्गभ्रष्ट लोकांपैकी झाली. [२६८]

وَاتْلُ عَلَيْهِمْ نَبَأَ الَّذِيٓ ءَاتَيْنَٰهُ ءَايَٰتِنَا فَانْسَلَخَ مِنْهَا فَأَتْبَعَهُ الشَّيْطَٰنُ فَكَانَ مِنَ الْغَاوِينَ ﴿١٧٥﴾

१७६. जर आम्ही इच्छिले असते तर या (आयती) च्या द्वारे तिला अत्युच्च स्थान प्रदान केले असते, [२६९] परंतु ती जमीनीकडेच झुकली [२७०]व आपल्या इच्छा-अभिलाषांच्या मागे लागली म्हणून तिचे उदाहरण कुत्र्यासारखे झाले, की तुम्ही त्याला झिडकाल तरीहि तो जीभ बाहेर काढील व सोडून द्याल तरीदेखील जीभ बाहेर काढील [२७१] हे त्या लोकांचे उदाहरण होय ज्यांनी आमच्या आयतींना खोटे ठरविले. तेव्हा हे वृत्तांत [२७२] लोकांना ऐकवा, यासाठी की त्यांनी विचार-चिंतन करावे [२७३]

وَلَوْ شِئْنَا لَرَفَعْنَٰهُ بِهَا وَلَٰكِنَّهُۥٓ أَخْلَدَ إِلَى الْأَرْضِ وَاتَّبَعَ هَوَىٰهُ ۚ فَمَثَلُهُۥ كَمَثَلِ الْكَلْبِ إِنْ تَحْمِلْ عَلَيْهِ يَلْهَثْ أَوْ تَتْرُكْهُ يَلْهَثْ ۚ ذَّٰلِكَ مَثَلُ الْقَوْمِ الَّذِينَ كَذَّبُوا بِـَٔايَٰتِنَا ۚ فَاقْصُصِ الْقَصَصَ لَعَلَّهُمْ يَتَفَكَّرُونَ ﴿١٧٦﴾

२६४. ही घटना हजरत आदम यांच्या उत्पत्तिनंतर व जगात मनुष्य वंशाचा क्रम सुरू होण्यापूर्वी घडली होती. सर्वश्रेष्ठ अल्लाहने कियामती पावेतो निर्माण होणाऱ्या सर्व मनुष्यांच्या प्राण्यांना एकाच वेळी उपस्थित करून त्यांना सामंजस्य प्रदान केले होते व त्यांच्याकडून ते वचन घेतले होते ज्याचा उल्लेख या आयतीमध्ये आला आहे. हे मानवी प्राण्यांचे सम्मेलन होते, ज्याचा संबंध अदृश्य विश्वाशी आहे. म्हणून आम्ही ना त्याचे स्वरूप समजू शकतो व ना त्याचा तपाशील जाणण्याचे आमच्याजवळ एखादे साधन आहे. यास्तव सलामतीचा मार्ग हाच की क़ुरआनाच्या संक्षिप्त वर्णनावर समाधान मानले जावे.

राहिल्यात इन्कार करणाऱ्यांच्या शंका-कुशंका तर या घटनेत अशी कोणतीहि गोष्ट नाही जी अशक्य वा बुद्धि विरुद्ध असावी; किंबहुना आधुनिक शास्त्रीय संशोधनास लक्षात घेता खात्री वाटते की ही घटना निश्चितच घडून आली असेल.

जीवशस्त्रा (Biology)ने माणसाच्या उत्पत्ति संदर्भात अशा महत्वपूर्ण वस्तुस्थितीचा रहस्य स्फोट केला आहे की माणसाच्या शरीरातून एकाच वेळी जे वीर्य बाहेर पडते त्यात कोट्यावधी शुक्रजंतू (Spermatozoa) असतात, म्हणजे काही थेंबांमध्ये एवढ्या मोठ्या संख्येत मनुष्य निर्माण करण्याची क्षमता असते. मग प्रत्येक शुक्रजंतू (Cell) मध्ये २३ जोडी क्रोमोजम्स (Chromosoms) असतात. हे क्रोमोजम्स आपल्या मुलाकडे त्यांच्याचद्वारे स्थानांतरित होतात. तेव्हा जर एक थेंब पाण्यात एक मानव विश्व सुप्त असते तर संपूर्ण मानव वंशास अस्तित्वात आणणाऱ्या जीव जंतूंचा आदमच्या पाठीत संचय केला जाणे, व त्यांच्यात मूलत: प्रज्ञादेखील असणे का म्हणून शक्य नसावे तसेच या जीव जंतूंना त्यांच्या निर्मात्याने आदमच्या पाठीतून काढून त्यांच्या सुप्त प्रज्ञेला त्यावेळी जागृत केले व त्यांच्याकडून वचन घेतल्यानंतर त्याना पुन्हा आदमच्या पाठीत परतून दिले असावे,यासाठी की या भंडारापासून मानव-वंशाचा हा क्रम आपल्या मूल भूत वैशिष्ट्यांसह चालू रहावा यात बुद्धीच्या विपरीत गोष्ट ती कोणती?

स्पष्ट असावे की मूळ ग्रंथात आदमचे पाठ आणि आदमची संतति हे शब्द वापरले गेले नाहीत किंबहुना

مِنۢ بَنِىٓ اٰدَمَ مِنۡ ظُهُوۡرِهِمۡ ذُرِّيَّتَهُمۡ

बनी आदमपासून त्यांच्या पाठीतून त्यांची संतती हे शब्द वापरले गेले आहेत, कारण एका पाठोपाठ जे वंश जन्मास येणार होते, त्यांचे चित्र समोर यावे, तसेच ज्याअर्थी येथे اَخَذَ ''अख़ज़'' हा शब्द वचन घेण्याच्या अर्थाने वापरला गेला आहे, ते वचन जे आदमच्या सर्व संततिकडून घेतले गेले होते यास्तव

مِنۢ بَنِىٓ اٰدَمَ

(बनी आदमकडून) हे शब्द अनुकूल ठरले. आयतीत काही शब्द संयुक्त आहेत, जर संधीविग्रह केला गेला तर त्यांची रचना अशा प्रकारे होईल.

مِنۢ بَنِىٓ اٰدَمَ ميثاقا واخرج ظهورهم ذريتهم

हजरत आदम यांना त्यांच्या संततीपैकी ज्या श्रेष्ठतम व्यक्तिंची नावे सांगितली गेली होती तर ही देखील मानव जातीच्या ह्या सम्मेलनाच्याच प्रसंगाची गोष्ट आहे. जसे की सूरह बकरा टीप ४४ मध्ये वर्णिले गेले आहे. واللهُ اَعۡلَمُ باسرار كلامه

२६५. हे अल्लाहच्या ईशत्वाचे वचन होते जे मानवी प्राण्यांकडून त्यांना शारीरिक अस्तित्व प्रदान करण्यापूर्वीच घेतले गेले, यासाठी की त्यांच्या विवेक बुद्धीत (Conscience) ही गोष्ट चांगल्या प्रकारे रुजावी की ते आपोआप निर्माण झाले नाहीत व ना स्वत: स्वतंत्र वा मुखत्यार आहेत. किंबहुना त्यांचा एक निर्माता, पालनकर्ता, स्वामी व शासक आहे व तो म्हणजे 'अल्लाह' या वस्तुस्थितीस मान्य करण्याचा अर्थ खचितच हा होता की त्यांनी आपण अल्लाहचे दास, त्यांचे उपासक व त्याच्या हुकुमाअधीन असल्याचे मान्य केले होते.

आता या वचनाचा भंग मनुष्य असे म्हणून करू शकत नाही की वचन कोणत्या वेळी घेतले गेले व कोठे घेतले गेले मला काहीच आठवत नाही. खरे पाहता जगात त्यांची कसोटी अपेक्षित आहे म्हणून जेथपर्यंत या वचनाच्या बाह्य पैलूंचा संबंध आहे म्हणजे स्थळ काळ इत्यादि तर याचे स्मरण वेदनाशक्तिने मिटविले गेले आहे आणि असे घडले नसते तर मानवाच्या कसोटीचे उद्दिष्ट फलद्रुप झाले नसते. परंतु हा पैलू मनुष्य स्वभावात रुजविला गेला यास्तव प्रत्येक मनुष्य आपल्या निर्मात्यास स्वभावत: ओळखतो. त्याचे अंतर्ज्ञान तो उच्च व एकमेव असण्यासंबंधी साक्ष देते व त्याचा विवेक त्याच्या अवज्ञे (दुष्कृत्या) बाबत त्याला टोकतो. तात्पर्य हे स्वाभाविक वचन होय जे हृदय-पटलावर कोरलेले आहे. म्हणून हे म्हणणे उचित नव्हे की मनुष्य या वचनापासून अगदी अनभिज्ञ आहे.

काय एखादा मनुष्य हे सांगू शकतो की जेव्हा तो अगदी अजाण बालक होता तेव्हा त्याला बोलायला कोणी शिकवले? उघड आहे, याचे स्मरण कोणालाच नाही परन्तु मनुष्य या वस्तुस्थितीचा इन्कार करू शकत नाही त्याचे माता-पिता, स्नेही संबंधी किंवा त्याचे पालन पोषण करणाऱ्यांमध्ये खचितच कोणी असा होता, ज्याने त्याला प्राथमिक स्वरूपात वस्तूंची नावे शिकविलीत शब्दांचा एक एक उच्चार शिकविला व यानंतर तो बोलण्यास योग्य झाला. त्याच्या स्मरणातून ही मन:स्थिती पूसली जाते परंतु त्याचे बोलू लागणे हाच या गोष्टीचा पुरावा होय की बालपणी कोणी ना कोणी त्याला

बोलायला जरूर शिकविले. मग काय आपल्या निर्मात्या व स्वामीविषयी, मनुष्य स्वभावाचा स्वर मग तो कितीही दबलेला का असेना या गोष्टीचे प्रमाण नव्हे की त्याला आपल्या निर्मात्याच्या ज्ञानाचा पहिला धडा त्याचे जगात येण्यापूर्वीच शिकविला गेला आहे. या वस्तुस्थितीस पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अशा प्रकारे वर्णिले आहे.

مَا مِنْ مَوْلُوْدٍ اِلَّا يَلِدُ عَلَى الْفِطْرَةِ فَاَبَوَاهُ يُهَوِّدَانِهِ

وَيُنَصِّرَانِهِ وَيُشَرِّكَانِهِ۔ (مسلم کتاب القدر)

''प्रत्येक मूल स्वभावावर (म्हणजे एकेश्वरवादावर) जन्मास येते. मग त्याचे आई-वडील त्याला यहुदी, ख़िश्चन किंवा अनेकेश्वरवादी बनवितात.'' (मुस्लिम किताबुल कद्र)

आणि याच पाठाची आठवण पैगंबर लोकांना देत राहिले. म्हणून त्यांच्या शिकवणीला तज़्कीर म्हणजे आठवण करून देणारी गोष्ट असे म्हटले गेले आहे.

२६६.या आयतीवरून स्पष्ट होते की प्रत्येक मनुष्य एकेश्वरवादाबाबत जबाबदार आहे, आणि कियामतीच्या दिवशी त्यास ईश्वरासमक्ष आपल्या वर्तनाविषयी जाब द्यावा लागेल. मग पैगंबरांचे तपशीलवार आमंत्रण त्याच्यापर्यंत पोहचले असो किंवा नसो. स्वभाव वचन आपल्या परीने पुरावा आणि एकेश्वरवादाच्या मूलभूत श्रद्धेचा जेथपावेतो संबंधच होय, जे त्याच्यावर साबीत होते कोणत्याही मनुष्याला कियामतीच्या दिवशी ही सबब पुढे करण्याची संधी उरणार नाही की तो या बाबतीत अगदी अनभिज्ञ होता; म्हणून त्याने कुफ्र नितीचा मार्ग अंगिकारला, किंवा तो अनेकेश्वरवादात एवढ्याकरीता गुरफटून राहिला की त्याला आपल्या वाड वडीलांपासून अनेकेश्वरवादी धर्म किंवा अनेकेश्वरवादी संस्कृति वारसा रूपाने लाभली होती. नाहीतर शिर्क (अनेकेश्वरवादा)ला स्वत:हून कबूल करण्याचा निर्णय त्याने घेतला नसता.

२६७. येथे संकेत या गोष्टीकडे आहे की स्वभाव वचन एकेश्वरवादाचे चिन्ह आहे, जे माणसाच्या अंगी उपजत आहे आणि कुरआनाने अन्य चिन्हांप्रमाणे याचेहि उघडरित्या वर्णन केले आहे.

२६८. अभिप्रेत अमुक एक व्यक्ति नव्हे तर असा प्रत्येक मनुष्य ज्याला ही आयत लागू पडेल. विशेषत: आयतीचा संकेत बनी इस्राईलच्या विद्वानांकडे आहे ज्यांचा वृत्तांत वर आला आहे.

आयती प्रदान केल्या होत्या म्हणजे ईशग्रंथ व त्याचे ज्ञान प्रदान केले होते परंतु हे विद्वान देखील सैतानाचे अनुयायी बनले.

२६९. अल्लाहच्या आयती ईमान बाळगणाऱ्यांना उच्चता प्रदान करतात, मात्र या अटीवर की त्यांनी त्यानुसार आचरण करावे. कुरआना बाबत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले की:

اِنَّ اللهَ يَرْفَعُ بِهٰذَا الْكِتَابِ اَقْوَاماً وَيَضَعُ بِهٖ

اٰخَرِيْنَ۔ (مسلم کتاب فضائل القرآن)

''अल्लाह या ग्रंथाद्वारे कित्येक जाती समूहांना उच्चता प्रदान करील व कित्येकांना अधोगतित टाकील.'' (मुस्लिम, किताब फजाईलुल क़ुरआन)

२७०. म्हणजे तो चारित्र्य आणि आचरण दृष्ट्या अधोगति कडे झुकला आणि अल्लाहची ही रीत नाही की जो अधोगति कडे जाऊ इच्छिल त्याला जबरदस्तीने उच्चतेकडे न्यावे.

२७१. कुत्रा सर्वात जास्त अधाशी प्राणी होय. तो जमीनीवर वास घेत चालतो की एखादे हाड मिळावे. तसेच तो नेहमी धापा टाकीत व जीभ बाहेर काढून चालतो मग त्याला कोणी झिडकारून द्यावे वा त्याच्या दशेवर सोडावे. तद्वतच इहलोकीय लाभांकरिता अल्लाहच्या आयतींपासून दूर पळणारे लोक जगाची कुत्री होत. त्यांची इहलोक लालसा कधीहि संपत नाही ते नेहमी धापा टाकीत व जीभ लोंबकाळीत राहतात. यांच्या ऐहिक भक्तिबद्दल तुम्ही त्यांना ताकीद व निंदा करा किंवा करू नका ते कोणत्याही उपदेशास ग्रहण करणारे नाहीत.

२७२. अभिप्रेत जन-समूहांचे वृत्तांत जे या सूरह मध्ये वर्णिले गेले आहेत. या वृत्तांताना आमंत्रण व सुधारणा हेतु लक्षात घेता ऐकविण्याची आज्ञा केली गेली आहे. परंतु आज मुसलमानांची दशा अशी आहे की या खुऱ्या खुऱ्या कुरआन-कथा ऐकण्या-ऐकविण्याचा प्रयत्न फार थोडा केला जातो, उलट पथभ्रष्ट विद्वान निराधार कथनांचा आधार घेऊन विचित्र किस्से वर्णन करतात आणि लोक मन लावून ऐकतात. या विद्वानांना कोणी हा प्रश्न करावा की त्याना कोणते कार्य पार पाडावयाचे होते व ते कोणते कार्य करीत आहेत?

२७३. म्हणजे जे लोक वृत्तांतावर विचार चिंतन करतात ते त्यापासून बोधहि घेतात. अशा लोकांना मागील समूहांच्या वृत्तांताद्वारे सचेत करणे लाभप्रद ठरेल.

कुरआनतले वृत्तांत केवळ कथा ऐकविण्याच्या उद्देशाने नाहीत किंबहुना बोधा:-प्राप्ति व विचार चिंतना करिता आहेत. कुरआनाचा अर्थ लक्षात घेऊन पठण केल्यावरच हा लाभ घडेल. अर्थ लक्षात न घेता कुरआन पठन केल्यास हा लाभ कसा घडेल?

**मोठे वाईट उदाहरण आहे त्या लोकांचे ज्यांनी आमच्या आयतींना खोटे ठरविले व स्वतः आपल्यावरच अत्याचार करीत राहीले. ज्याला अल्लाह मार्गदर्शन करील तोच सन्मार्ग प्राप्त झालेला होय; व ज्याला मार्गभ्रष्ट करील तर हे असेच लोक होत जे विफल मनोरथ झाले. *(अल-क़ुरआन)***

سَآءَ مَثَلًا الْقَوْمُ الَّذِيْنَ كَذَّبُوْا بِاٰيٰتِنَا وَاَنْفُسَهُمْ كَانُوْا يَظْلِمُوْنَ ﴿١٧٧﴾

**१७७.** मोठे वाईट उदाहरण आहे त्या लोकांचे ज्यांनी आमच्या आयतींना खोटे ठरविले व स्वत: आपल्यावरच अत्याचार करीत राहीले.

مَنْ يَّهْدِ اللّٰهُ فَهُوَ الْمُهْتَدِيْ ۚ وَمَنْ يُّضْلِلْ فَاُولٰٓئِكَ هُمُ الْخٰسِرُوْنَ ﴿١٧٨﴾

**१७८.** ज्याला अल्लाह मार्गदर्शन करील तोच सन्मार्ग प्राप्त झालेला होय; व ज्याला मार्गभ्रष्ट करील तर हे असेच लोक होत जे विफल मनोरथ झाले.

وَلَقَدْ ذَرَاْنَا لِجَهَنَّمَ كَثِيْرًا مِّنَ الْجِنِّ وَالْاِنْسِ ۖ لَهُمْ قُلُوْبٌ لَّا يَفْقَهُوْنَ بِهَا ۡ وَلَهُمْ اَعْيُنٌ لَّا يُبْصِرُوْنَ بِهَا ۡ وَلَهُمْ اٰذَانٌ لَّا يَسْمَعُوْنَ بِهَا ۭ اُولٰٓئِكَ كَالْاَنْعَامِ بَلْ هُمْ اَضَلُّ ۭ اُولٰٓئِكَ هُمُ الْغٰفِلُوْنَ ﴿١٧٩﴾

**१७९.** आणि आम्ही बहुतेक जिन्नांना व मनुष्यांना जहन्नम करीताच निर्माण केले आहे [२७४] यांच्या जवळ हृदये आहेत परंतु त्याद्वारे ते समजून घेण्याचे काम करीत नाहीत.[२७५] त्यांच्याजवळ डोळे आहेत परंतु त्याद्वारे पाहण्याचे काम करीत नाही, त्यांच्याजवळ कान आहेत पण त्याद्वारे ते ऐकण्याचे काम करीत नाही. ते जनावरांसारखे आहेत. किंबहुना त्यांच्याहूनहि अधिक भटकलेले [२७६] हेच लोक होत जे असावध स्थितीत पडलेले आहेत.[२७७]

وَلِلّٰهِ الْاَسْمَآءُ الْحُسْنٰى فَادْعُوْهُ بِهَا ۠ وَذَرُوا الَّذِيْنَ يُلْحِدُوْنَ فِيْٓ اَسْمَآئِهٖ ۭ سَيُجْزَوْنَ مَا كَانُوْا يَعْمَلُوْنَ ﴿١٨٠﴾

**१८०.** आणि अल्लाह करीता तर चांगली नावे आहेत.[२७८] यास्तव त्याला त्याच नावांनी पुकारा [२७९] आणि त्या लोकांना सोडून द्या जे त्याच्या नावा बाबत वाकडेपणा अंगिकारतात.[२८०] ते जे काही करीत आहेत त्याचा मोबदला त्याना अवश्य मिळेल.

وَمِمَّنْ خَلَقْنَآ اُمَّةٌ يَّهْدُوْنَ بِالْحَقِّ وَبِهٖ يَعْدِلُوْنَ ﴿١٨١﴾

**१८१.** आणि आमच्या निर्मितीत एक समूह असाहि आहे जो सत्यानुरूप मार्गदर्शन करतो व त्यानुसारच निर्णय करतो.

وَالَّذِيْنَ كَذَّبُوْا بِاٰيٰتِنَا سَنَسْتَدْرِجُهُمْ مِّنْ حَيْثُ لَا يَعْلَمُوْنَ ﴿١٨٢﴾

**१८२.** आणि ज्या लोकांनी आमच्या आयतींना खोटे ठरविले आहे त्याना आम्ही हळूहळू अशा दुष्परिणितीकडे नेत आहोत की त्यांना याची खबर देखील नाही.[२८२]

وَاُمْلِيْ لَهُمْ ۭ اِنَّ كَيْدِيْ مَتِيْنٌ ﴿١٨٣﴾

**१८३.** मी त्यांना सैल सोडत आहे, कारण माझी युक्ति मोठी मजबूत आहे.

२७४. याचा हा अर्थ नव्हे की बहुतेक जिन्न व मनुष्यांना अल्लाहने विचार करण्याची, समजून घेण्याची गुणवत्ता प्रदान केलीच नव्हती, व त्यांना मार्गदर्शन व मार्गभ्रष्टतेच्या मार्गांपैकी आपल्या आवडीनुसार मार्ग अंगिकारण्याचे स्वातंत्र्य लाभले नव्हते. व त्यांना सक्तिने मार्गभ्रष्टनेच्या मार्गावर चालवून जहन्नम मध्ये पोहचविले गेले; किंबहुना अर्थ असा की जेव्हा त्यांनी आपली बौद्धिक गुणवत्ता वाया घालवली व मार्गभ्रष्टतेला पसंत करून त्याच मार्गावर चालू लागले तर परिणामी अनंत शिक्षेची गोडी चाखण्यासाठी जहन्नम मध्ये पोहचले. या प्रकारे त्यांचे ध्येय-स्थान जहन्नम ठरले. हीच गोष्ट दुसऱ्या शब्दात सांगायची म्हणजे एखाद्या शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यास, जो अभ्यासात आळस केल्याने नापास झाला, म्हणावे की मी तुला याकरिता शिकविले की तू नापास व्हावे. अर्थात शिक्षकाच्या म्हणण्याचा असा अर्थ कदापि होऊ शकत नाही की त्याने आपल्या शिष्यास असफल व्हावे या हेतुने शिकविले होते; किंबहुना हे त्याचे राग व्यक्त करणे होय की मी तुला एवढ्यासाठी शिकविले की तू सफल व्हावे. परंतु तू परिश्रम केले नाहीस व अयशस्वी झाला म्हणून माझ्या शिकविण्याचा तुला काही एक फायदा झाला नाही. या आयतीत जी गोष्ट सांगितली गेली आहे ती परिणितीच्या दृष्टीकोनातून सांगितली गेली, मार्गभ्रष्टतेकडे बलपूर्वक लोटण्याच्या अर्थाने नव्हे.

२७५.येथे हृदयाशी अभिप्रेत बुद्धि होय. अरबी भाषेत हृदयाला बुद्धिच्या अर्थाने घेतले जाते. म्हणून अरबीचा सर्वात मोठा शब्दकोश लिसानुल् अरब मध्ये

"وقديعبر بالقلب عن العقل۔"

(لسان العرب ج ١ص ٦٨٧)

''म्हणजे कधी कधी हृदयाला बुद्धिच्या अर्थाने वापरले जाते.'' (लिसानुल् अरब-खंड १ पृष्ठ ६८७)

२७६. जेथपावेतो शारीरिक डोळे, कान व हृदयाचा संबंध आहे ते मनुष्य आणि पशू या दोघांजवळ असतात. परंतु जी दृष्टी, श्रवणशक्ति व आकलनशक्ति माणसाला प्रदान केली गेली आहे ती जनावरला नव्हे. दोघांमध्ये हा मोठा वैशिष्टपूर्ण फरक आहे व यामुळेच मनुष्य सर्व प्राणीमात्रात श्रेष्ठ गणला जातो. परंतु जे लोक या शक्तिचा उपयोग करीत नाहीत ते स्वत:ला जनावरांच्या रांगेत बसवितात, किंबहुना त्याहूनहि खालच्या पातळीवर पोहचतात कारण जनावरामध्ये ही गुणवत्ता व सामर्थ्य नाही परंतु मनुष्याला ही सामर्थ्य प्राप्त असतानाहि त्याने त्यांचा योग्य वापर केला नाही, व स्वत:ला अधोगतिकडे ढकलले. जेव्हा जनावर जेथे होते तेथेच राहीले.

२७७. म्हणजे यांना कसला गंधहि नाही की त्यांना इहलोकात कोणी पाठविले आहे व कोठे जावयाचे आहे. आपले अस्तित्व व जीवन-उद्दिष्टाबाबत मोठमोठ्या प्रकांड बुद्धिवंतांची ही अपराधात्मक गफलत किती आश्चर्यजनक आहे!

२७८. म्हणजे अल्लाह करीता अशी नावे आहेत जे आपल्या अर्थांच्या दृष्टीने उत्कृष्ट व उच्चतम आहेत जी त्याच्या पवित्र असण्याविषयी, त्याच्या श्रेष्ठत्वा विषयी व महानतेविषयी प्रमाण प्रस्थापित करतात. कुरआनात 'अल्लाह' हा शब्द त्याचे विशेष नाम होय. तर :

الرحمن، الرحيم، الخالق، الملک،

الرزاق، العزيز، العليم،

''अर् रहमान, अर् रहीम, अल् खालीक़, अल् मलिक, अर् रज़्ज़ाक, अल् अज़ीज़, अल् अलीम'' इ. नावे त्याची गुणविशेषणे या रूपाने आली आहेत या नामांमध्ये ही गुणवत्ता परिपूर्णत: अस्तित्वात आहे.

२७९. दुसऱ्या शब्दात त्याला अशा नावांनी पुकारू नका ज्यामुळे वरून त्यच्या स्वत्वात किंवा त्याच्या गुणवैशिष्ट्यांमध्ये वैगुण्या विषयीचा पैलू निघत असेल किंवा अशी नावे जी अनादरणीय असावीत. अरबी भाषेत अल्लाहला पुकारण्या करिता तर कुरआनातील शुभनामे पुरेशी आहेत. राहिला अन्य भाषेचा प्रश्न तर अल्लाह करिता नावाच्या निवडीत या मूलभूत आज्ञेस चांगल्याप्रकारे ध्यानी ठेवले पाहिजे जी या आयतीत दिली गेली आहे. या बाबतीत सावधगिरी पाळणे फार अगत्याचे आहे. अन्यथा अनेकेश्वर वादाचा मार्ग खुलण्याची शक्यता आहे.

२८०.अल्लाहच्या नावांमध्ये वक्रता अंगिकारण्याचे विभिन्न प्रकार असू शकतात. एक असा की अल्लाहकरिता असे नाम वा गुणधर्म योजणे ज्यात आत्मा आणि वैगुण्याचा पैलू असावा तसेच अशी नावे जी ईश्वराला 'निर्मिती'वर कयास करून जावीत. याचीही गणना याच प्रकारात आहे. उदाहरणार्थ ईश्वराला पिता' (Father) संबोधणे.

दुसरा प्रकार असा की ईश्वराच्या गुणवैशिष्ट्यांना वेगवेगळी अस्तित्वे मानून प्रत्येक गुणवैशिष्ट्यास देवी किंवा देवतेचे रूप देणे व तदनुसार त्याची नावे योजणे. भारतातील अनेकेश्वर वाद्यांना हीच ठेच लागली आहे. यास्तव ईश्वराच्या प्रत्येक गुणवैशिष्ट्याला एखाद्या देवी अन्यथा देवतेच रूप मानले आहे. येथपावेतो की ईश्वराच्या ज्ञान-वैशिष्ट्यास त्यांनी ज्ञानदेवता ठरवून तिचे सरस्वती' (Goddess of Knowledge) हे नाव ठेवले:

तद्वतच त्यांनी अल्लाहच्या 'पालकत्व' गुणधर्मास एक

वेगळा देव ठरवून त्याचे नाव 'विष्णू' असे ठेवले आहे. तसेच अल्लाहच्या 'शिक्षा देण्याच्या' वैशिष्ट्यास एक देवता मानून त्याचे नाव 'शिव' असे ठेवले आहे त्याचप्रमाणे अल्लाहच्या 'अन्नदाता' या वैशिष्ट्यांस विभिन्न दैवतांमध्ये विभागून संपत्तिची एक देवी मानली आहे व तिचे नाव 'लक्ष्मी' (The goddess of Wealth) असे ठेवले आहे. तिसरा प्रकार हा की ईश्वराच्या एकत्वास विभाजीत करून त्यासंबंधी असा तात्त्विक खुलासा करणे की ज्यायोगे अनेक ईश्वरांच्या कल्पनेस वाव मिळावा. उदा. एकात तीनची श्रद्धा (त्रिमूर्ति) किंवा अनेकेश्वर वाद्यांचा हा खुलासा की ते अंगणित ईश्वरांची उपासना करीत असले तरी खरे पाहता एकाच ईश्वराची उपासना करीत आहेत! अल्लाहच्या नाम व गुणवैशिष्ट्यांविषयी या प्रकारच्या तात्त्विक विवादात गुरफटणे निरर्थक होय.

ईश्वराची ओळख साध्य करून घेण्याचा खरा मार्ग तोच होय जो कुरआनाने दाखविला आहे. म्हणजे वेड्या वाकड्या विवादास टाळून सरळ साधेपणाने अल्लाहच्या गुण वैशिष्ट्यांना मानणे. या गुणवैशिष्ट्यांचे वर्णन कुरआनने स्पष्टीकरणासह दिले आहे. त्यासोबत ही ताकीद केली आहे की अल्लाहच्या नावांबाबत त्या लोकांशी वाद न घालावा ज्यांनी विमुख होण्याचा मार्ग अंगिकारला आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे ज्यांनी तत्त्वज्ञानीय विवाद निर्माण केले, अशा लोकांशी वाद घालण्याची गरज नाही कारण ईश्वराच्या गुणवैशिष्ट्या बाबतची तत्त्वज्ञानीय चर्चा मार्गभ्रष्टतेचे द्वारे उघडते.

२८१. म्हणजे ईश्वराच्या सृष्टीत सर्वच लोक मार्गभ्रष्टता पसरविणारे नाहीत किंबहुना काही असेहि आढळून येतात जे लोकांना योग्य मार्गदर्शन करतात आणि न्यायासंबंधीच्या गरजा भागवितात.

२८२. म्हणजे ते या भ्रमात आहेत की आमच्याकरिता मंगलताच मंगलता आहे. आम्ही अगदी मजेत आहोत परंतु खरे पाहता सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांना शिक्षेकडे लोटत आहे.

**काय या लोकांनी नीट विचार केला नाही की यांच्या साथीदाराला वेड लागले नाही. तो तर उघडरित्या खबरदार करणारा आहे. काय ह्या लोकांनी आकाशांच्या व जमीनीच्या शासन व्यवस्थेवर व त्या वस्तूंवर ज्या अल्लाहने निर्माण केल्या आहेत चिंतन केले नाही व हा विचार केला नाही की त्यांचा निर्धारीत समय जवळ येऊन ठेपला आहे. मग त्यानंतर ते आणखी कोणत्या गोष्टीवर ईमान बाळगतील ?** *(अल-क़ुरआन)*

**१८४. काय या लोकांनी नीट विचार केला नाही की यांच्या साथीदाराला वेड लागले नाही. [२८३] तो तर उघडरित्या खबरदार करणारा आहे.**

أَوَلَمْ يَتَفَكَّرُوا مَا بِصَاحِبِهِم مِّن جِنَّةٍ إِنْ هُوَ إِلَّا نَذِيرٌ
مُّبِينٌ ﴿١٨٤﴾

**१८५. काय ह्या लोकांनी आकाशांच्या व जमीनीच्या शासन व्यवस्थेवर व त्या वस्तूंवर ज्या अल्लाहने निर्माण केल्या आहेत चिंतन केले नाही व हा विचार केला नाही की त्यांचा निर्धारीत समय [२८४]जवळ येऊन ठेपला आहे. मग त्यानंतर ते आणखी कोणत्या गोष्टीवर ईमान बाळगतील ?[२८५]**

أَوَلَمْ يَنظُرُوا فِي مَلَكُوتِ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ وَمَا خَلَقَ اللَّهُ مِن
شَيْءٍ وَأَنْ عَسَىٰ أَن يَكُونَ قَدِ اقْتَرَبَ أَجَلُهُمْ فَبِأَيِّ حَدِيثٍ
بَعْدَهُ يُؤْمِنُونَ ﴿١٨٥﴾

**१८६. ज्याला अल्लाह मार्गभ्रष्ट करील. त्यास मार्गदर्शन करणारा कोणी नाही. तो त्यांना स्वैर सोडतो की जेणेकरून आपल्या बंडखोरीत त्यानी भटकत रहावे.**

مَن يُضْلِلِ اللَّهُ فَلَا هَادِيَ لَهُ
وَيَذَرُهُمْ فِي طُغْيَانِهِمْ يَعْمَهُونَ ﴿١٨٦﴾

**१८७. ते तुम्हाला त्या वेळे (कियामती) विषयी विचारतात की ती केव्हा येईल? सांगा याचे ज्ञान तर माझ्या पालन कर्त्यालाच आहे. तोच तिला तिच्या वेळेवर प्रकट करील. आकाश व जमीनीत ती ओझे बनली आहे, [२८६] ती तुमच्यावर आकस्मात येईल [२८७] तुम्हाला ते अशा प्रकारे विचारतात की जणू तिची वेळ तुम्हाला ठाऊक आहे. [२८८] सांगा याचे ज्ञान फक्त अल्लाहलाच आहे परंतु अधिकांश लोक जाणत नाहीत. [२८९]**

يَسْأَلُونَكَ عَنِ السَّاعَةِ أَيَّانَ مُرْسَاهَا قُلْ إِنَّمَا عِلْمُهَا عِندَ
رَبِّي لَا يُجَلِّيهَا لِوَقْتِهَا إِلَّا هُوَ ثَقُلَتْ فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ لَا تَأْتِيكُمْ
إِلَّا بَغْتَةً يَسْأَلُونَكَ كَأَنَّكَ حَفِيٌّ عَنْهَا قُلْ إِنَّمَا عِلْمُهَا عِندَ اللَّهِ
وَلَٰكِنَّ أَكْثَرَ النَّاسِ لَا يَعْلَمُونَ ﴿١٨٧﴾

**१८८. सांगा मी आपल्या स्वत:करिता एखाद्या लाभाचा अथवा हानीचा अधिकार बाळगत नाही. [२९०] घडते तेच जे अल्लाह इच्छितो. जर मला अपरोक्षाचे ज्ञान असते तर अनेक लाभ प्राप्त केले असते व मला एखादे नुकसान पोहचले नसते. [२९१] मी तर केवळ खबरदार करणारा व खुशखबरी देणारा आहे त्या लोकांकरिता ज्यांनी ईमान बाळगले आहे.**

قُل لَّا أَمْلِكُ لِنَفْسِي نَفْعًا وَلَا ضَرًّا إِلَّا مَا شَاءَ اللَّهُ وَلَوْ
كُنتُ أَعْلَمُ الْغَيْبَ لَاسْتَكْثَرْتُ مِنَ الْخَيْرِ وَمَا مَسَّنِيَ
السُّوءُ إِنْ أَنَا إِلَّا نَذِيرٌ وَبَشِيرٌ لِّقَوْمٍ يُؤْمِنُونَ ﴿١٨٨﴾

२८३. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह तकवीर टीप २५.

२८४. म्हणजे मरणाची वेळ.

२८५. म्हणजे ह्या स्पष्ट प्रमाण व परिपूर्ण तंबी नंतरहि जर ते कुरआनावर ईमान बाळगत नाही तर याहून अधिक सप्रमाण व सचेत करणारी शिकवण आणखी कोणती असू शकते, की जिच्यावर ते ईमान बाळगतील?

२८६. ज्याप्रकारे गर्भवती गर्भाने अवजड होते व कोणत्या वेळी ती प्रसुति होईल हे सांगता येत नाही याच प्रकारे आकाश व जमीन क़ियामतीच्या ओझ्याने भारदस्त झाले आहेत व यांच्या गर्भातून केव्हा कियामत प्रकट होईल हे सांगितले जाऊ शकत नाही.

यावरून स्पष्ट झाले की क़ियामत बाहेरून येणारी गोष्ट नव्हे किंबहुना सृष्टीच्या अंतरंगातूनच उदयोन्मुख होणारी गोष्ट आहे. तिचा लाव्हा आतल्या आत शिजत आहे व लवकरच तो फुटून जबरदस्त घटनेचे स्वरूप धारण करणार आहे. जमीन अत्याचार पिडीतांच्या रक्ताने माखली आहे व आकाश त्यांच्या चित्कारांनी व्यापले आहे. सत्य-असत्याची ओढाताण जी हजारो वर्षांपासून चालत आली आहे ती न्यायाची ओरड करीत आहे. तिचे हे ओरडणे असा प्रत्येक मनुष्य ऐकत आहे जो अपरोक्षाच्या वस्तुस्थितीवर विश्वास बाळगतो. त्याला जमीनीवरून उंच उठणारी ही ओरडहि ऐकू येते की या सृष्टीचा स्वामी, आपले न्यायासन जमीनीवर लवकरच स्थापित करणार आहे. तसेच आकाशातून प्रक्षेपित केला जाणारा हा संदेशहि ऐकू येतो की न्यायाचे संतुलन क़ायम होण्याच्या बेतात आहे.

२८७. क़ियामतीची चिन्हे तर दिवसेंदिवस जाहीर होतच आहेत. पण तिचा निर्धारीत वेळ अल्लाहच्या शिवाय इतर कोणालाही ठाऊक नाही. ती तर अकस्मात येऊन ठेपेल. जेव्हा मनुष्य तिच्याबाबत अगदी गाफील असेल. हदीस मध्ये यासंबंधीचे चित्र अशा प्रकारे रेखाटले गेले आहे:-

وَلَتَقُوْمَنَّ السَّاعَةُ وَقَدْ نَشَرَ الرَّجُلَانِ ثَوْبَهُمَا بَيْنَهُمَا فَلَا يَتَبَا يِعَانِهِ
وَلَا يَطْوِيَانِهِ وَلَتَقُوْمَنَّ السَّاعَةُ وَقَدْ انصَرَفَ الرَّجُلُ بِلَبْنِ لَقِحَتِهِ
فَلَا يَطْعَمُهُ وَلَتَقُوْمَنَّ السَّاعَةُ وَهُوَ يَلِيطُ حَوْضَهُ فَلَا يَسْقِى فِيهِ ،
وَلَتَقُوْمَنَّ السَّاعَةُ وَقَدْ رَفَعَ اَحَدُكُمْ اَكَلَتَهُ اِلٰى فِيهِ فَلَا يَطْعَمُهَا ـ

(بخاری کتاب الرقاق)

''क़ियामत या स्थितीत क़ायम होईल की दोन माणसांच्या दरम्यान खरेदी-विक्रीचा व्यवहार चालला असेल. ज्याकरिता कापड उलगडत असतील आणि हा व्यवहार अजून पूर्णहि झाला नसेल व ना ते कपड्यास लपेटून घेऊ शकतील की क़ियामत क़ायम होईल. एक मनुष्य आपल्या सांडणीचे दूध घेऊन परत येत असेल तो अजून पोहचू शकला नसेल की क़ियामत क़ायम होईल. एक मनुष्य आपल्या हौदाची दुरुस्ती करीत असेल व अजून पाणी भरूहि शकला नसेल की कियामत कायम होईल आणि एखाद्या मनुष्याची ही दशा असेल की तो आपला घास तोंडात टाकत असेल, तो खाऊहि शकला नसेल की (तेवढ्यात) क़ियामत क़ायम होईल.

(अल बुखारी- किताबुर-रिकाक)

२८८. ही आयत स्पष्ट करते की कियामतीची निश्चित वेळ पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना देखील माहित नाही. हदीसमध्ये त्यांनी क़ियामतीच्या संदर्भात जे काही निवेदन फर्माविले आहे ती क़ियामतीची लक्षणे होत. निश्चित वेळ नव्हे.

२८९. म्हणजे या गोष्टीस जाणत नाही की कियामतीची वेळ अशा बाबींपैकी आहे जिचे ज्ञान केवळ अल्लाहला आहे व त्याच्या हिकमतीची ही निकड आहे की तिचा निश्चित वेळ कोणावरही जाहीर न केला जावा. ही गोष्ट न समजल्यामुळे लोक या प्रश्नाची पुनरावृत्ति करीत राहतात की क़ियामत केव्हा येईल?

२९०. पैगंबर आपल्या स्वत:साठी लाभ-हानीचा अधिकार बाळगत नाही तेव्हा इतरांना कोणता लाभ-हानी पोहचवू शकतात आणि जेव्हा ही गोष्ट पैगंबराच्या अधिकार-क्षेत्रात नाही तर अवलीयाच्या अधिकारात कशा प्रकारे असू शकते म्हणून गरज-निवारणाकरिता एखाद्या पैगंबराला पुकारणे ''एक निरर्थक गोष्टी'' शिवाय आणखी काही नाही. यांना पुकारल्याने गरज पूर्तता तर दूर राहिली, मात्र पुकारणारा 'शिर्क' सारखे अपराधाला बळी पडतो.

२९१. ही वस्तुस्थिती आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना स्वत:ला अगणित नुकसान पोहचत राहिले. जर त्यांना अपरोक्षाचे ज्ञान असते तर त्यांनी आधीच जाणून घेतले असते की अमुक एका गोष्टीपासून हानी पोहचणार आहे व या आधारे भावी आपत्तिपासून स्वत:चा बचाव करण्याचा त्यांनी प्रयत्न केला असता परंतु ''असे नसणे'' हे या गोष्टीचे प्रमाण आहे की त्यांना अपरोक्षाचे ज्ञान नव्हते, तथापि जेथपावेतो प्रेषितत्व-कर्तव्य पार पाडण्याचा संबंध आहे सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्यावर अपरोक्षाच्या त्या गोष्टी खचितच उघड केल्या होत्या ज्या सर्वसामान्य माणसांवर उघड केल्या जात नाही. तात्पर्य कियामतीची निश्चित वेळ सांगणे, प्रेषितत्व-कर्तव्यात नाही. यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाहने याचे ज्ञान त्यांना म्हणजे पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना प्रदान केले नाही.

१८९. तोच होय ज्याने तुम्हाला एका जीवापासून निमार्ण केले व त्यापासून त्याचा जोडीदार बनविला [१९२] यासाठी की त्याने त्यापासून समाधान प्राप्त करावे. मग जेव्हा तो तिला झाकून टाकतो [१९३] तेव्हा तिला हलकासा गर्भ राहतो ज्याला घेऊन ती फिरते मग जेव्हा अवजड होते तेव्हा दोघे अल्लाहशी जो त्यांचा पालनकर्ता आहे प्रार्थना करतात की जर तू आम्हाला भली चांगली संतती प्रदान केली तर आम्ही तुझे आभारी राहू.

هُوَ الَّذِي خَلَقَكُم مِّن نَّفْسٍ وَاحِدَةٍ وَجَعَلَ مِنْهَا زَوْجَهَا لِيَسْكُنَ إِلَيْهَا ۖ فَلَمَّا تَغَشَّاهَا حَمَلَتْ حَمْلًا خَفِيفًا فَمَرَّتْ بِهِ ۖ فَلَمَّا أَثْقَلَت دَّعَوَا اللَّهَ رَبَّهُمَا لَئِنْ آتَيْتَنَا صَالِحًا لَّنَكُونَنَّ مِنَ الشَّاكِرِينَ ﴿١٨٩﴾

१९०. मग जेव्हा अल्लाह त्यांना भली चांगली संतती प्रदान करतो तेव्हा त्याच्या अनुग्रहात ते इतरांना त्याचा (अल्लाहचा) सहभागी ठरवू लागतात [१९४] अल्लाह उच्चतम आहे त्यांच्या त्या अनेकेश्वरवादी गोष्टीहून.

فَلَمَّا آتَاهُمَا صَالِحًا جَعَلَا لَهُ شُرَكَاءَ فِيمَا آتَاهُمَا ۚ فَتَعَالَى اللَّهُ عَمَّا يُشْرِكُونَ ﴿١٩٠﴾

१९१. काय हे अशांना त्याचा सहभागी ठरवितात जे कोणत्याहि वस्तूला निर्माण करीत नाही. किंबहुना स्वत: निर्माण केले गेलेले आहेत.

أَيُشْرِكُونَ مَا لَا يَخْلُقُ شَيْئًا وَهُمْ يُخْلَقُونَ ﴿١٩١﴾

१९२. आणि ना त्यांची मदत करण्याचे सामर्थ्य बाळगतात व ना स्वत: आपली मदत करू शकतात.

وَلَا يَسْتَطِيعُونَ لَهُمْ نَصْرًا وَلَا أَنفُسَهُمْ يَنصُرُونَ ﴿١٩٢﴾

१९३. जर तुम्ही त्यांना मार्गदर्शनासाठी पुकाराल तर ते तुमचे म्हणणे ऐकणार नाहीत [१९५]तुमच्या करीता सारखेच आहे, त्यांना पुकारा किंवा गप्प रहा.

وَإِن تَدْعُوهُمْ إِلَى الْهُدَىٰ لَا يَتَّبِعُوكُمْ ۚ سَوَاءٌ عَلَيْكُمْ أَدَعَوْتُمُوهُمْ أَمْ أَنتُمْ صَامِتُونَ ﴿١٩٣﴾

१९४. तुम्ही अल्लाहला सोडून ज्यांना पुकारता ते तुमच्याच सारखे दास आहेत [१९६] त्यांना तुम्ही पुकारून पहा, त्यांनी तुमच्या पुकारण्यास प्रतिसाद द्यावा [१९७] जर तुम्ही (आपल्या दाव्यात) सच्चे आहात (की ते देव आहेत).

إِنَّ الَّذِينَ تَدْعُونَ مِن دُونِ اللَّهِ عِبَادٌ أَمْثَالُكُمْ ۖ فَادْعُوهُمْ فَلْيَسْتَجِيبُوا لَكُمْ إِن كُنتُمْ صَادِقِينَ ﴿١٩٤﴾

१९५ काय त्यांना पाय आहेत की त्याद्वारे त्यांनी चालावे ? त्यांना हात आहेत की ज्याद्वारे त्यांनी धरावे ? त्यांना डोळे आहेत की ज्याद्वारे त्यांनी पहावे ? त्यांना कान आहेत की ज्याद्वारे त्यांनी ऐकावे ?[१९८]सांगा, बोलवा आपल्या ठरविलेल्या सहभागींना.मग माझ्याविरुद्ध कारवाई करून दाखवा आणि मला मोहलत देऊ नका.[१९९]

أَلَهُمْ أَرْجُلٌ يَمْشُونَ بِهَا ۖ أَمْ لَهُمْ أَيْدٍ يَبْطِشُونَ بِهَا ۖ أَمْ لَهُمْ أَعْيُنٌ يُبْصِرُونَ بِهَا ۖ أَمْ لَهُمْ آذَانٌ يَسْمَعُونَ بِهَا ۗ قُلِ ادْعُوا شُرَكَاءَكُمْ ثُمَّ كِيدُونِ فَلَا تُنظِرُونِ ﴿١٩٥﴾

२९२. याचे स्पष्टीकरण सूरह निसा टीप क्र. ३ मध्ये केले गेले आहे.

आदम पासून हव्वाच्या निर्मितीचा असूसंगत अर्थ लावण्याची गरज नाही. जीवशास्त्र (Biology) च्या रहस्योद्‌घाटनांना लक्षात घेता काही सजीव असेहि आढळून येतात जे एक पेशी (Single Celled) असतात व आपोआप दोन भागात विभाजित होतात उदा. अमीबा (Amoeba) म्हणून सुरुवातीस जर एका जीवापासून म्हणजे आदमपासून हव्वाला निर्माण केले गेले असेल तर त्यात आश्चर्य कसले?

२९३. मनुष्यांची जी पहिली जोडी (Couple) निर्माण केली गेली. तिचा उल्लेख केल्यानंतर आता माणसांच्या सर्वसामान्य जोड्या. म्हणजे स्त्री-पुरुषांचा उल्लेख केला जात आहे.

२९४. अर्थात अल्लाह त्यांना जेव्हा भली चांगली संतती प्रदान करतो तेव्हा ते अल्लाहशी कृतज्ञ होण्या ऐवजी लाभलेल्या संततीला एखाद्या देवी देवतेची किंवा एखाद्या वली वा बुजूर्गची देणगी ठरवून त्यांना नजराणे, बळी, चढावे अर्पण करू लागतात. मग नजराणा अर्पण करण्यास कोणी मंदीराकडे धाव घेतो तर कोणी दरगाह कडे. मग त्या नवजात अर्भकाचे नाव हि अनेकेश्वरवादीय ठेवले जाते. मक्केचे अनेकेश्वरवादी आपल्या बालकांची नावे 'अब्दुल उज्जा' (उज्जा देवीचा दास) 'अब्दुश शम्स' (सूर्य देवतेचा दास) अशी नावे ठेवत तर भारतीय अनेकेश्वरवादी रामदास (रामाचा दास) गोकुलदास (गोकुळचा दास) अशी ठेवतात. तसेच बिदअती (धर्मात नवनव्या गोष्टी घुसविणारे) मुसलमान 'अब्दुल रसूल' (रसूलचा दास) 'हुसेनबक्ष' (हुसेन ने प्रदान केलेला) 'गुलाम गौस' (गौस अब्दुल कादर जिलानी यांचा गुलाम) या प्रकारची नावे ठेवतात.

२९५. म्हणजे ह्या मूर्ति तुम्हाला कसले मार्गदर्शन करू शकतात? जर तुम्ही त्यांना मार्गदर्शनासाठी पुकारांल तर तुम्हाला काहीच उत्तर मिळणार नाही. त्यांना या हेतुने पुकारणे, न पुकारणे सारखेच आहे. मग जेव्हा ते तुम्हाला मार्गदर्शन करू शकत नाही व तुम्हाला हेहि सांगू शकत नाही की सफलतेचा मार्ग कोणता व असफतेचा मार्ग कोणता तर ते ईश्वर कसे? काय ईश्वर असाहि असतो की ज्यात मार्गदर्शनाची पात्रता मूळापासूनच नसावी, व केवळ दगडाचा देव असावा?

२९६. मूर्तिपूजक आपल्या मूर्तिविषयी ही श्रद्धा बाळगतात की त्या खरे पाहता त्यांच्या सामूहीक दैवतांची, उदा. जिन्न फिरिश्ते, भूतपूर्व मानवी व्यक्तिमत्व इत्यादिंची लक्षणे व चित्रे आहेत. म्हणून मूर्तिची पूजा खरे पाहता त्यांनी कल्पिलेल्या ईश्वरांची पूजा आहे. कुरआनाने या दोन्ही गोष्टींवर अकुंश ठेवला आहे. या आयतीत हे जे फर्माविले गेले की ते तुमच्या सारखेच दास आहेत तर याचा इशारा त्यांची मूल दैवते म्हणजे जिन्न व विभूतिंकडे आहे. अर्थात जिन्न असोत वा फिरिश्ते, विभूति असोत वा आत्मे, सर्वच ईश्वराचे दास आहेत. ईशत्वाचा गुणधर्म कोणताहि नाही. राहिलेत त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मूर्ति तर या संबंधी पकड नंतरच्या आयतीत झाली आहे.

२९७. म्हणजे जर ते ईश्वराचे दास नाहीत, किंबहुना स्वत: ईश्वर आहेत तर मग तुमच्या पुकारण्याला प्रतिसाद का म्हणून देत नाहीत? तुमचे जीवन-उद्दिष्ट तुम्हावर का म्हणून उघड करीत नाहीत व जीवन-व्यवहारात तुमचे यथायोग्य मार्गदर्शन का करीत नाहीत?

२९८. हे शिर्क व्यक्त करणारे म्हणजे मूर्ती होत, ज्यांना अनेकेश्वरवाद्यांनी देव बनवून ठेवले आहे. यांची अपात्रता स्पष्ट करण्याकरिता येथे काही प्रश्न क़ायम केले गेले आहेत अर्थात ह्या मूर्ती मनुष्य स्वरूपात तर बनविल्या गेल्या आहेत परंतु त्यांचे हात पाय, डोळे, कान सर्व दिखाव्याचे आहेत. त्यांच्यात ना चालण्या-फिरण्याची शक्ति आहे व ना पकडण्याची, तसेच ना बघण्याची शक्ति आहे व ना श्रवण-शक्ति, मग हे देव कशावरून? परंतु जे लोक बुद्धीने अंध असतात त्यांना या गोष्टीत संकोच वाटत नाही की आपल्या ईश्वरांना आपल्याच हातांनी घडवावे, व यातही की, ज्यांच्यात ईश-गुणधर्म तर राहीला, मानव-गुणधर्महि आढळून येत नसावा, त्यांनाच गरज-पूर्ती करणारे मानून त्यांची पूजा करावी तसेच त्यांना हे करण्यात किंचितहि लज्जा वाटत नाही की आपल्या दैवतांना आपल्याच हातांनी समुद्रात बुडवावे.

राहीला मूर्तिपूजेचा हा खुलासा की मूर्ति खरे पाहता ईश्वरोपासनेचे साधन आहे तर ही गोष्ट पूर्णत: वस्तुस्थितीशी विसंगत आहे, कारण मूर्तिपूजक प्रथम तर एक ईश्वरावर नव्हे किंबहुना अनेक ईश्वरांवर श्रद्धा ठेवतात एवढेच नव्हे तर त्यांची कार्ये या गोष्टीचा पुरावा होय की ते मूर्तिनाच सर्व काही समजतात व त्यांना ईश्वराचा दर्जा देतात.

आयतीत मूर्तिपूजकांच्या मूर्खतेला ज्या प्रकारे स्पष्ट केले गेले आहे त्याच्याशी मिळता जुळता मजकूर स्तोत्रसंहितेत आहे :

''त्यांच्या मूर्ति केवळ सोनेरूपी आहेत, त्या मनुष्यांच्या हातच्या कृति आहेत. त्यांना तोंड आहे पण बोलता येत नाही, त्यांना डोळे आहेत पण दिसत नाही. त्यांना कान आहेत पण ऐकू येत नाही त्यांना नाक आहे पण वास येत नाही. त्यांना हात आहेत पण स्पर्श करिता येत नाही. पाय

आहेत पण चालता येत नाही. त्यांच्या कठातून शब्द निघत नाही.त्या बनविणारे व त्यांच्यावर भाव ठेवणारे सर्व त्यांच्यासारखेच बनतात.''

"हे इस्राएला, परमेश्वरावर भाव ठेव तोच त्यांचा सहाय्यकर्ता व त्यांची ढाल आहे.'' (स्तोत्रसंहिता -११५: ४ ते ९)

२९९. हे अनेकेश्वरवाद्यांना आव्हान आहे. त्यांच्या त्या धमकीच्या जवाबात, ज्या ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना देत होते की तुम्ही आमच्या दैवतांचा जो विरोध करता तर याचा परिणाम म्हणून तुमच्यावर त्यांचा प्रकोप निश्चित होईल त्यांना आव्हान दिले गेले की जर तुमच्या या दैवतांमध्ये काही दम आहे तर त्यांना बोलवा. माझ्या विरूद्ध त्यांनी तुमची मदत करावी मग तुम्ही सर्व मिळून माझ्याविरूद्ध जे काही करावयाचे ते करून पहा या आव्हानानंतर जेव्हा ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या केसालाहि धक्का लावू शकले नाहीत, किंबहुना मक्केत त्यांचा विजेता या नात्याने प्रवेश झाल्यानंतर, त्यांच्या मूर्तिंचे जी दशा झाली त्यावरून हे सिद्ध झाले की त्या मूर्तिंचे ईशत्व खोटे होते व केवळ अल्लाह हाच खराखुरा ईश्वर आहे.

**माझा सहाय्यकर्ता तर अल्लाह आहे ज्याने हा ग्रंथ अवतरीत केला आहे व तो सत्कृत्ये करणाऱ्यांची मदत करतो. परंतु ज्यांना तुम्ही अल्लाहला सोडून पुकारता ते ना तुमची मदत करू शकतात, व ना स्वतःची मदत करू शकतात. जर तुम्ही त्यांना मार्गदर्शनासाठी पुकाराल तर ते तुमचे म्हणणे ऐकूहि शकत नाही. तुम्हाला असा भास होतो की ते तुमच्याकडे टक लावून पाहत आहेत, वस्तुतः ते, पाहत काहीच नाही.** *(अल-कुरआन)*

१९६. माझा सहाय्यकर्ता तर अल्लाह आहे ज्याने हा ग्रंथ अवतरीत केला आहे व तो सत्कृत्ये करणाऱ्यांची मदत करतो.

إِنَّ وَلِـِّۧيَ ٱللَّهُ ٱلَّذِي نَزَّلَ ٱلۡكِتَٰبَۖ وَهُوَ يَتَوَلَّى ٱلصَّٰلِحِينَ ١٩٦

१९७. परंतु ज्यांना तुम्ही अल्लाहला सोडून पुकारता ते ना तुमची मदत करू शकतात, व ना स्वतःची मदत करू शकतात.

وَٱلَّذِينَ تَدۡعُونَ مِن دُونِهِۦ لَا يَسۡتَطِيعُونَ نَصۡرَكُمۡ وَلَآ أَنفُسَهُمۡ يَنصُرُونَ ١٩٧

१९८. जर तुम्ही त्यांना मार्गदर्शनासाठी पुकाराल तर ते तुमचे म्हणणे ऐकूहि शकत नाही.[३००] तुम्हाला असा भास होतो की ते तुमच्याकडे टक लावून पाहत आहेत, वस्तुतः ते, पाहत काहीच नाही.[३०१]

وَإِن تَدۡعُوهُمۡ إِلَى ٱلۡهُدَىٰ لَا يَسۡمَعُواْۖ وَتَرَىٰهُمۡ يَنظُرُونَ إِلَيۡكَ وَهُمۡ لَا يُبۡصِرُونَ ١٩٨

१९९. (हे पैगंबर !) क्षमाशीलतेने काम घ्या. भल्या गोष्टीचा आदेश द्या व अज्ञानी लोकांशी उपेक्षा ठेवा. [३०२]

خُذِ ٱلۡعَفۡوَ وَأۡمُرۡ بِٱلۡعُرۡفِ وَأَعۡرِضۡ عَنِ ٱلۡجَٰهِلِينَ ١٩٩

२००. आणि जर तुम्हाला सैतानाकडून उत्रेजितता जाणवेल तर अल्लाहचे शरण मागा [३०३] निःसंश्य तो ऐकणारा व जाणणारा आहे.

وَإِمَّا يَنزَغَنَّكَ مِنَ ٱلشَّيۡطَٰنِ نَزۡغٞ فَٱسۡتَعِذۡ بِٱللَّهِۚ إِنَّهُۥ سَمِيعٌ عَلِيمٌ ٢٠٠

२०१. जे लोक ईश-भय अंगिकारतात त्यांना जर सैतानाकडून एखादा विचार स्पर्श करतो तर ते दचकून उठतात व त्यांचे डोळे अकस्मात उघडतात.[३०४]

إِنَّ ٱلَّذِينَ ٱتَّقَوۡاْ إِذَا مَسَّهُمۡ طَيۡفٞ مِّنَ ٱلشَّيۡطَٰنِ تَذَكَّرُواْ فَإِذَا هُم مُّبۡصِرُونَ ٢٠١

२०२. परंतु जे त्यांचे (म्हणजे सैतानांचे) भाऊबंध आहेत ते त्यांना मार्गभ्रष्टतेत ओढत नेत जातात आणि मग यात ते कसलीहि कसर बाकी ठेवीत नाही.[३०५]

وَإِخۡوَٰنُهُمۡ يَمُدُّونَهُمۡ فِي ٱلۡغَيِّ ثُمَّ لَا يُقۡصِرُونَ ٢٠٢

२०३. आणि (हे पैगंबर !) जेव्हा तुम्ही त्यांच्यासमोर एखादी आयत सादर करीत नाही तेव्हा ते म्हणतात, तुम्ही एखादी आयत का नाही निवडली? सांगा, मी तर केवळ त्या ''वही''चे अनुसरण करतो जी माझ्या पालन कर्त्याकडून मजवर अवतरीत केली जाते.[३०६] ह्या तुमच्या पालनकर्त्या तर्फे अंतर्दृष्टिच्या गोष्टी आहेत.[३०७] आणि मार्गदर्शन व कृपा आहे अशा लोकांसाठी ज्यांनी ईमान बाळगले.[३०८]

وَإِذَا لَمۡ تَأۡتِهِم بِـَٔايَةٖ قَالُواْ لَوۡلَا ٱجۡتَبَيۡتَهَاۚ قُلۡ إِنَّمَآ أَتَّبِعُ مَا يُوحَىٰٓ إِلَيَّ مِن رَّبِّيۚ هَٰذَا بَصَآئِرُ مِن رَّبِّكُمۡ وَهُدٗى وَرَحۡمَةٞ لِّقَوۡمٖ يُؤۡمِنُونَ ٢٠٣

३००. म्हणजे ह्या मूर्ति जेव्हा ऐकत नाही कि पाहत नाही तर त्या मार्गदर्शन काय करतील मग जेव्हा त्या मार्गदर्शन करण्यायोग्य नाहीत तर ईश्वर कशा?

३०१. यात सूक्ष्म-व्यंग लपलेले आहे की जी दशा मूर्तिची आहे. तीच दशा त्यांच्या पूजकांचीहि आहे. मूर्ति बाह्यत: असे वाटते की  पहात आहेत पण वस्तुत: पहात काहीच नाही तद्‌वतच मूर्तिपूजक बाह्यत: डोळे बाळगणारे असतात व सत्य आवाहकास पाहतात परंतु खरे पाहता ते ना सत्याला पाहू शकतात ना त्याच्या आवाहकास, कारण आपले नेत्रतेज ते गमावून बसले आहेत.

३०२. हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना उद्देश्यून आहे व त्यांच्या माध्यमाने समस्त ईमान बाळगणाऱ्यांना आदेश आहे. क्षमाशीलतेने काम घ्या म्हणजे ईश्वराशी अपरिचित असलेल्या लोकांच्या दु:खदायक बोलण्यास मनावर घेऊ नका. आणि चारित्र्याची विशालता दर्शवीत जास्तीत जास्त क्षमाशीलतेने काम घ्या. भल्या गोष्टींची ताकीद अवश्य करीत रहा परंतु जर अशा लोकांशी वास्ता पडला जे भावनांनी प्रभावित आसावेत व काही ऐकण्या समजण्यास तयार नाहीत तर त्यांच्या तोंडी लागण्याची गरज नाही. त्यांना त्यांच्या स्थितीवर सोडून द्या; कारण जे ऐकू इच्छित नाही, त्यांना ऐकविण्याची कसलीहि जबाबदारी तुमच्यावर येत नाही.

३०३. म्हणजे जर विरोधकांच्या गोष्टी तुम्हाला भडकून जाण्यास कारणीभूत ठरल्या आहेत तर अल्लाहचे शरण मागा, तो तुम्हाला अपायापासून सुरक्षित ठेवील.

या आदेशांना आचरणात आणून विरोधकांची हृदये जिंकली जाऊ शकतात. आणि इस्लामी आवाहनासाठी मार्ग निघू शकतात. परंतु आज मुसलमानांची ही दशा आहे की ते मुस्लिमेतरांच्या भडकविण्याच्या प्रयत्नांना बळी पडतात व त्यांना प्रत्युत्तर देण्यास तत्पर असातात क्षमा व सबुरीने काम घ्यायला ते तयार नसतात, परिणामी त्यांच्याशी भिडतात व कोणताही लाभ साध्य होत नाही.

३०४. म्हणजे ईश-भयाचे वर्तन अंगिकारणाऱ्यांचा विवेक नेहमी जागृत असतो. जर योगयोगाने एखादा सैतानी विचार किंवा वसवसा मनात उद्‌भवतो तर त्यास ते तत्काळ जाणतात; व त्याना स्पष्ट दिसू लागते की तकवा (ईश-भया) चा मार्ग कोणता व अपराधाचा मार्ग कोणता.

३०५. ईश-भय बाळगणाऱ्यां विरुद्ध सैतानाच्या भाऊबंधांची ही दशा असते. सैतान त्यांच्या मार्गभ्रष्टतेत वाढच करीत जातो त्यांना जेव्हा सैतानी वसवसा स्पर्श करतो; तर त्यापासून सचेत होण्याऐवजी स्वत:ला या अनुचित हरकतीवर समाधानी मानातात व त्यानंतर त्या विचाराला कृतीत आणतात त्यांच्यावर सैतानाची जादू अशा प्रकारे चालते की त्यांची सुत्रे सैतानाच्याच हाती असतात.

आत्माशुद्धी व नैतिक प्रशिक्षणाबाबत ही अत्यंत महत्वपूर्ण बाब होय जी या आयतीमध्ये फर्माविली गेली आहे.

३०६. जेव्हा ईश संदेश अवतरणाच्या दरम्यान काही काळ जात असे तेव्हा अनेकेश्वरवादी, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना टोमणे मारीत की आपण एखादी आयत छाटून का घेतली नाही. अर्थात हे की तुम्ही आयती तर रचीतच असता मग आज एखादी आयत रचून का नाही आणली. ही सक्त भडकविणारी गोष्ट होती परंतु याचे उत्तर अत्यंत गांभीर्याने देण्याची आज्ञा  पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दिली गेली व ती अशी की त्यांना सांगा मी केवळ त्या वहीचे अनुसरण करतो जी माझ्याकडे पाठविली जाते. म्हणजे माझे काम आयत रचणे नव्हे किंबहुना आपल्या पालनकर्त्याकडून अवतरीत झालेल्या आयती सादर करणे हे होय.

३०७. कुरआनातील आयतींचे दृष्टीवर्धक असणे या गोष्टीचे प्रमाण आहे की त्या अल्लाहने अवतरीत केलेल्या आयती आहेत, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मनाने रचलेल्या आयती नव्हेत. क़ुरआन एक खुला ग्रंथ आहे व जो कोणी याचे अध्ययन स्वच्छ मनोभावे करील तो या निर्णयाप्रत पोहचल्याशिवाय राहणणार नाही की यात ज्या गोष्टी वर्णिल्या गेल्या आहेत त्या माणसाच्या विवेकाला जागृत करणाऱ्या, हृदय-द्वार उघडणाऱ्या व बुद्धीला सतेज करणाऱ्या आहेत. मग जी वाणी अगदी अंतर्दृष्टीशाली असावी व तीहि उच्च कोटीची अंतर्दृष्टी, मग ती मनुष्य वाणी कशी असू शकते.

ईश्वर व धर्माशी संबंध दर्शवून ज्या लोकांनी आपली वाणी सादर केली आहे, त्यात विभिन्न गोष्टी, कयास व तत्वज्ञानीय गुंतागुंतीखेरीज आणखी काय आहे? त्यांच्या गोष्टी ना बुद्धि व चिंतनास तेज प्रदान करणाऱ्या आहेत व ना मन-मस्तिष्काकरिता समाधान व शांती. मग क़ुरआनाला याच पातळीवर ठेवणे हा कोठला न्याय?

३०८. क़ुरआन ईमान बाळगणाऱ्यांसाठी मार्गदर्शनहि आहे व कृपाहि म्हणजे त्यांचे योग्य मार्गदर्शन करून त्यांना- ईश-कृपेचा लाभ घडवितो.

२०४. आणि जेव्हा कुरआन पठन केले जाईल तेव्हा ते लक्षपूर्वक ऐका व स्तब्ध रहा. यासाठी की तुमच्यावर दया केली जावी.[३०९]

وَاِذَا قُرِئَ الْقُرْاٰنُ فَاسْتَمِعُوْا لَهٗ وَاَنْصِتُوْا لَعَلَّكُمْ
تُرْحَمُوْنَ ۝٢٠٤

२०५. आणि आपल्या पालनकर्त्याचे सकाळ-संध्याकाळ स्मरण करा, मनातल्या मनात नम्रता व भया सह आणि मुखानेहि हळू स्वरासह [३१०] आणि गाफील लोकांपैकी होऊ नका. [३११]

وَاذْكُرْ رَّبَّكَ فِيْ نَفْسِكَ تَضَرُّعًا وَّخِيْفَةً وَّدُوْنَ
الْجَهْرِ مِنَ الْقَوْلِ بِالْغُدُوِّ وَالْاٰصَالِ وَلَا تَكُنْ
مِّنَ الْغٰفِلِيْنَ ۝٢٠٥

२०६. नि:संशय जे तुमच्या पालन कर्त्याच्या सान्निध्यात आहेत ते त्याच्या उपासनेपासून गर्व करीत नाही, त्याची तस्बीह (पावित्र्यवर्णन) करतात आणि त्याच्यापुढे सजदा करतात. [३१२]

اِنَّ الَّذِيْنَ عِنْدَ رَبِّكَ لَا يَسْتَكْبِرُوْنَ عَنْ عِبَادَتِهٖ
وَيُسَبِّحُوْنَهٗ وَلَهٗ يَسْجُدُوْنَ ۩ ۝٢٠٦

३०९. वर वर्णिले गेले की किती उच्च कोटीची वाणी आहे. आता लोकांचे लक्ष वेधले जात आहे की त्यांनी क़ुरआनास जेव्हा ते वाचले जात असेल किंवा त्याचे पठन केले जात असेल अगदी लक्षपूर्वक ऐकावे. शक्य आहे ते देखील त्या कृपेचे भागीदार ठरतील. जे लोक क़ुरआनवर आक्षेप घेतात. त्यांच्या आक्षेपाचे कारण सर्वसामान्यत: हे असते की ना ते क़ुरआनाला लक्षपूर्वकरित्या वाचतात व ना ध्यान देऊन ऐकतात, जर ते विचारपूर्वक वाचतील किंवा लक्षपूर्वक ऐकतील तर त्यांचे सर्व संशय सर्व शंका दूर होतील. व ईमान सारखी अत्युच्च कोटीची ईश-देणगी त्यांना लाभेल.

आयतीत जी गोष्ट सांगितली गेली आहे तिचे मूळ उद्दिष्ट तेच होय जे वर वर्णिले गेले म्हणजे क़ुरआनास अगदी लक्षपूर्वक ऐकण्याचे सार्वत्रिक अवाहन करणे परंतु ओघाओघाने यापासून नमाज़विषयी हा आदेशहि निघतो की जेव्हा इमाम क़ुरआन ऐकवित असेल तर इमामच्या नेतृत्वात नमाज़ अदा करणाऱ्यांनी लक्षपूर्वक क़ुरआन पठण ऐकावे व स्तब्ध रहावे. राहिला हा प्रश्न की जेव्हा इमाम अगदी हळू स्वरात क़ुरआन पठण करीत असेल तर नमाज़ पढणाऱ्यांनी सूरह फातिहाचे पठण करावे किंवा नाही तर यासाठी सप्रमाण हदीस वचनांकडे रूजू केले पाहिजे. क़ुरआनला आपापल्या 'मस्लकांच्या' समर्थनात ओढणे मोठे वाईट होय. योग्य मार्ग हा की क़ुरआन द्वारे फिक़हच्या समस्यांमध्ये जे स्पष्ट आदेश किंवा मार्गदर्शन लाभत असेल ते कसलाही विलंब न लावता मान्य केले जावे की ते खरे प्राप्ति स्थान आहे व तपशीला करिता पैगंबरांच्या आदेशांकडे (सुन्नाह) रूजू केले जावे कारण सुन्नाह क़ुरआनाचे स्पष्टीकरण करणारी आहे. परंतु जेव्हा अनुकरण-वृत्ति निर्माण होते तेव्हा लोक आपआपल्या इमामांना व पंथांना खरे साबित करण्यासाठी कोणत्या ना कोणत्या हदीसचा आधार घेतात व क़ुरआनला हदीसच्या स्वाधीन करतात किंवा क़ुरआन व हदीसचा असा खुलासा करतात की 'मत' व 'कयास' यांना क़ुरआन व सुन्नह वर प्राधान्य लाभते. क़ुरआनचे आज्ञापालन करणाऱ्याने स्वत:ला या मार्गापासून अलिप्त ठेवले पाहिजे.

आयतीत इशारा आहे की क़ुरआन जेव्हा वाचले जात असेल तेव्हा अल्लाहची कृपा सावली स्वरूप होते. हदीस मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हा संकेत अशा प्रकारे केला आहे:-

وَمَا اجْتَمَعَ قَوْمٌ فِى بَيْتٍ مِنْ بُيُوْتِ اللهِ يَتْلُوْنَ كِتَابَ اللهِ وَ يَتَدَارَسُوْنَ بَيْنَهُمْ اِلَّا نَزَلَتْ عَلَيْهِمُ السَّكِيْنَةُ وَ غَشِيَتْهُمُ الرَّحْمَةُ وَحَفَّتْهُمُ الْمَلاَ ئِكَةُ وَذَكَرَهُمُ اللهُ فِيْمَنْ عِنْدَهُ۔ (مسلم كتاب الذكر)

''जे लोक अल्लाहच्या घरात (मसजिदीत) एकत्र होऊन ईश ग्रंथाचे पठण करतात व त्यास एकत्रपणे शिकतात शिकवितात तर त्यांच्यावर शांती अवतरीत होते. त्यांच्यावर कृपा आच्छादीत होते व फिरिश्ते त्यांच्याभोवती जमा होतात आणि अल्लाह त्यांचा उल्लेख आपल्या सान्निध्यात असलेल्यांमध्ये करतो. (मुस्लिम किताबुज़्-ज़िक्र )

३१०. येथे ईश-स्मरणाचे दोन प्रकार वर्णिले गेले आहेत. एक हा की माणसाने मनातल्या मनात आपल्या पालन कर्त्याचे स्मरण करावे व दुसरा हा की जीभेनेहि त्याने स्मरण करावे व त्यासोबतच ही ताकीद केली गेली आहे की नम्रता व भय बाळगून ईश-स्मरण करा व जीभेने त्याचे स्मरण करतांना अगदी मंद स्वरात, यासाठी की माणसाने उपासनेच्या शिष्टाचारांना नजरेसमोर असू द्यावे व देखावा करण्यापासून अलिप्त रहावे.

स्पष्ट झाले की ईश-स्मरण जीभ हलविण्याचे काम नव्हे की 'हू हक'चा घोष विशेष रीतीने केला जावा आणि ना प्रचलीत परिभाषेत 'वीर्द' आणि 'वजीफा' आहे; जीभेने विशिष्ट वचनांचे उच्चार पुन्हा पुन्हा करीत रहावे. परंतु मन ईश्वराकडे एकाग्र नसावा आणि ना नम्रता व भयाची कैफियत त्याच्यात असावी. राहिलेत तस्बीह (जपमाळेचे) दाणे जे फिरवले जातात तर स्पष्ट व्हावे की इस्लाम मध्ये माला जपण्याची पद्धत नाही. ही पद्धत इतरांकडून घेतली गेली आहे. व ज्या भावनेसह अल्लाहचे स्मरण करण्याची ताकीद या आयतीत दिली गेली आहे. यापासून तिला कोणताही प्रमाण नाही. तस्बीह फिरविल्याने ईश स्मरण तर कमी होते तथापि ईश स्मरणाचे प्रदर्शन अधिक होते.

सकाळ-संध्याकाळच्या वेळा स्थितींना अनुसरून आहेत. जणू मनुष्य या अवधीत एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीस दाखल होतो. म्हणून खास प्रकारे या अवधींमध्ये ईश स्मरणाचा प्रयत्न करण्याची ताकीद दिली गेली आहे.

३११. तात्पर्य मनुष्याने जर ईश स्मरणाची स्वयं लावून घेतली नाही तर त्यच्या मनावर गफलतीचा पडदा पडतो नमाज़ पूर्णत: ईश स्मरण आहे. नमाज़च्या खेरीजहि उठता बसता, चालता फिरता व कारभारात मग्न असतानाहि ईश स्मरण अपेक्षित आहे. अशासाठी माणसाने अल्लाह पासून कधीहि गाफील होऊ नये.

३१२. अभिप्रेत सान्निध्यात असलेले फिरिश्ते होत; ज्यांना अज्ञानी लोक ईश्वर बनवून बसले आहेत. वस्तुत: ते स्वत: आपल्याला अल्लाहचा दास समजतात व त्याच्या

उपासनेत लागून राहतात. ते त्याचे पावित्र्य वर्णन करतात व त्याच्यापुढे सजदा करतात. जर तुम्ही अल्लाहचे सान्निध्य इच्छिता तर तुम्ही देखील हे फिरिश्त्यांचे गुणवैशिष्ट्य आपल्या अंगी निर्माण केले पाहिजे.

या आयतीवर सजदा करणे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यापासून साबीत आहे व त्याचे प्रयोजन हे की माणसाने त्या गोष्टीचा प्रभाव आत्मसात करावा जी येथे वर्णिली गेली आहे; व ताबडतोब हे साबीत करावे की तो गवोन्मत नाही; किंबहुना अल्लाह पुढे आपले डोके झुकवित आहे.

# ८. सूरह-अनफाल

**नावः** सूरह चा आरंभ ''अनफ़ाल'' म्हणजे युद्धात शत्रूपासून हाती आलेल्या मालमत्तेच्या प्रश्नाने झाला आहे. या अनुषंगाने अध्यायाचे नाव ''अल् अनफाल'' असे आहे.

**अवतरण काळः** ही सूरह ''मदनी'' अर्थात मदीनेत अवतरलेली आहे, आणि बद्रच्या युद्धानंतर म्हणजे रमजान हिजरी सन २ मध्ये हिचे अवतरण झाले.

**मध्यवर्ति कल्पनाः** सूरह चा मध्यवर्ति विषय जेहाद (धर्मयुद्ध) होय तसेच बदर-युद्धाच्या परिणामी ज्या समस्या उद्‌भवल्या होत्या त्या संबंधाने मुसलमानांचे यथायोग्य मार्गदर्शन करणे तद्‌वतच इन्कार करणाऱ्याना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सत्यतेचे चिन्ह स्पष्ट करणे जे सत्य आणि असत्याच्या या युद्धाने इतिहासाच्या पानांवर अंकित केले. सूरह अअराफ मध्ये अशा ऐतिहासिक घटना प्रस्तुत केल्या होत्या, ज्यावरून त्या प्रेषितांची सत्यता जाहीर होते जे वेगवेगळ्या जाती समूहांकडे पाठविले गेले होते या सूरह मध्ये बद्र युद्धातील ईमान धारकांच्या यशास पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सत्यतेचे चिन्ह ठरविले गेले कारण हे युद्ध सर्वसामान्य युद्धाहून भिन्न, सत्य व असत्यामध्ये फरक करणारे युद्ध होते.

**आयत रचना :** आयत क्र.१ ते ४ मध्ये ''माले ग़नीमत'' (युद्धात शत्रूपासून जिंकलेल्या मालमत्ते)च्या विभागणी संदर्भात एका प्रश्नाचे उत्तर देतांना ईमान बाळगणाऱ्याची ती वैशिष्ट्ये वर्णिली गेली आहेत जी त्यांच्या ईमानाच्या सत्यतेचे व दृढतेचे प्रमाण ठरतात आणि जी उद्‌भवल्यामुळे मनुष्य प्रत्येक व्यवहारात अल्लाह व त्यच्या पैगंबराचे आज्ञापालन अंगिकारतो.

आयत क्र. ५ ते ८ मध्ये मुसलमानाच्या त्या वैगुण्यावर अंकुश ठेवला गेला आहे जे युद्धापूर्वी त्यांच्यात दिसून आले.

आयत क्र. ९ ते १९ मध्ये अल्लाहच्या मदतीचा उल्लेख आहे,जी युद्ध प्रसंगी जाहीर झाली, व त्या अनुषंगाने मुसलमानांना ही आज्ञा की सामना करतांना त्यांनी पाठ दाखवू नये.

आयत क्र. २० ते २९ मध्ये मुसलमानाना ही आज्ञा की कठीण प्रसंगी त्यांनी अल्लाह व त्याच्या प्रेषिताशी एकनिष्ठ असल्याचा पुरावा द्यावा.

आयत क्र. ३० ते ४० मध्ये पैगंबराविरुद्ध काफ़ीरांनी ज्या क्लुप्त्या योजल्या होत्या त्या निष्फळ झाल्या व अल्लाहची योजना यशस्वी झाली हे दर्शविले गेले आहे. परंतु जर त्यांना अजूनहि आपली भूमिका चुकीची असल्याची जाणीव झालेली नाही व आपल्या इन्कारवादी वर्तनापासून ते परावृत्त होत नाही तर या स्थितीत मुसलमानांनी युद्ध-क्रम जारी राखला पाहिजे, यासाठी की या पवित्र भूमीवर सत्य धर्मास वर्चस्व प्राप्त व्हावे.

आयत क्र. ४१ ते ४९ मध्ये ''माले गनीमत''च्या विभागणीचा नियम व इस्लामी युद्धास इस्लामेतर युद्धापेक्षा श्रेष्ठ ठरविण्याऱ्या गोष्टी, तसेच मुसलमानांना ही आज्ञा की त्यांनी या गोष्टींना. सक्तोने विचाराधीन घ्यावे.

आयत क्र. ५० ते ५४ मध्ये त्या ईश-प्रकोपाचा उल्लेख ज्याला बद्र युद्धाच्या प्रसंगी काफ़ीर बळी पडले होते.

आयत क्र. ५५ ते ६६ मध्ये युद्ध आणि तहा-संदर्भात महत्वपूर्ण आदेश दिले गेले आहेत.

आयत क्र. ६७ ते ७१ मध्ये युद्ध कैदी व त्यांच्याकडून घेतल्या गेलेल्या फिदयावर समीक्षण दिले गेले आहे.

आयत क्र ७२ ते ७५ सूरहचा समाप्ति भाग आहे ज्यात मुसलमानांना परस्पर बंधुत्वाच्या नात्यास मजबूत करण्याविषयी ताकीद केली गेली आहे, अशासाठी की त्यांनी एकसंघ व सुसंबद्ध होऊन आपल्याशी लढण्यास तत्पर असलेल्या काफ़ीरांशी मुकाबला करावा.

सूरहच्या आरंभात मुसलमानांना परस्पर संबंध चांगले राखण्याची ताकीद केली गेली होती आणि शेवटच्या आयतीमध्ये परस्पर सहाय्य व समर्थनास प्रोत्साहन दिले गेले आहे. ज्यावरून हे स्पष्ट होते की जेहाद (धर्मयुद्धा)च्या संदर्भात या समस्येची काय महत्ता आहे.

**बद्रचे युद्ध व त्याची कारणेः** हे युद्ध 'बद्र' या स्थानावर झाले. हे स्थान मदीनेपासून १४८ कीलोमीटर व मक्केपासून ३०३ कीलोमीटर अंतरावर आहे. एका बाजूला मदीनेचे मुसलमान होते ज्यांचे नेतृत्व स्वत: पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) करीत होते तर दुसरीकडे मक्केचे काफीर होते ज्याचा सरदार अबु जहल होता. मुसलमान तीनशेहून थोडेसे जास्त व कसलीहि सामुग्री नसलेल्या स्थितीत होते, त्या मानाने काफीर-सेनेत एक हजार शिपाई साधन सामुग्रीने सज्ज होते. कुफ्र आणि इस्लाम यांच्या दरम्यान झालेले हे

पहीले युद्ध होते. म्हणून या युद्धास मोठे ऐतिहासिक महत्व प्राप्त आहे. या युद्धाची कारणे थोडक्यात खालील प्रमाणे :-

१) मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याविरुद्ध हत्येचा कट रचला होता, परंतु पैगंबर त्यांच्या तावडीत येऊ शकले नाहीत, किंबहुना पैगंबरांनी देशत्याग केला व मदीना शहरी गेले. जेथे त्यांना सर्वोत्कृष्ट साथीदार लाभले व त्यांनी पैगंबरांची मदत करण्याच्या व त्यांचे समर्थन करण्याचा विडा उचलला त्यामुळे मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांच्या मनात मत्सराग्नि प्रज्वलीत झाला.

२) मक्केत जे लोक पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याविषयी ईमान बाळगून एकेश्वरवादाचा ध्वज उंचविणारे बनले होते त्यांच्यावर तेथील अनेकेश्वरवादी भयंकर जुलुम करीत होते, येथपावेतो की त्यांना आपले घरदार सोडून देशत्याग करण्यास प्रवृत्त केले.

३) मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी श्रद्धा व विवेक -स्वातंत्र्य जो माणसाचा स्वाभाविक हक्क आहे त्यावर प्रतिबंध घातला होता यास्तव ते मक्केत अशा कोणत्याही व्यक्तिचे अस्तित्व सहन करण्यास तयार नव्हते जी मूर्तिपूजेचा त्याग करून एकेश्वरवादी धर्माचा अंगिकार करू इच्छित असावी. म्हणून अशा लोकांवर ते दबाव आणीत व त्यांना सतावून सोडीत,अशासाठी की त्यांनी आपल्या वाडवडीलांच्या धर्माला सोडू नये. मग त्यांच्या दृष्टीने तो किती का चुकीचा असेना.

४) मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी मदीनेच्या मुसलमानांकरिता हज्ज व उमराचा मार्ग रोखला होता. यास्तव जेव्हा सअद बिन मुआज ''उमरा'' करिता मक्केला गेले तेव्हा अबु जहलने सक्त आक्षेप घेत त्यांना हरम (काबागृहा) मध्ये म्हटले ''तुम्ही मक्केत समाधानपूर्वक प्रदक्षिणा घालता, वस्तुत: तुम्ही आमच्या धर्मापासून परावृत्त होणाऱ्यांना आश्रय देऊन ठेवला आहे व त्यांचे सहाय्य देखील करता जर तुम्ही अबू सफवानच्या सोबतीला नसते तर येथून सुखरूप पणे जाऊ शकले नसते. सअद त्यांच्या उत्तरादाखल म्हणाले, अल्लाह शपथ, जर तुम्ही मला यापासून रोखले तर मी तुम्हाला अशा गोष्टीपासून रोखीन जी तुमच्याकरिता याहून जास्त तीव्र असेल आणि ती म्हणजे तुमचा मदीना जवळून जाण्याचा मार्ग.'' (बुखारी-किताबुल मगाजी)

५) सर्वश्रेष्ठ अल्लाहने काबागृहाला एकेश्वरवादाचे केंद्र स्थान बनविले होते, व त्यास उभारणारे हजरत इब्राहीम यांनी हज्ज'ची पद्धत प्रचलीत केली होती, तिचे उद्दिष्ट लोकांना एकेश्वरवादी धर्मावर क़ायम राखणे हे होते. परंतु कुरैश जाती समूहाने काबागृहाच्या विस्वस्ततेचा लाभ घेऊन त्यात मूर्ति बसविल्या होत्या व तेथे अनेकेश्वरवादी प्रथा पार पाडू लागले होते. अर्थात या ऐतिहासिक व महान मसजिदीला मूर्तिपूजेच्या स्थानात परिवर्तित करण्याचा व त्यावर बलपूर्वक नियंत्रण ठेवण्याचा कुरेश जाती समूहास कसलाहि अधिकार नव्हता. म्हणून त्यांना काबागृहाच्या विश्वस्तेपासून हटविणे, मूर्ति आणि मूर्तिपूजेपासून त्यास स्वच्छ शुद्ध करणे व त्यास (काबागृहास) एकेश्वरवादाच्या केंद्रस्थानाची योग्यता प्रदान करणे अत्यावश्यक होते.

ही ती मूलभूत कारणे होत. ज्यांनी मदीनेचे मुसलमान व मक्केचे अनेकेश्वरवादी या दोघांच्या दरम्यान द्विधावस्था निर्माण केली होती. आणि मग मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी मदीनेच्या मुसलमानांविरूद्ध जो उपद्रव द्यायचे सुरु केले त्या परिणामी दोघांमध्ये युद्धस्थिती क़ायम झाली व आतापर्यंत आपले हात रोखून धरणाऱ्या मुसलमानांना कुरआनने युद्ध करण्याची उघड अनुज्ञा दिली.

या परिस्थितीत जेव्हा अबु सुफीयान एका व्यापारी काफिल्याबरोबर सिरीया देशाहून मक्केला परत येत होता तेव्हा त्याच्यावर हल्ला चढविण्याची मुसलमानांनी इच्छा केली, ज्यायोगे अनेकेश्वरवाद्यांची ताकत कमजोर व्हावी व त्यांना चांगला धडा मिळावा. परंतु अबुसुफीयानला ही बातमी कळली तेव्हा त्याने मक्केला माणूस पाठवून तेथून कुमक मागविली. मग काय विचारता, मक्केचे अनेकेश्वरवादी एक हजारच्या संख्येने, ज्यात त्यांचे मोठमोठे नेतेसुद्धा होते. युद्धाच्या पूर्ण तयारीनिशी निघाले. तिकडे मदीनेहून मुसलमान देखील युद्धाच्या तयारीनिशी निघाले ते संख्येने तीनशेहून थोडेच जास्त होते व त्यांच्यासह युद्ध-सामुग्रीहि फार अल्पशी होती. तरीदेखील ते सामना करण्याच्या निर्धारासह मदीनेहून निघाले व त्यांनी सरळ सरळ बद्रचा मार्ग पत्कारला.

ते बद्र पोहोचे पावतो व्यापारी काफीला रस्ता बदलून बद्रच्या पुढे मक्के कडे निघून गेला. काफीला पुढे निघुन गेल्यानंतर काफ़ीरांच्या काही सरदारांनी अशी इच्छा बाळगली की मक्केच्या सेनेने परत चालले जावे परंतु अबु जहल ने बद्र जाण्याचा आग्रह धरला. शेवटी मक्केचे सैन्य बद्र येथे पोहोचले तिकडे मुसलमानाचे लष्करहि बद्र पोहोचले होते. अशा प्रकारे शुक्रवार दिनांक १७ रमजान हिजरी सन २ नुसार मार्च इ. स. ६२४ मध्ये बदरच्या मैदानात दोन्ही सेना युद्धास सज्ज झाली. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मदतीकरिता सर्वश्रेष्ठ अल्लाहशी अत्यंत नम्रतेने प्रार्थना केली. जेव्हा सामना झाला तेव्हा मुसलमान अगदी जीवावर उदार होऊन लढले व ईश-मदतीनेहि त्यांना वेळेवर साथ दिली. आणि म्हणूनच मुठभर माणसांनी काफ़ीरांच्या एवढ्या मोठ्या लष्करावर वर्चस्व प्राप्त केले. या लढाईत मुसलमानांचे

फक्त १४ जण शहीद झाले, आणि काफ़ीर सेनेचे ७० जण मारले गेले, ज्यात कुरेश जाती समूहाचे मोठ मोठे सरदार होते.उदा.अबुजहल, उतबा, शैबा, उमय्या बिन खल्फ वगैरे. या सरदारांना ठार केल्यानंतर काफ़ीरांच्या सैन्यात मोठी धावपळ माजली. मुसलमानांनी त्यांच्यातल्या ७० जणांना कैद केले. ज्यात त्यांचे काही नेतेहि होते या नेत्यांपैकी उक्बा बिन अबी मुअैत आणि नजर बिन हारिस यांना बद्रहून परततांना ठार केले गेले व बाकीच्या युद्ध कैदींना तसेच युद्धात शत्रूपक्षाचा जो माल हाती लागला होता तो घेऊन मुसलमान मदीनेला परत गेले. मदीना वासींनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे भव्य स्वागत केले. त्यांचे सुखरूप परतणे व इस्लामी सैन्याच्या जबरदस्त यशाबद्दल मुसलमानांमध्ये हर्षोल्हासाची लहर धावली. कैद्यांना त्यांनी फिदया (मुक्ति-दंड) घेऊन सोडून देण्याचा आदेश दिला व जे कैदी फिदया देऊ शकत नव्हते त्यांना फिदया न घेता सोडून देण्यात आले इकडे काफ़ीरांचे सैन्य बद्रच्या लढाईत पराभव झाल्यानंतर इतस्तत: पळाले व जेव्हा मक्केस पोहोचले तेव्हा अपमानामुळे आपल्या लोकांना तोंड दाखविणे त्यास मोठे कठीण झाले.

असे होते बचे युद्ध ज्याने मक्केच्या काफ़िरांना त्यांचे नेते हिरावून त्यांना अगदी अनाथ केले व मुसलमानांचे भाग्य अशा प्रकारे उजळविले की भावी काळात ते पूर्ण क्रांतीमय स्थितीसह साऱ्या विश्वावर प्रभावशाली झाले व ज्या ज्या शक्तिने त्यांच्याशी सामना केला तिचे तुकडे तुकडे झाले.

# ८. सूरह अनफाल

سُورَةُ الْأَنفَالِ

**आयती :७५**

**अनुवाद**

**परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने**

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. ते तुम्हाला माले ग़नीमत (युद्धात शत्रूपासून हाती आलेल्या धना) विषयी विचारतात. सांगा माले ग़नीमत तर अल्लाह व पैगंबराकरिता आहे. तेव्हा अल्लाहचे भय बाळगा, आपले परस्पर संबंध योग्य राखा आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञापालन करा, जर तुम्ही मोमीन (ईमान बाळगणारे) असाल.[१]

يَسْأَلُونَكَ عَنِ الْأَنفَالِ ۖ قُلِ الْأَنفَالُ لِلَّهِ وَالرَّسُولِ ۖ فَاتَّقُوا
اللَّهَ وَأَصْلِحُوا ذَاتَ بَيْنِكُمْ ۖ وَأَطِيعُوا اللَّهَ وَرَسُولَهُ إِن كُنتُم
مُّؤْمِنِينَ ①

२. ईमान बाळगणारे असे होत की जेव्हा अल्लाहचा उल्लेख केला जातो तेव्हा त्यांची हृदये कंपीत होतात [२] व जेव्हा त्याच्या आयती त्यांना वाचून ऐकविल्या जातात तेव्हा यामुळे त्यांच्या ईमानात वृद्धि होते [३] आणि ते आपल्या पालनकर्त्यावर भरवसा ठेवतात.[४]

إِنَّمَا الْمُؤْمِنُونَ الَّذِينَ إِذَا ذُكِرَ اللَّهُ وَجِلَتْ قُلُوبُهُمْ
وَإِذَا تُلِيَتْ عَلَيْهِمْ آيَاتُهُ زَادَتْهُمْ إِيمَانًا وَعَلَىٰ رَبِّهِمْ
يَتَوَكَّلُونَ ②

३. जे नमाज़ क़ायम करतात [५] व जे काही आम्ही त्यांना दिले आहे त्यातून खर्च करतात. [६]

الَّذِينَ يُقِيمُونَ الصَّلَاةَ وَمِمَّا رَزَقْنَاهُمْ يُنفِقُونَ ③

४. असेच लोक खऱ्या अर्थाने ईमान बाळगणारे होत त्यांच्याकरिता त्यांच्या पालन कर्त्याजवळ दर्जे आहेत, क्षमा आहे आणि सर्वोत्कृष्ट उपजिविका आहे.

أُولَٰئِكَ هُمُ الْمُؤْمِنُونَ حَقًّا ۚ لَّهُمْ دَرَجَاتٌ عِندَ رَبِّهِمْ
وَمَغْفِرَةٌ وَرِزْقٌ كَرِيمٌ ④

५. (आणि बद्र ची घटना अगदी अशा प्रकारे घडली) ज्या प्रकारे तुमच्या पालन कर्त्याने तुम्हाला सत्यासह तुमच्या घरातून बाहेर काढले होते, वस्तुतः ईमान बाळगणाऱ्यांच्या एका समूहास ते अप्रिय वाटले होते.[७]

كَمَا أَخْرَجَكَ رَبُّكَ مِن بَيْتِكَ بِالْحَقِّ
وَإِنَّ فَرِيقًا مِّنَ الْمُؤْمِنِينَ لَكَارِهُونَ ⑤

१. बद्रच्या युद्धात शत्रूची जी मालमत्ता मुसलमानांच्या हाती लागली होती, तिच्या विभागणी बाबत त्यांच्यात मतभेद झाला होता ज्याअर्थी हे इस्लामच्या ध्वजाखाली लढले गेलेले प्रथम युद्ध होते म्हणून ज्या समस्या उद्‌भवल्या त्याच्या बाबतीत मतभेदहि झालेत व काही वैगुण्यांचे निवारणहि. या संदर्भात सर्वात महत्वपूर्ण प्रश्न असा उद्‌भवला की माले गनीमतच्या विभागणीस पात्र ठरणारे लोक कोणते? अर्थात ते लोक की ज्यांनी त्यावर अगदी कब्जा केला कि त्यांच्याबरोबर सैन्यात असलेले इतर सैनिक देखील? तसेच हे की या सम्पत्तिच्या विभागणीचा नियम कोणता? येथे या प्रश्नाचे तात्विक उत्तर देतांना त्या वैगुण्यांना दूर सारण्यासंबंधी लक्ष वेधले गेले आहे; जी या प्रसंगी जाहीर झाली होती कारण जेहाद द्वारे जे उच्चतम लाभ साध्य करणे इस्लामला अभिप्रेत आहे ते त्याच स्थितीत साध्य होऊ शकतात जेव्हा त्याचे सैनिक खऱ्या मनाचे, चारीत्र्याशील, आपसात जुळलेले व मजबूत शिस्त राखणारे असावेत.

''माले ग़नीमत'' अल्लाह व पैगंबराकरिता आहे' ही तात्विक गोष्ट आहे जी प्रश्नाच्या उत्तरादाखल फर्मावली गेली आहे आणि हिचा अर्थ हा आहे की माले ग़नीमतवर सर्व अधिकार अल्लाह व त्याच्या पैगंबराला आहे. याबाबत अल्लाह व पैगंबर जे आदेश देतील ते मान्य करा. अल्लाहने माले गनीमतच्या विभागणीचा नियम आयत क्र.४१ मध्ये वर्णिला आहे व याचे विवरण पैगंबरावर सोपविले.

२. म्हणजे ईमान बाळगणारे असे जिवंत मनाचे व जागृत बुद्धीचे असतात की अल्लाहचे स्मरण होताच त्याच्या महानतेच्या कल्पनेने त्यांचा थरकाप उडतो. या स्थितीचे दुसरे नाव तकवा (ईश-भय) आहे.

३. ईमानचा खरा संबंध हृदयाशी आहे आणि हृदयात जी ईमानजन्य स्थिती निर्माण होते तिचे जर काळजी पूर्वक पालन केले गेले तर ती वृद्धिगत होत राहते. पवित्र क़ुरआनाच्या आयतींचे पठण,त्यांच्या अर्थासह केल्यास ईमान वृद्धिंगत होण्यास कारक ठरते.

४. अर्थात त्यांचा खरा भरवसा साधनांवर नव्हे तर अल्लाहवर असतो. युद्धाकरिता ते शक्यतोवर साधन सामुग्री जुटवितात व चांगल्या योजनाहि अंगिकारतात, मात्र एवढे करूनहि ते असे समजत नाही की या साधनांमुळे किंवा केवळ आपल्या शक्ति सामर्थ्याच्या जोरावर आपण खचितच सफल होऊ, किंबहुना ते असे समजतात की सफलता अल्लाहच्या मदतीवर अवलंबून आहे. तसेच जेव्हा अल्लाह युद्ध करण्याचा आदेश देतो तेव्हा केवळ साधनांच्या कमतरतेमुळे ते युद्ध करण्यापासून मागे हटत नाही,किंबहुना कसलेहि साधन नसलेल्या स्थितीतहि लढतात व असे समजतात की परिणिती अल्लाहच्या हाती आहे.

५. जेहादच्या संदर्भात नमाज़चे महत्व या गोष्टीस स्पष्ट करते की मुसलमानांचे ते सैन्य जे नमाज़ क़ायम करीत नसेल इस्लामी क्रांती घडवून आणण्याकरिता निरर्थक आहे.

६. संकेत या गोष्टीकडे की अल्लाहच्या मार्गात लढणारे भाडोत्री सैनिक नसतात व ना भौतिक लाभ त्यांच्या दृष्टीपथात असतो; किंबहुना ते या मार्गात स्वत: खर्च करणारे व आपले धन लुटविणारे असतात.

७. ही आयत स्पष्ट करते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) मदीनेहून अल्लाहच्या आदेशाने निघाले होते व त्यांचे हे स्थानंतर केवळ सत्यासाठी होते. म्हणजे एखाद्या भौतिक गरजेपायी लूटमार करणे किंवा रक्तपात करणे हा उद्देश नव्हता किंबहुना एकेश्वरवादाच्या आवाहनास सत्य व प्रेषितत्वास खरे सिद्ध करून दाखविणे हे उद्दिष्ट होते आणि हे उद्दिष्ट काफ़िल्यावर हल्ला केल्याने नव्हे किंबहुना काफ़ीर-सैन्याशी सामना केल्यानेच साध्य होऊ शकत होते यास्तव पैगंबर मदीनेहून बद्रच्याच इराद्याने निघाले होते परंतु मुसलमानांच्या एका समूहाला लष्कराचा सामना करण्यास निघणे पसंत नव्हते. ते असे इच्छित होते की सिरीया देशाहून जो व्यापारी काफ़ीला येत आहे त्यावर हल्ला चढवावा कारण सैन्याच्या तुलनेने काफ़ील्यावर वर्चस्व प्राप्त करणे सोपे होते.

६. ते तुमच्याशी सत्या बाबतीत भांडण करीत होते; वस्तुत:बाब स्पष्ट झाली होती. जणू ते मरणाकडे हाकून लावले जात आहेत व ते त्यास (आपल्या समोर) पाहत आहेत.[८]

يُجَادِلُونَكَ فِي الْحَقِّ بَعْدَمَا تَبَيَّنَ كَأَنَّمَا يُسَاقُونَ إِلَى الْمَوْتِ وَهُمْ يَنظُرُونَ ﴿٦﴾

७. आणि जेव्हा अल्लाहने तुमच्याशी वायदा केला होता की दोन समूहांपैकी कोणताही एक निश्चित तुमच्या हाती लागेल [९] आणि तुम्ही असे इच्छित होता की ज्यात प्रतिकार-शक्ति नाही असा समूह तुमच्या हाती लागावा [१०] आणि अल्लाह असे इच्छित होता की आपल्या वचनांनी [११] सत्याचे ‘सत्य’ असणे सिद्ध करावे व काफ़ीरांचे समूळ उच्चाटन करावे. [१२]

وَإِذْ يَعِدُكُمُ اللَّهُ إِحْدَى الطَّائِفَتَيْنِ أَنَّهَا لَكُمْ وَتَوَدُّونَ أَنَّ غَيْرَ ذَاتِ الشَّوْكَةِ تَكُونُ لَكُمْ وَيُرِيدُ اللَّهُ أَن يُحِقَّ الْحَقَّ بِكَلِمَاتِهِ وَيَقْطَعَ دَابِرَ الْكَافِرِينَ ﴿٧﴾

८. अशासाठी की त्याने सत्याला सत्य करून दाखवावे व असत्यास असत्य, मग अपराधींना ही गोष्ट नापसंत का होईना.[१३]

لِيُحِقَّ الْحَقَّ وَيُبْطِلَ الْبَاطِلَ وَلَوْ كَرِهَ الْمُجْرِمُونَ ﴿٨﴾

९. जेव्हा तुम्ही आपल्या पालनकर्त्याचा मदतीसाठी धावा करीत होते [१४] तेव्हा त्याने तुमची फ़िर्याद ऐकून फर्माविले होते मी एक हजार फिरिश्त्यांनी, की जे निरंतर येतील, तुमची मदत करीन.

إِذْ تَسْتَغِيثُونَ رَبَّكُمْ فَاسْتَجَابَ لَكُمْ أَنِّي مُمِدُّكُم بِأَلْفٍ مِّنَ الْمَلَائِكَةِ مُرْدِفِينَ ﴿٩﴾

१०. आणि अल्लाहने या गोष्टीस (तुमच्या करिता) पूर्णपणे शुभ संदेश बनविले [१५] व (ही खुशखबरी तुम्हाला यासाठी दिली) ज्यायोगे तुमची ह्रदये समाधानी व्हावीत अन्यथा मदत तर अल्लाहच्याच कडून होत असते.[१६] नि:संशय अल्लाह प्रभावशाली व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.

وَمَا جَعَلَهُ اللَّهُ إِلَّا بُشْرَىٰ وَلِتَطْمَئِنَّ بِهِ قُلُوبُكُمْ وَمَا النَّصْرُ إِلَّا مِنْ عِندِ اللَّهِ إِنَّ اللَّهَ عَزِيزٌ حَكِيمٌ ﴿١٠﴾

११. (आणि आठवा ती वेळ) जेव्हा तो तुम्हावर पेंग चढवित होता की ही त्याच्यातर्फे शांततेची सामुग्री होती [१७] आणि आकाशातून पाण्याचा वर्षाव करीत होता यासाठी की तुम्हाला स्वच्छ करावे व तुमच्यापासून सैतानाची मलीनता दूर करावी आणि ज्यायोगे तुमच्या मनाचे धाडस बांधावे व त्याद्वारे तुमचे पाय स्थिर करावेत.[१८]

إِذْ يُغَشِّيكُمُ النُّعَاسَ أَمَنَةً مِّنْهُ وَيُنَزِّلُ عَلَيْكُم مِّنَ السَّمَاءِ مَاءً لِّيُطَهِّرَكُم بِهِ وَيُذْهِبَ عَنكُمْ رِجْزَ الشَّيْطَانِ وَلِيَرْبِطَ عَلَىٰ قُلُوبِكُمْ وَيُثَبِّتَ بِهِ الْأَقْدَامَ ﴿١١﴾

८. ही घटना मदीनेहून निघण्यापूर्वीची होय. जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मुसलमानांना सूचना दिली की अबु सुफीयान व्यापारी काफ़ील्यासह सिरीयाहून मक्केकरिता रवाना झाला आहे आणि मक्केहून काफ़ीरांच्या लष्कराने बद्रच्या दिशेने कूच केले आहे आणि या दोन समूहापैकी कोणत्याही एका समूहाशी तुमची मुठभेड होईल तेव्हा मुसलमानांच्या एका समूहाचा कल हा होता की काफ़ील्यावर हल्ला केला जावा. नंतर जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी स्पष्ट: सांगितले की काफ़ीरांच्या सैन्याशी मुकाबला करावयाचा आहे यासाठी की सत्य व असत्याचा सरळ सरळ फ़ैसला व्हावा. तेव्हा मुसलमानांमध्ये जे लोक कमकुवत होते त्यांना असे वाटू लागले की या साधन शून्य अवस्थेत एवढ्या अल्पसंख्येने काफ़ीरांच्या एवढ्या मोठ्या लष्कराशी सामना करणे म्हणजे स्वत:ला मृत्यूच्या तोंडी देणे होय. म्हणून ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी या बाबतीत वाद करीत राहिले. त्यांचा हा आग्रह होता की लष्कराऐवजी काफ़ील्याचा रोख केला जावा. त्यांच्या या वर्तनावर येथे अंकुश ठेवण्यात आला आहे.

९. अर्थात एकतर काफ़ीला तुमच्या हाती लागेल किंवा लष्कर. हा सर्वश्रेष्ठ अल्लाहचा वायदा होता व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी याबाबत ईमान बाळगणाऱ्यांना आधीच सूचना दिली होती. युद्ध विषयक योग्य गोष्टी लक्षात घेता बाब स्पष्ट ठेवली गेली होती परंतु नंतर जेव्हा मदीनेहून प्रस्थान होऊ लागले तेव्हा पैगंबरांनी स्पष्टपणे फर्माविले की, लष्कराशीच मुकाबला करावयाचा आहे. अशासाठी की ईमान बाळगणाऱ्यांनी युद्धाच्या तयारीनिशी निघावे.

स्पष्ट असावे की घटनांच्या क्रम बद्धतेत कथन कर्ते व पैगंबर चरित्र लिहीणाऱ्यांकडून काही चुका झाल्या आहेत यास्तव घटनेचे यथार्थ चित्र समोर येत नाही उदा. चरीत्र लेखक इब्ने इसहाक चे हे निवेदन की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी काफ़ील्यास लक्ष्य बनवून मदीनेहून निघाले होते आणि नंतर मार्गात लोकांना सांगितले की लष्कराशी मुकाबला करावयाचा आहे. घटनांच्या या चुकीच्या क्रमबद्धतेने इस्लाम विरोधकांना आक्षेप घेण्यास वाव दिला. परंतु क़ुरआनाचे निवेदन जे वरून चालत आले ते या कथनांचे खंडन करते कारण त्यात स्पष्टपणे हे सांगितले गेले आहे की मदीनेहून निघण्यापूर्वीच ही गोष्ट स्पष्ट झाली होती की लष्कराशी सामना आहे आणि म्हणूनच मुसलमानांच्या एका समूहाला मुकाबल्यासाठी निघणे अप्रिय वाटले व तो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी याच समस्येवर वाद करीत राहिला यास्तव या कथनांना क़ुरआनाच्या दृष्टीकोनातून पाहिले जावे, क़ुरआनास कथनांच्या दृष्टीकोनातून नव्हे.

हेहि स्पष्ट असावे की काफ़िल्यावर जर हल्ला केला गेला असता तर ही एखादी चुकीची गोष्ट झाली नसती कारण कुरेश हे मुसलमानांशी युद्ध करण्यास प्रवृत्त होते आणि युद्ध जन्य स्थितीत शत्रूचे सामर्थ्य नष्ट करण्याकरिता त्यांच्या काफ़िल्यावर हल्ला करणे व त्यांच्या अर्थव्यवस्थेवर घाव घालणे कदापि आक्षेपार्य नाही आणि जर ही एखादी सदोष बाब असती तर क़ुरआनानने हे सांगितले नसते की ''दोन समूहांपैकी कोणताहि एक जरूर तुमच्या हाती लागेल'' किंबहुना असे सांगितले असते की सैन्य तुमच्या हाती लागेल' परंतु ज्याअर्थी काफीला हाती लागल्याने सत्य व असत्याचा भेद प्रकट होऊ शकत नव्हता व हा गैरसमज निर्माण केला जाऊ शकत होता की मुसलमानांचे उद्दिष्ट केवळ काफ़ीला लुटणे हेच होते, म्हणूनच सर्वश्रेष्ठ अल्लाहने काफ़ील्यास मुसलमानांच्या तावडीत येऊ दिले नाही व सैन्याशी मुकाबला करण्याकरिता त्यांना आणून उभे केले आणि जेव्हा अल्लाहच्या मदतीने ते प्रभावी झाले तेव्हा हे सिद्ध झाले की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी युद्धाचा जो कार्यक्रम बनविला होता तो अगदी योग्य होता अर्थात हे सर्व काही ईश-मार्गदर्शनान्वये व त्याच्या समर्थनामुळे घडले.

१०. ''ज्यात काटा नाही तो समूह'' म्हणजे कमकुवत समूह अभिप्रेत व्यापारी काफ़िला होय. ज्याअर्थी हा काफीला फक्त चाळीस व्यक्तिंचा होता म्हणून युद्ध केल्याशिवाय त्यावर वर्चस्व प्राप्त केले जाऊ शकत होते.

११. अर्थात आपल्या आदेशांद्वारे:

१२. उघड आहे, हे उद्दिष्ट युद्धा द्वारेच साध्य केले जाऊ शकत होते.

१३. म्हणजे काफिरांना.

१४. मुसलमानांनी मदती करिता सर्वश्रेष्ठ अल्लाहशी प्रार्थना केली होती आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) रात्रभर प्रार्थना करण्यात मग्न होते व सकाळी युद्ध भूमीवर त्यांच्या जिव्हेवर ही वचने होती.

''हे ईश्वर जो वायदा तू माझ्याशी केला आहेस तो पूर्ण कर आणि प्रदान कर ती गोष्ट जिचा तू वायदा केला आहेस. हे ईश्वर ! जर इस्लाम बाळगणाऱ्यांची ही मुठभर जमात आज नाश पावली तर मग तुझी उपासना होणार नाही.''

(मुस्लिम, किताबुल् जिहाद)

१५. म्हणजे फिरिश्त्यांच्या अवतरणाची जी खबर तुम्हाला दिली गेली होती तिचा हा अर्थ नव्हता की फिरिश्ते स्वत: येऊन लढतील व तुम्हाला ना काफ़ीरांचा मुकाबला करावयाचा आहे, ना आपला जीव धोक्यात टाकावयाचा आहे, किंबहुना याचा अर्थ तुम्हाला फक्त ही खुशखबरी ऐकवायची होती की जर तुम्ही काफिरांच्या मुकाबल्यास सर्व शक्तिसह उभे राहिले व लढण्या-मरण्यास सज्ज झाले तर त्या नाजूक प्रसंगी तुम्हाला स्थिर

ठेवण्यास तुमचा निर्धार उंचाविण्यास व तुमच्या आघातांना परिणामकारक बनविण्यास ते तुमची मदत करतील जसे की आयत क्र.१२ मध्ये स्पष्ट केले गेले आहे आणि ही सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे फार मोठी मदत होती कारण ज्या फौजेचा उत्साह उंच असेल व जी अगदी जीवावर उदार झालेली असावी तर तिला कोणीहि पराभूत करू शकत नाही. आणि म्हणूनच बद्र युद्धात मुसलमान वस्तुत: त्यांच्या व काफ़िरांच्या दरम्यान एकास तीन या प्रमाणाने प्रभावी ठरले. परंतु जर फिरिशत्यांच्या अवतरण्याचा हेतु प्रत्यक्षत: काफ़िरांशी लढणे हा असता तर त्यासाठी एकच फिरिश्ता पुरेसा होता. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहचा हा विधिनियम नव्हे. सत्य-असत्याचा संघर्ष दोन्ही पक्षांकरिता कठीण परिक्षेने युक्त असतो. असत्य वाद्यांना आपल्या निकृष्ट भावना व्यक्त करण्याची संधी लाभते आणि सत्य बाळगणाऱ्यांना आपली गुणवत्ता दाखविण्याची संधी लाभते. परंतु ज्याअर्थी सत्य बाळगणारे संख्येने थोडे व साधन मासुग्री विना असतात म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाह फिरिश्त्यांद्वारे त्यांची मदत करतो व जेथपावेतो अल्लाहच्या मदतीचा संबंध आहे ती सत्य बाळगणाऱ्यांनाच होते मग ते संख्येने कमी असोत वा अधिक.

१६. म्हणजे हा शुभसमाचार दिला गेला नसता तरी तुम्ही समाधान राखले पाहिजेत होते की अल्लाहची मदत अवश्य येईल व जेव्हा मदत येते. अल्लाहच्याच कडून येते फिरिश्ते स्वत: कोणाची मदत करीत नाही; किंबहुना जेव्हा अल्लाहचा हुकुम होतो तेव्हा फिरिश्ते मदती करिता पोहचतात.

१७. ही त्या रात्रीची घटना होय. जिच्या प्रात:काळी युद्ध झाले. ही रात्र मोठ्या विमनस्कतेची व दहशतीची होती. अर्थात अशा प्रसंगी झोप उडतेच. म्हणून बद्रच्या रात्री गाढ झोपेचा प्रश्नच नव्हता तथापि थोडीशी डुलकी घेणे आवश्यक होते ज्यायोगे सकाळी ताजेतवाने होऊन लढणे शक्य व्हावे. सर्वश्रेष्ठ अल्लाहने या प्रसंगी ईमान बाळगणाऱ्यांवर निद्रावस्था टाकली. त्यांचे भय नाहीसे झाले व सकाळी ताजेतवाने होऊन ते लढण्या योग्य झाले.

१८. बद्र च्या रात्री मुसलमान पाण्याकरिता त्रस्त होते.सर्वश्रेष्ठ अल्लाहने पाऊस वर्षाविला ज्यामुळे तऱ्हे तऱ्हेचे लाभ घडले प्रवासाच्या धुळीपासून शरीराला स्वच्छ करण्याकरिता स्नानाची गरज होती व याहून जास्त गरज वुज़ू व तहारत (शौचादि नंतर स्वच्छ शुद्ध होण्याचा विधी) करिता होती. मुसलमान एका खुल्या मैदानात पडले होते म्हणून पावसाने त्यांना स्नान घालून स्वच्छ केले व त्यांनी हौद बनवून पाणी देखील जमा केले. पावसाचा दुसरा लाभ हा झाला की सैतानाने मनात उद्‌भविलेले कुविचार दूर झाले. कारण पाणी न मिळल्यामुळे सैतान मनात निरनिराळे विचार निर्माण करीत होता. विशेषत: हा विचार की परिस्थिती मुसलमानांना अनुरूप नाही. तिसरा लाभ हा झाला की पावसाने टवटवी निर्माण केली आणि मुसलमानांनी यास अल्लाहच्या मदतीचे चिन्ह मानले ज्यामुळे त्यांची मने बळकट झालीत. चौथा लाभ हा की ज्या ठिकाणी मुसलमान वास्तव्य करून होते तेथली वाळू पावसामुळे घट्ट झाली व सैन्याचे पाय स्थिरावले अशा प्रकारे हा पाऊस मुसलमानांच्या हक्कात इतका लाभदायक ठरला की त्याने युद्धाची कायाच पालटून टाकली दुसरीकडे हाच पाऊस काफ़िरांकरिता हानीकारक ठरला. अशासाठी की ते ज्या ठिकाणी वास्तव्याला होते तेथे चिखलच चिखल झाला ज्यामुळे सैन्याला चालणे व पाय स्थिरावणे कठीण झाले.

# बद्र चा मार्ग, मदीना, मक्का व सीरिया (शाम)पासून



إِذْ يُوحِي رَبُّكَ إِلَى الْمَلَائِكَةِ أَنِّي مَعَكُمْ فَثَبِّتُوا الَّذِينَ آمَنُوا ۚ
سَأُلْقِي فِي قُلُوبِ الَّذِينَ كَفَرُوا الرُّعْبَ فَاضْرِبُوا فَوْقَ
الْأَعْنَاقِ وَاضْرِبُوا مِنْهُمْ كُلَّ بَنَانٍ ﴿١٢﴾

**१२.** त्या वेळी तुमचा पालनकर्ता फिरिश्त्यांना 'वही' द्वारे हुकुम देत होता की मी तुमच्या सोबत आहे. तुम्ही ईमान बाळगणाऱ्यांना स्थैर्यशील राखावे [१९] मी काफ़िरांच्या मनात धाक बसवून देईन. तेव्हा तुम्ही आघात करा यांच्या मानेवर व आघात करा यांच्या एकेक बोटावर. [२०]

ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ شَاقُّوا اللَّهَ وَرَسُولَهُ ۚ وَمَن يُشَاقِقِ اللَّهَ
وَرَسُولَهُ فَإِنَّ اللَّهَ شَدِيدُ الْعِقَابِ ﴿١٣﴾

**१३.** हे अशासाठी की यांनी अल्लाह व त्याच्या प्रेषिताचा विरोध केला आणि जो अल्लाह व त्याच्या प्रेषिताचा विरोध करील तर अल्लाह त्यास सक्त शिक्षा देणारा आहे.

ذَٰلِكُمْ فَذُوقُوهُ وَأَنَّ لِلْكَافِرِينَ عَذَابَ النَّارِ ﴿١٤﴾

**१४.** ही आहे शिक्षा तुमची,तेव्हा चाखा तिची गोडी आणि काफ़िरांकरिता आगीची शिक्षा आहे.[२१]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا إِذَا لَقِيتُمُ الَّذِينَ كَفَرُوا زَحْفًا
فَلَا تُوَلُّوهُمُ الْأَدْبَارَ ﴿١٥﴾

**१५.** हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! जेव्हा एका सैन्याच्या रूपाने तुमचा काफ़िरांशी मुकाबला होईल तेव्हा त्यांना पाठ दाखून नका.

وَمَن يُوَلِّهِمْ يَوْمَئِذٍ دُبُرَهُ إِلَّا مُتَحَرِّفًا لِّقِتَالٍ
أَوْ مُتَحَيِّزًا إِلَىٰ فِئَةٍ فَقَدْ بَاءَ بِغَضَبٍ مِّنَ اللَّهِ
وَمَأْوَاهُ جَهَنَّمُ ۖ وَبِئْسَ الْمَصِيرُ ﴿١٦﴾

**१६.** आणि जो कोणी मुकाबल्याच्या दिवशी पाठ दाखविल याशिवाय की तो युद्धाचा पवित्रा म्हणून असे करील किंवा (आपल्याच) एखाद्या (सेना) समूहाशी मिळू इच्छित असेल, तर तो अल्लाहच्या प्रकोपात घेरला जाईल व त्याचे ठिकाण जहन्नम आहे आणि पोहचण्याचे ते अत्यंत वाईट ठिकाण होय.[२२]

فَلَمْ تَقْتُلُوهُمْ وَلَٰكِنَّ اللَّهَ قَتَلَهُمْ ۚ
وَمَا رَمَيْتَ إِذْ رَمَيْتَ وَلَٰكِنَّ اللَّهَ رَمَىٰ ۚ وَلِيُبْلِيَ الْمُؤْمِنِينَ
مِنْهُ بَلَاءً حَسَنًا ۚ إِنَّ اللَّهَ سَمِيعٌ عَلِيمٌ ﴿١٧﴾

**१७.** वस्तुतः तुम्ही त्यांना ठार केले नाही, किंबहुना अल्लाह ने त्यांना ठार केले आणि ( हे पैगंबर !) जेव्हा तुम्ही (माती) फेकली तर तुम्ही नाही फेकली किबंहुना अल्लाहने फेकली [२३] आणि हे एवढ्यासाठी घडले की अल्लाहने ईमान बाळगणाऱ्यांना एका सर्वोत्कृष्ट परीक्षेतून पार पाडावे. नि:संशय अल्लाह ऐकणारा व जाणणारा आहे.

ذَٰلِكُمْ وَأَنَّ اللَّهَ مُوهِنُ كَيْدِ الْكَافِرِينَ ﴿١٨﴾

**१८.** हे तर घडले आणि अल्लाह काफ़िरांच्या कलुप्त्यांना कमजोर करणारा आहे.[२४]

१९. हे ते काम होय जे फिरिश्त्यांना सोपविले गेले होते म्हणजे ईमान बाळगणाऱ्यांच्या अपेक्षा उंच राखणे यासाठी की त्यांना काफ़िरांशी अटीतटीने लढणे शक्य व्हावे राहिली ही गोष्ट की फ़िरिश्ते ईमान बाळगणाऱ्यांची अपेक्षा उचावण्यास कशाप्रकारे सहाय्यक ठरतात? तर ही अपरोक्षाशी संबंध असलेली गोष्ट आहे अर्थात ती जाणून घेण्याचे आम्हाजवळ कसलेहि साधन नाही. म्हणून फक्त एवढे समजून घेणे आमच्याकरिता पुरेसे आहे की ज्या प्रकारे सैतानाने कुविचार मनात उद्‌भविल्याने माणसाचे पाय डळमळू लागतात तव्द्‌तच फिरिश्त्यांद्वारे मनात विचार उद्‌भवल्याने पाय स्थिरावू लागतात.

२०. याचा हा अर्थ नव्हे की फिरिश्त्यांना काफिरांच्या मानेवर तलवार चालविण्याचा आदेश दिला गेला होता, असे असते तर त्यांच्या बोटावर आघात करण्याचा आदेश दिला गेला नसता किंबहुना फिरिश्त्यांना मान व बोटे यावर आघात करण्याचा आदेश दिला गेला होता.

कुरआनातील शब्द

فَاضْرِبُوا فَوْقَ الأَعْنَاقِ ''फ़ज्रिबू फौकल आनाक़''

अर्थात मान कापणे असा नव्हे किंबहुना मानेवर आघात करणे असा आहे. हा आघात त्याच प्रकारची अपरोक्ष वस्तुस्थिती जशी फिरिश्त्यांद्वारे ईमान बाळगणाऱ्यांना स्थैर्यशील राखणे अर्थात या गोष्टीचा संबंध सुप्त अवस्थेशी आहे. बाह्य कृतिशी नव्हे. फिरिश्त्यांद्वारे मानेवर आघात करण्याचा परिणाम असा झाला की त्यांच्या माना मुसलमानांच्या तलवारींच्या नेमात सहजगत्या आल्या आणि बोटांवर आघात करण्याचा परिणाम असा झाला की त्यांची पकड सैल झाली व मुसलमानांवर मजबूत हातांनी तलवार चालविणे त्यांना अशक्य झाले.

२१. म्हणजे जगात तुम्हाला ही शिक्षा मिळाली की फिरिश्त्यांचा प्रहार तुम्हावर पडला व तुम्ही अपमानित झालात. परंतु मामला इथेच संपला नाही. किंबहुना आखिरतची शिक्षा अजून बाकी आहे; कारण प्रत्येक काफ़िरास दोजख (जहन्नम) मध्ये दाखल होऊन आगीची शिक्षा भोगावयाची आहे.

२२. इस्लाम आपले धाडसी व तळहातावर शिर घेणारे सैनिक तयार करू इच्छितो जे अल्लाहला ध्येय मानून त्याच्या मार्गात आगे कूच करू इच्छितात म्हणून त्याच्या शब्दकोशात माघार घेणे व पळणे सारखे शब्दच नाही. क़ुरआन अशा लोकांना सक्त ताकीद ऐकविते जे काफ़िरांशी ऐन मुक़ाबल्याच्या वेळी पाठ फिरवितात व हदीसमध्येहि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी याची गणना सात प्राणघातक अपराधांमध्ये केली आहे.

وَالتَّوَلِّي يَوْمَ الزَّحْفِ (مسلم كتاب الايمان)

''आणि मुकाबल्याच्या दिवशी पाठ फिरवणे सात नष्ट करणाऱ्या अपराधांपैकी आहे.'' (मुस्लिम किताबुल् ईमान)

तथापि आयतीत वर्णन झाल्याप्रमाणे दोन प्रकार असे आहेत जे फरारच्या व्याख्येत येत नाही. पैकी एक हा की युद्धाचा डावपेच म्हणून माणसाने थोडे मागे हटावे व मग आवेगाने हल्ला चढवावा आणि दुसरा हा की आघाडी जवळ अन्य एखादा सैन्य-समूह हजर असावा, ज्यात सामील होऊन शत्रूपक्षाशी मुकाबला करणे युद्धाच्या दृष्टीने निकडीचे ठरावे.

२३. बद्र मध्ये जेव्हा रण-क्षेत्र थोडे तापले तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मूठभर वाळू شاهت الوجوه ''चेहरे बिघडोत यांचे''असे म्हणून काफिरांच्या सैन्याकडे फेकली व त्याबरोबरच मुसलमानांनी काफ़िरांवर हल्ला चढविला, परिणामी काफ़िरांचे मोठमोठे नेते मारले गेले व त्यांना मोठ्या दारूण पराभवाला तोंड द्यावे लागले. ही घटना सीरत इब्ने हिशाम' (भा. २ पा. २६८) या पुस्तकात उल्लिखित आहे. कुरआनाचा संकेत याच घटनेकडे आहे. अर्थात मुसलमानांच्या आघातांना परिणामकारक बनविणे व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फेकलेली वाळू काफिरांच्या डोळ्यात फेकणे हे अल्लाहचेच काम होते म्हणून या युद्धात मुसलमानांना जे यश लाभले ते अल्लाहच्याच मदतीमुळे.

२४. म्हणजे बद्रच्या युद्धात काफ़िरांचा पराभव तर झालाच. यानंतर देखील त्यांनी डावपेच लढविले तर अल्लाह त्यांचा प्रत्येक डाव कमजोर करील. आणि ही वस्तुस्थिती होय की त्यानंतर काफ़िरांनी अनेक कलुप्त्या योजल्या व निरनिराळी कारस्थाने रचली परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या सर्व कलुप्त्या व कारस्थानांना असफल केले. तात्पर्य इस्लामच्या उगवत्या क्रांतीला ते मुळीच रोखू शकले नाहीत.

# बद्र युद्धाचा नकाशा


मदीनेचा मार्ग
सफरा दरी
दरीचा जवळचा किनारा
(अल्-उद्वतुद्दुनिया)
पैगंबरानी ज्या ठिकाणी
सैन्याचे नेतृत्व केले ती जागा
मुसलमानांचे सैन्य
हौद
शहीदांचे कब्रस्तान
पश्चिमेकडील पर्वत रांगा
या दिशेने अबू सुफ़ियानचा काफ़िला
खालच्या बाजूने निघून गेला होता
(والركب اسفل منكم)
क़ल्बे बद्र
अर्थात ती विहीर जिच्यात
काफ़िरांची प्रेते टाकली गेली
दरीचा लांबचा किनारा
(अल्-उद्वतुलक़ुस्वा)
मक्केचा मार्ग
उत्तर
पश्चिम
पूर्व
दक्षिण

जर तुम्ही फैसला इच्छित होता तर बघा फैसला तुमच्या समोर आला आता दुष्कर्म सोडाल तर ते तुमच्या हक्कात अधिक चांगले आहे आणि जर तुम्ही पुन्हा तेच केले तर आम्ही देखील तेच करू आणि तुमचा जथा कितीका जास्त असेना, तुमच्या काहीहि कामी येणार नाही आणि अल्लाह ईमान बाळगणाऱ्यांसह आहे. (अल-क़ुरआन)

१९. जर तुम्ही फैसला इच्छित होता तर बघा फैसला तुमच्या समोर आला [२५] आता दुष्कर्म सोडाल तर ते तुमच्या हक्कात अधिक चांगले आहे आणि जर तुम्ही पुन्हा तेच केले तर आम्ही देखील तेच करू [२६] आणि तुमचा जथा कितीका जास्त असेना, तुमच्या काहीहि कामी येणार नाही आणि अल्लाह ईमान बाळगणाऱ्यांसह आहे. [२७]

إِنْ تَسْتَفْتِحُوا فَقَدْ جَاءَكُمُ الْفَتْحُ ۖ وَإِنْ تَنْتَهُوا فَهُوَ خَيْرٌ لَكُمْ ۖ وَإِنْ تَعُودُوا نَعُدْ وَلَنْ تُغْنِيَ عَنْكُمْ فِئَتُكُمْ شَيْئًا وَلَوْ كَثُرَتْ وَأَنَّ اللَّهَ مَعَ الْمُؤْمِنِينَ ﴿١٩﴾

२०. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! अल्लाह व त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन करा व त्यापासून तोंड फिरवू नका ज्याअर्थी तुम्ही ऐकत आहात. [२८]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا أَطِيعُوا اللَّهَ وَرَسُولَهُ وَلَا تَوَلَّوْا عَنْهُ وَأَنْتُمْ تَسْمَعُونَ ﴿٢٠﴾

२१. आणि त्या लोकांसारखे होऊ नका ज्यांनी म्हटले आम्ही ऐकले वस्तुत: ते काहीच ऐकत नाहीत. [२९]

وَلَا تَكُونُوا كَالَّذِينَ قَالُوا سَمِعْنَا وَهُمْ لَا يَسْمَعُونَ ﴿٢١﴾

२२. अल्लाहच्या जवळ सर्वात निकृष्ट जनावरे ते बधिर व मूके लोक होत जे बुद्धीने काम घेत नाहीत. [३०]

إِنَّ شَرَّ الدَّوَابِّ عِنْدَ اللَّهِ الصُّمُّ الْبُكْمُ الَّذِينَ لَا يَعْقِلُونَ ﴿٢٢﴾

२३. जर अल्लाहला यांच्यात किंचितहि भलेपणा दिसून आला असता तर त्याने निश्चितच त्यांना ऐकण्याची सुबुद्धि प्रदान केली असती. परंतु जर (या विरहित) त्यांना ऐकविले असते तर त्यांनी त्याच्यापासून उपेक्षेने तोंड फिरवले असते. [३१]

وَلَوْ عَلِمَ اللَّهُ فِيهِمْ خَيْرًا لَأَسْمَعَهُمْ ۖ وَلَوْ أَسْمَعَهُمْ لَتَوَلَّوْا وَهُمْ مُعْرِضُونَ ﴿٢٣﴾

२४. हे ईमान बाळगणाऱ्यांनो !अल्लाह व त्याच्या प्रेषिताच्या पुकारण्यावर लब्बैक म्हणा ( होकार द्या) जेव्हा प्रेषित तुम्हाला अशा गोष्टीकडे बोलाविल जी तुम्हाला जीवन प्रदान करणारी आहे [३२] आणि जाणून असा की अल्लाह मनुष्य आणि त्याचे हृदय यांच्या दरम्यान आड येतो [३३] आणि हेहि जाणून असा की तुम्ही त्याच्या समोर एकत्रित केले जाल.

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا اسْتَجِيبُوا لِلَّهِ وَلِلرَّسُولِ إِذَا دَعَاكُمْ لِمَا يُحْيِيكُمْ ۖ وَاعْلَمُوا أَنَّ اللَّهَ يَحُولُ بَيْنَ الْمَرْءِ وَقَلْبِهِ وَأَنَّهُ إِلَيْهِ تُحْشَرُونَ ﴿٢٤﴾

२५. या युद्धाद्वारे अनेकेश्वरवादी सत्य व असत्याचा फैसला इच्छित होते व त्यांचा सरदार अबु जहलने दुआ (प्रार्थना) केली होती की, हे ईश्वर, आमच्यापैकी ज्या पक्षाने नाते संबंध तोडण्याचे अपराध-कृत्य सर्वाधिक केले असेल त्याला तू नष्ट कर.सर्वश्रेष्ठ अल्लाहने मुसलमानांना या युद्धात यशस्वी व अनेकेश्वरवाद्यांना असफल करून फैसला केला की मुसलमान सत्यावर आहेत व अनेकेश्वरवादी असत्यावर.

२६. अनेकेश्वरवाद्यांना हा उपदेशहि आहे व ताकीदहि. उपदेश असा की बद्रच्या युद्धात जाहीर झालेल्या ईश्वरी निर्णयास पाहिल्यानंतर जर तुम्ही इस्लामशी वैर राखणे सोडून द्याल तर ते तुमच्याच हक्कात अधिक चांगले ठरेल की अपमान व विनाशापासून वाचाल. आणि ताकीद अशी की जर तुम्ही इस्लामशी वैर राखण्याचे तेच वर्तन अंगिकारले तर आम्ही पुन्हा तुमच्यावर आपल्या चाबुकाचा वर्षाव करू.

२७. क़ुरआनाचे हे भाकितहि शब्दशः खरे ठरले. मूर्तिपूजकांनी त्यानंतर देखील इस्लाम व त्याच्या पैगंबरांविरुद्ध लढाया केल्या परंतु त्यांचे मोठमोठे जथे त्यांच्या काहीहि उपयोगी पडले नाहीत; उलट त्यांना तोंडघशी पडावे लागले. कुफ्र आणि ईमान यांच्या दरम्यान लढल्या जाणाऱ्या या लढ्यांपैकी प्रत्येक लढाईत असे दिसून आले की अल्लाहची मदत ईमान बाळगणाऱ्यांसह आहे.

२८. म्हणजे जेव्हा अल्लाह व त्याच्या प्रेषिताचा आवाज तुमच्या कानांपर्यंत पोहचत आहे तेव्हा सर्व काही ऐकून अवज्ञा करणे किती चुकीचे व केवढ्या मोठ्या अपराधाची बाब होय !

२९. संकेत यहुदींकडे आहे. जे अल्लाहचे आदेश ऐकून घेतल्यानंतर अवज्ञा करीत राहिले. ते ऐकत होते, परंतु त्यांचे ऐकणे मान्य करण्याच्या अर्थाने नव्हते.

३०. म्हणजे जे लोक आपल्या बुद्धिचा वापर करीत नाही. ते सत्य गोष्ट ऐकण्याकरिता बधीर व सत्य बोलण्याकरिता मुके बनतात. असे लोक मनुष्य नव्हेत किंबहुना जनावरे होत किंबहुना जनावरांपेक्षाहि निकृष्टतम.

तात्पर्य धर्माचे खऱ्या मनाने अनुसरण करण्याकरिता या गोष्टीची नितांत गरज आहे की माणसाने हे समजून घेण्याचा प्रयत्न करावा की ज्या धर्माला त्याने कबुल केले आहे त्याच्या निकडी कोणत्या आहेत व ईमान बाळगत्यानंतर त्याला कोणत्या जबाबदाऱ्या लागू पडतात.

३१. म्हणजे जे लोक बुद्धिने काम घेत नाहीत ते सत्यस्वीकृति पासून वंचित राहतात आणि त्यांना ऐकण्याची व समजून घेण्याची सुबुद्धि सर्वश्रेष्ठ अल्लाह यासाठी देत नाही की त्यांच्यात मांगल्या-प्रियता नसते. तेव्हा उघड आहे की चांगल्या पिकाकरिता केवळ बियाणे चांगले असणे पुरेसे नाही किंबहुना त्यासाठी ज़मीन देखील चांगली असणे फार आवश्यक आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या स्वभावात मांगल्य प्रियता राखली होती. परंतु त्यांनी आपला गुणधर्म सोडून दिला म्हणून जर त्यांना काही ऐकविले गेले असते तरी त्यांनी त्याचा प्रभाव आत्मसात केला नसता.

३२.म्हणजे प्रेषित ज्या सेवेसाठी तुम्हाला आवाहन करील, व ज्या गोष्टीचा देखील आदेश देईल त्याची अंमलबजावणी करणे तुमच्याकरिता पूरेपूर जीवन आहे, कारण प्रेषिताचा प्रत्येक आदेश हृदयाला जागृत करणारा व आत्म्यास सचेत करणारा असतो, तो आचरणात आणल्याने मांगल्य भावना वाढीस लागतात व माणसाच्या अंतरंगात जीवन प्रवाह वाहू लागतो. चैतन्यशील जीवनाची ही अशी अवस्था आहे जी प्रेषिताचे अनुसरण करणाऱ्यास या जगातच जाणवू लागते. राहीली आखिरत तर तेथे प्रेषिताचे अनुसरण करणाऱ्यानाच अनंत जीवनाचा लाभ घडेल.

३३. म्हणजे तुम्ही या गोष्टीचे भय बाळगले पाहिजे की जर तुम्ही अल्लाह व त्याच्या प्रेषिताच्या एखाद्या आदेशाविरूद्ध वर्तन केले तर तुमची मने आज्ञापालनापासून परावृत्त न व्हावीत. اَللّٰهُ مُقَلِّبُ الْقُلُوْب ''अल्लाहु मुकल्लीबुल कुलूब'' ''म्हणजे हृद यांची स्थिती बदलविणारा आहे.'' जेव्हा तो हे पाहतो की एखादा माणूस अवज्ञेवर अवज्ञा करीत चालला आहे तर मग त्याच्या मनाला अवज्ञेकरिता अनुकूल बनवितो. त्या नंतर आज्ञापालनाचे वर्तन अंगिकारण्यास स्वभावतः तो माणूस तयार होत नाही.

**जानता हूँ सवाब ताअत व ज़ुहद**
**पर तबीअत इधर नहीं आती !**

२५. आणि अलिप्त रहा त्या उपद्रवापासून ज्याच्या नेमात केवळ तेच लोक येणार नाहीत ज्यांनी तुमच्यापैकी अत्याचार केला असेल [३४] आणि हेहि जाणून असा अल्लाह शिक्षा देण्यात फार सक्त आहे.

وَاتَّقُوْا فِتْنَةً لَّا تُصِيْبَنَّ الَّذِيْنَ ظَلَمُوْا مِنْكُمْ
خَآصَّةً ۚ وَاعْلَمُوْٓا اَنَّ اللّٰهَ شَدِيْدُ الْعِقَابِ ﴿۲۵﴾

२६. आणि आठवा ती वेळ जेव्हा तुम्ही थोडे होते आणि जमीनीवर कमजोर समजले जात होते. तुम्हाला असे भय होते की लोक तुम्हाला जबरदस्ती पकडून उचलून नेतील [३५] मग अल्लाहने तुम्हाला आश्रय दिला [३६] आणि आपल्या मदतीने तुम्हाला सामर्थ्य प्रदान केले आणि चांगली उपजिविका दिली अशासाठी की तुम्ही कृतज्ञ व्हावे.

وَاذْكُرُوْٓا اِذْ اَنْتُمْ قَلِيْلٌ مُّسْتَضْعَفُوْنَ فِى الْاَرْضِ تَخَافُوْنَ
اَنْ يَّتَخَطَّفَكُمُ النَّاسُ فَاٰوٰىكُمْ وَاَيَّدَكُمْ بِنَصْرِهٖ وَرَزَقَكُمْ
مِّنَ الطَّيِّبٰتِ لَعَلَّكُمْ تَشْكُرُوْنَ ﴿۲۶﴾

२७. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! अल्लाह व प्रेषिताशी विशवासघात करू नका [३७] आणि ना आपल्या अमानतींमध्ये जाणून बुजून विश्वास घात करू लागा. [३८]

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا لَا تَخُوْنُوا اللّٰهَ وَالرَّسُوْلَ وَتَخُوْنُوْٓا
اَمٰنٰتِكُمْ وَاَنْتُمْ تَعْلَمُوْنَ ﴿۲۷﴾

२८. आणि जाणून असा की तुमची धनसम्पत्ति व तुमची संतति कसोटी आहे [३९] आणि हे की अल्लाहच्याच जवळ फार मोठा मोबदला आहे.

وَاعْلَمُوْٓا اَنَّمَآ اَمْوَالُكُمْ وَاَوْلَادُكُمْ فِتْنَةٌ ۙ وَّاَنَّ اللّٰهَ
عِنْدَهٗٓ اَجْرٌ عَظِيْمٌ ﴿۲۸﴾

२९. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! जर तुम्ही अल्लाहशी भय बाळगित राहिलात तर तो तुम्हाला ''फुर्कान'' (सत्य व असत्यामधील फरक जाणण्याची शक्ति) प्रदान करील [४०] आणि तुमच्या दुष्कर्मांना तुमच्या पासून दूर करील व तुम्हाला माफ करील [४१] अल्लाह मोठी कृपा बाळगणारा आहे.

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْٓا اِنْ تَتَّقُوا اللّٰهَ يَجْعَلْ لَّكُمْ فُرْقَانًا
وَّيُكَفِّرْ عَنْكُمْ سَيِّاٰتِكُمْ وَيَغْفِرْ لَكُمْ ؕ وَاللّٰهُ ذُو الْفَضْلِ
الْعَظِيْمِ ﴿۲۹﴾

३०. आणि (हे पैगंबर ! ती वेळ आठवा) जेव्हा काफ़ीर तुमच्या विरूद्ध कट-कारस्थान करीत होते ज्यायोगे तुम्हाला कैद करावे किंवा तुमची हत्त्या करावी अथवा तुम्हास देशाबाहेर घालवावे [४२] ते आपले डाव चालवित होते आणि अल्लाह त्यांना उधळून लावीत होता आणि अल्लाह चांगली उपाय-योजना करणारा आहे. [४३]

وَاِذْ يَمْكُرُ بِكَ الَّذِيْنَ كَفَرُوْا لِيُثْبِتُوْكَ اَوْ يَقْتُلُوْكَ
اَوْ يُخْرِجُوْكَ ؕ وَيَمْكُرُوْنَ وَيَمْكُرُ اللّٰهُ ؕ وَاللّٰهُ
خَيْرُ الْمٰكِرِيْنَ ﴿۳۰﴾

३४. अभिप्रेत सामूहिक उत्पात होत ज्यांची आग जेव्हा भडकते तेव्हा चांगले आणि वाईट सगळेच तिचे भक्ष्य ठरतात. यापासून सुरक्षित राहण्याकरिता या गोष्टीची आवश्यकता आहे की समाजाचे सामूहिक अंतर्मन जागृत असावे व त्याने एखादा उत्पात डोके वर काढीत असलेला पाहून तत्क्षणीच तो दाबून टाकण्याचा प्रयत्न करावा आणि आग लावणाऱ्यांचे हात त्याचवेळी धरावेत.विशेषत: युद्ध-स्थितीत अधिक सावध राहण्याची गरज आहे.ती अशी की समाजाच्या एखाद्या क्षेत्रातून एखादा उत्पात दृगोचर न व्हावा अन्यथा अशा नाजुक प्रसंगी मुसलमानांची एकता क्षत-विक्षत होऊ शकते.

या आज्ञेनुसार जोपर्यंत मुसलमान वागत राहिले, तो पर्यंत त्यांच्यात कोणत्याहि उत्पाताने डोके वर काढले नाही. परंतु नंतरच्या काळात जेव्हा मुस्लिम समाजात प्रत्येक प्रकारचे लोक सामील झाले व या तात्विक आज्ञेला विचाराधीन राखू शकले नाहीत तेव्हा निरनिराळ्या प्रकारचे उत्पात निर्माण झाले व संपूर्ण समाजाला या उत्पातांना तोंड द्यावे लागले.

३५. जोपर्यंत मुसलमान मक्केत राहिलेत तोपर्यंत त्यांची हीच स्थिती राहिली.

३६. म्हणजे मदीनेत, जेथे मुसलमान स्थलांतरीत झाले.

३७. विश्वासघातशी अभिप्रेत निष्ठाहीनता होय. अर्थात हे की अल्लाह व त्याच्या प्रेषिताशी निष्ठा राखण्याची जी प्रतिज्ञा तुम्ही केली आहे तिच्यावर दृढतेने क़ायम रहा व असे कोणतेहि कृत्य करू नका ज्याने तुमची निष्ठा संशयास्पद व्हावी. अल्लाह व त्याच्या प्रेषिताशी निष्ठा राखण्याची कसोटी विशेषत: त्याचवेळी होते जेव्हा कुफ्र आणि इस्लाम यांच्या दरम्यान युद्ध होते.

३८. येथे अमानतीशी अभिप्रेत जबाबदाऱ्या होत व त्यात विश्वासघात करण्याचा अर्थ असा की त्या पार पाडण्याबाबात माणसाने बेपर्वा व्हावे किंवा कर्तव्यशून्य असल्याचा पुरावा द्यावा.

अमानतींचे वर्तुळ व्यापक आहे यासंबंधीचे स्पष्टीकरण सूरह निसा टीप क्र. १२३ मध्ये आले आहे. येथे प्रामुख्याने त्या जबाबदाऱ्यांना मन:पूर्वक व निष्ठेने अदा करण्याची ताकीद केली गेली आहे ज्या मुसलमानांच्या सामूहीक व्यवहारांशी संबंधित आहे.

३९. माणसाने विश्वासघात करण्याचे मोठे कारण संपत्ति व संततिचा वाढता मोह, म्हणून त्यांची ही वस्तुस्थिती स्पष्ट केली गेली आहे की ह्या गोष्टी ऐहिक जीवनात कसोटी म्हणून आहेत. यांच्याद्वारे हे पारखून पाहिले जाते की कोण संपत्ति व संततिच्या मोहात अडकून अल्लाह व त्याच्या प्रेषिताशी कृतघ्नता करतो,व कोण अल्लाह व त्याच्या प्रेषिताशी खऱ्या अर्थाने एकनिष्ठ असल्याचा पुरावा देतो.

४०. अर्थात खऱ्या-खोट्यातले तारतम्य पारखण्याची गुणवत्ता निर्माण करील, मग जीवनाच्या प्रत्येक वळणवर तुम्हाला असे दिसून येईल की स्वच्छ सरळ मार्ग कोणता आहे व प्रत्येक कठीण प्रसंगी तुमची दृष्टि सत्याच्या दिशेने तुमचे मार्गदर्शन करील.

जीवन व्यवहारात ईमान बाळगणाऱ्यांना पावलो पावली नवनवीन समस्यांना तोंड द्यावे लागते व विविध उत्पातांशीहि त्यांना सामना करावा लागतो. अशा प्रसंगी क़ुरआन व प्रेषित आचरणाच्या तात्वित मार्गदर्शनाच्या उजेडाच आचार-संहिता निश्चित करण्याची गरज असते अशा प्रसंगी अंतर्दृष्टिच योग्य आचरणाची दिशा दाखविते व ही दृष्टि ईश भयाच्या परिणामी निर्माण होते. याच अंतर्दृष्टिला व तारतम्य पारखण्याच्या शक्तिला येथे "फ़ुर्क़ान" म्हटले गेले आहे.

४१. माणसाचे जीवन जर ईश-भयाने युक्त असेल तर सर्व श्रेष्ठ अल्लाह त्याची दुष्कर्मे त्याच्यापासून दूर करतो म्हणजे अपराधांचे कलंक मिटवितो व त्याला सुधारणेची सुबुद्धि प्रदान करतो अशा प्रकारे त्याच्या चारित्र्यात गुणवैशिष्ट्ये प्रकट होऊ लागतात व जे लहान मोठे अपराध त्याच्या हातून घडलेले असतील त्यांना तो आपल्या कृपेने माफ करतो.

४२. संकेत आहे कुरेशच्या त्या कारस्थानांकडे जी ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विरुद्ध मक्केत करीत होते. दारून्नदवा मध्ये त्यांच्या सरदारांचे जे सम्मेलन झाले होते त्यात निरनिराळ्या योजनांवर विचार विमर्श केला गेला होता. कोणी ही योजना करीत होता की पैगंबरांना कैद केले जावे तर कोणी त्यांना देशातून काढण्यास सांगत होता शेवटी त्यांना ठार करण्याबाबत सर्वांचे एकमत झाले व ही योजना अशा तऱ्हेने पार पाडण्याचे ठरले की प्रत्येक कबिल्यामधून एक एक तरुण निवडला जावा व त्या सर्वांनी एकत्र होऊन पैगंबरांवर हल्ला करावा व त्यांना ठार करावे. अशा रीतीने त्यांच्या वधाचे सर्वजण वाटेकरी ठरतील व बनी हाशीमचे खानदान सर्वांशी सूड घेऊ शकणार नाहीत म्हणून त्यांना रक्त दंड (Blood money) घ्यावास राजी व्हावे लागेल. ही अबुजहलची योजना होती व त्यानुसार एका रात्री सर्वांनी मिळून पैगंबराच्या घराला वेढा घातला. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना सूचित केले होते म्हणून ते त्या आधीच घरातून निघून गेले होते यास्तव या लोकांचे कारस्थान असफल झाले.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) शांतपणे निघाले होते "ग़ारे सौर' या ठिकाणी पोहचून त्यांनी तेथे तीन दिवस आश्रय घेतला. त्यानंतर मदीना शहरी स्थलांतर केले व

येथूनच हिजरी सनाला आरंभ झाला (ही घटना सीरत इब्ने हिशाम मध्ये विवरणासह उल्लेखित आहे. खंड २ पृष्ठ ९२)

४३. कुरेश ने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची हत्या करण्याचा कट रचला होता परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशी युक्ति केली की कुरेश त्यांच्या केसालाहि धक्का लावू शकले नाहीत व पैगंबर कुशलपूर्वक मदीना शहरी पोहचले. हे स्थानंतर मुसलमानांकरिता लाभदायक ठरले व त्यांच्याकरिता वर्चस्व व यशाचा मार्ग खुलला.

## बद्रचे रणक्षेत्र



आणि जेव्हा त्यांच्या समोर आमच्या आयती (वचने) वाचल्या जात होत्या तेव्हा म्हणत, आम्ही ऐकले. जर आम्ही मनात आणले तर अशी वाणी आम्ही देखील सादर करू शकतो. ह्या तर केवळ पूर्वी होऊन गेलेल्या लोकांच्या कथा होत. आणि जेव्हा त्यांनी म्हटले होते की हे अल्लाह ! जर हे खरोखर सत्य आहे, तुझ्याच कडून आहे तर आमच्यावर आकाशातून दगडांचा वर्षाव कर किंवा आमच्यावर एखादी दुःखदायक शिक्षा अवतरीत कर. (अल-क़ुरआन)

३१. आणि जेव्हा त्यांच्या समोर आमच्या आयती (वचने) वाचल्या जात होत्या तेव्हा म्हणत, आम्ही ऐकले. जर आम्ही मनात आणले तर अशी वाणी आम्ही देखील सादर करू शकतो. ह्या तर केवळ पूर्वी होऊन गेलेल्या लोकांच्या कथा होत.

وَإِذَا تُتْلَىٰ عَلَيْهِمْ آيَاتُنَا قَالُوا قَدْ سَمِعْنَا لَوْ نَشَاءُ
لَقُلْنَا مِثْلَ هَٰذَا ۙ إِنْ هَٰذَا إِلَّا أَسَاطِيرُ
الْأَوَّلِينَ ٣١

३२. आणि जेव्हा त्यांनी म्हटले होते की हे अल्लाह! जर हे खरोखर सत्य आहे, तुझ्याच कडून आहे तर आमच्यावर आकाशातून दगडांचा वर्षाव कर किंवा आमच्यावर एखादी दुःखदायक शिक्षा अवतरीत कर.[४४]

وَإِذْ قَالُوا اللَّهُمَّ إِنْ كَانَ هَٰذَا هُوَ الْحَقَّ مِنْ عِنْدِكَ
فَأَمْطِرْ عَلَيْنَا حِجَارَةً مِنَ السَّمَاءِ أَوِ ائْتِنَا
بِعَذَابٍ أَلِيمٍ ٣٢

३३. आणि अल्लाह त्यांच्यावर शिक्षा अवतरीत करणार नव्हता जेव्हा तुम्ही (हे पैगंबर !) त्यांच्यात हजर होता [४५] आणि ना अल्लाह या स्थितीत त्यांना शिक्षा देणार आहे जेव्हा ते क्षमायाचना करीत असावेत. [४६]

وَمَا كَانَ اللَّهُ لِيُعَذِّبَهُمْ وَأَنْتَ فِيهِمْ ۚ وَمَا كَانَ اللَّهُ
مُعَذِّبَهُمْ وَهُمْ يَسْتَغْفِرُونَ ٣٣

३४. परंतु आता अल्लाहने त्यांना शिक्षा का म्हणून न द्यावी ज्याअर्थी ते मसजिदे हराम (काबागृहा) पासून रोखत आहेत, वस्तुतः ते त्याचे विश्वस्त नाहीत. त्याचे विश्वस्त तर ईश-भय बाळगणारेच असू शकतात [४७] परंतु त्यांच्या पैकी बहुतेक लोक जाणत नाहीत.

وَمَا لَهُمْ أَلَّا يُعَذِّبَهُمُ اللَّهُ وَهُمْ يَصُدُّونَ عَنِ الْمَسْجِدِ
الْحَرَامِ وَمَا كَانُوا أَوْلِيَاءَهُ ۚ إِنْ أَوْلِيَاؤُهُ إِلَّا الْمُتَّقُونَ
وَلَٰكِنَّ أَكْثَرَهُمْ لَا يَعْلَمُونَ ٣٤

३५. काबागृहाजवळ त्यांची नमाज शिट्या व टाळ्या वाजविणे याखेरीज काहीच नाही. [४८] तर आता चाखा ईश-शिक्षेची गोडी त्या कुफ्रच्या मोबदल्यात जे तुम्ही करीत राहीलात. [४९]

وَمَا كَانَ صَلَاتُهُمْ عِنْدَ الْبَيْتِ إِلَّا مُكَاءً وَتَصْدِيَةً ۚ
فَذُوقُوا الْعَذَابَ بِمَا كُنْتُمْ تَكْفُرُونَ ٣٥

३६. काफ़ीर आपली सम्पत्ति अल्लाहच्या मार्गापासून रोखण्याकरिता खर्च करीत आहेत. हे लोक खर्च करतील मग त्यांच्या करिता हा खर्च पश्चातापाचे साधन बनेल. मग ते प्रभावीत होतील. [५०]आणि ज्या लोकांनी कुफ्र केले त्यांना जहन्नमकडे हाकून लावले जाईल.[५१]

إِنَّ الَّذِينَ كَفَرُوا يُنْفِقُونَ أَمْوَالَهُمْ لِيَصُدُّوا عَنْ
سَبِيلِ اللَّهِ ۚ فَسَيُنْفِقُونَهَا ثُمَّ تَكُونُ عَلَيْهِمْ حَسْرَةً ثُمَّ
يُغْلَبُونَ ۗ وَالَّذِينَ كَفَرُوا إِلَىٰ جَهَنَّمَ يُحْشَرُونَ ٣٦

४४. ''बुख़ारी'' या हदीस संग्रहात आहे की ही गोष्ट कुरेश चे सरदार अबु जहलच्या मुखातून निघाली होती आणि इतर कथनांमध्ये नजर बिन हारिस याचाहि उल्लेख येतो. ही खरे पाहता प्रर्थना नव्हती, किंबहुना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या शत्रूत्वात भावनाविवश होऊन अशी वचने आपल्या मुखातून काढीत होते.

४५. म्हणजे जोपर्यंत अल्लाहचा प्रेषित मदीनेत होता ईश-शिक्षा येऊ शकत नव्हती कारण सर्वश्रेष्ठ अल्लाह एखाद्या वस्तीला अशाच वेळी शिक्षा करतो जेव्हा ती वस्ती प्रेषिताचे अस्तित्व सहन करण्यास तयार नसते व प्रेषिताने त्या वस्तीचा त्याग केलेला असावा.

४६. म्हणजे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी स्थलांतर केल्यानंतर त्यांच्या शिक्षेपासून बचावाची एकच स्थिती राहिली व ती ही की त्यांनी अल्लाहशी क्षमा याचना करावी. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे त्यांनी इस्लाम कबूल करावा.

४७. म्हणजे काबागृहाचा विश्वस्त होण्याचा हक्क केवळ अशाच लोकांना पोहचतो जे ईश-भय बाळगणारे असावेत व असे लोक तेच असू शकतात जे एकेश्वरवादास मान्य करणारे व ईश मार्गदर्शनावर ईमान राखणारे असावेत. या स्थितीत अनेकेश्वरवादी व काफ़ीर काबागृहाचे विश्वस्त कसे होऊ शकतात जेव्हा या घराच्या उभारणीचा हेतु एकेश्वराची उपासना व एकेश्वरवादाच्या आमंत्रणास सार्वत्रिक करणे हा होता व याची उभारणी करणारे हजरत इब्राहीम हे देखील शुद्ध एकेश्वरवादाचे ध्वज-रोहक होते.

अर्थात हे की काबागृहावर अनेकेश्वरवाद्यांनी जो अयोग्य कब्जा करून ठेवला आहे व मुसलमानांना त्यांच्या दर्शनापासून रोखत आहेत तर ते आपल्या या अत्याचार व अतिरेकापायी शिक्षेला यथायोग्य पात्र झाले आहेत. म्हणून जर अल्लाह मुसलमानांद्वारे यांचा नि:पात करून काबागृहावरील यांचा कब्जा दूर करील तर हे अगदी न्यायाला धरून होईल.

४८. स्पष्टीकरणा करिता पहा सूरह माऊन टीप क्र.५

४९. बद्र मध्ये काफ़िरांना जी चपराक बसली ती ईशशिक्षेचीच एक कडी होती.

ईश शिक्षा केवळ भूकंप व वादळाच्याच रूपाने यावी हे जरूरी नव्हे, ती युद्धाच्या विनाश स्वरूपातहि येऊ शकते आणि ही वस्तुस्थिती आहे की बद्र पासून हुनैन पर्यंत जा युद्धे झालीत त्यात विनाशाचे वाटेकरी काफ़ीरच ठरले.

५०. म्हणजे कुफ्र आणि इस्लाम दरम्यानच्या युद्धात काफ़िरांकरिता पराभव निश्चित आहे. ते इस्लामचा मार्ग रोखण्याकरिता आज सर्व शक्ति एकवटून जोर लावीत आहेत व आपले धन मुक्तहस्ते खर्च करीत आहेत परंतु याचा परिणाम त्यांच्या हक्कात पश्चातापाखेरीज आणखी काहीहि नाही.

५१. म्हणजे जे लोक अगदी शेवटपर्यंत कुफ्र नितीवर अटळ राहतील त्यांना जहन्नमच्या दिशेने ढकेलले जाईल.

لِيَمِيزَ اللَّهُ الْخَبِيثَ مِنَ الطَّيِّبِ وَيَجْعَلَ الْخَبِيثَ بَعْضَهُ
عَلَىٰ بَعْضٍ فَيَرْكُمَهُ جَمِيعًا فَيَجْعَلَهُ فِي جَهَنَّمَ ۚ أُولَٰئِكَ
هُمُ الْخَاسِرُونَ ﴿٣٧﴾

३७. अशासाठी की अल्लाहने अशुद्ध असलेल्यांना शुद्ध असलेल्यांपासून अलग करावे आणि अशुद्ध असलेल्यांना आपसात मिळवून एकत्र करावे व मग सर्वांना जहन्नम मध्ये टाकावे [५२] हेच लोक नाश पावणारे आहेत.

قُلْ لِلَّذِينَ كَفَرُوا إِنْ يَنْتَهُوا يُغْفَرْ لَهُمْ مَا قَدْ سَلَفَ
وَإِنْ يَعُودُوا فَقَدْ مَضَتْ سُنَّتُ الْأَوَّلِينَ ﴿٣٨﴾

३८. या काफ़िरांना सांगा, जर परावृत्त होतील तर जे काही पूर्वी होऊन गेले त्याकरीता त्यांना माफ केले जाईल.[५३] परंतु जर त्यांनी पुन्हा तेच वर्तन अंगिकारले तर भुतकालीन जनजाती समूहांच्या घटना घडल्या आहे.[५४]

وَقَاتِلُوهُمْ حَتَّىٰ لَا تَكُونَ فِتْنَةٌ وَيَكُونَ الدِّينُ كُلُّهُ
لِلَّهِ ۚ فَإِنِ انْتَهَوْا فَإِنَّ اللَّهَ بِمَا يَعْمَلُونَ بَصِيرٌ ﴿٣٩﴾

३९. आणि त्यांच्याशी लढा [५५] येथपावेतो की उत्पात न उरावा व धर्म संपूर्णत: अल्लाहकरिता व्हावा [५६] मग जर ते परावृत्त होतील तर अल्लाह त्यांच्या कर्मांना पाहणारा आहे. [५७]

وَإِنْ تَوَلَّوْا فَاعْلَمُوا أَنَّ اللَّهَ مَوْلَاكُمْ ۚ نِعْمَ الْمَوْلَىٰ
وَنِعْمَ النَّصِيرُ ﴿٤٠﴾

४०. आणि जर ते तोंड फिरवतील तर जाणून असा, अल्लाह तुमचा मौला (समर्थक) आहे. सर्वोत्कृष्ट मौला (समर्थक) व सर्वोत्कृष्ट सहाय्यक !

وَاعْلَمُوا أَنَّمَا غَنِمْتُمْ مِنْ شَيْءٍ فَأَنَّ لِلَّهِ خُمُسَهُ وَ
لِلرَّسُولِ وَلِذِي الْقُرْبَىٰ وَالْيَتَامَىٰ وَالْمَسَاكِينِ وَابْنِ
السَّبِيلِ إِنْ كُنْتُمْ آمَنْتُمْ بِاللَّهِ وَمَا أَنْزَلْنَا عَلَىٰ عَبْدِنَا يَوْمَ
الْفُرْقَانِ يَوْمَ الْتَقَى الْجَمْعَانِ ۗ وَاللَّهُ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ ﴿٤١﴾

४१. आणि जाणून असा की जो काही माले ग़नीमत [५८] तुम्ही प्राप्त केला आहे त्याच्या पाचवा हिस्सा अल्लाहकरीता व रसूल करिता आणि (रसूलचे) नातेवाईक, अनाथ व प्रवाशांकरिता आहे.[५९] जर तुम्ही ईमान राखीत असाल अल्लाहवर व त्या गोषटीवर जी आम्ही निर्णयाच्या दिवशी. [६०] ज्या दिवशी दोन्ही समूह एकमेकांशी भिडले होते, आपल्या दासांवर अवतरीत केली.[६१]आणि अल्लाह प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य बाळगून आहे.[६२]

إِذْ أَنْتُمْ بِالْعُدْوَةِ الدُّنْيَا وَهُمْ بِالْعُدْوَةِ الْقُصْوَىٰ وَ
الرَّكْبُ أَسْفَلَ مِنْكُمْ ۚ وَلَوْ تَوَاعَدْتُمْ لَاخْتَلَفْتُمْ فِي
الْمِيعَادِ ۙ وَلَٰكِنْ لِيَقْضِيَ اللَّهُ أَمْرًا كَانَ مَفْعُولًا لِيَهْلِكَ
مَنْ هَلَكَ عَنْ بَيِّنَةٍ وَيَحْيَىٰ مَنْ حَيَّ عَنْ بَيِّنَةٍ ۗ وَإِنَّ
اللَّهَ لَسَمِيعٌ عَلِيمٌ ﴿٤٢﴾

४२. त्यावेळी तुम्ही दरीच्या जवळील किनाऱ्यावर होता व ते दूरच्या किनाऱ्यावर आणि काफ़िला तमच्या पासून खालच्या बाजुला होता. जर तुम्ही आपसात लढाईचा ठराव करून निघाले असते तर तुम्ही कराराप्रत पोहचू शकले नसते [६३] परंतु जी गोष्ट घडणार होती तिला अल्लाह पूर्ण करू इच्छित होता [६४]ज्यायोगे ज्याला नष्ट व्हायचे आहे त्याने प्रमाण पाहून नष्ट व्हावे आणि ज्याला जिवंत राहायचे आहे त्याने प्रमाण पाहून जिवंत रहावे. [६५]नि:संशय अल्लाह ऐकणारा व जाणणारा आहे.

५२. अशुद्ध असलेले म्हणजे असे लोक जे शिर्क (अनेकेश्वरवाद) कुफ्र (सत्याचा इन्कार) व इलहाद (नास्तिकता) इत्यादिंच्या घाणीत बरबटलेले आहेत व शुद्ध असलेले म्हणजे ज्यांना ईमानाची शुचिर्भूतता लाभली.

क़ियामतीच्या दिवशी सर्वश्रेष्ठ अल्लाह काफ़िरांना मोमीनांपासून अलग करील, मग प्रत्येक प्रकारचे काफीर एकत्र करून घाणीच्या संपूर्ण ढीगाला जहन्नम मध्ये फेकून देईल.

५३. परावृत्त होणे शी अभिप्रेत कुफ्र व शिर्क पासून परावृत्त होणे. अर्थात हे की जर ते इस्लाम कबूल करतील तर यापूर्वी इस्लामच्या विरोधात ते जे काही करीत राहिले त्यावर अंकूश ठेवला जाणार नाही. सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याना माफ़ करील.

५४. म्हणजे जर ते पुन्हा काफ़िरांसारखे वागत राहिले तर अल्लाहचा शिक्षा-नियम त्यांना तसाच लागू पडेल ज्याप्रमाणे पूर्वीच्या काफ़िरांना उदा. आद, समूद व फिरऔन इत्यादिना लागू पडला होता.

५५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. २६६

५६. येथे काफ़िरांशी युद्ध जारी राखण्याचा जो आदेश दिला गेला आहे त्याचे दोन महत्वपूर्ण हेतु वर्णिले गेले आहेत एक हा की उत्पात मुळासकट नाश व्हावा व दुसरा हा की धर्म पूर्णपणे अल्लाहकरिता व्हावा या दोन्ही गोष्टींचा खरा अर्थ निश्चित करण्याकरिता आवश्यक आहे की आयत क्रम दृष्टीपथात ठेवला जावा.

वर मक्केतील काफीरांच्या मुसलमानांविरुद्ध हिंसक कारवायाचा उल्लेख आला आहे. एक हे की त्यांनी मुसलमानांना काबागृहाचा मार्ग रोखला, ते ना ''उमरा'' करू शकतात व ना हज्ज, दुसरे हे की ते इस्लामच्या सर्वाधिक महत्वपूर्ण उपासना स्थळाचे (काबागृहाचे) अयोग्य विश्वस्त बनले आहेत व त्याचा उपयोग अनेकेश्वरवादी रिती रीवाज पार पाडण्याकरिता करीत आहेत व तिसरे हे की अल्लाहचा मार्गा-इस्लाम -यापासून लोकांना रोखण्याकरिता आपली धनसम्पत्ति खर्च करीत आहेत म्हणजे युद्ध हेतुकरिता आपली साधने खर्ची पाडत आहेत. तसेच सूरह बकरा आयत १९१ मध्ये जेथे उत्पाता विषयी फर्माविले गेले आहे की तो हत्येपेक्षाही कठोर आहे, तिथेच काफ़ीरांच्या या अत्याचाराचा उल्लेख आला आहे की त्यांनी मुसलमानांना मक्का शहर सोडून जाण्यास भाग पाडले. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे त्यांना मुसलमानांचे मक्का शहरातील अस्तित्व मान्य नव्हते याच प्रकारची गोष्ट सूरह बक़रा आयत क्र. २१७ मध्येहि सांगितली गेली आहे. तात्पर्य त्यांचा खरा अपराध शिर्क (अनेकेश्वरवाद) होता व हाच अपराध ते काबागृहात करीत होते व या अपराधात अधिक कठोरता त्यांच्या हिंसक कारवायांनी निर्माण केली होती, म्हणून त्यांच्या शिर्कला ''उत्पात'' या अर्थाने घेतले गेले आहे.

राहिला दुसरा हेतू म्हणजे ''धर्म पूरेपूर अल्लाहकरिता व्हावा'' तर ही होकारात्मक (Positive) गोष्ट होय व यात धर्माशी अभिप्रेत एकेश्वरवादी धर्म अर्थात इस्लाम होय ज्यास कबूल करण्याचे आवाहन वर आयत क्र.३८ मध्ये काफ़िरांना केले गेले आहे. आणि धर्म सर्वस्वी अल्लाहकरिता होण्याचा अर्थ हा की काबागृहाच्या भूमीवर एकेश्वरवादी धर्म प्रस्थापित झाला व दुसरा कोणताहि धर्म येथे बाकी राहता कामा नये कारण या भूमीला ईश-गृहाची (काबा) भूमी असण्याची प्रतिष्ठा लाभली आहे व हिचे स्थान सुरवातीपासूनच एकेश्वरवादी केंद्राचे आहे म्हणून या भूमीला व तिच्या आसपासच्या परिसराला अनेकेश्वरवादी धर्मापासून नेहमी करिता स्वच्छ शुद्ध ठेवून एकेश्वरवादी (तौहीदच्या) धर्माला पूर्णपणे प्रभावित करणे अगत्याचे आहे. अर्थात हे की या परिसरात केवळ अशाच लोकांना आबाद होऊ द्यावे जे या धर्माला मानणारे असावेत व त्यांच्यावर सत्ता केवळ इस्लामची असावी.

आयतीचा हा अर्थ जो आम्ही वर्णन केला. तो क़ुरआनशी सुसंगत आहे, त्याबरोबरच याचे समर्थन हदीस, कथने व भाष्यकारांच्या उक्तिंद्वारेहि होते हदीस मधील उल्लेखा नुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले :

أُمِرْتُ اَنْ اُقَاتِلَ النَّاسَ حَتّٰى يَقُوْلُوْا لَا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ فَاِذَا قَالُوْا لَا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ عَصِمُوْا مِنِّيْ دِمَائَهُمْ وَاَمْوَالَهُمْ اِلَّا بِحَقِّهَا وَحِسَابُهُمْ عَلَى اللّٰهِ۔ (مسلم کتاب الایمان)

> ''मला लोकांशी (म्हणजे अनेकेश्वरवादी अरब लोकांशी) लढण्याचा आदेश दिला गेला आहे, जोपर्यंत ते ''ला इलाहा इल्लल्लाह'' म्हणत नाही जेव्हा ते ''ला इलाहा इल्लल्लाह'' म्हणतील तर त्यांचे रक्त व संपत्ति सुरक्षित राहील, मात्र या खेरीज की हक्काद्वारे एखाद्याच्या विरुद्ध काही कारवाई करणे भाग असावे राहिला त्यांचा हिशेब तर त्याची जबाबदारी अल्लाहवर आहे.' (मुस्लिम किताबुल ईमान)

आणि जेथ पावेतो कथनांचा संबंध आहे, उर्वाबिन जुबैर ने उत्पाताचे स्पष्टीकरण मक्केचा जुलुम व अत्याचार असा केला आहे ज्यामुळे मुसलमानांना देशत्याग करावा लागला आणि इब्ने अब्बास,मुजाहिद, हसन, कतादा व इतर विद्वानांनी उत्पातास शिर्क या अर्थाने घेतले आहे.(तफसीर तबरी खंड२पृष्ठ ११३व

खंड८पृष्ठ१६२) राहिलेत भाष्यकार तर त्यांनी एकतर पहिल्या विधानास प्राधान्य दिले आहे किंवा दुसऱ्या विधानास उदा. प्रख्यात भाष्यकार इब्ने जरीर तबरी (३१० हि.) लिहीतात.

**فقاتِلُوهُمْ حَتَّى لا يكون شِرك وَلَا يُعْبَدُ اِلَّا اللّٰهُ ، وحده لا شريک لَهٗ فيرتفِعَ البلاءُ عن عباد اللّٰه من الارض وهو الفتنةُ ويكونَ الَّذِينُ كُلَّه للّٰه يقول وحتى تكون الطاعةُ وَالعبادةُ كُلُّهَا للّٰه خالصةً دون غيرِه۔**(تفسیر طبری ج۹ ص ۱۶۲)

"त्यांच्याशी युद्ध करा, येथपावेतो की शिर्क बाकी न रहावे व एकमेव, अद्वितीय असलेल्या अल्लाहचीच उपासना केली जाऊ लागावी. अशा प्रकारे अल्लाहच्या दासांना जमीनीवर ज्या कसोटीशी सामना करावा लागत आहे ती म्हणजे उत्पात नष्ट व्हावा व धर्म सर्वस्वी अल्लाहचा व्हावा याचा अर्थ असा की युद्ध त्या क्षणापर्यंत चालू ठेवले पाहिजे जोपर्यंत आज्ञापालन व उपासना पूर्णपणे अल्लाहकरिता खास होत नाही."

(तफसीर तबरी खंड ९ पृष्ठ १६२)

तथापि काही समकालीन भाष्यकारांनी धर्माला जीवनव्यवस्था किंवा आज्ञापालन व्यवस्था या अर्थाने घेतले आहे व या आदेशाला की, "धर्म पूरेपूर अल्लाहकरिता व्हावा" काबागृहाच्या भूमीकरिता खास न ठरविता इस्लामचा राजकीय प्रभाव व अल्लाहच्या विधि नियमांची अंमलबजावणी असा कल्पिला आहे व असे स्पष्टीकरण केले आहे की, अनेकेश्वरवादी आपल्या श्रद्धेवर कायम राहू शकतात, मात्र त्यांना ईश्वराच्या जमीनीवर खोटे विधिनियम जारी करण्याचा हक्क राहणार नाही. या आयतीचा हा खुलासा इतर कारणांखेरीज यामुळे देखील योग्य नव्हे की आयतीत फक्त या म्हणण्यावर पुरे केले गेले नाही की "धर्म अल्लाहकरिता व्हावा" किंबहुना हा आदेश "परिपूर्णत: धर्म " या स्पष्टीकरणासह दिला गेला आहे. जर याला केवळ इस्लामी कायद्याची सत्ता" या अर्थाने घेतले गेले तर याला पूरेपूर धर्माचा अर्थ कसा लागू होईल?

राहिला हा प्रश्न की मग इस्लामने जिम्मींना (इस्लामी राज्याच्या अमुस्लिम नागरीकांना) जी सुरक्षितता दिली आहे तिचा आधार कोणता तर तिचा आधार ही आयत नव्हे किंबहुना सूरह तौबाची आयत क्र. २९ होय.

५७. परावृत्त होण्याशी अभिप्रेत शिर्क व तत्संबंधी उत्पात माजविण्यापासून परावृत्त होणे. जर ते परावृत्त होत आहेत तर अल्लाह त्यांच्या भूतकालीन अपराधांना दृष्टीआड करील व यापुढे जे आचरण ते करतील त्यास पाहील.

५८. म्हणजे ते धन व सामुग्री जी जिहादमध्ये काफिरांपासून मुसलमानांच्या हाती यावी.

स्पष्ट असावे की येथे आदेश वर्णन केला जात आहे तो जंगम मिळकती (Movable Property)चा आहे राहिली स्थावर मिळकत (Immovable Property) तो तर तिचा आदेश सूरह हश्र आयत क्र.७ मध्ये वर्णिला गेला आहे.

५९. म्हणजे माले-गनीमत मधून सर्वप्रथम त्याचा पाचवा हिस्सा (वीस प्रतिशत) काढला जाईल व त्यास अशा हेतुंकरिता खर्च केले जाईल जे ह्या आयतीत वर्णिले गेले आहेत.

"अल्लाह करिता आहे" म्हणजे अल्लाहच्या धर्माचा प्रसार व त्याच्या मार्गात जेहाद करण्याकरिता आहे. प्रेषिताकरिता आहे म्हणजे प्रेषित यातून अपल्या गरजा भागविण्यासाठी खर्च करू शकतो. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपल्या हिश्श्यास मुसलमानांच्या विकासाच्या कामांसाठी खर्च करीत राहिले व त्यांच्यानंतर याचा वापर याच स्वरूपाच्या कामांसाठी आहे."

नातेवाईकांशी अभिप्रेत प्रेषितांचे नातेवाईक होत. ज्याअर्थी पैगंबरानी आपल्या नातेवाईकांवर ज़कात हराम (निषिद्ध) ठरवली होती म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने प्रेषित-कुटंबातील गरजवंतांच्या गरजा भागविण्याची उपाय योजना माले गनीमत द्वारे केली. तद्वतच माले गनीमत मधून अनाथ,दीनदुबळे व प्रवाशी इत्यादिंचीहि मदत केली जाऊ शकते व त्यांच्या समृद्धिसाठीहि खर्च केला जाऊ शकतो. इस्लामी शासन योग्य वाटेल ती स्थिती अंगिकारू शकते.

प्रवाशांशी अभिप्रेत ते प्रवासी होत जे प्रवासाच्या स्थितीत मदत करण्यास पात्र झाले असावेत, मग ते आपल्या देशात धनाढ्य का असेनात.

हा झाला पाचव्या हिश्श्याचा वापर राहिलेत चार हिस्से (ऐंशी प्रतिशत) तर ते मुजाहीदीन (जेहाद लढणाऱ्यां) मध्ये वाटले जाऊ शकतात. क़ुरआनने स्पष्टपणे असा आदेश दिला नाही की हा ४/५ भाग खचितच मुजाहीदीन मध्ये विभागला पाहिजे किंबहुना फक्त १/५ हिश्श्याबाबत आदेश दिला. म्हणून यावरून हा निष्कर्ष निघतो की जर इस्लामी शासन या ४/५ भागास संरक्षणविषयक गरजा व राज्याची स्थिरता इत्यादिवर खर्च करू इच्छित असेल तर असे करू शकते आणि आजच्या काळात जेव्हा युद्धाचे रीति रिवाज अगदी बदलले आहेत याची गरज अगदी उघड आहे. क़ुरआन-अवतरणाच्या काळात ना व्यवस्थितपणे फौज ठेवली जात होती व ना सैनिकांना पगार दिला जात असे किंबहुना कबिला-व्यवस्था असल्यामुळे त्यावेळी प्रत्येकजण रणांगणाचा शिपाई असे आणि ईमान बाळगणारा

या नात्याने जेहाद लढणारा स्वत:शस्त्र प्राप्त करीत असे व जेहादकरिता आपले धनदेखील खर्च करीत असे म्हणून त्या काळात माले ग़नीमत अशा वीरांमध्ये विभागणे श्रेयस्कर होते. परंतु आजच्या काळात जेव्हा शासनाला व्यवस्तितपणे फौज राखावी लागते व तिच्या पगाराचा भार उचलण्याबरोबरच संरक्षणार्थ (Defence)मोठ्या प्रमाणावर शस्त्र इत्यादिंची व्यवस्था करावी लागते. मालेगनीमतचा या बाबीत खर्च केल्याशिवाय गत्यंतर नाही मग शत्रूपक्षापासून जी युद्ध-सामग्री लाभते, उदाहरणार्थ टँक, बॉम्ब, लढाऊ विमान वगैरे, तर ह्या अशा वस्तू नव्हेत ज्या सैनिकांमध्ये विभागल्या जाव्या किंबहुना ह्या सर्व वस्तू शासनाच्याच ताब्यात येऊ शकतात. अर्थात त्या संरक्षण विषयक गरजा भागविण्याकरिता उपयोगात आणल्या जाऊ शकतात.

शासनाला हा अधिकार प्राप्त आहे. आमच्या या मताचे समर्थन अल्लामा इब्ने तैमिया यांच्या कथनानेहि होते. ते एका ठिकाणी लिहितात:

وَهٰذَا دليل علىٰ اَنَّ الغنيمةَللامام اَنْ يُقسمها باجتهاده كمايقسم الفئ باجتهادهٖاذا كَانَ امام عدل قسمها بعلم وعدل ليس قسمتها بين الغانمين كقسمهِ الميراثِ بين الورثةِ وقسمة الصدقات فى الاصنافِ الثمانية۔

(مجموع فتاوىٰ ابن تيمیہ ج ۱۷ ص ۴۹۵)

"हे (म्हणजे पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे नवमुस्लिमांची मने जिंकण्याकरिता माले ग़नीमत मधून मोठ मोठे उपहार देणे) या गोष्टीचे प्रमाण होय की शासकाला (शासनाला) आपल्या इज्तिहादने (निर्णय बुद्धीने) याची वाटणी करण्याचा तसाच अधिकार आहे ज्या प्रकारे आपल्या निर्णयबुद्धीने फैच्या मालाची वाटणी करण्याचा अधिकार आहे. जेव्हा एखादा न्याय-प्रिय शासक असेल तर तो ज्ञान व न्यायासह माले गनीमतची वाटणी करील.जेहाद लढणाऱ्यांमध्ये याच्या वाटणीचा व्यवहार वारसाहक्काने लाभलेल्या सम्पत्तिच्या विभागणी सारखा नाही व ना दानद्रव्याच्या (ज़कातच्या) वाटणी सारखा आहे जे आठ विभागात वाटले जातात."

(मजमूअ फतावा इब्ने तैमिय्या ख.१७ पा. ४९५)

दुसऱ्या ठिकाणी त्यांनी हेहि स्पष्टीकरण केले आहे की ज्याअर्थी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मक्का विजयाच्या प्रसंगी काफ़िरांच्या मालमत्तेवर कब्जा केला नव्हता, कारण ते इस्लाम कबूल करतील अशी आशा होती म्हणून नेता (शासन) गनीमतच्या संदर्भात असा एखादा मार्ग पत्करु शकतो जो दूरदर्शितेनुसार असावा:

وَكَانَ فى هٰذا ما دَل عَلىٰ اَنَّ الامامَ يَفْعَلُ بالاموال والرجالِ وَالعقارِ وَالمنقولِ ما هو اَصْلَح۔ (مجموع فتاوىٰ ابن تيمیہ ج ۱۷ ص ۴۹۲)

"यात या गोष्टीचे प्रमाण आहे की, धनसंपत्ति, व्यक्ति मिळकत व जंगम मिळकतीच्या बाबतीत शासक तो मार्ग पत्करु शकतो जो अधिक योग्य असावा." (मजमूअ फ़तावा इब्ने तैमिय्या ख. १७ पा. ४९२)

६०. बद्र-युद्धाच्या दिवसाला "निर्णयाचा दिवस" या अर्थाने घेतले गेले आहे. यासाठी की या युद्धात अल्लाहचा निर्णय उघडपणे जाहीर झाला होता आणि सत्य व असत्यामधील फरक अगदी स्पष्ट झाला होता.

६१. म्हणजे अल्लाहने आपल्या प्रेषितावर फिरिशत्यांची जी फौज पाठविली आणि अपरोक्षातून समर्थन व सहाय्याची जी उपाययोजना केली.

६२. यास्तव अल्लाह आपल्या प्रेषिता करिता अपरोक्षातून मदतीची उपाय योजना करु शकतो.

६३. म्हणजे युद्धाचा नकशा अशा प्रकारे होता की बद्रच्या खिंडीचा जो हिस्सा मदीनेच्या बाजूला होता तेथे मुसलमानांचे सैन्य पोहचले होते आणि खिंडीचा जो हिस्सा मक्केच्या बाजूला होता तेथ काफ़ीरांचे सैन्य होते आणि व्यापारी काफिला काफिरांच्या सैन्यामागे होता व खालच्या दिशेने म्हणजे समुद्र किनाऱ्याजवळून जात होता. ही रणक्षेत्र सज्जता जी बाह्यात: मुसलमानांकरिता मोठी प्रतिकूल होती. अल्लाहच्या मदतीने ती मुसलमानांच्या हक्कात अगदी अनुकूल झाली व ती अशी की व्यापारी काफिला काफ़िरांच्या मागे व त्यांच्याजवळ असतांना देखील त्यांच्या मदतीस पोहचू शकला नाही, किंबहुना तो नकळतपणे दुसऱ्या मार्गाने मक्केकडे निघून गेला. मग ऐन वेळी जो पाऊस पडला, त्याने काफिरांचे सैन्य असलेल्या भू-भागाला मृदु व चिखलमय केले. याऊलट मुसलमानांचे सैन्य, असलेल्या भू-भागाला पाय स्थिर करण्याजोगे बनविले आणि ही देखील एक वस्तुस्थिती आहे की त्यावेळी ज्या प्रकारची युद्ध लढली जात, त्यांच्या जयाप्राजयात युद्ध-स्थानाचा मोठा वाटा असे. सर्वश्रेष्ठ अल्लाहने परिस्थिती काही अशा प्रकारची निर्माण केली की युद्ध-स्थळ व युद्ध-काळ दोन्हीही मुसलमानांकरिता अनुकूल ठरले. हा सुयोग, अल्लाहच्याच चमत्कृतिने घडला. अन्यथा जर मुसलमानांचे व काफ़िरांचे सैन्य एकमेकाला आव्हान देऊन

ठरलेल्या कार्यक्रमानुसार मुकाबल्यास निघाले असते तर ठीक त्याच वेळी जेव्हा पाऊस पडला व नेमक्या त्याच ठिकाणी जेथे रणक्षेत्र-सज्जता मुसलमानांकरिता लाभदायक ठरली, पोहचू शकत नव्हते. मग अशा स्थितीत लढाईचा नक्शा अगदी वेगळाच असता.

६४. म्हणजे अल्लाहने जी गोष्ट ठरविली होती ती घडून यावी आणि बद्रचे मैदान सत्य व असत्याच्या युद्धाचे मैदान बनावे.

६५. बद्रचे युद्ध दोन जाती-समुहांचे युद्ध नव्हते जे भौतिक गरजांकरति लढले जाते, किंबहुना हे प्रामुख्याने सत्य व असत्य यांच्यातील युद्ध होते. यात जेथे सत्य प्रकट होऊन समोर आले होते, तिथे असत्य देखील अनावरित झाले होते. याच गोष्टीने लोकांवर अल्लाहचे प्रमाण शेवटचे म्हणून प्रस्थापित केले. आयतीत नष्ट होण्याशी अभिप्रेत कुफ्रचा विनाश होय व जिवंत राहण्याशी अभिप्रेत ईमानाचे जीवन होय. अर्थात हे की जो माणूस कुफ्र-स्थितीत मरु इच्छितो त्यावर अल्लाहचे प्रमाण पूर्णपणे प्रस्थापित व्हावे. अशासाठी की त्याला नंतर ही सबब मांडता न यावी की सत्य मला स्पष्टपणे काळाले नव्हते आणि जो ईमानाचा मार्ग पत्करुन चिरसजीव बनू इच्छितो त्याने अल्लाहच्या प्रमाणापासून दृष्टी प्राप्त करावी.

त्यासमयी (हे पैगंबर !) अल्लाह तुम्हाला स्वप्नात त्यांना अल्प प्रमाणात दाखवितो होता, जर त्यांना जास्त दाखवितो, तर तुम्ही लोकांनी धैर्य सोडले असते आणि युद्धसंदर्भात आपसात वाद करू लागले असते, परंतु अल्लाहने तुम्हाला यापासून वाचविले. निःसंशय तो त्या गोष्टींना जाणतो ज्या अंतःकरणात लपलेल्या असतात. (अल-क़ुरआन)

४३. त्यासमयी (हे पैगंबर !) अल्लाह तुम्हाला स्वप्नात त्यांना अल्प प्रमाणात दाखवितो होता,[६६] जर त्यांना जास्त दाखवितो, तर तुम्ही लोकांनी धैर्य सोडले असते आणि युद्धसंदर्भात आपसात वाद करू लागले असते, परंतु अल्लाहने तुम्हाला यापासून वाचविले. नि:संशय तो त्या गोष्टींना जाणतो ज्या अंत:करणात लपलेल्या असतात.

إِذْ يُرِيكَهُمُ اللَّهُ فِي مَنَامِكَ قَلِيلًا ۖ وَلَوْ أَرَاكَهُمْ
كَثِيرًا لَّفَشِلْتُمْ وَلَتَنَازَعْتُمْ فِي الْأَمْرِ وَلَٰكِنَّ
اللَّهَ سَلَّمَ ۗ إِنَّهُ عَلِيمٌ بِذَاتِ الصُّدُورِ ﴿٤٣﴾

४४. आणि जेव्हा तुम्ही एकमेकांच्या समोर आले तेव्हा त्याने तुमच्या नजरेत त्यांना अल्प प्रमाणात दाखविले. व त्यांच्या नजरेत तुम्हाला अल्प स्वरूपात दाखविले [६७] यासाठी की जी गोष्ट घडून येणार होती तिला त्याने करून दाखवावे. आणि सर्व गोष्टी अल्लाहच्याच समोर सादर होतात.

وَإِذْ يُرِيكُمُوهُمْ إِذِ الْتَقَيْتُمْ فِي أَعْيُنِكُمْ قَلِيلًا
وَيُقَلِّلُكُمْ فِي أَعْيُنِهِمْ لِيَقْضِيَ اللَّهُ أَمْرًا كَانَ مَفْعُولًا ۗ
وَإِلَى اللَّهِ تُرْجَعُ الْأُمُورُ ﴿٤٤﴾

४५. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! जेव्हा एखाद्या समूहाशी तुमचा मुकाबला होईल [६८] तेव्हा स्थैर्यशील रहा व अल्लाहचे जास्तीत जास्त स्मरण करा, ज्यायोगे तुम्ही सफ़ल व्हावे.[६९]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا إِذَا لَقِيتُمْ فِئَةً فَاثْبُتُوا وَاذْكُرُوا
اللَّهَ كَثِيرًا لَّعَلَّكُمْ تُفْلِحُونَ ﴿٤٥﴾

४६. आणि अल्लाह व त्याच्या रसूलचे आज्ञापालन करा व आपसात मतभेद करु नका [७०] अन्यथा तुमच्या अंगी वैगुण्य निर्माण होईल व तुमचा दरारा नाहीसा होईल. धैर्य बाळगा [७१] कारण अल्लाह धैर्य बाळगणाऱ्यांच्या सोबत आहे.

وَأَطِيعُوا اللَّهَ وَرَسُولَهُ وَلَا تَنَازَعُوا فَتَفْشَلُوا وَتَذْهَبَ
رِيحُكُمْ ۖ وَاصْبِرُوا ۚ إِنَّ اللَّهَ مَعَ الصَّابِرِينَ ﴿٤٦﴾

४७. आणि त्या लोकांसारखे होऊ नका जे आपल्या घरांतून फुशारकी मारत व लोकांना डौल दाखवित निघाले आणि ज्यांची ही दशा आहे की (ईश-दासांना) अल्लाहच्या मार्गापासून रोखतात.[७२] ते जे काही करीत आहेत ते अल्लाहच्या आटोक्यात आहे.

وَلَا تَكُونُوا كَالَّذِينَ خَرَجُوا مِن دِيَارِهِم بَطَرًا وَرِئَاءَ
النَّاسِ وَيَصُدُّونَ عَن سَبِيلِ اللَّهِ ۚ وَاللَّهُ بِمَا
يَعْمَلُونَ مُحِيطٌ ﴿٤٧﴾

६६. ही घटना युद्ध आघाडीवर पोहचण्यापूर्वीची होय. सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना स्वप्नात काफ़िरांच्या सैन्याला अल्पसंख्येने दाखविले आणि त्या स्वप्नाचे जेव्हा त्यांनी मुसलमानांसमोर वर्णन केले तेव्हा त्यांचे धैर्य वाढले. ते अल्पसंख्येने दाखविणे आंतरिकदृष्ट्या होते,म्हणजे काफिरांची मोठी संख्या चारित्र्य व धैर्य या दृष्टीने काही भारदस्त नव्हती, म्हणून त्यांची मोठी संख्या अल्पसंख्ये समान होती. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे स्वप्न वास्तविक दृष्ट्या अगदी खरे होते परंतु ज्याअर्थी स्वप्न लाक्षणिक स्वरुपात असते म्हणून मुसलमानांनी याचा हा अर्थ घेतला की काफ़िरांचे सैन्य संख्येने कमी आहे. अर्थात त्यांची ही धारणा लाभप्रद ठरली कारण हे लक्षात घेता काफ़िरांशी मुकाबला करणे त्यांना सोपे गेले.

६७. जेव्हा दोन्ही सैन्य लढण्यास सज्ज झाले तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशी योजना केली की मुसलमानांच्या नजरेस काफ़िरांची संख्या कमी दिसली, म्हणून त्यांचे धैर्य कायम राहिले व दुसरीकडे काफिरांना मुसलमान फार थोड्या संख्येने दिसू लागले, म्हणून या मुठभर माणसांना नष्ट करणे अगदी सोपे आहे असा विचार करुन युद्धाला सुरवात केली. अशा प्रकारे ते रणक्षेत्र तापले जे सत्याला सत्य व असत्याला असत्य साबीत करण्याकरिता आवश्यक होते. नंतर सर्वश्रेष्ठ अल्लाहने या मुठभर मुसलमानांचा धाक काफ़िरांच्या मनावर काही अशा प्रकारे बसवला की त्यांचे धैर्य खचले व ते युद्ध-भूमी सोडून पळाले.

६८. म्हणजे जेव्हा कधी काफ़िरांशी तुमचा मुकाबला होईल.

६९. सफलतेशी अभिप्रेत खरी सफलता होय म्हणजे जगात अल्लाहची मदत व आखिरत मध्ये त्याच्याकडून मोठा मोबदला.या सफलतेला प्राप्त करण्याकरिता दोन गोष्टी आवश्यक आहेत. मुकाबल्याच्या वेळी स्थैर्यशील असणे व अल्लाहचे अधिकाधिक स्मरण करणे. अल्लाहची मदत त्यावेळी अवतरते जेव्हा ईमान बाळगणारे आपल्या या जबाबदारीस पूर्ण करतात.

यावरून ही गोष्ट देखील स्पष्ट होते की मुसलमानांची ती युद्धे जी ईश्वराला विसरुन केवळ भौतिक लाभकरिता लढली जातात. ईश-मदती पासून वंचित राहण्यास कारणीभूत आहेत.

७०. युद्धप्रसंगी शिस्ती (Deciplince) चे मोठे महत्व असते आणि मतभेदामुळे गैरशिस्त व जमातीत फूट निर्माण होते यास्तव ही ताकीद केली गेली आहे की मतभेद करु नका.

७१. धैर्य बाळगण्यात ही गोष्ट देखील सामील आहे की माणसाने आपल्या मताविरुद्ध शिस्तबद्ध असल्याचा पुरावा द्यावा, अशासाठी की सत्य व असत्याच्या लढाईत मुसलमानांमध्ये फूटीर अवस्था निर्माण होऊ नये.

७२. संकेत आहे काफ़ीर-सैन्याकडे जे आपल्या विपुलतेवर गर्व करीत व आपले भव्य वैभव ऐश्वर्य दाखवित मक्केहून निघाले होते व ज्याचे उद्दिष्ट सत्य धर्माचा मार्ग रोखणे' हे होते. मुसलमानांना ताकीद केली गेली आहे की त्या लोकांसारखे रागरंग बाळगू नये. ही एक चिरस्थायी आज्ञा आहे, जी मुसलमानांना दिली गेली आहे, यासाठी की त्यांचे सैन्य काफ़िरांच्या सैन्याहून प्रत्येक युद्ध प्रसंगी वरचढ रहावे. ते अल्लाहचे सैनिक आहेत व त्यांच्या युद्धाचे उद्दिष्ट ईश-दासांकरिता सत्य मार्ग खोलणे यास्तव युद्धात देखील त्यांचा थाट इबादतचा (उपासनेचा) असला पाहिजे.

وَاِذْ زَيَّنَ لَهُمُ الشَّيْطٰنُ اَعْمَالَهُمْ وَقَالَ لَا غَالِبَ لَكُمُ
الْيَوْمَ مِنَ النَّاسِ وَاِنِّيْ جَارٌ لَّكُمْ ۚ فَلَمَّا تَرَآءَتِ الْفِئَتٰنِ
نَكَصَ عَلٰى عَقِبَيْهِ وَقَالَ اِنِّيْ بَرِيْٓءٌ مِّنْكُمْ اِنِّيْٓ اَرٰى مَا لَا تَرَوْنَ
اِنِّيْٓ اَخَافُ اللّٰهَ ؕ وَاللّٰهُ شَدِيْدُ الْعِقَابِ ﴿۴۸﴾

४८. आणि (ती वेळ कठीण परीक्षेची होती) जेव्हा सैतानाने त्यांची कामे त्यांच्या दृष्टीत सुशोभित केली होती व त्यांना म्हटले होते की आज लोकांमध्ये असा कोणी नाही जो तुमच्या वर प्रभावी होऊ शकेल आणि मी तुमचा समर्थक आहे, परंतु जेव्हा दोन्ही समूह एकमेकांसमोर आले तेव्हा तो उलटपावली फिरला आणि म्हणू लागला की माझा तुमच्याशी काहीहि संबंध नाही. मी जे काही पाहत आहे ते तुम्ही पाहत नाही. मी अल्लाहचे भय बाळगतो आणि अल्लाह कठोर शिक्षा देणारा आहे.[७३]

اِذْ يَقُوْلُ الْمُنٰفِقُوْنَ وَالَّذِيْنَ فِيْ قُلُوْبِهِمْ مَّرَضٌ غَرَّ
هٰٓؤُلَآءِ دِيْنُهُمْ ؕ وَمَنْ يَّتَوَكَّلْ عَلَى اللّٰهِ فَاِنَّ اللّٰهَ عَزِيْزٌ
حَكِيْمٌ ﴿۴۹﴾

४९. जेव्हा दांभिक आणि ते लोक ज्यांच्या मनात विकृति आहे [७४] असे म्हणत होते की या लोकांना यांच्या धर्माने धोक्यात टाकले आहे [७५] आणि जो कोणी अल्लाहवर भरवसा करील तर अल्लाह प्रभावशाली व हिकमत बाळगणारा आहे.

وَلَوْ تَرٰٓى اِذْ يَتَوَفَّى الَّذِيْنَ كَفَرُوا الْمَلٰٓئِكَةُ يَضْرِبُوْنَ
وُجُوْهَهُمْ وَاَدْبَارَهُمْ ۚ وَذُوْقُوْا عَذَابَ الْحَرِيْقِ ﴿۵۰﴾

५०. आणि जर तुम्ही या स्थितीला पाहू शकले असते जेव्हा फिरिश्ते काफ़िरांच्या आत्म्यांना ताब्यात घेतात ते त्यांच्या चेहऱ्यांवर व त्यांच्या पाठीवर प्रहार करतात [७६] आणि म्हणतात जाळणाऱ्या शिक्षेची गोडी चाखा.

ذٰلِكَ بِمَا قَدَّمَتْ اَيْدِيْكُمْ وَاَنَّ اللّٰهَ لَيْسَ
بِظَلَّامٍ لِّلْعَبِيْدِ ﴿۵۱﴾

५१. हा तुमच्या स्वतः च्या कर्मांचा मोबदला होय, अन्यथा अल्लाह आपल्या दासांवर जुलुम करणारा नाही.

كَدَاْبِ اٰلِ فِرْعَوْنَ ۙ وَالَّذِيْنَ مِنْ قَبْلِهِمْ ؕ كَفَرُوْا بِاٰيٰتِ اللّٰهِ
فَاَخَذَهُمُ اللّٰهُ بِذُنُوْبِهِمْ ؕ اِنَّ اللّٰهَ قَوِيٌّ شَدِيْدُ الْعِقَابِ ﴿۵۲﴾

५२. त्यांची तीच दशा झाली जी फिरऔनवाल्यांची व त्यांच्या पूर्वीच्या लोकांची झाली होती.[७७] त्यांनी अल्लाहच्या आयतींचा इन्कार केला तर अल्लाहने त्यांच्या अपराधांमुळे त्यांना धरले. अल्लाह अत्यंत सामर्थ्यशाली व कठोर दण्ड देणारा आहे.

ذٰلِكَ بِاَنَّ اللّٰهَ لَمْ يَكُ مُغَيِّرًا نِّعْمَةً اَنْعَمَهَا عَلٰى قَوْمٍ حَتّٰى
يُغَيِّرُوْا مَا بِاَنْفُسِهِمْ ۙ وَاَنَّ اللّٰهَ سَمِيْعٌ عَلِيْمٌ ﴿۵۳﴾

५३. हे एवढ्यासाठी [७८] झाले की अल्लाह आपल्या त्या देणगीला जी त्याने एखाद्या जाती समूहाला प्रदान केली असावी, तो पावेतो बदलत नाही, जोपर्यंत तो जातीसमूह स्वतः आपली अवस्था बदलत नाही. [७९] आणि याकरिताहि की अल्लाह ऐकणारा व जाणणारा आहे.[८०]

७३. सैतान आपल्या क्लृप्त्या अशाच प्रकारे वापरतो की माणसाला हे जाणवत नाही की सैतान समक्ष उभा आहे व तो मला चुकीचे पाऊल टाकण्यासाठी उद्युक्त करीत आहे. तो अत्यंत गुप्त रीतीने माणसाच्या आत्म्याशी सरळ-सरळ संभाषण करतो. व त्यांचे हे संभाषण संकेत भाषेने होते जी वस्वसा (अशांका) रुप धारण करते.

माणसाचा आत्मा जर जागृत असेल तर त्याला असे जाणवते की हा एक वाईट विचार आहे जो त्याच्या मनात निर्माण झाला आहे मग मात्र तो त्याचा प्रभाव आपल्यावर होऊ देत नाही. बद्र युद्धाच्या प्रसंगी सैतानाने आपल्या शिष्यांना (काफ़िरांना) जी गोष्ट सांगितली होती ती याच स्वरुपाची होती व यावर प्रमाण क़ुरआनाची ती आयत होय ज्यात फ़र्माविले गेले आहे.

كَمَثَلِ الشَّيْطٰنِ اِذْ قَالَ لِلْاِنْسَانِ اكْفُرْ فَلَمَّا كَفَرَ قَالَ اِنِّي بَرِیٓءٌ مِّنْكَ اِنِّيٓ اَخَافُ اللّٰهَ رَبَّ الْعٰلَمِيْنَ۔(الحشر۔١٦)

"सैतानाप्रमाणे, जो माणसास कुफ्र करण्यास सांगतो आणि जेव्हा तो कुफ्र करुन बसतो तेव्हा म्हणतो मी तुझ्यापासून मुक्त आहे. मी सर्व विश्वांचा पालनकर्ता अशा अल्लाहचे भय बाळगतो." (अल-हश्र:१६)

उघड आहे की सैतान या गोष्टी प्रत्यक्षत: व प्रकट होऊन सांगत नाही. किंबहुना मनात कुविचार उद्‌भवून कुफ्र करण्यास प्रवृत्त करतो व जेव्हा मनुष्य कुफ्र करुन बसतो तेव्हा परिणामाची जबाबदारी सैतान कबूल करीत नाही किंबहुना तो त्या माणसाला सोडून चालता होतो, जेणेकरुन त्या माणसाने एकट्यानेच विनाशाच्या गर्तेत उडी टाकावी याच प्रकारची गोष्ट सैतानाने बद्र युद्धाच्या प्रसंगी काफ़िरांच्या मनावर बिंबवली होती.

यावर दुसरे प्रमाण भाष्यांतर्गत आयतीचे पहिले विधान होय,ज्यात फर्माविले गेले आहे की सैतानाने त्यांची कामे त्यांच्या नजरेत सुशोभित केली होती. उघड आहे कामांना नजरेत सुशोभित करण्याचे कार्य सैतानाने आपल्या विशिष्ट शैलीने केले होते, मनुष्य स्वरूपात प्रकट होऊन नव्हे यास्तव सैतानाच्या कथनालाहि याच शैलीची बाब समजले पाहिजे. (आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहच आपल्या वाणीच्या अर्थाला अधिक चांगले जाणतो) आणि सैतानाने असे जे म्हटले होते की मी जे काही पाहत आहे ते तुम्ही पाहत नाही तर याचा अर्थ त्याचे-फिरिश्त्यांना पाहणे होय जे बद्र युद्धाच्या प्रसंगी मुसलमानांच्या मदतीकरिता अवतरले होते आणि फिरिश्त्यांच्या मुकाबल्यात तो टीकू शकला नसता म्हणून तो म्हणाला की मी अल्लाहचे भय बाळगतो आणि त्याने जेव्हा ही गोष्ट काफिरांना सांकेतिक भाषेत सांगितली असेल तर नवल नव्हे की त्यांच्या मनात थोडा वेळ हा विचार आला असावा की पराभवाला आम्हाला तोंड द्यावे लागत आहे तर हा ईशप्रकोप तर नव्हे जो आमच्यावर कोसळत आहे.

७४. ही त्या वेळची गोष्ट होय जेव्हा मुसलमान काफ़िरांशी मुकाबला करण्याकरिता मदीनेहून रवाना झाले होते. 'ज्यांच्या मनात विकृति आहे'शी अभिप्रेत यहुदी होत जे अल्लाहवर ईमान असल्याचा दावा तर करीत पण त्यांच्या मनात कुफ्र रोग होता.

७५. म्हणजे मुसलमान धार्मिक उन्मादात असे ग्रस्त झाले आहेत की त्यांना आपल्या प्राणांचीहि पर्वा राहिली नाही. साधन-सामुग्री जवळ नसतांना देखील ते कुरेशाच्या शक्तिशाली सैन्याचा मुकाबला करण्यास सज्ज झाले.

७६. ही मरणासन्न-अवस्था होय जी वर्णिली गेली आहे, म्हणून हिचा संबंध आत्म्याशी आहे आणि वस्तुत: मनुष्य तोच आहे जो मानव शरीरात आहे. केवळ शरीराला माणूस समजणे योग्य नव्हे. आणि मरणाची हकीकत याखेरीज काहीहि नाही की, आत्मा शरीरापासून वेगळा होतो आणि हा आत्मा जर एखाद्या काफ़िर माणसाचा आहे तर त्याला फिरिश्त्यांचा मार बसतो व ते त्याला म्हणतात की आगीची शिक्षा भोगावयास तयार हो.

७७. म्हणजे बद्रमध्ये काफ़िरांना जी शिक्षा मिळाली ती त्याच प्रकारची शिक्षा होय,जी फिरऔनवाल्यांना व इतर बंडखोर जाती समूहांना मिळत राहिली कारण त्यांनी देखील तेच वर्तन अंगिकारले.

७८. म्हणजे ही शिक्षा त्यांना यासाठी मिळाली.

७९. हा जाती समूहांच्या उत्कर्ष व ऱ्हासाचा नियम आहे. जो या आयतीत वर्णन केला गेला आहे. एखाद्या जाती-समूहास जेव्हा अल्लाह देणगी प्रदान करतो तर या स्थितीत ती हिरावून घेतो की जेव्हा तो समूह त्या देणगीची कदर बाळगत नाही व स्वत:ला त्या देणगीस अपात्र असल्याचे दर्शवितो, शांतीसुरक्षा, सुबत्ता, सत्ता-प्रतिष्ठा या सर्व अल्लाहच्या देणग्या होत. आणि जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह एखाद्या जातीसमूहापासून त्याच्या विद्रोहामुळे या देणग्यांना हिरावून घेऊ इच्छितो, तेव्हा त्याच्यावर भिती व दहशतीचे आवरण घालतो. कधी तर ते आपसातच लढू-मरु लागतात. तर कधी त्या समूहावर युद्धाचे वावटळ येऊ लागते. तद्वतच समृद्धी व

सुबत्ता आर्थिक तंगीत परिवर्तित होते किंवा दुर्घटना व रोगांचा क्रम चालतो. राहिली सत्ता-प्रतिष्ठेची बाब तर ती देखील संकटात सापडले आणि अवमान,पराभव, व इतर जातीसमूहांच्या आश्रयाखाली जाण्यासारखी स्थिती निर्माण होते.

कुरेशाला मक्केत जी शांती सुरक्षा लाभली होती, ती त्यांच्या विद्रोहामुळे युद्धात बदलली आणि बद्र ने त्यांच्या प्रतिष्ठेला धुळीस मिळविले, येथपावेतो की त्यांच्यातली सत्ताधारी माणसे एकतर ठार झालीत किंवा त्यांना बंदी होऊन प्रेषित-दरबारी हजर व्हावे लागले. आयतीचा संकेत त्यांच्या या दशेकडे आहे.

८०. म्हणजे अल्लाह ज्याअर्थी ऐकणारा व जाणणारा आहे तर त्याला जातीसमूहांच्या कथन व कर्माची खबर कशी नसेल व ज्याअर्थी तो ज्ञाता आहे तर त्यांच्याशी 'तो' व्यवहार का म्हणून करणार नाही ज्यास ते पात्र आहेत?

यांचीहि गत फ़िरऔनवाले व त्यांच्या पूर्वीच्या लोकांसारखीच आहे.त्यांनी आपल्या पालनकर्त्याच्या आयतींना खोटे ठरविले तर आम्ही त्यांच्या अपराधांमुळे त्यांचा नाश केला व फिरऔनवाल्यांना बुडवून टाकले. हे सर्व अत्याचारी लोक होते. *(अल-क़ुरआन)*

५४. यांचीहि गत फ़िरऔनवाले व त्यांच्या पूर्वीच्या लोकांसारखीच आहे.[८१] त्यांनी आपल्या पालनकर्त्याच्या आयतींना खोटे ठरविले तर आम्ही त्यांच्या अपराधांमुळे त्यांचा नाश केला व फिरऔनवाल्यांना बुडवून टाकले. हे सर्व अत्याचारी लोक होते.

كَدَأْبِ آلِ فِرْعَوْنَ ۙ وَالَّذِينَ مِن قَبْلِهِمْ ۚ كَذَّبُوا بِآيَاتِ
رَبِّهِمْ فَأَهْلَكْنَاهُم بِذُنُوبِهِمْ وَأَغْرَقْنَا آلَ فِرْعَوْنَ ۚ وَكُلٌّ
كَانُوا ظَالِمِينَ ﴿٥٤﴾

५५. नि:संशय अल्लाहजवळ सर्वात निकृष्ट जनावर असे लोक होत ज्यांनी कुफ्र केले व ईमान बाळगले नाही.[८२]

إِنَّ شَرَّ الدَّوَابِّ عِندَ اللَّهِ الَّذِينَ كَفَرُوا فَهُمْ لَا يُؤْمِنُونَ ﴿٥٥﴾

५६. ज्या लोकांशी तुम्ही करार केला मग ते आपली प्रतिज्ञा प्रत्येक वेळी भंग करीत राहिले आणि ते (अल्लाहचे) भय बाळगत नाही.[८३]

الَّذِينَ عَاهَدتَّ مِنْهُمْ ثُمَّ يَنقُضُونَ عَهْدَهُمْ فِي كُلِّ
مَرَّةٍ وَهُمْ لَا يَتَّقُونَ ﴿٥٦﴾

५७. असे लोक जर तुम्हाला लढाईत आढळून आले तर त्यांना अशी शिक्षा द्या की जे लोक त्यांच्या पाठीशी आहेत त्यांची दाणादाण उडावी व त्यांनी धडा घ्यावा.[८४]

فَإِمَّا تَثْقَفَنَّهُمْ فِي الْحَرْبِ فَشَرِّدْ بِهِم مَّنْ خَلْفَهُمْ لَعَلَّهُمْ
يَذَّكَّرُونَ ﴿٥٧﴾

५८. आणि जर तुम्हाला एखाद्या समूहापासून वचनभंगाचे भय असेल तर त्यांच्या करार सरळरित्या त्यांच्यापुढे फ़ेकून द्या.[८५] अल्लाह वचनभंग करणाऱ्यांना पसंत करीत नाही.

وَإِمَّا تَخَافَنَّ مِن قَوْمٍ خِيَانَةً فَانبِذْ إِلَيْهِمْ عَلَىٰ سَوَاءٍ ۚ
إِنَّ اللَّهَ لَا يُحِبُّ الْخَائِنِينَ ﴿٥٨﴾

५९. काफ़िरांनी असे समजू नये की ते बाजी नेतील.[८६] ते आमच्या तावडीतून कदापि बाहेर जाऊ शकत नाही.

وَلَا يَحْسَبَنَّ الَّذِينَ كَفَرُوا سَبَقُوا ۚ إِنَّهُمْ لَا يُعْجِزُونَ ﴿٥٩﴾

६०. आणि त्यांच्या मुकाबल्याकरिता [८७] यथासंभव सामर्थ्य उपलब्ध करीत राह [८८] आणि बांधून ठेवलेले घोडे तयार राखा [८९] यासाठी की याद्वारे तुम्ही अल्लाहच्या व आपल्या शत्रूंना, तसेच यांच्याखेरीज इतर लोकांनाहि ज्यांना तुम्ही जाणत नाही परंतु अल्लाह जाणतो [९०] भयग्रस्त करु शकावे. आणि अल्लाहच्या मार्गात तुम्ही जे काही खर्च कराल [९१] ते तुम्हाला पूरेपूर परतविले जाईल व तुमच्याशी कदापि अन्याय होणार नाही.[९२]

وَأَعِدُّوا لَهُم مَّا اسْتَطَعْتُم مِّن قُوَّةٍ وَمِن رِّبَاطِ الْخَيْلِ
تُرْهِبُونَ بِهِ عَدُوَّ اللَّهِ وَعَدُوَّكُمْ وَآخَرِينَ مِن دُونِهِمْ
لَا تَعْلَمُونَهُمُ اللَّهُ يَعْلَمُهُمْ ۚ وَمَا تُنفِقُوا مِن شَيْءٍ فِي سَبِيلِ
اللَّهِ يُوَفَّ إِلَيْكُمْ وَأَنتُمْ لَا تُظْلَمُونَ ﴿٦٠﴾

८१. ही कुरेश-जातीसमूहास यापुढे दिली जाणारी ताकीद आहे की जे काही बद्रमध्ये तुमच्या समोर घडले ती शिक्षेची एक कडी होती. परंतु जर तुम्ही विद्रोही जाती समूहांच्याच वळणावर चालत राहिले तर मात्र संपूर्ण जाती समूह शिक्षेच्या लपेटीत तसाच येईल ज्या प्रकारे मागील जाती समूह येत राहिले.

८२. म्हणजे त्यांचे कुफ्र एवढे प्रखर आहे की ते कोणत्याहि रीतीने ईमान बाळगावयास तयार नाहीत.

जो माणुस कुफ्र-मार्ग पत्करतो तो बुद्धि व सुज्ञतेने काम घेत नाही. किंबहुना अंध बनतो व स्वत:ला मानवतेच्या दर्जापासून खाली फेकून जनावरांपेक्षाहि खालच्या थराला नेतो.

८३. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मदीना सोडल्यानंतर यहुदींशी मैत्रीपूर्ण करार केला होता ज्याचे एक कलम असे होते की ते कुरेशाची पाठराखण करणार नाहीत परंतु यहुदी दरवेळी याविरुद्ध वागत राहिले. ते कुरेशाला मदीनेच्या मुसलमानांविरुद्ध उकसावितहि राहिले व त्यांची पाठराखणहि करीत राहिले. आयतीचा संकेत प्रामुख्याने त्यांच्याचकडे आहे.

८४. म्हणजे कराराविरुद्ध वागणाऱ्यांपैकी एखादी व्यक्ति वा समूह शत्रूशी हातमिळवणी करून तुमच्याशी लढण्यास येईल तर त्याला विना विलंब ठार करा व धडा घेण्याजोगी शिक्षा द्या.

८५. म्हणजे ज्या समूहाशी तुमचा करार व्हावा, व तो कराराचे नीट पालन करीत नसेल आणि त्याच्या आचरणाने असे दिसून यावे की तो संधी लाभताच तुमच्या विरुद्ध कारस्थान करील तर तुम्ही त्याच्या करारला सरळ सरळ त्यांच्या तोंडावर फेकून मारा. कारण वचनभंग करणारे याच गोष्टीस पात्र आहेत

तद्वतच जेव्हा तुमच्याकडून करार संपल्याची घोषणा व्हावी तर तुम्हीं त्याच्या विरुद्ध कारवायी करु शकता, परंतु कराराला कायम राखीत गुप्तरित्या त्या जाती समूहाविरुद्ध कारवाई करणे योग्य नव्हे.

हा आदेश अशा स्थितीत आहे जेव्हा कोणी समूह किंवा राष्ट्र आपल्या कराराविरुद्ध वागेल अशी भिती असावी, परंतु जेव्हा करारबद्ध समूह उघडपणे करारभंग करील, ज्याप्रमाणे हुदैबिया तहानंतर मक्केच्या काफ़िरांनी केला, तर तो करार आपोआप भंग पावेल मग कसल्याहि रिवाजात्मक घोषणेची गरज रहाणार नाही.

स्पष्ट असावे की येथे कराराशी अभिप्रेत ना युद्ध व तहाचा करार आहे. राहिलेत आजच्या काळातील व्यापार विषयक व सांस्कृतिक करार तर जोपर्यंत त्यांना पूर्ण केले जात नाही त्यांचे पालन अगत्याचे ठरते परंतु असा करार एखाद्या समूहाविरुद्ध युद्ध कारवायी करण्यास बाधक ठरत नाही. युद्ध स्थितीत अशा प्रकारचे करार नगण्य ठरतात.

८६. म्हणजे काफ़िरांनी या भ्रमात राहू नये की ते ईश-निर्णयापासून आपला बचाव करून पुढे निघून जातील, किंबहुना ईश्वराने त्यांना तावडीत घेण्याचा जो फैसला केला आहे. त्यानुसार ते खचितच तावडीत सापडतील.

८७. म्हणजे काफ़िरांच्या मुकाबल्याकरिता.

८८. सामर्थ्य (शक्ति) उपलब्ध करुन ठेवण्यात मनुष्याबळाचा (Man-Power)देखील समावेश आहे व प्रत्येक प्रकारच्या युद्ध-सामग्रीचाहि.

बद्र युद्धात मुसलमान साधन-सामग्रीहीन अवस्थेत निघाले होते कारण ते अशा भूमिकेत नव्हते की युद्धाकरिता भरपूर तयारी करावी, परंतु भावी काळासाठी त्यांना ताकीद केली गेली की शक्यतोवर प्रशिक्षित सैन्य (Trained Military) योद्धा तयार राखा व युद्ध सामुग्रीहि यासाठी की गरज पडताच युद्ध भूमीवर येणे शक्य व्हावे.

८९. युद्धात घोड्यांचे महत्व सर्वमान्य आहे. त्या काळात याहून अधिक वेगवान व युद्ध कारवायी करिता अधिक योग्य असे कोणतेहि वाहन नव्हते म्हणून विशेष करुन युद्धास उपयोगी पडणाऱ्या घोड्यांना तयार राखण्याचा आदेश दिला गेला आहे.

आजच्या काळात टँक, पाणबुडी, विमाने, मिजाईल, रॉकेट इ. अत्यंत महत्वपूर्ण युद्ध-सामुग्री होय म्हणून आयतीचा उद्देश्य पूर्ण करण्याकरिता या वस्तूही उपलब्ध कराव्या लागतील.

९०. येथे संकेत आहे, इस्लामशी शत्रूत्व राखणाऱ्या त्या शक्तिंकडे ज्या अजून उघडकीस आल्या नव्हत्या परंतु पुढे त्यांच्याशी मुठभेड होणार होती. तद्नुसार भविष्यात मुसलमानांना फक्त यहुदी व अरब कबिल्यांशीच नव्हे तर रोम, फ़ारस या सारख्या तत्कालीन बलाढ्य शक्तिशीहि सामना द्यावा लागला.

९१. अल्लाहच्या मार्गात खर्च करण्याशी अभिप्रेत 'जेहाद' करिता खर्च करणे होय. वर युद्ध-सामुग्रीच्या तयारीचा जो आदेश दिला गेला आहे तो अंमलात आणण्याकरिता विपुल धन साधनाची गरज भासेल यास्तव हा हेतु लक्षात घेता खर्च करण्यास प्रोत्साहन दिले गेले आहे.

९२. म्हणजे आख़िरतमध्ये याचा पूरेपूर मोबदला मिळेल व कोणाचाहि हक्क मारला जाणार नाही.

६१. आणि जर ते तहा कडे झुकतील तर तुम्हीदेखील त्याकरिता झुका [१३] आणि अल्लाहवर भरवसा ठेवा. नि:संशय तो ऐकणारा व जाणणारा आहे.

وَاِنْ جَنَحُوْا لِلسَّلْمِ فَاجْنَحْ لَهَا
وَتَوَكَّلْ عَلَى اللّٰهِ ؕ اِنَّهٗ هُوَ السَّمِيْعُ الْعَلِيْمُ ﴿٦١﴾

६२. आणि (हे पैगंबर !) जर ते तुम्हाला धोका द्यायचा निश्चय बाळगत असतील तर अल्लाह तुमच्यासाठी पुरेसा आहे [१४] तोच होय, ज्याने आपल्या सहाय्याने व ईमान-धारकांद्वारे तुमचे समर्थन केले.

وَاِنْ يُّرِيْدُوْۤا اَنْ يَّخْدَعُوْكَ فَاِنَّ حَسْبَكَ اللّٰهُ ؕ هُوَ الَّذِيْۤ
اَيَّدَكَ بِنَصْرِهٖ وَبِالْمُؤْمِنِيْنَ ﴿٦٢﴾

६३. आणि त्यानेच तुमच्या हृदयांना परस्पर जोडले. जर तुम्ही जमीनीवरील सर्व साधने खर्ची घातली असती तरी त्यांच्या हृदयांना जोडू शकले नसते, परंतु तो अल्लाह होय, ज्याने त्यांच्या हृदयांत परस्पर प्रेम निर्माण केले.[१५] नि:संशय तो प्रभावशाली व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.[१६]

وَاَلَّفَ بَيْنَ قُلُوْبِهِمْ ؕ لَوْ اَنْفَقْتَ مَا فِى الْاَرْضِ جَمِيْعًا مَّاۤ اَلَّفْتَ
بَيْنَ قُلُوْبِهِمْ وَلٰكِنَّ اللّٰهَ اَلَّفَ بَيْنَهُمْ ؕ اِنَّهٗ عَزِيْزٌ حَكِيْمٌ ﴿٦٣﴾

६४. हे पैगंबर ! तुमच्यासाठी अल्लाह पुरेसा आहे व त्या ईमान बाळगणाऱ्यांकरिताहि ज्यांनी तुमचे अनुसरण पत्करले आहे.

يٰۤاَيُّهَا النَّبِىُّ حَسْبُكَ اللّٰهُ وَمَنِ اتَّبَعَكَ مِنَ الْمُؤْمِنِيْنَ ﴿٦٤﴾

६५. हे पैगंबर ! ईमान बाळगणाऱ्यांना युद्धासाठी प्रवृत्त करा. जर तुमची वीस माणसे स्थैर्यशील राहणारे असतील तर ते दोनशे (जणां) वर प्रभावी होतील, आणि जर तुमची शंभर माणसे अशी असतील तर एक हजार काफिरांवर प्रभावी होतील, कारण ते अशा प्रकारचे होत जे सामंजस्य बाळगत नाही.[१७]

يٰۤاَيُّهَا النَّبِىُّ حَرِّضِ الْمُؤْمِنِيْنَ عَلَى الْقِتَالِ ؕ اِنْ يَّكُنْ مِّنْكُمْ
عِشْرُوْنَ صٰبِرُوْنَ يَغْلِبُوْا مِائَتَيْنِ ۚ وَاِنْ يَّكُنْ مِّنْكُمْ
مِّائَةٌ يَّغْلِبُوْۤا اَلْفًا مِّنَ الَّذِيْنَ كَفَرُوْا بِاَنَّهُمْ قَوْمٌ
لَّا يَفْقَهُوْنَ ﴿٦٥﴾

६६. आता अल्लाहने तुमचा भार हलका केला व त्याने जाणून घेतले की तुमच्यात काही कमजोरी आहे, यास्तव जर तुमची शंभर माणसे स्थैर्यशील राहणारे असली तर ती दोनशेवर प्रभावी होतील, आणि जर हजार असले तर अल्लाहच्या हुकुमाने दोन हजारांवर प्रभावी होतील [१८] आणि अल्लाह, धैर्यशील लोकांच्या सोबत आहे.

اَلْـٰٔنَ خَفَّفَ اللّٰهُ عَنْكُمْ وَعَلِمَ اَنَّ فِيْكُمْ ضَعْفًا ؕ فَاِنْ يَّكُنْ
مِّنْكُمْ مِّائَةٌ صَابِرَةٌ يَّغْلِبُوْا مِائَتَيْنِ ۚ وَاِنْ يَّكُنْ مِّنْكُمْ اَلْفٌ
يَّغْلِبُوْۤا اَلْفَيْنِ بِاِذْنِ اللّٰهِ ؕ وَاللّٰهُ مَعَ الصّٰبِرِيْنَ ﴿٦٦﴾

९३. आयत क्र. ३९ मध्ये अनेकेश्वरवाद्यांशी युद्ध ज़ारी राखण्याचा आदेश दिला गेला होता, येथपावेतो की काबा गृहाची भूमी शिर्क पासून स्वच्छ शुद्ध व्हावी आणि येथे फर्माविले की जर ते तहाकरिता झुकतील तर तुम्हीहि झुका. ही दुसरी गोष्ट पहिल्या गोष्टीच्या विरुद्ध नाही, किंबहुना या गोष्टीस स्पष्ट करीत आहे की अंतिम-ध्येय (Goal) तर काबागृहाच्या भूमी वरुन शिर्क मिटेपर्यंत अनेकेश्वरवाद्यांशी लढत राहण्याचा आहे, परंतु मधल्या अवस्था अशा असू शकतात की त्यांच्या तह-मागणीला मान्य केले जावे, कारण हा तह शिर्क मिटविण्याकरिता वातावरण अनुकूल बनविण्याकरिता कारक ठरु शकतो व युद्धाचा उल्हास मावळण्याच्या स्थितीत बहुतेक लोक इस्लामविषयी विचार चिंतन करण्यास प्रवृत्त होऊ शकतात.मग जे कार्य समज देऊन केले जाऊ शकते तर त्यासाठी रक्तपाताची गरज काय?

९४. म्हणजे अनुचित भया आधारे तहाच्या मागणीला धुडकावून लावणे योग्य नव्हे, किंबहुना अल्लाहवर भरवसा ठेवून ती मान्य करावी, जर तुमची नियत साबूत आहे व अल्लाहवर तुम्ही भरवसा केला आहे तर शत्रू तुमचे काहीहि नुकसान करू शकणार नाही. शत्रूच्या चाली उधळून लावण्यास अल्लाह पुरेसा आहे.

९५. म्हणजे अरब-कबिल्यांमध्ये आत्यंतिक वैर चालत आले होते ते मिटवून खऱ्या अर्थाने त्यांच्यात भावनात्मक स्वरमेळ निर्माण करणे कोणाच्या आवाक्यात नव्हते व जगभरची साधने खर्ची पाडूनहि हे उद्दिष्ट साध्य केले जाऊ शकत नव्हते परंतु अल्लाहने हा चमत्कार दाखविला की जे लोक एकमेकांच्या रक्तासाठी तहानलेले होते ते ईमान बाळगून एक जमात व आपसात भाऊ-भाऊ झाले.

९६. म्हणजे तो प्रभाशाली आहे यास्तव त्याची योजना लागू झाल्याखेरीज रहात नाही आणि तो हिकमत बाळगणारा आहे म्हणून त्याचे निर्णय अत्यंत बुद्धिकौशल्य-युक्त असतात.

९७. अर्थात ते सत्य समजून घेण्याबाबत वंचित आहेत; म्हणून त्यांची लढाई सर्वत: असत्य -उद्दिष्टांकरिता आहे, आणि जो समूह असत्य उद्दिष्टांकरिता लढत असेल तो आपल्या आंतरिक व स्वभाविक सामर्थ्यांच्या दृष्टीने कमकुवतच राहिल, याऊलट ईमान बाळगणारे सत्याशी परिचित झालेले असतात व त्यांचे युद्ध सर्वस्वी सत्य-वचनास बुलंद करण्याकरिता असते यास्तव त्यांच्या अंगी जबरदस्त आत्मिक व स्वभाविक बल निर्माण होते. ते असे समजतात की अल्लाहच्या मार्गात प्राण त्यागणे म्हणजे प्राण गमविणे नव्हे, किंबहुना त्याचा लाभ घेणे व मेल्यावरहि चिरसजीव राहणे होय म्हणून ते निर्भयतापूर्वक लढतात. ईमान बाळगणाऱ्यांना त्यांच्या या आंतरिक सामर्थ्याची जाणीव करून देताना धर्मयुद्धासाठी प्रवृत्त केले गेले आहे व त्यांना अशी ताकीद केली गेली आहे की, काफिरांच्या विपुल संख्येकडे बघून त्यांनी युद्धासाठी पाऊल टाकण्यास कचरू नये, मग काफ़िरांची संख्या ईमान बाळगणऱ्यांच्या तुलनेने दहा पट जास्त का असेना. कारण असत्य, असत्याच्या विरोधात जोर दाखवू शकते परंतु सत्याच्या विरोधात ते टिकू शकत नाही.

विस व शंभराची संख्या येथे उदाहरणादाखल दिली गेली आहे आणि संभवत: या अनुषंगाने की तत्कालीन युद्धात सैन्य व्यवस्था वीस वीस व शंभर शंभर च्या तुकडी स्वरूपात असावी.

९८. अर्थात हे की, जेव्हा प्रश्न शत्रूच्या विरूद्ध पाऊल उचलण्याचा असेल तर शत्रूपक्षाचे सामर्थ्य तुमच्याहून दहा पटींनी जास्त असले तरी त्याच्या विरूद्ध युद्ध पवित्रा घेण्याबाबत तुम्ही संकोच बाळगू नये, कारण ईमान बाळगणाऱ्यांकरिता विरोधाची खरी पातळी हीच आहे, जसे वरील आयतीत वर्णिले गेले आहे. तथापि सध्या ज्याअर्थी तुमच्यात असे लोक आहेत जे निष्णात नाहीत आणि सबुरी धैर्याच्या दृष्टीने अपेक्षित पातळीवर बसत नाही, म्हणून बद्र युद्धाच्या प्रसंगी यांच्याकडून विविध वैगुण्ये दिसून आली, ज्यासंबंधी या सूरहमध्ये कानउघाडणीहि केली गेली आहे, यास्तव तुमच्या जबाबदारीस हलके केले जात आहे. आता जर शत्रूचे सामर्थ्य दुप्पट असेल तरी तुम्ही त्याच्या विरूद्ध पाऊल उचलण्यास संकोच बाळगू नये.

ही सवलत त्या प्रसंगासाठी आहे जेव्हा शत्रूच्या विरुद्ध प्रतिकारात्मक पाऊल उचलून युद्ध लढावयाचे असेल जसे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) मदीनेच्या परिसरातील वेगवेगळया शत्रू कबिल्यांचे डोके ठेचण्याकरीता लहान मोठे दस्ते रवाना करीत असत. राहीले स्वरंक्षणार्थ लढले जाणारे युद्ध तर ते लढणे क्रमप्राप्त होय आणि यात औचित्याचा प्रश्नच निर्माण होत नाही, तेव्हा बद्र युद्धाच्या प्रसंगी मुसलमान आपल्या कमकुवत स्थितीतही आपल्याहून तिप्पट सामर्थ्याशी लढले, तसेच उहुदच्या युद्धातहि त्यांना तीन पटीहून अधिक सामर्थ्याशी सामना करावा लागला व खंदकच्या युद्धात तर शत्रू पक्षाची संख्या दहा हजारांवर होती, जेव्हा मुसलमानांची संख्या तीन हजार व एक कथनानुसार एक हजाराहूनहि कमी होती, म्हणजे एकाच्या विरोधात दहा असा. मुकाबला होता.

सर्वसाधारणपणे भाष्यकारांनी या आयतीचा असा खुलासा केला आहे की आधी हा आदेश होता की मुसलमानांनी आपल्याहून दहापट संख्येशी मुकाबला करावा व लढाईच्या मैदानातून पळ काढू नये, परंतु जेव्हा हा आदेश मुसलमानांना दुष्कर झाला तेव्हा दुसरी आयत अवतरीत झाली, ज्यात ही सवलत दिली गेली की आपल्याहून दुप्पट संख्येशी विरोध करण्यात त्यांनी

आटोकाट प्रयत्न करावा आणि जर दोन पटींहून जास्त संख्या असेल तर फरार होण्यास वाव असू शकतो.

तथापि आयतीचा हा खुलासा ना कुरआनच्या निवेदनाशी औचित्य राखतो व ना घटनांद्वारे याला पुष्टी मिळते. जेथपावेतो फरार होण्याचा प्रश्न उद्‌भवतो, या सूरहच्या आयत क्र.१६ मध्ये याबाबत सक्त मनाई केली गेली आहे म्हणजे जेव्हा कसेहि करून काफ़िरांच्या सैन्याशी मुठभेड व्हावयाचीच तर मग मुसलमानांना आपल्या रक्ताच्या अंतिम थेंबापर्यंत लढावयाचेच आहे मग शत्रू संख्या कितीहि असो. मुकाबल्यापासून पळ काढण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही कारण इस्लामच्या शब्दकोशात सुरवाती पासूनच हा शब्द अस्तित्वात नाही. याला अपवाद असणारी स्थिती केवळ हीच की युद्धाचा पावित्रा म्हणून मागे सरणे. आशासाठी की पुन्हा भरपूर वार करणे शक्य व्हावे. राहीली घटनांची साक्ष, तर (पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या काळात जेवढया लढाया झाल्यात त्यातली एकहि उदाहरणादाखल या गोष्टीच्या समर्थनार्थ प्रस्तुत केली जाऊ शकत नाही की एखाद्या प्रसंगी फरार होणे मुसलमानांकरिता योग्य राहीले असावे. वस्तुत: प्रत्येक प्रसंगी शत्रू सैन्याची संख्या मुसलमानांच्या सैन्याच्या तुलनेंने कित्येक पटींनी अधिक राहीली. जर उहुदमध्ये काही मुसलमांनाच्या हातून ही चुक घडली होती की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या हत्या केली जाण्याच्या अफ़वेने त्यांना घाबरवून सोडले होते व या भयग्रस्त अवस्थेत ते आघाडी सोडून जात होते, तर याबाबत क़ुरआनने सक्त कानउघाडणी केली, वस्तुत: त्यावेळी मुसलमानांची संख्या फक्त सातशे होती; याउलट काफ़िरांची संख्या तीन हजार होती.

खरे पाहता, भाष्यांतर्गत आयतीचा संबंध फरार होण्यास सवलत देण्याशी नाही, किंबहुना जिहाद (धर्मयुद्धाची) स्फूर्ति निर्माण करण्याशी आहे. यास्तव वरील आयतीचा आरंभच ‘हे पैगंबर ! ईमान बाळगणाऱ्यांना युद्धासाठी प्रवृत्त करा’ या आदेशाने झाला आहे. म्हणून आयतीचा हेतु असा की युद्ध संदर्भात पाऊल टाकण्या विषयी निर्णय घेण्यापूर्वी शत्रू सामर्थ्याचे अनुमान लावले जावे. जर शत्रू सैन्य तुमच्याहून दुप्पट संख्येने असेल तर अशा स्थितीत प्रतिकारात्मक पाऊल उचलण्या बाबत तुम्हाला कसलाही संकोच वाटू नये, त्याच स्फूर्तिने आगेकूच करीत रहा नवल नव्हे की, तुम्ही आपल्याहून दहापट संख्येवर भारी व्हाल. बद्र युद्धानंतर जेव्हा वेगवेगळ्या अरब कबिल्यांनी मदीनेवर आक्रमण करण्याची तयारी सुरू केली तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्यांचे डोके ठेचून काढण्याकरिता जे सैनिक दस्ते पाठविले ते अगदी या आदेशानुसार होते.

**कोणत्याहि पैगंबराकरिता हे योग्य नव्हे की त्याच्याजवळ कैदी असावेत, जोपर्यंत तो जमीनीवर प्रभुत्व प्राप्त करीत नाही. तुम्ही लोक इहलोकीय लाभांची इच्छा बाळगतां, आणि अल्लाह (तुमच्या साठी) आखिरत इच्छितो आणि अल्लाह प्रभावशाली व हिकमत (बुद्धि कौशल्य) बाळगणारा आहे. *(अल-कुरआन)***

६७. कोणत्याहि पैगंबराकरिता हे योग्य नव्हे की त्याच्याजवळ कैदी असावेत, जोपर्यंत तो जमीनीवर [९९] प्रभुत्व प्राप्त करीत नाही. तुम्ही लोक इहलोकीय लाभांची इच्छा बाळगतां, आणि अल्लाह (तुमच्या साठी) आखिरत इच्छितो [१००] आणि अल्लाह प्रभावशाली व हिकमत (बुद्धि कौशल्य) बाळगणारा आहे. [१०१]

مَا كَانَ لِنَبِيٍّ أَنْ يَكُونَ لَهُ أَسْرَىٰ حَتَّىٰ يُثْخِنَ فِي الْأَرْضِ ۚ تُرِيدُونَ عَرَضَ الدُّنْيَا وَاللَّهُ يُرِيدُ الْآخِرَةَ ۗ وَاللَّهُ عَزِيزٌ حَكِيمٌ ﴿٦٧﴾

६८. जर अल्लाहचे फर्मान आधीपासून आलेले नसते तर,तुमच्या कैदी बनविण्याचा परिणाम म्हणून, तुम्हाला सक्त शिक्षा भोगावी लागली असती[१०२]

لَوْلَا كِتَابٌ مِنَ اللَّهِ سَبَقَ لَمَسَّكُمْ فِيمَا أَخَذْتُمْ عَذَابٌ عَظِيمٌ ﴿٦٨﴾

६९. तेव्हा, जो माले-ग़नीमत तुम्ही प्राप्त केला आहे तो खा, कारण तो हलाल (वैध) व पाक (स्वच्छ शुद्ध) आहे [१०३] आणि अल्लाहचे भय बाळगून असा,निःसंशय अल्लाह माफ करणारा, व दयावान आहे.

فَكُلُوا مِمَّا غَنِمْتُمْ حَلَالًا طَيِّبًا ۚ وَاتَّقُوا اللَّهَ ۚ إِنَّ اللَّهَ غَفُورٌ رَحِيمٌ ﴿٦٩﴾

७०. हे पैगंबर ! तुम्हा लोकांच्या ताब्यात जे कैदी आहेत त्यांना सांगा, जर अल्लाहने हे जाणून घेतले की तुमच्या मनांत काही भलाई आहे तर जे काही तुमच्या पासून घेतले गेले आहे, त्याहून आधिक चांगले तुम्हाला प्रदान करील व तुम्हाला क्षमा करील [१०४] अल्लाह माफ करणारा व दया करणारा आहे.

يَا أَيُّهَا النَّبِيُّ قُلْ لِمَنْ فِي أَيْدِيكُمْ مِنَ الْأَسْرَىٰ إِنْ يَعْلَمِ اللَّهُ فِي قُلُوبِكُمْ خَيْرًا يُؤْتِكُمْ خَيْرًا مِمَّا أُخِذَ مِنْكُمْ وَيَغْفِرْ لَكُمْ ۗ وَاللَّهُ غَفُورٌ رَحِيمٌ ﴿٧٠﴾

७१. आणि जर ते तुमच्याशी विश्वासघात करू इच्छितात तर याआधी त्यांनी अल्लाहशी विश्वासघात केला आहे आणि याचा परिणाम म्हणूनच त्याने त्यांना तुमच्या ताब्यात देऊन टाकले [१०५] आणि अल्लाह जाणणारा व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.

وَإِنْ يُرِيدُوا خِيَانَتَكَ فَقَدْ خَانُوا اللَّهَ مِنْ قَبْلُ فَأَمْكَنَ مِنْهُمْ ۗ وَاللَّهُ عَلِيمٌ حَكِيمٌ ﴿٧١﴾

९९. अर्थात लढाईच्या मैदानांत.

१००. बदर युद्धात मुसलमानांनी काफ़िरांच्या ७० इसमांना कैद केले होते ज्यात त्यांचे नेते उक्बा बिन मुऔत व नज्र बिन हारिस यांचाहि समावेश होता. युद्ध आटोपल्यानंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आदेशान्वये या दोन्ही नेत्यांना बद्रजवळ एका स्थानी ठार केले गेले व बाकीच्या कैदींना, मुसलमान आपल्या सोबत मदीनेस घेऊन गेले. तेथे यांच्यापैकी त्या कैद्यांना जे फिदीया देऊ शकत होते, त्यांना फिदया घेऊन मुक्त केले गेले व जे लिहणे वाचणे शिकवू शकत होते त्यांच्याकरवी ही सेवा घेऊन त्यांना मुक्त केले गेले. इतर कैद्यांची सुटका काहीही मोबदला न घेता करण्यात आली.

या घटनेचा जो पैलू अयोग्य होता तो हा की शत्रूंचा चांगल्या प्रकारे सफाया करण्याऐवजी त्यांना कैद करावयास सुरवात केली, ज्यात ही विचार सरणी कार्यरत होती की त्यांच्याकडून फिदया रूपाने भली मोठी रक्कम वसूल होईल. सर्वश्रेष्ठ अल्लाहने मुसलमानांच्या ह्याच विचार सरणीवर व त्यांच्या ह्याच चुकीच्या वर्तनावर अंकुश ठेवला आहे. आयतीचा अर्थ हा की पैगंबराच्या नेतृत्वात लढल्या जाणाऱ्या युद्धात अशा उच्च उद्दिष्टाकडे दृष्टी असली पाहीजे ज्यासाठी पैगंबर रणभूमीवर उतरतो, आर्थिक व भौतिक लाभांकडे नव्हे, विशेषत: युद्धात प्राप्त करण्यासाठी उद्दिष्टाची निकड ही होती की बद्रमध्ये जेव्हा शत्रूचा पराभव होत होता, तेव्हा त्यांचा शिरच्छेद केला गेला असता, प्रामुख्याने शत्रूच्या कोणत्याहि नेत्याला मुळीच जिवंत ठेवले नसते की त्यांना पुन्हा डोके वर काढण्याची संधी मिळावी, परंतु तुम्ही वेळेआधीच पकड धडकीस आरंभ केला केवळ या कारणास्तव की तुम्हाला फिदया घ्यायचा अवसर लाभेल. चांगले जाणून असा की, पैगंबर या उद्देश्याने लढाई करतो की, जमीनीवर सत्याचा बोलबाला व्हावा, शत्रूंना कैद करुन फिदया वसूल करण्यासाठी नव्हे. तथापी शत्रूचे सामर्थ्य जर लयाला गेले असेल तेव्हा सैन्यातील सर्व माणसांना कैद करण्यात व नंतर फिदया घेऊन त्यांना मुक्त करण्यात काहीच हरकत नाही.

१०१. अल्लाह प्रभावशाली आहे, म्हणून तो आपल्या प्रेषिताचे स्थान उच्च राखू इच्छितो व तो बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे, यास्तव त्याचे समस्त निर्णय बुद्धिकौशल्यमय असतात.

१०२ बद्रयुद्धाच्या आधी सूरह मुहम्मद अवतरली होती ज्यात युद्धासंबंधी हा आदेश दिला गेला होता की-

فَإِذَا لَقِيتُمُ الَّذِينَ كَفَرُوا فَضَرْبَ الرِّقَابِ حَتَّىٰ إِذَا أَثْخَنتُمُوهُمْ فَشُدُّوا الْوَثَاقَ فَإِمَّا مَنًّا بَعْدُ وَإِمَّا فِدَاءً حَتَّىٰ تَضَعَ الْحَرْبُ أَوْزَارَهَا۔ (سورہ محمد۔۴)

''जेव्हा तुमचा सामना काफ़िरांशी व्हावा तर त्यांच्या माना उडवा येथपावेतो की, जेव्हा तुम्ही त्यांच्यावर प्रभावी व्हाल तेव्हा त्यांना मजबूतपणे बांधा, त्यानंतर एकतर उपकार करा किंवा फिदया घ्या, येथपावेतो की युद्धाने आपली शस्त्रे खाली टाकावीत.''(सूरह मुहम्मद-४)

या आदेशात लढणाऱ्यांना कैद करण्याची ताकीद दिली गेली होती, जेव्हा त्यांच्यावर चांगल्या रीतीने प्रभाव केला गेला असावा. म्हणजे युद्धात जोपर्यंत शत्रूंचे चांगल्या प्रकारे डोके ठेचले न जावे व त्याचे सामर्थ्य खचून न जावे तो पर्यंत ठार करण्याचा क्रम जारी राखला पाहिजे. बद्र युद्धात मुसलमानांकडून ही चूक झाली होती की शत्रूचे पारिपत्य करण्या आधीच त्यांनी कैद करण्याचा क्रम आरंभिला व असे करण्यात ही विचारसरणी कार्यरत होती की कैदी बनविण्याच्या स्थितीत त्यांच्याकडून फिदीया वसूल केला जाऊ शकेल जरी ही चुक सर्व मुजाहीदीन (धर्मयोद्धयां) कडून नव्हे, किंबहुना त्यांच्या एका समूहाच्या हातून घडली होती. तथापी ही सामुदायिक चुक होती, जिचे निष्पन्न हे हि निघू शकत होते की हे कैदी मुक्त झाल्यानंतर संधी लाभल्यावर पुन्हा मुसलमानांच्या मुकाबल्यात यावेत आणि काही तर उहुद युध्दाच्या प्रसंगी मुसलमानांशी सामना करण्यास आले देखील तसेच यामुळे कमजोर मुसलमानांमध्ये फिदीया वसूल करण्याचा कल वाढीस लागू शकत होता, की जिहाद (धर्मयुद्ध) फक्त अल्लाहच्या कलिमास बुलंद करण्याकरिता केले गेले पाहिजे, आर्थिक लाभ प्राप्त करण्याच्या हेतुने नव्हे. या कारणास्तव या चुकीबद्दल मुसलमानांना ताकीद दिली गेली. यासाठी की यापुढे अशी चुक करण्यापासून त्यांनी अलिप्त रहावे.

आयतीत ''किताबुम मिनल्लाह'' (अल्लाहचे फर्मान)शी अभिप्रेत सूरह मुहम्मदची वर उल्लेखिलेली आयत होय, व ही तंबी दिली गेली की, तुम्हाला सक्त शिक्षा भोगावी लागली असती तर हे त्या लोकांबाबत आहे ज्यांनी पूर्णत: वर्चस्व प्राप्त होण्याआधी शत्रूंना कैद केले होते व ह्या वेळेपूर्वीच्या अटक-सत्रात त्यांच्या दृष्टी पथात आर्थिक लाभ (फिदया) वसूल करणे हे होते म्हणून या तंबीस प्रेषितांच्या समस्त सहकाऱ्यांशी संबंधित समजणे योग्य नव्हे याचे उदाहरण सूरह नूर ची ही आयत होय

وَلَوْلَا فَضْلُ اللّٰهِ عَلَيْكُمْ وَرَحْمَتُهُ فِي الدُّنْيَا وَالْاٰخِرَةِ لَمَسَّكُمْ فِي مَآ اَفَضْتُمْ فِيْهِ عَذَابٌ عَظِيْمٌ ۔(سورہ النور۔۱۴)

''जर तुम्हा लोकांवर इहलोक व आखिरत मध्ये अल्लाहची कृपा व त्याची दया नसती तर ज्या गोष्टीमध्ये तुम्ही पडला होता

त्यामुळे तुम्हाला सक्त शिक्षा-यातना पोहचली असती.''

या आयतीतहि शिक्षा यातनेची गोष्ट बाह्यत: सर्व सामान्य मुसलमानांविषयी सांगितली गेली आहे, परंतु तात्पर्य जसे की वाक्यशैली वरुन स्पष्ट आहे, ते मुसलमान होत जे ''इफ़क'' च्या घटने मध्ये गुरफटले गेले होते.

येथे हा प्रश्न उद्‌भवतो की जर मुसलमानांनी वेळे आधीच काफिरांना बंदी बनविले होते तर नंतर त्यांना ठार करण्याचा आदेश दिला जाऊ शकत होता. मग असे का घडले नाही? तर याचे उत्तर असे की, कैदी बनविल्या नंतर एखाद्या विशेष कारणास्तव एखाद्या कैद्याला ठार केले जाऊ शकत होते. सर्व सामान्य कैद्यांना ठार केले जाऊ शकत नव्हते, कारण सूरह मुहम्मदच्या वर उल्लेखिलेल्या आयतीत आधीच हा आदेश दिला गेला होता की जेव्हा त्यांना कैदी बनवाल मग एकतर उपकार वर्तन अंगिकारून त्यांना सोडून द्या अथवा फिदया घेऊन मुक्त करा.

तथापि ज्या मुसलमानांच्या हातून ही चूक घडली होती ती इज्तिहादी (जेथे कुरआन व हदीस या धर्म ग्रंथाचा स्पष्ट आदेश नसेल तेथे आपल्या बुद्धीने विधिनिषेधा संबंधी निर्णय करणे) नव्हती, किंबहुना एका आदेशावर उचितरित्या अंमलबजावणी न करण्याविषयीची चुक होती, जिला आर्थिक लाभाच्या लालसेने घोर बनविले, यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फेही दटावणी झाली. स्पष्ट असावे की आयतीचे शब्द **''फीमा अख़ज़तुम''** चा अनुवाद सर्वसामान्य पणे ''तुम्ही जे काही घेतले त्याच्या मुळे'' असा केला जातो ज्याचा अर्थ असा की ईश-क्रोध फिदया घेण्याबद्दल झाला होता. आयतीचा हा अर्थ घेण्याच्या स्थितीत प्रतिष्ठित सहाबा देखील क्रोध-मर्यादित येतात. या व्यतिरिक्त यात अडचण अशी की फिदया घेण्याबद्दल जर हा ईश-कोप होता तर फिदया परत केला जाऊ शकत होता तसेच ह्यात अन्य दुष्करता देखील आहे म्हणून आम्ही याचा अनुवाद ''तुमच्या कैद करण्याच्या परिणामी'' असा केला आहे, कारण अरबी भाषेत जेथे **''अख़ज़''** चा अर्थ घेणे असा होतो तेथे अटक करणे व कैद करणे असाहि अर्थ होतो म्हणून अरबी भाषेत **''अख़ीज़''** कैद्याला म्हणतात (पहा लिसानुल अरब-शब्द-अखज खंड-३पृ.४७३)

या खुलाशान्वये ईश-क्रोधाचे वर्तुळ त्याच लोकापर्यंत राहते ज्यांच्या हातून वेळेआधीच कैदी बनवून घेण्याची चुक घडली होती. तसेच इतर अडचणहि नाहीशी होते.

१०३. म्हणजे जी चुक तुमच्या हातून घडली ती आपल्या स्थानी,पण जेथपावेतो माले गनीमतचा संबंध आहे ज्यात कैद्यांकडून घेतलेला फिदया देखील सामील आहे तो वापरण्यात काहीच हरकत नाही. की तो हलाल व पाक (स्वच्छ शुद्ध) आहे.

या अनुषंगाने एक महत्वपूर्ण तात्विक बाबहि स्पष्ट झाली व ती अशी की युद्धात लाभलेली ही संपत्ति जी काफ़िरांच्या मालकीची होती. तिला त्यांनी योग्य व अयोग्य मार्गांनी कमविले असेल परंतु जेव्हा ती योग्य रित्या मुसलमानांच्या हाती लागली तर या गोष्टींना कुरेदण्याविना तिला हलाल व पाक ठरविले गेले म्हणून यावरून हे निष्पन्न निघते की सामुदायिक स्वरुपात जी धनसंपदा मुसलमानांकडे स्थानांतरित व्हावी वा इस्लामी शासनाच्या खजिन्यात जमा व्हावी, तिचे स्थित्यंतर जर योग्य स्वरुपाचे आहे तर त्या सम्पत्ति विषयी या विवादात पडण्याची गरज नाही की ती अयोग्य मिश्रणापासून मुक्त होती वा नव्हती.

१०४. म्हणजे जो फिदया तुमच्या कडून घेतला गेला आहे त्याच्या मोबदल्यात तुम्हाला इस्लाम-स्वीकृतिचे सद्‌भाग्य प्रदान करील व अशा प्रकारे तुम्ही त्याच्या माफीस पात्र व्हाल. मात्र या अटीवर की या प्रसंगी तुम्हाला जे जीवदान दिले गेले आहे त्याची तुम्ही कदर बाळगा.

१०५. म्हणजे जर ते पैगंबराच्या उपकाराची हेळसांड करून पुन्हा त्याच्या विरोधात येऊ इच्छितात तर याद राखा ते पुन्हा मुसलमानांद्वारे प्रभावित होतील.

**आणि ज्या लोकांनी नंतर ईमान आणले व हिजरत केली व तुमच्या सह मिळुन जिहाद केले, तर ते देखील तुमच्या पैकी होत. आणि रक्ताचे नातेवाईक अल्लाहच्या विधीनियमात एकमेकांचे अधिक हक्कदार होत. निःसंशय, अल्लाह प्रत्येक गोष्टीचे ज्ञान बाळगणारा आहे. *(अल-क़ुरआन)***

७२. ज्या लोकांनी ईमान बाळगले आणि ज्यांनी हिजरत (देश-त्याग) केली [१०६] व अल्लाहच्या मार्गात आपले धन व प्राणाने जिहाद (धर्मयुद्ध) केले [१०७] आणि ज्या लोकांनी (देश-त्याग) केलेल्यांना) आश्रय दिला व त्यांची मदत केली [१०८] तेच आपसात एकमेकांचे मित्र आहेत [१०९] आणि ज्या लोकांनी ईमान तर बाळगले, परंतु हिजरत केली नाही, तर त्यांच्याशी तुमच्या मित्रत्वाचा कसलाहि संबंध नाही, जोपावेतो ते हिजरत करीत नाही.[११०] तथापि धर्म-संबंधात ते तुमच्याकडून मदतीची अपेक्षा करतील तर तुम्हावर मदत करणे अत्यावश्यक होय. मात्र याशिवाय की त्यांनी अशा समूहा विरुद्ध मदत मागावी, ज्याच्याशी तुमचा करार झाला असावा.[१११] आणि तुम्ही जे काही करता ते अल्लाहच्या नजरेत आहे.

إِنَّ الَّذِينَ آمَنُوا وَهَاجَرُوا وَجَاهَدُوا بِأَمْوَالِهِمْ وَأَنفُسِهِمْ فِي سَبِيلِ اللَّهِ وَالَّذِينَ آوَوا وَّنَصَرُوا أُولَٰئِكَ بَعْضُهُمْ أَوْلِيَاءُ بَعْضٍ ۚ وَالَّذِينَ آمَنُوا وَلَمْ يُهَاجِرُوا مَا لَكُم مِّن وَلَايَتِهِم مِّن شَيْءٍ حَتَّىٰ يُهَاجِرُوا ۚ وَإِنِ اسْتَنصَرُوكُمْ فِي الدِّينِ فَعَلَيْكُمُ النَّصْرُ إِلَّا عَلَىٰ قَوْمٍ بَيْنَكُمْ وَبَيْنَهُم مِّيثَاقٌ ۗ وَاللَّهُ بِمَا تَعْمَلُونَ بَصِيرٌ ﴿٧٢﴾

७३. आणि ज्या लोकांनी कुफ्र केले ते आपसात एकमेकांचे मित्र आहेत. जर तुम्ही असे न कराल तर जमीनीवर उत्पात व जबरदस्त उपद्रव माजेल.[११२]

وَالَّذِينَ كَفَرُوا بَعْضُهُمْ أَوْلِيَاءُ بَعْضٍ ۚ إِلَّا تَفْعَلُوهُ تَكُن فِتْنَةٌ فِي الْأَرْضِ وَفَسَادٌ كَبِيرٌ ﴿٧٣﴾

७४. ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी हिजरत केली आणि अल्लाहच्या मार्गात जिहाद केले व ज्या लोकांनी (देश-त्याग केलेल्यांना) आश्रय दिला व मदत केली, तेच खरे मोमीन (ईमान-बाळगणारे) होत. त्यांच्या करिता क्षमा व सन्मानपूर्वक उपजिविका आहे.[११३]

وَالَّذِينَ آمَنُوا وَهَاجَرُوا وَجَاهَدُوا فِي سَبِيلِ اللَّهِ وَالَّذِينَ آوَوا وَّنَصَرُوا أُولَٰئِكَ هُمُ الْمُؤْمِنُونَ حَقًّا ۚ لَّهُم مَّغْفِرَةٌ وَرِزْقٌ كَرِيمٌ ﴿٧٤﴾

७५. आणि ज्या लोकांनी नंतर ईमान आणले व हिजरत केली व तुमच्या सह मिळुन जिहाद केले, तर ते देखील तुमच्या पैकी होत.[११४] आणि रक्ताचे नातेवाईक अल्लाहच्या विधीनियमात एकमेकांचे अधिक हक्कदार होत.[११५] निःसंशय, अल्लाह प्रत्येक गोष्टीचे ज्ञान बाळगणारा आहे.

وَالَّذِينَ آمَنُوا مِن بَعْدُ وَهَاجَرُوا وَجَاهَدُوا مَعَكُمْ فَأُولَٰئِكَ مِنكُمْ ۚ وَأُولُو الْأَرْحَامِ بَعْضُهُمْ أَوْلَىٰ بِبَعْضٍ فِي كِتَابِ اللَّهِ ۗ إِنَّ اللَّهَ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيمٌ ﴿٧٥﴾

१०६. हिज़रत म्हणजे पलायन नव्हेच किंबहुना देशत्याग होय. ईमान बाळगाणरे देश-भक्त नसतात, किंबहुना ते ईश-भक्त असतात. यास्तव जेव्हा ईश-धर्म या गोष्टीची निकड बाळगतो की त्यांनी अशा भू-भागाचा त्याग करावा जो सत्या करिता तंग होत आहे, तर ते हे बलीदान द्यायला तयार होतात त्या काळात जेव्हा सूरह अनफाल अवतरली इस्लामचे सामर्थ्य मदीनेत एकवटले जात होते; अशासाठी की पैगंबराच्या नेतृत्वात कुफ्र शी मुकाबला करणे शक्य व्हावे म्हणून या हेतुसाठी जे लोक मक्का शहराचा त्याग करून मदीनेला आले होते ते प्रतिष्ठेस पात्र ठरले.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह निसा टीप क्र.१७७

१०७. जिहाद म्हणजे केवळ धडपड नव्हे, किंबहुना अशी धडपड ज्यात ईमान बाळगणाऱ्याने सत्य विरोधक शक्तीशी टक्कर द्यावी. सत्य व असत्यात जेव्हा युद्ध व्हावे तेव्हा सत्याच्या सरंक्षणार्थ त्याने आपले धनहि खर्च करावे व प्राणाची बाजीहि लावावी.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह मायदा टीप क्र. १२३

१०८. अभिप्रेत मदीनेचे अन्सार होत; ज्यांनी देश-त्याग केलेल्या मुसलमानांची सर्वतोपरि मदत केली. अर्थात ही मदत तात्पुरती रिलीफ नव्हती; किंबहुना आपल्या निम्या सम्पत्तिची अंत:करणपूर्वक भेट होती त्याचबरोबर त्यांनी त्यांना राहायला आपल्या घरात जागा दिली.

१०९. मूळ ग्रंथात ''अवलीया'' हा शब्द वापरला गेला आहे. ''वली'' या शब्दाचे हे अनेक वचन होय. अरबी भाषेत हा शब्द अनेक अर्थांनी येतो परंतु जेव्हा याचा प्रयोग शत्रूशी सामना या अर्थाने होतो तेव्हा त्याचा अर्थ मित्र, समर्थक व सहाय्यक असा होतो. येथे मुहाजिरीन (देशांतर केलेले) व अन्सार (सहाय्यक) यांना एकमेकांचे ''वली'' असे जे म्हटले गेले आहे ते या अर्थाने की काफ़िरांच्या विरोधात ते एकमेकांचे मित्र होत. म्हणून त्यांच्यावर एकमेकांचे संरक्षण व समर्थन आणि सहाय्य करण्याची जबाबदारी येते. त्यांच्यात असे ऐक्य व अशी एकत्रता निर्माण झाली पाहिजे की त्यांना चांगल्या प्रकारे आपले सरंक्षणहि करता यावे व सत्य उद्दिष्टाकरिता जिहादहि करता यावे. मैत्रीचे हे नाते जे इस्लामी राज्याच्या मुसलमान नागरीकांच्या दरम्यान क़ायम केले गेले होते, त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात राजकिय जबाबदाऱ्या सोपवित होते.

११०. म्हणजे ज्या लोकांनी इस्लाम धर्म तर स्वीकारला आहे परंतु हिजरत करून ते मदीनेला आले नाही, त्यांच्याशी राजकिय व्यवहारात व समस्यांमध्ये तुमच्या मैत्रीचा संबंध नाही. ते मुसलमान झाल्यामुळे इस्लामी समाजाचे घटक जरूर आहेत, परंतु मदीनेत मुसलमानांचे जे राजकिय स्थान ठरले आहे त्याचे ते सदस्य नव्हते म्हणून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी तुमच्यावर येत नाही व ना त्यांच्यावर त्या कराराचे पालन आवश्यक ठरते जो तुम्ही एखाद्या राष्ट्राशी केला असावा.

यावरून स्पष्ट झाले की इस्लामचा आंतरराष्ट्रीय विधि नियम हा आहे की एक इस्लामी राज्य आपल्या हद्दीपासून बाहेर राहणाऱ्या मुसलमानांच्या संरक्षणास जबाबदार नाही.

१११. म्हणजे ज्याअर्थी ते इस्लामी राज्याच्या हद्दींपासून बाहेर राहतात म्हणून तुमच्यावर त्यांच्या संरक्षणाची कायदेशीर जबाबदारी येत नसली तरी ते धर्म-बांधव व इस्लामी समाजाचे घटक आहेत म्हणून धर्म-संबंधात जर ते एखाद्या मदतीची अपेक्षा करतील तर तुम्ही त्यांना मदत केली पाहिजे. मात्र हे की ते ज्या राज्यात राहात असतील त्या राज्याशी तुमची शस्त्र-संधी असावी व त्यांनी त्या राज्याविरूद्ध तुमच्याकडून मदत मागावी. अशा स्थितीत तुम्ही आपल्या कराराची प्रतिष्ठा राखली पाहिजे; आणि आपल्या मुसलमान बांधवांच्या मदतीकरिता अयोग्य पद्धतिचा अंगिकार न करावा.

यावरून आंतरराष्ट्रीय आदेश संदर्भात खालील तात्विक बाब स्पष्ट होते:

(१) इस्लामेतर राज्यांमधील मुस्लिम अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची कोणीतीहि कायदेशीर जबाबदारी इस्लामी राज्यावर येत नाही, तथापि याचा हा अर्थ नव्हे की त्यांनी यांच्याशी अशाप्रकारे असंबंधित रहावे की गरज प्रसंगी धर्मसंबंधात यांची काही मदतही न करावी; किंबहुना ज्या प्रकारच्या मदतीस ते पात्र आहेत, त्यांची अवश्य मदत केली जावी कारण सर्व एकाच इस्लामी समाजाचे घटक आहेत. उदाहरणार्थ जर मुसलमान मसजिदींच्या उभारणीसाठी किंवा धार्मिक शाळेच्या प्रस्थापनेसाठी अथवा इस्लामचे आवाहन लोकांपर्यंत पोहचविण्याकरिता एखाद्या इस्लामी राज्याकडून मदत मागतील तर या कार्याकरिता त्याचे सहाय्य करण्यात जेथापवेतो परिस्थिती अनुकूल आहे त्यांची मदत अवश्य केली पाहिजे.

(२) जर इस्लामी राज्याने एखाद्या इस्लामेतर राज्याशी ना युद्ध अगर तह चा करार केलेला असेल व तेथील मुस्लिम अल्पसंख्यांक वर्ग, मुस्लिम राज्याकडून एखाद्या अशा मदतीची अपेक्षा करीत आहे की जिचा वापर ते आपल्या राज्याविरूद्ध करू इच्छितात तर याला मुळीच परवानगी नाही, कारण ही कराराची उघडरित्या पायमल्ली होय.

(३) अत्याचार मग तो मुसलमानांवर केला जात असो किंवा मुस्लिमेतरांवर, अल्पसंख्याकांवर याचा नेम धरला जात असो किंवा बहुसंख्यांकांवर. इस्लामी राज्याकरिता याविरूद्ध आवाज बुलंद करण्यात काहीच अडचण नाही. कारण अत्याचार पिडीताचे समर्थन करणे इस्लामी-नितीचा अत्यंत महत्वपूर्ण

नियम होय. परंतु ज्या राज्यात हा अत्याचार होत असेल त्याच्याविरूद्ध कसलीही कारवायी या स्थितीत केली जाऊ शकत नाही जेव्हा त्याच्याशी इस्लामी राज्याने तह-करार केलेला असावा.

११२. म्हणजे काफिर सर्व मिळून एक समाज होय, त्यांचे विचार व दृष्टीकोन कितीही भिन्न का असेनात, जेथपावेतो कुफ्र म्हणजे सत्याचा इन्कार करण्याचा संबंध आहे. ते सर्व याबाबत सहमत आहेत व इस्लामविरुद्ध आपले एकत्रित सामर्थ्य दाखवू इच्छितात. अशा परिस्थितीत जर मुसलमानांनी या आदेशांनुसार आचरण केले नाही जे त्यांना एकमेकांचे सहाय्य, आपसात ऐक्य व इस्लामी राज्याबाहेरच्या अत्याचार-पिडीत मुसलमानांची मदत करण्याकरिता दिले जात आहेत, तर जबरदस्त उपद्रव व उत्पाताची स्थिती निर्माण होईल.

आज जगाचे वातावरण उपद्रवांमुळे धूलमिश्रित झाले आहे, येथ पावेतो की सत्य-मार्गावर चालणाऱ्यांना श्वास घेणेहि कठीण झाले आहे; आणि उत्पाताचा महापूर तलावर अशा प्रकारे उचंबळून आला आहे की जगातील लहान मोठी सर्व राष्ट्रे यात बुडत आहेत आणि मुस्लिम व मुस्लिमेतर सर्वच याच्या तावडीत सापडत आहेत. हा परिणाम आहे या गोष्टीचा की मुसलमानांनी एक सत्यशील सामर्थ्य बनून उदयास यायला हवे होते, पण ते तसे उदयास आले नाहीत. त्यांना विविध देशांमध्ये सत्ता प्राप्त आहे परंतु ते आपल्या कर्तव्याबाबत गाफील आहेत व जगातून अपाय-उपद्रव हटविण्याकरिता ज्या साधनांना कामी आणण्याची गरज आहे त्याविषयी ते अगदी बेपर्वा आहेत. अशा स्थितीत त्यांच्यावर व जग-वासीयांवर अल्लाहचा प्रकोप अवतरीत होत असेल तर त्यात नवल कसले?

११३. वर मुहाजिरीन व अन्सार यांना त्यांच्या जबाबदरीची जाणीव दिली गेली होती. येथे त्यांना खरे व पक्के मोमीन ठरवित आखिरतच्या यशासंबंधी खुशखबरी दिली गेली आहे.

११४. हा आदेश मुहाजिरीन व अन्सार यांना दिला गेला आहे की यापुढे जे लोक ईमान बाळगतील व हिजरत करून तुमच्या जवळ येतील, तसेच तुमच्यासह जिहाद मध्ये सहभागी होतील त्यांना आपल्या समूहात सामील असल्याचे समजा व त्यांच्याशी या आधारे एखादे विशिष्ट वर्तन न राखा की ते यापूर्वी तुमच्या विरूद्ध राहीलेत.

११५. म्हणजे जेथ पावेतो वारसाधिकाराचा संबंध आहे मुसलमानांच्या दरम्यान विभागणी रक्ताच्या नात्याआधारे अमलात येईल; त्या बंधुत्वाच्या नात्याने नव्हे जे अन्सार व मुहाजिरीन यांच्या दरम्यान क़ायम केले गेले होते. हा संबंध आपल्या जागी व रक्त-संबंध आपल्या जागी. अल्लाहच्या वारसाहक्काच्या विधिनियमाचा पाया रक्ताचे नाते होय, कारण सामाजिक व्यवहारात त्यांच्या हक्कांना प्राधान्य आहे. येथे ही तात्विक आज्ञा देण्यावर समाधान बाळगले गेले होते. नंतर जेव्हा सूरह निसा अवतरली तर त्यात वारसा संबंधीचा विधिनियम विस्तारपूर्वक वर्णिला गेला.

# ९. सूरह अत-तौबा

**नावः** आयत क्र ११७-११८ मध्ये तौबा स्वीकृतिची शुभवार्ता ऐकविली गेली आहे तद्नुषंगाने या सूरहचे नाव ''अत् तौबा'' असे आहे. हिचे दुसरे नाव ''बराअत'' असेहि आहे. अर्थात या दृष्टीने की पहिल्याच आयतीत करारभंग करणाऱ्या अनेकेश्वरवाद्यांच्या करारांपासून भारमुक्त होण्याची घोषणा केली गेली आहे.

**अवतरण काळः** ही सूरह हिजरी सन ८ व १० च्या अवधित विविध प्रसंगी व वेगवेगळ्या भागांच्या रुपाने अवतरली आहे. मजकूरावर विचार केल्याने असे दिसून येते की हिजरी सन ८ मध्ये जेव्हा अनेकेश्वरवाद्यांनी हुदैबिया कराराचा भंग केला तेव्हा आयत क्र. १३ ते २४ अवतरली.

तबूक युद्धा (रजब, हिजरी सन ९) च्या आधी आयत २९ ते ३५ आणि मग त्याच्या तयारीच्या संदर्भात आयत क्र. ३८ ते ४१ अवतरीत झाली.

तबूकहून परतल्यावर आयत क्र. ४२ ते १२७ अवतरली. त्यातल्या अनेक आयती परतीच्या प्रवासातच अवतरीत झाल्या. आणि अधिकांश आयती पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे मदीना पोहचल्यानंतर वेळा वेळा ने अवतरीत झाल्या.

ज़ीकअदा हिजरी सन ९ मध्ये जेव्हा पैगंबरानी हज़रत अबु बक्र यांना अमीर (प्रमुख) बनवून हज्जासाठी रवाना केले तेव्हा आयत क्र.१ ते १२ व २५ ते २८ तसेच ३६, ३७ अवतरीत झाल्या. पैगंबरांनी हजरत अली याना त्यांच्या मागे पाठविले, अशासाठी की त्यांनी हज्ज-प्रसंगी सूरह बराअतचा आरंभ-भाग जो आयत क्र. १ ते ३७ वर आधारित आहे व ज्यात महत्वपूर्ण घोषणा आहेत, तो लोकांना ऐकवावा.

शेवटच्या दोन आयती १२८ व १२९ शेवटी शेवटी अवतरीत झाल्या. सुमारे हिजरी सन १० च्या शेवटी.

**मध्यवर्ति विषयः** सूरह अनफाल प्रमाणेच हिचाहि मध्यवर्ति विषय जिहाद (अल्लाहच्या मार्गात युद्ध) हा आहे. जिहादचा आरंभ बद्रच्या युद्धाने झाला होता ते सूरह अनफालचे शिर्षक आहे आणि त्याचा उत्कर्षबिंदू मक्का विय व ''तबुक युद्ध'' होता, जे सूरह तौबाचे शिर्षक आहे. तात्पर्य ही सूरह अशा वेळी अवतरली जेव्हा इस्लाम आपल्या क्रांतीकारक प्रयत्नाच्या अंतिम अवस्थेत दाखल झाला होता. या अवस्थेत ज्या मार्गदर्शनाची गरज होती तिची सामग्री यात केली गेली.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते २८ मध्ये अरबच्या अनेकेश्वरवाद्यांना, ज्यांच्यावर इस्लामचे प्रमाण पूर्णतः प्रस्थापित झाले होते, व कित्येक कबिल्यांशी तहाचे करारहि झाले होते परंतु इस्लामशी वैर बाळगण्यात त्यांनी या करारांचा उघड भंग केला होता. शेवटचे म्हणून आव्हान दिले गेले आहे की आता इस्लाम शिवाय कोणतीहि गोष्ट त्यांच्याकडून कबूल केली जाणार नाही तथापि ज्या कबिल्यांशी मुसलमानांनी निर्धारीत मुदतीकरीता करार करून ठेवला होता व तयांनी वचनभंग केला नव्हता. त्यांच्याबाबत फर्मावले की त्यांचा करार अवधि पूर्ण होईपर्यंत क़ायम राहील मात्र त्यानंतर त्यांचे नूतनीकरण केले जाणार नाही. जो जनसमूह अखेरचे समजावून सांगितल्यानंतर देखील प्रेषिताविरूद्ध तलवार हाती घेईल तर त्याच्या करिता अल्लाहचा नियम हा आहे की त्याचा निःपात केला जावा. हा नायनाट नैसर्गिक दुर्घटनांच्या स्वरुपातहि होऊ शकतो व प्रेषिताच्या सहकाऱ्यांच्या तलवारीद्वारेहि होऊ शकतो. अरबच्या अनेकेश्वरवाद्यांबाबत अल्लाहचा निर्णय असा झाला की तलवारीद्वारे त्यांचा नायनाट केला जावा यास्तव मुसलमानांना अशी आज्ञा दिली गेली की त्यांनी जिहादच्या या अंतिम अवस्थेच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास तयार व्हावे आणि सर्व सामर्थ्यानिशी शस्त्र हाती घ्यावे.

आयत क्र. २९ ते ३५ मध्ये ग्रंथ बाळगणाऱ्यां (यहुदी व ख्रिश्चन) संबंधी इस्लामी राज्याची पॉलीसी स्पष्ट केली गेली आहे. तसेच त्यांच्या इस्लाम वैराच्या कारणांना अनावरित करीत त्यांना आपल्या अंतिम परिणितीपासून सचेत केले गेले आहे.

आयत क्र.३६ व ३७ मध्ये महिना व वर्ष संदर्भात नैसर्गिक जंत्रीचे अनुसरण करण्याची व प्रतिष्ठित महिन्यांचा आदर राखण्याची तसेच अनेकेश्वरवाद्यांच्या कल्पित जंत्रीला रद्द करण्याची ताकीद केली गेली आहे.तात्पर्य या दोन आयतींचे स्थान त्या आदेशांवर जे अनेकेश्वरवाद्यांबाबत वर वर्णिले गेले एक पुरवणी म्हणून आहे.

आयत क्र. ३८ ते ४१ तबुक युद्धाच्या प्रसंगी अवतरली व त्यांत मुसलमानांना जिहाद करिता निघण्याविषयी प्रोत्साहित केले गेले आहे.

आयत क्र. ४२ ते ७० तबुक युद्धानंतर अवतरली व त्यांत दांभिक लोकांची, जे जिहाद पासून अंग चोरत होते सक्त पकड घेतली आहे आणि प्रसंगानुषंगाने आयत क्र. ६० मध्ये ज़कात खर्च करण्याच्या बाबी वर्णिल्या गेल्या आहेत.

आयत क्र. ७१ व ७२ मध्ये खऱ्या ईमान बाळगणाऱ्यास यशाची खुशखबरी ऐकविली गेली आहे.

आयत क्र. ७३ ते ८७ मध्ये दांभिक लोकांशी सक्तीचे वर्तन अंगिकारण्याचा व जिहाद करण्याचा आदेश दिला गेला आहे त्याचबरोबर त्यांना झिंझोडले गेले आहे की जर त्यांना खरोखर ईश्वर व त्याच्या प्रेषिताशी लगाव आहे तर त्यांनी आपल्या वागणुकीत सुधार करावा अन्यथा त्यांच्या वर्तनाने हे सिद्ध झाले आहे की ते आपल्या ईमान विषयक दाव्यात खोटे आहेत.

आयत क्र. ८८ व ८९ मध्ये पैगंबराच्या सच्चा सहकाऱ्यांच्या बलीदानाची कदर करीत त्यांना यशाचा शुभ समाचार ऐकविला गेला आहे.

आयत क्र.९०मध्ये ग्रामीण अरब वासीयांना दांभिक वर्तन अंगिकारल्याबद्दल सक्त शिक्षेची ताकीद ऐकविली गेली आहे.

आयत क्र. ९१ व ९२ मध्ये खऱ्या सबबीच्या आधारावर जिहादमध्ये सहभागी न होणाऱ्यांना सांत्वना दिली गेली आहे की त्यांची कसलीहि पकड होणार नाही मात्र या अटीवर की त्यांनी अल्लाह व त्याच्या प्रेषिताशी खऱ्या अर्थाने एकनिष्ठ बनून रहावे.

आयत ९३ ते ९६ मध्ये जिहादपासून अंग चोरणाऱ्यांच्या खोट्या सबबींचे पितळ उघडकीस आणले गेले आहे.

आयत ९७ ते १०१ मध्ये हे दाखविले गेले आहे की ग्रामीण अरबवासीयांमध्ये दांभिक वृत्तीचे लोक देखील आहेत, व खरेखुरे ईमान बाळगणारेहि आहेत. दांभिक वृत्ती अंगिकारणाऱ्यांना त्यांच्या वाईट परिणितीची खबर दिली गेली आहे आणि खऱ्या ईमान बाळगणाऱ्यांना अल्लाहच्या कृपेत दाखल असण्याची शुभवार्ता दिली गेली आहे. मग जेव्हा ईश कृपेचा उल्लेख झाला तेव्हा ज्या लोकांनी इस्लामच्या मार्गात सर्वात प्रथम पुढाकार घेतला होता. त्यांच्या बलीदानांची पूरेपूर कदर करीत व त्यांच्या पदचिन्हांवर चालणाऱ्यांची प्रशंसा करीत त्यांना महान यशाची खुशखबरी ऐकविली गेली आहे.

आयत क्र. १०२ ते १०४ मध्ये अशा लोकांचा उल्लेख आहे जे ईमान बाळगणाऱ्यांपैकी होते परंतु त्यांच्या हातून चूका घडल्या होत्या.

आयत १०७ ते ११० मध्ये दांभिकांच्या एका विशिष्ट कारस्थानाला अनावरित केले गेले आहे जे त्यांनी एक नवी मसजिद उभारण्यामागे केले होते.

आयत १११ व ११२ मध्ये खऱ्या ईमान बाळगणाऱ्यांची गुणवैशिष्ट्ये वर्णिली गेली आहेत व त्यांना यशाची शुभर्वाता दिले गेली आहे.

आयत. क्र.११३ ते ११६ मध्ये अनेकेश्वरवाद्यांकरिता माफीची प्रार्थना मागण्यास मनाई केली गेली आहे व या संदर्भात एका चुकीच्या समजुतीचे निवारण केले गेले आहे.

आयत क्र. ११७ ते ११९ मध्ये अशा लोकांच्या अपराधांना क्षमा व क्षमा-स्वीकृतीचे ऐलान, ज्यांनी कठीण प्रसंगात पैगंबराशी एकनिष्ठ असण्याचे सिद्ध केले आणि ही आज्ञा की त्यांनी सत्यनिष्ठ लोकांची मैत्री पत्करावी.

आयत क्र. १२० ते १२२ मध्ये मदीनावासी व आसपासच्या ग्रमीण अरबवासीयांना पैगंबराशी परिपूर्ण निष्ठा व आत्मसमर्पणाचा मार्ग अंगिकारण्याची तसेच धर्माचे ज्ञान प्राप्त करण्याची आज्ञा दिली गेली आहे.

आयत क्र.१२३ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांना आपल्या आसपासच्या काफ़िरांशी युद्ध करण्याची ताकीद केली गेली आहे.

आयत क्र. १२४ ते १२७ मध्ये दांभिकांविषयी अंतिम गोष्ट सांगितली गेली आहे.

आयत क्र. १२८ व १२९ संभाषणाचा शेवट आहे ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या ''पाठविण्या'' संबंधाने शेवटची गोष्ट फर्माविली गेली आहे अर्थात हे की पैगंबर तुमचा खरा हितचिंतक आहे त्याची कदर जाणा की यात तुमचे स्वत:चेच कल्याण आहे.

**सूरह चा आरंभ 'बिस्मिल्लाह' शिवाय:** क़ुरआनाच्या प्रत्येक सूरहचा आरंभ ''बिस्मिल्लाहिर्रमा निर्रहीम'' या वचनाने झाला आहे. परंतु या सूरहचे हे वैशिष्ट्य आहे की हिचा आरंभ ''बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम'' ने झाला नाही. याचे कारण असे की या सूरह बरोबर ''बिस्मिल्लाह'' चे अवतरण झाले होते ते त्याच स्थितीत सुरक्षित आहे. पैगंबरांच्या आणि हा या गोष्टीचा उघड पुरावा होय की क़ुरआन ज्या प्रकारे अवतरित झाले होते त्याच स्थितीत सुरक्षित आहे. पैगंबराच्या अनुयायींना याच्या लेखनात अत्याधिक सावधगिरी बाळगली आहे.आणि ते वंशानुवंश जसेच्या तसे स्थानांतरित होत राहीले.

राहीली याची हिकमत तर ज्या प्रकारे प्रत्येक सूरह आपल्या वैशिष्ट्यांबाबत अद्वितीय आहे तद्वतच या सूरहचे खास वैशिष्ट्य हे आहे की ती एक म्यानविरहित तलवार आहे, जी अशा लोकांवर पडू इच्छिते ज्यांनी क़ुरआनाचे सर्व विषय ऐकून घेतल्यानंतर त्याचा कसलाही प्रभाव आत्मसात केला नाही, किंबहुना त्याच्या विरोधास सज्ज झाले व क़ुरआन धारकांच्या विरुद्ध त्यांनी युद्ध छेडले.

स्पष्ट असावे की सूरह तौबा अवतरणाच्या दृष्टीने सूरह नस्रच्या व्यतिरिक्त क़ुरआनाची शेवटची सूरह होय.

**सूरह 'बराअत' व क़ुरआनाची मांडणी:** येथे ही गोष्ट देखील समजून घेतली पाहिजे की क़ुरआनात सूरतींचा क्रम तोच

आहे जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी ईश संदेशाद्वारे निर्धारीत केला होता आणि मांडणीचे हे कार्य अगदी ह्या ईश- आदेशानुसार झाले ज्यात फर्माविले गेले आहे:

اِنَّ عَلَيْنَا جَمْعَهٗ وَ قُرْاٰنَهٗ (سورۃ القیامۃ)

''याला एकत्रित करणे व वाचन करविणे आमच्या जबाबदारीवर आहे'' (अल् क़ियामह आयत -१७)

यास्तव ज्या कथनांमध्ये असे येते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हे सांगितले नव्हते की सूरह 'बराअत' ची मांडणी कोणत्या ठिकाणी करावयाची आहे आणि हजरत उस्मान यांनी सूरह अनफालशी याचे साम्य पाहून अनफाल नंतर या सूरहची मांडणी केली. तर हे कथन मान्य करण्याजोगे नाही. कारण अशाने काही अन्य प्रश्नहि उद्‌भवतात. इमाम राजी यांनी उपरोक्त कथनाचे खंडन करतांना लिहिले आहे:

''खरी गोष्ट अशी आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी ईश- आदेशाद्वारे हा आदेश दिला होता की या सूरहला सूरह अनफालच्या नंतर ठेवले जावे व पैगंबरानी ईश-आदेशाच्याच आधारावर या सूरहच्या सुरवातीस ''बिस्मिल्ला हिर्रहमानिर्रहीम'' चा उल्लेख केला नव्हता.

(अत-तफसीरुल कबीर भा. १५ पृष्ठ.२१६)

मग जेव्हा सूरतींचा आजचा क्रम तोच आहे जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी क़ायम केला होता तेव्हा यात परिवर्तन करण्याचा आम्हाला कसलाहि अधिकार नाही आजच्या काळातील काही लोक, क़ुरआनासंबंधी अंतर्दृष्टि नसल्यामुळे क़ुरआनच्या विद्यमान क्रमाविषयी संतुष्ट नाहीत ते अवतरण-क्रमानुसार त्याची मांडणी करु इच्छितात. परंतु त्यांचा हा विचार एका नवीन अपकाराला आमंत्रण देण्याहून अधिक कसलीहि सत्यता राखीत नाही.

## मदीनेपासून तबूक

अंतर सुमारे ७०० किलोमिटर



# ९. सूरह अत-तौबा

سُورَةُ التَّوْبَةِ

आयती : १२९

### अनुवाद

१. जबाबदारीतून मुक्त होण्याची घोषणा आहे अल्लाह आणि त्यांच्या पैगंबरा तर्फे त्या अनेकेश्वरवाद्यांबाबत, ज्यांच्याशी तुम्ही करार केले होते.[१]

بَرَآءَةٌ مِّنَ اللّٰهِ وَرَسُوْلِهٖٓ اِلَى الَّذِيْنَ عٰهَدْتُّمْ مِّنَ الْمُشْرِكِيْنَ ۝١

२. आता तुम्ही जमीनीवर चार महीने हिंडा-फिरा [२] आणि जाणून असा की तुम्ही अल्लाहला पराभूत करू शकत नाही आणि अल्लाह काफ़िरांना अपमानित करणार आहे.[३]

فَسِيْحُوْا فِى الْاَرْضِ اَرْبَعَةَ اَشْهُرٍ وَّاعْلَمُوْٓا اَنَّكُمْ غَيْرُ مُعْجِزِى اللّٰهِ
وَاَنَّ اللّٰهَ مُخْزِى الْكٰفِرِيْنَ ۝٢

३. आणि अल्लाह व त्याच्या पैगंबरातर्फे मोठ्या हज्जच्या दिवशी[४] सर्व लोकांकरिता घोषणा आहे की अल्लाह अनेकेश्वर-वाद्यांच्या जबाबदारीतून मुक्त आहे व त्याचा पैगंबरहि.[५] जर आता देखील तुम्ही तौबा कराल तर हे तुमच्या हक्कात अधिक चांगले आहे आणि जर मानत नसाल तर जाणून असा तुम्ही अल्लाहच्या काबूतून बाहेर जाऊ शकत नाही. आणि (हे पैगंबर) काफिरांना दु:खदायक शिक्षेची खुशखबरी ऐकवा.

وَاَذَانٌ مِّنَ اللّٰهِ وَرَسُوْلِهٖٓ اِلَى النَّاسِ يَوْمَ الْحَجِّ الْاَكْبَرِ اَنَّ
اللّٰهَ بَرِيْۤءٌ مِّنَ الْمُشْرِكِيْنَ ۙ وَرَسُوْلُهٗ ۗ فَاِنْ تُبْتُمْ فَهُوَ خَيْرٌ
لَّكُمْ ۚ وَاِنْ تَوَلَّيْتُمْ فَاعْلَمُوْٓا اَنَّكُمْ غَيْرُ مُعْجِزِى اللّٰهِ ۗ وَبَشِّرِ
الَّذِيْنَ كَفَرُوْا بِعَذَابٍ اَلِيْمٍ ۝٣

४. तथापि ते अनेकेश्वरवादी यास अपवाद होत, ज्यांच्याशी तुम्ही करार करून ठेवला आहे व त्यानंतर त्याचे पालन करण्यात त्यांनी कसलीहि कसर ठेवली नाही व ना तुमच्या विरूद्ध एखाद्याची मदत केली. अशा लोकांच्या करारांना-त्यांची मुदत पूर्ण होईपर्यंत पूर्ण करा [६] की अल्लाह ईश-भय बाळगणाऱ्यांना पसंत करतो.[७]

اِلَّا الَّذِيْنَ عٰهَدْتُّمْ مِّنَ الْمُشْرِكِيْنَ
ثُمَّ لَمْ يَنْقُصُوْكُمْ شَيْـًٔا وَّلَمْ يُظَاهِرُوْا عَلَيْكُمْ اَحَدًا فَاَتِمُّوْٓا اِلَيْهِمْ
عَهْدَهُمْ اِلٰى مُدَّتِهِمْ ۗ اِنَّ اللّٰهَ يُحِبُّ الْمُتَّقِيْنَ ۝٤

१. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अनेक कबिल्यांशी तह-करार केले होते परंतु त्यांच्यातील बहुतेक कबीले कराराचा भंग करीत होते म्हणून असे समस्त करार संपुष्टात आल्याची घोषणा केली गेली.

२. त्यांना चार महीन्यांची सवड दिली गेली अशासाठी की या अवधित त्यांनी आपल्याबाबत एखादा अंतिम निर्णय घ्यावा. अर्थात एकतर शिर्क व मूर्तिपूजेचा त्याग करावा अन्यथा युद्धासाठी तयार व्हावे.

३. म्हणजे अल्लाहने अनेकेश्वरवाद्यांना अपमानित करण्याचा निर्णय घेतला आहे यास्तव जे लोक शेवटपर्यंत शिर्क वर क़ायम राहतील. अल्लाहचा हा निर्णय त्यांना निश्चितपणे लागू पडेल. कितीही सामर्थ्य पणाला लावले तरी ते ईश-निर्णयास आपल्या वर लागू होण्यापासून रोखू शकत नाही. आणि इतिहास साक्षी आहे की अल्लाहचा हा निर्णय अरबच्या अनेकेश्वरवाद्यांना लागू पडलाच.

४. मूळ ग्रंथातील शब्द ''अकबर'' हज्जचे विशेषण होय, जे उमराहून, ज्याला 'हज्जे असगर' म्हटले असे श्रेष्ठतम करते. तसेच हे विशेषण हज्जच्या महान सम्मेलनाकडे संकेत करते.

हे सम्मेलन ''अरफ़ात'' मध्येहि होते व ''मीना'' येथेहि होते. परंतु येथे मोठ्या हज्जच्या दिवसाचा अर्थ जिलहिज्जा महिन्याची १० तारीख होय. या दिवशी मीना येथे हज्जचे संमेलन होते. आणि ज्याअर्थी कुरेश अरफ़ात जात नव्हते म्हणून या घोषणेकरिता जी हज्ज प्रसंगी करावयाची होती ''मीना'' चा च दिवस योग्य होऊ शकत होता ज्यात प्रत्येक प्रकारचे अनेकेश्वरवादी सहभागी होत.

अलीकडे मुसलमान, अरफातचा दिवस जर जुमा (शुक्रवार) च्या दिवशी येतो तर त्याला मोठ्या हज्जच्या अर्थाने घेतात. वस्तुत: या आयतीच्या अनुषंगाने प्रत्येक हज्ज हे मोठे हज्ज आहे. कारण हे हज्जचे कायमचे वैशिष्ट्य आहे.

५. जबाबदारीतून मुक्त होण्याची ही घोषणा त्या अनेकेश्वर वाद्यांबाबत होय ज्यांच्याशी मुसलमानांचा कसलाहि करार झाला नव्हता. आणि अल्लाह व त्याच्या प्रेषिताचे जबाबदारीतून मुक्त होणे म्हणजे आता त्यांच्याकरिता ना अल्लाहच्या विधी नियमात कसले संरक्षण आहे व ना त्याच्या प्रेषितातर्फे त्यांच्या प्राणांची काही शाश्वती. तह आणि कराराचा काळ संपला आता एकतर त्याना आपल्या अनेकेश्वरवादीय वर्तनापासून परावृत्त व्हावे लागेल अन्यथा त्यांच्याविरूद्ध सामर्थ्याचा प्रयोग केला जाईल.

ही घोषणा हिजरी सन ९ मध्ये हज्ज प्रसंगी म्हणजे १० जिलहिज्जाला मिना येथे केली गेली. त्यावेळी अनेकेश्वरवाद्यांनी आपल्या पद्धतिने हज्जचे विधि पार पाडले होते व मुसलमानांनी आपल्या पद्धतिने पार पाडले होते हे हज्ज हजरत अबु बक्र यांच्या नेतृत्वात पार पडले होते; वा हजरत अली यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या तर्फे चार गोष्टींची घोषणा केली होती.

१) जन्नत मध्ये असा कोणताहि मनुष्य दाखल होणार नाही ज्याने ईमान बाळगले नसावे.

२) या वर्षानंतर कोणताही अनेकेश्वरवादी हज्ज करू शकणार नाही.

३) व ना कोणी नग्नावस्थेत काबागृहाची प्रदक्षिणा करू शकेल.

४) ज्या लोकांशी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा करार झाला आहे त्यांचा करार निर्धारित मुदती पर्यंत पूर्ण केला जाईल.

हजरत अबु हुरैरा निवेदन करतात की जेव्हा हजरत अली यांचा आवाज घोषणा करीत असतांना बसला तेव्हा मी घोषणा करू लागलो. (तफसीर तबरी खंड-१० पृष्ठ-४५)

६. ज्या अनेकेश्वर वाद्यांशी मुसलमानांचे तह-करार, एका ठराविक मुदतीकरीता झाले होते व त्यांनी त्या कराराचा भंग केला नव्हता, त्यांच्याशी तह-मुदत संपेपर्यंत निष्ठा राखण्याचा आदेश या आयतीत दिला गेला आहे. हे कबिले अर्थात ''खुजाआ, बनू जमरा व बनू किनाना'' हे होत.

७. क़ुरआन आपल्या अनुयायींना प्रत्येक स्थितीत ईश-भयाचे वर्तन अंगिकारण्याची ताकीद करतो, मग मामला-कराराच्या पालननाचा असो किंवा तह व युद्धाचा किंवा राजकारण व सामूहिक जीवनाचा असो, अगदी अशा रीतीने ज्या रीतीने व्यक्तिगत मामल्यांमध्ये ईशभय आचरणात आणणे अगत्याचे आहे.

# अरब
## कोणता कबीला कोठे वसत होता ?



**मग जेव्हा प्रतिष्ठित महीने निघून जातील तर या अनेकेश्वर वाद्यांना सापडतील तेथे ठार करा व त्यांना पकडा व घेरा आणि प्रत्येक पाळतीच्या जागी त्यांच्यावर टपून बसा मग जर ते तौबा करतील व नमाज़ क़ायम करतील आणि ज़कात देतील तर त्यांना सोडून द्या निःसंशय अल्लाह माफ करणारा, कृपा करणारा आहे. (अल-क़ुरआन)**

५. मग जेव्हा प्रतिष्ठित महीने निघून जातील [८] तर या अनेकेश्वर वाद्यांना सापडतील तेथे ठार करा [९] व त्यांना पकडा व घेरा आणि प्रत्येक पाळतीच्या जागी त्यांच्यावर टपून बसा [१०] मग जर ते तौबा करतील व नमाज़ क़ायम करतील आणि ज़कात देतील तर त्यांना सोडून द्या [११] नि:संशय अल्लाह माफ करणारा, कृपा करणारा आहे.

فَإِذَا انْسَلَخَ الْأَشْهُرُ الْحُرُمُ فَاقْتُلُوا الْمُشْرِكِينَ حَيْثُ
وَجَدْتُمُوهُمْ وَخُذُوهُمْ وَاحْصُرُوهُمْ وَاقْعُدُوا
لَهُمْ كُلَّ مَرْصَدٍ ۚ فَإِنْ تَابُوا وَأَقَامُوا الصَّلَاةَ وَ
آتَوُا الزَّكَاةَ فَخَلُّوا سَبِيلَهُمْ ۚ إِنَّ اللَّهَ غَفُورٌ رَحِيمٌ ﴿٥﴾

६. आणि जर अनेकेश्वर वाद्यांपैकी एखादा मनुष्य तुमच्या कडून संरक्षण मागेल तर त्याला संरक्षण द्या. येथ पावेतो की त्यांनी अल्लाहची वाणी ऐकावी [१२] मग त्याला त्याच्या शांतीस्थळावर पोहचवा. हे अशासाठी की हे लोक जाणत नाहीत.

وَإِنْ أَحَدٌ مِنَ الْمُشْرِكِينَ اسْتَجَارَكَ فَأَجِرْهُ حَتَّىٰ يَسْمَعَ
كَلَامَ اللَّهِ ثُمَّ أَبْلِغْهُ مَأْمَنَهُ ۚ ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ قَوْمٌ
لَا يَعْلَمُونَ ﴿٦﴾

७. या अनेकेश्वर वाद्यांची एखादी प्रतिज्ञा अल्लाह व त्याच्या प्रेषिताजवळ कशा रीतीने बाकी राहू शकते, मात्र त्या लोकांशिवाय [१३] ज्यांच्याशी तुम्ही मसजिदे हरामजवळ करार केला होता [१४] तेव्हा जोपर्यंत ते तुमच्याशी सरळ राहतील तुम्हीहि त्यांच्याशी सरळ रहा. कारण अल्लाह ईश-भय अंगिकारणाऱ्यांना पसंत करतो.

كَيْفَ يَكُونُ لِلْمُشْرِكِينَ عَهْدٌ عِنْدَ اللَّهِ وَعِنْدَ رَسُولِهِ
إِلَّا الَّذِينَ عَاهَدْتُمْ عِنْدَ الْمَسْجِدِ الْحَرَامِ ۖ فَمَا اسْتَقَامُوا
لَكُمْ فَاسْتَقِيمُوا لَهُمْ ۚ إِنَّ اللَّهَ يُحِبُّ الْمُتَّقِينَ ﴿٧﴾

८. (त्यांच्या खेरीज अन्य अनेकेश्वर वाद्यांची प्रतिज्ञा) कशा प्रकारे बाकी राहू शकते जेव्हा त्यांची ही दशा आहे की जर ते तुमच्यावर काबू पावतील तर तुमच्या बाबतीत ना नाते संबंधाची भिड बाळगतील व ना कराराची [१५] ते आपल्या जीभेने तुम्हाला आनंदीत करण्याच्या गोष्टी करतात. परंतु त्यांची मने यापासून इन्कारच करतात. आणि यांच्यात अधिकांश लोक दुराचारी आहेत. [१६]

كَيْفَ وَإِنْ يَظْهَرُوا عَلَيْكُمْ لَا يَرْقُبُوا فِيكُمْ إِلًّا وَلَا ذِمَّةً ۚ
يُرْضُونَكُمْ بِأَفْوَاهِهِمْ وَتَأْبَىٰ قُلُوبُهُمْ وَأَكْثَرُهُمْ
فَاسِقُونَ ﴿٨﴾

९. त्यांनी अल्लाहच्या आयतींच्या मोबदल्यात तुच्छ किंमत स्वीकारली [१७] आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखू लागले. [१८] मोठे वाईट कृत्य आहे जे हे करीत राहिलेत.

اشْتَرَوْا بِآيَاتِ اللَّهِ ثَمَنًا قَلِيلًا فَصَدُّوا عَنْ سَبِيلِهِ ۚ
إِنَّهُمْ سَاءَ مَا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿٩﴾

८. प्रतिष्ठित महीन्यांचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. २६९ मध्ये आले आहे. येथे प्रतिष्ठित महीन्यांच्या निघून जाण्याचा अर्थ असा की जेव्हा या संदर्भातील शेवटचा महीना म्हणजे मुहर्रम निघून जाईल तेव्हा त्या अनेकेश्‍वरवाद्यांचा ज्यांच्याशी तुमचा कोणताही करार झाला नव्हता, तलवारीने समाचार घ्या.

स्पष्ट असावे की आयत क्र.२ मध्ये चार महिन्यांची जी सवड दिली गेली होती ती अनेकेश्‍वरवाद्यांकरिता होती ज्यांच्याशी मुसलमानांचे करार झाले होते व ते कराराचा भंग करीत होते.

९. हे आव्हान प्रामुख्याने अरबच्या अनेकेश्वरवाद्यांना दिले गेले होते कारण त्यांचा मामला दुसऱ्या जनसमूहांहून भिन्न होता. सर्वश्रेष्ठ अल्लाहने अरबवासीयांमधूनच हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पैगंबर बनविले होते व त्यांची मातृभाषा असलेल्या 'अरबी'त ग्रंथ अवतरीत केला होता. यास्तव त्यांना सत्याचे अत्याधिक आकलन झाले होते. अल्लाहचा हा नियम आहे की जेव्हा त्यांच्या प्रेषिताद्वारे एखाद्या जन समूहावर प्रमाण पूर्णत: प्रस्थापित होते व त्यानंतर देखील तो जनसमूह ईमान बाळगत नाही तर अल्लाह त्यास नष्ट करतो कारण अल्लाहशी बंड करण्यात त्यांचा हा आग्रह त्यांना अल्लाहच्या जामिनीवर जगण्याच्या हक्कापासून वंचित करतो. असे लोक मृत होत व मेलेल्यांकरिता जागा जमीनीवर नव्हे किंबहुना जमीनीच्या खाली असते. यास्तव दोन स्थितींपैकी एका स्थितीला निश्‍चितपणे त्यांना तोंड द्यावे लागते. एकतर त्यांच्यावर ईश-प्रकोप कोसळतो जो त्यांचा समूळ नाश करतो ज्याप्रकारे आद व समूद या जनसमूहांवर कोसळला होता. अथवा प्रेषिताच्या सहकाऱ्यांच्या हातून त्यांचा सफाया केला जातो. अरबच्या अनेकेश्वरवाद्यांबाबत अल्लाहचा असा निर्णय झाला की त्यांच्यातल्या बहुतेकांना ईमान बाळगण्याची सुबुद्धि लाभेल व जे थोडेसे शिर्क वर क़ायम राहतील त्याचा नायनाट प्रेषिताच्या सहकाऱ्यांच्या तलवारीद्वारे होईल.

जे लोक या आयतींची पार्श्‍वभूमी व स्थळ वेळ समोर ठेवत नाही ते या आदेशास पाहून की अनेकेश्वरवाद्यांना सापडतील तेथे ठार करा निष्कर्ष काढतात की क़ुरआन मुसलमानांना हा आदेश देतो की जगाच्या कोणत्याहि देशात रहात असाल, तेथील अनेकेश्वरवाद्यांना ते सापडतील. तेथे ठार करावे मग त्यांच्यावर अल्लाहचे प्रमाण प्रस्थापित झालेले असो वा नसो, व स्थिती शांतीची असो वा युद्धाची, हा फार मोठा गैरसमज आहे जो प्रामुख्याने भारतामधील अनेकेश्वरवाद्यां मध्ये आढळून येतो. याचे निराकरण याच स्थितीत होऊ शकते की जेव्हा आयतीची पार्श्‍वभूमी डोळ्यासमोर ठेवून तिच्या उद्देश्यास समजून घेण्याचा प्रयत्न केला जावा.

१०. म्हणजे त्यांच्याविरुद्ध पाऊल उचला व युद्धविषयक कारवायी करण्यात कसलीहि कसर बाकी ठेवू नका.

११. म्हणजे हे अनेकेश्वरवादी जर शिर्क व मूर्तिपूजेपासून तौबा करून इस्लाम कबूल करतील व आपण मुसलमान आहोत हे सिद्ध करण्यासाठी नमाज़ क़ायम करतील व ज़कात अदा करू लागतील तर मग त्यांना हानी पोहचविण्याचे काहीच कारण नाही. ना तर मागील गोष्टींबाबत त्यांची पकड केली जावी व ना त्यांना काही त्रास दिला जावा.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या निधनानंतर जेव्हा अरबच्या काही कबिल्यांनी जे मुसलमान झाले होते, ज़कात देण्यास इन्कार केला तेव्हा प्रथम खलीफा हज़रत अबु बकर सिद्दीक यांनी या आयतीचा विचार करता त्यांच्याविरुद्ध तलवार उचलली होती व फर्माविले होते की जे नमाज़ व ज़कात यांच्या दरम्यान फरक करतील मी स्वत: त्यांच्याशी लढेन. (मिश्कात-किताबुज ज़कात)

यावरून नमाज़ व ज़कातचा आणखी एक महत्वपूर्ण पैलू स्पष्ट होतो व तो असा की इस्लाम मध्ये या दोन उपासना पद्धतिंना विधिवत दर्जाहि प्राप्त आहे, आणि इस्लामी शासनाच्या कर्तव्यामध्ये या गोष्टीचाहि समावेश आहे की शासनाचे या कायद्याची बलपूर्वक अंमलबजावणी करावी.

आज मुसलमानांमध्ये नमाज़ व ज़कातच्या बाबतीत जी सार्वत्रिक गफलत आढळून येते तिचे एक कारण असेहि आहे की त्यांना गफलतीतून सावध करण्याकरिता कोणताहि आसूड नाही.

१२. जर एखादा अनेकेश्वरवादी युद्ध-काळातहि क़ुरआन ऐकण्याच्या व समजण्याच्या हेतुने संरक्षण मागेल तर त्याला संरक्षण देणे व नंतर त्याला सुरक्षितपणे त्याच्या शांती-स्थळापर्यंत पोहचविणे मुसलमानांचे कर्तव्य होय, आणि हा या गोष्टीचा पुरावा आहे की अनेकेश्वरवाद्यांशी इस्लामचे युद्ध एक अत्यंत स्वच्छ शुद्ध उद्दिष्टाकरिता आहे. जमात वैर व मुलूखगिरी करण्यासाठी नव्हे.

या आयतीच्या अनुषंगाने एक गोष्ट ही देखील स्पष्ट होते की आवाहन व प्रचाराच्या हेतुने मुस्लिमेतरांना क़ुरआनाचा परिचय करून देणे, त्याला समजून घेण्यासाठी प्रोत्साहित करणे व त्यातील आयतींचा अर्थ त्यांच्या भाषेत सादर करणे अत्यंत महत्वाचे व आवश्यक आहे, अशासाठी की त्यांनी आपल्या पालनकर्त्याच्या वाणीस समजून घ्यावे.

१३. हे कंसातील वाक्य होय. वर्णन क्रमाच्या दृष्टीने आदेश त्या अनेकेश्वर वाद्यांविषयी वर्णिला जात होता ज्यांच्याशी करार क़ायम राहिला नव्हता परंतु कंसातील वाक्याद्वारे या आदेशापासून त्या लोकांना अपवाद ठरवले गेले आहे ज्यांनी

करारभंग केला नव्हता.

१४. मसजिदे हरामच्या जवळ म्हणजे हुदैबिया होय जे हरमच्या हद्दीत आहे. माहे ज़ीकअदा हिजरी सन ६ मध्ये मदीनेचे मुसलमान व मक्केचे कुरेश लोक यांच्या दरम्यान हुदैबिया येथे तह करार झाला होता. या कराराचे एक कलम हे होते की अरब कबिल्यांपैकी जो कबीला ज्या पक्षाचा मित्र बनू इच्छिल, तो त्याचा मित्र बनू शकतो.या प्रसंगी खुजाआ कबिला पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा मित्र बनला. हिजरी सन ८ च्या आरंभ कुरैशने हुदैबिया कराराचा भंग केला होता व त्यानंतर रमजान हिजरी सन ८ मध्ये मक्का-विजयाची घटना घडली, असे असले तरी खुजाआशी जो करार केला गेला होता तो क़ायम होता व त्यांनी ज्याअर्थी करारभंग केला नव्हता म्हणून येथे ताकीद केली गेली की जोपावेतो ते करारनिष्ठ राहतील तौपर्यंत तुम्हीहि रहा.

१५.अरबदेशात त्या काळी कबिला पद्धत प्रचलित होती. म्हणून सामूहीक व्यवहारात नाते- संबंधांना मोठे महत्व होते आणि दुसरी गोष्ट जी आंतर्रराष्ट्रीय संबंधांना दुरुस्त राखण्यात सहाय्यक ठरत होती ती म्हणजे परस्पर शांती व तहाचे करार होते. परंतु अनेकेश्वरवाद्यांनी इस्लामाशी वैर बाळगण्यात असे वर्तन अंगिकारले होते की ना सामाजिक संबंधांना खात्रीत आणीत व ना कराराच्या जबाबदाऱ्यांची जाणीव बाळगत किंबहुना जेव्हा जेव्हा संधी लाभे मुसलमानांविरूद्ध कोणती ना कोणती हरकत करीत. अशा स्थितीत मुसलमानांना त्यांच्याशी केलेल्या कराराला कायम राखणे कठीण होते कारण कोणताहि करारा क़ायम राहू शकत नाही जोपर्यंत दोन्ही पक्ष करार निभाविण्याचा प्रयत्न करीत नाही.

१६. येथे दुराचारीशी अभिप्रेत वचनभंग करणारे लोक होत.

१७. म्हणजे अल्लाहच्या आयतींमध्ये ईहलोक व परलोकाची सम्पत्ति लपलेली होती परंतु या कदर न जाणणाऱ्यांनी जगाच्या तुच्छ लाभांना प्राधान्य दिले व स्वत: ला फार मोठ्या मांगल्यापासून वंचित राखले.

१८. आणि जेव्हा जगाचा लाभ हेच खरे ध्येय ठरले तर धर्माच्या आवाहनास ते कसे बरे सहन करू शकले असते जे आखिरतला ध्येय बनविण्याकरिता दिले जात होते. यास्तव ते या मार्गात अडसर बनून उभे राहिले.

**आणि जर हे करार केल्यानंतर आपल्या आणाभाका तोडतील व तुमच्या धर्मावर टोमणे मारू लागतील. तर कुफ्रच्या नेत्यांशी लढा कारण यांच्या आणाभाकांचा काहीहि भरवसा नाही (त्यांच्याशी लढा) अशासाठी की त्यांनी परावृत्त व्हावे. (अल-क़ुरआन)**

१०. कोणत्याहि ईमान बाळगणाऱ्या संबंधी ना नाते. संबंधाची भिड बाळगतात व ना कराररमदाराची. हेच लोक होत जे अतिरेक करणारे आहेत.[१९]

لَا يَرْقُبُونَ فِي مُؤْمِنٍ إِلًّا وَّلَا ذِمَّةً ۚ وَأُولَٰٓئِكَ
هُمُ الْمُعْتَدُونَ ﴿١٠﴾

११. परंतु जर हे तौबा करतील व नमाज़ क़ायम करतील व ज़कात देतील तर तुमचे धर्म-बांधव होत [२०] आणि आम्ही आपल्या आयतींचे उघडरित्या वर्णन करतो त्या लोकांकरिता जे जाणणारे आहेत.[२१]

فَإِنْ تَابُوا وَأَقَامُوا الصَّلٰوةَ وَاٰتَوُا الزَّكٰوةَ فَإِخْوَانُكُمْ فِي
الدِّينِ ۗ وَنُفَصِّلُ الْاٰيٰتِ لِقَوْمٍ يَّعْلَمُونَ ﴿١١﴾

१२. आणि जर हे करार केल्यानंतर आपल्या आणाभाका तोडतील [२२] व तुमच्या धर्मावर टोमणे मारू लागतील.[२३] तर कुफ्रच्या नेत्यांशी लढा [२४] कारण यांच्या आणाभाकांचा काहीहि भरवसा नाही (त्यांच्याशी लढा) अशासाठी की त्यांनी परावृत्त व्हावे.

وَإِنْ نَّكَثُوٓا أَيْمَانَهُمْ مِّنْ بَعْدِ عَهْدِهِمْ
وَطَعَنُوا فِي دِينِكُمْ فَقَاتِلُوٓا أَئِمَّةَ الْكُفْرِ ۙ
إِنَّهُمْ لَآ أَيْمَانَ لَهُمْ لَعَلَّهُمْ يَنْتَهُونَ ﴿١٢﴾

१३. काय तुम्ही अशा लोकांशी न लढाल ज्यांनी आपल्या शपथांना तोडून टाकले [२५] व प्रेषिताला (त्याच्या मायभूमीतून) बाहेर घालविण्याचा संकल्प केला [२६] व तुमच्याविरुद्ध युद्ध करण्यास स्वत: आरंभ केला.[२७] काय तुम्ही यांचे भय बाळगता? जर तुम्ही ईमान बाळगणारे असाल तर तुम्ही हे समजून घेतले पाहिजे की अल्लाह या गोष्टीस अधिक पात्र आहे की तुम्ही त्याचे भय बाळगावे.

أَلَا تُقَاتِلُونَ قَوْمًا نَّكَثُوٓا أَيْمَانَهُمْ وَهَمُّوا
بِإِخْرَاجِ الرَّسُولِ وَهُمْ بَدَءُوكُمْ أَوَّلَ مَرَّةٍ ۚ
أَتَخْشَوْنَهُمْ ۚ فَاللّٰهُ أَحَقُّ أَنْ تَخْشَوْهُ إِنْ كُنْتُمْ مُّؤْمِنِينَ ﴿١٣﴾

१४. त्यांच्याशी युद्ध करा. अल्लाह तुमच्या हातून त्यांना शिक्षा यातना देईल [२८] व त्यांना अपमानित करील आणि त्यांच्या वर तुम्हाला प्रभावशाली करील [२९] व ईमान बाळगणाऱ्या लोकांची [२२] हृदये शांत करील. [३०]

قَاتِلُوهُمْ يُعَذِّبْهُمُ اللّٰهُ بِأَيْدِيكُمْ وَيُخْزِهِمْ وَيَنْصُرْكُمْ عَلَيْهِمْ
وَيَشْفِ صُدُورَ قَوْمٍ مُّؤْمِنِينَ ﴿١٤﴾

१५. आणि त्यांच्या हृदयाची जळजळ दूर करील व अल्लाह ज्याला इच्छिल ''तौबा'' ची सुबुद्धि प्रदान करील [३१] अल्लाह ज्ञानी व हिकमत बाळगणारा आहे.

وَيُذْهِبْ غَيْظَ قُلُوبِهِمْ ۗ وَيَتُوبُ اللّٰهُ عَلٰى مَنْ يَّشَآءُ ۗ وَاللّٰهُ
عَلِيمٌ حَكِيمٌ ﴿١٥﴾

१९. आयत क्र. ८ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांच्या समूहाशी अनेकेश्वरवाद्यांच्या वर्तनाचा उल्लेख झाला होता. या आयतीत फर्माविले गेले की कोणत्याहि ईमान बाळगणाऱ्याच्या संबंधी त्यांना ना नाते- संबंधाची चाड आहे, ना कराराची भिड, किंबहुना त्यांनी स्पष्ट हिंसक वर्तन अंगिकारले आहे.

२०. म्हणजे या समस्त शत्रूत्वाच्या हरकती नंतरहि जर ते तौबा करून इस्लाम कबूल करतात व नमाज़ क़ायम करून व ज़कात अदा करू लागतात तर हा या गोष्टीचा पुरावा ठरेल की त्यांनी अनेकेश्वरवादी धर्माचा त्याग करून एकेश्वरवादी धर्माचा स्वीकार केला आहे. म्हणून आता तुमच्याशी यांचे नाते धर्म-बांधवाचे राहील.

स्पष्ट झाले की इस्लामी समाजात मुस्लिम व नवमुस्लिम यांच्या दरम्यान कोणताही भेद नाही. सर्वांचा सामाजिक दर्जा एकच आहे.

२१. म्हणजे अनेकेश्वरवादी बाबत अत्यंत स्पष्टपणे आदेश वर्णिले गेले आहेत परंतु याचा लाभ केवळ तेच लोक घेऊ शकतात जे हे जाणतात की मार्गदर्शनाचा स्त्रोत अल्लाहच्या आयती आहेत, दुसरी एखादी गोष्ट नव्हे. ज्ञान-प्रकाशात चालणारे पावलो पावली अल्लाहच्या-आयतींद्वारे मार्गदर्शन प्राप्त करतात, तथापि अज्ञानाच्या अंध:कारात भटकणारे यापासून वंचित राहतात.

२२. वरून जो वर्णन-क्रम चालत आला आहे त्यात अनेकेश्वरवादींच्या विविध समूहांची स्थिती वर्णिली गेली आहे व त्या अनुषंगाने आदेश दिले गेले आहेत. या आयतीत त्यांच्या एक अशा समूहाची स्थिती वर्णन करून त्यांच्याशी युद्ध करण्यास मुसलमानांना प्रवृत्त केले गेले आहे, ज्याने ना केवळ करार भंग केला होता किंबहुना याहि पुढे जाऊन त्यांने इस्लामची थट्टा उडविण्यास सुरुवात केली होती.

अरब वासीयांमध्ये करार करतांना शपथ ग्रहण करण्याची प्रथा प्रचलित होती अशासाठी की करार पक्का व्हावा. याच संबंधाने येथे शपथ तोडण्याचा उल्लेख आला आहे.

२३. स्पष्ट झाले की इस्लाम धर्मावर टोमणे मारणे, त्याची थट्टा उडविणे आणि अल्लाह व त्याच्या प्रेषिताचा अपमान करणे उघडरित्या कुफ्र व घोर अपराध आहे.

२४. म्हणजे युद्धात काफिरांच्या नेत्यांना व पुढाऱ्यांना नेमावर ठेवा कारण हे सर्वात मोठे उपद्रव कारक आहेत आणि तुमचे काम हे असले पाहिजे की कुफ्रच्या मूळावर कुठारीचा घाव घालावा. अशासाठी की मानवतेला या सर्वांपासून मुक्ति मिळावी.

२५. अभिप्रेत हुदैबिया तहा (हिजरी सन ६,ज़ीकादा) चा करार होय जो कुरैशने तोडला होता. स्थिती अशी झाली की बनू बकरच्या कबिल्याने जो कुरैशचा मित्र होता, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी सख्य असलेल्या खुज़ाआ कबिल्यावर हमला केला. या हल्ल्यात कुरैशने बनू बकरची मदत केली व जेव्हा खुज़ाआच्या लोकांनी हरम मध्ये आश्रय घेतला तेव्हा अगदी हरम मध्ये त्यांना ठार केले. ख़ुज़ाआ ने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याजवळ या बाबत तक्रार केली. कुरैश व बनू बकर यांचे हे कृत्य कराराची उघडरित्या पायमल्ली होती म्हणून हुदैबिया करार भंग पावला. या आयतीत त्यांच्या या वचनभंगाचा उल्लेख आला आहे व मुसलमानांना त्यांच्याशी युद्ध करण्यास प्रवृत्त केले गेले आहे. तेव्हा रमजान हिजरी सन ८ मध्ये मक्का विजयाचे युद्ध घडले.

२६. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे मदीना येथे हिजरत (स्थानंतर) होण्यापूर्वी कुरैश त्यांच्या विरुद्ध वेगवेगळ्या प्रकारचे कट कारस्थान करीत होते ज्यापैकी एक कट हा देखील होता की पैगंबराना देशातून काढले जावे तथापि आपल्या अमंगल हेतुत ते यशस्वी होऊ शकले नाही किंबहुना अल्लाहच्या योजनेनुसार पैगंबरानी मदीना येथे अशा प्रकारे हिजरत केली की ते पैगंबरांच्या केसालाही धक्का लावू शकले नाही. त्यांच्या ह्याच वाईट इराद्यांकडे या आयतीत संकेत केला गेला आहे.

२७. म्हणजे युद्धाकरिता पुढाकार कुरैशने (मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी)च घेतला व तेच हिंस्त्र बनून बद्रच्या मैदानात आले.

२८. मक्का आणि अरबच्या अनेकेश्वरवाद्यांबाबत ही होती सर्वश्रेष्ठ अल्लाहची योजना जिला येथे उघडरित्या वर्णिले गेले आहे. अर्थात त्यांचा नाश ईश प्रकोपाद्वारे नव्हे किंबहुना मुसलमानांच्या तलवारींद्वारे होईल व क़ुरआनाचे हे भाकित शब्द न शब्द खरे ठरले.

२९. या आयतींच्या अवतरणानंतर मक्केवर विजय प्राप्त झाला आणि मग विजयांचा क्रम असा चालला की दोन वर्षाच्या आत संपूर्ण अरब देश मुसलमानांच्या सत्तेखाली आला.

३०. मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांनी मुसलमानांना अत्याचाराचे निशाण बनविले होते व त्यांना असह्य यातना पोहचविल्या होत्या म्हणून त्यांच्या दुष्परिणीतीस पाहून मुसलमानांच्या मनाला शितलता लाभणे एक मानसिक बाब होती.

३१. मुसलमानांच्या मनात अनेकेश्वरवाद्यांविरुद्ध क्रोध त्यांच्या शिर्क व कुफ्र मुळे होता म्हणून त्यांचा शेवट शिर्क व कुफ्रचा शेवट आणि एकेश्वरवादाचा विजय होता आणि ही गोष्ट मुसलमानांच्या क्रोधास शांत करणारी होती.

३२. जेहाद (धर्मयुद्ध)चा हा वास्तविक परिणाम होता जो मोठ्या प्रमाणावर दिसून आला. ज्या लोकांच्या मनावर गफलतीचे दाट पडदे पडले होते व उपदेश त्यांच्यावर परिणामकारक होऊ शकला नव्हता, रणक्षेत्राला तप्त होत असलेले पाहून त्यांचे डोळे उघडले व स्वत:पूर्ण दोषी असण्याची जाणीव त्यांच्या अंगी जागृत होऊ लागली. यास्तव फार मोठ्या संख्येला तौबाची सुबुद्धि लाभली. आणि त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला. अशा प्रकारे त्यांच्या करिता जहन्नमच्या आगीपासून सुरक्षित राहण्याची सामुग्री झाली. याहून मोठे हितचिंतन त्यांच्यासाठी आणखी काय असू शकत होते? ही आयत अवतरल्यानंतर ज्या अनेकेश्वरवाद्यांना तौबाची सुबुद्धि लाभली त्यांच्यात अबु सुफियान सारखे नेते व अकरमा बिन अबु जहल सारख्या व्यक्तित्व सामील होत्या.

**त्यांचा रब्ब (पालनकर्ता) त्यांना खुशखबरी देतो, आपली कृपा व प्रसन्नतेची आणि अशा बागांची जिथे त्यांच्याकरिता सदैव देणगी असेल.(अल-क़ुरआन)**

१६. काय तुम्हा लोकांनी असे समजून ठेवले आहे की तुम्हाला विनायास सोडून दिले जाईल. वस्तुतः अल्लाहने अजून हे सुद्धा पाहिले नाही की तुमच्यापैकी कोणत्या लोकांनी जिहाद केले [३३] आणि अल्लाह व त्याचा प्रेषित व ईमान बाळगणाऱ्यां शिवाय कोणालाहि आपला विश्वस्त बनविले नाही.[३४] तुम्ही जे काही करता त्याबाबत अल्लाह जाणकार आहे.

أَمْ حَسِبْتُمْ أَنْ تُتْرَكُوا وَلَمَّا يَعْلَمِ اللَّهُ الَّذِينَ جَاهَدُوا مِنْكُمْ
وَلَمْ يَتَّخِذُوا مِنْ دُونِ اللَّهِ وَلَا رَسُولِهِ وَلَا الْمُؤْمِنِينَ وَلِيجَةً ۚ
وَاللَّهُ خَبِيرٌ بِمَا تَعْمَلُونَ ﴿١٦﴾

१७. अनेकेश्वरवादी याला पात्र नाहीत की त्यांनी अल्लाहच्या मसजिदींना आबाद करावे जेव्हा ते स्वतः आपल्या विरुद्ध कुफ्रची साक्ष देत आहेत. [३५] त्यांची समस्त कर्मे वाया गेलीत [३६] आणि दोज़ख़ (जहन्नम) मध्ये ते सदैव राहतील.

مَا كَانَ لِلْمُشْرِكِينَ أَنْ يَعْمُرُوا مَسَاجِدَ اللَّهِ شَاهِدِينَ عَلَىٰ
أَنْفُسِهِمْ بِالْكُفْرِ ۚ أُولَٰئِكَ حَبِطَتْ أَعْمَالُهُمْ وَفِي النَّارِ هُمْ
خَالِدُونَ ﴿١٧﴾

१८. अल्लाहच्या मसजिदींना आबाद केवळ तेच लोक करू शकतात जे अल्लाह व अंतिम दिनावर ईमान राखतात, नमाज़ क़ायम करतात, ज़कात देतात आणि अल्लाह शिवाय कोणाचेहि भय बाळगत नाही [३७] अशा लोकांबाबत ही अपेक्षा उचित आहे की ते मार्ग पावतील.

إِنَّمَا يَعْمُرُ مَسَاجِدَ اللَّهِ مَنْ آمَنَ بِاللَّهِ وَالْيَوْمِ الْآخِرِ وَأَقَامَ
الصَّلَاةَ وَآتَى الزَّكَاةَ وَلَمْ يَخْشَ إِلَّا اللَّهَ ۖ فَعَسَىٰ أُولَٰئِكَ أَنْ
يَكُونُوا مِنَ الْمُهْتَدِينَ ﴿١٨﴾

१९. काय तुम्ही हाजी लोकांना पाणी पाजण्याचा कामास व मसजिदे हरामच्या सेवेस त्या लोकांच्या आचरणाचा दर्जा देऊन ठेवला आहे, ज्यांनी अल्लाहच्या मार्गात जिहाद केले. अल्लाहच्या दृष्टीने दोन्ही समान नाहीत [३८] आणि अल्लाह अत्याचारींना मार्ग दाखवित नाही.[३९]

أَجَعَلْتُمْ سِقَايَةَ الْحَاجِّ وَعِمَارَةَ الْمَسْجِدِ الْحَرَامِ كَمَنْ
آمَنَ بِاللَّهِ وَالْيَوْمِ الْآخِرِ وَجَاهَدَ فِي سَبِيلِ اللَّهِ ۚ
لَا يَسْتَوُونَ عِنْدَ اللَّهِ ۗ وَاللَّهُ لَا يَهْدِي الْقَوْمَ
الظَّالِمِينَ ﴿١٩﴾

२०. ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी हिजरत केली आणि अल्लाहच्या मार्गात आपल्या प्राण व धनानिशी जिहाद केले त्यांचा दर्जा अल्लाहजवळ फार मोठा आहे [४०] आणि तेच सफल होणारे आहेत.

الَّذِينَ آمَنُوا وَهَاجَرُوا وَجَاهَدُوا فِي سَبِيلِ اللَّهِ
بِأَمْوَالِهِمْ وَأَنْفُسِهِمْ أَعْظَمُ دَرَجَةً عِنْدَ اللَّهِ ۚ وَأُولَٰئِكَ
هُمُ الْفَائِزُونَ ﴿٢٠﴾

२१. त्यांचा रब्ब (पालनकर्ता) त्यांना खुशखबरी देतो, आपली कृपा व प्रसन्नतेची आणि अशा बागांची जिथे त्यांच्याकरिता सदैव देणगी असेल.[४१]

يُبَشِّرُهُمْ رَبُّهُمْ بِرَحْمَةٍ مِنْهُ وَرِضْوَانٍ وَجَنَّاتٍ لَهُمْ فِيهَا
نَعِيمٌ مُقِيمٌ ﴿٢١﴾

३३. संबोधनाचा खरा रोख त्या मुसलमानांकडे आहे जे नुकतेच इस्लाम मध्ये दाखल झाले होते व ज्यांचा जेहादशी संबंध आला नव्हता.

३४. काफ़िरांशी मैत्री करण्यास मनाई ज्या अर्थाने केली गेली आहे तिचे स्पष्टीकरण सूरह मायदा टीप क्र. १६४ मध्ये केले गेले आहे.

३५. म्हणजे मसजिदी अल्लाहच्या उपासनेकरिता खास आहेत मग जे लोक शिर्क व मूर्तिपूजेत व्यस्त आहेत व एकमेव ईश्वराच्या उपासनेबाबत ज्यांचा इन्कार आहे ते मसजिदींना आबाद करण्यास योग्य कसे व त्यांना याचा काय हक्क पोहचतो की त्यांनी मसजिदीचे सेवक व विश्वस्त बनावे? काय ते ईश्वर व मूर्ति दोघांनाही खुश करू इच्छितात? कशा परस्परविरोधी गोष्टी आहेत, ज्यांना लोक आपल्या अंतर्यामी बाळगतात.

गोष्ट सर्वसामान्यपणे सांगितली गेली आहे अशासाठी की मसजिदींबाबत एक तात्विक बाब लक्षात यावी. परंतु येथे प्रामुख्याने मसजिदे हरामकडे इशारा आहे ज्याच्यावर कुरैश जातीसमूहाने कब्जा केला होता आणि शिर्कला खात्रीत न आणता त्याची सेवा करण्यात व विश्वस्तता राखण्यात अभिमान बाळगत.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनफाल टीप क्र. ४७

३६. म्हणजे एखाद्या मसजिदीची अल्लाहच्या दृष्टीने काही महत्व राखत नाही, जर सेवा करणाऱ्याची बुद्धि शिर्क विरहित नाही. अशा लोकांची सत्कृत्ये वाया जाणार आहेत आणि त्यांच्या या सेवेचा त्यांना कोणताहि मोबदला मिळणार नाही.

३७. म्हणजे अल्लाहच्या उपासना गृहांना खऱ्या अर्थाने आबाद करणारे आणि त्यांची व्यवस्था व विश्वस्तता सांभाळण्यास खऱ्या अर्थाने पात्र असे तेच लोक असू शकात ज्यांच्या अंगी ही गुणवैशिष्ट्ये आढळून येतात, अनेकेश्वरवादी नव्हे.

यावरून काही तात्विक बाबी स्पष्ट झाल्या:-

एक हे की मसजिदीवर काफ़िरांचा नव्हे मुसलमानांचा अधिकार असला पाहिजे. दुसरी गोष्ट ही की, मसजिदींची उभारणी, त्यांची सेवा, त्यांची व्यवस्था विश्वस्तता इ. कार्यांकरीता काफ़ीर कदापि योग्य नाहीत.

तिसरे हे की ह्या कार्यांकरिता योग्य तेच लोक होत जे एकेश्वरवादावर विश्वास ठेवणारे आणि इस्लामच्या मूलभूत निकडी पूर्ण करणारे असावेत व चौथी गोष्ट अशी की कोणत्याहि मसजिदीचा विश्वस्त अशा एखाद्या मुसलमानास बनवू नये ज्याने अनेकेश्वरवादाशी मैत्री केलेली असावी अथवा जो नमाज़ व ज़कातबाबत बेपर्वा किंवा दुराचारी व व्यभिचारी असावा.

३८. कुरेश या घमेंडीत होते की ते काबागृहाचे सेवक व त्याचे विश्वस्त आहेत, मसजिदे हराम (काबागृहा) चे संरक्षण, हज्जची व्यवस्था व हज्ज यात्रींना पाणी पाजण्याकरिता कायमच्या एका विभागाची स्थापना या सारखा सेवेबद्दल त्यांना मोठा अभिमान होता आणि हे समजून घेण्यास ते असमर्थ होते की एवढी सेवा केल्यानंतरहि ते ईश्वराच्या नजरेत अप्रिय कसे होऊ शकतील. त्यांच्या ह्याच विचाराचे खंडन करीत हे स्पष्ट केले गेले आहे की ही कार्ये त्याच अवस्थेत अल्लाहजवळ कदर करण्याजोगी आहेत जेव्हा माणसाने अल्लाहशी एकनिष्ठतेचा संबंध जोडलेला असावा. शिर्क हे ईश्वराशी निष्ठाहीनता व बंड होय. यास्तव जो मनुष्य शिर्क करतो तो सर्वात मोठा अपराधी होय व त्याच्या विरूद्ध क़ियामतीच्या दिवशी ईश्वराच्या न्यायालयात बंडखोरीचा खटला चालविला जाईल: अशा माणसाला त्याच्या धार्मिक सेवेबद्दल इनाम देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

३९. येथे अत्याचारीशी अभिप्रेत अनेकेश्वरवादी होय. अर्थात अनेकेश्वरवादी कशाही प्रकारची ''धार्मिक सेवा'' पार पाडतील तरी देखील यशाचा मार्ग त्यांच्याकरिता खुला होणार नाही. ते असफल व विफल मनोरथ होणारे लोक होत.

४०. म्हणजे अल्लाहजवळ अनेकेश्वरवाद्यांचा तर कोणताही दर्जा व पद नाही तथापि त्यांच्या एकनिष्ठ दासांचा, ज्यांनी ईमान बाळगून त्याकरिता मोठ मोठे बलीदान दिले. ना केवळ दर्जा व पद आहे किंबहुना अत्यंत उच्च स्थान आहे.

४१. म्हणजे जन्नतच्या बागा सदा बहरलेल्या असतील आणि तेथल्या ईश देणग्या अविनाशी स्वरूपाच्या असतील.

२२. तिथे ते सदैव राहतील [४२] नि:संशय अल्लाह जवळ (देण्याकरीता) फार मोठा मोबदला आहे.[४३]

خٰلِدِيْنَ فِيْهَآ اَبَدًا ؕ اِنَّ اللّٰهَ عِنْدَهٗۤ اَجْرٌ عَظِيْمٌ ﴿۲۲﴾

२३. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! जर तुमचे पिता व बांधव ईमानच्या तुलनेत कुफ्रला पसंत करतील तर त्यांना आपला मित्र बनवू नका [४४] आणि तुमच्यापैकी जे लोक त्यांना दोस्त बनवतील तर (याद राखा) हयाच प्रकारचे लोक अत्याचारी होत.

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا لَا تَتَّخِذُوْۤا اٰبَآءَكُمْ وَ اِخْوَانَكُمْ اَوْلِيَآءَ اِنِ اسْتَحَبُّوا الْكُفْرَ عَلَى الْاِيْمَانِ ؕ وَمَنْ يَّتَوَلَّهُمْ مِّنْكُمْ فَاُولٰٓئِكَ هُمُ الظّٰلِمُوْنَ ﴿۲۳﴾

२४. सांगा, जर तुमचे पिता, तुमचे पुत्र, तुमचे भाऊ, तुमच्या पत्न्या, तुमचे कुटुंब व ती सम्पत्ति जी तुम्ही प्राप्त केली आहे आणि तो व्यापार जो मंद पडण्याची तुम्हाला धास्ती आहे आणि ते घर जे तुम्हाला पसंत आहे, तुम्हाला अल्लाहपेक्षा त्याच्या प्रेषितापेक्षा व त्याच्या मार्गात जेहाद करण्यापेक्षा अधिक प्रिय आहे तर प्रतिक्षा करा. येथपावेतो की अल्लाहने आपला निर्णय प्रस्तुत करावा [४५] आणि अल्लाह अवज्ञा करणाऱ्यांना मार्ग दाखवित नाही. [४६]

قُلْ اِنْ كَانَ اٰبَآؤُكُمْ وَاَبْنَآؤُكُمْ وَاِخْوَانُكُمْ وَاَزْوَاجُكُمْ وَعَشِيْرَتُكُمْ وَ اَمْوَالُ ۨاقْتَرَفْتُمُوْهَا وَتِجَارَةٌ تَخْشَوْنَ كَسَادَهَا وَ مَسٰكِنُ تَرْضَوْنَهَاۤ اَحَبَّ اِلَيْكُمْ مِّنَ اللّٰهِ وَرَسُوْلِهٖ وَجِهَادٍ فِيْ سَبِيْلِهٖ فَتَرَبَّصُوْا حَتّٰى يَاْتِيَ اللّٰهُ بِاَمْرِهٖ ؕ وَاللّٰهُ لَا يَهْدِي الْقَوْمَ الْفٰسِقِيْنَ ﴿۲۴﴾

२५. अल्लाहने बहुतेक प्रसंगी तुमची मदत केली आहे [४७] आणि हुनैन [४८] च्या दिवशी देखील जेव्हा तुम्हाला आपल्या बहुसंख्येचा गर्व होता पण ती तुमच्या काहीहि कामी आली नाही आणि भूमी विशाल असतानाहि तुम्हावर तंग झाली व तुम्ही पाठ फिरवून [४९] पळू लागले.

لَقَدْ نَصَرَكُمُ اللّٰهُ فِيْ مَوَاطِنَ كَثِيْرَةٍ ۙ وَّيَوْمَ حُنَيْنٍ ۙ اِذْ اَعْجَبَتْكُمْ كَثْرَتُكُمْ فَلَمْ تُغْنِ عَنْكُمْ شَيْـًٔا وَّضَاقَتْ عَلَيْكُمُ الْاَرْضُ بِمَا رَحُبَتْ ثُمَّ وَلَّيْتُمْ مُّدْبِرِيْنَ ﴿۲۵﴾

२६. मग अल्लाहने आपल्या प्रेषितावर व ईमान बाळगणाऱ्यांवर आपली शांती अवतरीत केली. आणि अशा सेना अवतरित केल्या ज्या तुम्हाला दिसून आल्या नाहीत [५०] व काफ़िरांना दंड दिला आणि काफ़िरांचा हाच मोबदला होय. [५१]

ثُمَّ اَنْزَلَ اللّٰهُ سَكِيْنَتَهٗ عَلٰى رَسُوْلِهٖ وَعَلَى الْمُؤْمِنِيْنَ وَاَنْزَلَ جُنُوْدًا لَّمْ تَرَوْهَا ۚ وَعَذَّبَ الَّذِيْنَ كَفَرُوْا ؕ وَذٰلِكَ جَزَآءُ الْكٰفِرِيْنَ ﴿۲۶﴾

२७. मग यानंतर अल्लाह ज्याला इच्छितो तौबाची सुबुद्धि प्रदान करतो [५२] आणि अल्लाह माफ करणारा, कृपा करणारा आहे.

ثُمَّ يَتُوْبُ اللّٰهُ مِنْۢ بَعْدِ ذٰلِكَ عَلٰى مَنْ يَّشَآءُ ؕ وَاللّٰهُ غَفُوْرٌ رَّحِيْمٌ ﴿۲۷﴾

४२. म्हणजे ईमान बाळगणाऱ्यांना जन्नतमध्ये निरंतर जीवन लाभेल-गृह व गृहस्थ दोन्हीहि शाश्वत.

४३. म्हणजे अल्लाह जेव्हा आपल्या खऱ्या दासाना त्यांच्या सेवेचा मोबदला देऊ इच्छिल तेव्हा त्याच्या जवळ कोणत्याहि गोष्टीची कमतरता असू शकणार नाही की ज्यायेगे त्याने हात राखून द्यावे. तो जमीन व आकाशाच्या खजिन्यांचा मालक आहे यास्तव त्याच्या बक्षिसाला कोणतीहि मर्यादा असू शकत नाही.

४४. ''आपला मित्र बनवू नका'' याचा अर्थ असा की जर तुमचा पिता किंवा तुमचा भाऊ अल्लाहशी बंडखोर आहे, व आपल्या काफ़ीर-वर्तनास सोडण्यास तयार नाही तर तो ईश्वराचा शत्रू असेल त्याला एक ईमान बाळगणारा आपला मित्र कसा बनवू शकतो? विशेषत: जेव्हा जिहादचा प्रसंग असेल तेव्हा तो नाते संबंधांना कशाप्रकारे खात्रीत आणू शकतो? अशा वेळी तर शत्रू समजूनच व्यवहार केला पाहिजे.

त्यावेळी कित्येक मुसलमानांचे आप्तस्वकीय काफ़िरांच्या देशी होते व त्यांनी इस्लाम कबुल केला नव्हता. इस्लाम व कुफ्रच्या युद्धात काफीरांशी ना केवळ त्यांची सर्व सहानुभूति होती. किंबहुना त्यांच्याशी मिळून मदीनेच्या मुसलमानांविरूद्ध युद्धासाठी निघत ज्यात त्यांचे पुत्रदेखील होते व भाऊ देखील हीच ती परिस्थिती होती ज्यात मुसलमानांना स्पष्टपणे ही ताकीद दिली गेली की त्यांनी सत्य व असत्याच्या संघर्षात ना बापाची तमा बाळगावी ना भावाची.

४५. मुसलमान म्हटला जाणारा मनुष्य तोंडाने तर हेच म्हणतो की तो अल्लाहला, त्याच्या प्रेषिताला व त्याच्या धर्माला सर्वाहून अधिक प्रिय जाणतो परंतु जेव्हा कसोटी समोर उभी राहते तेव्हा त्याचे खरे वा खोटे असणे जाहीर होते. कुफ्र व इस्लामच्या संघर्षात ज्या ज्या गोष्टींना मनुष्य प्रिय जाणतो त्या गोष्टींबाबत कठीण परीक्षा होते. एका बाजुला या गोष्टींचे प्रेम त्याला आपल्याकडे आकर्षित करते आणि दुसऱ्या बाजूला धर्माची निकड असते की निर्धास्तपणे सत्यसमर्थनाची घोषणा करा मग याचा प्रभाव आपल्या व्यवसायावर का होईना किंवा ही निकड उद्‌भवते की सत्यवचन बुलंद करण्याकरिता प्राण संकटात टाका. तद्‌वतच कुफ्र व इस्लामच्या युद्धात इस्लाम माणसाकडून ही अपेक्षा करतो की त्याने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याकरीता पुढे व्हावे व मुळे बाळे, घरदार इत्यादींच्या प्रेमास अडसर बनू न द्यावे. अशा प्रसंगी जो मनुष्य आचरणाच्या कसोटीवर खरा उतरतो तो हे सिद्ध करून दाखवतो की अल्लाह, त्याचा प्रेषित व त्याच्या धर्माहून अधिक कोणतीहि गोष्ट त्याला प्रिय नव्हती. परंतु जे लोक आपले आप्तस्वकीय, कुटुंबिय व आपल्या धंदा-व्यवसायाच्या प्रेमात इतके व्यस्त होतात की अगदी नाजुक प्रसंगी देखील ते सत्य-समर्थनाच्या निकडींना पाठीमागे टाकतात, यासाठी की त्यांची 'दुनिया' आबाद रहावी तेव्हा अशा लोकांना सक्त ताकीद केली गेली आहे की मग त्यांनी ईश-निर्णयाचीच वाट बघावी. अर्थात आपल्या दुष्परिणीतीकरीता तयार असावे.

४६. म्हणजे जे लोक अल्लाहची अवज्ञा करु इच्छितात त्यांच्याकरिता सद्‌भाग्याचा मार्ग खुलत नाही यास्तव त्यांच्या हिश्श्यात वंचिततताच येते.

४७ म्हणजे बद्रचे युद्ध, खंदक-युद्ध, खैबर युद्ध व मक्का युद्धासारख्या कित्येक कठीण प्रसंगी अल्लाहने तुमची मदत केली आहे. आणि ज्याअर्थी त्याची मदत भूतकाळात तुमच्या पाठीशी राहिली आहे तर आता का असणार नाही. यास्तव अनेकेश्वरवाद्यांशी युद्ध करण्याचा जो आदेश तुम्हाला दिला जात आहे त्यात मागे पुढे करू नका.

४८. हुनैन मक्का व ताइफ यांच्या दरम्यानची एक दरी आहे जी मक्केपासून २५ किलोमीटर अंतरावर आहे. येथे शव्वाला हिजरी सन ८ (फेब्रुवारी ६३०) मध्ये अनेकेश्वरवाद्यांशी युद्ध झाले.

४९. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मक्का विजयाची मोहीम नुकतीच जिंकली होती की ताइफच्या दिशेने कबीला हवाजिन व कबीला सकीफ यांनी जे मुशरीक (अनेकेश्वरवादी) होते मक्का-विजयाने भडकून जावून मुसलमानांविरुद्ध युद्धाची तयारी सुरू केली. पैग़ंबराना जेव्हा त्यांच्या वाईट संकल्पाची सूचना मिळाली तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) बारा हजार सैन्यासह त्यांच्या मुकाबल्याकरिता निघाले. या वेळी मुसलमानांच्या सैन्याची संख्या फार मोठी होती व नुकताच मक्केवर विजय प्राप्त झाला होता म्हणून मुसलमानांमध्ये आत्मविश्वास अत्याधिक प्रमाणात निर्माण झाला होता ज्यामुळे ते शत्रू पक्षाकडून चांगलेच गाफील राहीले, परिणामी ते प्राणाची पर्वा न करता लढू शकले नाहीत. युद्धात स्थान व वेळेला मोठे महत्व असते. हुनैनचा इलाका पहाडी आहे जेथे शत्रू आधीपासून मोर्चे लावून बसले होते हे कबीला तिरंदाजात मोठे निष्णात होते म्हणून मुसलमानांचे सैन्य जेव्हा दरीतून जाऊ लागले तेव्हा शत्रूने अचानक हल्ला केला व बाणांचा असा वर्षाव केला की मुसलमानांचे सैन्य अस्ताव्यस्त झाले परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व त्यांचे काही प्राणार्पण करणारे साथीदार आपल्या जागी अटळ राहीले. मग जेव्हा त्यांच्या इशाऱ्याने हजरत अब्बास यांनी मुसलमानांना ललकारले तेव्हा ते पैगंबरांभोवती जमा झाले व मग मोठ्या शौर्याने लढले. येथपावेतो की विजय ने त्यांच्या गळ्यात माळ घातली. आयतीत याच घटनेकडे संकेत केला गेला आहे.

५०. अभिप्रेत फिरीश्त्यांचे सैन्य होय जे या कठीण प्रसंगी

मुसलमानांच्या मदतीकरिता अवतरले. फिरिश्त्यांच्या या कुमकने मुसलमानांचा धीर बांधला कारण ते आकाशातून शांतीसामुग्री म्हणजे मन:शांती, व समाधान घेऊन उतरले होते याच गोष्टीने त्यांच्यात अशी चेतना निर्माण केली की ते जखमी सिंहाप्रमाणे शत्रूपक्षावर तुटून पडले व या आक्रमणास शत्रूपक्ष सहन करु शकला नाही. परिणामी त्याने शस्त्र खाली टाकले. हजारो लोकांना कैद केले गेले आणि जबरदस्त माले गनीमत मुसलमानांच्या हाती लागला. सर्वश्रेष्ठ अल्लाहची हीच ती अपरोक्ष मदत होय जिचा उल्लेख या आयतीत आला आहे. कुफ्र व इस्लाम यांच्या दरम्यान च्या युद्धात ईमान बाळगणाऱ्यांच्या मदतीकरीता फिरिश्त्यांची जी कुमक पाठविली जाते तिचे स्पष्टीकरण सूरह अनफाल टीप क्र. १५ व १९ मध्ये केले गेले आहे.

५१. हुनैन मध्ये काफिरांना मोठ्या वाईट रीतीने पराभवाला तोंड द्यावे लागले. ही शिक्षा त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने मुसलमानांच्या हातून दिली व हा त्यांच्या कुफ्रचा मोबदला होता जो त्यांना ईहलोकातच मिळाला आणि सत्याचा बोलबाला झाला.

५२. म्हणजे युद्धात जिथे रक्तपात, विध्वंस घडून येतो तिथे ईश्वराच्या कित्येक दासांकरिता मार्गदर्शनाचे दरवाजे उघडतात. ते अल्लाहकडून सुबुद्धि प्राप्त करुन कुफ्रबाबत तौबा करतात व ईश्वराच्या कृपाछत्राखाली आश्रय घेतात. जिहादचा हा स्पष्ट पैलू होय आणि मानवजातीच्या हक्कात हा एवढा मोठा लाभ होय की याचा निषेधात्मक पैलू अर्थात युद्धाचे दुष्परिणाम याच्या तुलनेत काहीहि महत्व राखत नाही. हुनैन युद्धात अनेकेश्वरवादींचा पराभव झाल्यानंतर त्यांच्या फार मोठ्या संख्येने इस्लाम धर्म स्वीकारला कारण त्यांना हा विश्वास झाला की प्रेषिताच्या पाठीशी अपरोक्ष-मदत आहे म्हणून प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक मैदानात त्याचे पारडे भारी राहते. मग जी शक्ति आपल्या प्रेषिताच्या मदतीकरीता हे चमत्कार दाखवित आहे तिच्यावर ईमान का म्हणून राखले न जावे व त्याच्या धर्माला का म्हणून कबूल न केले जावे?

**हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! अनेकेश्वरवादी अगदी गलीच्छ आहेत यास्तव या वर्षानंतर हे मसजिदेहराम जवळ येता कामा नये आणि जर तुम्हाला आर्थिक तंगीचे भय आहे तर अल्लाहने इच्छिल्यास आपल्या कृपेने तुम्हाला धनवान करील अल्लाह जाणारा, हिकमत बाळगणारा आहे. (अल-क़ुरआन)**

२८. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! अनेकेश्वरवादी अगदी गलीच्छ आहेत [५३] यास्तव या वर्षानंतर [५४] हे मसजिदेहराम जवळ येता कामा नये [५५] आणि जर तुम्हाला आर्थिक तंगीचे भय आहे तर अल्लाहने इच्छिल्यास आपल्या कृपेने तुम्हाला धनवान करील [५६] अल्लाह जाणारा, हिकमत बाळगणारा आहे.

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا إِنَّمَا الْمُشْرِكُونَ نَجَسٌ فَلَا يَقْرَبُوا
الْمَسْجِدَ الْحَرَامَ بَعْدَ عَامِهِمْ هَٰذَا ۚ وَإِنْ خِفْتُمْ عَيْلَةً
فَسَوْفَ يُغْنِيكُمُ اللَّهُ مِنْ فَضْلِهِ إِنْ شَاءَ ۚ إِنَّ اللَّهَ
عَلِيمٌ حَكِيمٌ ﴿٢٨﴾

२९. ग्रंथ बाळगणाऱ्यांपैकी जे लोक अल्लाह व अंतिम दिनावर ईमान बाळगत नाही आणि जे काही अल्लाह व त्याच्या प्रेषिताने हराम ठरवले आहे त्यास हराम ठरवित नाही आणि सत्य धर्मास आपला धर्म बनवित नाही त्यांच्याशी युद्ध करा, येथपावेतो की प्रभावित होऊन त्यांनी जिझिया कर द्यावा व गौण बनून रहावे.[५७]

قَاتِلُوا الَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ بِاللَّهِ وَلَا بِالْيَوْمِ الْآخِرِ وَلَا
يُحَرِّمُونَ مَا حَرَّمَ اللَّهُ وَرَسُولُهُ وَلَا يَدِينُونَ
دِينَ الْحَقِّ مِنَ الَّذِينَ أُوتُوا الْكِتَابَ حَتَّىٰ
يُعْطُوا الْجِزْيَةَ عَنْ يَدٍ وَهُمْ صَاغِرُونَ ﴿٢٩﴾

३०. यहुदी म्हणतात उजैर अल्लाहचा पुत्र आहे [५८] आणि ख्रिश्चन म्हणतात मसीह (येशू) अल्लाहचा पुत्र आहे [५९] ह्या केवळ वल्गना आहेत ज्या ते आपल्या मुखातून काढीत आहेत, त्या लोकांच्या वल्गनांची नक्कल उतारीत जे यांच्यापूर्वी काफ़ीर झाले [६०] अल्लाह यांचा सर्वनाश करो. हे कशा प्रकारे असत्याला बळी पडत आहेत !

وَقَالَتِ الْيَهُودُ عُزَيْرٌ ابْنُ اللَّهِ وَقَالَتِ النَّصَارَى
الْمَسِيحُ ابْنُ اللَّهِ ۖ ذَٰلِكَ قَوْلُهُمْ بِأَفْوَاهِهِمْ ۖ
يُضَاهِئُونَ قَوْلَ الَّذِينَ كَفَرُوا مِنْ
قَبْلُ ۚ قَاتَلَهُمُ اللَّهُ ۚ أَنَّىٰ يُؤْفَكُونَ ﴿٣٠﴾

३१. त्यांनी अल्लाहला सोडून आपल्या विद्वानांना व सन्याशांना रब्ब (ईश्वर) बनविले आहे.[६१] आणि मरीयमचा पुत्र मसीह ला देखील[६२] वस्तुतः त्यांना केवळ एक उपास्याची उपासना करण्याचा आदेश दिला गेला होता [६३] तो, ज्याच्या शिवाय अन्य कोणीहि ईश्वर नाही, पवित्र आहे तो त्या शिर्कपासून जे हे करीत आहेत.

اتَّخَذُوا أَحْبَارَهُمْ وَرُهْبَانَهُمْ أَرْبَابًا مِنْ
دُونِ اللَّهِ وَالْمَسِيحَ ابْنَ مَرْيَمَ وَمَا أُمِرُوا
إِلَّا لِيَعْبُدُوا إِلَٰهًا وَاحِدًا ۖ لَا إِلَٰهَ إِلَّا هُوَ ۚ
سُبْحَانَهُ عَمَّا يُشْرِكُونَ ﴿٣١﴾

३२. हे लोक अल्लाहच्या प्रकाशास (नूर ला) आपल्या फूंकीने विझवू इच्छितात. वस्तुतः अल्लाह आपला प्रकाश (नूर) पूर्ण केल्याखेरीज राहणारा नाही मग काफ़िरांना नापसंत का असेना. [६४]

يُرِيدُونَ أَنْ يُطْفِئُوا نُورَ اللَّهِ بِأَفْوَاهِهِمْ وَيَأْبَى
اللَّهُ إِلَّا أَنْ يُتِمَّ نُورَهُ وَلَوْ كَرِهَ الْكَافِرُونَ ﴿٣٢﴾

३३. तोच होय ज्याने आपल्या प्रेषितास मार्गदर्शन व सत्य धर्मासह पाठविले अशा साठी की यास समस्त धर्मांवर प्रभावित करावे.मग अनेकेश्वरवादींना नापसंत का असेना.[६५]

هُوَ الَّذِي أَرْسَلَ رَسُولَهُ بِالْهُدَىٰ وَدِينِ الْحَقِّ
لِيُظْهِرَهُ عَلَى الدِّينِ كُلِّهِ وَلَوْ كَرِهَ الْمُشْرِكُونَ ﴿٣٣﴾

५३. गलीच्छतेशी अभिप्रेत शिर्कची घाण होय ज्यापासून एकेश्वरवाद केंद्रास स्वच्छ शुद्ध राखणे आवश्यक आहे. अनेकेश्वरवादी व काफ़ीर यांच्या व्यवहारात इस्लामने स्पृश-अस्पृश्यतेची कोणतीहि कल्पना मांडली नाही, किंबहुना त्यांच्या शिर्क व कुफ्रच्या प्रभावापासून स्वत:ला अलीप्त राखण्याची ताकीद केली. स्पष्ट व्हावे की इस्लामजवळ हृदय व बुद्धि आणि श्रद्धेची गलिच्छता समस्त घाणीहून मोठी आहे.

५४. या वर्षाशी अभिप्रेत हिजरी सन ९ (इ. स. ६३१) होय. जेव्हा ही आयत अवतरली या वर्षी हजरत अबू बकरच्या नेतृत्वात हज्ज यात्रा झाली होती व या प्रसंगी या आदेशाच्या अंमलबजावणीत घोषणा केली गेली होती की यापुढे कोणताहि अनेकेश्वरवादी हज्ज करु शकणार नाही.

५५. म्हणजे अनेकेश्वरवाद्यांनी हरमच्या हद्दीत प्रवेश करता कामा नये. या आदेशानुसार ना केवळ मसजिदे हराम मध्ये किंबहुना संपूर्ण हरम मध्ये अनेकेश्वरवाद्यांचा प्रवेश कियामती पर्यंत निषिद्ध ठरला. दुसऱ्या शब्दात हरमची भूमी मुस्लिमेतरांकरीता ''मनाई केलेला इलाका'' (Prohibited Area) होय.

५६. अनेकेश्वरवाद्यांना हरम-प्रवेश निषिद्ध ठरविल्याच्या परिणामी व्यवसाय व व्यापार प्रभावित होण्याचे भय होते कारण त्यावेळी मक्केच्या बाजारपेठेत खाद्य-वस्तू आणणारे व नेणारे बहुतेक अनेकेश्वरवादीच होते परंतु या भयाला खात्रीत न आणण्याची ताकीद सर्वश्रेष्ठ अल्लाहने केली व हा दिलासा दिला की अल्लाह आपल्या कृपेने तुम्हाला धनवान करील तेव्हा सर्वसाधारणपणे मुसलमानांना हेच दिसून आले म्हणजे अनेकेश्वरवाद्यांना हरमच्या हद्दीत प्रवेश निशिद्ध ठरविल्याने मुसलमानांच्या आर्थिक स्थितीवर कसलाही वाईट परिणाम झाला नाही किंबहुना ते दिवसेंदिवस त्यात प्रगती करत गेले. तात्पर्य खरी गोष्ट, अल्लाहच्या आदेशाची त्याच्यावर भरवसा करीत आज्ञापालन करणे हे होय मग समस्या देखील सुटू लागतात व त्याच्याकडून समृद्धीचा उदयहि होऊ लागतो.

५७. जिहाद संबंधीची ही महत्वपूर्ण आयत होय जी हिजरी सन ९ मध्ये तबूक युद्धापूर्वी अवतरली या आधी ग्रंथ बाळगणाऱ्यापैकी केवळ युहुदींशी युद्धाचा प्रसंग आला होता. त्यांच्या वस्त्या मदीनेच्या आसपास किंवा त्याला लागून असलेल्या इलाक्यात होत्या व या युद्धाचे कारण त्यांच्या त्या कारस्थानात्मक कारवाया होत्या ज्या मुसलमानांविरुद्ध व अनेकेश्वरवादींच्या समर्थनात ते करीत होते. आता या आयतीत सर्वसामान्य ग्रंथ बाळगणाऱ्या (यहुदी व ख्रिश्चन यांच्या) शी व्यवहार करण्याबाबत तात्त्विक आज्ञा दिली गेली आहे जिचे स्वरुप इस्लामी राज्याची क़ायम स्वरुपी पॉलीसी आहे.

''ग्रंथ बाळणाऱ्यांपैकी'' चा अर्थ असा की जे ग्रंथधारक इस्लाम स्वीकारतील त्यांच्याशी विरोध केला जाणार नाही किंबहुना केवळ त्या लोकांशी युद्ध किंवा जिझियाची मागणी केली जाईल जे इस्लाम कबूल करणार नाहीत.

ग्रंथ बाळगणाऱ्यांचा अल्लाह व अंतिम दिनावर ईमान न ठेवण्याचा अर्थ असा की ते जरी याचा दावा करीत असेल तरी त्यांचा हा दावा ईमानच्या वस्तुस्थितीच्या दृष्टीने अगदी अर्थशून्य आहे. कारण ते अल्लाहला अशा प्रकारे मानत नाही ज्या प्रकारे मानले गेले पाहिजे. ते अल्लाहला मान्य करतात परंतु त्याला पुत्र असण्याचीहि धारणा बाळगतात. अल्लाहला एकमेव उपास्य मानून केवळ त्याचीच उपासना व दास्यत्व पत्करण्यास ते तयार नाहीत त्याला दोष व उणीवांपासून मुक्त जाणत नाही व त्याच्या एकेश्वरवादात यांनी शिर्कचे मिश्रण करून ठेवले आहे. तसेच ते आख़िरतलाहि मानणारे आहे पण त्या सोबतच ते या गोष्टीवरहि विश्वास ठेवतात की अमुक अमुकच्या शिफारसीने किंवा अमुक एका पैगंबरावर 'कफ्फारा'ची श्रद्धा ठेवल्यामुळे त्यांना मुक्ति मिळेल अर्थात त्यांच्या या श्रद्धेने आखिरतच्या श्रद्धेला सर्वसामान्यत: अगदी व्यर्थ करुन ठेवले आहे. आणि आखिरतच्या विचारपूस विषयीचा विचार बुद्धीतून नाहीसा झाला आहे म्हणून वस्तुस्थिती हीच की ग्रंथ बाळगणारे आखिरतवर ईमान बाळगत नाही.

अल्लाहने ज्या गोष्टींना आपल्या ग्रंथात हराम ठरविले आहे उदा. व्याज,मग ते आपल्या लोकांकडून घेतले जावे किंवा इतरांकडून. मद्य, डुक्कर वगैरे. तद्वतच अल्लाहचा अंतिम प्रेषित त्याच्या आज्ञेनुसार प्रतिष्ठेबाबत जे सविस्तर आदेश देत आहे ते मान्य करण्यासाठी ते तयार नाहीत. दुसऱ्या शब्दात ते अल्लाहच्या अंतिम शरीयतीस मान्य करण्यास नकार दर्शवितात.

''आणि ना सत्य धर्मास आपला धर्म बनवितात'' चा अर्थ असा की सत्यधर्म असलेल्या इस्लामला कबूल करण्यासाठी ते तयार नाहीत किंबहुना यहुदीमत व ख्रिश्चनमताशी जे अल्लाहचे धर्म नाहीत त्यांना कवटाळून बसू इच्छितात. अर्थात हे की ग्रंथ बाळगणाऱ्यांनी धर्माचे स्वरुप निश्चित अंगिकारले आहे परंतु त्यांचा ना खऱ्या ईशभक्तिशी संबंध आहे व ना त्याच्या आज्ञापालनाशी व ना खऱ्या धार्मिकतेशी अशा स्थितीत त्यांच्या हातून जगात भलेपणाचे कार्य व्हायचे तर राहीले, तथापि कुफ्रला वाढविण्यात व उत्पात पसरविण्यात ते खचितच मग्न राहतील. यास्तव या उच्च उद्दिष्टाप्रित्यर्थ जे इस्लामच्या नजरेसमोर आहे की,कुफ्र व उपद्रवाची सामर्थ्ये लयाला जावीत आणि ईश-भक्ति व मंगल सामर्थ्ये वाढीस लागावी. त्यांच्याशी युद्ध अनिवार्य आहे याशिवाय की

त्यांनी जिझिया देऊन इस्लामी राज्याच्या नियंत्रणात राहणे मान्य करावे कारण अशा स्थितीत त्यांचा उपद्रवहि लयाला जाऊ शकतो आणि बदललेल्या वातावरणात त्यांना इस्लामच्या सत्यतेवर विचार करण्याची संधीहि लाभू शकते.

''जिझिया'' एक असा टॅक्स आहे ज्यास इस्लामी राज्यात राहणारे मुस्लिमेतर राज्याशी आपली निष्ठा असल्याचे द्योतक म्हणून व राज्याकडून मिळणाऱ्या संरक्षणाचा मोबदला म्हणून अदा करतात. याचे ठराविक असे कोणतेहि प्रमाण नाही, किंबहुना इस्लामी शासनास हा अधिकार आहे की परिस्थिती व न्यायाच्या निकडींना समोर ठेवून हे प्रमाण ठरवावे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी ह्याचे प्रमाण प्रत्येक वर्षाला एक दिनार१० दिरहम सुमारे ३० ग्राम चांदी निर्धारीत केले होते. नंतर हजरत उमर यांनी आपल्या खिलाफ़त काळात जेव्हा मक्केची आर्थिक स्थिती चांगली झाली होती, जिझियाचे प्रमाण वाढवून चार दिनार (४० दिरहम= सुमारे १२० ग्राम चांदी) केले. (किताबुल अमवाल-अबूउबैद पा. ३९-४१)

आयतीत ग्रंथ बाळगणाऱ्यांपासून अर्थात यहुदी व ख्रिश्चनांपासून जिझिया घेऊन त्यांना संरक्षण देण्याची ताकीद केली गेली आहे परंतु ही सवड अनेकेश्वरवाद्यांना देण्याचा आदेश स्पष्टतः दिला गेला नाही. याचे कारण असे की ही सवलत अरबच्या अनेकेश्वरवादींकरिता नव्हती, ज्यांच्याशी खरे पाहता क़ुरआन अवतरण काळातील मुसलमानांचा संबंध होता, अरबच्या अनेकेश्वरवादींकडून, ज्यांच्याकडे प्रत्यक्ष पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पाठविले गेले होते फक्त इस्लाम कबूल केला जाऊ शकत होता. परंतु नंतर जेव्हा अरबेतर अनेकेश्वरवादींशी संबंध आला तेव्हा जिझियाच्या हा आदेश अरबेतर अनेकेश्वरवाद्यांनाहि लागू केला गेला. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हजर (बहरैन) च्या अग्निपूजकांकडून जिझिया घेतला होता (अबु दाऊद तिकाबुल खराज) आणि असे फर्माविले होते

سُنُّوا بِهِمْ سُنَّةَ اَهْلِ الْكِتَابِ

की ग्रंथ बाळगणाऱ्यांकरिता (जिझियाचा) जो कायदा निर्धारीत केला गेला आहे, तोच कायदा त्यांनाहि लागू करा (किताबुल अमवाल-अबूउबैद पा.३२)

अबू उबैद (मरण हि. सन ४२४) किताबुल अमवाल या पुस्तकांत जे इस्लामच्या आर्थिक व्यवस्थेबाबत अत्यंत प्रसिद्ध व प्रमाणित पुस्तक आहे, लिहीतातः-

''राहीलेत अरबेतर तर त्यांच्याकडून जिझिया घेतला जाऊ शकतो, ते ग्रंथ बाळगणारे नसतील तरी या कायद्या आधारे जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अग्निपूजक बाबत अंगिकारला होता वस्तुतः ते ग्रंथ बाळगणारे नाहीत. (पृष्ठ ३०)

आयतीत ग्रंथ बाळगणाऱ्यांशी युद्ध करण्याची जी कारणे वर्णिली गेली आहेत त्यावरुन हे स्पष्ट जाहीर होते की येथे संरक्षणात्मक युद्धाचा आदेश दिला गेला नाही, हा आदेश तर याच्या फार पूर्वी दिला गेला होता किंबहुना एक हेतुनिष्ठ, सुधारणानिष्ठ व क्रांतीकारक युद्धाचा आदेश दिला गेला आहे आणि याचे स्वरुप इस्लामी शासनाच्या तात्विक पॉलीसीचे आहे व या संदर्भात कोणतेहि पाऊल इस्लामी राज्य परिस्थिती व साधनांचा विचार करुनच उचलेले. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जेव्हा रोमन सम्राटाकडून धोका जाणवला होता तेव्हा ३० हजाराच्या सैन्यासह तबुक या ठिकाणी पोहचले जो सरहद्दीवर होता परंतु जेव्हा रोमन मुकाबल्यासाठी आले नाहीत, किंबहुना त्यांनी आपल्या सैन्यांना सरहद्दीपासून हटविले तेव्हा पैगंबरांनी त्यांना त्यांच्या दशेवरच सोडणे योग्य जाणले नंतर ख़िलाफत काळात जेव्हा परिस्थिती अनुकूल झाली तेव्हा मुसलमानांनी हे देश जिंकले.

वस्तुस्थिती अशी की जिहादला संरक्षणात्मक युद्धा (Defensive War)च्या कक्षेत मर्यादित समजणे योग्य नव्हे व ना त्यास आजच्या परिभाषेत हिंसक युद्ध (Agressive War) समजणे योग्य होय, कारण हे मुलुखगिरी, जातीय पक्षपात,भौतिक लालसा किंवा दोषपूर्ण दृष्टीकोनासाठी लढले जाणारे युद्ध नव्हे, किंबहुना ते ईश्वराच्या दासांना, खोट्या ईश्वरांच्या दास्यत्वातून मुक्त करण्यासाठी, अत्याचार मिटविण्यासाठी व त्यांना स्वच्छ शुद्ध वातावरण प्रदान करण्यासाठी लढले जाणारे युद्ध होय. खरे पाहता,हे युद्ध मानव जातीस तिच्या दुषित अवयवांचे ऑपरेशन करुन आरोग्यदायक जीवन प्रदान करण्यासमान आहे म्हणून त्याला त्या मापांनी मोजले जाऊ शकत नाही जी संरक्षण व हिंसा या नावांनी लोकांनी क़ायम करुन ठेवली आहेत. आणि जो धर्म सार्वत्रिक सत्य (Universal Truth) धारण करणारा असेल तो या बंधनात जखडून कसा राहील?

आजच्या काळात बदललेल्या विचारसरणीचे मुसलमान जिहादच्या आदेशांबाबत मोठी क्षमाशील शैली अंगिकारतात परंतु अल्लाहची वाणी याहून उच्च आहे की तिचे क्षमाशील स्पष्टीकरण केले जावे. व जेथपर्यंत यहुदी व ख्रिश्चनांचा संबंध आहे ते इस्लामच्या या प्रयत्नस्वरुप जिहादबाबत नाराजी व्यक्त करतात तर त्यांनी तौरात उघडून पहावे त्यातहि अल्लाहच्या मार्गात पुढाकार घेऊन युद्ध करण्याचे आदेश अस्तित्वात आहेत तेव्हा बनी इस्राईलला पवित्र भूमी

(पॅलेस्टाईन) ला जिंकण्याचा जो आदेश दिला गेला होता त्याचे कारण हेच होतेकी सर्वश्रेष्ठ अल्लाहने तो देश त्यांच्याकरिता लिहून दिला होता. व यासाठी लिहून दिला होता की ते इस्लामी-आवाहनाचे केंद्र ठरावे. मग काय याला देखील संरक्षणात्मक युद्ध म्हटले जाईल? तौरातमध्ये पॅलेस्टीनच्या मूर्तिपूजकासंबंधी तर अत्यंत सक्त आदेश दिले गेले होते अर्थात हे की त्याला जिंकल्यानंतर तेथे एखाद्या अनेकेश्वरवादीस राहू दिले जाऊ नये:-

''तुम्ही यार्देन ओलांडून कनान देशात पोहचाल तेव्हा त्या देशातील सर्व रहिवाश्यांना तुमच्यासमोरुन घालवून द्या, आकृति कोरलेल्या त्यांच्या दगडांचा नाश करा आणि त्यांची उच्च स्थाने पाडून टाका. तुम्ही तो देश ताब्यात घेऊन त्यात वस्ती करा तुम्ही त्या देशाचे वतनदार व्हावे म्हणून मी तो तुम्हाला दिलेला आहे.'' (गणना ३३:५१ ते ५३)

आणि जर बनी इस्राईल पॅलेस्टीन ऐवजी अन्य एखाद्या देशाशी युद्ध करण्यास निघतात पण युद्ध-प्रसंग येत नाही व तह होतो तर अशा स्थितीत त्या देशाच्या रहिवाश्यांकडून खिराज (कर) वसूल करण्याचा आदेश तौरात मध्ये दिला गेला आहे.

''युद्ध करावयाला तू एखाद्या नगरावर स्वारी करशील तेव्हा त्यांच्याशी तहाचे बोलणे करुन पहा त्यांनी तहाचे बोलणे कबूल करुन वेस उघडली तर त्या नगरात जे लोक सापडतील ते तुझे वेठबिगार करणारे व दास होतील. ते तह न करता तुमच्याशी लढू लागले तर त्या नगराला वेढा घालावा तुझा देव परमेश्वर ते नगर तुझ्या हाती देईल तेव्हा त्यातल्या प्रत्येक पुरुषाला तलवारीने मारुन टाकावे. (अनुवाद २०:१० ते १३)

५८. उजैरचे नाव बायबल मध्ये एज्रा (Ezra) असे आले आहे; जे पाचवे शतक इ. स. पूर्वी होऊन गेले बुख्त नस्सरच्या हातून बनी इस्राईलवर जो विनाश आला व ज्या धार्मिक, नैतिक व आचरणीय अध:पतनाचे ते शिकार झाले, त्यापासून त्यांना मुक्त करण्यास, तौरातशी त्यांचा संबंध मजबूत करुन त्यांची सुधारणा करण्याचे व त्यांच्यात धर्माची जागृती करण्याचे कार्य ज्या व्यक्तिने पार पाडले ती हजरत उजैर होय. बनी इस्राईलचे नैतिक बिघाडाचे एक कारण हे होते की त्यांनी आपल्या पतन काळात अनेकेश्वरवादी जातीसमूहांशी विवाह केले होते ज्याचा प्रभाव नैतिक बिघाडापर्यंतच मर्यादित राहिला नाही, किंबहुना शिर्कनेहि त्यांच्यात शिरकाव केला. बायबलमधील उल्लेखानुसार:

''एज्रा देवाच्या मंदिरापुढे पडून रडत असता व प्रार्थना करुन पापांगीकार करीत असा इस्राईल स्त्रीपुरुष मुलेबाळे यांचा मोठा समुदाय त्याच्याजवळ जमा झाला, लोक धायधाय रडत होते... मग एज्रा याजक उभा राहून त्यांस म्हणाला, तुम्ही आज्ञेचे उल्लंघन करुन अन्य जातींच्या स्त्रीयांशी विवाह केल्यामुळे इस्राएलाच्या अपराधात भर घातली तर आता आपल्या पूर्वजांचा देव परमेश्वर याच्या समोर आपले पाप कबूल करा, त्याच्या इच्छेप्रमाणे वर्तन करा आणि या देशाचे लोक व अन्य जातींच्या स्त्रीया यांच्यापासून निराळे व्हा. तेव्हा सगळ्या मंडळीने उच्च स्वराने म्हटले तू सांगतोस त्याप्रमाणे करणे आम्हास उचित आहे.''(एज्रा:१)

त्याच्या या सुधारणाविषयीच्या प्रयत्नांचा परिणाम म्हणून बनी इस्राईल ला नव-जीवन लाभले. बैतुल मुकद्दसची दुसऱ्यांदा उभारणी झाली व तौरातची शरीयत अमलात आली. अशा प्रकारे बनी इस्राईलच्या पुनरुज्जीवनाचे काम हजरत उजैर यांच्या हातून पार पडले. यास्तव स्टॅन्डर्ड ज्यूइश इन्सायक्लोपिडीयाचा लेखक असे लिहीतो:

''Ezra (5th Cent. B.C.E.) Refounder of Palestinian Jewry and reformer of Jewish life''

(Standard Jewish Encyclopedia-p. 660)

म्हणजे एज्रा पॅलेस्टेनियन यहुदी जन-समूहाचे नवे संस्थापक व सुधारक आहेत व इन्सायक्लोपिडीया ब्रिटानिकाचा लेखक लिहीतो की:

'' So important was he in the eyes of his people that later tradition regarded him as no less than a second Moses.' (Encyclopedia vol. 7 p. 127)

म्हणजे त्यांच्या जनसमूहाच्या नजरेत ते इतके महत्वपूर्ण ठरले की नंतरच्या लोकांनी त्यांना द्वितीय मूसाचे स्थान दिले.

त्यांची हीच महानता होय ज्यात अतिशयोक्ति करुन यहुदींच्या एका गटाने ख्रिश्चनांची तुलना करुन त्यांना अल्लाहचा पुत्र ठरवले.

स्पष्ट व्हावे की उजैर हे ईश्वराचे पुत्र असण्याची श्रद्धा यहुदींची सर्वसामान्य श्रद्धा नाही,किंबहुना त्यांच्या त्या संप्रदायाची श्रद्धा आहे जो क़ुरआन अवतरण काळात विद्यमान होता.

५९. मसीह (येशू) हे ईश्वराचे पुत्र असण्याविषयीची श्रद्धा ती सर्वात मोठी बिदअत आहे जिला ख्रिश्चनांनी अल्लाहच्या धर्मात सामील केले व तिला त्यांच्यात सर्वमान्य करण्यात व प्रचलीत करण्यात पॉल (Paul)चा मोठा हात आहे. यास्तव त्याची ती पत्रे जी बायबलच्या भागांमध्ये सामील आहेत त्याच्या धृष्टतेबद्दल साक्षी आहे. उदाहरणार्थ

रोमन लोकांच्या नावे पॉलने जे पत्र लिहिले होते त्यात तो म्हणतो:

''ह्या सुवार्तेविषयी देवाने पवित्र शास्त्रात आपल्या संदेष्ट्यांच्या द्वारे पूर्वीच वचन दिले होते. ही सुवार्ता त्याचा पुत्र येशू आपला प्रभू ह्याच्या विषयी आहे तो देहदृष्ट्या दावीद वंशात जन्मला व पवित्रतेच्या आत्म्याच्या दृष्टीने तो मृतांच्या पुनुरुत्थानाच्या द्वारे परिक्रमाने देवाचा पुत्र असा निश्चित ठरला.''

(पौलाचे रोमकरांस पत्र १: २ ते ४)

ईश्वराचा पुत्र असण्याच्या खोट्या श्रद्धेचे स्पष्टीकरणाकरिता पहा सूरह इखलास टीप क्र. ५

६०. ईश्वराची संतता असण्यासंबंधीची कल्पना खरे पाहता अनेकेश्वरवादी जाती समूहात राहीली आहे. ख्रिश्चनांमध्ये ही बिदअत पॉल ने प्रचलीत केली त्याने रोम व यूनानच्या अनेकेश्वरवादी तत्वज्ञानाने प्रभावित होऊन व ख्रिश्चनमतास त्या जाती समूहांमध्ये सर्वमान्य करण्यांच्या हेतुने मसीह-धर्मास तसे रुप दिले अन्यथा आजच्या इंजिल (बायबल) मध्ये ना तीन दैवतांची श्रद्धा आढळून येते व ना या अर्थाने हजरत मसीह हे ईश्वर-पुत्र असण्याची श्रद्धा आढळून येते ज्या अर्थाने ख्रिश्चनांनी अंगिकारले आहे. म्हणजे विद्यमान इंजील मध्ये जे परिवर्तित आहे, जर हजरत मसीह यांना जरी ईश-पुत्र म्हटले गेले आहे तरी ते लाक्षणिक अर्थाने, खऱ्या अर्थाने नव्हे परंतु इंजिलच्या लेखकांच्या या चुकीस पॉलने मार्गभ्रष्टतेचे रुप दिले.

६१. म्हणजे ग्रंथ बाळगणाऱ्यांमध्ये जी मार्गभ्रष्टता निर्माण झाली तिचे मूळ कारण म्हणजे त्यांचे आपल्या विद्वानांच्या व विभूतिंच्या अंधानुकरणात व्यस्त होणे हे होय. त्यांच्या कथनांनी ईश-ग्रंथाची जागा घेतली आणि स्वीकृत-अस्वीकृतिचे स्तर त्यांची कथने व फैसले ठरले. त्यांनी जी अनेकेश्वरवादी श्रद्धा व बिदअति धर्मात दाखील केले त्यावर लोक स्थिरावले व हे बघण्याची गरज भासली नाही की खरी श्रद्धा काय आहे व खोटी काय आहे, तौहीद काय व शिर्क काय, इबादत काय व बिदअत काय आणि हलाल काय आहे व हराम काय. ही स्थिती यहुदींचीहि झाली व ख्रिश्चनांचीहि परंतु ख्रिश्चनांनी एक पाऊल पुढे जाऊन हजरत मसीह यांच्याबाबत अशा श्रद्धा व खोडी (Mythology) कल्पिल्या की संपूर्ण धर्म या खोट्या कल्पनांच्या अक्षावर परिक्रमा करु लागला. येथे त्यांच्या ह्याच वर्तनास ''रब्ब बनविण्याच्या'' अर्थाने घेतले गेले आहे. यास्तव हदीस मध्ये या आयतीचे स्पष्टीकरण पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याकडून उल्लिखित आहे.

''अदि बिन हातिम म्हणतात मी एकदा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत हजर झालो या स्थितीत की माझ्या गळ्यात सोन्याचा क्रूस लटकत होता. पैगंबरांनी फर्माविले, अदी या मूर्तिला फेकून दे. अदी म्हणतात, मी पैगंबराना सूरह बराअतची ही आयत पठण करतांना ऐकले त्यांनी अल्लाहला सोडून आपले विद्वान, विभूति यांना ईश्वर बनविले' पैगंबरांनी फर्माविले ते त्यांची भक्ति करीत नव्हते किंबहुना हे करीत की ज्या गोष्टीला त्यांचे विद्वान, विभूति हलाल ठरवीत त्याला ते हलाल, आणि ज्या गोष्टीला हराम ठरवित त्याला ते हराम ठरवित.'' (तिरमिज़ी)

ही हदीस प्रमाणाच्या दृष्टीने मजबूत नाही कारण तिर्मिज़ीने याचे निवेदन करतांना लिहीले आहे:-

وهذا حديثٌ غريبٌ لا نعرفه الا من حديث عبدالسلام بن حرب ـ
و غُطيفُ بن اَعْيَنَ لَيس بمعروفٍ فى الحديث ـ

''ही ग़रीब हदीस आहे. आम्ही हिला अब्दुस्सलाम बिन हरब यांच्या मार्फतच जाणतो हिचे निवेदनकर्ते गुतैफ बिन आयन हदीसच्या मामल्यात परिचित नाहीत.''

परंतु जेथपर्यंत हदीसच्या विषयाचा संबंध आहे तो ह्या आयतीचे उत्कृष्ट भाष्य होय आणि इब्ने अब्बास, जहहाक, हुजैफा व अबुल आलिया यांच्यातर्फे जी भाष्यविषयक कथने उल्लिखित आहेत ती हि ह्याच अर्थाचे समर्थन करतात.

(पहा तफ़सीर तबरी खंड-१० पृष्ठ-८०)

या आयतीवर विचार चिंतन केल्याने खालील तात्विक बाबी स्पष्ट होतात.'

(१.) धर्म-संदर्भात मूलभूत गोष्ट अल्लाहचे आज्ञापालन होय. अल्लाहला सोडून अन्य एखाद्याच्या आज्ञापालनाचा गंडा आपल्या गळ्यात घालणे त्याला ईश्वर बनविण्याच्या व त्याची उपासना करण्याच्या अर्थासमान आहे.

(२.) विद्वान असोत वा फुक़हा, इमाम असो वा मुफ्ती, पीर असो वा वली, कोणाचेहि हे स्थान नव्हे की त्याच्या आज्ञापालनाने अल्लाहच्या आज्ञापालनाची जागा घ्यावी.

(३.) अल्लाहच्या आदेशास सिद्ध करणारी गोष्ट म्हणजे शरीयतचे प्रमाण होय, विद्वान, फुक़हा व थोर पुरुषांची कथने नव्हेत आणि इस्लामचा मार्ग प्रमाणाचा मार्ग आहे, ''तकलीद'' (अंधानुकरणा)चा मार्ग नव्हे.

(४.) जे लोक अल्लाहच्या शरीयतीच्या विरोधात मानव-जीवना-करीता कायदा घडविण्याचा अधिकार आपल्याच सारख्या माणसांना सोपवितात व शरीअतच्या आदेशांची तमा बाळगत नाही ते त्यांना ईश-पदावर बसवितात.

६२. हजरत मसीह यांना रब्ब (Lord)बनविणारे मूळात

ख्रिश्चन सन्यासी व विद्वान होत, विशेषत: पॉल (Paul)ज्याने हजरत मसीह यांच्या धर्माला जो खऱ्या अर्थाने इस्लाम होता, ख्रिश्चन मतात परिवर्तित केले. हजरत मसीह यांना खुदावन्द (Lord) म्हणण्यात त्याला काहीहि संकोच नाही:

''म्हणून इस्राएलाच्या सर्व घराण्याने हे निश्चयपूर्वक समजून घ्यावे की, ज्या येशूला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले त्याला देवाने प्रभू व ख्रिस्त असे करुन ठेवले आहे.'' (प्रेषितांची कृत्ये २ : ३६)

''ख्रिस्त येशूचा दास पौल ह्याच्याकडून''(रोमकरांस पत्र-१:१)

''तर आपल्या प्रभू येशूला ज्याने मेलेल्यामधून उठविले.'' (रोमकरांस पत्र ४: २५)

६३. हा आदेश आजदेखील तौरात व इंजिलमध्ये विद्यमान आहे :-

''माझ्या खेरीज तुला वेगळे देव नसावेत''.... त्यांच्या पाया पडू नको किंवा त्यांची सेवा करु नको.''

(निर्गम २० :३,५)

हे विधि व नियम तू पाळावे आशी आज्ञा आज तुझा देव परमेश्वर तुला करीत आहे म्हणून ते तू जिवेभावे व काळजीपूर्वक पाळ' (अनुवाद २६ : १६)

''तेव्हा येशू त्याला म्हणाला, अरे सैताना, चालता हो, कारण असा शास्त्र लेख आहे की, परमेश्वर तुझा देव ह्याला नमन कर,व केवळ त्याचीच उपासना कर.'' (मत्तय ४ :१०)

६४. अल्लाहच्या प्रकाशा (नूर) शी अभिप्रेत इस्लाम होय व त्याला संपूर्ण करण्याशी अभिप्रेत इस्लामची पूर्णता होय. अर्थात हे की काफ़ीरांना इस्लामी प्रगती मुळीच पसंत नाही विश्वाच्या क्षितिजावर इस्लामच्या सूर्याला वर येत असलेला पाहून ते मोठ्या बौद्धिक विवंचनेत सापडले आहेत व त्यांना काही सुचेनासे झाले आहे की ह्या प्रकाशाला सर्वत्र पसरविण्यापासून कसे रोखले जावे. याचा काही उपाय जेव्हा त्यांच्या लक्षात येत नाही तेव्हा ते या प्रकाशाला फूंकीने विझविण्याची पोरकट हरकत करुन बसतात परंतु इस्लामचा सूर्य ह्यांच्या फूंकीद्वारे विझायचा राहीला, उलट त्याचे तेज विश्वाच्या कानाकोपऱ्यात पसरेल.

हे काफ़ीर मार्गदर्शनाच्या सूर्याला ना वर येण्यापासून रोखू शकतील व ना इस्लामच्या चंद्राला पौर्णिमेचा चंद्र बनण्यापासून कारण इस्लाम धर्माची पूर्णता अल्लाहचा अटळ निर्णय आहे अर्थात अल्लाहचा निर्णय लागूच पडतो. मग कोणी पसंत करो वा ना करो.

६५. आयतीत मार्गदर्शनाशी अभिप्रेत ते मार्गदर्शन होय जे सत्यधर्माचा मार्ग प्रकाशित करते म्हणजे त्या निशाण्या व प्रमाणे जी इस्लामचे सत्य धर्म असण्याचे सिद्ध करतात व सत्य धर्माशी अभिप्रेत इस्लामची परिपूर्ण उपासना व्यवस्था व परिपूर्ण शरीयत होय ज्याचे क्षेत्र श्रद्धेपासून राजकारणापर्यंत विस्तृत आहे. لِيُظْهِرَهٗ عَلَى الدِّيْنِ كُلِّهٖ

आयत मध्ये युजहिरहचा अर्थ प्रभावित करणे असा आहे. लिसानुल अरब या अरबी शब्दकोशांत आहे:

فَلَانٌ ظَاهِرٌ عَلٰى فُلَانٍ اى غالب عليه

''अमुक व्यक्ति अमुक व्यक्तिवर जाहीर' आहे म्हणजे प्रभावशाली आहे.'' (खंड ४ पृष्ठ ५२६)

क़ुरआनात एका ठिकाणी फर्माविले गेले आहे.

يٰقَوْمِ لَكُمُ الْمُلْكُ الْيَوْمَ ظٰهِرِيْنَ فِى الْاَرْضِ۔ (المؤمن-٢٩)

''हे माझ्या लोकांनो ! आज तुम्हाला सत्ता प्राप्त आहे व देशात तुम्ही प्रभावशाली आहात.'' (अल-मुमिन -२९)

भाष्यांतर्गत आयतीत ज़िहार'शी अभिप्रेत सत्तेचा प्रभाव व सत्ताधारी अधिकार होय. प्रमाणाचा प्रभाव नव्हे कारण हा प्रभाव तर प्रेषिताला आधीपासूनच प्राप्त होता, यास्तव इमाम राज़ी लिहीतात:

**وظهورُ هذا الدين بالحجة مقررٌ معلومٌ فالواجب حمله على الظهور بالغلبة۔** (التفسير الكبير ج١٦ ص ٤٠)

''प्रमाणाद्वारे या धर्माचे उदयास येणे ही एक स्पष्ट वस्तुस्थिती आहे म्हणून हे आवश्यक आहे की ह्यास सत्तेच्या प्रभाव द्वारे उदय असे कल्पिले जावे.''

(अत्तफसीरुल कबीर खं.१६ पृ. ४०)

لِيُظْهِرَهٗ अशासाठी की ह्यास प्रभावित करावे चा कर्ता अल्लाह आहे, प्रेषित नव्हे व यास प्रमाण उपरोक्त आयत होय, يُتِمَّ نُوْرَهٗ ज्यात अल्लाह आपल्या प्रकाशास पूर्ण करील असे फर्माविले गेले आहे म्हणून ज्या प्रकारे प्रकाश पूर्ण करण्याचा कर्ता अल्लाह आहे तदवतच दीन (इस्लाम) ला प्रभावित करण्याचा कर्ता देखील अल्लाहच आहे.

ह्या दोन्ही आयती अंतिम प्रेषिता संबंधी ईश्वरीय योजना जाहीर करतात. पहिल्या आयतीत प्रकाशाला संपूर्ण करण्याची म्हणजे दीन (इस्लाम) ला संपूर्ण करण्याची खबर दिली गेली आहे आणि दुसऱ्या आयतीत दीन प्रभावशाली होण्याची म्हणजे प्रेषिताच्या हातून समस्त धर्मांवर इस्लामच्या प्रभावाची. दीनच्या संपूर्णतेच्या पार्श्वभूमीवर ग्रंथ बाळगणारे लोक होत.म्हणून पहिल्या आयतीत وَلَوْ كَرِهَ الْكٰفِرُوْنَ ''काफीरांना नापसंत असले तरी'' असे फर्माविले आणि धर्म प्रभावाच्या पार्श्वभूमीत ग्रंथ बाळगणाऱ्यांखेरीज अनेकेश्वरवादीहि होते म्हणून या आयतीत وَلَوْ كَرِهَ الْمُشْرِكُوْنَ ''मग अनेकेश्वरवादींना नापसंत

असले तरी''असे फर्माविले ही वस्तुत: या गोष्टीची घोषणा होती की अंतिम प्रेषिताबद्दल ईश्वराने हा निर्णय घेतला आहे की त्याच्या द्वारे इस्लामला अरबच्या समस्त धर्मांवर प्रभावशाली केले जाईल. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जीवनातच हा ईश निर्णय उघडकीस आला व ही योजना अंमलात येऊन पूर्ण झाली. या प्रकारे की संपूर्ण अरब देशात मूर्तिपूजा व अनेकेश्वरवादी धर्मांचे अस्तित्व नावालाहि उरले नाही. आणि यहुदी मतास हद्दपार व्हावे लागले. राहीले ख्रिश्चन-मत तर ती केवळ अरबच्या सीमा-प्रांतात बाकी राहिली अर्थात पराभूत होऊनच आणि इस्लामी राज्याचे खंडणी देणारे बनून.

यावरुन स्पष्ट झाले की ही आयत ईश्वराच्या योजनेचे वर्णन करते,जी त्याने मुख्यत्वे आपल्या प्रेषिता संबंधाने बनविली होती. आणि सर्वसामान्य भाष्यकारांनी हिला याच अर्थाने घेतले आहे. परंतु काही भाष्यकारांनी धर्मांच्या राजकी प्रभावाला प्रेषिताचे मिशन ठरवून इस्लामी-पद्धतिच्या प्रभावाच्या प्रयत्नाकरिता या आयतीस प्रमाण ठरवले आहे जी अगदी औपचारिक गोष्ट आहे कारण यात प्रेषिताचे मिशन वर्णिले गेले नाही, किंबहुना ईश्वराच्या निर्णयाची घोषणा केली गेली आहे.

राहिला हा प्रश्न की मग प्रेषिताचे मिशन काय होते आणि धर्माचा राजकीय प्रभाव अपेक्षित आहे किंवा नाही? तर जेथपावेतो रसूलच्या मिशनचा प्रश्न आहे तो केवळ एकाद्या आयतीत नव्हे किंबहुना शेकडो आयतीत वर्णिला गेला आहे. याकरीता मक्की आयतींकडे रुजू केले पाहिजे कारण प्रत्येक प्रेषित आंरभातच आपल्या मिशनचे वर्णन करतो.राहिला धर्माचा राजकीय प्रभाव तर तो निश्चितच अपेक्षित आहे.आणि जेहाद याच हेतुसाठी आवश्यक ठरविले आहे ज्याचे स्पष्टीकरण या सूरहच्या भाष्यात देखील आम्ही केले आहे आणि सूरह अनफालच्या भाष्यातहि. परंतु याचा संबंध इस्लामी आवाहनविषयक प्रयत्नांच्या विशेष अवस्थेशी आहे म्हणून हयास पैगंबराचे मिशन ठरविणे उचित नव्हे.

**हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! ग्रंथ बाळगणाऱ्या विद्वान व संन्याशांमध्ये बहुतेक लोक असे आहेत जे लोकांचा माल अवैध रीतीने खातात आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखतात आणि जे लोक सोन्या-चांदीला खजिना बनवून ठेवतात व त्यास अल्लाहच्या मार्गात खर्च करीत नाही, त्यांना दुःखदायक शिक्षेची खुशखबरी द्या. (अल-क़ुरआन)**

३४. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! ग्रंथ बाळगणाऱ्या विद्वान व संन्याशांमध्ये बहुतेक लोक असे आहेत जे लोकांचा माल अवैध रीतीने खातात [६६] आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखतात [६७] आणि जे लोक सोन्या-चांदीला खजिना बनवून ठेवतात व त्यास अल्लाहच्या मार्गात खर्च करीत नाही, त्यांना दुःखदायक शिक्षेची खुशखबरी द्या.[६८]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا إِنَّ كَثِيرًا مِّنَ الْأَحْبَارِ وَالرُّهْبَانِ
لَيَأْكُلُونَ أَمْوَالَ النَّاسِ بِالْبَاطِلِ وَيَصُدُّونَ عَن
سَبِيلِ اللَّهِ ۗ وَالَّذِينَ يَكْنِزُونَ الذَّهَبَ وَالْفِضَّةَ وَلَا
يُنفِقُونَهَا فِي سَبِيلِ اللَّهِ فَبَشِّرْهُم بِعَذَابٍ أَلِيمٍ ﴿٣٤﴾

३५. ज्या दिवशी जहन्नमच्या आगीत हे (सोने-चांदी) तापविले जाईल व त्याने त्यांचे कपाळ, बाजू व पाठीना डागले जाईल [६९] हाच तो खजिना जो तुम्ही आपल्यासाठी जमा केला होता. तेव्हा चाखा आता खजिना जमविण्याची गोडी.

يَوْمَ يُحْمَىٰ عَلَيْهَا فِي نَارِ جَهَنَّمَ فَتُكْوَىٰ بِهَا جِبَاهُهُمْ
وَجُنُوبُهُمْ وَظُهُورُهُمْ ۖ هَٰذَا مَا كَنَزْتُمْ لِأَنفُسِكُمْ فَذُوقُوا
مَا كُنتُمْ تَكْنِزُونَ ﴿٣٥﴾

३६. महिन्यांची खरी संख्या अल्लाहजवळ बारा आहे जी अल्लाहच्या ग्रंथात, ज्या दिवशी त्याने आकाशाना व जमीनीला निर्माण केले, लिहीलेली आहे. [७०] ज्यात चार महीने आदरणीय आहेत [७१] हाच सरळ दीन (धर्म) होय [७२] यास्तव या चार महिन्यात स्वतःवर अत्याचार करु नका [७३] आणि अनेकेश्वरवाद्यांशी सर्वजण मिळून लढा, ज्याप्रकारे ते सर्वजण मिळून तुमच्याशी लढतात आणि जाणून असा की अल्लाह त्या लोकांच्या सोबतीला आहे जे ईश-भय अंगिकारतात.

إِنَّ عِدَّةَ الشُّهُورِ عِندَ اللَّهِ اثْنَا عَشَرَ شَهْرًا فِي
كِتَابِ اللَّهِ يَوْمَ خَلَقَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ مِنْهَا
أَرْبَعَةٌ حُرُمٌ ۚ ذَٰلِكَ الدِّينُ الْقَيِّمُ ۚ فَلَا تَظْلِمُوا
فِيهِنَّ أَنفُسَكُمْ ۚ وَقَاتِلُوا الْمُشْرِكِينَ كَافَّةً كَمَا
يُقَاتِلُونَكُمْ كَافَّةً ۚ وَاعْلَمُوا أَنَّ اللَّهَ مَعَ الْمُتَّقِينَ ﴿٣٦﴾

३७. महिन्यास त्याच्या स्थानापासून मागे हटविणे ही कुफ्रनितीत आणखी भर होय. ज्या द्वारे काफ़िरांना मार्गभ्रष्ट केले जाते. एखाद्या वर्षी त्या (महिन्यास) हलाल ठरवितात तर एखाद्या वर्षी हराम, अशासाठी की अल्लाहने हराम केलेल्या महिन्यांची संख्या पूर्ण करावी आणि या सोबतच अल्लाहने हराम ठरविलेल्या महिन्यांना हलाल ठरवावे [७४] त्यांची दुष्कृत्ये त्यांच्या नजरेत शोभिवंत बनविली गेली आहेत आणि अल्लाह काफिरांना मार्ग दाखवित नाही.

إِنَّمَا النَّسِيءُ زِيَادَةٌ فِي الْكُفْرِ ۖ يُضَلُّ بِهِ الَّذِينَ كَفَرُوا
يُحِلُّونَهُ عَامًا وَيُحَرِّمُونَهُ عَامًا لِّيُوَاطِئُوا عِدَّةَ مَا حَرَّمَ
اللَّهُ فَيُحِلُّوا مَا حَرَّمَ اللَّهُ ۚ زُيِّنَ لَهُمْ سُوءُ أَعْمَالِهِمْ ۗ وَاللَّهُ
لَا يَهْدِي الْقَوْمَ الْكَافِرِينَ ﴿٣٧﴾

६६. ग्रंथ बाळगणाऱ्या विद्वान व संन्याशांची ही दशा होती की ते मोठ्या चातुर्याने धार्मिकते आड अर्थोपार्जना करु लागत. त्यांच्या या दशेचा उल्लेख क़ुरआनाने ईमान बाळगणाऱ्यांना संबोधून केला आहे. यासाठी की ईमान बाळगणाऱ्यांनी यापासून बोध घ्यावा. मात्र अत्यंत खेदाची बाब अशी की ही तंबी दिल्यानंतरहि मुसलमानांमध्ये कित्येक विद्वान, मौलवी मुल्ला, इमाम व पीर असे आहेत ज्यांनी धर्माच्या नावाने आपल्या धंद्याचा चांगला जम बसवला आहे. ते उलट सुलट स्पष्टीकरण करुन धर्माच्या नावाने मार्गभ्रष्ट करणाऱ्या गोष्टी लोकांपुढे मांडतात.''पीरी-मुरीदी''च्या चक्रव्युहात त्यांनी लोकांना घेरले आहे.अशासाठी की त्यांच्याकडून मोठमोठे नजराणे प्राप्त करीत रहावे. तसेच बुजुर्गांच्या नावाने नजराणा व नियाज़चे ढोंग रचून ठेवले आहे ज्यायोगे त्यांच्या मिष्टान्नाची व सुग्रास भोजनाची सामुग्री होत रहावी. तसेच त्यांनी तावीज-गंडे निर्माण करून ठेवले आहेत यासाठी ती त्यांचा कारभार सतत चालावा. ते बिदआत (नवनवीन प्रथा) व अज्ञान पूर्ण प्रथांना उन्नति देत राहतात. अशासाठी की प्रत्येक बैठकीत त्यांची गरज भासावी व त्यांचा कार्यभाग साधावा. त्यांना शिर्कचे पालकत्व कबूल करण्यातहि संकोच नाही. दरगा स्थानांच्या मुजावरीस मूळ प्रेरक 'चिराग़ी' व 'चढावे' आहेत. ज्यामुळे त्यांचे खिसे गरम होत राहतात. या समस्त बिदआत व अनिष्ट प्रथांच्या तळाशी जी गोष्ट दिसून येते ती म्हणजे उपजिविका होय आखिरतचे प्रतिफळ नव्हे.

निष्कर्ष हा की हराम खाद्यामुळे त्यांची सर्व धार्मिकता निव्वळ एक ढोंग बनून राहीली आहे.

६७. म्हणजे त्या विद्वानांची व संन्यासींची दशा मोठी विचित्र आहे. त्यांना खऱ्या ईश-भक्तिचे जीवन पसंत नाही, म्हणून ते सत्य धर्माचे विरोधक झाले आहेत आणि लोकांना इस्लाम कबूल करण्यापासून रोखत आहेत.

तात्पर्य हराम माल खाल्ल्याने माणसाचा स्वभाव असा होतो की त्यांच्या अंगी सत्य-प्रियतेचा लवलेशहि राहात नाही मग तो सत्याचा विरोध करु लागतो.

६८. मूळ ग्रंथात ''यकनिज़ून'' हा शब्द प्रयोग झाला आहे. जो कन्ज पासून बनला आहे आणि अरबी शब्द कोशात 'कन्जा'चा अर्थ केवळ जमा करणे असा नव्हे किंबहुना खजिना करुन ठेवणे असा आहे.

تسمعى العرب كلَّ كثيرٍ مجموعٍ تنافس فيه كنزاً۔

(لسان العرب ج۵ ص۴۰۱)

''असा प्रत्येक प्रकारचा माल जो विपुल प्रमाणात जमा केला गेला असावा व ज्यामुळे परस्पर लाभ निर्माण होत असावा अशा मालास अरब 'कन्ज' (खज़िना) म्हणतात.''

(लिसानुल अरब ख. ५ पा. ४०१)

आणि इमाम राग़िब लिहितात:

وَالَّذِيْنَ يَكْنِزُوْنَ الذَّهَبَ وَالْفِضَّةَ اى يَدَّخِرُوْنها

(المفردات ص۴۵۸)

''जे लोक सोने व चांदीला ''कन्ज''(ख़ज़िना) करुन ठेवतात म्हणजे साठा करुन ठेवतात.''(अल-मुफरदात पा. ४५८)

आणि पवित्र क़ुरआनात एके ठिकाणी फर्माविले गेले आहे: لَوْلَآ اُنْزِلَ عَلَيْهِ كنزٌ۔ (هود:۱۲)

''याच्यांवर एखादा 'कन्ज़' (खज़िना) का नाही उतरविला गेला?'' (सूरह हूद-१२)

स्पष्ट आहे की येथे देखील 'कन्ज'शी अभिप्रेत खज़िना (साठा) होय, मालमत्तेचे मर्यादित प्रमाण नव्हे यास्तव भाष्यांतर्गत आयतीत अज़ाब (ईश-प्रकोपा)ची जी तंबी केली गेली आहे, ती अशा लोकांकरीता आहे जे अतिरिक्त धनसम्पत्ति मोठ्या प्रमाणात साठवून ठेवतात आणि ज्या उद्देश्याप्रत खर्च करणे आवश्यक आहे त्यावर खर्च करीत नाही. सर्वश्रेष्ठ अल्लाह धनसम्पत्ति यासाठी प्रदान करीत नाही की माणसाने त्यावर साप बनून बसावे व त्या धनास अभिमान व गर्वाचे आणि प्रदर्शनाचे साधन बनवावे, किंबहुना एवढ्यासाठी प्रदान करतो की धनसम्पत्तिचा उचित वापर केला जावा. माणूस सम्पत्तिचा मालक नव्हे, किंबहुना विश्वस्त आहे म्हणून त्यावर ही जबाबदारी येते की त्याने आपल्या पालनकर्त्याने दर्शविलेल्या रीतीनुसार धनसम्पत्तिचा वापर करावा व त्याच्या मार्गात खर्च करावा. जो मनुष्य सम्पत्तिचा अशा रीतीने वापर करीत नाही व साठवून ठेवतो तो मोठ्या प्रमाणात इतरांचा हक्क मारतो. अर्थात याची शिक्षा अल्लाहजवळ मोठी भयंकर आहे.

याने त्या विचाराचे खंडन होते की इस्लाममध्ये ज़कात अदा केल्यानंतर सम्पत्तिचा साठा करण्याबाबत कसलेहि बंधन नाही या दृष्टीकोनानुसार भाष्यांतर्गत आयतीचे स्पष्टीकरण असे केले जाते की ही तंबी त्या लोकांना केली गेली आहे जे ज़कात अदा करीत नाही, वस्तुतः भाष्यांतर्गत आयतीत हे म्हटले गेले नाही की ते ज़कात अदा करीत नाही, किंबहुना असे फर्माविले गेले आहे की ते सोने चांदीचा साठा करुन ठेवतात व अल्लाहच्या मार्गात खर्च करीत नाही म्हणजे येथे गोष्ट खर्च करण्याविषयी सांगितली गेली आहे जिचा संबंध आवश्यकता व परिस्थितीशी आहे. जेव्हा ज़कात सम्पत्तिचा एक निर्धारीत हिस्सा आहे जो कोणत्याहि परिस्थितीत अदा

करणे आवश्यक ठरते आणि इस्लामचा सर्वसामान्य नियम हाच आहे की ज़कात अदा केल्यानंतर माल (सम्पत्ति) स्वच्छ शुद्ध होते परंतु याचा हा अर्थ नव्हे की इस्लामच्या कर्तव्यबद्ध गोष्टीची (वाजीबातची) यादी पूर्ण झाली, किंबहुना आवश्यकता व परिस्थितीच्या अनुषंगाने सम्पत्तिवर हक्क क़ायम होतात व तदनुसार खर्च करणे सम्पत्ति बाळगणाऱ्या करिता आवश्यक ठरते. उदाहरणार्थ, जर अवर्षणाने किंवा एखाद्या दुर्घटनेमुळे लोक उपाशी मरत असावेत तेव्हा एखादा मनुष्य हे सांगून त्यांना जेऊ घालण्याच्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही की मी आधीच ज़कात अदा केली आहे. अथवा एखाद्या माणसाचे आई-वडील गरीब-दरिद्री असावेत तर अशा स्थितीत त्यांच्या पोषणाची जबाबदारी अनिवार्य पणे त्यच्यावर येईल. मग तो ज़कात अदा करीत असला तरी. तद्वतच जिहाद करीता ज़कातच्या व्यतिरिक्त देखील खर्च करावा लागेल.

येथे जो आदेश दिला गेला आहे तो म्हणजे सोन्या-चांदीचा साठा न करण्याविषयीचा व त्यास अल्लाहच्या मार्गात खर्च करणयाविषयीचा आहे. सोने चांदीच्या आदेशात प्रत्येक प्रकारचे चलन (Currency) बँक बॅलन्स व बाँड या सारख्या बाबी सामील आहेत. आणि अल्लाहच्या मार्गात खर्च करण्याच्या अर्थात धर्माचा प्रसार व आवाहन, जिहाद, इस्लामी शिक्षण, मसजिदी व मदरसे यांची उभारणी, गोरगरीबांची मदत आणि यासारखे अन्य विधायक कामे सामील आहेत. पवित्र क़ुरआन लोकांना या गोष्टीची अनुज्ञा देत नाही की त्यांनी आपल्या तिजोऱ्या भरगच्च भराव्या, किंबहुना क़ुरआन या गोष्टीवर भर देते की अतिरिक्त सम्पत्ति मंगल-कार्यासाठी खर्च केली जावी. क़ुरआन धनपूजा, कृपणता व लोभ या गोष्टी विनाशास कारणीभूत ठरवितो. या विनाशाचे उदाहरण म्हणून कारुन चे उदाहरण प्रस्तुत करतो. जो त्या काळातील सर्वात मोठा धनवान व सर्वात मोठा धनभक्त होता.

मनुष्य जर आपल्या सम्पत्तिची योग्य गरजांकरिता बचत करतो किंवा कारभार व व्यापारात गुंतवणूक करतो अथवा आपल्या मुलाबाळांकरीता व नातेवाईकांकरिता वारसा सोडतो तर यापैकी कोणतीहि गोष्ट आक्षेपार्ह नाही, मात्र या अटीवर की तो ज़कात आदेशाचे पूरेपूर पालन करीत असावा तथापि ह्याचा अर्थ हा नव्हे की माणसाने धन साठविण्यास आपले जीवन-ध्येय बनवावे आणि आपल्या संततीसहि कोट्याधीश बनवावे.

सम्पत्तिला अशा प्रकारे रोखून धरणे व तिचा संचय करणे इस्लामच्या दृष्टीने अत्यंत आक्षेपार्ह बाब होय. अशा प्रकारे आपली तिजोरी भरणाऱ्यांना क़ुरआन दु:खदायक शिक्षेची खबर देते की त्यांना आपल्या खजिन्यांना पाहून जो आनंद झाला आहे तो लवकरच शिक्षेच्या आनंदात परिवर्तित होणार आहे.

हज़रत अली यांनी आपल्या काळातील परिस्थितीनुसार चार हज़ार दिरहम (सुमारे बारा हजार ग्रॅम चांदी) पेक्षा अधिक सम्पत्तिला ''कन्ज'' (खजिन्या) च्या अर्थाने घेतले होते. इब्ने जरीर तबरी यांनी त्यांच्या या कथनाचा उल्लेख केला आहे.

चार हजार दिरहम किंवा त्याहून कमी प्रमाण तर 'नफ़क़ा' (आवश्यक खर्चाकरिता बचत केलेली सम्पत्ति) आहे,जर याहून अधिक असेल तर तो ''कन्ज़''(खजिना) होय. (तफसीर तबरी खंड-१०,पृष्ठ-८३)

ही मर्यादा नेहमीकरिता बाब नव्हती, किंबहुना आयतीचा उद्देश्य पूर्ण करण्याकरिता परिस्थिती लागू करण्याचे एक स्वरुप होते.

आणि हजरत उस्मान यांच्या ख़िलाफत- काळात जेव्हा सम्पत्तिची रेल-चेल झाली व लोकांचे लक्षय धन एकत्रित करण्याकडे वळले तेव्हा हजरत अबुज़र यांनी सक्त पकड घेतली व स्पष्टपणे म्हटले:

هٰولاءيَجْمَعُونَ الدنيا ولا يعقلون شيئاً۔

(صحيح مسلم كتاب الزكوٰة)

''हे लोक दुनिया जमा करीत आहे, अन्य कोणतीहि गोष्ट समजून घेत नाही.''

(सहीह मुस्लिम, किताबुज़-ज़कात)

आणि या संदर्भात अमीर मआवियाशी त्यांचा मोठा मतभेद झाला. अमीर मआवीयांना हे मान्य होते की ही आयत ग्रंथ बाळगणाऱ्यां विषयी अवतरली आहे. हजरत अबुजर यांचे असे म्हणणे होते की आयतीचा आदेश सर्वांकरीता आहे ग्रंथ बाळगणारे व मुसलमान दोघांशीहि संबंधित आहे. (बुखारी किताबुज़-ज़कात)

हज़रत अबुजर यांचे हे कथन मूलत: अगदी योग्य आहे कारण आयतीत सम्पत्तिचे खजिने जमा करण्यावर जी शिक्षा ऐकविली गेली आहे तिला ग्रंथ बाळगणाऱ्यांशी खास ठरविण्याचे कोणतेहि कारण नाही तथापि हजरत अबूजर यांच्याशी इतर सहाबाचा मतभेद असण्याचे कारण शक्यतो हे असावे की हजरत अबूजर यांनी सम्पत्तिला खजिना हा अर्थ लागू करण्यात तीव्रता अंगिकारली असावी. आणि खऱ्या गरजांकरिता बचत केलेल्या सम्पत्तिलाहि कन्जचा नियम लावला असावा.

आज इस्लामचा प्रसार, आवाहनाचा प्रयत्न आणि धार्मिक शिक्षणासरखे अत्यंत महत्वपूर्ण कार्ये आर्थिक साधनांच्या कमतरतेमुळे किती हानि-ग्रस्त होत आहेत? दंगा-ग्रस्तांच्या पुनर्वसनाची समस्या किती भयंकर रुप धारण करीत आहे.

समाजातील एक वर्ग असाहि आहे ज्याला आश्रय घेण्याकरितहि जागा लाभत नाही आणि कित्येक लोक आपल्या मुलाबाळांसह रस्त्यावरच संसार थाटतात. काय अशा स्थितीत धनाढ्यांना आपल्या तिजोऱ्या गच्च भरण्याची व आपल्या संततीस करोडपती बनविण्याकरिता सम्पत्ति साठवून ठेवण्याची परवानगी दिली जाऊ शकते? या प्रश्नाचे उत्तर फ़िक़्ही (कायदेशास्त्रीय) विवाद करण्याऐवजी सूरह तौबाच्या या आयतीलाच विचारले पाहिजे.

६९. या अवयवांना डागण्याचे कारण असे की सम्पत्तिचा गर्व मस्तिष्कात असतो ज्याची चिन्हे कपाळावर जाहीर होतात तसेच बाजू व पाठ असे अवयव आहेत ज्यांना सम्पत्तिच्या विपुलतेमुळे सुखविलासाचे वैभव लाभते.

७०. म्हणजे अल्लाहने ज्या वेळी आकाश व जमीन निर्माण केले त्याच वेळी भूवासीयांकरीता चंद्राला नैसर्गिक कालगणने'(Natural Calander)चे स्वरुप दिले. यास्तव त्याचे घटणे व वाढणे सर्वसामान्य अवलोकनातील बाब आहे. आणि या लक्षणांना पाहून तारखा निर्धारीत करणे सोपे जाते आणि हेहि ज्ञात होते की महिन्याचा आरंभ केव्हा झाला व शेवट केव्हा झाला, मग या सृष्टीच्या निर्मात्याने माणसाकरीता वर्षाच्या गणनेची जी व्यवस्था आधीपासूनच निर्धारीत केली आहे ती बारा चांद्र महिन्याची आहे. अर्थात हे मार्गदर्शन ईश-आदेशान्वये मनुष्याला प्राप्त होत राहिले. आणि जेथपावेतो अरब लोकांचा संबंध आहे, हज़रत इबराहीम यांच्या काळापासून चांद्र वर्ष (Luner Year)प्रचलीत राहीले होते व महिन्यांची अरबी नावे अशी होती:-

(१) मुहर्रम (२) सफर (३) रबीउल अव्वल (४) रबीउल आखिर (५) जुमादल् ऊला (६) जुमादल् आखिर (७) रजब (८) शअबान (९) रमज़ान (१०) शव्वाल (११) जुलकअदा (१२) जुलहिज्जा.

आज देखील इस्लामी जगतात चांद्र-वर्ष प्रचलीत आहे आणि महिन्यांचीहि हीच नावे प्रचलीत आहेत.

क़ुरआन-अवतरण काळात अरबांच्या येथे हेच चांद्रवर्ष प्रचलीत होते परंतु विशिष्ट हितांना लक्षात घेऊन ते महिन्यांच्या क्रमात उलटफेर करीत ज्याचे विवरण पुढे येत आहे.

७१. आदरणीय महिन्यांच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. २६९

७२. म्हणजे महिना व वर्षाबाबत ईश्वरातर्फे शरअी (धर्मशास्त्रीय) व्यवस्था हीच आहे जी अगदी योग्य व दुरुस्त आहे. यास्तव समस्त धार्मिक कामे उदाहरणार्थ हज्ज अदा करणे रोजा पाळणे, ज़कात देणे आणि इद्दत वगैरेकरीता चांद्रवर्षाचाच विश्वास केला गेला पाहिजे.

७३. म्हणजे आदरणीय महिन्यांमध्ये युद्ध करुन गुन्हेगार होऊ नका.

स्पष्ट असावे की आदरणीय महिन्यांमध्ये युद्ध छेडण्यास मनाईचा आदेश सर्वकालीन आहे आणि हा विचार योग्य नव्हे की हा आदेश रद्द झाला कारण हा आदेश यापूर्वी अनेक सूरतीत आला आहे आणि सूरह ''बराअत'' तर शेवटच्या काळातील अवतरण होय. तसेच क़ुरआनाची कोणतीहि आयत अशी नाही की जिने या आदेशास रद्द केले असावे.

७४. अरब लोकांजवळ जंत्री तर चांद्रवर्षाचीच प्रचलीत होती. परंतु आपल्या योद्धिक गरजेपोटी ते महिन्यांच्या क्रमात फेरफार करीत. उदाहरणार्थ मुहर्रमचा महिना आदरणीय महिना होता ज्यात युद्धास मनाई होती. परंतु जेव्हा ते या महिन्यात एखाद्या कबिल्याविरुद्ध युद्ध छेडू इच्छित तेव्हा मुहर्रमला मागे करुन सफरच्या जागी ठेवत व सफरला पुढे करुन मुहर्रमच्या जागी आणीत. त्यांची ही हरकत अशीच होती जसे कोणी रात्रीला दिवस व दिवसाला रात्र मानून चालावे. उघड आहे अशाने वस्तुस्थिती तर बदलायची राहिली, तथापि मनुष्य नैसर्गिक प्रणाली पासून तोंड फिरवून आपल्या बंडखोर विचारसरणीचा पुरावा अवश्य देतो.

अज्ञान काळातील अरब, आदरणीय महिन्यांना आपल्या जागेवरुन हटवून नैसर्गिक व्यवस्थेत अडथळा आणीत होते म्हणून यास ''कुफ्रमध्ये वृद्धि'' या अर्थाने घेतले गेले आहे. 'नसी' याचा अर्थ मागे करण्याचा आहे. ही परिभाषा या अर्थाने वापरली गेली आहे.

'इस्लाम'ने नसी'च्या कायद्यास खोटे ठरविले व नैसर्गिक व्यवस्थेस आपल्या मूळ स्वरुपात कायम केले यास्तव शेवटच्या हज्ज प्रसंगी (हि. स. १० मध्ये) पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले:

اِنَّ الزَّمَانَ قَدِاسْتَدَارَ كهيْئَةِ يَوْمَ خَلَقَ اللّٰهُ السَّمٰوَاتِ وَالْاَرْضَ ،
اَلسَّنَةُ اِثْنَا عَشَرَ شَهْرًا مِنْهَا اَرْبَعَةٌ حُرُمٌ ، ثَلَاثٌ مُتَوالِيَاتٌ ذو القعدةِ
وَذُوالحِجَّةِ وَالْمُحَرَّمُ وَرَجَبُ مُضَرَ الَّذِىْ بَيْنَ جُمَادى و شَعْبَان۔
(البخاری کتاب التفسیر)

''काळ फेरा घेऊन आपल्या त्या दिवसाच्या स्थितीवर आला ज्या दिवशी अल्लाहने आकाशांना व जमीनीला निर्माण केले होते. वर्ष बारा महिन्यांचे आहे ज्यात चार महीने आदरणीय आहेत, तीन निरंतर आहेत, जुलकअदा, जुलहिज्जा व मुहर्रम आणि चौथा रजब मुजर (म्हणजे मुजर कबीला जो रज्जबला आपल्या स्थानापासून हटवित नव्हता) जो जुमादै व शाबान यांच्या दरम्यान आहे.'' (बुखारी किताबुत्तफसीर)

म्हणजे प्रत्येक महिना आपल्या मूळ स्थानावर आला आहे. हलाल महीना हलाल महिन्याच्या जागी आहे व हराम महिना हराम महिन्याच्या जागी. त्या वेळेपासून महिन्यांचा हा क्रम ठीक आपल्या स्थितीवर क़ायम चालत आला आहे.

काहीनी 'नसी'ला अधिक मास या अर्थाने घेतले आहे. म्हणे त्यांच्या दृष्टीने याची स्थिती ही होती की चांद्र व सौर्य वर्ष यांच्या दरम्यान ११ दिवसांचा जो फरक आहे तो नाहीसा करण्याकरीता दर तीन वर्षांनी एक चांद्रमासाची वाढ केली जात असे. परंतु कारणामुळे या गोष्टीशी सहमत होता येणार नाही.

प्रथमत: नसी' चा अर्थ मागे टाकणे असा आहे वृद्धि करणे असा नव्हे. त्याला अधिकमास या अर्थाने घेणे योग्य नव्हे दुसरे असे की जर अरब देशात अधिक मासाची प्रथा असती तर क़ुरआनने हे म्हटले नसते की 'यासाठी की अल्लाहने हराम केलेल्या महिन्यांची संख्या पूर्ण करावी' क़ुरआनच्या या निवेदनावरुन स्पष्ट होते की आदरणीय महिन्यांना जेव्हा ते त्यांच्या स्थानावरुन हटवित तेव्हा त्याच्या भरपाईकरीता हलाल महिन्यांना हराम ठरवित. अशा प्रकारे हराम महिन्यांची संख्या जी चार होती पूर्ण करीत. या स्थितीचा अधिक मासशी काय संबंध?

तिसरे हे की जर हे मानले गेले की अरब देशात अधिक मासाचा कायदा प्रचलीत होता तर याचा अर्थ असा होईल की कोणताहि चांद्रमास आपल्या स्थानावर नव्हता, किंबहुना सगळ्या हिशोबाचाच घोटाळा झाला होता. मग क़ुरआनने आदरणीय महिन्यांमध्ये युद्ध छेडण्याची जी मनाई मुसलमानांना केली होती व हा ताकीदीचा आदेश हिजरतच्या थोड्याच दिवसानंतर दिला गेला होता तर ते कोणते हराम महीने होते, जेव्हा अधिक मासामुळे कोणताहि हराम महीना आपल्या स्थानावर क़ायम राहिला नसेल, म्हणजे रजब ना खऱ्या अर्थाने रजब राहिला असेल व ना जिलहिज्जा राहिला असेल आणखी तर आणखी रमजानच्या बाबतीत हा प्रश्न निर्माण होईल की काय तो खरोखर रमजानच्या महिना होता, ज्यात रोजे फर्ज (बंधनकारक) होते व ज्यात बद्र युद्ध लढले गेले व ज्यात क़ुरआन अवतरणाचा आरंभ झाला होता. हे सर्व प्रश्न अधिक मासाचे वर्ष मान्य केल्याने निर्माण होतात. परंतु क़ुरआनाचे निवेदन या समस्त गोष्टींचे खंडन करण्यास पुरेसे आहे.

काही भाष्यकारांनी हज़रत अबु बकर यांच्या हज्जविषयी (हि.स.९मध्ये) असे लिहीले आहे की तो खऱ्या अर्थाने जिकअदा चा महिना होता, परंतु क़ुरआनच्या निवेदनाने याचे खंडन होते कारण क़ुरआनने यास मोठ्या हज्जचा दिवस म्हटले आहे, जसे या सूरहच्या आयत क्र.३मध्ये याचा उल्लेख आला आहे आणि इब्ने कसीर यांनी याच आयतीने युक्तिवाद करत या विचाराचे खंडन केले आहे. (पहा तफसीर इब्ने कसीर खंड २,पृष्ठ-३५७)

**हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! तुम्हाला काय झाले आहे की जेव्हा तुम्हाला सांगितले गेले की अल्लाहच्या मार्गात निघा, तेव्हा तुम्ही जमीनीशी बिलगून राहिलात? काय तुम्ही आखिरतच्या तुलनेने इह-लोकीय जीवनास पसंत केले? इहलोकीय जीवनाची सामुग्री तर आखिरतच्या तुलनेने फार थोडीशी आहे.(अल-क़ुरआन)**

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا مَا لَكُمْ إِذَا قِيلَ لَكُمُ
انفِرُوا فِي سَبِيلِ اللَّهِ اثَّاقَلْتُمْ إِلَى الْأَرْضِ ۚ أَرَضِيتُم
بِالْحَيَاةِ الدُّنْيَا مِنَ الْآخِرَةِ ۚ فَمَا مَتَاعُ الْحَيَاةِ الدُّنْيَا
فِي الْآخِرَةِ إِلَّا قَلِيلٌ ﴿٣٨﴾

३८. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! तुम्हाला काय झाले आहे की जेव्हा तुम्हाला सांगितले गेले की अल्लाहच्या मार्गात निघा, तेव्हा तुम्ही जमीनीशी बिलगून राहिलात? [७५] काय तुम्ही आखिरतच्या तुलनेने इह-लोकीय जीवनास पसंत केले ? [७६] इहलोकीय जीवनाची सामुग्री तर आखिरतच्या तुलनेने फार थोडीशी आहे.

إِلَّا تَنفِرُوا يُعَذِّبْكُمْ عَذَابًا أَلِيمًا وَيَسْتَبْدِلْ قَوْمًا غَيْرَكُمْ
وَلَا تَضُرُّوهُ شَيْئًا ۗ وَاللَّهُ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ ﴿٣٩﴾

३९. जर तुम्ही जिहादकरिता न निघालात तर तो तुम्हाला दुःखदायक शिक्षा देईल [७७] आणि तुमच्या जागी अन्य एखाद्या समूहास आणून उभे करील [७८]आणि तुम्ही अल्लाहचे काहीहि बिघडवू शकणार नाहीत [७९] अल्लाह प्रत्येक गोष्टीस समर्थ आहे.

إِلَّا تَنصُرُوهُ فَقَدْ نَصَرَهُ اللَّهُ إِذْ أَخْرَجَهُ الَّذِينَ كَفَرُوا
ثَانِيَ اثْنَيْنِ إِذْ هُمَا فِي الْغَارِ إِذْ يَقُولُ لِصَاحِبِهِ
لَا تَحْزَنْ إِنَّ اللَّهَ مَعَنَا ۖ فَأَنزَلَ اللَّهُ سَكِينَتَهُ عَلَيْهِ
وَأَيَّدَهُ بِجُنُودٍ لَّمْ تَرَوْهَا وَجَعَلَ كَلِمَةَ الَّذِينَ كَفَرُوا
السُّفْلَىٰ ۗ وَكَلِمَةُ اللَّهِ هِيَ الْعُلْيَا ۗ وَاللَّهُ عَزِيزٌ حَكِيمٌ ﴿٤٠﴾

४०. जर तुम्ही त्याची मदत न कराल तर [८०] (काही पर्वा नाही) अल्लाहने त्याची मदत अशा वेळी केली आहे जेव्हा काफ़िरांनी त्याला घालवून दिले होते [८१] आणि तो दोघांमधील दुसरा होता, जेव्हा ते दोघे गुहेत होते. जेव्हा तो आपल्या साथीदाराशी म्हणत होता की खेद करु नकोस, अल्लाह आमच्या सोबत आहे. त्यावेळी अल्लाहने त्याच्यावर शांती अवतरीत केली [८२] व अशा सैन्यांनी त्याची मदत केली जी तुमच्या दृष्टीस पडली नाहीत.[८३] आणि काफ़िरांचा बोल खाली पाडला आणि अल्लाहचा बोल उंच राहिला अल्लाह प्रभावशाली व हिकमत बाळगणारा आहे.[८४]

انفِرُوا خِفَافًا وَثِقَالًا وَجَاهِدُوا بِأَمْوَالِكُمْ وَأَنفُسِكُمْ
فِي سَبِيلِ اللَّهِ ۚ ذَٰلِكُمْ خَيْرٌ لَّكُمْ إِن كُنتُمْ تَعْلَمُونَ ﴿٤١﴾

४१. कूच करा. मग हलके असा किंवा भारदस्त [८५] आणि अल्लाहच्या मार्गात आपल्या माल व प्राणासह जिहाद करा. हे तुमच्या हक्कात अधिक चांगले आहे जर तुम्ही जाणाल.[८६]

لَوْ كَانَ عَرَضًا قَرِيبًا وَسَفَرًا قَاصِدًا لَّاتَّبَعُوكَ
وَلَٰكِن بَعُدَتْ عَلَيْهِمُ الشُّقَّةُ ۚ وَسَيَحْلِفُونَ بِاللَّهِ
لَوِ اسْتَطَعْنَا لَخَرَجْنَا مَعَكُمْ يُهْلِكُونَ أَنفُسَهُمْ
وَاللَّهُ يَعْلَمُ إِنَّهُمْ لَكَاذِبُونَ ﴿٤٢﴾

४२. जर लाभ ताबडतोब होणारा असता व प्रवासहि सोयीस्कर असता तर हे खचितच तुमच्या मागे आले असते परंतु त्यांना हे अंतर मोठे लांब वाटले [८७] आता हे शपथपूर्वक सांगतील की जर आम्हाला शक्य असते तर आम्ही अवश्य तुमच्या सोबत निघालो असतो. ते स्वतःला विनाशग्रस्त करीत आहेत [८८] आणि अल्लाह जाणून आहे की हे अगदी खोटारडे आहेत.

७५. संकेत तबुक युद्धाकडे आहे. हे युद्ध रजब ९ हिजरी (इ.स. ६३०) मध्ये झाले. मक्का-विजयानंतर इस्लाम एक सामर्थ्य बनले होते व मोठ्या वेगाने अरब देशात पसरत जात होते. त्यावेळी जगातील सर्वात शक्तिशाली राज्य रोम-साम्राज्य होते, ज्याची हद्द सीरीया देशापर्यंत विस्तृत होती. सीरीया देशात गस्सान खानदान जे ख्रिश्चन खानदान होते. रोमन शासकांच्या प्रभावाखाली राज्य करीत होते.रोम-सम्राटाने इस्लामच्या उदयोन्मुख सामर्थ्यास ठेचून काढण्याकरीता मदीनेवर हल्ला करण्याची तयारी सुरु केली.पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जेव्हा हे माहित पडले तेव्हा ते तीस हजार मुजाहीदीन (जिहाद करणाऱ्यां) सह रोमन लोकांच्या मुकाबल्याकरीता निघाले. अत्यंत कडक उन्हाळ्याचा तो काळ होता. पिके कापणीला आली होती व प्रवास मोठा लांब पल्ल्याचा होता.म्हणून घराबाहेर पडणे मनाला मोठे जड वाटत होते. ज्या लोकांच्या मनात दांभिकतेचा रोग होता त्यांनी संकटे का म्हणून सहन करावीत, अत: घरात बसून राहणेच त्यांनी योग्य मानले. या खेरीज मुसलमानांमध्ये जे लोक कमजोर होते त्यांच्या करीताहि हा प्रवास सक्त कसोटीस कारणीभूत ठरला आणि काहीजण तर 'सुस्ती'ला बळी पडले.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी तबुक येथे पोहचल्यावर सुमारे दोन आठवडे मुक्काम केला. तबुक, मदीने पासून उत्तरेकडे ६८६ किलोमीटर अंतरावर आहे. रोमन सैन्य मुकाबल्यासाठी आले नाही म्हणून युद्धाचा प्रसंग आला नाही परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या या प्रयत्नाने रोम-साम्राज्यावर चांगलाच धाक बसला आणि याचा दुसरा लाभ असा झाला की या सरहदी प्रांतात जे ख्रिश्चन कबीले रोमन लोकांच्या प्रभावाखाली होते ते इस्लामी राज्याचे खंडणी देणारे बनले यास्तव ऐला, जरबा, अजरोह व उकैदिर वासीयांनी पैगंबराशी करार केला व जिझिया कर देण्याचे कबूल केले. आणि तिसरा जबरदस्त फायदा हा झाला की तीस हजार मुजाहीदीनचे प्रशिक्षण अशाप्रकारे झाले की ते रोम व फारसच्या सम्राटांना आव्हान करण्यायोग्य झाले. उत्साहाचा हा परमोच्च बिंदू होता ज्याने भावीकाळात (फारुकी काळात) त्यांना या दोन महान सामर्थ्यांवर विजय प्राप्त करुन दिला. त्या आयत क्रमाचीही संक्षिप्त पार्श्वभूमी होय जिचा आरंभ ह्या आयतीने होते.

७६. जिहादपासून मनुष्य यासाठी अंग चोरतो की त्याला आपला संसार घडविण्याची काळजी असते. जर त्याला आपली आखिरत बनविण्याची काळजी असेल तर जिहाद करण्यात तो आपले सद्‌भाग्य जाणेल.

७७. जिहादपासून अंग चोरण्याबद्दल जेव्हा एवढ्या सक्त शिक्षेचे भय ऐकविले गेले आहे तेव्हा जर मुसलमान ऐहिक सुखासाठी किंवा जेहाद-त्यागाच्या खोट्या दृष्टीकोनान्वये स्वत:ला या महत्वपूर्ण कर्तव्यापासून सदैवकरीता जबाबदारीतून मुक्त करतील तर बाब किती गंभीर होईल ! आज जगात मुसलमानांना ज्या विनाशास तोंड द्यावे लागत आहे त्याचे मोठे कारण असे की त्यांच्या अंगी जिहादचे स्पिरीट बाकी राहीले नाही. जर जिहादचा आवेश त्यांच्या अंगी असता तर ना 'बैतुल मुकद्दस' त्यांच्या हातून हिसकावून घेतले गेले असते व ना इस्राईलच्या हातून ते अपमानग्रस्त झाले असते.

७८. म्हणजे अल्लाहची योजना पूर्ण होणे तुमच्यावर अवलंबून नाही. जर तुम्ही इस्लामसाठी जिहाद न कराल तर सर्वश्रेष्ठ अल्लाह अन्य एखाद्या समुदायास ही सुबुद्धि प्रदान करील.

७९. म्हणजे हे कर्तव्य पार पाडण्यात तुम्ही जर बेपर्वा होऊन वागलात तर विचार करा, अशाने नुकसान कुणाचे होईल? अल्लाहचे कि तुमचे स्वत:चे व तुमच्या सामुदायित्वाचे?

८०. म्हणजे पैगंबराची.

८१. संकेत आहे हिजरतच्या घटनेकडे, जी पैगंबरांच्या प्रेषित्वाच्या १३ वर्षानंतर (इ.स.६२२ मध्ये) घडली. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अल्लाहच्या हुकुमाने मक्केहून निघाले होते. ज्याअर्थी काफ़िरांनी अशी परिस्थिती निर्माण केली होती की पैगंबरांना निघणे क्रमप्राप्त ठरले. म्हणून फर्माविले, काफिरांनी त्यास घालविले होते.

८२. कुरेश कबील्याने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ठार करण्याचा कट रचला होता आणि या हेतुने एका रात्री त्यांच्या घरावर पहारा बसविला होता. परंतु पैगंबर मक्केहून अशा प्रकारे निघाले की त्यांना कानोकान खबर झाली नाही. त्यावेळी पैगंबरासोबत हजरत अबू बक्र होते. मक्केहून हिजरत (स्थलांतर) करुन त्यांना मदीना जायचे होते. मदीना शहर मक्केच्या उत्तरेस आहे परंतु पैगंबरांनी बुद्धिपुरस्पर दक्षिणेचा मार्ग अंगिकारला अशासाठी की शत्रूला थांगपत्ता लागू नये आणि मक्केहून सुमारे ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या सौर डोंगराच्या गुहेमध्ये आश्रय घेतला. येथे त्यांनी तीन रात्री घालविल्या.या कठीण प्रसंगी त्यांच्या सोबत एखादी जमात नव्हती, किंबहुना फक्त हज़रत अबु बक्र (रजि.) होते. शत्रू सर्वत्र शोध करीत जेव्हा गुहेजवळ पोहोचले तेव्हा हजरत अबू बक्र यांना या गोष्टीची चिंता वाटली की कदाचित शत्रूची नजर न पडावी, परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हज़रत अबू बक्र यांना असे सांगत निश्चिंत केले की, दु:खी होऊ नकोस, अल्लाह आमच्या सोबत आहे. ईश्वरेच्छा अशी की शत्रूंनी गुहेत

झाकून सुद्धा पाहिले नाही व परत गेले. ही अल्लाहची फार मोठी मदत होती, जी या कठीण प्रसंगी जाहीर झाली. या मदतीचा हवाला देऊन येथे मुसलमानांना फर्माविले गेले आहे की जर तुम्ही जिहाद करीता पैगंबरांच्या सोबतीस न निघालात तर अल्लाहला याची काहीहि पर्वा नाही तो कोणत्याहि स्थितीत आपल्या प्रेषिताचे सहाय्य करील, ज्याप्रमाणे त्याने हिजरतच्या कठीण प्रसंगी केले होते. वस्तुत: दोघांशिवाय तिसरा मनुष्य गुहेत नव्हता.

८३. अभिप्रेत फिरिशत्यांची मदत होय, जी बद्र व हुनैन आणि इतर प्रसंगी जाहीर झाली.

८४. अल्लाह प्रभावशाली आहे. म्हणून त्याचाच बोलबाला राहतो व तो हिकमत बाळगणारा आहे म्हणून आपल्या प्रेषिताच्या मदतीसाठी व वर्चस्वासाठी अत्यंत हिकमतपूर्ण मार्ग पत्करतो.

८५. म्हणजे साधन सामुग्री कमी असो वा जास्त, जेव्हा तुम्हाला जिहादकरिता निघण्याचा आदेश दिला गेला आहे तेव्हा त्याचे तुम्ही पालन केले पाहिजे स्पष्ट असावे की त्या वेळी जिहादकरिता कूच करण्याचा आदेश समस्त मुसलमानांना दिला गेला होता. याला अपवाद एकतर स्त्रिया होत्या किंवा ते लोक जे खरोखर असमर्थ होते. आणि हेहि स्पष्ट असावे की अरबच्या कबिलामय वातावरणात संगोपन झाल्यामुळे प्रत्येक जण तलवार चालविणे जाणत होता व तलवार बाळगूनच असायचा. शिवाय या जिहादचे स्वरुप हे होते की ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या नेतृत्वात एक योजनाबद्ध व केवळ अल्लाहच्या कलिमास बुलंद करण्याकरिता, त्याच्या शत्रूंविरुद्धचे जेहाद होते. म्हणून लाचार लोकांखेरीज अन्य कोणास यापासून मागे राहण्याचे कोणतेहि कारण असू शकत नव्हते. या आदेशाचा सर्वसामान्य पैलू हा होय की जेव्हा योजनाबद्ध जिहादचा प्रसंग समोर असावा व मुसलमानांच्या सत्ताधारी अमीरने त्यांना या गोष्टीचा आदेश द्यावा तेव्हा जिहाद करीता निघणे त्यांच्याकरिता फर्ज (अनिवार्य कर्तव्य) ठरते. ही तात्विक बाब होय अन्यथा आजच्या काळात राज्याचे सैन्यच अशा योग्यतेचे असते की पद्धतशीर युद्ध करु शकेल.

८६. म्हणजे जर परिणितीवर तुमची दृष्टी आहे तर आपले प्राण-वित अल्लाहच्या मार्गात खपविणे तुमच्याकरीता मोठ्या सदभाग्याची गोष्ट होय.

८७. ही मुनाफीक (दांभिक) लोकांची दशा वर्णिली गेली आहे. ज्यांनी तबुक युद्धात सहभागी होण्याविषयी अलीप्तता अंगिकारली होती. वस्तुत: समस्त मुसलमानांना युद्धासाठी निघण्याचा आदेश दिला गेला होता. यावरुन हे स्पष्ट झाले की जेव्हा रणशिंग सर्वांसाठी फुंकले जावे तेव्हा जिहादकरिता न निघणे हे खऱ्या ईमान बाळगणाऱ्याचे काम नव्हे.

८८. म्हणजे खोटी सबब रचून हे आपल्या विनाशाची सामुग्री करीत आहेत.

# ग़ारे सौर

**(सौर गुफा)**

जेथे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हिज़रत (स्थलांतराच्या) प्रसंगी आपले सहकारी हज़रत अबु बक्र सह आश्रय घेतला. मक्केपासूनचे अंतर ५ किलोमीटर.



४३. (हे पैगंबर !) अल्लाहने तुम्हाला माफ केले. तुम्ही त्यांना परवानगी का दिली ?(तुम्ही परवानगी द्यायला नको होती) जोपर्यंत तुम्हाला हा उलगडा झाला नसता की कोणते लोक खरे आहेत व हे जाणून घेतले नसते की कोणते लोक खोटे आहेत ?[८९]

عفا الله عنك لم أذنت لهم حتى يتبين لك الذين صدقوا وتعلم الكاذبين ﴿٤٣﴾

४४. जे लोक अल्लाह आणि अंतिम दिनावर ईमान राखतात, ते आपल्या संपत्ति व प्राणाने जिहाद न करण्याची परवानगी तुमच्याकडून कधीहि मागणार नाहीत. आणि अल्लाह ईश-भय बाळगणाऱ्यांना चांगल्या प्रकारे जाणतो.[९०]

لا يستأذنك الذين يؤمنون بالله واليوم الآخر أن يجاهدوا بأموالهم وأنفسهم والله عليم بالمتقين ﴿٤٤﴾

४५. परवानगी तर तेच लोक मागतात जे अल्लाह व अंतिम दिनावर ईमान राखत नाही व ज्यांची मने संशयग्रस्त आहेत आणि ते आपल्या संशयात डळमळीत आहेत.[९१]

إنما يستأذنك الذين لا يؤمنون بالله واليوم الآخر وارتابت قلوبهم فهم في ريبهم يترددون ﴿٤٥﴾

४६. जर त्यांचा निघण्याचा इरादा असता तर त्यासाठी त्यांनी काही सामुग्री अवश्य केली असती, परंतु अल्लाहला त्यांचे उठणे नापसंत झाले, म्हणून त्यांना यापासून मागे ठेवले [९२] आणि सांगितले गेले की, बसून रहा, बसणाऱ्यांसोबत.

ولو أرادوا الخروج لأعدوا له عدة ولكن كره الله انبعاثهم فثبطهم وقيل اقعدوا مع القاعدين ﴿٤٦﴾

४७. जर ते तुमच्या बरोबर निघाले असते तर तुमच्याकरीता हानीकारक झाले असते व तुमच्या दरम्यान यांची धावपळ उपद्रव माजविण्याकरीता राहीली असती. आणि तुमच्यात असेहि लोक आहेत जे त्यांच्या गोष्टी कान लावून ऐकणारे आहेत [९३] आणि अल्लाह अत्याचारींना चांगल्या प्रकारे जाणतो.

لو خرجوا فيكم ما زادوكم إلا خبالا ولأوضعوا خلالكم يبغونكم الفتنة وفيكم سماعون لهم والله عليم بالظالمين ﴿٤٧﴾

४८. यापूर्वीहि त्यांनी उत्पात माजविण्याचा प्रयत्न केला होता आणि तुमच्या विरुद्ध प्रत्येक प्रकारच्या युक्त्या योजीत राहीले [९४] येथपावेतो की सत्य आले आणि अल्लाहचे फर्मान प्रभावशाली झाले. वस्तुतः असे घडणे त्यांना अप्रिय होते.

لقد ابتغوا الفتنة من قبل وقلبوا لك الأمور حتى جاء الحق وظهر أمر الله وهم كارهون ﴿٤٨﴾

८९. तबुक मोहीमच्या प्रसंगी काही दांभिकांनी खोट्या सबबी रचून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याकडून या मोहिमेत सहभागी न होण्याची परवानगी दिली होती परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने यावर ताकीद दिली की जोपर्यंत तुम्हाला हे कळले नव्हते की त्यांची सबब अगदी सत्य आहे तोपर्यंत त्यांना परवानगी दिली नसती.

त्यांना ही सूट दिल्याबद्दल सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या पैगंबरास सावध करण्यापूर्वीच फर्माविले की त्याने आपणास (म्हणजे पैगंबराना) माफ केले आहे. यावरुन एका बाजूला पैगंबरांच्या हक्कात सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या दयेची शान जाहीर होत आहे तर दुसरीकडे पैगंबरांच्या इस्मतीचे संरक्षण झाले आहे. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहचा हा नियम आहे की शरीअतच्या निकडीनुसार जर एखाद्या प्रेषिताकडून काही चूकभूल झाल्यास तो त्याच वेळी त्याची सुधारणा करतो, अशासाठी की लोकांना योग्य मार्गदर्शन लाभावे.

९०. तात्पर्य ईश-भय बाळगणारा मनुष्य तो नव्हे जो कुफ्र व इस्लामच्या युद्धात आपल्या जबाबदारींकडे पाठ फिरवीत गृह सौख्यात व्यस्त राहील, किंबहुना ईश-भय बाळगणारा मनुष्य तो होय, जो आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याकरीता रणक्षेत्रात उतरतो.

९१. यावरुन दांभिकतेची हकीकत स्पष्ट होते. अर्थात अशी की, माणसाने मुसलमान असल्याचा दावा तर करावा, पण मन इस्लामविषयी समाधानी नसावे, किंबहुना संशयग्रस्त असावे. मनाची ही स्थिती ईमानाविरुद्ध आहे आणि ज्या मनाची ही अवस्था असते ते इस्लामच्या निकडींची पूर्तता करण्यासंबंधी डळमळीत असते. कारण जेव्हा माणसाला धर्माच्या सत्यतेवर विश्वास नसतो तेव्हा तो धर्मासाठी तन, मन आणि धनाची बाजी लावत नाही मदीनेच्या दांभिकांची हीच दशा होती. ते स्वत:ला केवळ मुसलमानच समजत नव्हते तर नमाज़ सुद्धा पढत होते आणि ज़कात हि देत होते परंतु हे सर्वकाही ते वरकरणी भावाने करीत. खरे पाहता, त्यांना ना अल्लाहशी प्रेम होते ना त्याच्या प्रेषिताशी. म्हणून जेव्हा अल्लाहच्या मार्गात क़ुर्बानी (बलीदाना) ची मागणी केली जाई तेव्हा त्यांच्यावर जाणू आभाळ कोसळत असे व ते त्यापासून पळ काढण्याचा मार्ग अंगिकारीत.

आज देखील अशा नामधारी मुसलमानांची कमतरता नाही. जे इस्लाम बाबत भयंकर संशयग्रस्त आहेत. तेव्हा ही गोष्ट अशा प्रसंगी दिसून येते जेव्हा इस्लाम करीता स्वत:ला संकटात उडी घेण्यास व आपल्या लाभांवर पाणी सोडण्यास त्यांना सांगितले जाते. परंतु मुस्लिम समाजात मिसळून गेल्यामुळे त्यांना आपल्या दांभिकपणावर आवरण घालण्याची संधी लाभली आहे.

९२. म्हणजे जेव्हा त्यांनी जिहादकरीता निघण्याचा इरादा केला नाही तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने देखील त्यांना निघण्याची सुबुद्धि प्रदान केली नाही कारण त्यांचे मनाविरुद्ध निघणे अल्लाहला पसंत नव्हते.

९३. संकेत आहे भोळसट मुसलमानांकडे जे दांभिकांच्या उपद्रवास बळी पडत.

९४. दांभिकांच्या उपद्रव माजविण्याचा उल्लेख यापूर्वीच्या अनेक सूरतींमध्ये झाला आहे.

وَمِنْهُمْ مَّنْ يَّقُوْلُ ائْذَنْ لِّيْ وَلَا تَفْتِنِّيْ ؕ اَلَا فِي
الْفِتْنَةِ سَقَطُوْا ؕ وَاِنَّ جَهَنَّمَ لَمُحِيْطَةٌۢ بِالْكٰفِرِيْنَ ﴿۴۹﴾

४९. त्यांच्यात एखादा असाहि आहे जो हे म्हणतो, मला परवानगी द्या व उपद्रवग्रस्त करु नका.[९५] ऐका हे उपद्रवात पडले [९६]आणि जहन्नम काफ़िरांना घेरून आहे.

اِنْ تُصِبْكَ حَسَنَةٌ تَسُؤْهُمْ ۚ وَاِنْ تُصِبْكَ مُصِيْبَةٌ
يَّقُوْلُوْا قَدْ اَخَذْنَآ اَمْرَنَا مِنْ قَبْلُ وَيَتَوَلَّوْا وَّهُمْ
فَرِحُوْنَ ﴿۵۰﴾

५०. जर तुम्हाला भलेपणा लाभतो तर त्यांना वाईट वाटते आणि जर तुमच्यावर एखादे संकट येते तेव्हा ते म्हणतात, बरे झाले आम्ही आधीपासूनच सावधगिरी बाळगली मग ते अशा प्रकारे पलटतात की त्यांच्या आंनदाला पारावार राहात नाही.[९७]

قُلْ لَّنْ يُّصِيْبَنَآ اِلَّا مَا كَتَبَ اللّٰهُ لَنَا ۚ هُوَ مَوْلٰىنَا ۚ
وَعَلَى اللّٰهِ فَلْيَتَوَكَّلِ الْمُؤْمِنُوْنَ ﴿۵۱﴾

५१. सांगा, जे अल्लाहने आमच्याकरीता लिहून ठेवले आहे तेच आमच्यासमोर येईल. तोच आमचा स्वामी आहे व ईमान बाळगणाऱ्यांनी त्यावरच भरवसा केला पाहिजे.

قُلْ هَلْ تَرَبَّصُوْنَ بِنَآ اِلَّآ اِحْدَى
الْحُسْنَيَيْنِ ؕ وَنَحْنُ نَتَرَبَّصُ بِكُمْ اَنْ يُّصِيْبَكُمُ اللّٰهُ
بِعَذَابٍ مِّنْ عِنْدِهٖٓ اَوْ بِاَيْدِيْنَا ۖ فَتَرَبَّصُوْٓا اِنَّا مَعَكُمْ
مُّتَرَبِّصُوْنَ ﴿۵۲﴾

५२. सांगा, तुम्ही आमच्याकरीता ज्या गोष्टीची प्रतिक्षा करीत आहात ती याखेरीज कोणती आहे की दोन कल्याणदायी गोष्टींपैकी एक होय [९८] आणि आम्ही तुमच्याकरीता ज्या गोष्टीची प्रतिक्षा करीत आहोत ती ही की अल्लाहने एकतर आपल्याकडून एखादी शिक्षा पाठवावी किंवा आमच्या हातून तुम्हाला शिक्षा घडवावी.[९९] आता तुम्हीहि प्रतिक्षा करा व आम्ही देखील तुमच्यासोबत प्रतिक्षा करणार आहोत.

قُلْ اَنْفِقُوْا طَوْعًا اَوْ كَرْهًا لَّنْ يُّتَقَبَّلَ مِنْكُمْ ؕ اِنَّكُمْ كُنْتُمْ
قَوْمًا فٰسِقِيْنَ ﴿۵۳﴾

५३. सांगा, तुम्ही स्वखुशीने खर्च करा किंवा नापसंतीने, तुमचे दान कबूल केले जाणार नाही कारण तुम्ही आज्ञाभंग करणारे लोक आहात.[१००]

وَمَا مَنَعَهُمْ اَنْ تُقْبَلَ مِنْهُمْ نَفَقٰتُهُمْ اِلَّآ اَنَّهُمْ كَفَرُوْا
بِاللّٰهِ وَبِرَسُوْلِهٖ وَلَا يَاْتُوْنَ الصَّلٰوةَ اِلَّا وَهُمْ
كُسَالٰى وَلَا يُنْفِقُوْنَ اِلَّا وَهُمْ كٰرِهُوْنَ ﴿۵۴﴾

५४. त्यांचे दान कबूल न केले जाण्याचे कारण याशिवाय काहीहि नाही की त्यांनी अल्लाह व त्याच्या प्रेषिताशी कुफ्र केले आणि नमाज़करीता येत असले तरी सुस्तीसह येतात.[१०१] आणि (ईश-मार्गात) खर्च करतात तर नापसंतीने खर्च करतात.[१०२]

९५. तबरीचे कथन आहे की जद्द बिन कैस ने म्हटले होते की मी जर रोमच्या सुंदर व रुपवान स्त्रीयांना पाहीले तर स्वत:वर काबू ठेवू शकणार नाही, यासाठी जिहादबाबत मला माफ करा व उपद्रवात फसवू नका.

यावरुन कल्पना केली जाऊ शकते की दांभिक लोक कशा प्रकारे खोट्या सबबी सादर करीत, मग त्यावर ईशभयाची कशी कल्हई चढवित.

९६. म्हणजे ते उपद्रवापासून अलिप्त राहण्याच्या गोष्टी करतात परंतु कुफ्र आणि निफाक (दांभिकता) च्या उपद्रवात जो सर्वात मोठा उपद्रव होय, ते अगदी वाईटरित्या व्यस्त आहेत.

९७. म्हणजे या दांभिकांची स्थिती मोठी विचित्र आहे. एकीकडे पैगंबरावर ईमान बाळगण्याचा दावाहि करतात व दुसरीकडे हितशत्रूहि आहेत. ते स्वत:ला मुसलमानांमध्ये सामीलहि करतात व मुसलमानांवर जे संकट येते त्यावर आनंदीतहि होतात.

९८. दांभिक या गोष्टीची प्रतिक्षा करीत होते की मुसलमानांचे सैन्य रोमन सैन्याच्या मुकाबल्यात विजयी होते कि प्रेतांचा ढीग बनते. याचे उत्तर येथे दिले गेले आहे की या दोघांपैकी जी काही स्थिती समोर येईल ती मुसलमानांकरीता कल्याणकारी स्थिती आहे. जर मुसलमानांना विजय प्राप्त होतो तर ते अनुभूतिशील यश होय आणि जर मुसलमान मारले जातात तर त्यांना अल्लाहच्या मार्गात ''शहीद'' होण्याचे सद्‌भाग्य लाभेल.

९९. या आयतीला अवतरीत होऊन फार तर दोन वर्षाचा काळ लोटला असेल तोच सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या शिक्षेचा आसूड मुसलमानांच्या हस्ते दांभिकांवर बरसला. हेच ते नावापुरते मुसलमान ज्यांनी हजरत अबू बक्र यांच्या खिलाफत-काळात ज़कात देण्यास इन्कार केला होता. आणि काही कबिल्यांनी तर संधी लाभताच इस्लाम विरुद्ध विद्रोह ध्वज उंच केला होता. परंतु हजरत अबु बक्र सिद्दीक यांनी त्या लोकां विरुद्ध युद्ध केले व मोठ्या खुबीने त्या उपद्रवांचा नायनाट केला.

१००. फ़ासिक म्हणजे आज्ञापालन बाह्य असलेले. मुनाफ़िक़ (वरकरणी मुसलमान) अल्लाहच्या आज्ञापालनाचे एखादे काम जरी करीत असत तरी ते अल्लाहची आज्ञा पाळण्याच्या भावनेने नव्हे व जेव्हा त्यांना संधी लाभे तेव्हा पूर्ण धिटाईने अल्लाहच्या अवज्ञेची कामे करु लागत. त्यांचा हा दुराचार ईशभयाविरुद्ध व कुफ्रच्या समान अर्थाने होता.

१०१. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह निसा टीप क्र. २२९ व २३०.

१०२. म्हणजे ते मन:पूर्वक व केवळ अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी खर्च करीत नाहीत किंबहुना उद्दिष्ट दिखाव्याचे असते.

५५. तुम्ही यांच्या सम्पत्ति व संततीला पाहून आश्चर्य वाटू देऊ नका. अल्लाह तर हे इच्छितो की त्यांच्याद्वारे त्यांना इहलोकीय जीवनात शिक्षा द्यावी व त्यांचे प्राण या स्थितीत निघावे की ते काफ़ीर असावेत. [१०३]

فَلَا تُعْجِبْكَ أَمْوَالُهُمْ وَلَا أَوْلَادُهُمْ ۚ إِنَّمَا يُرِيدُ اللَّهُ لِيُعَذِّبَهُمْ
بِهَا فِي الْحَيَاةِ الدُّنْيَا وَتَزْهَقَ أَنْفُسُهُمْ وَهُمْ كَافِرُونَ ﴿٥٥﴾

५६. ते अल्लाहची शपथ घेऊन सांगतात की ते तुमच्यापैकीच आहेत, वस्तुतः ते तुमच्यापैकी नाहीत, किंबहुना ते घाबरलेले लोक होत.[१०४]

وَيَحْلِفُونَ بِاللَّهِ إِنَّهُمْ لَمِنْكُمْ وَمَا هُمْ مِنْكُمْ وَلَٰكِنَّهُمْ قَوْمٌ
يَفْرَقُونَ ﴿٥٦﴾

५७. जर त्यांना एखादे आश्रय-स्थान, किंवा एखादी गुहा अथवा एखादे लपण्याचे स्थान लाभले तर पळत जाऊन त्यात लपतील.[१०५]

لَوْ يَجِدُونَ مَلْجَأً أَوْ مَغَارَاتٍ أَوْ مُدَّخَلًا لَوَلَّوْا إِلَيْهِ
وَهُمْ يَجْمَحُونَ ﴿٥٧﴾

५८. आणि त्यांच्यात काही असे आहेत जे दान (सदकह) संदर्भात तुम्हाला टोमणे मारतात. जर त्यांना त्यामधून काही दिले गेले तर आनंदित होतात व न दिले गेले तर नाराज होतात.[१०६]

وَمِنْهُمْ مَنْ يَلْمِزُكَ فِي الصَّدَقَاتِ فَإِنْ أُعْطُوا مِنْهَا
رَضُوا وَإِنْ لَمْ يُعْطَوْا مِنْهَا إِذَا هُمْ يَسْخَطُونَ ﴿٥٨﴾

५९. जर ते त्यावर संतुष्ट असते जे अल्लाह व त्याच्या प्रेषिताने त्यांना दिले व म्हणाले असते की,''आमच्याकरीता अल्लाह पुरेसा आहे तो आम्हाला आपल्या कृपेने प्रदान करील व त्याचा प्रेषित देखील [१०७] आम्ही अल्लाहकडेच प्रवृत्त आहोत'' [१०८] तर त्यांच्या हक्कात फार चांगले झाले असते.

وَلَوْ أَنَّهُمْ رَضُوا مَا آتَاهُمُ اللَّهُ وَرَسُولُهُ وَقَالُوا
حَسْبُنَا اللَّهُ سَيُؤْتِينَا اللَّهُ مِنْ فَضْلِهِ وَرَسُولُهُ
إِنَّا إِلَى اللَّهِ رَاغِبُونَ ﴿٥٩﴾

६०. सदक़ात [१०९] (दान) तर केवळ गरजू आणि गोर-गरीबांकरिता आहेत.[११०] आणि त्या लोकांकरीता जे दान कार्याकरिता नियुक्त असावेत.[१११] आणि असे लोक ज्यांच्या मनात (इस्लाम)चे प्रेम निर्माण करावयाचे असेल [११२] तसेच याकरीता आहे की माना सोडविण्यात [११३] व कर्जदारांचे ओझे हलके करण्यात [११४] आणि अल्लाहच्या मार्गात [११५] व प्रवांशांवर खर्च केले जावे.[११६] अल्लाह तर्फे हे एक बंधनकारक कर्तव्य आहे [११७] आणि अल्लाह ज्ञानी व हिकमत बाळगणारा आहे.[११८]

إِنَّمَا الصَّدَقَاتُ لِلْفُقَرَاءِ وَالْمَسَاكِينِ وَالْعَامِلِينَ عَلَيْهَا
وَالْمُؤَلَّفَةِ قُلُوبُهُمْ وَفِي الرِّقَابِ وَالْغَارِمِينَ وَفِي
سَبِيلِ اللَّهِ وَابْنِ السَّبِيلِ ۖ فَرِيضَةً مِنَ اللَّهِ ۗ وَاللَّهُ
عَلِيمٌ حَكِيمٌ ﴿٦٠﴾

१०३. म्हणजे या लोकांना इहलोकीय साधन सामुग्रीची जी विपुलता लाभलेली आहे ती काही ईर्ष्या करण्याजोगी गोष्ट नव्हे कारण ज्या गोष्टीचा त्यांना मोठा अभिमान आहे तीच त्यांच्याकरीता दु:खदायक होणार आहे. आणि ही गोष्ट सर्वसामान्यत:दिसून येते की धनाचा हव्यास बाळगणाऱ्यांकरीता त्यांचे धन संकट बनते, तथापि या संकटाचे स्वरुप वेगवेगळे असते दांभिकांपैकी कित्येक लोकांना ज्या गोष्टीने खऱ्या ईमानापासून मागे ठेवले होते ती म्हणजे धन व संततीची घमेंड होती. या घमेंडीने शेवटी त्यांना ज़कात देण्यास इन्कार करण्याप्रत प्रवृत्त केले आणि हज़रत अबु बक्र यांनी ज्यांच्या ख़िलाफ़त-काळाच्या आरंभातच ही घटना घडली होती, त्यांच्याविरूद्ध जिहाद केले तेव्हा मदीनेच्या परिसरात अबस व जुब्यान कबील्यांच्या विरुद्ध फौजी कारवायी केली गेली. अशा प्रकारे इहलोकातच त्यांना आपल्या घमेंडीची शिक्षा मिळाली व कुफ्रच्या अवस्थेतच त्यांनी जगाचा निरोप घेतला.

१०४. म्हणजे मुस्लिम समाजात ते केवळ एवढ्यासाठी सामील झाले आहेत की त्यांना अशी भिती आहे की ह्या समाजाशी संबंध तोडून ते अन्यत्र कोठेहि आश्रयस्थान प्राप्त करु शकत नाहीत. अन्यथा ते ना आपल्या ईमानसंबंधी खरे आहेत व ना खऱ्या अर्थाने इस्लामी समाजाचे घटक आहेत.

१०५. म्हणजे त्यांना जर असे एखादे स्थान लाभले, जेथे त्यांच्या लाभांचे संरक्षण होत असावे तर ते इस्लामपासून मुक्त होऊन व मुस्लिम समाजाशी आपले नाते तोडून तिथे पोहचतील. अर्थात त्यांना ना इस्लामशी गोडी आहे व ना मुसलमानांशी किंबहुना परिस्थितीवश ते तुमच्यासह बांधले गेले आहेत.

१०६.''बैतुल माल'' मध्ये ज़कात रुपाने जे धन जमा होत असे त्याची वाटणी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अशा प्रकारे करीत की जे खऱ्या अर्थाने पात्र असलेल्यांपर्यंत पोहोचावे. परंतु दांभिक याबाबत आक्षेप घेत की सम्पत्तिची वाटणी न्याय्यारित्या होत नाही. वस्तुत: अल्लाहच्या प्रेषिताहून अधिक न्याय करणारा अन्य कोण असू शकतो? खरी गोष्ट ही होती की दांभिकांपैकी जे गरजवंत असत त्यांची त्यांच्या हक्काआधारे मदत केली जाई तेव्हा ते खुश होत परंतु जेव्हा त्यांच्याहून अधिक पात्र असलेल्यांना प्राधान्य दिले जाई तेव्हा ते नाराज होत. तद्वतच ते दांभिक देखील नाराज होत जे या धनाला लोभस नेत्रांनी पाहात, परंतु पात्र नसल्यामुळे त्यांना काहीहि दिले जात नसे.

१०७. म्हणजे प्रेषिताविषयी गैरसमज बाळगण्याऐवजी ही अपेक्षा बाळगली असती की तो आपल्यातर्फे त्यांची मदत करण्यात काही कसर ठेवणार नाही, किंबहुना अधिक उपकृत करील तर ही ईमान व शुद्ध अंत:करणाशी सुसंगत गोष्ट झाली असती.

१०८. म्हणजे आम्हाला खरी ओढ सम्पत्तिची नव्हे किंबहुना अल्लाहची आहे.

१०९. वर सदक़ात (दानाच्या) विभागणी संदर्भात मुनाफ़ीक (दांभिक) लोकांच्या आक्षेपास उत्तर दिले गेले होते. या आयतीत हे दर्शविले गेले आहे की दानास पात्र असे कोणते लोक आहेत आणि दान कोणत्या बाबींवर खर्च केले जाऊ शकते. खर्चाच्या त्या विविध बाबी एकूण आठ आहेत.

''सदकह'' हा शब्द सिद्क या शब्दापासून बनलेला आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाह करीता माल खर्च करुन मनुष्य या गोष्टीचा पुरावा देतो की तो आपल्या ईमानामध्ये खरा आहे म्हणून अल्लाह करीता खर्च केलेल्या धन-सम्पत्तिस सदकह म्हटले गेले आहे. हदीसमध्ये उल्लिखित आहे:

الصَّدَقَةُ بُرْهَانٌ (مسلم کتاب الطہارۃ)

सदकह प्रमाण आहे (मुस्लिम किताबुत्तहार:) सर्वसामान्यांमध्ये सदकह (दान) खैरात म्हटले जाते. परंतु क़ुरआनने ज़कात करीता सदकहची परिभाषा वापरली आहे आणि हदीसमध्येहि ही परिभाषा वापरली गेली आहे.यास्तव जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हज़रत मुआज यांना यमनला पाठविले तेव्हा फर्माविले:

فَاَعْلِمْهُمْ اَنَّ اللّٰهَ افْتَرَضَ عَلَيْهِمْ صَدَقَةً فِى اَمْوَالِهِمْ
تُؤْخَذُ مِنْ اَغْنِيَائِهِمْ وَتُرَدُّ فِى فُقَرَائِهِمْ۔ (البخاری کتاب الزکاۃ)

''त्यांना सांगा की अल्लाहने त्यांच्या मालमत्तेत सदकह (दान) हे फ़र्ज़ (अनिवार्य कर्तव्य) ठरवून दिले आहे जे त्यांच्यातील श्रीमंतांकडून घेतले जाईल आणि त्यांच्यातील गरीबांना दिले जाईल.'' (अल-बुखारी-किताबुज़-ज़कात)

११० मूळ ग्रंथात फुकरा व मसाकीन हे शब्द प्रयोग झाले आहेत.हे दोन्ही शब्द अशा गरीबांकरीता वापरले जातात ज्यांना अर्थोपार्जनाकरीता मदतीची गरज असावी. हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. परंतु जेव्हा दोघांचा एकाच वेळी प्रयोग केला जातो तेव्हा ते स्पष्ट करण्याचा हेतु असतो की फुकरा असे लोक होत जे पहिल्या दर्जाचे गरजवंत आहेत आणि ''मसाकीन'' असे लोक जे दुय्यम दर्जाचे गरजवंत आहेत.

फुकरा (गरजवंता) चा उल्लेख सर्वप्रथम झाला आहे. जो या गोष्टीचा पुरावा होय की ज़कात ला सर्वप्रथम पात्र असे हेच लोक होत. फकीर हा शब्द गनीच्या विरुद्ध आहे. आणि क़ुरआनाने हा शब्द त्या मुहाजिरीन (देशत्याग केलेले) करीता वापरला आहे. ज्यांना त्यांच्या घरापासून व मालमत्तेपासून

वंचित केले गेले होते आणि सर्वथा मदतीस पात्र होते.

لِلْفُقَرَآءِ الْمُهَاجِرِيْنَ الَّذِيْنَ اُخْرِجُوْا مِنْ دِيَارِهِمْ وَاَمْوَالِهِمْ۔(الحشر۔۸)

''त्या गरजवंत (फुक़रा) मुहाजरीनकरीता आहे ज्यांना वंचित केले गेले आपल्या घरांपासून व मालमत्तेपासून.'' (अल हश्र -८)

यास्तव फुक़राशी अभिप्रेत ते लोक ज्यांची उपासमार होत असावी किंवा जे आपला उदरनिर्वाह करण्यास असमर्थ झाले असावेत अथवा लाचारीमुळे जे ना कमवू शकतात, ना त्यांच्या उपजिविकेची एखादी व्यवस्था असावी. अशा गरीब व दीनदुबळ्या लोकांची आर्थिक मदत करणे ज़कातचे सर्वप्रथम उद्दीष्ट होय. पवित्र क़ुरआनाने विशेषत:अशा ''फुकरा'' (गरजवंता) ची मदत करण्यास उद्युक्त केले आहे जे धर्म-सेवेत अशा प्रकारे व्यस्त आहेत की आपल्या उपजिविकेसाठी धावपळ करु शकत नाही. त्यांच्या स्वाभीमानाची ही दशा आहे की अजाण लोक त्यांना गरजशून्य समजू लागतात.

لِلْفُقَرَآءِ الَّذِيْنَ اُحْصِرُوْا فِىْ سَبِيْلِ اللّٰهِ لَا يَسْتَطِيْعُوْنَ ضَرْبًا فِى الْاَرْضِ يَحْسَبُهُمُ الْجَاهِلُ اَغْنِيَآءَ مِنَ التَّعَفُّفِ تَعْرِفُهُمْ بِسِيْمٰهُمْ لَا يَسْـَٔلُوْنَ النَّاسَ اِلْحَافًا۔(البقرة:۲۷۳)

''ज्यांच्यावर खर्च केला जावा अशा योग्यतेस खऱ्या अर्थाने पात्र ते गरजवंत होत जे अल्लाहच्या मार्गात अशा रीतीने घेरले गेले आहेत की जमीनीवर धावपळ करु शकत नाही. अजाण मनुष्य त्यांच्या स्वाभीमानास पाहून त्यांना श्रीमंत समजतो, परंतु तुम्ही त्यांना त्यांच्या चेहऱ्यावरुन ओळखू शकतात. ते लोकांना बिलगून मागत नाही. (अल बक़रा-२७३)

राहीलेत ''मसाकीन'' तर गरजवत्तेच्या दृष्टीने हे दुय्यम दर्जाचे लोक होत. अर्थात ते गरीब लोक ज्यांच्याजवळ उदरनिर्वाहाची सामुग्री त्यांना पुरेशी नसावी अथवा उपजिविकेचे साधन तर असावे, पण आवक इतकी अल्प असावी की ते स्वत:च्या व आपल्या आप्तस्वकीयांच्या मूलभूत गरजा पूर्ण करु शकत नसावेत. क़ुरआनाने एका घटनेचे वर्णन करतांना नौकेचा मिस्कीनाशी (गरीब दुबळ्यांशी) संदर्भ जोडला आहे.

اَمَّا السَّفِيْنَةُ فَكَانَتْ لِمَسٰكِيْنَ يَعْمَلُوْنَ فِى الْبَحْرِ

''ती नौका मिस्कीनांची (गोरगरीबांची) होती जे समुद्रात मेहनत मजुरीचे काम करीत.'' (अल कहफ -८९)

तात्पर्य एखाद्या गोष्टीची मिळकत असणे अथवा एखादे उपजिविकेचे साधन असणे हे ''मिस्किन'' (गरीब) असण्याविरुद्ध नाही, जेव्हा की मनुष्य उदरनिर्वाहापुरते प्राप्त करीत नसावा.

१११. अभिप्रेत ते कर्मचारी होत जे ज़कात-माल वसूल करण्यावर, त्याचे रक्षण व विभागणी तसेच यासंबंधीच्या इतर व्यवस्थापनीय कामांकरीता नियुक्त केले गेले असावेत. त्या सर्वांचा मेहनताना वा पगार ज़कातच्या धनामधून अदा केला जाऊ शकतो.

ही खर्चाची बाब या गोष्टीची निकड बाळगते की ज़कातची प्राप्ती व वाटणी संबंधी अशी नियमबद्ध व्यवस्था असावी की एका बाजूला श्रीमंतांनी आपल्या या सांपत्तिक जबाबदारीस अपरिहार्यत: पार पाडावे व दुसरीकडे नादार व गरीबदुबळ्यांना ही जामीनकी प्राप्त व्हावी की त्यांचा हक्क त्यांना लाभेल. तसेच ज़कातचे जे विनियोग धार्मिक बाबांशी व सामूहीक बाबींशी संबंधित असतात त्यावरही आवश्यकतेनुसार खर्च केला जावा-ही व्यवस्था क़ायम करणे इस्लामी शासनाची जबाबदारी आहे. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व खुलफा-ए-राशेदीनच्या काळात ज़कातच्या वसूली व वाटणी विषयीची व्यवस्था क़ायम होती.

११२. अभिप्रेत ते लोक होत ज्यांनी नुकताच इस्लाम धर्म अंगिकारला असावा आणि त्यांच्या मनात इस्लामचे प्रेम निर्माण करण्याकरीता त्यांना साम्पत्तिक नजराणे देणे ही काळाची निकड असावी. अशा लोकांकरीता ही अट नाही की ते गरीब असतील तरच त्यांची मदत केली जावी. तथापि ते सुखी असतांनाहि त्यांना या बाबीतून दिले जाऊ शकते. आणि इस्लामी शासन या गोष्टीस समर्थ आहे की त्याने इस्लाम व मुसलमानांच्या लाभाकरीता ज़कातच्या धन सम्पत्तितून या बाबीवर खर्च करावा.

११३. अभिप्रेत दासी, गुलामांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी खर्च करणे होय. क़ुरआनाने या उद्दिष्टकरीता ज़कातच्या मालमध्ये एक हिस्सा निर्धारीत करुन, या उद्दिष्टाचे महत्त्व प्रकट केले आहे.

आता जगात गुलामीची प्रथा बाकी राहिली नाही, परंतु त्या निरपराध मुसलमान कैदींचा यावर क़यास केला जाऊ शकतो जे काफ़ीरांच्या कैदेत असावेत. तेव्हा अशा लोकांना बंदीवासातून सोडविण्याकरीता या बाबीतून खर्च केला जाऊ शकतो. यास्तव डॉक्टर युसुफ कर्जावी लिहीतात:

''इमाम अहमद यांच्या मस्लकमध्ये उल्लिखित आहे की ज़कात द्वारे मुसलमान कैदीस मुक्त करणे उचित आहे कारण हे कैदेपासून मान सोडविणे होय आता गुलामगिरी संपली आहे परंतु युद्धे तर चालूच राहतील आणि सत्य व असत्याचा संघर्षाहि चालूच राहील अशा स्थितीत ही सोय असावी की मुसलमान कैदींचा फिदया या बाबीतून अदा केला जावा.''

(फिकहतुज़्ज़कात खंड-२ पृष्ठ -६२०)

११४. मूळ ग्रंथात ''अल-गारिमीन'' हा शब्द वापरला गेला आहे ज्याचा अर्थ असे कर्जदार होत, ज्यांच्याकरीता कर्ज एक दंड व ओझे झाले असावे-अर्थात असे कर्जदार जे आपल्या आर्थिक दु:स्थितीमुळे किंवा एखाद्या सामूहीक लाभाच्या कार्यात सहभागी होण्यासाठी कर्ज घेण्यास अगतिक झाले आणि मग कर्जाच्या ओझ्याखाली असे दबले की त्याच्या परतफेडीचा कोणताही मार्ग काढू शकले नाहीत. असे लोक कमविणारे व बाह्यत: अगरजवंत असू शकतात, परंतु कर्ज फेडण्याइतकी रक्कम नसल्यामुळे ते या गोष्टीस पात्र आहेत की त्यांच्या कर्जाची परतफेड ज़कातच्या मालमत्तेतून केली जावी.

११५. मूळ ग्रंथात فِى سَبِيْلِ اللهِ ''फी सबीलिल्लाह'' हा शब्दप्रयोग झाला आहे. अर्थात ''अल्लाहच्या मार्गात'' अभिप्रेत तो मार्ग की ज्यावर चालून मनुष्य अल्लाहची प्रसन्नता व त्याचे सान्निध्य प्राप्त करतो. उघड आहे की हा मार्ग सत्यधर्माचा म्हणजेच इस्लामचा होय. आणि क़ुरआनात याचा वापर ह्याच अर्थाने झाला आहे, उदाहरणार्थ:

اُدْعُ اِلٰى سَبِيْلِ رَبِّكَ۔

''आपल्या पालनकर्त्याच्या मार्गाकडे बोलवा''
(अन नहल - १२५)

या आयतीत पालनकर्त्याच्या मार्गाशी अभिप्रेत इस्लाम धर्म होय.

اَلَّذِيْنَ يَصُدُّوْنَ عَنْ سَبِيْلِ اللهِ وَيَبْغُوْنَهَا عِوَجاً۔

''जे अल्लाहच्या मार्गापासून रोखतात व त्यात वक्रता निर्माण करू इच्छितात'' (अल अअराफ -४५)

येथे अल्लाहच्या मार्गापासून रोखण्याचा अर्थ त्याच्या धर्मापासून रोखणे होय. अशाच प्रकारे हिजरत, जिहाद व विनियोगा सोबत ''फी सबिलिल्लाह'' चे पोट-वाक्य क़ुरआनात अधिक प्रमाणात वापरले गेले आहे जे विशेषत: या गोष्टीच्या (Causation)स्पष्ट करते.

اَلَّذِيْنَ اٰمَنُوْا يُقَاتِلُوْنَ فِى سَبِيْلِ اللهِ وَالَّذِيْنَ كَفَرُوْا يُقَاتِلُوْنَ فِى سَبِيْلِ الطَّاغُوْتِ۔(النساء-٧٦)

''ईमान बाळगणारे अल्लाहच्या मार्गात लढतात आणि काफ़ीर सैतानाच्या मार्गात.'' (अन निसा-७६)

या आयतीत अल्लाहच्या मार्गात लढण्याशी अभिप्रेत इस्लामचे संरक्षण व त्याच्या प्रभावाकरिता लढणे होय आणि ताग़ूत (सैताना) च्या मार्गात लढण्याशी अभिप्रेत इस्लामच्या विरोधात आणि असत्य उद्दिष्टांकरीता लढणे होय.

وَمَنْ يُّهَاجِرْ فِى سَبِيْلِ اللهِ۔(النساء-١٠٠)

''आणि जो कोणी अल्लाहच्या मार्गात हिजरत (स्थानांतर) करील.'' (अन-निसा-१००)

या आयतीत ''फि सबीलिल्लाह'' हे शब्द हिजरत (स्थलांतरा) च्या उद्दिष्टास स्पष्ट करीत आहेत म्हणजे जो मनुष्य केवळ अल्लाहकरीता व त्याच्या धर्माच्या सरंक्षणार्थ व सहाय्यार्थ स्थलांतर करील.

لِلْفُقَرَآءِ الَّذِيْنَ اُحْصِرُوْا فِى سَبِيْلِ اللهِ لَا يَسْتَطِيْعُوْنَ ضَرْبًا فِى الْاَرْضِ۔(البقرہ-٢٧٣)

''दानास खरे पात्र असलेले ते गरजवंत होत जे अल्लाहच्या मार्गात अशा प्रकारे घेरले गेले आहेत की जमीनीवर धावपळ करू शकत नाही ।'' (अल बकरह-२७३)

या आयतीत अल्लाहच्या मार्गात घेरले जाण्याशी अभिप्रेत धर्म-सेवेत व्यस्त होऊन जाणे होय.

وَاَنْفِقُوْا فِى سَبِيْلِ اللهِ وَلَا تُلْقُوْا بِاَيْدِيْكُمْ اِلَى التَّهْلُكَةِ۔(البقرہ-١٩٥)

''अल्लाहच्या मार्गात खर्च करा व आपल्या हातांनी स्वत:ला विनाशात लोटू नका'' (अल बकरा- १९५)

येथे अल्लाहच्या मार्गात खर्च करण्याशी अभिप्रेत अल्लाहच्या धर्माच्या प्रभावासाठी व त्यास उंचविण्यासाठी खर्च करणे.

وَتُجَاهِدُوْنَ فِى سَبِيْلِ اللهِ بِاَمْوَالِكُمْ وَاَنْفُسِكُمْ۔(الصّف-١١)

''आणि जिहाद करा अल्लाहच्या मार्गात आपल्या धनाने व आपल्या प्राणाने'' (अस-सफ-११)

या आयतीत अल्लाहच्या मार्गात जिहाद करण्याशी अभिप्रेत सत्य धर्माच्या समर्थनार्थ व त्यास प्रभावशाली करण्याकरिता जिहाद करणे. यावरून हेहि दिसून आले की ''फि सबी लिल्लाह'चा'' अर्थ जिहाद नव्हे, अन्यथा आयतीचा अनुवाद होईल 'जेहाद करा जेहाद मध्ये' किंबहुना 'फि सबी लिल्लाह'चे शब्द जिहादचे ध्येय व त्याच्या उद्दिष्टास स्पष्ट करतात की जिहाद अल्लाहच्या मार्गात म्हणजे अल्लाहच्या धर्माकरीता केले जावे.

या विवरणावरून स्पष्ट झाले की ''फि सबीलिल्लाह'चा विनियोग एक व्यापक विनियोग आहे आणि या विनियोगाचे

एक विशेष वैशिष्ट्य असे की हे त्या कामांवर खर्च करण्यासाठी आहे ज्यांचा प्रत्यक्षत: धर्महिताशी संबंध येतो; जेव्हा इतर विनियोग व्यक्तिंवर किंवा त्यांच्या कल्याणासाठी खर्च करण्यासाठी आहेत जर ''फी सबीलिल्लाह'च्या रकमेतून गाजी (जेहाद करणाऱ्यांवर) खर्च केला जातो तेव्हा त्यांची वैयक्तिक मदत करण्याचा उद्देश नसतो, किंबहुना त्यांच्या द्वारे धर्माचे संरक्षण करण्याचा उद्देश असतो, अन्यथा ही रकम जिहाद करणाऱ्यांवर खर्च करण्यापुरती मर्यादित नाही किंबहुना या रकमेने युद्धोपयोगी शस्त्रे खरेदी केली जाऊ शकतात आणि समस्त संरक्षण विषयक कामांवर खर्च केला जाऊ शकतो.तसेच त्या कामांवरहि ज्यांचा संबंध सरळ सरळ धर्माचे आवाहन, त्याचा प्रसार त्याच्या शरीयतीस लागू करण्याशी व त्याच्या स्मारक चिन्हांना क़ायम करण्याशी आहे.

आजच्या काळात धर्माची अत्यंत महत्वपूर्ण गरज म्हणजे त्याचे आवाहन व प्रसाराचे काम होय; ज्याकरिता आवाहक व प्रसारक तयार करण्याचीहि आवशयकता आहे तसेच ज्ञान व वैचारीक क्षेत्रातहि जिहाद करण्याची गरज आहे. तद्वतच क़ुरआनच्या संदेशास ईश्वरांच्या दासांपर्यंत पोहचविण्याचीहि गरज आहे आणि सुधारणे करीता संमेलने भरविण्याचीहि. इस्लामी शिक्षणास सार्वत्रिक करण्यासाठी पाठशाळांचीहि गरज आहे व युनिवर्सिटींची देखील. कोठे इस्लामच्या कौटुंबिक कायद्यांच्या संरक्षणविषयक समस्येने एक महत्वपूर्ण सामाजिक समस्येचे स्वरूप धारण केले आहे तर कोठे शरीअतच्या कायद्यांना लागू करण्याची समस्या. या कार्यांखेरीज मुसलमानांमध्ये सामूहीक जागृती निर्माण करून व एक 'मिल्लत' (समाज) या नात्याने त्यांचे संघटन करणे, शरीयत न्याय-दानाची व्यवस्था, बैतुलमाल व इस्लामी केंद्र प्रस्थापित करण्याची गरज देखील काळाची अत्यंत महत्वपूर्ण सामाजिक गरज आहे व या गरजांवर खर्च करण्याकरीता 'फि सबी लिल्लाह'च्या खर्चाच्या बाबीत पूर्ण सोय आहे.

स्पष्ट असावे की फुकहा (इस्लामी विधि-तज्ज्ञ) नी सर्वसामान्यात: ''फि सबीलिल्लाह' ला जेहादच्या अर्थाने घेतले आहे; परंतु असेहि काही विद्वान आहेत की यांच्या दृष्टीने याच्या अर्थात बरीच व्यापकता आहे यास्तव इमाम राजी लिहितात की:

''फि सबीलिल्लाह'च्या शब्दांद्वारे हे आवश्यक ठरत नाही की याचा अर्थ फक्त गाजी (वीर) असावा. यास्तव कफ्फालने आपल्या भाष्यात काही फुकहांचे हे कथन उल्लिखित केले आहे की प्रत्येक प्रकारचे मंगल-कार्य उदा.प्रेताचा कफन विधी, किल्ला उभारणी, मसजीदी आबाद करणे इत्यादि वर सदकात (दानाचे धन) खर्च करणे उचित आहे कारण फि सबीलिल्लाह'च्या सामान्य आदेशात या सर्व गोष्टी सामील आहेत'' (तफसीर राज़ी. खंड १६ पृष्ठ ११२)

सय्यद सिद्दीक हसन खान ''अर-रौजतुन नदीय्या'' या पुस्तकांत लिहीतात:

''येथे फि सबीलिल्लाह'चा अर्थ अल्लाहचा मार्ग होय; आणि जिहाद अल्लाहचा सर्वात मोठा मार्ग असला तरी या बाबीस जिहाद करीता खास ठरविण्याचे काही कारण नाही; किंबहुना प्रत्येक अशा कामावर खर्च करणे योग्य आहे जे अल्लाहच्या मार्गार्थाने आहे. येथे शाब्दिक दृष्ट्या आयतीचा हाच अर्थ आहे आणि जेव्हा शरीयतीच्या दृष्टीने अन्य एखादा अर्थ उल्लिखित नाही तेव्हा शाब्दिक अर्थाच अभिप्रेत घेणे आवश्यक आहे.''

(फिकहुतुज़्ज़कात-अल कर्ज़ावी खंड २ पृष्ठ ६४७ हवाला अररौजतून नदीय्या खं.१ पृ.२०६)

अल्लामा रशीद रिज़ा लिहीतात:

''सबीलिल्लाह मध्ये त्या समस्त शरअी (शरीअत विषयक) व सर्वसामान्य हिताच्या गोष्टी सामील आहेत ज्यांच्यावर धर्म आणि राज्याच्या व्यवहारांची मदार आहे. प्रथम व मुख्य गोष्ट युद्धाची तयारी होय. उदा. शस्त्र खरेदी, फौजकरीता रेशन, वाहतूकीची साधने, युद्ध सामुग्री वगैरे आणि अल्लाहच्या मार्गात खर्च करण्याच्या संबंधाने आजच्या काळात महत्वपूर्ण काम असे की इस्लाम करीता आवाहक तयार केले जावेत व त्यांना संघटित जमातीतर्फे सहाय्य देऊन मुस्लिमेतर देशात पाठविले जावे,ज्याप्रमाणे मुस्लिमेतर आपल्या धर्माच्या प्रसारासाठी करतात.

(फिकहुज़्ज़कात खंड-२ पृष्ठ- ६४९ हवाला तफसीर अल-मनार ख. १० पृ.५८५) शेख महमूद शलतूत लिहीतात की:

''ही बाब सार्वजनिक हिताची आहे. यात ना एखाद्याच्या मिळकतीचा प्रश्न निर्माण होतो व ना ही एखाद्या व्यक्तिच्या लाभापुरती आहे; किंबहुना याची मिळकत अल्लाहकरीता व तिचा लाभ ईश-निर्मितीकरीता आहे. या हितां मध्ये सर्वात मुख्य युद्ध विषयक गरजा होत आणि यात ही गोष्टहि सामील आहे की इस्लामच्या आवाहकांकरीता अशी साधने उपलब्ध केली जावीत की त्यांनी इस्लामचे गुणवैशिष्ट्ये सादर करण्याचे, धर्माचा प्रसार करण्याचे व त्याच्या आदेशांचा प्रसार करण्याचे कार्य शक्य व्हावे.

(अल-इस्लाम अकीदतन व शरीअतन पृ.१००) डॉक्टर युसुफ कर्ज़ावी लिहितात:

''याकरीता ''सबीलिल्लाह' शी अभिप्रेत काय आहे ते निर्धारीत करण्यात मी अशा स्पष्टीकरणास मानणारा नाही की

प्रत्येक प्रकारचे हित व शुभ कार्ये यात सामील व्हावीत आणि ना ह्याच्या क्षेत्रास इतके संकुचित समजतो की केवळ सैनिक जिहाद करीता खास व्हावेत. ज्याप्रमाणे जिहाद तलवार व भाल्याने केले जाते तद्वतच जीभेने व लेखणीनेहि केले जाते व ज्याप्रमाणे जिहाद सैनिकी असते, तद्वतच वैचारीक, प्रशिक्षण विषयक, सामूहिक, वैयक्ति व राजकीय स्वरूपाचेहि असते.'

(फिकहुज़्ज़कात खंड-२.पृष्ठ-६५७)

विद्वान महाशय पुढे लिहीतात:

''तथापि आजच्या परिस्थितीत ''फी सबीलिल्लाह' पासून जी सर्वप्रथम गोष्ट ध्यानी घेतली जाईल ती म्हणजे खऱ्या इस्लामी पुनर्जीवनाचा तो प्रोग्राम जो इस्लामचे संपूर्ण आदेश, श्रद्धा,तर्क स्मारके,शरीआत विधीनियम आणि निती व शिष्टाचार इ. गोष्टींना अमलात आणण्याकरिता असावा. खऱ्या इस्लामला सादर करण्याकरीता आवाहक केंद्र क़ायम करणे ज्याद्वारे जगाच्या कानाकोपऱ्यात धर्मा-धर्मांच्या संघर्षात मुस्लिमेतरांपर्यंत इस्लामचा संदेश पोहचविणे शक्य व्हावे. नि:संशय जिहाद ''फी सबीलिल्लाह''आहे. (फ़िकहुज़्ज़कात खं.२पृ.६६७,६६८)

११६. प्रवासी आपल्या देशात श्रीमंत असूनहि प्रवासात सहाय्य करण्यास पात्र ठरु शकतो. अशा गरजवंत प्रवाशांची मदत ज़कातच्या धनाद्वारे केली जाऊ शकते.

प्रचीन काळात, जेव्हा प्रवासाच्या अडचणी फार जास्त होत्या तेव्हा आपल्या देशापासून प्रवाशाचा संबंध अगदी तुटत असे. या परिस्थितीत जर शिदोरी संपत असे तर त्याला असाधारण संकटांना तोंड द्यावे लागे. यास्तव क़ुरआनाने केवळ आतिथ्य करण्यास प्रोत्साहन दिले नाही, किंबहुना जकात विनियोगात एक बाब प्रवाशांकरीता खास केली.

आज देखील जेव्हा प्रवास मोठा सोपा झाला आहे, तरीहि अशी स्थिती उद्‌भवत राहते की प्रवाशा जवळचे पैसे संपतात व तो आपल्या देशात श्रीमंत असूनहि आपल्या घरून वेळेवर पैसे मागवू शकत नाही. आणि दुर्दैवाने तो जर एखाद्या परदेशात असला तर परकीय चलना (Foreign Exchange) चा कायदा यात बाधक ठरतो. यास्तव प्रवाशांवर खर्च करण्याची आज देखील गरज उद्‌भवते.

११७. हा ताकीदवजा हुकुम आहे की खर्च करण्याच्या ह्या बाबी सर्वश्रेष्ठ अल्लाहने निर्धारित केलेल्या आहेत यास्तव याची वाटणी या नियमानुसार व्हावयास पाहीजे. या वर्तुळाबाहेर कोणत्याहि व्यक्तिला ज़कात देणे अथवा अन्य एखाद्या बाबीवर ज़कात-धन खर्च करणे कदापि उचित नाही.

खर्चाच्या या आठ बाबींचा अर्थ व त्यांची परिसीमा निर्धारीत करण्यात भाष्यकार व फुक़हा (कायदेतज्ज्ञ) यांच्या दरम्यान बराच मतभेद झाला आहे म्हणून आम्ही या आयतीच्या भाष्य-संदर्भात अधिक स्पष्टीकरणाने काम घेतले आहे. ज्यायोगे प्रमाण स्पष्ट व्हावे व गोष्ट सुव्यवस्थित समोर यावी. समस्येचे महत्व लक्षात घेता दीर्घ-स्पष्टीकरणाची निकड भासली आता एक समस्या राहते ती म्हणजे तमलीक (मालक बनविण्या)ची. सर्वसाधारणपणे फुक़हा हे मान्य करतात की ज़कात धन ज्यावर खर्च करावयाचे त्याला त्या (धना) चा मालक बनविणे आवश्यक आहे. यास्तव ते ''फी सबीलिल्लाहच्या'' बाबीसहि मुजाहिदीन करीता खास करतात त्यांचा युक्तिवाद 'लिलफुकरा'च्या 'लाम' या अक्षराशी आहे जो यांच्या दृष्टीने लामे तमलीक' आहे. वस्तुत: अरबी भाषेत 'लाम' केवळ मालकत्वासाठी नाही. किंबहुना हक्कदार व लाभ पोहचविण्याच्या अर्थाने देखील येतो आणि वाक्य-क्रमावर विचार केल्यास हे स्पष्ट होईल की येथे 'लाम' हक्कदार या अर्थानेच प्रयोगात आला आहे. कारण दांभिक लोक पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर ज़कात वाटणी संदर्भात जो आक्षेप घेत, त्याला उत्तर देताना फर्माविले गेले आहे की ज़कात ला खऱ्या अर्थाने पात्र हे गोरगरीब व दारिद्र्याने पिडीत लोक होत, आक्षेप घेणारे ते लोक नव्हते ज्यांचा या पैकी कोणत्याहि वर्गात समावेश होत नाही, परंतु ज़कात धनाची लालसा बाळगतात.

दुसरी गोष्ट अशी की उपरोक्त वर्णिलेल्या आठ खर्च बाबींपैकी फक्त सुरवातीच्या चार बाबींसह 'लाम' अक्षर आले आहे. इतर चार बाबी म्हणजे माना सोडविणे, कर्जदारांचे ओझे हलके करणे, सबीलिल्लाह व प्रवासी यासह 'लाम' नव्हे किंबहुना 'फी' अक्षर आले आहे ज्याचा अर्थ 'मध्ये' असा आहे. म्हणून या चार विनियोगांच्या संदर्भात मालकत्वाच्या शर्तीकरीता कोणतेहि प्रमाण नाही आणि 'फी' या अक्षरापासून जो अर्थ स्पष्ट होतो तो हाच की या कार्यांवर किंवा त्यांच्या विकासावर धन खर्च केले जावे आणि ''फी सबीलिल्लाह'' मध्ये तर व्यक्तिंचा कोठे उल्लेखहि नाही यास्तव ही बाब व्यक्तिंच्या बंधनाविना इस्लाम-सेवा व इस्लाम-समस्यांवर खर्च करण्याकरीता आहे.

११८. म्हणून ज़कात-वाटणी चा हा हुकूम ज्ञान व हिकमतीवर (बुद्धि कौशल्यावर) आधारीत आहे.

६१. यांच्यात असेहि लोक आहेत जे पैगंबरास दुःख पोहचवितात आणि म्हणतात की हा मनुष्य कच्च्या कानाचा आहे. सांगा तो तुमच्या करीता मंगल श्रोता आहे.[११९] अल्लाह वर ईमान बाळगतो. मोमीनांच्या गोष्टींवर विश्वास ठेवतो [१२०] आणि तुमच्यापैकी जे लोक ईमान बाळगतात त्यांच्याकरीता संपूर्णपणे कृपा आहे आणि जे लोक अल्लाहच्या प्रेषितास दुःख पोहचवितात त्यांच्याकरिता दुःखदायक शिक्षा आहे.

وَمِنْهُمُ الَّذِينَ يُؤْذُونَ النَّبِيَّ وَيَقُولُونَ هُوَ أُذُنٌ ۚ قُلْ
أُذُنُ خَيْرٍ لَّكُمْ يُؤْمِنُ بِاللَّهِ وَيُؤْمِنُ لِلْمُؤْمِنِينَ
وَرَحْمَةٌ لِّلَّذِينَ آمَنُوا مِنكُمْ ۚ وَالَّذِينَ يُؤْذُونَ
رَسُولَ اللَّهِ لَهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٦١﴾

६२. ते तुमच्या समोर अल्लाहच्या शपथा वाहतात यासाठी की तुम्हाला राजी करावे, वस्तुतः जर ते ईमान बाळगणारे आहेत तर अल्लाह व त्याचा रसूल (प्रेषित) या गोष्टीस अधिक हक्कदार आहे की त्यास राजी करावे.[१२१]

يَحْلِفُونَ بِاللَّهِ لَكُمْ لِيُرْضُوكُمْ وَاللَّهُ وَرَسُولُهُ
أَحَقُّ أَن يُرْضُوهُ إِن كَانُوا مُؤْمِنِينَ ﴿٦٢﴾

६३. काय त्यांना हे माहीत नाही की जो अल्लाह व त्याच्या प्रेषिताचा विरोध करतो त्याच्या करीता जहन्नमची आग आहे ज्यात तो सदैव राहील. ही फार मोठी अवहेलना आहे.

أَلَمْ يَعْلَمُوا أَنَّهُ مَن يُحَادِدِ اللَّهَ وَرَسُولَهُ فَأَنَّ لَهُ
نَارَ جَهَنَّمَ خَالِدًا فِيهَا ۚ ذَٰلِكَ الْخِزْيُ الْعَظِيمُ ﴿٦٣﴾

६४. दांभिकांना भय आहे की यांच्यावर (मुसलमानांवर) एखादी अशी सूरत (अध्याय) अवतरीत न व्हावी जी यांना त्यांच्या (दांभिकांच्या) मनातील रहस्य-भेदांशी पूर्वसूचित करील.[१२२] सांगा थट्टा उडवा-अल्लाह त्या गोष्टीस प्रकट करणार आहे जिचे तुम्ही भय बाळगत आहात.[१२३]

يَحْذَرُ الْمُنَافِقُونَ أَن تُنَزَّلَ عَلَيْهِمْ سُورَةٌ تُنَبِّئُهُم
بِمَا فِي قُلُوبِهِمْ ۚ قُلِ اسْتَهْزِئُوا إِنَّ اللَّهَ مُخْرِجٌ
مَّا تَحْذَرُونَ ﴿٦٤﴾

६५. जर तुम्ही यांना विचाराल तर उत्तर देतील आम्ही तर सहज बोलचालीत रममाण होतो आणि थट्टा-विनोद करीत होतो. सांगा, काय तुम्ही अल्लाह, त्याच्या आयती व त्याच्या प्रेषिताशी थट्टा-विनोद करता ?[१२४]

وَلَئِن سَأَلْتَهُمْ لَيَقُولُنَّ إِنَّمَا كُنَّا نَخُوضُ وَنَلْعَبُ ۚ قُلْ
أَبِاللَّهِ وَآيَاتِهِ وَرَسُولِهِ كُنتُمْ تَسْتَهْزِئُونَ ﴿٦٥﴾

६६. सबब रचू नका – तुम्ही ईमान बाळगल्यानंतर कुफ्र केले आहे–जर आम्ही तुमच्या एखाद्या समूहाला माफ केले तरी दुसऱ्या समूहाला अवश्य शिक्षा देऊ कारण तो अपराधी आहे.[१२५]

لَا تَعْتَذِرُوا قَدْ كَفَرْتُم بَعْدَ إِيمَانِكُمْ ۚ إِن نَّعْفُ عَن
طَائِفَةٍ مِّنكُمْ نُعَذِّبْ طَائِفَةً بِأَنَّهُمْ كَانُوا
مُجْرِمِينَ ﴿٦٦﴾

१११९. दांभिक लोक पैगंबर (सल्ल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विषयी अपमान जनक गोष्टी करीत आणि धर्माची थट्टा उडवित आणि जेव्हा खरे ईमान धारक त्यांच्या या गोष्टी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पर्यंत पोहचवित व पैगंबर त्यांना विचारीत तेव्हा ते इन्कार करीत व टीका करीत की आपण प्रत्येकाचे म्हणणे ऐकता त्यांच्या या हरकतीवर अंकुश ठेवीत फर्माविले गेले आहे की पैगंबराने तुमच्या भल्याकरीता आपले कान उघडे ठेवले आहेत-तुमच्या असह्य हरकतीची जेव्हा त्याला खबर दिली जाते तेव्हा तो एवढ्यासाठी ऐकतो की तुम्हाला याबाबत सावध करावे व तुमच्यात सुधारणा व्हावी तो ना वाईटाच्या शोधात राहतो व ना विघ्नसंतोषा पायी एखादी गोष्ट ऐकतो. त्याचे कान तर संपूर्णपणे मंगल कान आहेत.

१२०.म्हणजे ते क:पदार्थ लोक नव्हते की ज्यांच्या गोष्टींवर विश्वास करून तुमच्या बाबतीत त्याने दुराग्रह बाळगावा, किबंहुना ते खरे ईमान बाळगणारे लोक आहेत तेव्हा त्यांच्या गोष्टींवर विश्वास न ठेवायला काही कारण नाही, कारण कोणाताही सच्चा मोमिन हे धारीष्ट्य करूच शकत नव्हता की पैगंबरासमोर खोटे बोलावे अथवा चुकीच्या गोष्टींवर आपला विश्वास बसविण्याचा प्रयत्न करावा.

१२१. दांभिक लोक खोट्या सबबी पुढे करून मुसलमानाना खुश करण्याचा जो प्रयत्न करीत होते त्यावर अंकुश ठेवीत येथे फर्माविले गेले आहे की त्यांना या गोष्टीची कसलीहि काळजी नाही की अल्लाह व त्याच्या प्रेषितास राजी करावे. खरे पाहता, ईमानाची ही निकड होती की त्यांनी या गोष्टीस प्राधान्य दिले असते आणि जर त्यांनी खरोखर अल्लाह व त्याच्या प्रेषितास राजी करण्याची इच्छा बाळगली असती तर खोट्या सबबी मुळीच रचल्या नसत्या.

आयतीला जर आपल्या जागी ठेवून पाहील्यास याचा अर्थ अगदी स्पष्ट आहे परंतु बिदअत करणारे (धर्मात नवीन गोष्टी घुसविणारे) लोक आयतींना त्यांच्या स्थानापासून हटवितात मग त्यांचा उलट सुलट अर्थ लावतात, तेव्हा या आयतीचे बिदअती स्पष्टीकरण असे केले गेले आहे की उपासनेतहि अल्लाह सोबत त्याच्या पैगंबराच्या प्रसन्नतेची नियत असावयास पाहिजे की हे उच्चतम दर्जाचे ईमान होय. वस्तुत:येथे उपासनेची समस्या सुरवाती पासूनच विवादात्मक नाही, किंबहुना पैगंबराच्या उपस्थितीत जिहाद करीता पैगंबराची साथ न दिल्याबद्दल दांभिकांना तंबी दिली गेली आहे; आणि जेथपावेतो उपासनेचा संबंध आहे फक्त अल्लाहची उपासना व निव्वळ त्याच्याच प्रसन्नतेसाठी करण्याचा आदेश पवित्र क़ुरआनात ठिकठिकाणी दिला गेला आहे परंतु बिदअत करणारे या सर्व गोष्टींना दृष्टीआड करून क़ुरआनच्या आयतींचा मार्गभ्रष्ट करणारा अर्थ लावतात आणि भूतकालीन जनसमूह अल्लाहच्या ग्रंथाचा चुकीचा अर्थ लावूनच मार्गभ्रष्ट होत राहीली.

१२२. दांभिक लोक क़ुरआनावर खरे ईमान तर बाळगत नव्हते परंतु अपरोक्षाच्या त्या खबरींचा विचार करता ज्या क़ुरआनाद्वारे दिल्या जात होत्या ते या संशयात खचितच पडले होते की क़ुरआन प्रेषितावर अपरोक्षातून अवतरीत होते. यास्तव त्यांना हे भय जाणवत होते की एखादी अशी सूरह अवतरीत न व्हावी जी त्यांच्या मनातील सुप्त गोष्टीना प्रकट करून दाखवील.

१२३. आणि सूरह तौबा ने दांभिकांच्या समस्त कट-कारस्थानांना उघड करून दाखविले व त्यांच्या प्रत्येक भेदास, प्रकट केले.

१२४. अल्लाह त्याचा ग्रंथ व त्याचा प्रेषित सर्वात जास्त आदर-पात्र होत आणि कोणताहि खरा मुसलमान त्यांची थट्टा उडविण्याचे धारिष्ट्य करू शकत नाही.

१२५. दांभिकांमध्ये उपद्रव व उत्पाताच्या दृष्टीने विविध स्तराचे लोक होते. कोणाचा मामला आपल्या पर्यंतच मर्यादीत होता तर कोणी अपराधात्मक कारवायांमध्ये मग्न होता. यास्तव फर्माविले की पहिल्या प्रकारच्या लोकांना आम्ही माफ जरी केले तरी ज्यांचा मामला अपराधात्मक स्वरूपाचा आहे त्यांना निश्चित शिक्षा देऊ. येथे माफ करण्याशी अभिप्रेत इहलोकात माफ करणे होय व शिक्षा देण्याशी अभिप्रेतहि जगातच शिक्षा देणे होय. राहीली आखिरत तर जसे पुढे आयत ६८ मध्ये स्पष्ट केले गेले आहे. त्यांच्याकरीता जहन्नमची शिक्षा आहे. या दांभिकांना इहलोकात मोठी अपमानजनक शिक्षा मिळाली उदाहरणार्थ त्यांनी तयार केलेली ''मसजिदे जिरार'' नावाची मसजिद पैगंबर (सल्ल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या हुकुमाने जाळली गेली. तसेच ज्या घरात सभा भरवून ते उत्पात रचीत असत ते एक यहुदी सुवैलम चे घर होते. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आदेशाने हे घर देखील फुंकले गेले.

(सीरत इब्ने हिशाम खं. ४ पृ. १७१)

६७. दांभिक पुरुष व दांभिक स्त्रीया सर्व एकमेकांचे सजातीय आहेत. [१२६] दुष्कृत्याचा आदेश देतात व सत्कृत्यांपासून रोखतात [१२७]आणि आपल्या हातांना बंद ठेवतात.[१२८] हे अल्लाहला विसरले [१२९] तेव्हा अल्लाहने देखील यांना विस्मृतीत टाकले.[१३०] नि:संशय हे दांभिक मोठे अवज्ञाकारी होत.

اَلْمُنٰفِقُوْنَ وَالْمُنٰفِقٰتُ بَعْضُهُمْ مِّنْۢ بَعْضٍ ۘ يَاْمُرُوْنَ
بِالْمُنْكَرِ وَيَنْهَوْنَ عَنِ الْمَعْرُوْفِ وَيَقْبِضُوْنَ
اَيْدِيَهُمْ ۭ نَسُوا اللّٰهَ فَنَسِيَهُمْ ۭ اِنَّ الْمُنٰفِقِيْنَ
هُمُ الْفٰسِقُوْنَ ﴿٦٧﴾

६८. अल्लाहने दांभिक पुरुष, दांभिक स्त्रीया व काफ़िरांशी जहन्नमच्या आगीचा वायदा करून ठेवला आहे, ज्यात ते सदैव राहतील [१३१] तीच त्यांना पुरेशी आहे. त्यांचा अल्लाहने धिक्कार फर्मांविला आहे व त्यांच्याकरीता सदैव असणारी शिक्षा आहे.

وَعَدَ اللّٰهُ الْمُنٰفِقِيْنَ وَالْمُنٰفِقٰتِ وَالْكُفَّارَ نَارَ جَهَنَّمَ
خٰلِدِيْنَ فِيْهَا ۭ هِىَ حَسْبُهُمْ ۚ وَلَعَنَهُمُ اللّٰهُ ۚ وَلَهُمْ
عَذَابٌ مُّقِيْمٌ ﴿٦٨﴾ۙ

६९. तुमची दशाहि तीच झाली जी तुमच्या पूर्वीच्या लोकांची होती. ते तुमच्याहून किती तरी जास्त सामर्थ्यवान होते आणि सम्पत्ति व संतती मध्येहि अधिक वरचढ होते. तेव्हा (त्यांची काय दशा झाली?) त्यांनी आपल्या हिश्शयाचा लाभ उचलला आणि तुम्हीहि आपल्या हिश्शयाचा लाभ त्याच प्रकारे उचलला ज्या प्रकारे तुमच्या पूर्वीच्या लोकांनी उचलला होता.आणि तुम्ही देखील त्याच प्रकारे वाद करीत राहीले ज्या प्रकारे ते वाद करीत राहीले. [१३२] हेच लोक होत ज्यांची आचरणे इहलोक व आखिरत मध्ये वाया गेली [१३३] आणि हेच लोक होत नाश पावणारे.

كَالَّذِيْنَ مِنْ قَبْلِكُمْ كَانُوْٓا اَشَدَّ مِنْكُمْ قُوَّةً وَّاَكْثَرَ
اَمْوَالًا وَّاَوْلَادًا ۭ فَاسْتَمْتَعُوْا بِخَلَاقِهِمْ فَاسْتَمْتَعْتُمْ
بِخَلَاقِكُمْ كَمَا اسْتَمْتَعَ الَّذِيْنَ مِنْ قَبْلِكُمْ بِخَلَاقِهِمْ
وَخُضْتُمْ كَالَّذِيْ خَاضُوْا ۭ اُولٰۗىِٕكَ حَبِطَتْ اَعْمَالُهُمْ فِي
الدُّنْيَا وَالْاٰخِرَةِ ۚ وَاُولٰۗىِٕكَ هُمُ الْخٰسِرُوْنَ ﴿٦٩﴾

७०. काय यांना त्या लोकांच्या बातम्या पोहचल्या नाहीत जे ह्यांच्यापूर्वी होऊन गेले आहेत नूह, आद व समूद चे जनसमूह.[१३४] इब्राहीमचा जनसमूह [१३५] मदयन वाले [१३६] आणि त्या वस्त्या ज्या उलथविल्या गेल्या [१३७] त्यांचे पैगंबर [१३८] त्यांच्याजवळ उघड निशाण्या घेऊन आले होते मग असे नाही झाले की अल्लाहने त्यांच्यावर जुलुम केला असावा किंबहुना ते स्वत:च आपल्यावर जुलुम करीत राहीले.

اَلَمْ يَاْتِهِمْ نَبَاُ الَّذِيْنَ مِنْ قَبْلِهِمْ قَوْمِ نُوْحٍ وَّعَادٍ
وَّثَمُوْدَ ڏ وَقَوْمِ اِبْرٰهِيْمَ وَاَصْحٰبِ مَدْيَنَ وَالْمُؤْتَفِكٰتِ ۭ
اَتَتْهُمْ رُسُلُهُمْ بِالْبَيِّنٰتِ ۚ فَمَا كَانَ اللّٰهُ لِيَظْلِمَهُمْ وَلٰكِنْ
كَانُوْٓا اَنْفُسَهُمْ يَظْلِمُوْنَ ﴿٧٠﴾

१२६. म्हणजे सर्व एकाच माळेचे मणी व एकाच प्रकार (Category) चे लोक आहेत. ते फक्त नामधारी मुसलमान आहेत; अन्यथा त्यांचा ना इस्लामशी कसला संबंध आहे ना त्याची काही कळकळ.

१२७. ईमानचे वैशिष्ट्य असे की मनुष्य सत्कृत्य करण्यास सांगतो व दुष्कृत्यापासून परावृत्त करतो. परंतु या उलट दांभिकतेचे वैशिष्ट्य असे की मनुष्य दुष्कृत्य करण्यास लोकांना उद्युक्त करतो व सत्कृत्य करण्यापासून परावृत्त करतो.दांभिकांची ही निती केवळ भूतकालीन गोष्ट नव्हे, किंबहुना वर्तमान काळाची घटना देखील आहे आणि क़ुरआनात दांभिकांची ही निती यासाठी वर्णिली गेली आहे की ह्या दर्पणात प्रत्येक युगातील दांभिकांचे प्रतिबिंब पाहणे शक्य व्हावे.

१२८. म्हणजे भलेपणाच्या कामांवर व अल्लाहच्या मार्गात खर्च करण्याकरीता त्यांच्या मुठी बंद आहेत.

१२९. दांभिक लोक अल्लाहच्या नावाने शपथाहि वाहत असत व नमाजहि पढत असत तरीदेखील ते अल्लाहला विसरले होते कारण ना तर त्यांचा खरा उद्देश ईश-प्रसन्नता प्राप्तीचा होता आणि ना त्यांना अल्लाहची उपासना व आज्ञा पालनात कसली गोडी होती. ते श्रद्धेने कुफ्र नितीत व्यस्त होते आणि धार्मिकतेचे प्रदर्शन केवळ समाजाच्या दबावा पोटी किंवा त्यास खुश करण्याकरीता करीत असत.

१३०. अल्लाहने विसरण्याचा अर्थ असा की तो त्यांना मांगल्याची सुबुद्धि प्रदान करीत नाही व आपल्या कृपेपासून त्याने यांना वंचित केले आहे.

१३१. इहलोकात मुस्लिम समाजाची रचना बाह्य इस्लामच्या आधारे झाली आहे. कोणताहि मनुष्य कलिमा पढून इस्लाम धर्मात प्रवेश करू शकतो आणि मुस्लिम समाजात त्याचा अंतर्भाव होऊ शकतो. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या दृष्टीने स्वीकृत ''इस्लाम'' केवळ त्याच माणसाचा होय ज्याने अगदी मनापासून ईमान बाळगले असेल आणि अल्लाह व त्याच्या प्रेषिताकरीता एकनिष्ठतेची भावना बाळगत असेल. दुसऱ्या शबदात सांगायचे म्हणजे तो धर्म-ग्रहण करण्यात प्रमाणिक असावा. अर्थात आखिरतची सफलता अशाच लोकांकरीता आहे. राहीलेत ते लोक जे इस्लाम हा सत्य धर्म असण्याबाबत संशय-ग्रस्त असावेत व ज्यांची निष्ठा ईश्वर व सैतान यांच्या दरम्यान वाटली गेली असावी किंवा ज्यांची मने कुफ्र ने ओतप्रोत असावीत आणि केवळ मुस्लिम समाजात आपला समावेश क़ायम राखण्या करीता मुसलमान असल्याचा दावा करावा तेव्हा असे लोक मग ते पुरुष असोत वा स्त्रीया, ना खऱ्या अर्थाने मुसलमान आहेत व ना आखिरतमध्ये त्यांची गणना ईमान बाळगणाऱ्यांमध्ये होईल-त्यांना जहन्नमची शिक्षा त्याचप्रकारे भोगावी लागेल ज्या प्रकारे इतर काफ़ीरांना भोगवी लागेल.

१३२. जे लोक आपल्या ईमानात खरे नसतात ते कधी इस्लामच्या श्रद्धेबाबत शंका-संशय व्यक्त करू लागतात तर कधी शरीयत आदेशांबाबत वाद निर्माण करतात अशासाठी की लोकांच्या मनात शरीयत बद्दल तिरस्कार व्हावा.

१३३. म्हणजे बाह्यत: त्यांनी काही सत्कृत्ये केलीहि असतील तरी ज्याअर्थी ही सत्कृत्ये खऱ्या मनाने अल्लाह करीता केलेली नव्हती आणि कुफ्र मिश्रित होती म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या तराजूमध्ये त्यांचे काहीहि वजन राहणार नाही आणि जगातहि त्यांची ही कृत्ये मांगल्य व समृद्धीस कारक ठरू शकणार नाहीत.

१३४. ह्या जन समूहांचा अहवाल सूरह अअराफ आयत ५९ ते ७९ मध्ये वर्णिला गेला आहे.

१३५. इब्राहीमचा जनसमूह मूर्तिपूजा करणारा समूह होता, ज्याच्या विनाशाचा उल्लेख सूरह अंबिया मध्ये आला आहे.

فَجَعَلْنٰهُمُ الْاَخْسَرِيْنَ۔(الانبیاء۔٧٠)

''आम्ही त्यांना वाईटरित्या नष्ट केले'' (अल आंबिया-७०)

فَجَعَلْنٰهُمُ الْاَسْفَلِيْنَ۔(الصافات۔٩٨)

''आम्ही त्यांना अवनत व अपमानित केले'' (अस्साफ्फात-९८)

१३६. यांचा वृत्तांत हि सूरह अअराफ आयत क्र.८५ते ९३ मध्ये येऊन गेला आहे.

१३७. अभिप्रेत लूत जनसमूहाच्या वस्त्या अर्थात सदूम व अमूराच्या वस्त्या. यांचा किस्साहि सूरह अअराफ आयत क्र. ८० ते ८४ मध्ये येऊन गेला आहे.

१३८. प्रेषितांना जनसमूहाकडे या संबंधाने जोडले गेले आहे की ते या जनसमूहातूनच उभारले गेले होते.

७१. आणि ईमान बाळगणारे पुरुष व ईमान बाळगणाऱ्या स्त्रीया एकमेकांचे मित्र आहेत. सत्कृत्याचा आदेश देतात व दुष्कृत्यापासून रोखतात. नमाज़ क़ायम करतात व ज़कात देतात आणि अल्लाह व त्यच्या रसूलचे (प्रेषिताचे) आज्ञापालन करतात. [१३९] ह्याच लोकांना अल्लाह आपल्या कृपेने उपकृत करील निःसंशय अल्लाह प्रभावशाली व हिकमत बाळगणारा आहे.

وَالْمُؤْمِنُوْنَ وَالْمُؤْمِنٰتُ بَعْضُهُمْ اَوْلِيَآءُ بَعْضٍ
يَاْمُرُوْنَ بِالْمَعْرُوْفِ وَيَنْهَوْنَ عَنِ الْمُنْكَرِ
وَيُقِيْمُوْنَ الصَّلٰوةَ وَيُؤْتُوْنَ الزَّكٰوةَ وَيُطِيْعُوْنَ
اللّٰهَ وَرَسُوْلَهٗ ؕ اُولٰٓئِكَ سَيَرْحَمُهُمُ اللّٰهُ ؕ اِنَّ
اللّٰهَ عَزِيْزٌ حَكِيْمٌ ﴿٧١﴾

७२. ईमान बाळगणारे पुरुष व ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांशी अल्लाहने वायदा केला आहे की तो त्यांना अशा बागांनी उपकृत करील ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील. ते त्यात सदैव राहतील आणि त्या शाश्वत बागांमध्ये [१४०] स्वच्छ शुद्ध घरे असतील व त्यांना अल्लाहची प्रसन्नता लाभेल जी सर्वात मोठी गोष्ट होय [१४१]हीच महान सफलता आहे.

وَعَدَ اللّٰهُ الْمُؤْمِنِيْنَ وَالْمُؤْمِنٰتِ جَنّٰتٍ تَجْرِيْ مِنْ تَحْتِهَا
الْاَنْهٰرُ خٰلِدِيْنَ فِيْهَا وَمَسٰكِنَ طَيِّبَةً فِيْ جَنّٰتِ عَدْنٍ ؕ
وَرِضْوَانٌ مِّنَ اللّٰهِ اَكْبَرُ ؕ ذٰلِكَ هُوَ الْفَوْزُ الْعَظِيْمُ ﴿٧٢﴾

७३. हे पैगंबर ! काफ़िरांशी व दांभिकांशी जिहाद करा आणि त्यांच्याशी सक्तीने वागा [१४२] त्यांचे ठिकाण जहन्नम आहे आणि ते मोठे वाईट ठिकाण आहे पोहचण्याचे.

يٰۤاَيُّهَا النَّبِيُّ جَاهِدِ الْكُفَّارَ وَالْمُنٰفِقِيْنَ وَاغْلُظْ عَلَيْهِمْ ؕ وَ
مَاْوٰىهُمْ جَهَنَّمُ ؕ وَبِئْسَ الْمَصِيْرُ ﴿٧٣﴾

७४. हे अल्लाहची शपथ घेऊन म्हणतात की आम्ही असे म्हटले नाही. वस्तुतः ते निश्चित कुफ्र गोष्ट बोलले आणि इस्लाम अंगिकारल्यानंतर कुफ्र केले आणि असा काही बेत केला जो त्यांना साधला नाही [१४३] त्यांचा रोष केवळ या कारणास्वत आहे की अल्लाहने अपल्या कृपेने त्यांना श्रीमंत केले व त्याच्या प्रेषितानेहि [१४४] जर हे तौबा करतील तर त्यांच्या हक्कात अधिक चांलगे होय आणि जर तोंड फिरवतील तर अल्लाह त्यांना इहलोकातहि दुःखदायक शिक्षा देईल व आखिरत मध्येहि. आणि भूतलावर त्यांचा ना कोणी समर्थक असेल, ना सहाय्यक.

يَحْلِفُوْنَ بِاللّٰهِ مَا قَالُوْا ؕ وَلَقَدْ قَالُوْا كَلِمَةَ الْكُفْرِ وَكَفَرُوْا
بَعْدَ اِسْلَامِهِمْ وَهَمُّوْا بِمَا لَمْ يَنَالُوْا ۚ وَمَا نَقَمُوْۤا اِلَّاۤ اَنْ
اَغْنٰىهُمُ اللّٰهُ وَرَسُوْلُهٗ مِنْ فَضْلِهٖ ۚ فَاِنْ يَّتُوْبُوْا يَكُ خَيْرًا
لَّهُمْ ۚ وَاِنْ يَّتَوَلَّوْا يُعَذِّبْهُمُ اللّٰهُ عَذَابًا اَلِيْمًا فِى
الدُّنْيَا وَالْاٰخِرَةِ ۚ وَمَا لَهُمْ فِى الْاَرْضِ مِنْ
وَّلِيٍّ وَّلَا نَصِيْرٍ ﴿٧٤﴾

१३९. वर दांभिक पुरुष व दांभिक स्त्रीयांची वैशिष्ट्ये वर्णिली गेली होती येथे ईमान बाळगणारे पुरुष व ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांची वैशिष्ट्ये वर्णिली गेली आहेत, यासाठी की दोघांमधील फरक स्पष्ट व्हावा.

१४०. गृहस्थहि शाशवत व गृहहि शाश्वत.

१४१. म्हणजे समस्त ईश-देणग्यांहुन श्रेष्ठ अशी जी देणगी त्यांना लाभेल ती अल्लाहची प्रसन्नता होय. ही अशी देणगी होय जी समस्त देणग्यांची किल्ली होय कारण ज्याच्या हाती आकाश व जमीनीचे खजीने आहेत त्याची प्रसन्नता प्राप्त झाल्यानंतर दासाचे त्यांच्या देणग्यांनी मालामाल होणे एक आवश्यक गोष्ट होय. आणि हे असे सद्‌भाग्य होय की ज्यात मन: शांती ची पूर्ण सामुग्री व अध्यात्मिक आनंदाची समस्त रहस्ये लपलेली आहेत. हेच ते अंतिम उद्दिष्ट ज्याच्या प्राप्तीची आकांक्षा ईमान बाळगणाऱ्यांच्या मनांत उचंबळत असते.

१४२. म्हणजे दांभिकांशी आता क्षमा-व्यवहार केला न जावा किंबहुना सक्तीचा मामला केला जावा आणि आवश्यक तो त्यांच्या विरूद्ध सामर्थ्याचाहि वापर केला जावा. सक्तीचा हा आदेश अशासाठी दिला गेला की त्यांचा दंभ उघड झाला होता व त्यांचे कुफ्र उघडरित्या समोर आले होते. हे केवळ नामधारी मुसलमान होते. परंतु इस्लाम वैराच्या दृष्टीने ह्यांच्यात व काफ़ीरांमध्ये कसलाहि फरक नव्हता. कुफ्र-नितीची वचने यांच्या तोंडून तर निघतच होती, याखेरीज त्यांनी इस्लामला हानी पोहचविण्यात व मुसलमानांचे धैर्य खचविण्यात व त्यांच्यात उपद्रव माजविण्यात कसलीहि कसर बाकी ठेवली नव्हती. येथपावेतो की ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विरूद्ध देखील कट रचत राहीले. यास्तव आस्तीनीत लपलेल्या या सापांशी शत्रूसारखा मामला करणे आवश्यक होते.

१४३. म्हणजे इस्लाम व पैगंबराविरूद्ध त्यांनी निरनिराळ्या प्रकारची कारस्थाने केली परंतु त्यांचे कोणतेहि कट-कारस्थान व त्यांची कोणतीही योजना यशस्वी होऊ शकली नाही.

१४४. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे मदीना येथे स्थलांतर होण्याअधी मदीनेचे सर्वसामान्य लोक गरीब होते. पैगंबरांच्या शुभागमना नंतर जेव्हा मदीना शहर इस्लामचे शासन-स्थळ बनले तेव्हा व्यापाराचाहि विकास झाला आणि मग विजयांचा जो क्रम सुरू झाला व विपुल सम्पत्ति मुसलमानांच्या हाती लागली. अशा प्रकारे अल्लाहने त्यांच्या उपजिविकेत वृद्धि निर्माण केली व त्याच्या पैगंबराने आपल्या उपकारांनी त्यांना उपकृत केले परंतु त्यांनी याच्या उत्तरादाखल अल्लाहशी कुफ्र व त्याच्या पैगंबराशी शत्रूत्वाचे वर्तन अंगिकारले.

**७५.** आणि त्यांच्यात काही असेहि लोक आहेत ज्यांनी अल्लाहशी वायदा केला होता की जर त्याने आपल्या कृपेने आम्हाला प्रदान केले तर आम्ही अवश्य दान करू आणि सदाचारी बनून राहू .

وَمِنْهُمْ مَّنْ عٰهَدَ اللّٰهَ لَئِنْ اٰتٰىنَا مِنْ فَضْلِهٖ لَنَصَّدَّقَنَّ
وَلَنَكُوْنَنَّ مِنَ الصّٰلِحِيْنَ ﴿٧٥﴾

**७६.** परंतु जेव्हा अल्लाहने त्यांना आपल्या कृपेने प्रदान केले तेव्हा ते कृपणाता करू लागले आणि आपल्या प्रतिज्ञेपासून फिरले अर्थात ते आहेतच (सद्‌वर्तनापासून) पूर्णतः परावृत्त.

فَلَمَّآ اٰتٰىهُمْ مِّنْ فَضْلِهٖ بَخِلُوْا بِهٖ وَتَوَلَّوْا وَّهُمْ مُّعْرِضُوْنَ ﴿٧٦﴾

**७७.** याचा परिणाम असा झाला की त्याने (अल्लाहने) त्यांच्या मनात आपल्या समोर हजर होण्याच्या दिवसापर्यंत दांभिकता बसविली. हे अशासाठी की त्यांनी अल्लाहशी केलेल्या वायद्याचे उल्लंघन केले व अशासाठी की ते खोटे बोलत राहीले.[१४५]

فَاَعْقَبَهُمْ نِفَاقًا فِيْ قُلُوْبِهِمْ اِلٰى يَوْمِ يَلْقَوْنَهٗ
بِمَآ اَخْلَفُوا اللّٰهَ مَا وَعَدُوْهُ وَبِمَا كَانُوْا يَكْذِبُوْنَ ﴿٧٧﴾

**७८.** काय त्यांना हे माहीत नाही की अल्लाह त्यांचे रहस्य-भेद व त्यांच्या कानगोष्टी जाणतो आणि अल्लाह अपरोक्षाच्या समस्त गोष्टींना जाणणारा आहे.

اَلَمْ يَعْلَمُوْٓا اَنَّ اللّٰهَ يَعْلَمُ سِرَّهُمْ وَنَجْوٰىهُمْ
وَاَنَّ اللّٰهَ عَلَّامُ الْغُيُوْبِ ﴿٧٨﴾

**७९.** जे लोक प्रसन्न मनाने खर्च करणाऱ्या ईमानधारकांवर दानाबाबत टोमणे मारतात व त्या लोकांची थट्टा उडवितात ज्यांना आपल्या मेहनत मजूरी शिवाय खर्च करण्यास काहीहि लाभत नाही [१४६] अल्लाह त्यांची थट्टा उडवितो व त्यांच्याकरीता दु:खदायक शिक्षा आहे.

اَلَّذِيْنَ يَلْمِزُوْنَ الْمُطَّوِّعِيْنَ مِنَ الْمُؤْمِنِيْنَ فِي
الصَّدَقٰتِ وَالَّذِيْنَ لَا يَجِدُوْنَ اِلَّا جُهْدَهُمْ
فَيَسْخَرُوْنَ مِنْهُمْ ۭ سَخِرَ اللّٰهُ مِنْهُمْ ۡ وَلَهُمْ عَذَابٌ اَلِيْمٌ ﴿٧٩﴾

**८०.** (हे पैगंबर !) तुम्ही यांच्यांसाठी क्षमेची प्रार्थना करा किंवा न करा तुम्ही जर सत्तर वेळा देखील यांच्याकरीता क्षमेची प्रार्थना कराल तरी देखील अल्लाह यांना कदापि माफ करणार नाही. हे अशासाठी की यांनी अल्लाह व त्याच्या पैगंबराशी कुफ्र केले [१४७] आणि अल्लाह ''फासिक'' (अवज्ञाकारी) लोकांना सन्मार्ग दाखवित नाही.[१४८]

اِسْتَغْفِرْ لَهُمْ اَوْ لَا تَسْتَغْفِرْ لَهُمْ ۭ اِنْ تَسْتَغْفِرْ لَهُمْ سَبْعِيْنَ مَرَّةً
فَلَنْ يَّغْفِرَ اللّٰهُ لَهُمْ ۭ ذٰلِكَ بِاَنَّهُمْ كَفَرُوْا بِاللّٰهِ وَرَسُوْلِهٖ ۭ
وَاللّٰهُ لَا يَهْدِي الْقَوْمَ الْفٰسِقِيْنَ ﴿٨٠﴾

१४५. स्पष्ट झाले की अल्लाहशी वायदा करून पराड़गमुख होण्याने व खोटे बोलत राहिल्याने मनात दंभाचे पालन पोषण होते.

१४६. तबुक युद्धाच्या प्रसंगी प्रवास व युद्धाचा विपुल विनियोग लक्षात घेता अधिकाधिक खर्च करण्याची गरज होती. या महत्वपूर्ण प्रसंगी दांभिकांनी अल्लाहच्या मार्गात खर्च करण्यापासून आपला हात रोखला परंतु ज्या खऱ्या मुसलमानांनी मोठमोठे साम्पत्तिक बलीदान दिले तेव्हा त्यांना हा टोमणा मारण्यात आला की ते देखावा म्हणून असे करीत आहेत आणि त्यांच्यात जे लोक गरीब होते त्यांनी जेव्हा आपल्या काबाड कष्टाचा नजराणा अल्लाहच्या मार्गात सादर केला तेव्हा त्यांची कदर न करता दांभिक थट्टा उडवू लागले की अल्लाहला अशा तुच्छ धनाची गरज नाही.

१४७. म्हणजे ह्या दांभिकांची बाह्य स्थिती अशी आहे की ते मुसलमान आहेत कारण ते नमाज़हि पढतात व ज़कातहि अदा करतात, तेव्हा शक्य आहे की तुम्ही यांच्या बाह्य स्वरूपावर विश्वास ठेवून त्यांच्याकरीता अल्लाहकडे क्षमा याचना करावी. परन्तु ज्याअर्थी ते आपल्या मनात अल्लाह व त्याच्या प्रेषिता विरूद्ध कुफ्रमय भावना बाळगतात म्हणून अल्लाह त्यांना कदापि माफ करणार नाही. अल्लाहजवळ ज्या प्रकारे शिर्क अक्षम्य अपराध आहे, तद्वतच कुफ्र देखील अक्षम्य गुन्हा होय.

स्पष्ट असावे की सत्तर वेळा शी अभिप्रेत आधिक्य होय, एक विशिष्ट संख्या नव्हे आणि हेतु निश्चितच या गोष्टीची घोषणा करणे होय की दांभिकांच्या हक्कात पैगंबराची क्षमा-प्रार्थना देखील स्वीकृत करण्यायोग्य नाही, मग ती कितीही वेळा केली जावो.

जवळजवळ हीच गोष्ट सूरह मुनाफिकून मध्येहि सांगितली गेली आहे जी सूरह तौबाच्या फार आधी अवतरीत झाली होती.

१४८. येथे 'फासिक'शी अभिप्रेत ते अवज्ञाकारी लोक होत ज्यांची अवज्ञा कुफ्रमय भावनांसह असते अशा लोकांसाठी यशाचा मार्ग उघडत नाही.

८१. ज्या लोकांना मागे सोडून देण्यात आले होते [१४९] त्यांना अल्लाहच्या पैगंबरामागे बसून राहण्यात आनंद झाला व त्यांना ही गोष्ट अप्रिय वाटली की आपल्या धनाने व आपल्या प्राणाने अल्लाहच्या मार्गात जिहाद करावे. त्यांनी सांगितले की उन्हाळ्यात निघू नका-संगा जहन्नमची आग याहून कितीतरी जास्त गरम आहे.[१५०] त्यांनी समजून घेतले असते तर बरे झाले असते.

فَرِحَ الْمُخَلَّفُونَ بِمَقْعَدِهِمْ خِلَافَ رَسُولِ اللّٰهِ
وَكَرِهُوٓا أَنْ يُّجَاهِدُوا بِأَمْوَالِهِمْ وَأَنْفُسِهِمْ فِي سَبِيلِ اللّٰهِ
وَقَالُوا لَا تَنْفِرُوا فِي الْحَرِّ ۗ قُلْ نَارُ جَهَنَّمَ أَشَدُّ
حَرًّا ۚ لَوْ كَانُوا يَفْقَهُونَ ﴿٨١﴾

८२. आता त्यांनी हसावे थोडे व रडावे जास्त,[१५१] या (दुष्कृत्या) च्या मोबदल्यात जे हे कमवित राहीलेत.

فَلْيَضْحَكُوا قَلِيلًا وَّلْيَبْكُوا كَثِيرًا ۚ جَزَآءًۢ بِمَا
كَانُوا يَكْسِبُونَ ﴿٨٢﴾

८३. जर अल्लाह यांच्या एखाद्या समूहाकडे तुम्हाला परत नेईल [१५२] आणि ते तुमच्याकडून (जिहाद करीता) निघण्याची आज्ञा मागतील तेव्हा सांगा तुम्ही माझ्या सोबत कधीच निघू शकत नाही आणि ना माझ्या सोबतीला येऊन शत्रूशी लढू शकता [१५३] तुम्ही पहिल्यांदा बसून राहणे पसंत केले तेव्हा आताहि मागे राहणाऱ्यांसह बसून रहा.

فَإِنْ رَّجَعَكَ اللّٰهُ إِلٰى طَآئِفَةٍ مِّنْهُمْ فَاسْتَأْذَنُوكَ لِلْخُرُوجِ
فَقُلْ لَّنْ تَخْرُجُوا مَعِيَ أَبَدًا وَّلَنْ تُقَاتِلُوا مَعِيَ عَدُوًّا ۖ إِنَّكُمْ
رَضِيتُمْ بِالْقُعُودِ أَوَّلَ مَرَّةٍ فَاقْعُدُوا مَعَ الْخَالِفِينَ ﴿٨٣﴾

८४. आणि यांच्यापैकी जो मरेल त्याची नमाज़ (जनाज़ा) तुम्ही मुळीच पढू नका आणि ना कधी त्याच्या कबरीवर उभे रहा, कारण त्यांनी अल्लाह व त्याच्या पैगंबराशी कुफ्र केले व अशा स्थितीत मेले की ते आज्ञाभंग करणारे होते.[१५४]

وَلَا تُصَلِّ عَلٰٓى أَحَدٍ مِّنْهُمْ مَّاتَ أَبَدًا وَّلَا تَقُمْ عَلٰى قَبْرِهٖ ۖ
إِنَّهُمْ كَفَرُوا بِاللّٰهِ وَرَسُولِهٖ وَمَاتُوا وَهُمْ فٰسِقُونَ ﴿٨٤﴾

८५. आणि त्यांच्या सम्पत्ति व संतती ने तुम्हाला अचंब्यात न टाकावे-अल्लाह तर हे इच्छितो की यांच्याद्वारे जगात त्यांना शिक्षा द्यावी व त्यांचे प्राण या स्थितीत निघावे की ते काफ़ीर असावेत.[१५५]

وَلَا تُعْجِبْكَ أَمْوَالُهُمْ وَأَوْلَادُهُمْ ۚ إِنَّمَا يُرِيدُ اللّٰهُ أَنْ يُّعَذِّبَهُمْ
بِهَا فِي الدُّنْيَا وَتَزْهَقَ أَنْفُسُهُمْ وَهُمْ كٰفِرُونَ ﴿٨٥﴾

८६. आणि जेव्हा एखादी सूरत (या आदेशा सह) अवतरीत होते की अल्लाह वर ईमान बाळगा व त्याच्या पैगंबरासह मिळून जेहाद करा तेव्हा जे लोक यांच्यापैकी सामर्थ्य बाळगणारे आहेत तेच तुमच्याकडून परवानगी मागू लागतात व म्हणतात की आम्हाला सोडून द्या कारण आम्ही बसणाऱ्यांच्या बरोबर राहू.[१५६]

وَإِذَآ أُنْزِلَتْ سُورَةٌ أَنْ اٰمِنُوا بِاللّٰهِ وَجَاهِدُوا مَعَ رَسُولِهِ
اسْتَأْذَنَكَ أُولُوا الطَّوْلِ مِنْهُمْ وَقَالُوا ذَرْنَا نَكُنْ مَّعَ الْقٰعِدِينَ ﴿٨٦﴾

१४९. अभिप्रेत ते दांभिक होत ज्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने तबूक युद्धात सहभागी होण्यापासून वंचित ठेवले.

१५०. विलासप्रिय मनुष्य सत्य-मार्गातील कष्ट यातना सहन करण्यास तयार नसतो आणि असे समजतो की जर आखिरत क़ायम झाली तर तेथे त्याला सुखरूपतेचे जीवन लाभेल. हा स्वत:शीच धोका आहे ज्यात मनुष्य ग्रस्त असतो परंतु जेव्हा आखिरत क़ायम होईल व जहन्नमला तो आपल्या समोर पाहील देव्हा या गोष्टीचे त्याला आकलन होईल की अल्लाह च्या मार्गात उद्‌भवणाऱ्या कष्ट यातनांना सहन न करून त्याने त्याहून जास्त सक्त कष्ट यातनांना आमंत्रण दिले आहे. इहलोकाच्या ज्या उष्णतेपासून घाबरून आपल्या कर्तव्य पूर्ततेत तो अंग चोरीत राहीला,ती जहन्नमच्या उष्णतेच्या तुलनेने काहीच नव्हती.

१५१. म्हणजे यांचे हसण्याचे दिवस फार थोडे राहीलेत यापुढे त्यांना रडतच रहावयाचे आहे.

१५२. ह्या आयती तबूक युद्धाहून परतताना प्रवासात अवतरीत झाल्या होत्या.

१५३. संकेत या गोष्टीकडे आहे की आता या दांभिकांना कोणत्याहि जिहादमध्ये निघण्याची सुबुद्धि लाभणार नाही.

१५४. आयत क्र. ७३ मध्ये दांभिकांशी सक्तीने वागण्याची जी आज्ञा दिली गेली होती हा आदेश त्या क्रमातील एक होय आणि त्या दांभिकांबाबत आहे ज्यांचे दंभ उघंडरित्या प्रकट झाले असावे आणि ज्यांच्या हातून स्पष्ट कुफ्र घडले असावे अशा लोकांची नमाज़-जनाज़ा (दफन विधीपूर्वी अदा केली जाणारी नमाज़) पढण्यास मनाई केली गेली आहे व त्यांच्या कबरीवर उभे राहण्यासहि क़बरीवर उभे राहण्याचा अर्थ कबरीवर जाऊन मृतासाठी क्षमा-प्रार्थना करणे व दया भावना प्रकट करणे होय. हा मनाई हुकुम ज्या प्रकारे दांभिकांबाबत आहे तद्‌वतच काफ़ीर, अनेकेश्वरवादी व नास्तिकांकरीताहि आहे; कारण जे लोक मरेपर्यंत काफीर राहीले ते अल्लाहचे शत्रू होत आणि अल्लाहच्या शत्रूंकरीता ईमान बाळगणाऱ्याच्या मनात कोमल भाव असू शकत नाही.

अल्लामा इब्ने तैमीय्या यांना जेव्हा विचारले गेले की एखादा मुसलमान एखाद्या ख्रिश्चनच्या जनाज़ा मागे चालू शकतो काय, तेव्हा त्यांनी उत्तर दिले नाही त्याच्या जनाज़ा मागे न चालावे. आणि ज्याअर्थी ख्रिश्चन कुफ्र-स्थितीत मेला यास्तव तो जहन्नमला पात्र ठरला म्हणून त्याची नमाज़ न पढावी.

(मज्मुअ-फतावा इब्ने तैमीय्या खं.२४ पृ. २६५)

परंतु आजच्या काळात संधी सांधू मुसलमानांना अनेकेश्वर वाद्यांच्या मृत्युयात्रेत सहभागी होण्यात, त्यांचा अस्ति-कलश उठविण्यात, त्यांच्या समाधीवर जाऊन फूल चढविण्यात व श्रद्धांजली अर्पण करण्यात कसलाहि संकोच वाटत नाही आणि ज्यांच्यावर राजकीय हिताचा प्रभाव असतो किंवा ज्यांना अल्लाहच्या आयतीना विकण्याची कला चांगली अवगत असते ते अनेकेश्वरवादी नेत्यांच्या मृत्युसमयी त्यांच्या डोक्याशी बसून क़ुरआन-पठन करावयासहि चुकत नाही, वस्तुत: हे नेते आयुष्यभर क़ुरआन हा ईश-ग्रंथ असण्यासंबंधी इन्कार करीत राहीलेत.

या आयतीच्या भाष्यात सर्वसाधारणपणे हे कथन उल्लेखिले जाते की पैगंबरांनी दांभिकांचा सरदार अब्दुल्लाह बिन उबई याची नमाज़-जनाज़ा पढवली होती ज्यावर ही आयत अवतरीत झाली. यास्तव ''बुखारी'' या हदीस संग्रहात आहे:-

अब्दुल्लाह बिन उमर द्वारे उल्लिखित आहे की जेव्हा अब्दुल्लाह बिन उबई मरण पावला तेव्हा त्याचा मुलगा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत उपस्थित झाला. पैगंबरांनी त्याला आपला कुर्ता दिला आणि फर्माविले की यात त्याचा कफन विधी करावा मग पैगंबर उभे राहीले, यासाठी की त्याची नमाज़-जनाज़ा पढावी परंतु उमर बिन खत्ताब यांनी पैगंबरांचे वस्त्र धरले व म्हणाले की आपण याची नमाज़ पढणार, जेव्हा की तो दांभिक आहे आणि अल्लाहने आपणास त्यांच्याकरीता क्षमेची प्रार्थना करण्यास रोखले आहे. पैगंबरांनी फर्माविले अल्लाहने मला (दोन्ही गोष्टींचा) अधिकार दिला आहे. जसे फर्माविले तुम्ही यांच्याकरीता क्षमेची प्रार्थना करा वा न करा. जर तुम्ही सत्तर वेळाहि यांच्याकरीता क्षमेची प्रार्थना कराल तरी देखील अल्लाह यांना माफ करणार नाही, (या आयतीचे पठण करून) पैगंबरांनी फर्माविले, मी सत्तर वेळाहूनहि अधिक क्षमेची प्रार्थना करीन. हज़रत उमर फर्मावितात की मग पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्याची नमाज़-जनाज़ा अदा केली व त्यांच्या सोबत आम्हीहि अदा केली. त्यानंतर अल्लाहेने पैगंबरांवर ही आयत अवतरीत केली.

''आणि यांच्यापैकी जो मरेल त्याची नमाज़ (जनाज़ा) मुळीच पढू नका व कधीहि त्यांच्या कबरीवर उभे राहू नका कारण त्यांनी अल्लाह व त्याच्या पैगंबराशी कुफ्र केले व अशा स्थितीत मेले की ते आज्ञाभंग करणारे होते.''

(बुखारी किताबुत्तफसीर)

ही हदीस बुखारीची आहे व तिचे कथन-कर्ता विश्वसनीय आहेत परंतु काही विद्वानांनी या हदीसचे सप्रमाण असण्यास व तिला मान्य करण्यास इन्कार केला आहे:

''काजी अबु बक्र म्हणतात, या हदीसाला मान्य करणे उचित नव्हे व ना ही गोष्ट खरी आहे की हे अल्लाहच्या

पैगंबराचे कथन आहे आणि काजी अबु बक्र बाकलानी अत-तकरीब' या पुस्तकांत लिहीतात:

ही हदीस 'अखबर आहाद' पैकी आहे जिचे सिद्ध असणे ज्ञात नाही आणि इमामुल हरमैन आपल्या 'मुख्तसर' या पुस्तकात लिहितात की या हदीसची गणना सहीह हदीसीमध्ये होत नाही आणि बुरहान' मध्ये ते म्हणतात, अहले हदीस या हदीसला खरे जाणत नाही आणि इमाम गजाली 'अल-मुस्तस्फा' या पुस्तकांत म्हणतात की स्पष्टतम गोष्ट अशी की ही हदीस सहीह (खरी) नव्हे व या हदीसचे भाष्यकार दाऊदी म्हणतात की ही असुरक्षित आहे.''

(फतहुल बारी खं. ८ पृ. २७२)

या हदीस संबंधी जी दुष्करता जाणवते ती थोडक्यात पुढील प्रमाणे:

१) बुखारी ने जेथे ही हदीस वर्णिली आहे तेथे एक दुसरी हदीस हज़रत जाबीर यांचे कडूनहि वर्णिली आहे जी याहून अगदी असुसंगत आहे.

''हज़रत जाबीर फर्मावितात, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अब्दुल्लाह बिन उबई जवळ त्याच्या दफनविधी नंतर पोहचले. मग पैगंबरानी त्याला बाहेर काढविले व त्याच्या तोंडात आपल्या तोंडातील लाळ टाकली व त्यास आपला कुर्ता (सदरा) घातला.'' (बुखारी किताबुल् जनाइज़)

दोन्ही हदीस बुखारीच्याच आहेत परंतु एकीत उल्लेख आहे की जेव्हा अब्दुल्लाह बिन उबईचा पुत्र पैगंबरांच्या सेवेत उपस्थित झाला तेव्हा पैगंबरानी आपला कुर्ता दिला मग त्याची नमाज़ जनाज़ा अदा केली आणि एका कथनात हे शब्द देखील आहेत की पैगंबरांनी त्यास फर्माविले, मला कळवा मी नमाज़ पढेन. मग त्याने पैगंबराना (मयत तयार असल्याचे) कळविले आणि जेव्हा पैगंबर त्याची नमाज़ पढण्याकरीता पुढे सरसावले तेव्हा हज़रत उमर यांनी पैगंबराना रोखण्याचा प्रयत्न केला. (बुखारी किताबुल जनाइज़)

आणि दुसऱ्या हदीस मध्ये आहे की दफन विधी झाला होता परंतु पैगंबरानी त्याचे शव कबरीतून काढवून आपला अंगरखा घातला. उघड आहे या हदीसींमध्ये स्पष्ट विरोध आहे, आणि या विरोधाचे दुसरे उदाहरण असे की बुखारी ने अब्दुल्लाह बिन उमरची रिवायत (कथन) उल्लिखित केली आहे त्यात سَازِيدُهٗ عَلَى سَبْعِيْنَ 'साजीदुहु अला सब्ईन' हे शब्द आहेत म्हणजे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले की मी सत्तर वेळा हूनहि अधिक वेळा क्षमेची प्रार्थना करीन; परंतु इब्ने अब्बास ने जे कथन उल्लेखित केले आहे त्यात पैगंबराना हे शब्द संबोधिले गेले आहेत.

لَوْ اَعْلَمُ اَنِّيْ اِنْ زِدتُ عَلَى السَّبْعِيْنَ يُغْفَرُ لَهٗ لَزِدْتُ عَلَيْهَا

''म्हणजे जर मला हे माहीत असते की सत्तर वेळाहून अधिक दुआ केल्याने याला माफ केले जाईल. तर मी याहून अधिक वेळा दुआ केली असती.''

(बुखारी किताबुत तफसीर सूरह. तौबा)

दोन्ही गोष्टीत अर्थाच्या दृष्टीने मोठा फरक आहे. पहिली गोष्ट बिनशर्त आहे, व दुसरी शर्त असलेली आणि अल्लामा जस्सास म्हणतात की काही कथनांमध्ये لَأَزِيْدَنَّ عَلَى سَبْعِيْنَ 'मी सत्तर वेळतहि वाढ करीन' या अर्थाचे जे शब्द आहेत ती कथन कर्त्याची चूक आहे कारण सर्वश्रेष्ठ अल्लाहने ही खबर दिली होती की या लोकांनी अल्लाह व त्याच्या पैगंबराशी कुफ्र केले व पैगंबराना हे माहित होते की यांची माफी होणार नाही मग पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी कशा प्रकारे काफ़ीरांकरीता अल्लाहजवळ क्षमेची याचना केली असावी. वस्तुत: खरे कथन ते होय ज्यात हे शब्द उल्लिखित आहेत.

لَوْ عَلِمْتُ اَنِّيْ لَوْ زِدْتُ عَلَى السَّبْعِيْنَ غُفِرَ لَهُمْ لَزِدْتُ عَلَيْهَا

अर्थात जर मला हे माहित असते की सत्तर वेळाहून अधिक वेळा दुआ केल्याने त्यांना माफी मिळेल तर मी याहून अधिक वेळा दुआ केली असती. (अहकामुल क़ुरआन जस्सास खं. ३ पृ. १७७)

२) ही हदीस प्रमाणांच्या दृष्टीने विविधरित्या वर्णिली गेली आहे परंतु मधील कडी उबैदुल्लाह बिन अब्दुल्लाह बिन उतबा आहेत किंवा उबैदुल्लाह बिन अब्दुल्लाह बिन उमर आहेत. म्हणजे हिचे स्थान खबर वाहिद (एका कथनकर्त्यांद्वारे वर्णिले गेलेले कथना) चे आहे व खबर वाहीद हुज्जत (प्रमाण) जरूर आहे मात्र या अटीवर की ती क़ुरआन व सुन्नाह च्या विरोधात नसावी.

३) मुस्नद अहमदच्या इब्ने अब्बास उल्लिखित हदीसमध्ये हे स्पष्टीकरण आहे की,

ثم صلّٰى عَلَيْهِ وَمَشٰى مَعَهٗ وَقَامَ عَلٰى قَبْرِهٖ

मग पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्याची नमाज़ जनाज़ा अदा केली व जनाज़ासोबत चालले व त्याच्या कबरीवर उभे राहीले, जेव्हा हज़रत जाबीर यांची बुखारीची हदीस हे दर्शविते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अब्दुल्लाह बिन उबईच्या कबरीवर त्याचा दफन-विधी झाल्यानंतर पोहचले. या दोन्ही हदीस मधील विसंगति अल्लामा सिंदी यांनीहि मान्य केली आहे. यास्तव ते लिहीतात की-ही हदीस मागील हदीसच्या विरूद्ध आहे कारण यात स्पष्टत: हे वर्णिले गेले आहे की पैगंबरानी नमाज़ जनाज़ा अदा केली व

त्याआधी त्यांनी अंगरखा देऊन टाकला होता... परंतु तसदी घेऊन ही हदीस दर्शविते की पैगंबरांचे आगमन नंतर झाले व त्यानंतर अंगरखा घातला. काही विद्वानांनी दोन्ही हदीस मध्ये मेळ बसविण्याचा प्रयत्न केली आहे. परंतु अशाने आक्षेपाचे पूर्णता: परिमार्जन होत नाही.

(सुनन नसाई ख. ४ पृ. ३८ हाशिया सिंदी)

४) इब्ने जरीर तबरी हज़रत अनस द्वारे उल्लेखितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अब्दुल्लाह बिन उबई यांची नमाज़-जनाज़ा अदा करण्याचा इरादा केला तेव्हा हज़रत जिब्रील यांनी पैगंबरांचे पदर धरले व ही आयत पढली परंतु ज्याप्रकारे इब्ने कसीर यांनी स्पष्टीकरण केले आहे, तिचा एक कथन कर्ता यजदि रक्काशी आहे जो प्रमाणदृष्ट्या जईफ (कमकुवत) आहे.

(तफसीर इब्ने कसीर-खं. २ पृ. २७९)

तरीसुद्धा अनुमानाची गोष्ट हीच की जिब्रील यांनी पैगंबरांना रोखले असेल व संभवत: दुसऱ्या कथन-कर्त्यांचा हा गैरसमज झाला की हज़रत उमर यांनी पैगंबराना रोखण्याचा प्रयत्न केला. याच करणास्तव अल्लामा राजी यांनी तफसीर कबीर मध्ये आणि मौलाना मौदूदी यांनी तफ़हीमुल क़ुरआन मध्ये या प्रमाण दृष्ट्यां कमकुवत कथनांवर भरवसा केला आहे जेव्हा बुखारी, मुस्लिम इ. चा कथनांमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी नमाज़ जनाज़ा पढविल्याचा उल्लेख स्पष्टत: आहे जणू त्यांच्या दृष्टीने मजकूराला लक्षात घेता ही जईफ (कमकुवत) हदीस बुखारीच्या हदीसच्या तुलेने प्राधान देण्यायोग्य आहे.

५) आयतीची वर्णन शैली दर्शविते की ही आयत तबुक युद्धाहून परतीच्या प्रवासात अवतरीत झाली होती कारण याशी संबंधित पूर्वीच्या आयतीत आहे. ''जर अल्लाह तुम्हाला यांच्यापैकी एखाद्या समूहाकडे परत पोहोचवील' जो या गोष्टीचा पुरावा होय की ह्या आयती पैगंबर मदीना पोहचण्याच्या आधीच अवतरीत झाल्या होत्या आणि अबदुल्लाह बिन उबईचा मृत्यु पैगंबर मदीनेस परतल्यानंतर सुमारे दोन महीने म्हणजे जीकदा ९ हिजरी मध्ये झाला. म्हणून ही हदीस आयतीच्या वर्णन-शैलीशी सुसंगत नाही, किंबहुना आयत ७३ पासून जो मजकूर सुरू होतो तो या आयती पावेतो एक सुसंगत विषय आहे व त्यात दांभिकांशी जिहाद करण्याची व सक्तीने वागण्याची जी आज्ञा दिली गेली आहे, ती लक्षात घेता या गोष्टीस कसले अनुमान आहे की पैगंबर दांभिक-सरदाराशी इतपत नरमीचा व्यवहार करतील की त्याला आपला अंगरखा देतील व त्याची नमाज़-जनाज़ा अदा करतील?

६) अब्दुल्लाह बिन उबई चा पुत्र अब्दुल्लाह खरा व सदाचारी मुसलमान होता. बनीमुस्तलिकच्या युद्ध-प्रसंगी जेव्हा अब्दुल्ला बिन उबई ही अनादराची गोष्ट बोलला की आम्ही मदीना परतू तेव्हा जो प्रतिष्ठित आहे तो अपमानितास बाहेर घालविल. तेव्हा त्याचा मुलगा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत हजर झाला व आपल्या पित्याची मान स्वहस्ते उडविण्याची आज्ञा मागितली.

(सीरत इब्ने हिशाम खं. ३ पृ. ३३७)

काय असा मनुष्य पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याकडून आपल्या दांभिक पित्याकरीता अंगरखा मागील व त्याची नमाज़ जनाज़ा पढण्याची विनंती करील?

ह्या अडचणींना लक्षात घेता घटनेचे ते स्वरूप जे उल्लिखित हदीसीमध्ये प्रस्तुत केले गेले आहे; योग्य वाटत नाही. अल्लाहच अधिक चांगले जाणतो की घटना काय होती व वर्णन कशाप्रकारे झाले.

१५५. याचे स्पष्टीकरण टीप क्र. १०३ मध्ये केले गेले आहे.

१५६. संकेत आहे त्या दांभिकांकडे जे सामर्थ्यवान असूनहि जिहाद करीता निघाले नाहीत व निमित पुढे करून रजा मागू लागले.

८७. त्यांनी मागे राहणाऱ्यां (स्त्रीयां) बरोबर राहणे पसंत केले [१५७] आणि त्यांच्या हृदयांवर मोहर लावली गेली.[१५८] यास्तव त्यांना काही समजत नाही.

رَضُوا بِأَنْ يَكُونُوا مَعَ الْخَوَالِفِ وَطُبِعَ عَلَىٰ قُلُوبِهِمْ
فَهُمْ لَا يَفْقَهُونَ ﴿٨٧﴾

८८. परंतु पैगंबराने आणि त्या लोकांनी ज्यांनी त्याच्या बरोबर ईमान बाळगले आहे, आपल्या धनाने व प्राणाने जिहाद केले. हेच लोक होत की ज्यांच्या करीता भल्या गोष्टी आहेत आणि हेच लोक सफल होणारे आहेत.

لَٰكِنِ الرَّسُولُ وَالَّذِينَ آمَنُوا مَعَهُ جَاهَدُوا
بِأَمْوَالِهِمْ وَأَنْفُسِهِمْ ۚ وَأُولَٰئِكَ لَهُمُ الْخَيْرَاتُ ۖ وَأُولَٰئِكَ
هُمُ الْمُفْلِحُونَ ﴿٨٨﴾

८९. अल्लाहने यांच्याकरीता बागा तयार करून ठेवल्या आहेत, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत आहेत-त्यात ते सदैव राहतील- ही सर्वात मोठी सफ़लता होय.

أَعَدَّ اللَّهُ لَهُمْ جَنَّاتٍ تَجْرِي مِنْ تَحْتِهَا الْأَنْهَارُ خَالِدِينَ
فِيهَا ۚ ذَٰلِكَ الْفَوْزُ الْعَظِيمُ ﴿٨٩﴾

९०. बद्दू (ग्राम-वासीयां) पैकीहि (खोट्या) सबबी सांगणारे आले, यासाठी की त्यांना देखील परवानगी दिली जावी [१५९] आणि जे लोक अल्लाह व त्याच्या पैगंबराशी खोटे बोलले होते ते बसून राहीले [१६०] या (ग्राम-वासीयां) पैकी ज्या लोकांनी कुफ्र केले ते लवकरच दु:खदायक शिक्षेला तोंड देतील. [१६१]

وَجَاءَ الْمُعَذِّرُونَ مِنَ الْأَعْرَابِ لِيُؤْذَنَ لَهُمْ وَقَعَدَ الَّذِينَ
كَذَبُوا اللَّهَ وَرَسُولَهُ ۚ سَيُصِيبُ الَّذِينَ كَفَرُوا مِنْهُمْ
عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٩٠﴾

९१. दुर्बल, आजारी व त्या लोकांवर कसलाहि गुन्हा नाही ज्यांना खर्चा करीता काहीहि उपलब्ध नाही जेव्हा ते अल्लाह व त्याच्या पैगंबराशी एकनिष्ठता बाळगतील.[१६२] अशा सदाचारी लोकांवर कसलाहि आरोप नाही आणि अल्लाह मोठा माफ करणारा व दया करणारा आहे.

لَيْسَ عَلَى الضُّعَفَاءِ وَلَا عَلَى الْمَرْضَىٰ وَلَا عَلَى الَّذِينَ
لَا يَجِدُونَ مَا يُنْفِقُونَ حَرَجٌ إِذَا نَصَحُوا لِلَّهِ وَرَسُولِهِ ۚ
مَا عَلَى الْمُحْسِنِينَ مِنْ سَبِيلٍ ۚ وَاللَّهُ غَفُورٌ رَحِيمٌ ﴿٩١﴾

९२. आणि ना त्या लोकांवर कसलाहि आरोप आहे, जे तुमच्याजवळ आले की तुम्ही त्यांच्याकरीता वाहनाची व्यवस्था करावी आणि जेव्हा तुम्ही म्हणाले की मी तुमच्या करीता वाहनाची व्यवस्था करू शकत नाही तेव्हा ते अशा अवस्थेत परतले की खर्च करण्याचे सामर्थ्य नसण्याच्या दु:खात डोळे अश्रू ढाळीत होते.[१६३]

وَلَا عَلَى الَّذِينَ إِذَا مَا أَتَوْكَ لِتَحْمِلَهُمْ قُلْتَ لَا أَجِدُ
مَا أَحْمِلُكُمْ عَلَيْهِ تَوَلَّوْا وَأَعْيُنُهُمْ تَفِيضُ مِنَ الدَّمْعِ
حَزَنًا أَلَّا يَجِدُوا مَا يُنْفِقُونَ ﴿٩٢﴾

१५७. म्हणजे त्यांनी स्त्रीयांप्रमाणे घरात बसून राहणे पसंत केले.

१५८. या धैर्य शून्यतेचा व नैतिक अध: पतनाचा परीणाम असा झाला की त्यांची नैतिक जाणीव मृतवत झाली व ते निर्लज्ज बनले. या कैफ़ियतीलाच हृदयांवर मोहर लावण्याच्या अर्थाने घेतले आहे. कारण ही कैफ़ियत त्या स्वभावनियमानुसार निर्माण झाली होती जो सर्वश्रेष्ठ अल्लाहने नैतिक मानसशास्त्रा करीता निर्धारीत केला आहे.

१५९. बद्दू म्हणजे ग्रामीण अरब. हा उल्लेख त्या ग्रामीण दांभिकांचा आहे ज्यांनी तबुक युद्धात सहभागी न होण्याकरीता खोट्या सबबी मांडल्या.

१६०. म्हणजे त्या ग्रामीण अरबांमध्ये काही दांभिक असेहि आहेत की ज्यांनी या गंभीर प्रसंगी पैगंबरांच्या सेवेत उपस्थित होण्याचे तसदी सुद्धा घेतली नाही.

१६१. या दांभिकांच्या हक्कात सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे शिक्षेचा हा वायदा पूर्ण झाला व त्याचे स्वरूप असे की या आयतीला अवतरीत होऊन दोन वर्षाहि लोटली नव्हती की या दांभिकांनी जाहीर वा गुप्तपणे इस्लाम सोडण्याचा मार्ग पत्करला आणि प्रथम खलीफा हज़रत अबु बक्र यांनी या उपद्रवाचा तलवारीने सामना केला.

१६२. म्हणजे ज्या लोकांची सबब खरी आहे त्यांच्यावर ना कसला आक्षेप आहे ना गुन्हा. उदा. वृद्ध, आजारी, शारीरिक दृष्ट्या असमर्थ व नादार लोक, मात्र या अटीवर की त्यांचा संबंध अल्लाह व त्याच्या पैगंबराशी प्रामाणिकतेचा व एकनिष्ठतेचा असावा आणि मागे राहून असे एखादे कृत्य ना करावे जे विपरीत असावे.

१६३. म्हणजे खऱ्या ईमान धारकाच्या भावना अशा प्रकारे असतात. की जे लोक वाहनाची व्यवस्था स्वत: करू शकत नव्हते ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत हजर झाले व आपणास वाहन व्यवस्था करून देण्याबद्दल विनंती केली. परंतु जेव्हा साधन-कमतरतेमुळे पैगंबर त्यांच्याकरीता वाहन व्यवस्था करू शकले नाहीत तेव्हा आपण जिहादच्या सद्भाग्याला मुकणार या जाणीवेने त्यांच्या डोळ्यातून आसवे वाहू लागली.

''मी तुमच्याकरीता वाहन-व्यवस्था करू शकत नाही'' रसूलचे (पैगंबराचे) हे बोल त्यांच्या विवशतेस प्रकट करते परंतु या प्रकारच्या स्पष्ट प्रमाणानंतरहि मुसलमानांचा अडाणी वर्ग पैगंबराला ईश-दर्जा देऊ लागतो व असे समजतो की पैगंबराजवळ खजीने आहेत आणि त्यांनी ईहलोकाचा निरोप घेतला असला तरी त्यांना मदती करीता पुकारणे अगदी योग्य आहे. ही श्रद्धा एकेश्वरवादाच्या अगदी विरुद्ध आहे. आणि पैगंबराची ही उक्ति जी या आयतीत वर्णिली गेली आहे, या श्रद्धेचे खंडन करण्यात पुरेशी आहे.

९३. आरोप वस्तुतः त्या लोकांवर आहे जे श्रीमंत असूनहि तुमच्याकडून परवानगी मागतात त्यांनी मागे राहणाऱ्या स्त्रीयांसह राहणे पसंत केले अल्लाहने त्यांच्या हृदयांवर मोहर लावली, म्हणून ते काही जाणत नाही.

إِنَّمَا السَّبِيلُ عَلَى الَّذِينَ يَسْتَأْذِنُونَكَ وَهُمْ أَغْنِيَاءُ ۚ
رَضُوا بِأَنْ يَكُونُوا مَعَ الْخَوَالِفِ وَطَبَعَ اللَّهُ عَلَىٰ
قُلُوبِهِمْ فَهُمْ لَا يَعْلَمُونَ ﴿٩٣﴾

९४. जेव्हा तुम्ही त्यांच्याकडे परत जाल तेव्हा ते तुमच्या समक्ष सबब मांडतील [१६४] तुम्ही त्यांना सांगा की सबब पुढे करु नका आम्ही तुमच्या गोष्टींवर भरवसा करणारे नाही. अल्लाहने तुमच्या परिस्थितीशी आम्हाला परिचित केले आहे [१६५] आता अल्लाह व त्याचा पैगंबर तुमच्या आचरणास पाहील [१६६] मग तुम्ही त्याच्याकडे परतविले जाल, जो अपरोक्ष आणि वर्तमानाचे क्षान बाळगणारा आहे. तो तुम्हाला दाखवून देईल की तुम्ही काय करीत राहिलात.

يَعْتَذِرُونَ إِلَيْكُمْ إِذَا رَجَعْتُمْ إِلَيْهِمْ ۚ قُلْ لَا
تَعْتَذِرُوا لَنْ نُؤْمِنَ لَكُمْ قَدْ نَبَّأَنَا اللَّهُ مِنْ أَخْبَارِكُمْ ۚ وَ
سَيَرَى اللَّهُ عَمَلَكُمْ وَرَسُولُهُ ثُمَّ تُرَدُّونَ إِلَىٰ عَالِمِ الْغَيْبِ
وَالشَّهَادَةِ فَيُنَبِّئُكُمْ بِمَا كُنْتُمْ تَعْمَلُونَ ﴿٩٤﴾

९५. जेव्हा तुम्ही त्यांच्याकडे परताल तेव्हा ते अल्लाहच्या शपथा वाहतील, अशासाठी की तुम्ही त्यांच्याकडे डोळेझाक करावी, तुम्ही तर त्यांना दृष्टीआड कराच [१६७] ते नापाक (अस्वच्छ, अशुव्द) आहेत [१६८] आणि त्यांचे ठिकाण जहन्नम होय, त्या गोष्टीच्या मोबदल्यात जी ते कमवित राहीले.

سَيَحْلِفُونَ بِاللَّهِ لَكُمْ إِذَا انْقَلَبْتُمْ إِلَيْهِمْ لِتُعْرِضُوا عَنْهُمْ ۖ
فَأَعْرِضُوا عَنْهُمْ ۖ إِنَّهُمْ رِجْسٌ ۖ وَمَأْوَاهُمْ جَهَنَّمُ جَزَاءً بِمَا
كَانُوا يَكْسِبُونَ ﴿٩٥﴾

९६. ते तुमच्या समोर शपथा वाहतील, यासाठी की तुम्ही राजी व्हावे,परंतु तुम्ही त्यांच्याशी राजी झालात तरी अल्लाह अवज्ञाकारी लोकांशी कधीहि राजी होणार नाही.

يَحْلِفُونَ لَكُمْ لِتَرْضَوْا عَنْهُمْ ۖ فَإِنْ تَرْضَوْا عَنْهُمْ فَإِنَّ اللَّهَ
لَا يَرْضَىٰ عَنِ الْقَوْمِ الْفَاسِقِينَ ﴿٩٦﴾

९७. बद्दू [१६९] (ग्रामीण-अरब) लोक कुफ्र व दांभिकतेत फार सक्त होत [१७०] आणि याची जास्त शक्यता आहे की अल्लाहने आपल्या पैगंबरावर जे काही अवतरीत केले आहे त्याच्या मर्यादांशी ते अनभिज्ञ असावे [१७१] आणि अल्लाह सर्व काही ऐकणारा व बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे. [१७२]

الْأَعْرَابُ أَشَدُّ كُفْرًا وَنِفَاقًا وَأَجْدَرُ أَلَّا يَعْلَمُوا
حُدُودَ مَا أَنْزَلَ اللَّهُ عَلَىٰ رَسُولِهِ ۗ وَاللَّهُ عَلِيمٌ حَكِيمٌ ﴿٩٧﴾

१६४. अर्थात जेव्हा तुम्ही तबुक युद्धाहून परत मदीनेस पोहचाल तेव्हा हे दांभिक जिहादसाठी तुमच्यासह निघणार नाहीत तुमच्या जवळ येऊन खोट्या सबबी मांडतील.

१६५. संकेत आहे सूरह तौबाच्या त्या आयतींकडे ज्यात दांभिकांचे पितळ उघडे केले गेले आहे.

१६६. अर्थात हे पाहील की यापुढे तुमचे आचरण कसे राहते सुधारणा मान्य करुन अल्लाह व त्याच्या पैगंबराशी एकनिष्ठ असल्याचा पुरावा देता कि पूर्वीच्या वर्तनावर क़ायम राहता.

स्पष्ट असावे की त्यावेळी अल्लाहचे पैगंबर त्यांच्यात उपस्थित होते, म्हणून हे जे फर्माविले गेले आहे. की पैगंबर तुमच्या वर्तनास पाहील तर याचा अर्थ आपल्या जागी अगदी स्पष्ट आहे,अगदी तसाच, जसा आयत क्र.१०५ मध्ये फ़र्माविला गेला आहे की अल्लाह तुमच्या आचरणास पाहील आणि त्याचा पैगंबर व ईमान बाळगणारेहि.

तथापि अतिशयोक्तिप्रिय स्वभाव हा मुद्दा निर्माण करतो की पैगंबर आमच्या व्यक्त-अव्यक्त आचरणास पाहत आहेत जेव्हा की त्यांनी ईहलोकाचा निरोप घेतला आहे. अशा प्रकारचे नुक्ते निर्माण करुन शिर्क व बिदअत करीता मार्ग जरुर काढले जाऊ शकतात.

यहुदी व ख्रिश्चन देखील ईश ग्रंथात अशाच प्रकारचे मुद्दे काढत राहीले अल्लाह आमचे रक्षण करो.

१६७. अर्थात ते असे इच्छितात की तुम्ही त्यांना त्यांच्या दशेवर सोडा आणि जेव्हा ते आपल्या सुधारणे करीता तयार नाहीत तेव्हा तुम्ही त्यांना त्यांच्या दशेवर सोडा हेच योग्य.

१६८. नापाक शी अभिप्रेत कुफ्र व दंभाची घाण होय, जिने त्यांनच्या मन-मस्तिष्कास व त्यांच्या अंतरंगास अगदी घाणेरडे केले आहे. यास्तव ना स्वच्छ शुद्ध सुप्तगुणांचा त्यांच्या मन-मस्तिष्कात समावेश होतो व ना स्वच्छ शुद्ध भावना त्यांच्या अंगी वाढीस लागतात.

१६९. आराब (बद्दू) अर्थात अरब चे ग्रामीण लोक.

१७०. ग्रामीण-वातावरण सामाजिक दृष्ट्या शहराहून भिन्न असते. म्हणून ग्रामीण लोक सक्त स्वभावाचे असतात आणि स्वभवातील ही सक्ती कुफ्र व दांभिकतेतही सक्ती निर्माण करते.

१७१. त्यांना ना ज्ञानाची हौस असते व ना शिक्षणाची आवड म्हणून शरीअतच्या आदेशांशी त्यांची अनभिज्ञ राहण्याची संभावना अधिक असते.

१७२. संकेत या गोष्टीकडे आहे की अल्लाहला त्यांच्या मन:स्थितीची जाणीव आहे. म्हणून तो त्यांच्याशी तोच मामला करील जो त्याच्या बुद्धिकौशल्यास अनुसरुन असेल.

وَمِنَ الْأَعْرَابِ مَن يَتَّخِذُ مَا يُنفِقُ
مَغْرَمًا وَيَتَرَبَّصُ بِكُمُ الدَّوَائِرَ ۚ عَلَيْهِمْ
دَائِرَةُ السَّوْءِ ۗ وَاللَّهُ سَمِيعٌ عَلِيمٌ ﴿٩٨﴾

९८. त्यांच्यात असेहि लोक आहेत जे (अल्लाहच्या मार्गात) खर्च करण्यास आपल्यावर ओझे समजतात [१७३]आणि या गोष्टीची वाट बघत आहे की तुम्ही कोणत्या ना कोणत्या विपत्तित सापडावे [१७४] (आणि वस्तुस्थिती अशी की) वाईट विपत्तित ते स्वत:च सापडले आहेत आणि अल्लाह सर्व काही ऐकणारा, जाणणारा आहे.

وَمِنَ الْأَعْرَابِ مَن يُؤْمِنُ بِاللَّهِ وَالْيَوْمِ الْآخِرِ
وَيَتَّخِذُ مَا يُنفِقُ قُرُبَاتٍ عِندَ اللَّهِ وَصَلَوَاتِ
الرَّسُولِ ۚ أَلَا إِنَّهَا قُرْبَةٌ لَّهُمْ ۚ سَيُدْخِلُهُمُ اللَّهُ
فِي رَحْمَتِهِ ۗ إِنَّ اللَّهَ غَفُورٌ رَّحِيمٌ ﴿٩٩﴾

९९. आणि ग्रामीण अरब लोकांत असेहि आहेत जे अल्लाह व अंतिम दिनाविषयी ईमान बाळगतात [१७५] आणि अल्लाहच्या मार्गात खर्च करण्यास अल्लाहचे सान्निध्य प्राप्तीचे व त्याच्या पैगंबराची दुआ घेण्याचे साधन बनवितात [१७६] खचितच ते त्यांच्याकरीता सान्निध्याचे साधन होय.[१७७] अल्लाह लवकरच त्यांना आपल्या कृपेत दाखल करील. नि:संशय अल्लाह मोठा माफ करणारा व कृपा करणारा आहे.

وَالسَّابِقُونَ الْأَوَّلُونَ مِنَ الْمُهَاجِرِينَ وَالْأَنصَارِ وَالَّذِينَ
اتَّبَعُوهُم بِإِحْسَانٍ رَّضِيَ اللَّهُ عَنْهُمْ وَرَضُوا عَنْهُ وَأَعَدَّ لَهُمْ
جَنَّاتٍ تَجْرِي تَحْتَهَا الْأَنْهَارُ خَالِدِينَ فِيهَا أَبَدًا ۚ ذَٰلِكَ الْفَوْزُ
الْعَظِيمُ ﴿١٠٠﴾

१००. मुहाजिरीन [१७८] (देश त्याग केलेले) व अन्सार [१७९] (सहाय्य कर्ते) पैकी ज्या लोकांनी सर्वात आधी पुढाकार घेतला, [१८०] तसेच ते लोक ज्यांनी चांगल्या प्रकारे अनुसरण केले [१८१] अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न झाला व ते त्याच्याशी प्रसन्न झाले. [१८२] त्यांच्या करीता त्याने अशा बागा तयार केल्या आहेत, ज्यांच्या खालून प्रवाह वाहत आहेत. ते सदैव तेथे राहतील आणि हीच सर्वात मोठी सफ़लता होय.

وَمِمَّنْ حَوْلَكُم مِّنَ الْأَعْرَابِ مُنَافِقُونَ ۖ وَمِنْ أَهْلِ
الْمَدِينَةِ ۖ مَرَدُوا عَلَى النِّفَاقِ لَا تَعْلَمُهُمْ ۖ نَحْنُ
نَعْلَمُهُمْ ۚ سَنُعَذِّبُهُم مَّرَّتَيْنِ
ثُمَّ يُرَدُّونَ إِلَىٰ عَذَابٍ عَظِيمٍ ﴿١٠١﴾

१०१. आणि तुमच्या सभोवती जे ग्रामीण-अरब राहतात त्यांच्यात दांभिक आहेत व मदीनेच्या रहिवाश्यामध्येहि दांभिक आहेत जे दांभिकतेत पक्के झाले आहेत.[१८३] तुम्ही त्यांना जाणत नाही, त्यांना आम्ही जाणतो. [१८४] त्यांना आम्ही दोनदा शिक्षा देऊ [१८५] मग ते फार मोठ्या शिक्षेकडे परतवले जातील.[१८६]

१७३. अर्थात ज़कात ला ते बळजबरीचा टॅक्स व जेहादकरीता मदत करण्यास दंड समजतात वस्तुत: हा खर्च उपासना होय जो मन पूर्वक करावयास हवा.

१७४. हे ग्रामीण अरब केवळ दूरचा विचार करुन इस्लाममध्ये दाखल झाले होते. त्यांनी हे पाहीले की इस्लाम या भूमीवर प्रभावशाली होत चालला आहे म्हणून मुसलमान होण्यातच भलाई आहे अन्यथा त्यांना इस्लामशी काहीहि गोडी नव्हती. वस्तुत: ते मुसलमानांचे हितशत्रू होते व मुसलमान एकाद्या फेऱ्यात सापडावे अशी इच्छा बाळगत होते, यासाठी की इस्लामचे जोखंड आपल्या मानेवरुन काढून फेकण्याची त्यांना संधी लाभावी.

१७५. म्हणजे समस्त ग्रामीण -अरब लोकांशी दशा समान नाही. त्यांच्यात दांभिक आहेत तसेच सच्चे ईमान धारकही आहेत. म्हणून या अनुरोधाने या दृष्टीकोनाचे खंडन होते की वातावरणानेच मनुष्य चांगला किंवा वाईट बनतो, असे दिसते तर पाषाण-हृदयी ग्रामीणांमध्ये कोमल हृदयाचे लोक निर्माण नसते झाले. माणसाचा मामला दगड-वीटांप्रमाणे नाही, किंबहुना तो चांगले-वाईट बनण्याचे सुप्त गुण बाळगतो व या मामल्यात निर्णायक शक्ति (Decisive- Force) त्याचे स्वत:चे मन आहे. वातावरणाने मनुष्य प्रभावित होतो जरुर परंतु वातावरणच माणसाला चांगले-वाईट बनविते हे म्हणणे योग्य नव्हे. जर हे खरे असते तर वाईट वातावरणात चांगले लोक जन्मले नसते व ना चांगल्या वातावरणात वाईट लोक जन्मले असते.

१७६. ईमान बाळगाऱ्यांपैकी जेव्हा एखादा मनुष्य ईशमार्गात आर्थिक सहाय्य प्रस्तुत करीत तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) त्याचा स्वीकार करीत व त्याच्या हक्कात ईश-कृपा लाभावी अशी दुवा करीत.पैगंबराच्या दुवाची कदर ईमान बाळगणारे चांगल्या प्रकारे जाणत होते,म्हणून खर्च करुन पैगंबराची प्रार्थना घेण्याची अभिलाषा त्यांच्या हृदयात उचंबळत होती.

१७७. यावरुन खर्च करण्याचे महत्त्व व श्रेष्ठता स्पष्ट होते की ईमान बाळगणारा अल्लाहच्या मार्गात जेवढा खर्च करील तेवढा जास्त तो अल्लाहच्या समीप होईल.

१७८. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अनफाल टीप क्र १०६.

१७९. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अनफाल टीप क्र. १०८.

१८०. अर्थात ज्यांनी सत्य आवाहन कबूल करण्यात व ईमान बाळगण्यात पुढाकार घेतला व लोक देखील या आवाहनास कबूल करतात किंवा नाही याची वाट बघितली नाही. आणि ईमान बाळगल्यानंतर इस्लामच्या निकडी पूर्ण करण्यात व कठीण समयी त्याच्याकरीता बलीदान देण्यात अग्रेसर राहीले. त्यांनी आपल्या जीवांना जोखीममध्ये टाकले व आपले धन ईश-मार्गात लूटवून अल्लाहच्या वचनास बुलंद करण्यात व त्याच्या पैगंबराची मदत व समर्थन करण्यात कसलीहि कसर बाकी ठेवली नाही, हेच लोक या बागेचे सर्वोत्कृष्ट फूल व याच्याच द्वारे इस्लामची प्रथम रांग सजली आहे.

साबिकून अव्वलून? (पुढाकार घेणाऱ्यां)चा संबंध बदर युद्धापूर्वीच्या काळाशी आहे कारण हाच काळ अधिक परिक्षेचा होता आणि बद्र युद्धाने इस्लामच्या हक्कात फैसला सादर केला होता. म्हणून त्यानंतर इस्लामकडे प्रवृत्त होण्यात त्या अडचणी नव्हत्या ज्या पूर्वीच्या काळात होत्या.

१८१. अभिप्रेत ते लोक होत जे मागील व पूर्वीच्या नमुन्यास पाहून या काफ़िल्यात सामील झाले आणि स्वत: पत्करलेल्या मार्गावर चांगल्या रीतीने चालत राहीले.

पहीला समूह प्रतिष्ठीत सहाबां (पैगंबरांच्या सहवासात असलेल्या अनुयायीं) चा आहे आणि दुसऱ्या समूहात अन्य सहाबीही सामील आहेत आणि ते सर्व लोक देखील जे चांगल्या रीतीने यांच्या पदचिन्हांवर चालत राहतील मग तो कोणत्याहि काळात व कोणत्याहि देशात जन्माला येत असोत कारण सर्व एकाच मार्गाचे पांथस्थ व एकाच जन समूहाचे लोक आहेत.

१८२. ज्या समूहाचा हा थाट असावा की अल्लाहने त्याच्याशी आपण राजी असल्याची घोषणा आपल्या ग्रंथात केली असावी, मुसलमानाच्या मनात अपरिहार्यत: याची कदर होईल तसेच त्याच्या पदचिन्हांवर चालण्याचा तो अधिकाधिक चांगला मार्ग पत्करील

परंतु या स्पष्टोक्ति उपदेश: नंतरहि मुसलमानाचा एक पंथ काही व्यक्तिना अपवादात्मक ठरुन सहाबाच्या पूर्ण समूहाला आणि विशेषत: साबिकून अव्वलून (पुढाकार घेणाऱ्या) सहाबांना निंदेचे निशाण बनवितो व तबर्री बाजीस (अपशब्द उच्चारणे) त्याने आपली पद्धत बनविली आहे. तात्पर्य जेथून त्यांना मार्गदर्शन प्राप्त करावयास पाहीजे होते तेथूनच त्यांनी मार्गभ्रष्टता अंगिकारली जर ते अतिशयोक्ति व व्यक्ति-पूजेत रममाण नसते तर या आयतीला वाचून त्यांचे डोळे उघडले असते.

१८३. म्हणजे स्वत:ला ते मुसलमान जाहीर करतात, पण मनाने ते दांभिक आहेत व आपल्या या दंभास लपविण्याकरीता अशी वाक्पटुता करतात की त्यांना कोणी ओळखू शकत नाही.

१८४. मन:स्थिती पैगंबरहि जाणत नाही, केवळ अल्लाह जाणतो.

१०२. आणि अन्य ते लोक होत ज्यांनी आपले अपराध कबूल केले आहेत. त्यांनी मिळती जुळती कामे केली आहेत चांगली कामे हि व वाईट हि [१८७] नवल नव्हे की अल्लाह यांची तौबा (क्षमा-याचना) कबूल करील अल्लाह मोठा माफ कर्ता व कृपा करणारा आहे.

وَاٰخَرُوْنَ اعْتَرَفُوْا بِذُنُوْبِهِمْ خَلَطُوْا عَمَلًا صَالِحًا وَّاٰخَرَ سَيِّئًا
عَسَى اللّٰهُ اَنْ يَّتُوْبَ عَلَيْهِمْ اِنَّ اللّٰهَ غَفُوْرٌ رَّحِيْمٌ ﴿١٠٢﴾

१०३. (हे पैगंबर !) तुम्ही यांच्या सम्पत्तितून दान [१८८] घ्या कारण त्याद्वारे तुम्ही त्यांना स्वच्छ कराल आणि त्यांना शुद्ध कराल [१८९] आणि त्यांच्या हक्कात तुम्ही कृपा लाभावी म्हणून दुआ करा. निःसंशय तुमची दुआ त्यांच्या करीता सांत्वनकारक आहे. अल्लाह सर्व काही ऐकणारा व जाणणारा आहे.

خُذْ مِنْ اَمْوَالِهِمْ صَدَقَةً تُطَهِّرُهُمْ وَتُزَكِّيْهِمْ بِهَا وَصَلِّ
عَلَيْهِمْ اِنَّ صَلٰوتَكَ سَكَنٌ لَّهُمْ وَاللّٰهُ سَمِيْعٌ عَلِيْمٌ ﴿١٠٣﴾

१०४. काय त्यांना हे माहीत नाही की तो अल्लाहच होय जो आपल्या दासांची तौबा कबूल करतो व दानांस स्वीकृति प्रदान करतो आणि हे की अल्लाह मोठा तौबा कबूल करणारा व कृपा करणारा आहे.

اَلَمْ يَعْلَمُوْٓا اَنَّ اللّٰهَ هُوَ يَقْبَلُ التَّوْبَةَ عَنْ عِبَادِهٖ وَيَاْخُذُ
الصَّدَقٰتِ وَاَنَّ اللّٰهَ هُوَ التَّوَّابُ الرَّحِيْمُ ﴿١٠٤﴾

१०५. सांगा तुम्ही कर्म करा. अल्लाह तुमच्या कर्मास पाहील तसेच त्याचा पैगंबर व ईमान बाळगणारेहि पाहतील [१९०] आणि तुम्हाला लवकरच त्याच्या समक्ष हजर केले जाईल जो अपरोक्ष व विद्यमान सर्व काही जाणणारा आहे मग तो तुम्हाला दाखविल की तुम्ही काय करीत राहीलात.

وَقُلِ اعْمَلُوْا فَسَيَرَى اللّٰهُ عَمَلَكُمْ وَرَسُوْلُهٗ وَالْمُؤْمِنُوْنَ
وَسَتُرَدُّوْنَ اِلٰى عٰلِمِ الْغَيْبِ وَالشَّهَادَةِ فَيُنَبِّئُكُمْ بِمَا كُنْتُمْ
تَعْمَلُوْنَ ﴿١٠٥﴾

१०६. आणखी काही लोक आहेत ज्यांना अल्लाहच्या निर्णयाच्या प्रतिक्षेत राखून ठेवले आहे [१९१] एकतर त्यांना शिक्षा देईल किंवा त्यांच्यावर मेहरबान होईल-अल्लाह ज्ञानी व हिकमत बाळगणारा आहे.

وَاٰخَرُوْنَ مُرْجَوْنَ لِاَمْرِ اللّٰهِ اِمَّا يُعَذِّبُهُمْ وَاِمَّا يَتُوْبُ عَلَيْهِمْ
وَاللّٰهُ عَلِيْمٌ حَكِيْمٌ ﴿١٠٦﴾

१०७. आणि (काही असेहि लोक आहेत) ज्यांनी या हेतुने मसजिद बनविली की नुकसान पोहचवावे व कुफ्र करावे आणि ईमान बाळगणाऱ्यांत फूट पाडावी आणि त्या लोकांकरीता दबा स्थान बनवावे जे यापूर्वी अल्लाह व पैगंबराशी लढले आहेत [१९२] ते खचितच शपथा वाहून म्हणतील की आमचा इरादा तर भलेपणाचा होता, परंतु अल्लाह साक्ष देतो की हे अत्यंत खोटारडे आहेत.

وَالَّذِيْنَ اتَّخَذُوْا مَسْجِدًا ضِرَارًا وَّكُفْرًا وَّتَفْرِيْقًا بَيْنَ
الْمُؤْمِنِيْنَ وَاِرْصَادًا لِّمَنْ حَارَبَ اللّٰهَ وَرَسُوْلَهٗ مِنْ
قَبْلُ وَلَيَحْلِفُنَّ اِنْ اَرَدْنَآ اِلَّا الْحُسْنٰى وَاللّٰهُ يَشْهَدُ
اِنَّهُمْ لَكٰذِبُوْنَ ﴿١٠٧﴾

१८५. एक शिक्षा इहलोकात व दुसरी शिक्षा कबरीत. जगात या दांभिकांना शिक्षा जसे की टीप क्र. १०३ मध्ये स्पष्ट केले गेले आहे. मुसलमानांच्या हातून मिळाली.

१८६. अभिप्रेत आखिरतची शिक्षा होय.

१८७. सूरह बराअत शेवटच्या काळात अवतरलेली आहे. त्या काळात ईमान व आचरण दृष्ट्या मुस्लिम समाजात विविध दर्जाचे लोक आढळून येत म्हणून या सूरहमध्ये प्रत्येक समूहाचे वेगवेगळे निरीक्षण केले गेले आहे. अशा साठी की क़ुरआनास अपेक्षित मोमीन (ईमानधारक) कोण आहे हे या काळातील मुसलमानांनाहि स्पष्ट उमजावे व भावी पिढींनाहि.

या आयतीत मुसलमानांच्या ज्या समूहाचा उल्लेख झाला आहे त्याच्या हातून एक चूक तर अशी घडली होती की हे लोक तबुक-युद्धात सहभागी झाले नव्हते. परंतु या खेरीज, जसे की क़ुरआनच्या वर्णनावरुन स्पष्ट होते त्यांचे जीवन चांगल्या-वाईटाचे मिश्रण होते परंतु त्यांनी आपल्या अपराधांना कबूल केले होते म्हणून त्यांना तौबा स्वीकृत होण्याची आशा दिली गेली.

१८८. म्हणजे जे दान सादर करतील ते कबूल करा. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जे दान किंवा ज़कात कबूल करत, ते अशा बाबीत खर्च करीत जे दाना करीता निर्धारीत आहेत.

१८९. स्पष्ट झाले की दान-मग ते ज़कात असो वा खैरात अपराध आणि दुष्कृत्यांपासून शुचिर्भूत व सत्कृत्य आणि सद्गुणांनी सुशोभित होण्याचे साधन होय.म्हणून बौद्धीक आजार व मानसिक रोग देखील बरे होतात. आणि सद भावनाहि वाढीस लागतात. याने अंतरंग सजते व मनुष्य पुण्यशील बनतो.

१९०. अर्थात यापुढे तुमचे वर्तन कसे राहते यावर ईमान बाळगणाऱ्यांचीहि नजर राहील, अशासाठी की त्यांनी तुमच्याशी तो मामला करावा ज्यास तुम्ही स्वत:ला पात्र ठरवून दाखवाल.

१९१. अर्थात तबुक युद्धापासून मागे राहणाऱ्या लोकांमध्ये काही लोक असे आहेत ज्यांच्या मामला तहकूब आहे. ही तीन माणसे होती ज्यांनी केवळ गफलतीमुळे युद्धात भाग घेतला नव्हता. त्यांचा मामला तहकूब ठेवला गेला व नंतर त्यांची तौबा कबूल केली गेली, ज्याचा उल्लेख पुढे आयत क्र. ११८ मध्ये केला गेला आहे.

१९२. ही मसजिद जी ''मस्जिदे जिरार'' या नावाने प्रसिद्ध झाली, मदीनेत ''मसजिदे कूबा'' शेजारी दांभिकांच्या एका समूहाने बनविली होती. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जेव्हा तबुकच्या प्रवासास रवाना होते तेव्हा काही दांभिकांनी तेथे येण्याविषयी विनंती केली होती व मसजिदीस एक वेळ नमाज़ पढण्यास विनविले होते. तिच्या उभारणीचे कारण त्यांनी असे सांगितले की पावसाळ्या रात्रीत,विशेषत: शारीरिक दृष्ट्या असमर्थ असलेल्यांकरीता सोय व्हावी. पैगंबरानी फर्माविले आता प्रवासाची तयारी आहे. नंतर जेव्हा तबूक हून परतणे झाले व पैगंबर मदीनेजवळ ''जीअवान'' या स्थानावर पोहचले तेव्हा त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या कट-कारस्थानाविषयी सूचित केले. पैगंबरांनी त्यावेळी आपल्या काही साथीदारांना पुढे रवाना केले, यासाठी की त्यांनी पैगंबराच्या पोहचण्यापूर्वीच त्या मसजिदीला जमीनदोस करावे.तेव्हा त्या श्रेष्ठींनी या आदेशाचे पालन करण्यात अक्कल हुशारीने काम घेतले व मसजिदीला तत्क्षणी आग लावली, यासाठी की उपद्रवास पुन्हा डोके वर काढण्याची संधी लाभू नये. (हा किस्सा सीरत इब्ने हिशाम खंड ४ पृष्ठ १८५ मध्ये वर्णिला गेला आहे) या आयतीत अल्लाहने दांभिकांच्या त्या दुषित उद्दिष्टांना अनावरित केले आहे ज्याकरीता त्यांनी ही मसजिद उभारली होती. त्यांचे पहिले उद्दिष्ट हे होते की याने इस्लाम धर्माला हानी पोहचविली जावी. धर्माचा विकास व्हावा म्हणून मसजिदी बनविल्या जातात आणि इस्लामचे हे स्मारक त्याच्या मजबूतीचे साधन होय. परंतु त्यांनी इस्लामचे मूळ कापण्याच्या हेतुने मसजिद उभारली होती. एका अशी मसजिद की जिची उभारणी खोट्या उद्देशांवर ठेवण्यात आली असावी, तर तिला पावित्र्य कसे प्राप्त होऊ शकते?

त्यांचा दुसरा हेतु असा होता की हे खरेखुरे उपासनेचे स्थळ नव्हे किंबहुना कुफ्र केंद्र बनावे. तिसरा हेतु असा की मुसलमानांच्या एकमेवतेस शतविक्षत केले जावे आणि हे अशा प्रकारे की त्यांना त्यांच्या मूळ सामूहिक केंद्रापासून वेगळा करण्याचा प्रयत्न केला जावा, आणि चौथा हेतू असा की इस्लामच्या वैऱ्यांकरीता हे आश्रय-स्थान बनावे, अशासाठी की इस्लाम विरुद्ध त्यांना कट रचणे शक्य व्हावे. कथनांमध्ये उल्लिखित आहे की खजरज कबिल्याचा एक मनुष्य अबू आमिर जो ख्रिश्चन झाला होता,इस्लाम आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा कट्टर वैरी होता. ओहदच्या युद्धात त्याने अनेकेश्वरवाद्यांना साथ दिली व हुनैन युद्धानंतर जेव्हा त्याला असे जाणवले की इस्लामच्या सामर्थ्यास नेस्तनाबूत करण्यात अरब असफल राहीलेत तेव्हा तो रोम येथे चालला गेला व तेथून इस्लाम विरुद्ध कारस्थाने रचू लागला. येथपावेतो की त्याने रोम-सम्राटास मदीनेवर हल्ला करण्यासाठी प्रवृत्त केले. त्याच्या संकेतावर दांभिकांनी ''मसजिदे ज़िरार'' बनविली होती. परंतु अल्लाहच्या आदेशाने त्या घाणेरड्या कटाचे पितळ उघडकीस आणले आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी वेळेवर पाऊल उचलून त्यांच्या योजनेला मातीत मिळविले.

१०८. तुम्ही या (मसजिदी) त मुळीच उभे राहू नका. [१९३] ती मसजिद जिचा पाया पहिल्या दिवसापासूनच 'तकवा' (ईश-भया) वर ठेवला गेला आहे तिच या गोष्टीची हक्कदार आहे की तुम्ही तिच्यात उभे रहावे.[१९४] तिच्यात असे लोक आहेत जे स्वच्छ व शुद्ध राहणे पसंत करतात [१९५] आणि अल्लाह स्वच्छ शुद्ध राहणाऱ्यांनाच पसंत करतो.

لَا تَقُمْ فِيهِ أَبَدًا ۚ لَمَسْجِدٌ أُسِّسَ عَلَى التَّقْوَىٰ مِنْ أَوَّلِ يَوْمٍ
أَحَقُّ أَنْ تَقُومَ فِيهِ ۚ فِيهِ رِجَالٌ يُحِبُّونَ أَنْ يَتَطَهَّرُوا ۚ وَاللَّهُ
يُحِبُّ الْمُطَّهِّرِينَ ﴿١٠٨﴾

१०९. काय तो मनुष्य श्रेष्ठ आहे ज्याने आपल्या इमारतीचा पाया अल्लाहचे भय व त्याच्या प्रसन्नतेवर ठेवला, किंवा तो ज्याने आपल्या इमारतीचा पाया फुसफुशीत, ढासळणाऱ्या बांधाच्या काठावर ठेवला मग ती इमारत त्याला घेऊन जहन्नमच्या आगीत कोसळली. [१९६] अल्लाह अशा जालीम लोकांना मार्ग दाखवित नाही.[१९७]

أَفَمَنْ أَسَّسَ بُنْيَانَهُ عَلَىٰ تَقْوَىٰ مِنَ اللَّهِ وَرِضْوَانٍ خَيْرٌ
أَمْ مَنْ أَسَّسَ بُنْيَانَهُ عَلَىٰ شَفَا جُرُفٍ هَارٍ فَانْهَارَ بِهِ فِي
نَارِ جَهَنَّمَ ۗ وَاللَّهُ لَا يَهْدِي الْقَوْمَ الظَّالِمِينَ ﴿١٠٩﴾

११०. ही जी इमारत यांनी बनविली आहे, सदैव त्यांच्या मनात द्विधावस्थेस कारणीभूत ठरेल, येथपावेतो की त्यांची मने तुकडे तुकडे व्हावीत. [१९८] आणि अल्लाह अत्यंत ज्ञान बाळगणारा व हिकमत बाळगणारा आहे.

لَا يَزَالُ بُنْيَانُهُمُ الَّذِي بَنَوْا رِيبَةً فِي قُلُوبِهِمْ إِلَّا أَنْ
تَقَطَّعَ قُلُوبُهُمْ ۗ وَاللَّهُ عَلِيمٌ حَكِيمٌ ﴿١١٠﴾

१११. खरे पाहता, अल्लाहने ईमान बाळगणाऱ्यापासून त्यांचे प्राण व त्यांचे धन जन्नतच्या मोबदल्यात खरेदी केले [१९९] आहेत ते अल्लाहच्या मार्गात लढतात आणि मारतात व मरतातहि. [२००] हा अल्लाहकडे असलेला एक सच्चा वायदा होय. तौरात, इंजिल,[२०१] व क़ुरआनमध्ये. आणि अल्लाह पेक्षा वरचढ आपल्या प्रतिज्ञेस पूर्ण करणारा कोण आहे? तेव्हा आनंद साजरा करा आपल्या त्या सौद्या बाबत जो तुम्ही त्याच्याशी केला आहे. हीच सर्वात मोठी सफलता होय.

إِنَّ اللَّهَ اشْتَرَىٰ مِنَ الْمُؤْمِنِينَ أَنْفُسَهُمْ وَأَمْوَالَهُمْ
بِأَنَّ لَهُمُ الْجَنَّةَ ۚ يُقَاتِلُونَ فِي سَبِيلِ اللَّهِ فَيَقْتُلُونَ وَ
يُقْتَلُونَ ۖ وَعْدًا عَلَيْهِ حَقًّا فِي التَّوْرَاةِ وَالْإِنْجِيلِ
وَالْقُرْآنِ ۚ وَمَنْ أَوْفَىٰ بِعَهْدِهِ مِنَ اللَّهِ ۚ فَاسْتَبْشِرُوا
بِبَيْعِكُمُ الَّذِي بَايَعْتُمْ بِهِ ۚ وَذَٰلِكَ هُوَ الْفَوْزُ الْعَظِيمُ ﴿١١١﴾

११२. तौबा करणारे[२०२] इबादत (उपासना) करणारे [२०३] प्रशंसा करणारे [२०४] (त्याच्या मार्गात) प्रवास करणारे [२०५] रुकूअ करणारे, सजदा करणारे [२०६] भलाईचा आदेश देणारे आणि दुष्कृत्यांपासून रोखणारे [२०७] आणि अल्लाहच्या मर्यादांचे रक्षण करणारे [२०८] आणि (हे पैगंबर !) अशा ईमान बाळगणाऱ्यांना खुशखबरी द्या.

التَّائِبُونَ الْعَابِدُونَ الْحَامِدُونَ السَّائِحُونَ الرَّاكِعُونَ
السَّاجِدُونَ الْآمِرُونَ بِالْمَعْرُوفِ وَالنَّاهُونَ عَنِ الْمُنْكَرِ
وَالْحَافِظُونَ لِحُدُودِ اللَّهِ ۗ وَبَشِّرِ الْمُؤْمِنِينَ ﴿١١٢﴾

१९३. म्हणजे या मसजिदीत केवळ नमाज़ पढू नका असे नव्हे तर पाऊलही ठेवू नका.

१९४. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे स्थानांतर करुन जेव्हा मदीनेस पोहचले तेव्हा काही दिवस ते क़ूबा भागात राहीले. तेथे त्यांनी एका मसजिदीची स्थापना केली, ती ''मसजिदे क़ूबा' या नावाने प्रसिद्ध झाली. ही मदीनेची पहिली मसजिद होती. दुसरी मसजिद त्यांनी मध्यवर्ती शहरात क़ायम केली. जिला ''मसजिदे नबवी'' असे म्हणतात. या दोन्ही मसजिदींचा पाया तकवा (ईश भय आणि पाप भीरुता/संयमा) वर रचला गेला होता. यास्तव ही आयत दोन्ही मसजिदींना लागू पडू शकते. आणि सहाबा (प्रेषितांच्या सहवासातील अनुयायींची) कथने दोन्ही मसजिदींच्या समर्थनात आहेत परंतु ज्याअर्थी मसजिदे नबवी मध्ये हा गुण श्रेष्ठतम दर्जाचा आहे आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा त्यात उभे राहण्याचा व नमाज़ पढण्याचा नित्यक्रम राहिला आहे, तसेच दांभिकांचा मूल उद्देश्यहि ह्याच मसजिदीच्या सामूहीकतेस क्षतविक्षत करण्याचा होता म्हणून ही आयत सर्वप्रथम मसजिदे नबवीला लागू पडते.

हदीस मधील उल्लेखानुसार:-

''दोन माणसांच्या दरम्यान त्या मसजिदीबाबत जिचा पाया पहिल्या दिवसापासून ईश-भया वर ठेवला गेला आहे, मतभेद झाला. एक म्हणाला की मसजिदे क़ूबा होय. दुसरा म्हणाला, ती ''मसजिदे नबवी'' होय. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले ती माझीच मसजिद होय. इमाम तिर्मिजी यांनी या हदीसचा उल्लेख करुन लिहीले आहे की ही हदीस हसन सहीह आहे. आणि शैकानी ने 'तफसीर फतहुल कदीर' मध्ये अगदी योग्य फर्माविले आहे की जेव्हा ''सहीह हदीस'' वरुन ही गोष्ट स्पष्ट झाली की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मसजिदे नबवी लाच अभिप्रेत घेतले आहे तेव्हा प्रेषित वचनाच्या तुलनेने अन्य कुणाचे मत प्रस्तुत करणे योग्य नव्हे.

(फतहुल कदीर शैकानी खंड २ पृ. ४०५)

१९५. अभिप्रेत बाह्य शुचिर्भूतताहि होय व आंतरिकहि. शरीअतने दोघांचेहि आदेश दिले आहेत आणि या खऱ्या ईमान बाळगणाऱ्यांचे वैशिष्ट्य हे होय की ते सर्वप्रथम आपल्या मन-मस्तिष्कास अपराधांपासून स्वच्छ शुद्ध राखतात आणि या सोबतच शारीरिक स्वच्छ शुद्धतेचेहि काटेकोर पालन करतात. याउलट ''मसजिदे ज़िरार'' ची उभारणी करणाऱ्यांचे अंतर्मन कुफ्र व दंभाच्या घाणीने बरबटलेले होते. त्यांना ना मनाच्या शुद्धतेची जाणीव होती व ना शारीरिक स्वच्छ शुद्धतेची कल्पना.

१९६. हे त्या लोकांचे उदाहरण होय जे आपल्या जीवनाची उभारणी ईश-भय आणि ईश-प्रसन्नतेवर करण्याऐवजी. ईश्वराशी निर्भयता व निस्पृहतेच्या आधारावर करतात. ज्याचा परिणाम परिपूर्ण विनाशाच्या स्वरुपात दिसून येतो. जर ते या परिणामास डोळ्यासमोर ठेवतील तर त्याना जाणीव होईल की ते विधायक कार्य नव्हे, किंबहुना विध्वंसक कार्य करीत आहेत.

१९७. म्हणजे त्यांचे इप्सित साध्य करीत नाही व सफलतेच्या ध्येयाप्रत पोहचवित नाही.

१९८. म्हणजे एका घाणेरड्या कारस्थानास मसजिदीचे रुप देऊन त्यांनी दांभिकतेस आपल्या मनात अशा प्रकारे रूजविले आहे की आता मरेपर्यंत त्यांना यापासून सुटका मिळणे अशक्य.

१९९. येथे त्या करारास, जे ईमान धारक अल्लाहशी ईमान बाळगून करतात, खरेदी-विक्रीचा करार या अर्थाने घेतले आहे. प्राण व सम्पत्ति अल्लाहनेच प्रदान केलेल्या गोष्टी होत. आणि वस्तुत:तोच यांचा मालक होय परंतु या कसोटीच्या जीवनात ईमान बाळगणारे अल्लाहच्या मार्गात प्राण व धनाचे जे बलीदान करतात त्याची कदर सर्वश्रेष्ठ अल्लाह अशा प्रकारे करतो की तो जणू एक सौदा होय जो दास आणि स्वामी यांच्या दरम्यान ठरला आहे. दासाने आपला प्राण आपले धन अल्लाहच्या हाती विकून टाकले आहे. अर्थात अल्लाह तर्फे याची जी किंमत दिली जाईल ती म्हणजे ''जन्नत'' होय.

२००. म्हणजे अल्लाहच्या मार्गात लढण्यात ते अंग चोरीत नाही किंबहुना धैर्याने लढतात आणि अल्लाहच्या शत्रूंना मारण्यात कसलीहि कसर बाकी राखत नाही, येथपावेतो की हौतात्म्य-मुकुट शिरावर चढवितात.

२०१. अभिप्रेत अल्लाहने अवतरीत केलेले मूळ तौरात व इंजिल आहेत. आजच्या काळातील तौरात व इंजिल मध्ये हा विषय या रीतीने मिळत नसला तरी ही गोष्ट नकारात्मक ठरत नाही की मूळ तौरात व इंजिल मध्ये हा मजकूर नव्हताच. कारण विद्यमान तौरात व इंजिल हे ग्रंथ फेरफार केलेले होत. आणि त्यांच्यात मूळ ग्रंथांचे काही अवशेषच आढळून येतात, तथापि क़ुरआनच्या वर्णनाने मिळत्या जुळत्या गोष्टी आजच्या तौरात व इंजिल मध्येहि आहेत. उदाहरणार्थ:-

''हे इस्राएला, श्रवण कर, आपला देव परमेश्वर आहे, तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर पूर्ण मनाने,पूर्ण जिवाने व पूर्ण शक्तीने प्रीति कर'' (अनुवाद ६-४: ५)

''नीति मत्वा करीता ज्यांचा छळ झाला आहे ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.''(मत्तय ५:१०)

ज्याने आपला जीव राखिला तो त्याला गमावील आणि ज्याने माझ्या करीता आपला जीव गमविला तो त्याला राखील.' (मत्तय १०:३९)

२०२. या आयतीत सच्चे ईमान-धारक चे गुण वर्णिले गेले आहेत व त्यांचा पहिला गुण हा वर्णिला गेला आहे की ते

तौबा करीत राहतात- म्हणजे जेव्हा जेव्हा त्यांच्या हातून एखादी चुक वा अपराध घडतो तेव्हा ते पश्चात्तापदग्ध होऊन अल्लाहकडे परततात व त्याच्या माफीचे इच्छुक बनतात.

तौबाचे स्पष्टीकरण सूरह निसा टीप क्र. ४५ व ४६ मध्ये केले गेले आहे.

२०३. ते एकमेव ईश्वराची उपासना करतात व त्याच्या उपासनेत मग्न राहतात. अल्लाहच्या उपासनेस ते अवजड प्रथा समजून अदा करीत नाही, किंबहुना मन:पूर्वक व भाव विव्हल होऊन करतात.

२०४. म्हणजे ते अल्लाहचेच गुण गातात व त्याची प्रशंसा करण्यात त्यांची जिव्हा भिजत राहते.

२०५. म्हणजे ते धार्मिक निकडींना दृष्टीआड करुन आपले घर व देशाशी बिलगून राहत नाही किंबहुना त्याच्या निकडींना पूर्ण करण्याकरीता प्रवासातील कष्ट यातना सहन करतात व जमिनीवर भ्रमण करीत राहतात. उदाहरणार्थ जिहाद फि-सबी लिल्लाह, हिजरत, हज्ज व उमरा,आवाहन व प्रसार, इस्लामिक ज्ञानाची प्रचिती अल्लाहच्या आयतींचे निरीक्षण आपल्या धर्माची सेवा व प्रचार व त्यासाठी सामूहीक प्रयत्न इत्यादि उद्दिष्टांकरीता प्रवास करणे.

२०६. रुकुअ करणारे म्हणजे अल्लाहच्या समोर झुकणारे सजदा करणारे म्हणजे अल्लाह करीता आपला माथा जमीनीवर टेकविणारे. रुकूअचे स्वरुप असे की उभ्या असलेल्या स्थितीत आपले हात गुडघ्यांवर ठेवून अशा प्रकारे ओणवे व्हावे की पाठ सरळ असावी. (वाक नसावा) आणि सजद्याची पद्धत अशी की कपाळ जमीनीवर ठेवले जावे व त्यासोबत नाक, तळहात, गुडघे आणि पायाची बोटे देखील जमीनीवर ठेवली जावीत. रुकूअ आणि सजदा नमाज़ चे महत्त्वपूर्ण स्तंभ होत. व यांच्या उल्लेखांशी अभिप्रेत ''नमाज़'' होय.

२०७. ते केवळ आपल्याच सुधारणेचा विचार करीत नाही, किंबहुना ईश्वराच्या अन्य दासांच्या सुधारणेचे कर्तव्य देखील पार पाडतात. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह आले इमरान टीप क्र. १३७.

२०८. ''अल्लाहच्या मर्यादा'' शी अभिप्रेत शरीयत आदेश व विधिनियम व त्यांच्या रक्षणाशी अभिप्रेत त्यांचे पुरेपूर पालन करणे होय. तसेच याच्या अर्थात ही गोष्ट देखील सामील आहे की शरीअत विरुद्ध आदेश व विधिनियमांचे समर्थन करण्यापासून किंवा ते लागू करण्यापासून मनुष्याने अलिप्त राहीले पाहीजे.

हे गुणधर्म इथे वर्णिले गेले आहेत ईमान बाळगणाऱ्या चारित्र्याचे, दांभिकतेच्या चारित्रया पासून भिन्नता दर्शवितात.

**पैगंबर आणि ईमान बाळगणाऱ्यास हे साजेसे नाही की त्यांनी अनेकेश्वरवाद्यां करीता माफीची प्रार्थना करावी, मग ते त्यांचे नातेवाईक का असेनात, जेव्हा त्यांना स्पष्ट कळून चुकले आहे की ते जहन्नमवाले होत. (अल-क़ुरआन)**

**११३. पैगंबर आणि ईमान बाळगणाऱ्यास हे साजेसे नाही की त्यांनी अनेकेश्वरवाद्यां करीता माफीची प्रार्थना करावी, मग ते त्यांचे नातेवाईक का असेनात, जेव्हा त्यांना स्पष्ट कळून चुकले आहे की ते जहन्नमवाले होत.[२०९]**

مَا كَانَ لِلنَّبِيِّ وَالَّذِيْنَ اٰمَنُوْٓا اَنْ يَّسْتَغْفِرُوْا لِلْمُشْرِكِيْنَ وَلَوْ كَانُوْٓا اُولِيْ قُرْبٰى مِنْۢ بَعْدِ مَا تَبَيَّنَ لَهُمْ اَنَّهُمْ اَصْحٰبُ الْجَحِيْمِ ﴿١١٣﴾

**११४. आणि इब्राहीम ने आपल्या पित्या करीता जी माफीची याचना केली होती ती तर केवळ त्या वायद्यामुळे होती जो त्याने त्याच्याशी केला होता, परंतु जेव्हा त्याला स्पष्ट उमजले की तो अल्लाहचा शत्रू आहे तेव्हा त्याच्यापासून अलिप्त राहिला.[२१०] वस्तुतः इब्राहीम मोठा सहानुभूति बाळगणारा व सहनशील होता.[२११]**

وَمَا كَانَ اسْتِغْفَارُ اِبْرٰهِيْمَ لِاَبِيْهِ اِلَّا عَنْ مَّوْعِدَةٍ وَّعَدَهَآ اِيَّاهُ ۚ فَلَمَّا تَبَيَّنَ لَهٗٓ اَنَّهٗ عَدُوٌّ لِّلّٰهِ تَبَرَّاَ مِنْهُ ۭ اِنَّ اِبْرٰهِيْمَ لَاَوَّاهٌ حَلِيْمٌ ﴿١١٤﴾

**११५. आणि अल्लाहची ही पद्धत नव्हे की एखाद्या समूहास मार्गदर्शन केल्यानंतर मार्गभ्रष्ट करावे, जोपर्यंत त्यांना त्या गोष्टींची स्पष्ट समज न द्यावी ज्यापासून त्यांना अलीप्त राखण्याची इच्छा बाळगावी.[२१२] नि:संशय अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे.**

وَمَا كَانَ اللّٰهُ لِيُضِلَّ قَوْمًۢا بَعْدَ اِذْ هَدٰىهُمْ حَتّٰي يُبَيِّنَ لَهُمْ مَّا يَتَّقُوْنَ ۭ اِنَّ اللّٰهَ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيْمٌ ﴿١١٥﴾

**११६. नि:संशय, आकाश व जमिनीची राज्यसत्ता अल्लाह करीताच आहे-तोच जिवित राखतो व मारतो आणि अल्लाह खेरीज ना तुमचा कोणी मित्र आहे व ना कोणी सहाय्यक.[२१३]**

اِنَّ اللّٰهَ لَهٗ مُلْكُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۭ يُحْيٖ وَيُمِيْتُ ۭ وَمَا لَكُمْ مِّنْ دُوْنِ اللّٰهِ مِنْ وَّلِيٍّ وَّلَا نَصِيْرٍ ﴿١١٦﴾

**११७. अल्लाहने माफ केले पैगंबरास आणि ''मुहाजिरीनना''(हिजरत करणाऱ्यांना) व 'अनसारना' त्यांची मदत करणाऱ्यांना ज्यांनी अडचणीच्या काळात पैगंबराना साथ दिली [२१४] व अशा स्थितीत साथ दिली जेव्हा त्यांच्यातील एका समूहाची मने वक्रतेकडे प्रवृत्त होण्याची शक्यात होती. मग अल्लाहने त्यांना माफ केले [२१५] नि:संशय तो त्यांच्या हक्कात मोठा दयाळू व कृपाळू आहे.**

لَقَدْ تَّابَ اللّٰهُ عَلَي النَّبِيِّ وَالْمُهٰجِرِيْنَ وَالْاَنْصَارِ الَّذِيْنَ اتَّبَعُوْهُ فِيْ سَاعَةِ الْعُسْرَةِ مِنْۢ بَعْدِ مَا كَادَ يَزِيْغُ قُلُوْبُ فَرِيْقٍ مِّنْهُمْ ثُمَّ تَابَ عَلَيْهِمْ ۭ اِنَّهٗ بِهِمْ رَءُوْفٌ رَّحِيْمٌ ﴿١١٧﴾

२०९. एक अल्लाहचा निष्ठावंत दास बनून राहण्यास अनेकेश्वरवादी नकार दर्शवितो. या कारणास्तव तो अल्लाहचा बंडखोर व त्याचा शत्रू असतो. मग जो मनुष्य मरेपर्यंत अनेकेश्वरवादी राहीला त्याने आपल्या आचरणाने हे स्पष्ट केले की तो अल्लाहचा शत्रू होय अर्थात अनेकेश्वरवाद्या बाबत सर्वश्रेष्ठ अल्लाहने फर्माविले आहे की तो अक्षम्य अपराधी आहे आणि अशा अपराध्यांचे ठीकाण जहन्नम होय. असे असताना ईमान बाळगणाऱ्याना ही गोष्ट कशा प्रकारे शोभून दिसू शकेल की त्यांनी अनेकेश्वर वाद्यांकरीता क्षमेची याचना करावी, मग ते त्याचे अगदी जवळचे नातेवाईक का असेनात. अल्लाहशी मैत्रीची निकड अशी की त्याच्या (अल्लाहच्या) शत्रूला ईमान बाळगणाऱ्याने आपला शत्रू समजावे.

स्पष्ट व्हावे की माफीच्या प्रार्थनेस ज्या प्रकारे अनेकेश्वरवाद्यांच्या हक्कात मनाई आहे तद्‌वतच काफ़ीरांच्या व नास्तिकांच्याहि हक्कात आहे. कारण सर्वांचा समाईक अपराध कुफ्र होय जो अगदी अक्षम्य आहे.

राहीला हा प्रश्न की अनेकेश्वरवादी असल्याचा कायदा कोणाला लागू पडतो? तर हा कायदा माणसाच्या बाह्य श्रद्धा व आचरणा आधारे लागू केला जाईल.जसे एखाद्याच्या बाह्य इस्लामला पाहून तो मुसलमान असल्याचा कायदा लागू केला जातो. अन्यथा अल्लाह अधिक चांगले जाणतो की खरोखर कोणाचा अंत शिर्क व कुफ्रवर झाला व कोणचा ईमान व इस्लाम वर आणि कोण जहन्नमी आहे व कोण जन्नती.

२१०. हज़रत इब्राहीम यांनी आपल्या पित्याचा निरोप घेताना त्याच्याकरीता क्षमा-प्रार्थना करण्याचा वायदा केला होता, याचा उल्लेख कुरआनात अन्य ठिकाणी झाला आहे. सूरह मरीयम मध्ये आहे.

سَلٰمٌ عَلَيْكَ ۚ سَاَسْتَغْفِرُ لَكَ رَبِّىْ ۚ اِنَّهٗ كَانَ بِىْ حَفِيًّا ۔(مریم۔۴۷)

''आपणावर सलामती असो. मी आपणा करीता आपल्या पालनकर्त्याकडे माफीची प्रार्थाना करीन. तो मजवर फार मेहरबान आहे.'' (मरीयम- ४७)

यावरुन एक कल्पना उद्‌भवू शकत होती की मुसलमानानी आपल्या अनेकेश्वरवादी नातेवाईकां करीता माफीची प्रार्थना का करु नये. या संशयाचे येथे निराकरण केले गेले आहे की हज़रत इब्राहीम यांचे आपल्या पित्यासाठी माफीची प्रार्थना करणे त्या वायद्याच्या आधारावर होते जो त्यांनी आपल्या पित्याशी केला होता. परंतु जेव्हा त्यांना हे स्पष्ट उमजले की तो अल्लाहचा शत्रू आहे. तेव्हा त्यांनी प्रार्थना करणे सोडून दिले अर्थात इब्राहीम आपल्या वायद्यानुसार त्या वेळपर्यंत दुआ (प्रार्थना) करीत राहिले जो पर्यंत तो अल्लाहचा वैरी असल्याचे त्यांना स्पष्टत: कळाले नव्हते जेव्हा हे कळाले तेव्हा त्यांना असे जाणवले की कोणत्याहि अनेकेश्वरवाद्या करीता क्षमेची प्रार्थना करणे योग्य नव्हे. मग तो स्वत:चा पिता का असेना आणि ही जाणीव होताच त्यांनी पित्याच्या हक्कात प्रार्थना करणे थांबवले. हज़रत इब्राहीम याचे नंतरचे हे आचरणच आदर्श आहे.

२११. म्हणजे हज़रत इब्राहीम ज्याअर्थी एक सहानुभूति बाळगणारा व सहनशील मनुष्य होते म्हणूनच आपल्या अनेकेश्वरवादी पित्याचे जुलमी वर्तन लक्षात न घेता त्याची पुरेपूर मनधरणी केली व त्याच्या दुर्वतनाचे प्रत्युन्तर प्रार्थनेने दिले. येथपावेतो की त्यांना हे स्पष्ट:कळाले की तो शिर्कपासून माघार घेणार नाही आणि शिर्क करणे ईश्वराशी वैर बाळगण्या समान आहे.

२१२. ही मुसलमानांना तंबी होय की सर्वश्रेष्ठ अल्लाहने मार्गदर्शन दिल्यानंतर तुम्हाला त्या सर्व गोष्टी स्पष्ट केल्या आहेत ज्यापासून तुम्ही अलिप्त राहिले पाहिजे व ज्यात ही गोष्ट देखील सामील आहे की तुम्ही अल्लाहच्या शत्रूंना आपला मित्र समजू नका व त्यांच्यासाठी क्षमा प्राप्तीची प्रार्थना करु नका मग ते तुमचे प्रिय नातेवाईक का असेनात. या स्पष्ट मार्गदर्शनानंतरहि जर तुम्ही बेपर्वाईने वागलात तर याद राखा अल्लाहचा मार्गभ्रष्ट करणारा नियम अमलात येऊ शकतो व तुम्ही मार्गभ्रष्टतेत सापडू शकता.

२१३. आणि जेव्हा अल्लाहची ही वैशिष्ट्ये आहेत तर तुम्हाला समस्त व्यवहारांत त्याच्याचकडे रुजू केले पाहिजे त्याच्या आदेशांस सक्तीने अमलांत आणले पाहिजे आणि त्याच्याशी दृढ संबंध राखला पाहिजे.

२१४. मूळग्रंथात 'ताब' हा शब्द प्रयोग झाला आहे. या शब्दाचा कर्ता जेव्हा अल्लाह असेल व 'अला' उपपद असेल तर याचा अर्थ माफ करणे, तौबा कबूल करणे, कृपेसह लक्ष देणे व कृपाळू होणे असा आहे. इथे हा शब्द व्यापक अर्थानेच प्रयोगात आणाला गेला आहे परंतु अनुवादासाठी आम्हाला असा कोणताहि शब्द मिळू शकला नाही जो पूर्ण अर्थ व्यक्त करील म्हणूनच याचा अनुवाद ''अल्लाहने माफ केले'' असा केला आहे.

तबूक युद्धाच्यावेळी ईमान बाळगणाऱ्यांच्या हातून ज्या चुका घडल्या होत्या त्यावर मागील आयतीत अंकूश ठेवला गेला आहे. परंतु जेव्हा त्यांना आपल्या चुकेची जाणीव झाली व त्यांनी माफी मागितली तेव्हा तौबा-स्वीकृतिची शुभ वार्ता त्यांना दिली गेली व शुभ वार्तेचे क्षेत्र इतके विस्तृत झाले की यापूर्वी ज्या ज्या चूका त्यांच्या हातून घडल्या होत्या त्या सर्व माफ झाल्याची घोषणा केली गेली हा जणू कृपेचा वर्षाव होता ज्याने तप्त वातावरणास अनुकूल केले.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या हातून तबुक युद्धाच्या प्रसंगी जी चूक झाली होती तिचा उल्लेख आयत क्र. ४३ मध्ये केला गेला, तो असा की ज्या लोकांनी सामर्थ्य असतानाहि युद्धात सहभागी न होण्याची आज्ञा मागितली होती, त्यांना पैगंबरांनी केवळ आपल्या कोमल मनाने व प्रेमळ चारीत्र्यामुळे परवानगी दिली होती. ही एक लहानशी चूक होती परंतु ......... ज्यांचे दर्जे मोठे आहेत त्यांच्या लहान-सहान चुकांवरहि आक्षेप घेतला जातो आणि जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने देशत्याग केलेल्यांवर व त्यांना सहाय्य करणाऱ्यांवर कृपा-दृष्टि केली तेव्हा सर्वात आधी आपल्या कृपेसह त्याने आपल्या पैगंबराकडे लक्ष दिले.

अडचणीच्या वेळेशी अभिप्रेत तबुक युद्ध होय ज्याच्या अडचणींचे अनुमान यावरुन लावले जाऊ शकते की अत्यंत कडक उन्हाळ्या सुमारे सातशे किलोमीटरचा दीर्घ-प्रवास, खाण्या-पिण्याची अत्याधिक कमतरता, वाहनाची दशा ही की एका उंटावर पाळी-पाळीने कित्येत जण स्वार होत, तशातच रोम सारख्या ज़बरदस्त सामर्थ्याशी टक्कर आशा कठीण प्रसंगात ज्या लोकांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना साथ दिली आणि या कठीण परीक्षेत पूर्ण उतरले ते जेव्हा मदीनेला परत आले तेव्हा तेथे ईश-कृपा त्यांच्या स्वागतासाठी सज्ज होती. ज्या चुका त्यांच्या हातून घडल्या होत्या, त्या माफ केल्या गेल्या व त्यांची तौबा (क्षमा-याचना) कबूल केली गेली.

२१५. म्हणजे या कठीण परीक्षेत शक्यात होती की काही निष्ठावंत लोकांकडूनहि चुका घडाव्या परंतु त्यांची खरी निष्ठा त्यांच्या वैगुण्यांवर प्रभावी ठरली व अल्लाहने त्यांना माफ केले.

**आणि त्या तिघांनाहि त्याने माफ केले. ज्यांचा मामला विलंबित केला गेला होता येथ पावेतो की जमीन विस्तीर्ण असतांनाहि त्यांच्याकरीता संकुचित झाली व ते स्वतः आपल्या प्राणाला जेरीस आले व त्यांना खात्री झाली की अल्लाहच्या प्रकोपा पासून सुरक्षित राहण्याकरीता त्याच्या खेरीज कोणतेहि आश्रय स्थान नाही तेव्हा अल्लाहने त्यांची तौबा (क्षमा-याचना) कबूल केली यासाठी की त्यांनी स्वतःला अल्लाहकडे रुजू करावे. निःसंशय अल्लाह मोठा तौबा कबूल करणारा व कृपा करणारा आहे. (अल-क़ुरआन)**

**११८. आणि त्या तिघांनाहि त्याने माफ केले. ज्यांचा मामला विलंबित केला गेला होता[२१६] येथ पावेतो की जमीन विस्तीर्ण असतांनाहि त्यांच्याकरीता संकुचित झाली व ते स्वतः आपल्या प्राणाला जेरीस आले व त्यांना खात्री झाली की अल्लाहच्या प्रकोपा पासून सुरक्षित राहण्याकरीता त्याच्या खेरीज कोणतेहि आश्रय स्थान नाही तेव्हा अल्लाहने त्यांची तौबा (क्षमा-याचना) कबूल केली यासाठी की त्यांनी स्वतःला अल्लाहकडे रुजू करावे.[२१७] निःसंश्य अल्लाह मोठा तौबा कबूल करणारा व कृपा करणारा आहे.**

وَّعَلَى الثَّلٰثَةِ الَّذِيْنَ خُلِّفُوْا ۭ حَتّٰٓى اِذَا ضَاقَتْ عَلَيْهِمُ
الْاَرْضُ بِمَا رَحُبَتْ وَضَاقَتْ عَلَيْهِمْ اَنْفُسُهُمْ وَظَنُّوْٓا اَنْ
لَّا مَلْجَاَ مِنَ اللّٰهِ اِلَّآ اِلَيْهِ ۭ ثُمَّ تَابَ
عَلَيْهِمْ لِيَتُوْبُوْا ۭ اِنَّ اللّٰهَ هُوَ التَّوَّابُ الرَّحِيْمُ ﴿١١٨﴾

**११९. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! अल्लाहचे भय बाळगा आणि सच्च्या लोकांसह व्हा.[२१८]**

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوا اتَّقُوا اللّٰهَ وَكُوْنُوْا مَعَ الصّٰدِقِيْنَ ﴿١١٩﴾

**१२०. मदीनेचे रहिवासी व त्याच्या परिसरात राहणाऱ्या ग्रामीण अरब लोकांस योग्य नव्हते की त्यांनी अल्लाहच्या पैगंबरास सोडून मागे बसून रहावे व त्याच्या प्राणाशी बेपर्वा होऊन आपल्या प्राणांची काळजी वहावी [२१९] हे अशासाठी की अल्लाहच्या मार्गात तहान, कष्ट व भूकेचा जो त्रास त्यांना पोहचला आहे आणि काफ़ीरांना प्रकोप ग्रस्त करण्यात जे काही पाऊल ते उचलतात व शत्रूला जे काही नुकसान ते पोहचवितात त्याचा मोबदला म्हणून त्यांच्याकरीता एक सत्कृत्य लिहीले जाते. [२२०]अल्लाह अशा लोकांचे आचरण वाया घालवित नाही जे सत्कृत्य करणारे आहेत.**

مَا كَانَ لِاَهْلِ الْمَدِيْنَةِ وَمَنْ حَوْلَهُمْ مِّنَ الْاَعْرَابِ
اَنْ يَّتَخَلَّفُوْا عَنْ رَّسُوْلِ اللّٰهِ وَلَا يَرْغَبُوْا بِاَنْفُسِهِمْ عَنْ
نَّفْسِهٖ ۭ ذٰلِكَ بِاَنَّهُمْ لَا يُصِيْبُهُمْ ظَمَاٌ وَّلَا نَصَبٌ
وَّلَا مَخْمَصَةٌ فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ وَلَا يَطَــــُٔـــوْنَ مَوْطِئًا يَّغِيْظُ
الْكُفَّارَ وَلَا يَنَالُوْنَ مِنْ عَدُوٍّ نَّيْلًا اِلَّا كُتِبَ لَهُمْ بِهٖ
عَمَلٌ صَالِحٌ ۭ اِنَّ اللّٰهَ لَا يُضِيْعُ اَجْرَ الْمُحْسِنِيْنَ ﴿١٢٠﴾

**१२१. आणि जो लहान मोठा खर्च ते करतात आणि जे मैदान ते पार करतात ते सर्व त्यांच्या हक्कात लिहीले जाते, अशासाठी की अल्लाहने त्यांच्या आचरणाचा सर्वोत्कृष्ट मोबदला द्यावा.**

وَلَا يُنْفِقُوْنَ نَفَقَةً صَغِيْرَةً وَّلَا كَبِيْرَةً وَّلَا يَقْطَعُوْنَ
وَادِيًا اِلَّا كُتِبَ لَهُمْ لِيَجْزِيَهُمُ اللّٰهُ اَحْسَنَ مَا كَانُوْا
يَعْمَلُوْنَ ﴿١٢١﴾

**१२२. आणि हे तर होऊ शकत नव्हते की सर्व ईमान बाळगणारे (इस्लामचे ज्ञान घेण्याकरिता बाहेर) निघाले असते परंतु असे का झाले नाही की यांच्या प्रत्येक समूहातून काही लोक निघाले असते, अशासाठी की त्यांनी धर्माची समज प्राप्त केली असती व परत जाऊन आपल्या समूहाच्या लोकांना खबरदार केले असते ज्यायोगे ते जागृत व्हावेत.[२२१]**

وَمَا كَانَ الْمُؤْمِنُوْنَ لِيَنْفِرُوْا كَاۗفَّةً ۭ فَلَوْلَا نَفَرَ مِنْ كُلِّ
فِرْقَةٍ مِّنْهُمْ طَاۗىِٕفَةٌ لِّيَتَفَقَّهُوْا فِي الدِّيْنِ وَلِيُنْذِرُوْا
قَوْمَهُمْ اِذَا رَجَعُوْٓا اِلَيْهِمْ لَعَلَّهُمْ يَحْذَرُوْنَ ﴿١٢٢﴾

२१६. हे तीन इसमांपैकी कअब बिन मालीक, मुरारह बिन रबीअ आणि हिलाल बिन उमय्या हे होत. हे तिन्ही खरेखुरे ईमान बाळगणारे होते परंतु सुस्ती व ग़फलतीमुळे तबुक युद्धात सहभागी होऊ शकले नव्हते, म्हणून त्यांचा मामला आयत क्र.१०६ मध्ये वर्णिल्या प्रमाणे लांबणीवर टाकला गेला होता. या आयतीने त्यांच्या तौबा-स्वीकृतिचीहि शुभवार्ता ऐकविली.

२१७. त्या तीन इसमांपैकी कअब बिन मालीक ने आपला किस्सा मोठ्या विवरणासह वर्णिला आहे जो बुख़ारी व इतर हदीस-ग्रंथात उल्लिखित आहे. येथे आम्ही बुख़ारीच्या हदीसचा खुलासा प्रस्तुत करीत आहोत.

खुलासा असा की या तिघांतर्फे ही ग़फलत झाली होती की तबुक युद्धात योग्य कारणाशिवाय सहभागी झाले नव्हते. जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) तबूकहून परतले तेव्हा मागे राहणाऱ्यांनी आपापल्या सबबी सादर केल्या होत्या परंतु कअब बिन मालीकने सेवेत उपस्थित होऊन स्पष्ट सांगितले की मला कसलीही योग्य सबब नव्हती. पैगंबरांनी फर्माविले, तुम्ही खरे सांगितले, आता उठा व अल्लाहच्या निर्णयाची प्रतिक्षा करा. हज़रत कअब निवेदन करतात की मी गेलो, नंतर कळाले की मुरारह बिन रबीअ व हिलाल बिन उमय्या यांचा मामला देखील माझ्याच सारखा आहे. ते दोन्ही तर घरात बसले व रडत राहीले आणि मी बाहेर चालला गेलो परंतु पैगंबर (सल्लल्लाह अलैहि वसल्लम) यांनी मुसलमानांना आम्हा तिघांशी बोलण्यास मनाई केली होती. म्हणून कोणीही माझ्याशी बोलत नव्हता एके दिवशी बाजारातून जात असताना एका इसमाने गस्सान बादशाहचे एक पत्र माझ्या हवाली केले, ज्यात लिहीले होते की तुमच्या मित्राने तुचमच्याशी अतिरेक केला आहे. जर तुम्ही आमच्या जवळ याल तर आम्ही तुमची कदर करु. हज़रत कअब फर्मावितात की मी हे पत्र वाचले व म्हटले ही सुद्धा एक परीक्षा आहे आणि या पत्रास चुलीत टाकले. चाळीस दिवस झाल्यानंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आदेश दिला की आपल्या पत्नीपासून अलग रहा. मी आपल्या पत्नीला म्हणालो, माहेरी जा व जोपर्यंत अल्लाह या संदर्भात फैसला करीत नाही तोपर्यंत तेथेच रहा. या स्थितीत पन्नास दिवस लोटले व मला जीवन असह्य झाले होते व जमीन माझ्याकरीता तंग झाली होती. अचानक एका पुकारणाऱ्याचा आवाज ऐकला, जो मला तौबा-स्वीकृतिचा शुभ-समाचार देण्यासाठी आला होता. माझ्या दोन्ही साथीदारांनाहि ही शुभवार्ता देण्याकरीता लोक पोहचले होते. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत हजर होऊन मी सलाम केला तेव्हा पैगंबरांचा चेहरा आंनदामुळे चमकत होता. त्यांनी मला शुभ-समाचार देत फर्माविले की आजचा दिवस तुमच्या जीवनात सर्वोत्कृष्ट दिवस आहे. मी म्हणालो माझ्या तौबा-स्वीकृतिची ही निकड आहे की मी आपली सर्व सम्पत्ति दान करावी. पैगंबरांनी फर्माविले, आपल्याकरीता काही राखून घ्याल तर अधिक चांगले, मी म्हणालो, खैबरचा हिस्सा स्वत:साठी ठेवतो. मी पुन्हा म्हणालो, हे अल्लाहचे प्रेषित, मला अल्लाहने खरे बोलण्यामुळे मुक्ति दिली. माझ्या क्षमा-याचनेत या गोष्टीचा समावेश आहे की मी जोपर्यंत जिवंत राहीन तोपावेतो सत्याशिवाय कोणतीही गोष्ट बोलणार नाही. (बुख़ारी- किताबुल मगाजी)

स्पष्ट असावे की या लोकांशी बोलण्याची जी मनाई सर्व सामान्य मुसलमानांना केली गेली होती तो एक विशिष्ट मामला होता जो यांच्यासह केला गेला आणि सर्व काही वही (ईश-आदेशाच्या) मार्ग दर्शनात पार पडले म्हणून यास एखाद्या मुसलमानाच्या सामाजिक बायकाटास उदाहरण बनविले जाऊ शकत नाही. चुका तर अन्य मुसलमानांच्या हातूनहि घडल्या. आणि ज्याने गुन्हा केला त्याला शिक्षा देखील दिली गेली परंतु संभाषण न करण्याची व सलामचे प्रत्युत्तर न देण्याची रीत कोणाच्याहि बाबतीत अंगिकारली गेली नाही आणि हा या गोष्टीचा पुरावा होय की कअब बिन मालीक व त्यांच्या साथीदारांसह जो मामला केला गेला तो विशिष्ट होता व यावरुन सामाजिक बहिष्काराचा नियम उद्धृत करणे योग्य नव्हे.

दुसरी गोष्ट अशी की सहाबा (प्रेषित अनुयायी) च्या हातूनहि चुका घडल्या आहेत व त्यांना माफ हि केले गेले आहे म्हणून ना त्यांच्या मागील चुकांबद्दल दोष-केले दिला जाऊ शकतो, ना त्यांना पूर्णत: निरागस ठरवले जाऊ शकते मग जेव्हा सहाबा निरागस नाहीत तेव्हा इमामांचे निरागस असण्याची श्रद्धा, जी मुसलमानांच्या एका पंथात अद्यापहि आहे. योग्य कशी असू शकते?

क़ुरआना द्वारे ही श्रद्धा स्पष्टत: खोटी ठरते.

२१८. वर ज्या घटना वर्णिल्या गेल्या आहेत, त्यावरून उघड झाले की दांभिकांनी असत्याचा आधार घेतला होता, परिणामी दांभिकतेच्या मूळांना खतपाणी लाभले व त्यांना तौबा (क्षमा याचना) ची सुबुद्धि लाभली नाही, याउलट ज्या ईमान बाळगणाऱ्यांच्या हातून चुका घडल्या होत्या त्यांनी सत्याची कास बाळगली म्हणून त्यांच्यात ईमान जन्य भावना उदूभल्या व त्यांना तौबाची सुबुद्धि लाभली.

सत्य आणि सदाचाराच्या या समृद्धींना लक्षात घेता सर्व सामान्य मुसलमानांना ताकीद केली जात आहे की खऱ्या व सदाचारी लोकांसह व्हा अर्थात प्रामाणिक व ईश-भीरू मोमीन (ईमान बाळगणाऱ्या) लोकांशी संबंध राखा त्यांची मैत्री संपादन करा, त्यांच्या सहवासात राहा. आणि धर्माच्या सामूहीक प्रयत्नात त्यांचेच समर्थन करा तसेच दांभिक वृत्ती अंगिकारणाऱ्यांपासून

अलिप्त रहा.

२१९. तबूक युद्धापासून अकारण मागे राहणाऱ्यांवर मागील आयतीत जो अंकूश ठेवला गेला त्याचे खरे कारण ते, जे ह्या आयतीत वर्णिले गेले आहे म्हणजे जेहाद सारख्या महत्वपूर्ण आणि नाजुक प्रसंगी त्यांचे अल्लाहच्या प्रेषितास साथ न देणे व घरी बसून राहणे. प्रेषिताने तर आपला जीव धोक्यात टाकावे व त्यांनी आपला जीव वाचविण्याकरिता शांती-स्थळ शोधावे.

२२०. म्हणजे जेव्हा जिहादचा हा लाभ आहे की पावलो पावली मोबदला प्राप्त केला जाऊ शकतो व आपल्या पदरात आखिरतची दौलत घेतली जाऊ शकते तेव्हा या मार्गातील त्रास, त्रास राहात नाही, किंबहुना सद्‌भाग्य प्राप्तीचे साधन ठरते आणि याचा मानसिक पैलू असा की माणसाला जेव्हा विश्वास होतो की अमुक एका दरींला पार करून तो ध्येय-रत्न प्राप्त करू शकतो तर मग मार्गातील कष्ट सोपे होतात आणि तो कठीण काम करण्यासहिं तयार होतो.

२२१. जे मुसलमान मदीने पासून  दूर राहात होते त्यांना पैगंबर सभेत हजर होणे अवघड होते व यामुळेच त्यांच्या शिक्षण व प्रशिक्षण संदर्भात समस्या निर्माण झाल्या होत्या. एकी कडे इस्लामचे क्षेत्र दिवसोंदिवस विस्तुत होत जात होते तर दुसरी कडे शिक्षण-प्रशिक्षणाच्या कमतरतेमुळे नामधारी मुसलमानांच्या संख्येत वाढ होत होती. या समस्येचे निराकरण या आयतीत सादर केले गेले आहे व ते असे की समस्त मुसलमान धर्माचे ज्ञान व समज प्राप्त करण्या करिता मदीना येऊ शकत नाही परंतु प्रत्येक वस्ती व कबिल्याच्या लोकांमधून काही लोक असे निघू शकतात ज्यांनी ज्ञान-केंद्रात येऊन ज्ञान साधना करावी व त्यात समज निर्माण करावी आणि मग पुन्हा परत जाऊन आपल्या वस्ती वा कबिल्या वाल्यांना याबाबत सचेत करावे, अशासाठी की त्यांच्यात धर्माची समज निर्माण व्हावी व त्यांनी अवज्ञा व गुन्हाच्या गोष्टींपासून अलिप्त रहावे.

यावरून ज्या तात्विक मार्गदर्शनपर गोष्टी मिळतात त्या पुढीलप्रमाणे:

१) धार्मिक ज्ञान मूलभूत महत्व बाळगणारी गोष्ट आहे. लोकांना जरी शरीआतच्या मर्यादांचे ज्ञान नसेल तर ते खऱ्या अर्थाने इस्लामी जीवन व्यतीत करू शकत नाही आणि जर धर्माची समज नसेल तर त्यांच्यात अपराध-बुद्धि, किंबहुना कुफ्र व दंभ देखील वाढिस लागेल. म्हणून मुसलमानांमध्ये धार्मिक शिक्षाणास सार्वत्रिक करण्याची गरज आहे.

२) धार्मिक ज्ञानास सार्वत्रिक करण्याकरिता परिस्थिती अनुरूप विविध मार्ग अंगिकारले जाऊ शकतात. एक हा की शिक्षण व प्रशिक्षण आणि अध्ययन-अध्यापनाची केंद्र क़ायम केली जावीत व तेथे संबंधित इलाक्याच्या प्रत्येक क्षेत्रातून एक संख्येने पोहचून लाभ घ्यावा आणि मग आपापल्या ठिकाणी पोहचून सर्व सामान्य लोकांना धार्मिक शिक्षणाशी परिचित करण्याचा प्रयत्न करावा.

आजच्या काळात हे कार्य स्थानिक रित्या देखील पार पडू शकते. उदा.मसजिदींमध्ये क़ुरआन व हदीसच्या पाठाचा उपक्रम. धार्मिक सम्मेलन, धार्मिक शिक्षण संस्था इत्यादि.

३) धार्मिक शिक्षण व प्रशिक्षणाची गरज जशी मुलांना आहे तशी मोठ्या माणसांनाही आहे म्हणून मोठ्या माणसांना दृष्टीआड करून केवळ लहान मुलांच्या शिक्षणावरच समाधान मानणे उचित नाही.

आयतीत खरे पाहता मोठ्या माणसांमध्ये धर्माची समज निर्माण करण्याची ताकीद दिली गेली आहे.

४) धर्माच्या शिक्षणात खरे महत्व धर्माचे सामंजस्य निर्माण होण्यात आहे हे उद्दिष्ट पारंपारीक शिक्षण दिल्याने किंवा केवळ फिकहची माहीती पुरविल्याने साध्य होऊ शकत नाही किंबहुना यासाठी अशा प्रकारच्या शिक्षणाची गरज आहे की माणसाने आपल्या पालनकर्त्यास ओळखावे, आपल्या जीवनउद्दिष्टाशी परिचित व्हावे व ही गोष्ट त्याच्या लक्षात रहावी की धर्म त्याच्याकडून प्रामाणिक अनुसरणाची अपेक्षा करतो आणि इस्लाम म्हणजेच स्वत:ला परिपूर्णत: अल्लाहच्या हवाली करणे. यावरून हे माहीत झाले पाहिजे की इस्लामी जीवनाचे अंगोपांग काय आहेत शरीअतच्या मर्यादांशीनिष्ठा राखण्याचा अर्थ काय, ईश भयाची वस्तुस्थिती काय आहे व क़ुरआनने कोणत्या लोकांना ईश-भीरू म्हटले आहे.

५) शिक्षण-प्रशिक्षणाचे खरे उद्दिष्ट लोकांना इस्लामेतर जीवनाच्या दुष्परिणामापासून सावध करणे, अशासाठी की त्यांच्यात आखिरतच्या उत्तरदायित्वाची जाणीव व्हावी व खरे खुरे इस्लामी जीवन व्यतीत करण्यास त्यांनी तयार व्हावे.

६) धर्माचे ठोस ज्ञान व त्याचे सामंजस्य याच स्थितीत निर्माण होऊ शकते जेव्हा क़ुरआन समजून घेण्याचा व समजविण्याचा प्रयत्न केला जाईल.

७) धार्मिक शिक्षणाकरीता आवश्यक असेल तर प्रवास केला पाहिजे.

**हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! काफ़िरांशी युद्ध करा जे तुमच्या जवळ आहेत आणि त्यांना तुमच्यात कठोरतेची अनुभूति व्हावी आणि जाणून असा की अल्लाह ईश-भय बाळगणाऱ्यांसह आहे. (अल-क़ुरआन)**

१२३. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! काफ़िरांशी युद्ध करा जे तुमच्या जवळ आहेत [२२२] आणि त्यांना तुमच्यात कठोरतेची अनुभूति व्हावी [२२३] आणि जाणून असा की अल्लाह ईश-भय बाळगणाऱ्यांसह आहे. [२२४]

يَٰٓأَيُّهَا ٱلَّذِينَ ءَامَنُوا قَٰتِلُوا ٱلَّذِينَ يَلُونَكُم مِّنَ
ٱلْكُفَّارِ وَلْيَجِدُوا فِيكُمْ غِلْظَةً ۚ وَٱعْلَمُوٓا أَنَّ ٱللَّهَ مَعَ
ٱلْمُتَّقِينَ ﴿١٢٣﴾

१२४. आणि [२२५] जेव्हा एखादी सूरत अवतरते तेव्हा त्यांच्या पैकी काही जण म्हणतात या (अध्यायाने) ने तुमच्यापैकी कोणाच्या ईमानात वाढ केली? तेव्हा जे लोक ईमान बाळगतात त्यांच्या ईमानात याने निश्चितच वाढ केली आहे [२२६] आणि ते यापासून शुभ-संदेश प्राप्त करतात.

وَإِذَا مَآ أُنزِلَتْ سُورَةٌ فَمِنْهُم مَّن يَقُولُ أَيُّكُمْ
زَادَتْهُ هَٰذِهِۦٓ إِيمَٰنًا ۚ فَأَمَّا ٱلَّذِينَ ءَامَنُوا فَزَادَتْهُمْ
إِيمَٰنًا وَهُمْ يَسْتَبْشِرُونَ ﴿١٢٤﴾

१२५. परंतु ज्या लोकांच्या मनात रोग आहे त्यांच्या मलीनतेवर याने आणखी एका मलीनतेची वाढ केली व ते अशा स्थितीत मेले की काफ़ीर होते [२२७]

وَأَمَّا ٱلَّذِينَ فِى قُلُوبِهِم مَّرَضٌ فَزَادَتْهُمْ
رِجْسًا إِلَىٰ رِجْسِهِمْ وَمَاتُوا وَهُمْ كَٰفِرُونَ ﴿١٢٥﴾

१२६. काय हे पाहत नाही की त्यांना दरवर्षी एक किंवा दोन वेळा कसोटीत टाकले जाते. तरी देखील हे असे आहेत की ना तौबा करतात व ना बोध घेतात. [२२८]

أَوَلَا يَرَوْنَ أَنَّهُمْ يُفْتَنُونَ فِى كُلِّ عَامٍ مَّرَّةً أَوْ
مَرَّتَيْنِ ثُمَّ لَا يَتُوبُونَ وَلَا هُمْ يَذَّكَّرُونَ ﴿١٢٦﴾

१२७. आणि जेव्हा एखादी सूरत अवतरते तेव्हा एकमेकांकडे पाहू लागतात की कोणी तुम्हाला पाहत तर नाही, मग चालते होतात. [२२९] अल्लाहने त्यांची मने फिरवली आहेत कारण हे असे लोक आहेत जे समजत नाहीत.

وَإِذَا مَآ أُنزِلَتْ سُورَةٌ نَّظَرَ بَعْضُهُمْ إِلَىٰ بَعْضٍ هَلْ
يَرَىٰكُم مِّنْ أَحَدٍ ثُمَّ ٱنصَرَفُوا ۚ صَرَفَ ٱللَّهُ قُلُوبَهُم
بِأَنَّهُمْ قَوْمٌ لَّا يَفْقَهُونَ ﴿١٢٧﴾

१२८. तुमच्या जवळ एक पैगंबर आला आहे जो तुमच्या पैकीच आहे [२३०] तुमचे अडचणीत पडणे त्याला असह्य आहे [२३१] तो तुमचे भले व्हावे या गोष्टीचा मोठा इच्छुक आहे [२३२] आणि ईमान बाळगणाऱ्यां करिता प्रेमळ व कृपाळू आहे. [२३३]

لَقَدْ جَآءَكُمْ رَسُولٌ مِّنْ أَنفُسِكُمْ عَزِيزٌ عَلَيْهِ
مَا عَنِتُّمْ حَرِيصٌ عَلَيْكُم بِٱلْمُؤْمِنِينَ رَءُوفٌ رَّحِيمٌ ﴿١٢٨﴾

१२९. असे असूनहि जर हे लोक तोंड फिरवितात. [२३४] तर त्यांना सांगा माझ्याकरिता अल्लाह पुरेसा आहे. त्याच्या खेरीज कोणीहि ईश्वर नाही [२३५] त्यावरच मी भरवसा केला आणि तो महान सिंहासना (अर्शे-अज़ीम) चा मालक आहे.

فَإِن تَوَلَّوْا فَقُلْ حَسْبِىَ ٱللَّهُ لَآ إِلَٰهَ إِلَّا هُوَ ۖ عَلَيْهِ
تَوَكَّلْتُ ۖ وَهُوَ رَبُّ ٱلْعَرْشِ ٱلْعَظِيمِ ﴿١٢٩﴾

२२२. जेहाद संबंधीचा हा अंतिम आदेश होय, जो मुसलमानांना दिला गेला आहे याद्वारे ही गोष्ट ध्यानी आणण्याची आहे की जरी अरब भूमीवर इस्लाम ची सत्ता कायम झाली आहे तरी ह्याने मुस्लिम समूहाच्या जबाबदाऱ्या संपुष्टात आल्या नाहीत. तो ज्या उद्दिष्टाकरिता निर्माण केला गेला आहे त्याची निकड हीच की जेहाद ची परंपरा यापुढेहि जारी आहे, अशासाठी की दिवसोंदिवस इस्लामचे क्षेत्र व्यापक व्हावे व ते एक प्रभावी सामर्थ्य व्हावे याचे कार्यात्मक स्वरूप असे असेल की काफ़िरांचा जो इलाका वा देश इस्लामी राज्याच्या हद्दीपासून जवळ व मिळालेला असेल त्याच्याशी प्रथम युद्ध केले जावे व त्या नंतर या अनुषंगे जो जवळ असेल त्याच्याशी.

हा मुतलक (निर्बंध) आदेश आहे. म्हणून सरंक्षणात्मक युद्धापावेतो त्याला मर्यादित ठेवण्याचे काही कारण नाही. इस्लामी राज्य आपली परिस्थिती व साधाना नुसार अशा प्रकारचे पाऊल उचलण्यास समर्थ आहे.

प्रमुख भाष्याकार इब्ने जरीर तबरी यांनी देखील याला या अर्थानेच घेतले आहे. यास्तव ते फर्मावितात:

''सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या या फ़र्मानाचा अर्थ असा आहे की स्थान दृष्ट्या जे (काफ़िर) तुमच्या जवळचे असतील त्यांच्याशी तुम्ही प्रथम लढा, मग त्यांच्याशी जे यांनतर जवळचे असतील. दूरच्या काफ़िरांशी नव्हे.

त्या काळी या आयतीच्या संबोधिताशी अधिक जवळचे रोमन होते. कारण ते सिरीया देशात वास्तव्य करून होते आणि सिरीया मदीनेपासून इराकच्या तुलनेने जवळ होता.''

(तफसीर तबरी खंड ७ पृष्ठ ५२)

आणि हल्लीचे भाष्यकार सय्यद कुतुब फर्मावितात:

''या आदेशात काफ़िरांचे मुसलमानांवर अतिरेक करण्याबाबत व देशावर क्रूर हल्ला करण्याविष्यी कोठेहि उल्लेख नाही आणि आम्हाला माहित आहे की हा शेवटचा आदेश होता जो या धर्मावर कार्यवाहीत होण्यास मूलाधार ठरवितो. आणि यापासून जिहादचे मूळ उद्दिष्ट आहे. हे त्या आदेशांप्रमाणे जे मदीनेत इस्लामी राज्याच्या स्थापनेच्या प्रारंभिक अवस्थेशी संबंधित होते केवळ 'सरंक्षणा'शी संबंधित आदेश नाही.''

काही लोक जे आज इस्लामच्या आंतर्राष्ट्रीय संबंधावर व इस्लाम मधील जिहादच्या आदेशांवर विवाद करतात तसेच काही असे लोक जे जिहादशी संबंधित क़ुरआनातील आयतींचे भाष्य करतात असे इच्छितात की क़ुरआनातील ह्या अंतिम वचनाला त्या वचनाशी सशर्त मानावे जे मागील अवस्थेशी संबंधित होते. आणि यासाठी (काफ़िरातर्फे) अतिरेक झाल्याची किंवा भयाची अट लावली, वस्तुत: क़ुरआनाची ही वचने आपल्या जागी अगदी मुतलक निर्बंध आहेत व (जिहादच्या बाबीमध्ये) हा अंतिम आदेश होय.

(फ़ी ज़िलालिल् क़ुरआन खंड ३ पृ. १७३७)

स्वत:च आरंभिलेले युद्ध मानवतेला अज्ञानाच्या अंध:कारातून बाहेर काढण्यासाठी, माणसांना माणसांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी व कुफ्रच्या विनाशा पासून मुक्ति देण्याकरीता होते. म्हणूनच या युद्धात व मुलुखगिरी करिता लढल्या जाणाऱ्या युद्धात जमीन-आसमानाचे अंतर आहे.

**परवाज़ है दोनो की इसी एक जहाँ में**
**शाहींन का जहाँ और है करगस का जहाँ और**

(या एकाच सृष्टीत दोघेहि भरारी मारतात परंतु बहीरी ससाण्याचे विश्व वेगळे तर गिधाडाचे विश्व वेगळे.)

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या वफ़ात (मृत्यु) च्या काही दिवस आधी उसामा बिन जैद यांच्या नेतृत्वात जे लष्कर रोमन लोकांच्या मुकाबल्यासाठी सिरीया कडे पाठविले होते ते या ईशआदेशाचे पालन होते आणि नंतर यरमोक इत्यादिच्या ज्या मोहिमा पुढे आल्या त्या देखील ह्याच आदेशाच्या पालनात होत्या.

स्पष्टीकरणासाठी पहा टीप क्र. ५७.

२२३. म्हणजे त्यांनी हे जाणून घ्यावे की तुम्ही काफ़िरांवर सक्त आहात व असत्यापुढे झुकणारे नाहीत. त्यांच्या बाबतीत तुमच्या अंगी सैलपणा असता कामा नये की त्यांनी तुम्हाला मऊ मेण समजू लागावे, किंबहुना तुमच्या अंगी अशी परिपक्वता व दृढता असली पाहिजे की त्यांना कळून यावे की हे पाषाणासारखे कठोर आहेत ज्यांना तोडणे सहज सोपे नाही.

या ताकीदचा प्रभाव होता की मुसलमानांनी फारस व रोमच्या महाशक्तिंच्या मुकाबल्याकरिता छाती पुढे केली;आणि ना कसरा ला खातरीत धरले, ना कैसरला.

२२४. म्हणून काफ़िरांशी युद्ध करतांना व त्यांच्याशी सक्ती चा मामला करीत तुम्ही अल्लाहचे भय बाळगले पाहिजे. आणि ही सर्व कामे शरीअतच्या मर्यादेत राहून पार पाडली पाहिजेत.

२२५. ज्या प्रकारे वरील आयतीत शेवटचा आदेश होता, जो काफ़िरांबाबत मुसलमानांना दिला गेला, तद्वतच या काही आयतीत दांभिकांबाबत अंतिम गोष्टी फर्माविल्या गेल्या आहेत. त्या दांभिकाबाबत ज्यांचा उल्लेख या सूरहमध्ये विवरणासह केला गेला आहे.

२२६. ईमान मध्ये वृद्धि शी अभिप्रेत ईमानाच्या कैफ़ियतीमध्ये वाढ होय. याचे स्पष्टीकरण सूरह अनफ़ाल, टीप क्र.३ मध्ये केले गेले.

२२७. म्हणजे ज्यांच्या मनात दंभ-रोग होता त्यांच्या या गलीच्छ अंतरंगात नव्या सूरहच्या अवतरणाने वृद्धिच झाली.

ज्या व्यक्तिला नेत्र-रोग असेल तिला सूर्य प्रकाशाचा लाभ होऊ शकत नाही, किंबहुना त्याच्या त्रासात वाढ होण्यास कारक ठरेल. हे दांभिक अत्यंत घाणेरड्या रोगात ग्रस्त असतानाहि स्वत:ला तन्दुरुस्त समजत व जेव्हा उपचाराकडे त्यांचे लक्ष वेधले जाई तेव्हा ते आपण निकोप असल्याचा दावा करीत परिणामी, ते क़ुरआनापासून-त्यात रोग-मुक्तिचा उपाय असतानाहि, कोणताहि लाभ घेऊ शकले नाहीत आणि सूरह बराअत सारख्या विवेक बुद्धीस हलविणाऱ्या सूरती पासूनहि त्याच्यांत जागृति येऊ शकली नाही.

२२८. म्हणजे वर्षात एक दोनदा कोणती ना कोणती कसोटी जरूर होत असते. कधी जिहादच्या स्वरूपात तर कधी अन्य एखाद्या स्वरूपात अशासाठी की ही कसोटी तौबा व सुधारणेचे साधन व्हावी. परंतु या दांभिकांची मने इतकी कठोर झाली आहेत की त्यांना तौबा ची सुबुद्धि लाभत नाही व त्यांची बुद्धि ज्याअर्थी भ्रष्ट झाली आहे म्हणून कोणत्याहि घटनेने व प्रसंगाने ते बोध घेत नाहीत.

२२९. दांभिक आपल्या दंभावर आवरण घालण्याकरिता पैगंबरांच्या मजलीस (सभे) मध्ये सहभागी तर होत, परंतु जेव्हा एखादी अशी सूरत अवतरत असे, ज्यात दांभिकांचे पितळ उघडकीस आणले गेले आहे तेव्हा त्यांचे चेहरे बघण्यासारखे होत मग ते आपल्या साथीदारांना संकेतिक भाषेत सांगत की तुम्हाला या स्थितीत कोणी पाहत तर नाही आणि मग संधी मिळताच निघून जात. त्यांच्या या अवस्थेचे चित्रण या आयतीत रेखाटले गेले आहे.

२३०. ह्या अंतिम दोन आयती क़ुरआन अवतरणाच्या दृष्टीने सूरह नस्रच्या व्यतिरिक्त अल्लाहचे अंतिम वचन होय ज्यात समारोपाचा संदेश दिला गेला आहे.पैगंबराचे प्रेषित्व जरी अरबकडे प्रत्यक्षत: झाले होते परंतु अप्रत्यक्षत:त्यांच्याद्वारे त्यांचे प्रेषित्व कयामती पर्यंत सर्व जनसमूहा व राष्ट्रांकरिता आहे.

"तुमच्या मधूनच आहे" चा अर्थ असा की पैगंबर अरबांमधूनच आहे व दुसरा अर्थ असा की ते माणसांमधूनच आहे, म्हणून सर्व मानव सहजगत्या त्याच्याशी परिचित होऊ शकतात कोणत्याहि जन-समूहाला त्याच्याशी जवळ होण्यात अजाणता वाटू नये. पैगंबर अल्लाहचा संदेश वाहक असतो म्हणून त्याच्याशी आपुलकी वाटण्यात देश व राष्ट्राच्या भिंती आड येऊ नयेत.

२३१. म्हणजे तो समस्त मानवांकरिता दयाळू मन बाळगतो. म्हणून तुम्हाला विनाशापासून वाचविण्याकरिता बेचैन आहे आणि हा विचार त्याच्याकरिता अत्यंत कलेशदायक होय की तुम्हाला जहन्नम मध्ये निरंतर शिक्षा भोगण्याकरिता फेकले जावे.

२३२. म्हणजे तो मानव जातीचा हितचिंतक आहे व हे इच्छितो की तुम्ही भलेपणाचा मार्ग पत्करून आपल्या पदरी मांगल्य घ्यावे व आखिरतमध्ये सफल व्हावे.

२३३. ईमान बाळगणाऱ्यांमध्ये अरबही होते व अरबेतरहि. आणि या सर्वांच्या हक्कात पैगंबर प्रेमळ व दयाळू होते. सुहैब रूमी, सलमान फारसी व बिलाल हब्शी सर्व प्रेषित्व तेजांकडे आकृष्ट होणारे पतंगे होते आणि पैगंबराचा लाभ राष्ट्र देशाच्या फरकाविना समस्त ईमान धारकांकरिता सार्वत्रिक होता.

२३४. अर्थात अशा थाटाचा जो प्रेषित यांच्याकडे पाठविला गेला आहे त्याची जर लोक कदर करीत नाही व त्यावर ईमान बाळगण्याबाबत इन्कार करतात तर.......

२३५. ही शेवटची गोष्ट होय जी प्रेषित-मुखाद्वारे सांगितली गेली आहे.यात तौहीद (एकेश्वरवादा) चा संदेश प्रकट करताना पैगंबरांच्या दोन गुणाचांहि उल्लेख आहे म्हणजे लोकांबाबत निरपेक्षता आणि ईश्वरावरील अटळ विश्वास पैगंबराने आवाहनाचा आरंभ तौहीद ने केला होता आणि.... शेवटच्या संदेशातही तौहीदलाच प्रस्तुत केले आहे.

# अनुक्रमणिका
# (INDEX)

# अनुक्रमणिका (INDEX)
## (पृष्ठ क्रमांक)

**अल्लाह**
- अल्लाह या शब्दाचे स्पष्टीकरण ३,४
- ला मानण्याचा अर्थ ११
- चा रंग धारण करणे ६७
- च्या जवळ होण्याचा अर्थ ९९
- बुद्धिकौशल्य युक्त असण्याचा अर्थ २२,२३
- शी प्रेम व त्याच्या प्रेमाचा अर्थ ८२, ८३, १९३
- एकमेव उपास्य असण्याचा अर्थ १८१
- आकाश व जमीनीचा स्वामी ३३६
- सत्ताधिकार बाळगणारा १९१
- शी निष्ठेला प्रत्येक गोष्टीवर प्राधान्य आहे ३०७
- शी निष्ठेला माती व रक्ताच्या निष्ठे वर प्राधान्य आहे ३२१
- चेहरे घडविणारा १८५
- चिरकालीन अस्तित्व १८१
- तर्फे मांगल्य ३११
- बनविलेल्या रचनेत परिवर्तन ३३३
- ची साक्ष १८९
- ला मजबूत धरणे २१९
- चे सान्निध्य कोणत्या लोकांना लाभेल ३६२
- ला प्राप्त करून घेणे ३६१
- ची दोर २१९
- मृतांमधून जिवितास व जिवितांमधून मृतांना बाहेर काढणारा १९१, ४९८, ४९९
- सर्व भूप्रदेशांचा मालक १९१
- ला आदेश देण्याचा परिपूर्ण अधिकार ३७६
- चे ज्ञान ४३३, ४३५
- च्या महानतेला गालबोट लावणारा ४११, ४१३
- ची कृपा ४७१
- स्थळ -काळाचा स्वामी ४५९
- च्या वचनांमध्ये बदल नाही ४६७, ४६८
- चा नियम ४६७, ४६८
- ला पुकारण्याचा अर्थ ४८१, ४८३
- दाणे व कोयी फाडणारा ४९८, ४९९
- करीता पावित्र्य ५००, ५०१
- चा हक्क ५२४,५२५
- ने आकाश व जमीनीला सहा दिवसात निर्माण केले ५६४
- अर्श वर विराजमान ५६५
- ला पुकारणे भय आणि आशा बाळगून ५६४
- जवळ मदत मागणे ५९४
- चे मूसाशी वार्तालाप करणे ६०२, ६०३
- करीता शुभ-नामे ६२५
- लाच कियामतीचे ज्ञान आहे ६२८, ६२९
- वर भरवसा ६४२
- चे भय बाळगणे ६४२
- च्या मार्गापासून रोखणे ६६९
- ची संतती असण्याची चुकीची कल्पना ७०९
- ची प्रसन्नता ७३८,७३९

**अल्लाहच्या आयती**
- चा अर्थ २३
- ना न विकणे ३०,३१
- रद्द असण्याचा अर्थ ५९
- आयतल कुर्सी १५४,१५५
- चा इन्कार १८६, २०४, ३०२
- सृष्टीच्या प्रत्येक गोष्टीत निशाणी २५०
- ची थट्टा उडविली जात असेल तर तिथे बसू नये ३४४, ३४६, ३४७, ३४९
- ला खोटे ठरविणे ३७८,३८०, ४६४, ४७०, ४७२, ४७८, ४८८, ५६२, ५६४, ६२४
- च्या मोबदल्यात तुच्छ किंमत ६९२, ६९३

**असहाबे अम्र**
- शी अभिप्रेत ३०३
- च्या आज्ञा पालनाचा आदेश ३०२
- च्या आज्ञा पालनाच्या अटी ३०३
- शी मतभेदाचा हक्क ३०३
- पावेतो खबरी पोहचविणे ३१२, ३१३
- इमाम निरागस असण्याची चुकीची कल्पना ३०३
- धर्महीन शासनाशी जुळते घेणे योग्य नव्हे ३०३
- च्या पदा करीता योग्य लोक ३०२

**अनामत**
- च्या अर्थ ३०१
- हक्कदारांच्या हवाली करणे ३००, ३०१

**अन्सार** ७५०,७५१, ७५८

**अन्फाल** ६३९
**अवलीया-भक्ति** ४७१, ६२९, ६३१
**अय्युब (अलैहिस्सलाम)** ४९२, ४९३,
**अल्लाह करीता संबंध** ३४२
**अनुसरण**
- आंधळे ५६९, ५७१, ५७५
**अडाणीपणाचा फैसला** ४०४, ४०५
**अपहार** ३२६, ३२७, ६५४, ६५५
**अल्लाहचे स्मरण** ४२८, ४२९, ४३२, ४३३, ६३४, ६३६
- सकाळ संध्याकाळ ६३६, ६३७
- तस्बीह फिरविणे ६३७
- ची हकीगत ६३७
- कशा प्रकारे अपेक्षित आहे ६३७
**अल्लाहची मर्जी** ११४
**अतिरेक करण्याची मनाई** ३६४, ३६८, ५५७
**अल्लाहच्या गुणवैशिष्टयां बाबत अनेकेश्वरवादी कल्पना** ६२६
**अल्लाहचा अजाब**
- अकस्मात येऊ शकतो ५४६, ५४७
- पासून निर्धास्त राहणाऱ्या वस्त्या ५८४, ५८५
**अर्श वर विराजमान होण्याचा अर्थ** ५६४
**अज़ीज़ (अलैहिस्सलाम)** ७०६, ७०९
**अली** ६८९
**अतिशयोक्ति** ४२०, ४२१, ४२३
**अल्लाह खेरीज च्या उपास्यांची पूजा** ५२०
-करीता पोकळ पदव्या मुश्किलकुशा वगैरे. ४६३, ४६५
**अभिमान बाळगणारे** २८८, २८९
**अन्याय**
- शत्रू शी ही करू नये ३७८, ३८०
**अशुभतेची हकीगत** ५९६, ५९७
**अनाथ**
- ची व्याख्या २५९
- चा माल त्याच्या हवाली करणे २५८, २६२, २६३,
- चा माल गिळंकृत करणे २५८, २६२
- मुलींशी निकाह करीता अट २५८,२६०
- चे हक़्क़ अदा करण्याची ताकीद २६२, २६३, ३३४, ३३५
- चा पालक २६३
- शी सद् व्यवहार २६२, २६३
- च्या मालमत्तेचे संरक्षण ५३२, ५३४
**अनेकेश्वर वादी** ४२२, ४८१, ४८३, ५२०, ५२१, ५२८
- मसजिदींना आबाद करण्या योग्य नाहीत ७००
- ची अवस्था कियामतीच्या दिवशी ४६२, ४६३
- च्या उपास्यांना बरेवाईट बोलणे ५०६, ५०७
- चे ईश्वर क़ियामतीच्या दिवशी गायब ४६३
- च्या इच्छेनुसार वागण्याची मनाई ५२८
- ची नमाज़ ६५८, ६५९
- शी लढण्याचा आदेश ६६०,६६१, ७१४
- पासून मुक्त होण्याची घोषणा ६८८, ६८९
- ला ठार करण्याचा आदेश ६९२, ६९३
- ला ईश-ग्रंथ ऐकण्यास्तव अभय देणे ६९२, ६९३
- च्या वधा च्या आदेशा विषयीचा गैरसमज व त्याचे निराकरण ६९३
**अबुसुफियानं** ६४०
**अबु जहल** ६३९
**अबुबक्र** ६८९
**अबुज़र** ७१६
**अम्र बिल मअरूफ व नही अनल मुन्कर** २१८, २२२
(चांगल्या गोष्टींचा आदेश, वाईट गोष्टींपासून रोखणे)
- मअरूफ शी अभिप्रेत २१९
- मुन्कर शी अभिप्रेत २१९
- प्रत्येक मुसलमानाचे कर्तव्य २१९
- भल्या जन समूहाचा गुणविशेष २२३
- जबाबदाऱ्या ५३९
**आखिरत**
- शी अभिप्रेत १३
- वर युक्तिवाद ५
- वर ईमान ३००
- मध्ये पूरेपूर मोबदला २४८
- कर्माच्या मोबदल्याचा नियम ३३२
- मध्ये हिस्सा २४४
- आखिरतची मुक्ति २११, २१३, ३३२, ३३३
- ला आपले ध्येय उद्दिष्ट बनविणे ६१९
-च्या तुलनेत ऐकहिक जीवनाची सामग्री ७२०
- चा इन्कार करणारे ७२४
**आदम** २२,२३,२४,२६,५६९
- पासून मानव-निर्मिती २५८, २५९
- पासून हव्वा ची निर्मिती २५९,२६०
- ची जन्नत २२,२३,२६,२७
- नावांशी अभिप्रेत २३,२४

- ला सजदा करण्याचा आदेश २६, २८
- ची तौबा (क्षमा याचना) २६, ५५०
- ची चूक २६, २७
- च्या दोन मुलांचा किस्सा ३८६, ३८७, ३९१
- चे लज्जा स्थानांना झाकणे ५५०
**आले इब्राहीम (हज़रत इब्राहीम यांची संतती)** १९२, १९३, ३०१
- ला ईश ग्रंथ व बुद्धि कौशल्य २९६
- ला महान साम्राज्य ३००
**आले इम्रान (हज़रत इम्रान यांची संतती)** १९२, १९३
- इम्रान बिन मातान १९३
- च्या पत्नीची प्रार्थना १९४
**आवागमन**
- एक चुकीचा दृष्टीकोन ६१६
**आरोप ठेवणे** ३२६, ३२७
**आत्महत्त्या निषिद** १०७, १२१
**आर्थिक सम्पन्नतेचा आधार** ५८५
**आर्थिक अडचणीत टाकण्याचा उद्देश** ४७३
**आत्मशुद्धि** ६७,७६,९९
**इब्राहीम (अलैहिस्सलाम)**
- आणि काबागृहाची उभारणी ६५, ६७, २१५
- चा धर्म ७१
- चा जन-समूह ७३६
- चे प्रमाण १५४, १५८, १६०, ४९२, ४९३
- च्या संततीच्या दोन शाखा ३०
- च्या प्रामाणिक मित्र ३३३
- ची पद्धति ५३८, ५३९
- चा आपल्या जन समूहाशी वाद ४८८, ४८९, ४९०, ४९३
- चे आपल्या पित्यास सत्य स्वीकृतिचे आवाहन ४८४
- ची आपल्या मुला करीता क्षमा याचना ७५८,७५९,

## इ

**इब्लीस (सैतान)**
- चा तर्क ५४८, ४४९
**इस्माईल (अलैहिस्सलाम)** २१०,२११,४९२
- आणि काबागृहाची उभारणी ६५, ६७
- ची संतती २८, ६५, ६७
**इसहाक (अलैहिस्सलाम)** २१०,२११, ४९२, ४९३,
- हज़रत इब्राहीम चे पुत्र ४९३
**इसराईल** २१२, २१३
- हज़रत याकूब यांची उपाधि ३०,४९२,४९३
**इस्लाम** २६४, ३६५, ३७५, ४०९
- चा अर्थ ६७
- मध्ये पूर्णत: शिरकाव ११५,११७
- चे दंडविधान ३९४, ३९६
- ची जीवन पद्धति १५
- खरा धर्म १८७,१९८,१९१
- मांगल्य च मांगल्य २१९
- समस्त सृष्टीचा धर्म २१०, २११
- हाच एकमेव सत्य धर्म असण्याचे प्रमाण २११, २१३
- एका वंश किंवा समुदायाचा धर्म नव्हे २११, २१३
- सहकाऱ्यांचा धर्म ४४२, ४४३, ४४६, ४४७
- करीता मन: पटल उघडले जाणे ५१६,५१७, ५१८, ५१९
- खेरीज कोणताही धर्म ईश्वरास मान्य नाही २१०, २११
**इस्लामी राज्य** ६८३
**इल्हाम (अंत: प्रेरणा)** ४४२, ४४३, ४४४, ४४७
**इलियास (अलैहिस्सलाम)** ४९२, ४९३
**इन्फाक (खर्च करणे)** १०, ६७२, ६७३, ७४०
- दिखावा म्हणून करणे २९०
- निकटतेचे माध्यम ७५०, ७५१
- ला दंड समजणे ७५०, ७५१
- चा अर्थ १६१
- मदतीस खऱ्या अर्थाने पात्र १६४, १६५
**इनामाचे स्पष्टीकरण** ३६५
**इला चा आदेश व त्याचे स्पष्टीकरण** १२९
**इस्लामी जन समूहा करीता वर्चस्व व सत्ताधिकार** २२५
- शी गद्दारी करणारे ३४१

## ई

**ईमान**
- तोच विश्वसनीय होय जे शिर्क विरहीत आहे ४९३
- सोबत कुफ्र करणे ३७४, ३७५
- बाळगण्याचा अर्थ १२
- बाळगण्याचे आवाहन ३४०
- मध्ये वृद्धि ६४२
**ईमान बाळगणारे** २०२
- धैर्यशील १८६
- सदाचारी १८६
- आज्ञाधारक १८६
- ईश-मार्गात खर्च करणारे १८६
- प्रात:काळी क्षमा याचना करणारे १८६

- अल्लाहच्या मार्गात लढणारे १८६
- पक्के ईमान धारक बनावे ३४१
- ची परिणति ३५६
**ईशादेशाच्या ठिकाणी मानवाचा हुकुम चालविणे** ३११
**ईदुल फित्र** ९९
**ईद** ४४४, ४४७
**ईसा (अलैहिस्सलाम)** ३५, ४८, ४९, ६८, ६९, ७१, १९३, १९६, १९७, २००, २०१, २०३ ३८१, ३८२, ४४२, ४४३, ४४४, ४४७
- आल्लाहचा कलिमा (वचन) १९६, १९७, ३५४
- ईश्वर असण्याचे खंडन ३५०, ३५४,३५७, ३८४, ४२०,४२१
- अल्लाहतर्फे एक आत्मा ३५०, ३५१, ३५६
- चे पाळण्यात बोलणे १९८, १९९, ३४८
- चा जन्म असामान्य रित्या १९६, ३३६, ४४२, ४४६
- ची प्रार्थना खाद्यपदार्थानी भरलेल्या ताटा करीता ४४६
- यांना अल्लाहचा दास असण्यात संकोच नाही ३५७
- मरीयम पुत्र शब्दाचे स्पष्टीकरण पिता विना असण्या बद्दल प्रमाणित करते २००
- चे चमत्कार २००, ४४२, ४४३, ४४४, ४४७
- चे क़बरीतून उठून उभे राहण्याचा किस्सा ३४८
- ची पुकार २००
- चे अंतिम जेवण ४४७
- यांना उचल्ले जाणे २००, ३५०, ३५१, ४५०
- चे अनुसरण करणाऱ्यांचे वर्चस्व १९८
- इस्लाम चे पुरस्कृत १९९
- चे अल्लाहला आपला 'रब्ब' (पालनकर्ता) म्हणणे २०१
- चे अवतरण नवीन प्रेषित या नात्याने होणार नाही ३५१
- ला जीवे मारले गेले नाही आणि ना कूसावर चढविले गेले ३४६, ३४८
- चे मृत्युपूर्वी ईश-ग्रंथाचे ईमान बाळगणे २४०,२४१
- ईसा यांचे अवतरण ३४८, ३४९
- ची साक्ष कियामतीच्या दिवशी ४५०, ४५१
- ची अवतरणा नंतर सर्वत्र इस्लाम हाच धर्म असेल ३४९
- द्वारे दज्जाल चा वध ३५०
- च्या मृत्यु नंतर ख्रिश्चनांनी विचित्र तत्वज्ञान शोधून काढले ३४८
- त्रिमूर्ति (त्रिदेव) मनाने रचलेली श्रद्धा ३५७
- ने अल्लाहच्या उपासनेचा आदेश दिला होता ४२०
- केवळ रसूल होते ४२०, ४२१
- च्या मुखाने धि:कार ४२३
- चे मदतनीस ४४२,४४७
**ईश- ग्रंथ**
- च्या एका भागाचा इन्कार करणे ४६
- बाबत मतभेद करणे ८४
- समस्त ग्रंथावर ईमान १०,१८४
- अल्लाहची ''वही'' ९१
- कडे आवाहन १९०
- चा व्यापार करणारे २५०
- च्या अनुसार फैसले करणे ३२६
- सत्याची कसोटी ३०३
- दिव्य ग्रंथ २४८
- ला त्याच्या मूळ स्थाना पासून हटविणे ३९८, ३९९
- ला मजबूत धरणे (त्यावर स्थैर्यशील राहणे) ६१८
- मध्ये फेरबदल करणे ४६, ४७
**ईश भय बाळगून आचरण करणारा** ४०१, ४०२, ६९२ ६९३, ६९६, ७१४,७२५
- कोण आहे १०, १२
**ईमान बाळगणाऱ्यांचा मार्ग सोडून अन्य मार्ग अंगिकारणे** ३२८
**ईमान धारक** ६८२, ६८३
- ची गुणवैशिष्टये ६४२, ६४३, ७०२, ७३८, ७५४,
- एकमेकांचे मित्र ७३६
- स्त्रीया ७३८
**ईश्वराचा साक्षात्कार**
- मनुष्य करू शकत नाही ६०२, ६०३
- या हेतु करीता सूफी लोकांचे कर्म काण्ड आणि योग्यांचे योगासन वगैरे मिथ्या आहे ६०३, ६०५
**इंजील (एक ईश ग्रंथ)**
- आणि बायबल चा फरक १८२
- मध्ये फेरबदल १९९,२०१
- ला क़ायम करण्याचा अर्थ ४१२
- मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) विषयी भाकित ६०८, ६०९, ६१०
- मध्ये एकेश्वर वादाचा आदेश ७१०

## उ

**उहद**
- करीता रवानगी २२६
- चे घटना स्थळ २२७
- युद्धाचा इतिहास २२७
- मध्ये मुसलमान व काफ़िरांची संख्या २२७,
- पर्वताचा नकाशा २२९

- चे चित्र २२८
- फरिशत्यांद्वारे अल्लाहची मदत २२६
- मुसलमानांना इजा २३२, २३६
- मुसलमानांकडून कमजोरी जाहीर होणे २३६, २३७, २३८
- मदतीचा वायदा पूर्ण होणे २३६, २३७
- शहीद लोकांची संख्या २३७
- काफिरांचा पाठलाग २४५

**उपकार**
- चा आशय २३७

**उम्मत (समस्त मुस्लिम जन समूह)**
- एकमेव उम्मत ११६
- उम्मते वस्त ७३
- उम्मते मुस्लिमा ६६,६७
- उम्मते मुस्लिमा ची दुआ १७५
- उम्मते मुस्लिमाच्या अस्तित्वाचा उद्देश ३७४
- करीता धडा ३८१, ३८२

**उम्मी (निरक्षर)**
- शाब्दिक अर्थ १८९
- बनी इस्माईल उम्मी १८९
- निरक्षरांबाबत यहूदींची विचार सरणी २०४

**उमय्या बिन खल्फ़** ६४०

**उम्मुल कुरा (मक्का)** ४९६, ४९७

**एहराम** ३६४, ३६५, ३६८, ३६९
- एकेश्वर वादाची कल्पना आणि शिर्क चे असत्य असणे १८, १९, २०, ६०, ६२, ८२, ८३, ८५, १५४, १५५, १८९, २०२, २१५, २५०, २५१, २९०, ४७८, ४७९, ४८३,
- एकेश्वरवादाच्या प्रमाणांचे स्पष्टीकरण ८३, ८५, ९८
- वैध अवैधतेचा हक्क ८३, ८५, ९९
- भ्रम आणि शरीअत बाहय बंधने ८७
- ची प्रमाणे ४७२, ४७४, ४७८, ४८०, ४८२, ४८८, ४८९, ४९०, ४९३, ५००, ५०६
-मनुष्य स्वभाव आहे ५०१
- च्या बाबतीत प्रत्येक मनुष्य जबाबदार आहे ६२२

**एतेकाफ** ६१,९८,९९,१००

**एअराफ** ५६२, ५६३

## क

**क़ायदा** १७२,१७३
- अल्लाहच्या कायद्यांचे पालन २८२, २८३
- आधुनिक सिविल कोडच्या नावाने खोटे कायदे २६८
- अल्लाहच्या कायद्यानुसार फैसला करणे ४००, ४०१, ४०२

**कादीयानी संप्रदाय एक फितना (उपद्रव)** ३५१

**कबरींची भक्ति** ५२१

**क़बीला**
- खरूज ३१७
- औस २२७
- अबु अजफान ३१७
- बनी ख़ज़ीमा ३१७
- हवाज़न ७०३
- सकीफ ७०३

**क़िब्ला** ७०, ७१, ७६, ७७, ७९

**क़िताल फी सबिलिल्लाह** १०७, १२०, १४२, १४४,

**कर्ज़ाची देवण घेवण** १७०
- कर्जदारा करीता सवलत १७०
- चे लिखित दस्तावेज १७०,१७२

**क़ुर्बानी**
- अल्लाह करीता ५३८
- ची जनावरे १०६, १०८, ३६८, ३६९, ४३२, ४३३, ४३४, ४३५
- केवळ ईश भीरू लोकांची कुर्बानी अल्लाह ला मान्य ३८६, ३८७
- अति प्राचीन काळा पासून ३८७

**क़ुरआन (ईश-ग्रंथ)** २९६, ३५४, ३५५, ३८०, ३८१, ४००, ४०४, ४३४, ४५६, ४६३, ४६५, ४७२, ४७५, ४७९, ४८१, ६२९
- प्रारंभिक आयत ५
- मार्गदर्शन असण्याचा अर्थ १०,११
- चे आवाहन २०, २१
-च्या अवतरणाचा उद्देश ५४६, ४४७
- चे खरे आवाहन २१
- च्या महानतेचे पैलू २१
- च्या अवतरणाचा आरंभ ९८, ९९
- सत्यनिष्ठ ग्रंथ १८०
- पूर्वीच्या ईश ग्रंथांचे समर्थन १८०
- फ़ुर्कान १८१, १८२
- मध्ये स्पष्टता व सादृश्यता १८४, १८५
- शब्दासह अवतरीत १८१
- बुद्धिकौशल्य युक्त ईश:स्मरण २०२,२०३
- पठण होत असतांना लक्षपूर्वक ऐकणे ६३४, ६३६, ६३७
- तेज ६०८
- मार्गदर्शन व ईश कृपा ५६४, ५६५, ६३४

- च्या उत्कृष्ट आशयाचे अनुसरण करणे ६९३
- इमाम उंच स्वरात क़ुरआन पठण करीत असेल तेव्हा लक्षपूर्वक ऐकणे ६३६
- चे अनुसरण ५५६, ५५७
- धर्माच्या प्रचार व प्रसारा करीता क़ुरआनास सरळ सरळ सादर करणे ४७४, ४७५
- ला क़ायम करणे ४१२, ४१३
- त्या नुसार फैसला करण्याचा आदेश ४०४
- ची कोणतीहि आयत रद्द नाही २७७
- परिपूर्ण ग्रंथ २९५
- सत्याची कसोटी ३०२
- वर विचार चिंतन करण्याचे आवाहन ३१२, ३१३
- ईश-ग्रंथ असण्याचे प्रमाण ३१२
- वर विचार चिंतन केल्याने बुद्धि कौशल्याचे दरवाजे उघडतात ३१३
- केवळ विद्वानां करीताच नाही ३१३
- दर्जे उंचविणारा ग्रंथ ६२२
- केवळ रटण्या करिता नाही ६१९
- चा प्रभाव ४२२, ४२४
- अरब व अरबेतर सर्वां करिता ४६०, ४६१
- अंतर्दृष्टित वाढ करणारा ग्रंथ ६३४, ६३५
- सत्य- स्तर ४०५
- शी मुस्लिमेतरांना परिचित करणे ६९३
- समृद्धशाली ग्रंथ ४९६, ४९७, ५३६, ५३७
- नाते वाईकांशी सद्व्यवहार २८८

**किसास** ९८, ९१, ४००, ४०१, ४०२
- चा अर्थ ९१

**कल्ब (हृदय) शी अभिप्रेत** ६२५

**क़ियामत** ४, ५४, ६०, ६१, ७१, ८६, ९०, १५०, २५४, ३२६, ४५४, ४५५, ४५८, ४६२, ४६३, ४६४ ४६५, ४७०, ४७१
- सर्वांना एकत्रित केले जाईल १९२, ३१४
- च्या दिवशी पूरेपूर मोबदला २४८
- च्या दिवशी ईसा साक्ष देतील ३४६
- केव्हा येईल ६२८, ६२९
- ची लक्षणे ६२९, ६३१

**काफ़िर** ३६४, ३६८, ४१७, ४६२, ४६३,४६४, ४६५, ६८२
- ची परिणति १६२, २२४, २४७, २४८, ३५०, ३५४, ३९४, ३९६, ६४९, ६४८
- ला मित्र बनविण्याचा अर्थ १९२, १९३
- ला मित्र बनविण्यास मनाई २२४, २२५, ३४१, ३४२, ४१०, ४११, ७००, ७०१
- ची धावपळ २५२
- माफ केले जाणार नाहीत ३५४
- अति निकृष्ट जनांवर ६७२, ६७३
- शी युद्धाचा आदेश ६७२, ६७३

**काबा** ४३२, ४३३, ४३५

**कअब बिन मालीक** ७५८, ७६३

**कअब बिन अशरफ** ३०४

**कफ़्फ़ारा चा अर्थ** ४२७

**कुफ्र**
- ची वास्तविकता २७
- च्या अवस्थेत मरण पावणे ८२, ८४, २१२
- सोबत युती ११७
- ईमानेत्तर कुफ्र २१४
- अक्षम्य अपराध ३५०
- ची दोन स्वरूपे ३४१
- अल्लाह व रसूल च्या दरम्यान विभागणी करणे ३४४, ३४६

**कलिमा पढणाऱ्या मुसलमानास धर्मबाहय न ठरविणे** ३१९

**कोहेतूर (पर्वत)** ३७, ३८, ३९, ५०, ९४, ६०९

**कावळा** ३९०, ३९१

**कृपण** २४८, २४९, २९२

**कुटुंब नियोजन**
- करीता नसबंदी ३३३
- खस्सी करणे ३३३

**कान गोष्टी** ३२८, ३२९


## ख


**खबरदार करण्याचा अर्थ** १३

**ख़बीस जनावर** ५२९

**ख़ज़ाआ** ६९७

**खुशुअ (नम्रता)** २७

**ख़िलाफ़त**
- इस्लामी १५१
- जमीनीची २२

**ख़लीफ़ा** २२, २३, २५, २८, ५४२, ५४३, ५९६
- चा अर्थ २३

**ख़ुलअ** १३०

**ख़्वान (भोजन पात्र) आकाशातून अवतरणे** ४४२,४४४,४४६

**खरे ईश भीरू लोक** ९०, ९१

**ख्रिश्चन** ३८, ५८, ६०, ६१, ६५, ६७, ६८, ७१,

७४, ३४७, ३४८,३५६, ३८४,३८५,४१६
५०१
- चे संप्रदाय ४१६, ४१७
- मुसलमानाशी दोस्तीत जवळचे ४२२, ४२३
- मध्ये विद्वान व संन्यासी ४२२, ४२३

## ग

**ग़ारे सूर** ७२०, ७२१, ७२३
**ग़रीबांची मदत** ९०, ९१
**गुलामास गुलामीतून मोकळे करणे** ९०, ३१६
- गुलामीची प्रथा नामशेष ८७, ९१
- दासी विषयी इस्लामचे आदेश २८३
- त्यांना ईमानाचे धन लाभणे २८३
- शी व्यवहार २९०
**गाय**
- जिबह करण्याचा आदेश ४० ते ४३
- गोपूजा ४३, ४४, ४५, ६०७
- वासरू ६०४, ६०५
- गाय बैल ५२४, ५२६
- म्हैस ५२६
**गाणे** ५३३
**गुन्हा** ५३३,५३४
- च्या कामात मदत न करणे ३६४, ३६६, ३७०
- उघड व लपून ५१२, ५१३
- कबीरा (मोठा) शी अभिप्रेत २८६,२८७
**गरीबांशी सद्‌व्यवहार** २८८
**गुरे ढोरे** ३६४, ३६५, ३६९, ५२०, ५२१
- मध्ये अल्लाहखेरीजच्या उपास्यांचा वाटा
निषिद्ध ५१८, ५२१
**ग्रामिण अरब** ७४७, ७४८, ७४९, ७५०
**ग्रंथ धारक**
- चे मतभेद १८८, ४०५
- ची विमुखता १८८
- ची मागणी ३४६, ३४७
- ना आवाहन २०४, २०५, २९६
- चे सत्य लपविणे २०४
- चा अल्लाहच्या आयतींशी इन्कार २०४, २१४
- चे कट कारस्थान २०४, २९४
- चे अल्लाहशी असत्याचा संबंध जोडणे २०४,२०७,२९६
- चा अपहार २०४
- चा फेरबदल २०४, ३८१
- चे वक्रता निर्माण करणे २१४
- चे आयतींना अल्प किंमतीवर विकणे २५०
- मध्ये सत्य प्रिय समूह २०२,२२२,२२३,२५४
- चा ज़बीहा ३७३
- च्या स्वच्छ शुद्ध स्त्रीयांशी निकाह ३७४, ३७५
- शी युद्ध ७०६, ७०७, ७०८, ७०९
- कडून जिझिया घेण्याचा आदेश ७०६
**गर्व करणारे** २८८, २८९
**चांगली गोष्ट बोलण्याचा आदेश** ६३४, ६३५
**चांगल्या रीतीने काम करणे** ३०
**चांद्र मास**
- चा विश्वास ७१४, ७१५
- ची नावे ७१५
- च्या क्रमबद्धतेत बदल करण्याची मनाई ७१४, ६१५
**चमत्कार दाखविणे** ४६६, ४६८
चमत्कार (अल्लाह तर्फे)
- चा अर्थ १९९
- जाणवणारा ४६८, ५०६, ५०७
**चिन्हे क्षितिजांमध्ये** २५०, २५१
- कियामती पूर्वी खास खास चिन्हे उदयास येतील ५३९,
५४०
**सूर्याचे पश्चिमे कडून उगदवणे** ५३९

## ज

**जादू** ५४, ५५, ५६
**जादूगारांचे ईमान बाळगणे** ५९२, ५९३
**जालूत** १४६, १४७, १५०
**जीव वाचविणे फार मोठे सत्कर्म** ३९०, ३९१
**जनावरांना अल्लाह खेरीज च्या उपास्यांच्या नावाने सोडणे**
४३४, ४३५
**जनावरांचे प्रकार** ४७०, ४७१,
**जीव निघतांनाची वेळ** ४९८,४९९, ५५८, ५५९
**जिब्रील** ४८,५२,५३,७३
**जिब्त (अल्लाह खेरीज पूजली जाणारी वस्तू मूर्ति वगैरे)**
- भ्रम व खुराफतींवर विश्वास ठेवणारे २९६
- शी अभिप्रेत २९६, २९७
- ज्योतिष, फ़ालगिरी, अपशकून, जादू टोणा २९८, ३०१
**जिझिया चा अर्थ** २९६,२९८
**जिन्न** ५००, ५०१, ५०२, ५०६, ५०८, ५१८,
६२४, ६२५
**जन्नत** २२, २३, ४४, १२०, १२२, २५२, २७०,
३३२, ३७८, ४२१, ४५०, ५६०, ७३८, ७४६,
- खास झाड २६, २७

-आदम आणि हव्वाला यातून उतरण्याचा आदेश २६
- मध्ये स्वच्छ शुद्ध पत्न्या १८६, ३००
- अल्लाहची प्रसन्नता १८६, १८७
- ची व्यापकता २३०, २३१
- मध्ये दाट सावली ३००
- चा समाज ३०७
- कोणावर हराम आहे ४२०
- सलामतीचे घर ५१६, ५१७, ५६०, ५६१
- जन्नत व दोजख वाल्यांचे संभाषण ५६२, ५६३
**जिहाद** १२०, २३४, ३०८, ३०९, ३१२, ३१८, ३१९, ३२०, ६८२, ६८३, ७००, ७०१, ७३८, ७४२, ७४८, ७६२, ७६४
- करणारे २३२
- मध्ये कमजोरी न दाखविणे २३४
- ची तयारी २५४, ६७२, ६७३
- सबबी विना बसून राहणारे ३१८
- दारूल कुफ्रच्या अत्याचार पिडीत मुसलमानां करीता आदेश ३०८, ३०९
- पासून टाळाटाळ करणारे ३७०
- अल्लाहच्या मार्गात लढणारे ३०९
- इस्लाम मध्ये युद्धाचा उद्देश ३१९
- शी अभिप्रेत ३९६
- युद्ध कैदी ६७८, ६७९
- न करण्याच्या स्थितीत उपद्रव उत्पात ६८२, ६८४
- कुफ्रच्या नेत्यांशी लढणे ६८२, ६९२
- सुधारणा व नैतिकतेचे युद्ध ७०८
- अल्लाहच्या मार्गात निघण्याचा आदेश ७२०
- अनिवार्य कर्तव्य केव्हा ठरते? ७२२
**जहन्नम (दोज़ख़)** ४२०, ४२६, ५१६, ५१७, ५५०, ५५८, ५६०, ५६१, ७२४, ७३४, ७३६, ७३८, ७४२
- चा खालचा वर्ग ३४२
- चा मार्ग ३१८
- मध्ये दांभिक मुसलमानांना व काफ़िरांना एकत्र केले जाईल ३४०
- आगीचे इंधन १८४
- पासून अलिप्त राहण्याची दुआ १८६
- वाईट ठिकाण १८६, २४०, २५२, ३२८, ३३२
- ची धगधगणारी आग ४६४, ४६५
- मध्ये त्वचा शिजून जाईल २५२, २७०, ३००, ३०१, ३४४
**जगणे मरणे अल्लाह करीता** ५३८
**जग**
- ऐहिक जीवनाची सामुग्री १८६, १८७
- काही दिवसांचे जीवन २५२,४६२,४६३,४६६,४६७
- मध्ये अपमान ३९८, ३९९
- चे लाभ उचलणे ६१८, ६१९
**ज़बूर** ३५०, ३५२
**ज़करीया** ३८, ३९, १९४, ४९२, ४९३
**ज़कात** ४६, ५८, १६८, ३१०, ३५०, ४०८, ४०९, ६०८, ६०९, ६९६, ६९७, ७००, ७३८
**अदा करणारे** ३६०
- च्या विनिमयाचे स्पष्टीकरण ७२९ ते ७३३
**ज़मीन**
- वर हिंडून फिरून पाहणे २३२, २३३
**ज़ालीम (अत्याचारी)** २१०,२१२,२३०,३४० ३८६, ३९०, ४००, ४०७
**जातीयवादी कोण आहे**? ५३७
**ज़मीनीवर उत्पात** १६, ४१०, ४१२, ५८६
- चा अर्थ १७
**जन समूह**
- लूत ७३७
- जन समूहांच्या ऱ्हास उत्कर्षाचा नियम ६६९
**ज़बीहा (अल्लाहच्या नावाने बळी दिले जाणारे जनावर)**
- ज़िबह करण्याचा अर्थ ३६४
- अल्लाह खेरीज च्या नावाचे ३६४, ३६८, ५२८, ५२९
- स्थान चे ३६८, ३६९,३७०
- बुजुर्गांच्या नावाचे ३६९
- यंत्राच्या द्वारे ३७५
- ला इलेक्ट्रीक शॉक ३६९
- ज्यावर अल्लाहचे नाव घेतले गेले नसावे ५१२, ५१३, ५१२, ५१३, ५२०

## ड

**डुक्कर** ३६८, ३६९, ५२८, ५२९
**तसव्वुफ** ४२७
**तक़वा (ईश भीरूता)** २४६, २७०,४१२, ४२८, ४३२, ४१६, ५३६, ५५७, ६०८, ६१८, ६३४, ७१४,
- अंगिकारणारे १८६, १८७
- अल्लाह ईश भीरू लोकांना पसंत करतो २०६
- चे स्तर २१६
- ईश भीरू कोण आहे २५५

- ईश भीरूता अंगिकारण्याची ताकीद २५९
- सामाजिक जबाबदारींची यथाशक्ति जाणीव २५९
- ची समृद्धी ५८४, ५८५
- अंगिकारण्याचा अर्थ ६०९
- अंगिकारणाऱ्यांची परिणति ५९२
**तकब्बुर (गर्व) करणारे** ५६०, ५६१
**तौबा (अपराधाबद्दल मन : पूर्वक क्षमा याचना व पुन्हा न करण्याचा संकल्प)** ३४२, ४९४, ४८८, ६०६,६८८,६९६, ७०२,७०९, ७३८
- करणाऱ्यां करीता क्षमा दान २१०, २१२
- खरी तौबा २१२, २१३
- कोणाची तौबा कबूल होत नाही २१०,२१२,२७६,३७७
- कोणाची तौबा कबूल होते २७६, २७७
- तौबाची वास्तविकता २७७
- सूरह तौबाचा आरंभ बिस्मिल्लाह विना ६८६
**तबूक**
- चे युद्ध ६८५
- चे मदीना पासून चे अंतर ६८७
**तौरात** ३१, ३५, ३६, ३८, ३९, ४३, ४५, ४७, ४८, ४९, ६१, ७१, ७९, १८०, १९८, १९९, २००, २१२, ३९५,३९८, ३९९, ४०२, ४०५, ४१२, ४१३, ४१७, ४४२, ४९७, ५३६, ५३७
- आणि बायबल मधील फरक १८१
- मध्ये फेरबदल २०७
- ला क़ायम करण्याचा अर्थ ४१६,४१७
- शिला लेख ६०४, ६०५, ६०६, ६०७
- मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विषयी भाकित ६०८, ६१०
- मध्ये एकेश्वरवादाचा आदेश ७०६
**तवक्कल (अल्लाहवर भरवसा)** २४४, २४५, ३३६
**तयम्मुम (पाणी नसतांना मातीने केला जाणारा वुजू)** २९४, २९५
- चा उद्देश २९५
**ताग़ूत**
- चा इन्कार १५४, १५५
- चे स्पष्टीकरण १५५, ४१०, ४११
- वर विश्वास ठेवणारे २९६
- शी अभिप्रेत २९८, ३०४
- कडे फैसल्या करीता रूजू करणे ३०२, ३०३
- च्या मार्गात लढण्याशी अभिप्रेत ३०९
**तालूत** १४२, १४६, १४७, १५१
**तलाक़** १२८,१३०,१३४,१३५,१३६,१४०,१४२,१४५
- चा अर्थ १३१
- चे अप्रिय असणे १३१
- चा आदेश हज़रत मूसा यांच्या शरीअतीत १३१
- ख्रिश्चनांच्या जवळ १३२
- च्या समस्येत समतोल मार्ग १३२
- तलाक रजई १३२
- चा अर्थ अज्ञानी पणात १३२
- देण्याची खरी व उचित पद्धत १३२
- तलाक मुग़ल्लज़ा १३२, १३३
- तीन तलाक एकाच वेळी न देणे १३३
- तलाक बाइना १३३
- एका बैठकीतील तीन तलाक, एक तलाक च्या आदेशात १३३
- तिसऱ्या तलाक चा अर्थ १३३
- न्ययालयाला अधिकार देणे १३९
- घटस्फोटीतेचा हक्क १३८, १४२, १४४
**तूर** २३८
**तवाफ** ६४, ६५, ६६, ६७
**दहा आदेश** ५३७
**दाऊद** १५०, १५१, ३५०, ४२०, ४२१, ४२३, ४९२
**दरगाह**
- कडे वळणे नवस-नजराण्या करीता ६३१
**दअवत व तब्लीग़**
- ची पद्धति १५५
- मांगल्या कडे २१८
- करीता प्रभाव शाली वाक्य शैली ३०२, ३०४
- आवाहकांचा समूह २१८
**दुराचाराचा मोबदला** ५३८
दुराचारा पासून न रोखण्या बद्दल पकड ४२२
दुराचाराचे सार्वत्रिक चलन ४३४, ४३५
**दुआ (प्रार्थना)**
- ची स्वीकृति ९८, ९९, २५२
- अश्रूपूर्ण नेत्रांनी करूणा भाकत ५६४, ५६५
- हज़रत इब्राहीम यांची दुआ ६४, ६५, ६६, ६७
- अल्लाहच्या मार्गात लढणाऱ्यांची २३४
- विद्वज्जनांची दुआ २५०,२५१,२५२,२५३
**दफ़न करणे (मृतास)** ३९०, ३९१
**देवता**
- देवतांच्या सोम प्राशनाची कल्पना १५५

- चे अवतार १५६
- त्रिमूर्ति श्रद्धा १५२
- शिफारसी ची चुकीची कल्पना १५४, १५५,
- देवी देवतांचे अस्तित्व अनेकेश्वरवाद्यांच्या भ्रामक कल्पना ८२, ८३

**दासी** २५९,२६०,२८२,२८३
- ज्या युद्ध कैदी म्हणून लाभाव्यात २८२, २८३
- ला मुक्त करण्यांस प्रोत्साहन २६०
- ला व्यभिचाराचे साधन बनविण्याची मनाई २८२, २८३

**देवाण घेवाण**
- परस्पर राजी खुषीने २८६, २८७
- धोक्या विरहीत २८७

**दांभिक मुसलमान** २४२, २४३, ३०२, ३०६, ३१०, ३११, ३१२, ३१३, ३१४, ३१५, ३२६ ते ३३०, ३४२,३४३,३६८,४०८, ४०९, ७३४,७३८
- शी जिहाद ७३८,७३९,७४८,७४९
- वर्तमान कालीन दांभिक ३२९
- चे जिहाद पासून अंग चोरणे ७२६, ७२७
- चे मुसलमानां विरूद्ध कट कारस्थाने ७२४, ७२५
- निफाक ची हकीगत ७२५
- ची नमाज़ सुस्तपणे ७२६, ७२७
- अब्दुल्लाह बिन उबई ची जनाज़ा ची नमाज़ ७४३ ते ७४५
- करीता क्षमेची प्रार्थना व्यर्थ ७४०,७४१
- ची जनाज़ाची नमाज़ पढण्याची मनाई ७४२,७४३

## ध

**धर्म (इस्लाम)** ६६,११८,३३२,३४२,७१४,७१५
- धर्माचे अल्लाह करिताच असणे ६८,६६०,६६१,६६२
- संदर्भात जबरदस्ती नाही १५४, १५५, १५६
- मध्ये मतभेद ११६
- बाबत अटकळीच्या गोष्टी करणे ४५
- खरा धर्म १८९,२०३,२०५,२१०,२११,२१२,२१३
- समस्त सृष्टीचा धर्म २१०,२११,२१२,२१३
- मध्ये अतिशयोक्ति २०१,३५६,३५७
- विभागणीत न पडणे २१८, २१९
- ची पूर्णता ३६८,३६९,३७०,३७१
- कडून विमुख होणे ४०८
- मध्ये वेगवेगळे मार्ग काढणे ५३८, ५३९
- अगदी योग्य धर्म ५३८,५३९,७०६,७०७
- ला खेळ तमाशा न बनविणे ५६२, ५६३
- वर टोमणे मारणे ६९६, ६९७
- ला वर्चस्वशाली बनविणे ७०६
- इस्लाम परिपूर्ण दास्यत्व व्यवस्था ७११
- अभिव्यक्ति चा अर्थ ७११
- चा राजकीय दबदबा ७१२
- चे आकलन प्राप्त करणे ७६२, ७६३, ७६४

**धन पूजा** २९७

**धर्महीनता प्रिय मुसलमान** ४८३
- धर्महीनता ४८५

**धि:क्कार** ४१०,४११,४१३,४२२
- बायबलमध्ये धि:क्कार चा उल्लेख ४११,४२१,४२३
- जहन्नम मध्ये एका जन समूहाचे दुसऱ्या जन समूहास धि:क्कार ५५८, ५५९

**धन संपदा** १८६, १८७, २४६, २४७, २६०, २८५,२८६, ३५०
- कसोटी ६५२, ६५३
- सोने व चांदी खजीना बनवून ठेवणे ७१४, ७१५
- चा गर्व ७२९
- ची दु:खदायक शिक्षा ७३८

**धर्माची वास्तविकता** ६७
- धार्मिक पक्षपात १५१
- च्या नावावर खोटे शिक्के चालविणे ४५
- धर्मांच्या दरम्यान ओढाताण ८८
- मानव वंशाचा सर्व प्रथम धर्म ११७
- धर्म पूजा २०५,२०७
- धर्म शोधून काढणारे १८४, ४९९
- संदर्भात जबरदस्ती नाही ५८२, ५८३

**तारे** ४९८, ४९९
- तारका पूजेचे खंडन ४८९ ते ४९०

**न नाते संबंध तोडणे** २१

**नाच गाणे** ५३३

**नवस मानणे** ४२१

**नाव**
- मुलांची नावे अनेकेश्वरवादी ठेवणे ६३१

**नबी उम्मी (निरक्षर प्रेषित)** ६०८, ६०९

**नजाशी** ४२४

**नवस नजराणे अल्लाह ऐवजी इतरां करीता** ५१२, ५१३,५१९

**नरमीचे वर्तन** २४३

**नज़र बिन हारिस** ६४१

**निफ़ाक़** १४
- ची हकीगत ७२५
- व असत्याचे नाते ७३८, ७३९

**नुफ्क:** १३६,१३७,१४०,१४३
**नक्श सुलेमानी जादू** ५५
**नूह (अलैहिस्सलाम)** १९२,१९३,७३६
- चा वृत्तांत ५६८, ५६९, ५७१
- चा काळ ५६९
- च्या जनसमूहाची वस्ती ५६९
**नवमुस्लिम सोबत सामाजिक समानता** ६९७
**निकाह** १३४,१३८,३७४
- पक्के वचन २८०, २८१
- अनेकेश्वरवाद्यांशी निकाह ची मनाई १२२, १२५
- विधवा स्त्रीयांचा विवाह १३९
– चे वय २६२, २६३
- ज्या स्त्रीयांशी हराम आहे २८०, २८१
- काही वर स्वभावा विरूद्ध २८३
- मुतआची मनाई २८३, २८४
- पत्नी संख्येचे बंधन ३३४, ३३५
**नमाज़** १२, ३०, ३१, ४६, ५४, ५८, ७८, ७९, १३८, ३७४, ३७६, ४०८, ४२८, ४२९, ४८४, ४८५, ६९६, ६९७
- क़ायम करण्याची ताकीद ३१०, ३११, ६४२, ६४३, ६४५
- क़ायम करणारे ३५०
- ची पैगंबरीय पद्धति १३९
- पासून मदत घेण्याचा अर्थ ३२
- नमाज जमीतीसह ३१,३२
- प्रदक्षिणेची नमाज़ १३९,१४०,३२४ ते ३२५
- मध्य भागीय नमाज़ १०६, १०७
- नशेच्या अवस्थेत जवळ न जाणे २९४, २९५
- संभोगोपरान्त अवस्थेत जवळ न जाणे २९४, २९५
- करीता भान व जागत असणे आवश्यक २९५
- स्वत: साठी ३०९
- जिहादवर प्राधान्य ३११
- कस्र ३२०,३२१,३२५
- जिहाद चा आत्मा आहे ३२५
- केव्हा कज़ा केली जाऊ शकते ३२५
- युद्ध स्थितीत ३२५
- वेळेच्या बंधना सह अनिवार्य ३४२
- करीता सुस्तीने उभे राहाणे ३४२
- मुसलमानांचे सांप्रत बेनमाजी नेते ३४३
- दिखाऊ पणाची नमाज़ ३४३
- पायी सत्य स्वीकृति ची सुबुद्धि ३५२
- तौरात मधून गायब ३७९
- करीता अज़ान ४१०, ४११
- चा आत्मा ४०९

## प

**पूजल्या जाणाऱ्या दगडांची दुर्गत** २०,२१,३६८, ४२८
**पुनर्जन्माची श्रद्धा** ४६४, ४६५
**पॉल** ४२१
- पॉल आणि ख्रिश्चन मत ७०९
**पत्नी- संख्या** २५८, २६०, ३३४, ३३५
**पॅलेस्टीन** ६०१, ६०२
**पोषाख-चा उद्देश** ५५२, ५५३
- नग्नतेस पावित्र्याचा दर्जा देण्याचे खंडन ५५३
- हिप्पीजम चे खंडन ५५३
- ईश भीरूतेचा पोषाख ५५२,५५३,५५४,५५५
**पुरूष-स्त्रीयांचे व्यवस्थापक** २८८, २८९
- अधिकार २८९
**पवित्र भूमि (पॅलेस्टीन)** ३८६, ३८७, ३८९
**पैगंबर**
- फक्त माणसां पैकी ५१७, ५१९
- प्रेषित हत्या ३८,३९,१८८,१८९,२२२
- प्रेषित हत्यामुळे दु:खदायक ईश-शिक्षा १८८
- समस्त पैगंबरांवर ईमान बाळगणे आवश्यक २१०, २१२
- अल्लाहच्या खेरीज कोणाच्या ही उपासनेचा आदेश देत नाहीत २०२,
- चे अज्ञा पालन व अनुसरण ३०७, ३०८, ४९६, ४९७
- खुश खबर देणारे ३५४, ४२२, ४२३
- सावध करणारे ३५४, ४२२, ४२३
- चा धर्म ४००,४०१
- ना क़ियामतीच्या दिवशी पृच्छा ४४२, ४४३, ५४६, ५४७,
- क़ुरआनात सर्वांचा उल्लेख नाही ३५४
- अल्लाहतर्फे पाठविले जाण्याचा उद्देश ३५४, ३५५
- सर्व एकाच मार्गदर्शन स्त्रोतापासून लाभान्वित होत राहीले ३५४,३५५
- ची मैत्री ३०६, ३०७
- प्रेषित्व-क्रम ५५८
- बनी इस्राईल मध्ये ३८४,३८५,४१६
- बक्षिस लाभलेले समूह ३०६, ३०७
**पाऊस (लाभदायक असलेला)** ५६८
**प्रक्षोभक गोष्टींचा प्रभाव न पडू देणे** ६३७

**प्रतिष्ठीत महीने** ३६४, ६९२, ६९३,७१४, ७१५,
**प्रेम चाळे करणे** ५३२, ५३३
**प्रवास**
- बोध दायक स्थळे पाहण्या करीता ४५८, ४५९
- चे अंतर ४५८,४५९
**प्रवाशा सोबत सद् व्यवहार** २८८
**फाशाचे बाण** ३६८, ३६९, ४२८
**फालगिरी** ३६९,३७०
**फ़ित्ना** १०२, १०३, १२०, १२१
**फ़ित्ना (उपद्रव) बाकी न रहावा** ६६०, ६६१
**फ़रीश्ते** २२, २३, २४, ५२, ४५८, ४५९, ४९७, ४९८, ५०६, ५३६, ५५८, ५५९
- फरिश्त्यांचे आदमला सजदा करणे ५४८
- अल्लाहचे सान्निध्य लाभलेले ६३६, ६३७
- अल्लाहलाच सजदा करतात ६३६
- आत्म्यांना ताब्यात घेणे ६६८, ६६९
- चे अवतरण युद्ध प्रसंगी ७०२, ७०३, ७२०
- 'मलायका' चा अर्थ २३, २४, ५३
**फिरऔन** ५८६, ५८८, ५८९, ५९०, ६६८, ६६९,
- शब्दाचा अर्थ ५९३
- ची उपास्ये ५९२, ५९३
- चे हज़रत मूसाला आव्हान ५९३
- च्या अत्याचारी शासनात परिवर्तन धर्म चे स्वातंत्र्य नव्हते ५९३
- चा ईशत्वाचा दावा ५९४
- चे समुद्रात बुडून मरणे ६००
- च्या जन समूहावर अज़ाब कोसळणे ५८८, ५९६
- ची संस्कृती नष्ट ५९६, ६००
**फ़ुर्कान** ६५४, ६५५
- चे स्पष्टीकरण ३५
**फ़िस्क़ (दुराचार)**
**फ़ासिक (दुराचारी)** १०, ४१०, ४१२, ६९२, ७०८, ७०९, ७२६
- चे स्पष्टीकरण २१, ५८५
- चे घर ६०४, ६०५


## ब


**बायबल**
- केव्हा क्रमबद्ध झाले १८१
- चे स्वरूप १८२
- च्या भाष्यकाराची स्वीकृति १८१
**बाबील** ५४, ५५
**बाप्तीस्मा** ७१
**बक्षीस लाभलेले लोक** ६
**बद्र** २२६, २२९, २३३, २४३, ६३९
- इस्लामचे पहीले युद्ध १८७
- युद्धाची कारणे ६३९
- ची घटना ६४२, ६४३, ६४४, ६४५, ६४६, ६४७, ६६४,६६६
-फरिश्त्यां द्वारे ६४८, ६४९, ६५०
**बिदअत** १०३
- बिदअत व ख़ुराफती ३३३
- चे द्वार केव्हा उघडते ३५१
- बिदअत वाल्यांची हरकत २०९
- इमाम निरागस असण्याची कल्पना ३०३
**बुजुर्ग वस्ती** ५२१, ६३१
**बिस्मिल्लाह चे स्पष्टीकरण** ३
**बक्का (मक्का शहराचे जुने नाव)** २१२
**बनी इस्राईल** २६, २७, २९, ३०, ३२, ३७, ३९, ४०, ४१, ४२, ६२, ६६, ७१, ८५, १४२, १४४, १४६, १९०, २०४, २०७, २०९, २१२, २२२, २२३, ३५१, ३८४, ३८६, ३८७, ३८९, ४४२, ४४३, ५९६, ६०१, ६०३, ६०६, ६०७, ६०८, ६१४, ६१६, ६१८, ६१९
- ला ईमान बाळगण्याचे आवाहन २९६
- चा वचन भंग ३४६, ३८०
- चा धि:क्कार २९४, २९५
- चे वासराला पूजणे ३४७, ६०४, ६०५, ६०६, ६०७
- चा हज़रत ईसा वर आरोप व त्यांच्या विरूद्ध कारस्थान २३८, ३४६, ३४७
- चे फेरबदल २१५
- चे अवैधरित्या सम्पत्ति गिळंकृत करणे ३५०,३५२
- च्या अपराधांची साक्ष बायबल मध्ये २२३
- चे प्रेषितांना जीवे मारणे २४८
- चे गोष्टीस मूळ मुद्यावरून फिरविणे २९२
- चे धर्मावर टोमणे मारणे २९४, २९५
- शी वचन ४१६, ४१७
- वर स्वच्छ शुद्ध वस्तु हराम ३५०
- चे व्याज घेणे ३५०
- चा हज़रत ईसा यांना सूळावर चढविण्याचा खोटा दावा ३४६
- चे मरीयम वर दोषारोपण ३४६,३४७
- चे नमाज़ व ज़कात सोडून देणे ३३५
- चे सत्य प्रिय विद्वान ३५०

- चे परस्पर वैमनस्या पायी मतभेद करणे १८८
- सत्य लपविणे आणि असत्यासह भेसळ करणे २०४, २९४, २९५
- मध्ये सत्य प्रिय लोक २२२, २२३, २५२,६१२,६१३
- चे आयतीस थोडयाशा किंमतीवर विकणे २५०
- चा बाहेर पडण्याचा मार्ग ५८०, ५८१
- च्या सुटकेची मागणी ५८६, ५८७
- च्या कठोर हृदयतेचे चित्र बायबल मध्ये ३८१
- चे जंगलात भटकणे ३८६, ३८७,३८९

**बनी आदम**
- कडून एकेश्वर वादाचे वचन ६२०, ६२१

**बनू बक्र** ६८५

**बनू कुरेज़ा** ४०१, ४०२

**बनू नज़ीर** ४०१, ४०२

**बैतुल्लाह (काबागृह)** ६४,६५,६६,६७,१०४, २१४, २१५
- पहीले घर २१२, २१५
- मुकामे इब्राहीम २१४, २१६
- चे हज्ज २१४, २१६
- चे बांधकाम करणारे २१५
- च्या उभारणी विषयी चुकीची कथने २१५

**बैतुल मक्दस** ३८५, ३८७

**बोध प्राप्त करणारे** १८०

**बुद्धिकौशल्य** ६६,६७,७६,१५०,१६२,१६३

**बुद्धिमान**
- चे गुण विशेष २५०
- च्या प्रार्थना २५०
- कोणते लोक आहेत २५१

**बुद्धिचा वापर करण्याची ताकीद** ६५२, ६५३

**भारतातील अनेकेश्वरवादी** ५११
- ची ईश्वरा विषयी कल्पना ५०२, ५०५
- ची दैवते ६२५,६२६

**भ्रम पूजा** ५२०

**भौतिकवाद** २४७

## म

**मनुष्य**
- ची खरी पात्रता २३
- च्या निर्मितीचा हेतु २४
- चे प्रतिनिधित्व २५८
- कमकुवत निर्मिती २८६
- ची निर्मिती ४५४,४५५,५४८,५४९
- ची निर्मिती एका जीवा पासून ५००,६३०,६३१
- मेल्यानंतर नामशेष होत नाही ४८१

**मूर्ति**
- चढावे ५२१, ६३०
- विषयी श्रद्धा ६३०

**मूर्तिपूजा** ६००,६०१,६०७
- नूह जन समूहात ५६९
- आद जन समूहात ५७०, ५७१, ५७२
- समूद जन समूहात ५७५
- अरब देशीय अनेकेश्वरवाद्यात ६३०, ६३२

**मनाची संकुचितता** ३३४, ३३५

**मर्यादा** ३९६

**मरणोत्तर जीवनाचा इन्कार करणारे** २२

**मत आणि कयासला क़ुरआन व पैगंबर आचरण शैलीवर प्राधान्य देऊ नये** ६३५

**मार्गभ्रष्ट करणारे प्रमुख** ८२, ८४

**मांसाहार** ८५

**माले ग़नीमत** ६४२, ६४३, ६७८, ६७९
- ची विभागणी ६६०, ६६२

**मुहर्रम** ७१४, ७१७, ७१८

**मदयन** ५८०, ५८१, ७३६, ७३७,
- वाले ७३६

**मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम)** ३१, ४३, ४९, ५३, ५६, ६१, ६४, ६५, ७१, ७२, ७३, ७७, ८०, १५१, २०७, २३४, २३५, २३७, २४२, ३५०, ३८१, ३८२, ४०८, ४१६, ४१७, ४६३, ६२८, ६२९
- अल्लाहचे रसूल २३४, २३५, ३१०, ३११
- चे अनुसरण अल्लाहच्या प्रेमासाठी अत्यावश्यक १९२
- चे आज्ञा पालन अल्लाहचे आज्ञापालन होय ३१२
- च्या प्रेषित्वा विषयी बनी इस्राईलशी वचन २०९
- क़ियामतीच्या दिवशी साक्ष देतील २९२, २९३
- चे अल्लाहतर्फे पाठविले जाणे समस्त जन-जातिंकरीता २९२, २९३
- चा काळ क़ियामती पावेतो २९३
- अंतिम प्रेषित २९३, ३५१, ३५२
- च्या प्रतिष्ठेस गालबोट लावणे २९५
- च्या आज्ञा पालनाचा आदेश २९५
- ला निर्णय करणारा मानणे ३०६, ३०७
- वर ईमान बाळगण्याचे आवाहन ३४०
- वर ईश संदेश अवतरणे ३५०

- ना जीवे मारण्याचा कट ३७९
- बशीर व नज़ीर २८४,२८५,६२८,६२९
- च्या अधिकारात लाभ- हानि पोहचविणे नाही ६२९,६३४
- ना अल्लाहतर्फे केव्हा पाठविले गेले ३८५
- अपरोक्ष ज्ञानाचा दावा नाही ४७४,४७५
- फरिश्ता असण्याचा दावा नाही ४७४, ४७५
- अपरोक्ष ज्ञाता असण्या विषयीचा वाद ४७५
- निरक्षर प्रेषित ६९२, ६९३
- विषयी तौरात व इंजिल मध्ये भाकिते ६१२, ६१३
- चे ओझे व जोखंड उतारणे ६०८, ६०९
- चे समर्थन व सहाय्य ६०८
- भारतातील लोंका करीता ही रसूल आहेत ६१३
- विरूद्ध कट- कारस्थान ६५४, ६५५
- ची दुआ समाधान कारक ७५२
- करीता माफीचे ऐलान ७६२, ७६३

**मृतांना जिवंत करणे** ५६८, ५६९

**मृत ऐकत नाहीत** ४६६, ४६७

**मेलेले जनावर** ३६८,५२८,५२९

**मरीयम**
- चा जन्म १९४
- करीता उपजिविका १९४, १९५
- ची पवित्रता व शुचिर्भूतता १९४, १९६
- ला जगातील स्त्रीयांवर श्रेष्ठत्व १९६, १९७
- वर आळ ३४६, ३४७
- ईश्वर असण्याची श्रद्धा ४४६, ४४७
- सत्य प्रिय ४२०, ४२१

**मरीयम पुत्र (येशू)** ७०६, ७०७

**मुस्लिम** ६६,६७, ६८, ६९, २०१, २०४, ४४२ ४४३, ५३८, ५९२
- मुस्लिम अल्पसंख्यांकांचे प्रश्न व आवाहनाचे कार्य ५८८
- मुस्लिम व अनेकेश्वरवादी मधील फरक ४६०,४६१
- मुसलमान ४१६
- नामधारी मुसलमान ७३७

**मसजिदे हराम** ७२, ७३, ७६, १०६, १०७, १२४, १२५
- चे विश्वस्त ६५८, ६५९
- जवळ करार ६९१
- ची सेवा ४६०, ४६१, ७०१
- जवळ अनेकेश्वरवादी न यावेत ७००, ७०१

**मसजिद**
- ची अप्रतिष्ठा ६०, ६१
- हजर होण्याचे शिष्ठाचार ५५२, ५५३
- ला आबाद करणे ७००,७०१,७०२,७०३
- मसजिदे ज़िरार ७५२, ७५३
- मसजिदे तक़्वा ७५४, ७५५
- मसजिदे कूबा ७५४, ७५५
- मसजिदे नबवी ७५५, ७५६

**मक्केचे भौगोलीक स्थान** ७७

**मुहाजिरीन (दुसऱ्या देशातून आलेले)** ७५०, ७५१, ७५८

**मृत्यु** २३४, २३५, २३८, २४८, २४९, ४४६
- चा अर्थ ७८
- नंतर जीवन २२
- नंतर पुन्हा जिवित केले जाण्याची घटना ३६

**मन व सलवा** ३६, ३७, ६१२

**मूसा** ३०,३४,३५,३६,३७,३८,५०,५८,६६ ३४६,३४७,३५१,३८४,३८६,३८७,३८८,४९५, ४९६,४९७, ५३६, ५३७, ५८६, ५९२, ५९३, ५९६, ५९७,६१२
- चे फिरऔनला आवाहन ५८६
- ची फिरऔन जवळ मागणी की बनी इस्राईलला जाऊ द्यावे ५८६

**मेहर** १३८, १३९, २५८, २७६, २७७, २८२, २८४, ३७४
- चे स्वरूप २५९
- स्त्री चा हक्क २६३
- भरमसाठ मेहर २८३

**मोजमाप करण्यात न्याय राखणे** ५३२

**मरणासन्न अवस्था (नज़ाअ)**
- च्या स्थितीत अल्लाह व रसूल कडे रूजू करणे ३०२, ३०३
- कुरआन व प्रेषिता कडे रूजू करण्याचा अर्थ ३०३

**मानव वंश वृद्धि** १२९

**माता पिता**
- शी सद् व्यवहार २८८, २९०, ५३२, ५३३, ५३४, ५३७

**मतभेद न करणे** ६६६, ६६७

**य**

**याकूबची संतती** ३५०, ३५१

**यहया (अलै.)** ३३,१९४,१९५,१९७,४९२,४९३
- बायबल मध्ये युहन्ना १९५

**यरूशलम (जेरूसलेम)** ३८५, ३८७

**याकूब (अलैहिस्सलाम)** ६६, ४९२, ४९३

**यूनुस (अलैहिस्सलाम)** ३५०, ४९२
**यूसुफ (अलैहिस्सलाम)** ४९२, ४९३
**यहूदी** ३८, ३९, ४५, ४९, ५३, ५६, ५८,६१ ६२, ६३, ६५, ६६, ६८, ७१, ७४, ३८० ३८४, ३९८, ३९९, ४००, ४०१, ४०२, ४१६, ४२२
- पैकी माकडे व डुकरे बनविले गेले ४१०, ४११
- मध्ये उलेमा व फ़ुक़्हा ४११, ४१२, ४१३, ४१४
- संघर्षागनि भडकवितात ४१२, ४१३,४१६
- वर नखे असलेली जनावरे हराम केले गेले होते ५२८, ५२९
- यहुदी मत व ख्रिश्चन मताची हकीगत ६१
- ना मित्र बनविण्यास मनाई ४०८, ४०९

## र

**रक्ताचे नातेवाईक** ६८२, ६८३
**रक्त** ३६८, ३६९, ५२८, ५२९
**रब (पालन कर्ता)** ४, १८, २६, ४४, ५५, ६६, ३५६
- चे स्पष्टीकरण ४
- शी भेट ३०
- चे भय बाळगणे २५४, २५८
- अल्लाह खेरीज इतरांना रब्ब मानण्याचा अर्थ २०३
**रूजू करणे** २३४, २४०
**रहमान व रहीम**
- चे स्पष्टीकरण ४
**रसूल (ईश ग्रंथासह पाठविलेले प्रेषित)**
- मध्ये श्रेष्ठत्व १५०, १५१
- मध्ये विभागणी न करणे ६८, ६९
- चे आज्ञा पालन ४२८, ४२९, ६४२, ६४३, ६६६
- ची जबाबदारी ४२८, ४२९, ४३४
- वर आक्षेप ४५८, ४५९
- ची मानहानि करणे भयंकर अपराध ६९७
- चे मिशन ७११,७१२
- ना कलेश यातना पोहचविणे ७३४
- ईमान बाळगणाऱ्या करीता ईश कृपा ७३४
- शी निष्ठा ७४६
- ईमान धारकां करीता स्नेहशील व दयाशील ७५८, ७५९
**रीती रिवाजांची शरीअत** ५२६
**रज़ाअत** १३४, १३५
**रमज़ान** ९८, ९९
**रूकूअ चा अर्थ** ३१, ३२
**ऋृग्वेद आणि सृष्टि निर्मात्याची कल्पना** ४५५
**रूहुल कुदुस (पवित्र आत्मा)** १५०, १५१, ४४२, ४४३
**रोज़ा** ९४, ९६, ९८, १०६, १०७
- अर्थ ९५, ९६
- चा हेतु ९५, ९६

## ल

**लोक सुधारणा** १२९
**लाच लुचपत** १०२,१०३,२८६,२८७

## व

**वाड वडीलांचे अनुसरण** ८४, ८५, ४३४, ४३६
**विद्वान व उच्चभ्रू**
- ना पालनकर्ता बनविणे ७०६, ७०९
- चे अंधानुकरण ७०७
- चे खोटया मार्गाने धन खाणे ७१४, ७१५
- चे अल्लाहच्या मार्गा पासून रोखणे ६१४, ६१५
**वचन**
- भंग ५०,५१,२०६,२१०,२१२,२५०,६७२ ते ६७५
- पूर्ण करणे ५३२, ५३४
- स्वभाव वचन ५८७
**वर्चस्व**
- धर्माचे वर्चस्व १०७
- ची प्रार्थना १०८,१७२,१७४
- अल्प समूहाचे वर्चस्व बाळगणे १४६
- ईमान धारक वरचढ राहतील २३२, २३३
- काफ़िरांच्या मनात दबदबा २३६, २३७
- अल्लाहची मदत येणे २३७
**वारसा हक्क**
- पुरूष व स्त्री दोघांचा हिस्सा २६२
- कलाला २७०,३५६,३६१
- ज्यांना वचन दिले त्यांचा हिस्सा २८८
- माता पिता व आप्तांचे वारस २८८, २८९
**मुलांचा वारसा हक्क** ३३५
- मुलगा व मुलगीचा हिस्सा समान न राखण्याचे कारण २६७
- संततीचा हिस्सा जास्त ठेवण्याचे कारण २६८
- मृत्युपत्र २६६, २६७, २६८
- वारसा करीता मृत्युपत्र नाही २६७
- अनाथ नातवास काहीतरी देणे २६८
- अनाथ गरीबास काही देणे २६२, २६४
- कर्ज़ाची फ़ेड २६६, २६९, २७०
- अज्ञानी कायदे २६३
- धर्मांची असमतोलता २६८

- वारसा विषयक नियम बनविणे अल्लाहचा हक्क २६६, २६८
- मुले वारस २६३
- नेपोलियनचे सिविल कोड २६८
- हिंदु सिविल कोड २६८
- इंडियन सेक्शन ॲक्ट २६८
- ग़ैर इस्लामी वारसा व्यवस्था लादण्याचा प्रयत्न मोठा अपराध २६८

**व्यभिचार** २७६, २७७, २८२, २८४, ५३३

**व्याज** १६४, १६५, १७०,
- ची निषिद्धता बायबलमध्ये १६५, ३५२
- कारभारविषयक १६६
- काफ़िरांकडून व्याज घेणे १६५
-अवैधतेचे कारण १६९
- व्याजविरहित कर्ज १६७

## श

**शांती आणि न्यायाचा अर्थ** १७, ६४३, ७६६, ७६७

**शेळी मेंढी** ५२५, ५२६,५२९

**शरीर- संबंध (पुरूषांशी)** ५७७, ५८१

**शिफारस**
- सत्कर्माची ३१२
- दुष्कर्माची ३१२

**शरीक (आल्लाहचे माणसाने ठरविलेले सहभागी)** ४८१, ४८२, ४८४, ४८५, ४८९, ४९०, ६०९
- देवी देवतांची कल्पना १५५, १९१
- अल्लाहची संतती असण्याची कल्पना ३५६
- देवमाला ३२९,३३०
- इतर उपास्यांना रब्ब बनविण्याचा अर्थ २०३, २०५
- विनाशकारक २०३
- प्रमाणशून्य बाब २३६
- सहभागी ठरविण्याची मनाई २८८
- अक्षम्य गुन्हा २९६, २९७, ३२८
- काय आहे? २९७, २९८
- मूर्तिपूजा २९७
- शिर्क करणारे ३२८
- देवींना पुकारणे ३२८, ३२९
- गरजपूर्ति करीता एखाद्यास पुकारणे व त्यास उपास्य बनविणे ३२९
- शी उन्दिग्नता ४६२, ४६३, ६२६, ६२८, ६३४
- हराम ५४२, ५४३

**शरीअत भारी जबाबदारी** १७४, १७५, १७६
- शरीअत विषयक व्यवस्थेची स्थापना १७६
- विरूद्ध कायदे बनविणे ७१०
- पासून अलिप्तता ३९
- साधी शरीअत २८९
- शरीअत विषयक कायदे ३६५
- च्या बंधनांचे पालन ३६४,३६५,३६८
- धर्माच्या नावाने खोटी शरीअत तयार करणे ५२१
- अवशेष ३६४,३६८,४०९

**शुएब**
- चा वृत्तांत ५८०, ५८२, ५८३

**शुक्रं (कृतज्ञता)** ३४४, ३४५
- धर्माचा आधार ३
- बाळगणारे ५६८

**शिकार** ४२८,४३०,४३४,४३५
- हलाल होण्याची पद्धति ३७१

**एहरामच्या स्थितीत वर्ज्य** ३६४, ३६५, ३६८,४३२ ४३३,४३४, ४३५
- समुद्राचा शिकार ४३२,४३३,४३४,४३५
- शिकारी जनावरे ३६८, ३७१

**शहीद**
- कोण आहे २३३
- ला मृत जाणू नका २४४
- उपजिविका प्राप्त करीत आहेत २४४
- करीता विशेष जीवन २४५
- करीता भय नाही २४४

**शेतीत अल्लाहखेरीज च्या उपास्यांचा हिस्सा** ५२०, ५२१

**शेजाऱ्याशी सद् व्यवहार** २८८,२८९

## स

**सत्ता**
- अनामत १९१, ३००
- आणि लोक शाहीचा दावा १९१
- आणि राज्य १९१

**संख्याधिक्य**
- प्रमाण नव्हे ५११
- ची अवस्था ५००, ५१०

**सुधार व बिघाड ची वास्तविकता** ६

**सांस्कृतिक व्यवस्थेचे खरे आधार** १९

**समूद चा वृत्तांत** ५७४, ५७५, ७३६

**सार्वमत**
- प्रमाण नव्हे ५११
- ला आदेश देण्याचा स्वभाव समजणे ५११

**सुस्थिती व दुरावस्था** ५८४, ५८५
**सात आकाश** २२
**सब्त (शनिवार)** ४०
- चा धि:क्कार २९६, २९७
- ला तोडणाऱ्यांची घटना ६१४, ६१५
**सजदा** ३४६, ३४७
- ची आयत ६३६
**सूरह (अध्याय)**
- ची क्रमबद्धता ६८७
- सूरह बक़रा ची तिलावत ८
**शांतीचे अवतरण** ७०२, ७२०
**सुलेमान (अलैहिस्सलाम)** ३५०,४९२, ४९३
- वर जादू च्या आक्षेपाचे खंडन ५४, ५५,
**सलाम करणे** ३१२ ते ३१९
- ची पद्धत इस्लामी संस्कृति ३१३
**साक्ष** १७०,१७२,४३८, ४३९, ४४०
- शपथपूर्वक सांगणे ४३९
- साक्षी मुस्लिमेतर ४३९
- परिस्थितीची साक्ष ४३९
- अल्लाह करीता ३३८, ३३९
**सैतान** १६, १७, २३, २६, २७, ८२, ८४, ८५, ११४, ११५, २४४, २४५, ३२८, ३३०, ४२८, ४२९, ४८४, ४८५, ५०६, ५०७, ५१०, ५११, ५१२, ५१३, ५२४, ५२५
- च्या असत्याचा अर्थ १६६
- चे दावे ३३२
- वाईट साथीदार २९२
- चा कावा ३०८
- चे अनुसरण करणे ३०४
- ला पुकारणे ३२८
- चे पूजक ३३०
- कोण आहे ५४८
- इब्लीस ३३०
- ची योजना ३३०
- चा अधिकार ३३०
- ला मित्र बनविणे ३३२
- इच्छित नाही की माणसाने धर्माबाबत सत्य प्रिय व्हावे ३३३
- चे आदम व हव्वाच्या मनात कुविचार प्रेरित करणे ५५०, ५५१
- द्वारे दुष्कर्मांना सुशोभित बनविणे ४७०,४७१,६६९
- चे विस्मरण घडविणे ४८४, ४८५
- उघड वैरी ५५०, ५५१
- ला अमांगल्याची देवता समजणे योग्य नाही ५५४
- दिसून न येणे याच्या अस्तित्वाचा नकार नव्हे ५५४
- तर्फे मनात गाँधळ ५५०, ५५१
**सालेह (अलैहिस्सलाम)** ५७४, ५७५
**सब्र (धीर-संयम)** ७८, ७९, ९१, २२४, २४६, २५४, २८२, ५८८, ५९७, ६६६, ६६७,
**सहाबा (पैगंबरांच्या सहवासातील अनुयायी)** ७५१
**सदक़ा (दान)**
- करीता स्वच्छ शुद्ध कमाई १६३, १६५
- चा विनिमय ७२८ ते ७३३
- वसूल करण्याचा आदेश ७५२, ७५३
- आणि शुद्धि ७५२
**सिराते मुस्तक़ीम (सरळ मार्ग)**
- चे स्पष्टीकरण ६
**सफ़ा मरवा** ७८, ७९,८०
**सूर** ४८४
**स्थान** ४२८
**संसती**
- क़ियामतीच्या दिवशी कामी येणार नाही १८४, २२४
**स्वच्छ शुद्ध वस्तू** ८४,८५,८६,८७,३६८,३७१
**स्वच्छ शुद्ध पत्न्या** २०
**संन्यास** ५५४
**स्त्री** २८८,२८९, ३३४
- हक़्क १३०, १३१
- अज्ञान काळात वारस हक्का पासून वंचित २६३
- पुरूषांचा दर्जा १३०, १३१
- ची साक्ष १७०
- ची मानसिकता १७०
- शेतींची उपमा १२८, १२९
- ला इस्लामने वारस बनविले २६३
- स्त्रीयांचा जबरदस्ती पूर्वक वारस बनणे २७६
- इद्दत नंतर मोकळी २७७
- ला धन दिल्यानंतर परत न घेणे २८०
- व्यभिचार स्थितीत अर्धचंद्र २७६, २७७
- ज्या स्त्रीयांशी निकाह हराम आहे २८० ते २८१
- निसर्गत: पुरूषांशी समान नाहीत २८६
- पुरूष स्त्रीयांचे व्यवस्थापक २८८, २८९
- सत्शील स्त्रीया कोणत्या २८८, २८९
- समानतेची अतिशयोक्ति पूर्ण कल्पना २८९
- चे पुरूषा सारखे बनणे ३३३

## ह

**हलाल जनावरे** ३६४, ३६८
**हलाल वस्तु** ३६८
**हज्ज व उमरा** ८०, १०२, १०३, १०६, १०८, १११, ११२, ११५, २१४, २१६, ३६६
- उमराचे स्पष्टीकरण ८०
- हज्जचे महीने ११०
- चा आत्मा १०८
- अरफात ११०, १११
- जबले रहमत १११
- मुज़दल्फा १११
- अय्यामे तशरीक ११५
- हरम मक्का १०२,१०३,१०४,१०७
- हज्जे अकबर ६८८, ६८९
- हाजींना पाणी पाजणे ७००
**हुदेबिया** ६९६, ६९७
**हराम गोष्टी** ३६४, ३६८, ३७०, ३७१
- शी अभिप्रेत रक्त, व्याज ८६, ८७, ८८, ३६८
- अल्लाहखेरीजच्या नावाने बळी ८६, ८७,
- या गोष्टींच्या अवैधतेचा उद्देश ८६, ८७, ८८
- हराम ठरविण्याचा अर्थ ३६८,३६९
- हराम माल खाणे ३९८,३९९, ४१२,४१३
**हलाल चा फैसला** ५२१,५२२
**हम्द चे स्पष्टीकरण** ३
**हुनैन** ७०२, ७०३
**हवारी** २००, २०१, ४४२, ४४३, ४५०,४५१
**हृदय**
- मधील गोष्टींवर पकड १७२
- ची कठोरता ४२, ४३, ३८०, ३८१
- वर मोहर १३
- मध्ये विकृति १३, १६,
**हत्तया** २८६, २८७, ५३२, ५३३
- गुन्हा ३१६, ३१७
- प्रेषित हत्त्या ४१६, ४१७
**हारूत व मारूत** ५४, ५५
- बाबत निरर्थक किस्से ५४, ५५
**हारून** ३५०, ३८६, ४९२, ४९३, ५९२, ५९३, ६०२, ६०६, ६०७
- वर वासरू बनविण्याच्या आरोपाचे खंडन ६०६, ६०७
**हिजरत** १२२, १२३, ३२०, ३२१, ६८२, ६८३, ७००
**हिदायत (ईश- मार्गदर्शन)** १, १०, ११, १३, २०, २६, ३२, ४८, ६८, ९८, १०६, १८०, १८८, २००, २०६, २०७, २१४, २१८, ४०४, ४०५, ४९६, ४९७, ५१६, ५१३, ६१२, ६२४, ६२८
- लपविणे धि:क्कार कारक ७८, ७९
- चा अर्थ ७०६

## क्ष

**क्षमावृत्तीने वागणे** ६३४, ६३५



زیر اہتمام: صدیق قریشی

Pixel Arts
Mobail : 9820790615
Printed at: Fatima Printers
Tilak Nagar, Saki Naka Mumbai - 400070